टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
इतिहास विभाग

तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत
'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

# "पंडिता रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य"
# (इ. स. १८८९ ते इ. स. १९८९)

संशोधक
श्री. नंदकुमार ज्ञानोबा जाधव
एम. ए., सेट.

मार्गदर्शक
डॉ. दीपक गोविंद देशपांडे
प्राचार्य, बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी,
ता. पलूस, जि. सांगली (महाराष्ट्र)

जानेवारी २०१४

## ✻ मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र ✻

प्रमाणित करण्यात येते की, श्री. जाधव नंदकुमार ज्ञानोबा यांनी "पंडिता रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य (सन १८८९ ते सन १९८९)" या विषयावर संशोधन प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केला आहे.

प्रस्तुत संशोधन प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वत: लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठाच्या पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही. संशोधकाच्या संशोधन कार्याबाबत मी समाधानी आहे.

मार्गदर्शक
डॉ. दीपक गोविंद देशपांडे
प्राचार्य, बाबासाहेब चितळे महाविद्यालय,
भिलवडी, ता. पलूस, जि. सांगली

स्थळ

दिनांक

# ✻ प्रतिज्ञापत्र ✻

मी, श्री. नंदकुमार ज्ञानोबा जाधव प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, "पं. रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य (सन १८८९ ते सन १९८९)" हा संशोधन प्रबंध स्वत: लिहिलेला असून तो टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केला आहे.

हा संशोधन प्रबंध यापूर्वी कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

संशोधक विद्यार्थी
श्री. नंदकुमार ज्ञानोबा जाधव

स्थळ

दिनांक

# * ऋणनिर्देश *

"पंडिता रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य (सन १८८९ ते सन १९८९)" या प्रबंधाच्या कार्यसिध्दीसाठी अनेक मान्यवर व्यक्ती व संस्था यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यांच्या ऋणनिर्देश या ठिकाणी मी करीत आहे. डॉ. श्रध्दा कुंभोजकर (इतिहास विभाग प्रमुख), टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे व प्रा. विजय कारेकर, अधिष्ठाता, तात्विक व सामाजिक शास्त्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांनी प्रस्तुत विषयावर संशोधन करण्यास परवानगी देऊन मला उपकृत केले त्या बद्दल त्यांना मन:पूर्वक धन्यवाद.

सर्वात महत्वाचे म्हणजे या प्रबंधात मूर्तस्वरुप येण्यास ज्यांचे बहुमोल मार्गदर्शन उपयोगी ठरले ते माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. दीपक देशपांडे यांचे ऋण मी शब्दांत व्यक्त करु शकत नाही. त्यांनी अत्यंत आपुलकीने, निरपेक्ष वृत्तीने आणि त्याचबरोबर परखडपणे त्यांनी मला मार्गदर्शन केले. त्यामुळे या ठिकाणी त्यांचा ऋण मानणे माझे कर्तव्य समजतो. तसेच सरांचे बंधू व सरांचे कुटूंबीय यांनी मला वेळोवेळी आपुलकीने वागविले त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी राहीन.

एकोणिसाव्या शतकाचे गाढे अभ्यासक डॉ. राजा दीक्षित यांनी या प्रबंधाच्या विषय निवडी संदर्भात मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचेही ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो. त्याचप्रमाणे प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष प्राचार्य नंदकुमार निकम, तसेच प्राचार्य सूर्यवंशी यांचे आशिर्वाद मला लाभले त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

नेताजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. किसनदादा निंबाळकर, कार्याध्यक्ष श्री. चंद्रकांत शेळके, सचिव श्री. धनाजीभाई शेळके व सर्व पदाधिकारी यांनी या प्रबंधाच्या पूर्ततासाठी सतत प्रोत्साहन व प्रेरणा दिली. त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानत आहे. आमच्या सुभाष बाबुराव कुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. आर. निंबाळकर सर यांच्या सहकार्यामुळे व प्रोत्साहनामुळे मी हा प्रबंध लिहू शकलो त्यांचे ऋणही मोलाचे आहेत. या प्रबंध लेखनासाठी मुक्ति मिशनशी संबंधीत महत्त्वाची कागदपत्रे व माहिती संकलित करण्यासाठी माजी अधिक्षिका वेणूताई इंगळे, विद्यमान अधिक्षिका लॉरेन्स फ्रान्सिस, रेव्ह गुढे अंकल, तसेच समाजसेविका वैशाली, आयमान शरयू, श्रीमती डोंगरे मॅडम व शारदासदनाच्या मुख्याध्यापिका मिसेस पावले मॅडम यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी या संशोधन कार्यासाठी जे मोलाचे सहकार्य केले, त्याबद्दल

मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. डॉ. अरुणा मोरे, प्रा. स्वाती राजन व प्रा. शोभा वाईकर यांनी पंडिता रमाबाईंच्या स्त्री सुधारणा कार्यावरील वेगवेगळ्या प्रकारची माहिती व लघुशोध प्रबंध उपलब्ध करुन दिला त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

आमच्या महाविद्यालयातील प्रा. भाऊसाहेब गव्हाणे, प्रा. श्रीमती गुजर (साळुंके), प्रा. अशोक दिवेकर, प्रा. महादेव थोपटे, प्रा. खराडे, प्रा. सोडनवर, प्रा. तोरडमल, प्रा. तन्वीर शेख, प्रा. राजेंद्र गायकवाड, प्रा. दरेकर, प्रा. राऊत, श्रीमती शेख, प्रा. जावळे व इतर ज्ञात व अज्ञात सहकारी यांनी सदर संशोधन कार्यासाठी जे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मदत केली त्याबद्दल या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. आमच्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकेतर वर्ग विशेषत: श्री. ओव्हाळ, श्री. शेंडगे व श्री. काळे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानतो.

तसेच, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथपाल व इतर कर्मचारी व सु. बा. कुल महाविद्यालयातील ग्रंथपाल श्रीमती मनिषा जाधव, ग्रंथालय सेवक श्री. निलेश टेकवडे यांनी प्रस्तुत संशोधन कार्यासाठी आवश्यक ते संदर्भग्रंथ, नियतकालिके, कात्रणे, लेख उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

सर्वात महत्वाचे ऋण म्हणजे माझे वडील कै. ज्ञानोबा पांडुरंग जाधव यांचे. हे संशोधन कार्य पूर्ण होताना ते असते तर मी स्वत:ला अत्यंत भाग्यवान समजलो असतो. माझी आई स्वत: अडाणी, निरक्षर असूनही तिने स्वत: कष्ट करुन आम्हाला शिकविले, या दोन्ही माऊलींच्या ऋणातच मी कायम राहू इच्छितो. माझ्या या प्रबंधाच्या कामास सर्वच बाबतीत मनापासून सहकार्य केले ती माझी पत्नी सौ. संगिता जाधव व माझी मुलगी प्रणाली, मुलगा प्रणय तसेच माझे मोठे बंधू श्री. विजय जाधव यांचे सर्वोतोपरी सहकार्य लाभले.

या संशोधन अहवालासाठी अक्षर जुळणी व आकर्षक मांडणी करुन दिल्याबद्दल गुरुकृपा ऑफसेट प्रिंटर्सचे श्री. शरद जगताप यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

प्रा. नंदकुमार जाधव
संशोधक

# ❋ अनुक्रमणिका ❋


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ | I |
| | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | II |
| | प्रमाणपत्र | III |
| | प्रतिज्ञापत्र | IV |
| | ऋणनिर्देश | V |
| | अनुक्रमणिका | VII |
| प्रकरण | **प्रास्ताविक व संशोधन पध्दती** | |
| पहिले | १.० प्रस्तावना | १ |
| | १.१ अभ्यासाची भूमिका | १ ते ४ |
| | १.२ अभ्यास विषय निवडण्याची कारणे | ४ ते ७ |
| | १.३ अभ्यासाची उद्दिष्टे | ८ ते ९ |
| | १.४ पूर्व संशाधनाचा आढावा | ९ |
| | १.५ संशोधनाची गृहितके | १० |
| | १.६ संशोधन पध्दती | |
| | १.६.१ इतिहासाच्या पुनर्लेखनाची आवश्यकता | ११ |
| | १.६.२ इतिहास संशोधनाचे प्रकार | ११ |
| | १.६.३ संदर्भ पध्दती | १२ |
| | १.६.४ सर्वेक्षण पध्दती | १२ |
| | १.६.५ मुलाखत पध्दती | १२ |
| | तळटीपा | १४ |
| प्रकरण | **पंडिता रमाबाईंच्या समकाळातील स्त्री जीवन** | |
| दुसरे | २.१ प्रस्तावना | १५ ते १७ |
| | २.२ कन्येचा जन्म | १७ ते २० |
| | २.३ सती प्रथा | २० ते २३ |
| | २.३.१ सती प्रथेस विरोध | २३ ते २६ |
| | २.४ बालविवाह | २६ ते ३१ |
| | २.४.१ बालविवाह विरोधी चळवळ | ३१ ते ३६ |
| | २.५ विधवांची स्थिती | ३७ ते ४० |
| | २.५.१ विधवांची संख्या | ४० ते ४२ |
| | २.५.२ विधवा पुनर्विवाह चळवळीचे प्रयत्न | ४२ ते ४३ |
| | २.५.३ महाराष्ट्रातील विधवा पुर्नविवाह | ४४ ते ४८ |

| | | |
|---|---|---|
| | २.५.४ विधवा पुर्नविवाहासाठी संस्थात्मक प्रयत्न | ४८ |
| | २.५.५ विधवांची मानसिकता | ४८ ते ४९ |
| | २.६ स्त्री शिक्षण | ४९ ते ५२ |
| | २.६.१ तत्कालीन शिक्षण पध्दती | ५२ |
| | २.६.२ स्त्री शिक्षणासाठी मिशनऱ्यांचे प्रयत्न | ५३ |
| | २.६.३ स्त्री शिक्षणासाठी भारतीयांचे प्रयत्न | ५४ |
| | २.६.४ स्त्री शिक्षणासाठी सरकारचे प्रयत्न | ५४ ते ५५ |
| | २.६.५ स्त्रियांचे उच्च शिक्षण | ५५ ते ५७ |
| | २.६.६ मुलींच्या शिक्षणासाठी प्रलोभने | ५७ |
| | २.६.७ स्त्री शिक्षणासाठी आर्थिक मदत | ५७ ते ५८ |
| | २.६.८ स्त्री शिक्षणासंदर्भात सुधारकांची मते | ५८ ते ५९ |
| | २.६.९ स्त्रियांच्या वैद्यकीय शिक्षणाचा विचार | ५९ ते ६१ |
| | तळटीपा | ६२ ते ७१ |
| प्रकरण तिसरे | **पंडिता रमाबाईंच्या प्रारंभिक जीवनाचा आढावा** | |
| | ३.१ प्रस्तावना | ७२ |
| | ३.२ पूर्ववृत्तांत | ७२ ते ७७ |
| | ३.३ रमाबाईंचे प्रारंभिक जीवन | ७८ ते ७९ |
| | ३.३.१ आई वडिलांचा मृत्यू | ७९ ते ८१ |
| | ३.३.२ हिंदू धर्मातील भोंदूगिरीचा प्रत्यय | ८१ ते ८३ |
| | ३.४ रमाबाईंचे बंगालमधील वास्तव्य | ८३ ते ८५ |
| | ३.५ ख्रिस्ती धर्माचे प्रथम दर्शन | ८५ ते ८६ |
| | ३.६ पंडिता रमाबाईंचा विवाह | ८६ ते ९० |
| | ३.६.१ पं. रमाबाईंच्या विवाहाच्या दिनांकाविषयी मतभिन्नता | ९० ते ९१ |
| | ३.६.२ पंडिता रमाबाईंचे वैवाहिक जीवन | ९१ ते ९३ |
| | ३.७ पंडिता रमाबाईंचे महाराष्ट्रात आगमन | ९३ ते ९६ |
| | ३.८ आर्य महिला समाजाची स्थापना | ९६ |
| | ३.८.१ आर्य महिला समाजाचे उद्देश व नियम | ९६ ते ९८ |
| | ३.८.२ आर्य महिला समाजाच्या कार्याचा आढावा | ९८ ते ९९ |
| | ३.९ हंटर कमिशनपुढील साक्ष | ९९ ते १०२ |
| | ३.१० इंग्लंडला जाण्याचा निर्णय | १०२ ते १०४ |
| | ३.१०.१ इंग्लंडला जाण्याच्या निर्णयाची चिकित्सा | १०४ ते १०७ |
| | ३.११ पंडिता रमाबाईंचे धर्मांतर | १०७ ते ११२ |
| | तळटीपा | ११३ ते ११९ |

| | | |
|---|---|---|
| प्रकरण चौथे | **पंडिता रमाबाईंचे शारदासदनाच्या कालखंडातील कार्य** (सन १८८९ ते सन १८९८) | |
| | ४.१ प्रस्तावना | १२० |
| | ४.२ शारदासदन स्थापनेची पार्श्वभूमी | १२० |
| | ४.२.१ पंडिता रमाबाईंचा अमेरिकेला जाण्याचा निर्णय | १२० ते १२१ |
| | ४.२.२ पंडिता रमाबाईंचे अमेरिकेतील वास्तव्य | १२१ ते १२७ |
| | ४.२.३ पंडिता रमाबाईंचे जपानमधील वास्तव्य | १२७ ते १२९ |
| | ४.३ शारदासदनाची स्थापना | १२९ ते १३१ |
| | ४.३.१ शारदासदनाची वाटचाल | १३१ ते १३२ |
| | ४.३.२ शारदासनातील प्रवेशित विद्यार्थीनींचा सांख्यिकीय तपशिल | १३२ |
| | ४.३.३ शारदासदनचे पुणे येथे स्थलांतर | १३२ ते १३४ |
| | ४.३.४ शारदासदनमधील शिक्षण | १३४ ते १३६ |
| | ४.३.५ शारदासदनातील वातावरण | १३६ ते १४० |
| | ४.४ महर्षि धोंडो केशव कर्वे यांचा पुर्नविवाह | १४० ते १४१ |
| | ४.५ पंडिता रमाबईंच्या कार्याचा इंडोनेशियावर प्रभाव | १४१ |
| | ४.६ पंडिता रमाबाईंची राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनातील कामगिरी (डिसें. १८८९) | १४१ ते १४२ |
| | ४.७ संमतिवयाच्या बिलास पाठींबा | १४२ ते १४४ |
| | ४.८ शारदासदनातील विद्यार्थीनींच्या हकिकती | १४४ ते १५१ |
| | ४.९ शारदासदनावर धर्मांतराचे आरोप | १५१ ते १५६ |
| | ४.१० शारदासदनातील तुळशी प्रकरण | १५६ ते १५८ |
| | ४.११ शारदासदनाची ख्रिस्तीकरणाकडे वाटचाल | १५८ ते १६४ |
| | ४.१२ पंडिता रमाबाईंनी दुष्काळातील स्त्रियांसाठी केलेले कार्य | १६४ ते १६७ |
| | ४.१३ शारदासदनाच्या कार्याचा सारांश | १६७ ते १६९ |
| | ४.१४ रमाबाई असोशिएशन | १६९ ते १७२ |
| | ४.१५ शारदासदन शाळेचा वर्षनिहाय तपशील | १७२ ते १७७ |
| | तळटीपा | १७८ ते १८६ |
| प्रकरण पाचवे | **मुक्ति मिशनचे कार्य** (सन १८९८ ते सन १९८९) | |
| | ५.१ मुक्ति मिशनच्या स्थापनेची पार्श्वभूमी | १८७ ते १८९ |
| | ५.२ मुक्ति मिशनची उभारणी | १९० |
| | ५.२.१ कृपासदन | १९० ते १९२ |
| | ५.२.२ प्रिती सदन | १९२ ते १९३ |
| | ५.२.३ बार्तमी सदन | १९३ ते १९४ |

| | | |
|---|---|---|
| | ५.२.४ सदानंद सदन | १९४ |
| | ५.२.५ मुक्ति मिशन चर्च | १९४ ते १९६ |
| | ५.२.६ मुक्ति मिशनमधील विहीरी | १९६ ते १९७ |
| | ५.२.७ मुक्ति मिशनमधील मुद्रणालय | १९८ ते १९९ |
| | ५.२.८ शांतिसदन | १९९ ते २०० |
| | ५.३ पंडिता रमाबाईंचे मुक्ति मिशनच्या कालखंडातील कार्य (सन १८९८ ते सन १९२२) | २०० ते २०१ |
| | ५.३.१ मुक्ति मिशनवर होणारी टीका | २०२ ते २०८ |
| | ५.४ द अमेरिकन रमाबाई असोशिएशन | २०८ ते २०९ |
| | ५.४.१ द अमेरिका रमाबाई असोशिएशन तर्फे दिलेली आर्थिक मदत | २०९ ते २११ |
| | ५.५ मुक्ति मिशनमधील व्यवस्थापकीय विभाग | २११ |
| | ५.५.१ कौटुंबिक विभाग | २११ ते २१४ |
| | ५.५.२ विवाह विभाग | २१४ ते २१५ |
| | ५.५.३ वैद्यकिय विभाग | २१५ ते २१९ |
| | ५.५.४ शेती विभाग | २१९ ते २२० |
| | ५.५.५ पशुपालन विभाग | २२० ते २२३ |
| | ५.५.६ शिक्षण विभाग | २२३ ते २३२ |
| | ५.५.७ व्यवसाय विभाग | २३२ ते २३६ |
| | ५.६ मुक्ति मिशनमधील धर्मसंजीवन | २३६ ते २४१ |
| | ५.७ मुक्ति मिशनचे कार्य | २४१ |
| | ५.७.१ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनचे कार्य (सन १९२३ ते सन १९८९) | २४१ ते २४३ |
| | ५.७.२ मुक्ति मिशनचा नामविस्तार | २४३ |
| | ५.७.३ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनची कायदेशीर नोंदणी | २४३ ते २४४ |
| | ५.८ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनमधील कुटूंबपध्दती | २४४ ते २४७ |
| | ५.९ कृपासदन | २४७ ते २४९ |
| | ५.१० शैक्षणिक विभाग | २४९ ते २५० |
| | ५.१०.१ शारदासदनच्या मुख्याध्यापिकांचा तपशिल | २५० ते २५१ |
| | ५.१०.२ विद्यार्थी संख्या | २५१ ते २५३ |
| | ५.११ दत्तक विभाग | २५३ ते २५४ |
| | ५.१२ वैद्यकिय सेवा विभाग | २५५ ते २५८ |
| | ५.१३ परदेशी परिषदा | २५८ |
| | ५.१३.१ अमेरिकेची परिषद | २५८ ते २५९ |

| | | |
|---|---|---|
| | ५.१३.२ ऑस्ट्रेलियन परिषद | २५९ ते २६० |
| | ५.१३.३ इंग्लिश परिषद | २६० ते २६१ |
| | ५.१३.४ स्वीडन परिषद | २६१ |
| | ५.१३.५ स्कॉटलंड परिषद | २६१ |
| | ५.१३.६ हॉलंड परिषद | २६२ |
| | ५.१३.७ कॅनडा परिषद | २६२ ते २६३ |
| | ५.१३.८ न्यूझीलंड परिषद | २६३ |
| | ५.१४ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या सेवा कार्यात सहभागी झालेल्या परदेशी मिशनरी स्त्रिया | २६३ ते २६५ |
| | ५.१५ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनची प्रशासकीय माहिती | २६६ |
| | ५.१५.१ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या अधिक्षिका | २६६ ते २६८ |
| | ५.१६ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनची नवी संरचना | २६८ |
| | ५.१६.१ सामाजिक देखभाल | २६८ |
| | ५.१६.२ प्रशासकीय देखभाल | २६८ |
| | ५.१६.३ निवासीय देखभाल | २६९ |
| | ५.१६.४ संघाची देखभाल | २६९ |
| | ५.१७ विस्तारीत गृहे | २७० ते २७१ |
| | ५.१८ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनचा दृष्टांत | २७१ |
| | ५.१९ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनचे निवेदन | २७१ ते २७३ |
| | तळटीपा | २७४ ते २८५ |
| प्रकरण सहावे | **उपसंहार** | |
| | ६.१ प्रस्तावना | २८६ ते २८७ |
| | ६.२ समकालीन सुधारकांच्या तुलनेत पंडिता रमाबाईंच्या कार्याचे महत्व | २८७ ते २९८ |
| | ६.३ पं. रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य दुर्लक्षित का राहिले? | २९८ ते ३०५ |
| | ६.४ पं. रमाबाई व मुक्ति मिशनच्या कार्याची आजच्या काळातील गरज | ३०६ ते ३१० |
| | तळटीपा | ३११ ते ३१३ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३१४ ते ३२४ |
| | परिशिष्टे | ३२५ ते ३६९ |

# प्रकरण १ ले

# प्रास्ताविक व संशोधन पध्दती

## १.० प्रस्तावना :

"राष्ट्रातील मोठमोठ्या व्यक्तींची चरित्रे म्हणजेच राष्ट्राचा इतिहास होतो, असे एक विधान आहे व ते बहुंशी खरे आहे... लहान व्यक्तींची चरित्रे व मोठ्या व्यक्तींची चरित्रे मिळून समाजाचा संपूर्ण इतिहास होतो... केवळ मोठमोठ्या व्यक्तींच्याच चरित्राने समाजाचा इतिहास संपूर्ण होत नाही, पक्के समजून पाश्चात्य इतिहासकार बहुजन समाजस्थितीसंबंधी देववेल तितकी सशास्त्र व सप्रमाण माहिती आपल्या इतिहासातून देत असतात. व्यक्तीच्या हातून व विशिष्ट काली व विशिष्ट स्थळी घडलेल्या अनेक प्रसंगाचे मुद्‌देसूद, तपशीलवार व व्यवस्थित वर्णन देता देता विशिष्टकाली व विशिष्ट देशात कोणत्या महाविचाराची कशी उत्क्रांती झाली व काय परिणाम झाले, हे वर्तमान व भावी पिढ्यांना दाखवून देण्याचे भूत व वर्तमान इतिहासांचे मुख्य प्रयोजन आहे."[१]

– वि. का. राजवाडे

## १.१ अभ्यासाची भूमिका :

"थोर व्यक्तींची चरित्रे व त्यांनी बजावलेली कामगिरी म्हणजे इतिहास होय."[२] (History is nothing but the biographies of great man) अशी इतिहासाची व्याख्या कार्लाईल या विचारवंताने केली आहे. काही श्रेष्ठ व्यक्ती आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर राष्ट्रासाठी उपयोगी ठरतात. त्यांच्या विचारामुळे समाजाची दिशा ठरते. त्यांचे कार्य समाजासाठी मार्गदर्शक ठरते. अशी व्यक्ती समाजाच्या सार्वकालीक प्रेरणा ठरतात. एखाद्या थोर व्यक्तीचे चरित्र हे त्या समाजाचा त्या काळातील इतिहास असतो. त्या व्यक्तीच्या कार्याची त्या काळातील घडामोडींवर छाप पडलेली असते. प्रत्येक ऐतिहासिक व्यक्ती त्या त्या काळाचे अपत्य असते. तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिस्थितीनुसार त्या व्यक्तींचे व्यक्तिमत्व घडते. कर्तबगार व्यक्ती त्या त्या काळातील इतिहासाच्या केंद्रस्थानी असते.

संशोधनाचा विषय जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या कार्याशी निगडीत असतो तेव्हा संबंधित व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवावे लागते. त्याच्या समकाळातील अभ्यासाच्या साधनांची जुळवाजुळव

करावी लागते. संबंधित व्यक्तीच्या कार्याचा आढावा घ्यावा लागतो. त्यासाठी व्यक्तीची कौटुंबिक पार्श्वभूमी व तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे आकलन व्हावे लागते. संबंधित व्यक्तीची झालेली जडणघडण, लोकोत्तर कार्य व त्या व्यक्तीने भावी पिढ्यांना जो वैचारिक वारसा दिला, तेथपर्यंतच्या सर्व घटना अभ्यासाच्या कक्षेत येतात. ऐतिहासिक कार्यकरणाच्या व्यक्तिंविषयी मिस वेजबुड लिहितात, "समूहाचे किंवा वर्गाचे घटक म्हणून माणसांचे जे वर्तन घडते त्यापेक्षा व्यक्ती या नात्याने त्यांचे जे वर्तन घडते त्यात मला अधिक रस आहे. .... या माणसांनी जी कृत्ये केली त्या कृत्यांच्या पाठीमागील त्यांच्या भावना आणि हेतू जाणून घेण्याचा प्रयत्न इतिहासात महत्त्वाचा आहे."[3] संबंधित व्यक्तीने स्वत: जे ग्रंथ लिहिले, पत्रव्यवहार केला असेल, भाषणे, मुलाखती दिल्या असतील, नियतकालिके सुरु केली असतील अशा साधनांना मूलगामी संशोधन साहित्य म्हणून महत्व प्राप्त होते. या संशोधनाद्वारेच त्या व्यक्तीचे विचार व कार्य अधिकृतरित्या समजू शकते. समाजावरील उपकारमूल्य समजू शकते.

याशिवाय तत्कालीन नियतकालिकांमध्ये, सरकारी अहवालामध्ये, समकालीन विचारवंतांच्या ग्रंथ लिखाणात त्या व्यक्तीच्या कार्याचा मागोवा घेण्यात आलेला असतो. या समकालीन साधनांमधून व्यक्तींच्या कार्याची सकारात्मक वा नकारात्मक चर्चा केलेली असते. ही चर्चा कधी पक्षपातीपणे तर कधी नि:पक्षपातीपणे असते. व्यक्तीच्या कार्याला झालेला विरोध व मिळालेला पाठिंबा याची माहिती असते. या साधनांच्या अभ्यासातूनच व्यक्तीच्या कार्याचे मूल्यमापन करता येते.

वरील दृष्टीने अवलोकन केल्यास एकोणिसाव्या शतकाच्या इतिहासामध्ये अनेक श्रेष्ठ व्यक्ती होऊन गेल्या. या व्यक्तींच्या कर्तृत्वाचा, विचारांचा प्रभाव त्या काळावर पडला. विसाव्या शतकातील पुरोगामी चळवळींना या व्यक्तींच्या कार्यातून प्रेरणा मिळाली. आजच्या एकविसाव्या शतकामध्येही त्या व्यक्तींच्या कार्याचा वारसा त्यांचे अनुयायी संस्थात्मक पातळीवर चालवितात. अशा "कर्तृत्त्ववान माणसांच्या हातून ज्या कृती घडल्या त्याबद्दल त्यांचे स्वत:चे म्हणणे काय होते याचा शोध घेणे हा इतिहासाचा विषय आहे."[४]

एकोणिसावे शतक प्रबोधनाचे मानले जाते. या काळातील समाज परिवर्तनाच्या इतिहासात लोकहितवादी, न्या. रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, बाळशास्त्री जांभेकर, विष्णुबुवा ब्रम्हचारी, विष्णुपंत पंडित, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा जोतिराव फुले यांची नावे

प्रामुख्याने घेतली जातात. या काळात समाजसुधारणा चळवळीचे नेतृत्व करताना एखादी स्त्री क्वचितच आढळते. एकोणिसाव्या शतकातील सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, आनंदीबाई कर्वे इ. स्त्रियांचे सामाजिक कार्य महत्वाचे मानले जाते. मात्र या स्त्रियांना उत्तुंग व्यक्तिमत्व असलेले पती लाभले. त्यांनी पतीच्या समाजकार्याच्या परिघात राहून मदत केली. या व्यक्तींनी केलेल्या प्रबोधनामुळे इतिहासाच्या स्वरुपात मोठा बदल घडवून आणला. "देव व दैववाद मागे पडून माणसाच्या कर्तृत्वावरचा विश्वास जागवला."[५] भारतीय प्रबोधन काळ हा वसाहतवादाच्या काळात सुरु झाले. "या काळातील इतिहासलेखन राष्ट्रवादाच्या कोटीक्रमामध्ये फिरत राहिले. या काळात अब्राह्मणी चळवळीतून झालेली स्त्री प्रश्नांची मिमांसा दुर्लक्षित राहिली. स्त्रियांच्या शोषित अवस्थेचा इतिहास लिहीताना ब्राह्मण ग्रंथांच्या आधारे विश्लेषण करुन इतिहास मांडला. स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या पहिल्या टप्प्यात रजिया सुलतान, झाशीची राणी, ताराबाई शिंदे, पं. रमाबाई यांच्या कार्याची वर्णने लिहीली गेली. ही वर्णने स्त्रियांचा इतिहासामध्ये समावेश करण्यासाठी महत्त्वाची ठरली."[६]

एकोणिसाव्या शतकातील स्त्री उद्‌धाराच्या प्रणेत्या पं. रमाबाई यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. त्यांनी केलेले स्त्रीसुधारणा विषयक कार्य, त्यांचे विचार, त्यांचे शारदासदन व मुक्ती मिशनद्वारे संस्थात्मक पातळीवर केलेले कार्य व त्यांच्या कार्याचा दीर्घ वारसा इ. बाबी इतिहासात दुर्लक्षितच राहिल्या. देवदत्त नारायण टिळक यांनी महाराष्ट्राची तेजस्विनी या ग्रंथातून पं. रमाबाईंचे चरित्र उजेडात आणले. त्या आधी क्लेमेंटिना बटलर, मॅकनिकोल निकॉल, डायर हेलन, अंडरहील बार्बारा या पं. रमाबाईंच्या समकालीन परदेशी लेखिकांनी पं. रमाबाईंचे चरित्रलेखन केले. पण हे चरित्र ग्रंथ इंग्रजी भाषेतून असल्यामुळे भारतीय समाजापर्यंत पोहोचले नाहीत. पं. रमाबाईंनी धर्मांतर केले होते. त्यामुळे हिंदू समाजाने त्यांच्या कार्याला समाजमान्यता दिली नाही. मुक्ति मिशन एक ख्रिस्ती संस्था म्हणून उपेक्षित राहिली.

पं. रमाबाई या तत्कालीन समाजरचनेत धाडसी पाऊल टाकणाऱ्या पहिल्या महिल्या होत्या. त्यांनी स्त्री सुधारणेचे प्रभावी कार्य केले. "स्त्री जीवनाशी निगडीत असणाऱ्या तत्कालीन रुढी परंपरांविरुध्द बंड पुकारले. बालविधवांच्या व निराधार परित्यक्त्या, दुर्वतनी स्त्रियांच्या उद्‌धारासाठी प्रयत्न केले. विधवांच्या शिक्षणाचा क्रांतीकारी प्रयोग सुरु केला. हजारो निराधार स्त्रियांचे संगोपन केले. हजारो स्त्रियांना व्यक्तीा म्हणून अस्तित्व मिळवून दिले. अनाथ स्त्रियांचे

संगोपन व स्वावलंबन ह्यालाच आपले जिवीतकार्य मानले."[७] हे त्यांचे कार्य लोकोत्तर असूनही केवळ धर्मांतरामुळे त्या समाजाच्या टीकेचे लक्ष बनल्या. त्यांनी केलेले धर्मांतर राष्ट्रांतरासारखे मानले गेले. त्यांना तत्कालीन समाज व्यवस्थेशी संघर्ष करावा लागला. असे असूनही त्यांनी स्त्री उद्धाराचे मोठे कार्य केले. त्यांनी स्थापन केलेल्या मुक्ति मिशन संस्थेद्वारे हेच कार्य गेली शंभरपेक्षा जास्त वर्षे अविरतपणे चालू आहे. या सर्व कार्याची माहिती घेऊन ते उजेडात आणण्याची या प्रबंधाच्या अभ्यासाची मूळ भूमिका आहे.

पं. रमाबाईंच्या जीवन कार्याचा आढावा अनेक चरित्र लेखक व लेखिकांनी घेतला आहे. त्यांच्या जीवनावर कादंबरी वजा लेखन झाले आहे. त्यांच्या विषयीचा तत्कालीन इतिहास जाणून घेण्यासाठी ज्ञानोदय, इंदुप्रकाश, केसरी, मराठा सुधारक इ. नियतकलिकांचे शेकडो अंक अत्यंत महत्वाचे आहेत. आजपर्यंत पं. रमाबाईंच्या मृत्यू पर्यंत कादंबरीवजा लेखन झाले आहे. हे लेखन एकांगी व चरित्रवजा आहे. या लेखनामध्ये बरीचशी व्यक्तीनिष्ठता आढळते. त्यांच्या कार्याविषयी ऐतिहासिक दृष्टिकोनातून लेखन झाले नाही. त्यांच्या कार्याविषयी बरेचसे गैरसमज निर्माण झाले. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न झालेला दिसत नाही. तसेच पं. रमाबाईंच्या मृत्यूनंतर सुमारे शंभर वर्षे त्यांच्या कार्याची परंपरा चालविणाऱ्या मुक्ति मिशनच्या कार्याची दखल समाजात फारशी घेतली गेल्याचे दिसत नाही. पं. रमाबाईंच्या हयातीत समाजाने नाकारलेले त्यांच्या लोकोत्तर कार्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न या शोध प्रबंधामध्ये केला आहे. तसेच मुक्ति मिशनच्या स्त्री सुधारणा कार्याची ओळख करुन देण्याचा प्रयत्न या शोध प्रबंधात केला आहे.

## १.२ अभ्यास विषय निवडण्याची कारणे :

"इतिहास म्हणजे एकूण भूतकाळ हे मर्म समजून घेतले की, त्या भूतकाळातील दूरगामी परिणाम करणाऱ्या घटकांना महत्व येते."[८] दूरगामी परिणाम करणाऱ्या घटना, प्रसंग, व्यक्ती यांचा अभ्यास असे एकूण इतिहासाचे स्वरुप असते. मानवी आयुष्यातील पूर्व घटितांचा शोध इतिहासामध्ये घेतला जातो. या घटितांची तत्कालीन परिस्थितीमध्ये झालेली मांडणी व बदलता काळ याचा विचार केल्यास इतिहासाची पुर्नमांडणी करणे आवश्यक असते. पं. रमाबाईंच्या

कार्याविषयी अनेक विचारवंतांनी मांडलेल्या विचारांचा अभ्यास करुन 'पं. रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य' (सन १८८९ ते सन १९८९) हा विषय पीएच.डी. साठी निवडला आहे.

या अनुषंगाने एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करताना जाणवले की, "या शतकामध्ये भारतामध्ये विशेषत: महाराष्ट्रामध्ये अनेक प्रकारचे सामाजिक परिवर्तन घडून आले. हा कालखंड संक्रमणाचा होता. १८१८ ला पेशवाईचा अस्त झाला. महाराष्ट्राची राजकीय सुत्रे इंग्रजांच्या हाती आली. इंग्रजांची शिक्षण पध्दती व प्रशासन यामुळे महाराष्ट्रात प्रबोधन सुरु झाले."[९] या सामाजिक संक्रमणाच्या काळात भारतीय समाज व पाश्चात्य समाज यातील व्यवस्थेची व स्वरुपांची तुलना होऊ लागली. भारतीय समाज पाश्चात्य समाजाच्या तुलनेत खूपच मागासलेला आहे याची जाणीव विचारवंतांना झाली. त्यातून समाज सुधारणा चळवळीचा जन्म झाला. "परंपरा व नवता, तसेच पाश्चात्य व भारतीय परंपरा यांच्या संघर्षात्मक समन्वयातून भारतीय प्रबोधन साकार झाले."[१०] या प्रबोधन काळात स्त्री सुधारणा हे समाज सुधारणेचे प्रमुख अंग मानले गेले. "महाराष्ट्रात स्त्री प्रश्नांच्या अनुषंगाने जे विचार मंथन झाले ती प्रबोधनाची फलश्रृती होती."[११] या प्रबोधन काळातील परिस्थितीचा परिपाक म्हणजे महाराष्ट्रात अनेक विचारवंत व समाजसुधारक पुढे आले. त्यात अभिजन व बहुजन वर्गातील सुधारकांचा समावेश होता. "अभिजन सुधारणावाद्यांनी स्त्री प्रश्नाच्या बाबतीत पांढरपेशा स्त्रियांचाच प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला."[१२] या समाज सुधारकांच्या विचारातून व कार्यातून स्त्री प्रबोधन पर्वाला सुरुवात झाली.

या प्रबोधन कालखंडामध्ये सुधारकांचे नानाविध विचारप्रवाह निर्माण झाले. त्यातील पहिला प्रवाह 'इंग्रजी राज्य ईश्वरी वरदान आहे' असे मानणारा होता. या प्रवाहाचे प्रतिनिधित्त्व नामदार गोखले, न्या. रानडे यांनी केले. दुसरा प्रवाह हिंदू धर्मावर, संस्कृतीवर जहाल टीका करणारा होता. या प्रवाहाचे नेतृत्त्व जोतिराव फुले, लोकहितवादी, गोपाळ गणेश आगरकर इत्यादी सुधारकांनी केले. तिसरा प्रवाह हिंदु धर्मातील कालबाह्य रुढी परंपरा बाजूला सारुन हिंदु धर्माचे उदात्तीकरण करणारा होता. या प्रवाहाचे प्रतिनिधीत्त्व दयानंद सरस्वती, विष्णुबुवा ब्रम्हचारी, विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी केले. हिंदू धर्म-संस्कृती टाकावू मानून तत्कालीन रुढी, परंपरावर जहाल टीका करणारा दुसरा प्रवाह प्रबळ ठरला. "भूतकालासंबंधी कमालीची कटूता बाळगणारी समाजातील बहुजन समाज दुर्लक्षित आहे. शुद्र, अतिशुद्र व स्त्रियांना

समाजात हीनपणे वागविले जाते, म्हणून वैचारीक बंडखोरी पत्करुन नवसमाज निर्मिती करु पाहणाऱ्या विचारवंतांचा यात समावेश होता."[१३] या प्रवाहातील विचारवंतांनी चातुर्वर्ण्य पध्दतीला, जातीसंस्थेला सवर्णांनी बहुजन समाजावर केलेल्या अन्यायाचे, शोषणाचे द्योतक मानले. या संस्थांच्या उच्चाटनाचे ध्येय बाळगले. ब्राम्हण वर्गाला टीकेचे लक्ष बनविले. जोपर्यंत शुद्रातिशुद्रांची व स्त्रियांची वैचारिक पातळी उंचावत नाही, तोपर्यंत राजकीय संस्थांच्या त्यातील सहभागाला अर्थ उरत नाही. असा पवित्रा या विचारवंतांनी घेतला. या विचारवंतांनी मनुस्मृतीवर आधारलेल्या समाजरचनेला आव्हान दिले. स्त्रिया व शुद्र यांचे सामाजिक स्थान उंचावण्यासाठी प्रबोधन केले.

या प्रबोधनकाळात समन्वयवादी दृष्टिकोन बाळगणारा वर्ग पुढे आला. हिंदू धर्माविषयी टोकाची भूमिका न घेता, हिंदू धर्माच्या चौकटीत राहून धर्म सुधारणा चळवळीचे नेतृत्त्व काही विचारवंतांनी केले. "हिंदू धर्म संस्कृतीबद्दल रास्त अभिमान बाळगावा. कालबाह्य रुढी परंपरांचा निषेध करावा. समाजाला भौतिक जीवनदृष्टी द्यावी. समाजाचे संघटन करावे, अशी मते या विचारवंतांकडून पुरस्कृत केली जात होती."[१४] त्यांनी भारतीय संस्कृती पाश्चात्य संस्कृतीपेक्षा सनातन आहे. श्रेष्ठ आहे असे सांगितले. स्वधर्माविषयी अभिमान जागृत करण्याचा प्रयत्न केला. ख्रिस्ती मिशनऱ्यांसोबत मुकाबला करत धर्म रक्षणाची चळवळ उभी केली. "समग्र समाज परिवर्तनाची कळ धर्म संस्थेच्या परिवर्तनामध्ये आहे."[१५] अशी तत्त्वे मांडली. या विचारसरणीचे नेतृत्त्व बाळशास्त्री जांभेकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, विष्णुबुवा ब्रम्हचारी व लोकमान्य टिळक इ. नेत्यांनी केले.

या विविध विचारसरणींमध्ये पं. रमाबाईंचे स्थान स्त्री सुधारक म्हणून महत्वपूर्ण आहे. समाज सुधारकांच्या सुरुवातीच्या सुधारकांमध्ये त्यांचा समावेश होतो. प्रबोधन काळातील उदारमतवाद, मानवतावाद, सामाजिक व्यवस्थेची व धर्म संस्थांची चिकित्सा करणे, आत्मपरिक्षण करणे इ. मूल्ये त्यांच्या विचारधारेमध्ये दिसतात. सुरुवातीच्या काळात पं. रमाबाई सनातन हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व करतात. पुढे "स्त्री मुक्तीच्या आंतरिक प्रेरणेतून त्यांनी सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला व हा सत्याचा शोध त्यांच्या ख्रिस्ती धर्मात केलेल्या धर्मांतराने थांबला. त्यांचे धर्मांतर परकियांच्या धर्मात झाले तरी भारतीयत्वाची चौकट त्यांनी ओलांडली नाही."[१६] स्वत: अनाथ व विधवा असूनही स्त्री उद्धाराचे कार्य अत्यंत धाडसी

पध्दतीने केले. म्हणूनच १९ व्या व २० शतकातील प्रबोधन काळातील त्यांचे स्थान आगळेवेगळे आहे. त्यांनी स्थापन केलेल्या मुक्ति मिशनचे स्त्री सुधारणा चळवळीतील निरंतर चाललेले दीर्घ कार्य अनन्यसाधारण आहे. हे जाणवल्यामुळे 'पं. रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य' (सन १८८९ ते सन १९८९) हा विषय पीएच. डी. साठी निवडला.

एखाद्या व्यक्तीच्या चरित्राचा अभ्यास म्हणजे केवळ त्या व्यक्तीचा अभ्यास नसतो. ती व्यक्ती ज्या समाज घटकात वाढली, घडली त्या समकालीन सामाजिक व धार्मिक धारणांचा तो अभ्यास असतो. त्यासाठी समकालीनांचे त्या व्यक्तीच्या संदर्भातील लेखन, त्या व्यक्तीचे चरित्रग्रंथ, लेख, आत्मचरित्रपर लेखन, त्या व्यक्तीने विविध विषयावर केलेले लेखन, समकालीन नियतकालिकांमधील लेख इत्यादी प्राथमिक व दुय्यम अशा साधनांचा आधार घ्यावा लागतो. व्यक्ती व तिचे कर्तृत्त्व यांचे सत्यदर्शन घडविण्यासाठी घटना व प्रसंगाची चिकित्सा करणे महत्वाचे असते. घटनांचा, कालखंडाचा अन्वयार्थ लावण्यासाठी संशोधन आवश्यक असते. बदलत्या काळानुसार जाणिवा बदलतात. त्या अनुषंगाने संशोधन आवश्यक असते. "मुळात इतिहास संशोधन म्हणजे आपल्याला आतापर्यंत ज्ञान अशा इतिहासातले अज्ञान धागे शोधून इतिहासाचे पुनश्च विश्लेषण होय."[१७] याच अनुषंगाने पुनर्लेखन करणे गरजेचे असते. या मूलभूत संशोधनातून इतिहासातील अज्ञात धागे उलगडले जातात. त्या काळातील महाराष्ट्राचा प्रबोधनाचा कालखंड, तत्कालीन सामाजिक व धार्मिक धारणा, त्या काळातील स्त्री जीवन या पार्श्वभूमीवर पं. रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य या विषयाचा संशोधन पध्दतीने अन्वयार्थ लावण्यासाठी प्रस्तूत विषय संशोधनासाठी निवडला.

'पं. रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य' या विषयाच्या अनुषंगाने टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, पुणे विद्यापीठ, पुणे व इतर विद्यापीठांमध्ये पीएच. डी. साठी संशोधन झाले नाही. महाराष्ट्राच्या प्रबोधन कालखंडातील 'पं. रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य' हा विषय दुर्लक्षित राहिल्याने या विषयावर संशोधन करणे गरजेचे वाटू लागले. या निमित्ताने प्रबोधन काळातील बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडूरंग, लोकहितवादी, न्या. रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, महात्मा फुले अशा अनेक विचारवंतांचे कार्ये व त्यांचे प्रबोधनातील योगदान याचा अभ्यास करताना पं. रमाबाई व मुक्ति मिशनचे संस्थात्मक पातळीवरील कार्य व त्याचे महत्व जाणवल्यामुळे अभ्यास संशोधनाची दिशा निश्चित व्हायला मदत झाली. पं. रमाबाई यांच्या स्त्री

सुधारणा कार्याची व मुक्ति मिशनच्या संस्थात्मक पातळीवरील दीर्घकाळ सुरु असणाऱ्या स्त्री सुधारणा कार्याची इतिहासामध्ये फारशी दखल घेतली नाही. म्हणून संशोधनासाठी प्रस्तुत विषय निवडला आहे.

## १.३ अभ्यासाची उद्दिष्टे :

१. युरोपियनांच्या आगमनानंतर आधूनिक पाश्चात्य शिक्षणाचा परिचय भारतीयांना झाला. त्यामुळे झालेल्या समाज सुधारणांचा आढावा घेणे.

२. पारंपरिक भारतीय स्त्री जीवनाचा अभ्यास करणे.

३. आधुनिक काळातील प्रबोधनामुळे समाजाच्या स्त्री विषयक बदललेल्या भूमिकेचा अभ्यास करणे.

४. पं. रमाबाईंच्या जीवन काळातील विविध घटनांचा अन्वयार्थ लावणे. या घटनांतून त्यांची जडणघडण कशी झाली याचा अभ्यास करणे.

५. पं. रमाबाईंच्या सुधारणावादी विचारांचा अभ्यास करणे व त्या विचारांचा समाज परिवर्तनामधील योगदान तपासणे.

६. पं. रमाबाईंनी विधवांच्या शिक्षणासाठी शारदासदनाची स्थापना केली याचा अभ्यास करणे.

७. अनाथ, अपंग व पतित स्त्रियांना मुक्ति मिशनमध्ये आश्रय दिला. या स्त्रियांच्या उद्धारासाठी प्रयत्न केले. या कार्याचा अभ्यास करणे.

८. पं. रमाबाईंच्या मृत्यूनंतर मुक्ति मिशनचे स्त्री उद्धाराचे सेवाकार्य अविरतपणे सुरु आहे या कार्याचा अभ्यास करणे.

९. पं. रमाबाईंच्या धर्मांतराची चिकित्सा करणे.

१०. शारदासदन व मुक्ति मिशनमधील ख्रिस्ती प्रभावाचा व त्या प्रभावाच्या परिणामांचा अभ्यास करणे.

११. पं. रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य दुर्लक्षित राहण्याच्या कारणांचा शोध घेणे.

१२. स्त्री विषयक सामाजिक परिवर्तनात पं. रमाबाई व मुक्ति मिशनच्या योगदानाचा अभ्यास करणे.

१३. पं. रमाबाई व मुक्ति मिशनच्या स्त्री विषयक कार्याच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रभावाचा अभ्यास करणे.

१४. पं. रमाबाई मुक्ति मिशनच्या कार्यपध्दती विषयी व्यवस्थापनाविषयी विभागनिहाय अभ्यास करणे.

## १.४ पूर्व संशोधनाचा आढावा :

पं. रमाबाईंच्या जीवनावर चरित्रवजा लेखन अनेक लेखक लेखिकांनी केले आहे. त्यात श्री. देवदत्त नारायण टिळक यांनी 'महाराष्ट्राची तेजस्विनी–पंडिता रमाबाई' हे चरित्र लिहिले आहे. श्यामसुंदर आढाव यांनी पं. रमाबाईंचे लिहिलेले चरित्र अत्यंत त्रोटक आहे. प्रभाकर दिघे, ज्योत्स्ना देवधर, पद्मिनी सेनगुप्ता, ताराबाई साठे यांनी पं. रमाबाईंवर कादंबरीवजा लेखन केले आहे. ज्यामध्ये ऐतिहासिक मूल्ये फारच कमी आढळतात. 'पं. रमाबाई स्त्री शिक्षणातून स्त्री प्रबोधन' हा एम.फिल. पदवीसाठी प्रा. स्वाती पुंगलिया (राजन) यांनी डॉ. राजा दिक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली लघूशोध प्रबंध पुणे विद्यापिठामध्ये सादर केला होता. संशोधन मूल्ये असलेले हे महत्वपूर्ण अप्रकाशित साधन आहे. सरोजिनी वैद्य, द्वा. गो. वैद्य, प्रबोधनकार ठाकरे,मृणालिनी जोगळेकर, एम. संतोषकुमार, वि. द. घाटे, मॅकॉनिकल, क्लेमेंटिना बटलर, हेलन डायर इत्यादींनी पं. रमाबाईंवर केलेले वैचारिक व चरित्रवजा लेखन महत्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण मानले जाते. हे लेखन साहित्यिक अंगाने जाणारे व व्यक्ती केंद्री आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या चरित्रमालिकेमध्ये पं. रमाबाईंचे डॉ. सिसिलीया कार्व्हालो लिखित एक छोटेखानी चरित्र प्रकाशित केले आहे. वरील बरेचसे लेखन कादंबरीवजा, साहित्यिक अंगाने व व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनातून झाले आहे. पं. रमाबाईंचा मृत्यू हाच आजवर झालेल्या लेखनाचा अंतिम बिंदू आहे. पं. रमाबाईंच्या मृत्यूनंतर मुक्ति मिशनने केलेल्या कार्यावर कोणीही लेखन केलेले नाही. पं. रमाबाई व मुक्ति मिशनच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रभावाचा विचार फारसा केलेला आढळत नाही. या संशोधनाची व्याप्ती निश्चित करताना पं. रमाबाई व मुक्ति मिशनच्या कार्याचा सन १८८९ ते सन १९८९ या शंभर वर्षांच्या कार्याचा अभ्यास करण्याचा विचार केला आहे. पं. रमाबाई व मुक्ति मिशनच्या

उपरोक्त काळातील कार्याविषयी अभ्यास करुन वस्तूनिष्ठ निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न या प्रबंधात केला आहे.

## १.५ संशोधनाची गृहितके :

१. पाश्चात्यांच्या आगमनामुळे भारतीय समाजामध्ये प्रबोधन सुरु झाले.

२. एकोणिसाव्या शतकातील सुधारकांचे स्त्री सुधारणा हेच समाजसुधारणेचे प्रमुख अंग मानले.

३. पं. रमाबाईंच्या समकालामध्ये भारतीय स्त्रियांचे जीवन अनेक रुढी, परंपरांनी जखडलेले होते. विधवा स्त्रियांचे जीवन दुर्मुखलेले होते.

४. पं. रमाबाईंनी विधवा स्त्रियांच्या शिक्षणासाठी सामाजिक विरोध पत्करुन प्रयत्न केले.

५. पं. रमाबाईंनी स्त्री जीवनाशी निगडीत असणाऱ्या रुढी, परंपरांच्या विरोधात आवाज उठवला.

६. पं. रमाबाईंनी भारतीय स्त्री जीवनाचा परिचय आंतरराष्ट्रीय समूहाला करुन दिला.

७. पं. रमाबाईंनी विधवा, अनाथ, अपंग स्त्रियांच्या मनात जगण्याची उर्मी निर्माण केली.

८. पं. रमाबाईंनी आधुनिक काळातील स्त्री चळवळीची बीजे १९ व्या शतकामध्ये रुजविली.

९. पं. रमाबाईंनी मुक्ति मिशनची स्थापना करुन स्त्री उध्दाराचा मार्ग पुढे चालू ठेवला.

१०. पं. रमाबाईंच्या मृत्यूनंतर मुक्ति मिशनने त्यांच्या स्त्री उद्धाराच्या कार्याचा वारसा सुरु ठेवला.

११. पं. रमाबाईंच्या धर्मांतरामुळे व मुक्ति मिशनवरील ख्रिस्ती प्रभावामुळे त्यांचे कार्य उपेक्षित राहिले.

१२. पं. रमाबाई व मुक्ति मिशनने स्त्री उद्धाराचे लोकोत्तर कार्य केले.

## १.६ संशोधन पध्दती :

इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे. त्यात प्रचलित असणाऱ्या सर्वच संशोधन पध्दती इतिहास संशोधनास उपयुक्त ठरतात. आपण कोणती संशोधनपध्दती वापरायची हे संशोधनासाठी निवडलेल्या विषयावर अवलंबून असते.

### १.६.१ इतिहासाच्या पुनर्लेखनाची आवश्यकता :

एखाद्या ऐतिहासिक घटनेची कारण मीमांसा करताना किंवा त्या घटनेचे स्पष्टीकरण देताना त्या घटनेमागील कारणांची वर्गवारी इतिहासकार करीत असतो. त्यासाठी इतिहासाचे पुनर्लेखन आवश्यक ठरते. त्यामुळे इतिहास लेखनात वैविध्य येते. इतिहासाच्या पुनर्लेखनामुळे एकाच गोष्टीकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन स्पष्ट होतात.

विशिष्ट काळात इतिहास लेखन करताना सर्व दुवे हाती लागतील असे नाही. काही पुरावे अस्पष्ट व संदिग्ध असतील. त्यामुळे पुनर्लेखनाला वाव मिळतो. प्रत्येक इतिहासकार आपल्या बौद्धिक, मानसिक क्षमतेनुसार, वैचारीक धोरणानुसार कल्पना शक्तीच्या मदतीने इतिहास लिहीतो. प्रत्येक इतिहासकाराच्या कल्पना शक्तीचा वापर वेगवेगळ्या प्रकारे होत असल्यामुळे इतिहासाचे पुनर्लेखन करण्याची संधी उपलब्ध होते.

### १.६.२ इतिहास संशोधनाचे प्रकार :

१) मुलभूत संशोधन : या प्रकारात अज्ञात असलेली माहिती मिळवून ती सुसंबंधरीतीने मांडली जाते. या प्रकारात काहीतरी नवीन माहिती प्रकाशात आणली जाते. मुलभूत संशोधनातून अनेक अज्ञात धागे उलगडले जातात. गतकालीन वाटचाल स्पष्ट होते. इतिहासाच्या ज्ञानात भर पडते.

२) विश्लेषणात्मक संशोधन : उपलब्ध झालेली माहिती नव्या दृष्टिकोनातून अभ्यासणे, तिचे विश्लेषण करणे हे देखील इतिहासाचे संशोधन असते. या प्रकारात ऐतिहासिक साधनांचे पुनर्मूल्यांकन करावे लागते. साधनांची विश्वसनीयता नव्याने तपासली जाते. उपलब्ध माहितीची तर्कशुध्द मांडणी केली जाते. या विश्लेषणातून नवा अर्थ तरी निघतो किंवा प्रस्थापित अर्थ पुनर्प्रस्थापित होतो.

३)	मूलगामी संशोधन : मौलिक व तात्विक स्वरुपाचे संशोधन इतिहासाच्या सखोल व प्रदीर्घ चिंतनातून होते. त्याबाबत काही नवे सिध्दांत मांडण्याचा प्रयत्न असतो. इतिहास विषयाला नवी तात्विक बैठक दिली जाते. एखाद्या व्यक्तीचा किंवा एखाद्या घटनेचा अभ्यास पूरेसा नसतो. तर दीर्घ कालखंडातील घटना प्रवाहांचा अभ्यास करुन त्यातील अंतस्थ सूत्र उलगडून दाखविण्याचा संशोधकाचा प्रयत्न असतो. प्रस्तूत संशोधनाचा विषय वरील तिन्ही प्रकारात मोडतो.

या संशोधन विषयाच्या संदर्भात माहिती संकलित करण्यासाठी संदर्भ पध्दतीचा प्रामुख्याने वापर केला आहे. तसेच सर्वेक्षणात्मक पध्दती, मुलाखत पध्दतीचा अवलंब केला आहे.

### **१.६.३ संदर्भ पध्दती :**

संशोधनाच्या विषयाच्या अनुषंगाने सर्व प्रकाशित वाङ्मय वाचावे लागते. अप्रकाशित साधनांचा अभ्यास करावा लागतो. पुनर्परीक्षणाची दिशा या व्यापक वाचनातून आणि चिंतनातून स्पष्ट होत जाते. यासाठी प्रथम संदर्भ यादी तयार करावी लागते. संशोधनासाठी आवश्यक ती माहिती या संदर्भ वाचनातूनच जमा होत जाते. संबंधित विषयासंबंधीची विविध मते, निरनिराळ्या प्रकारचे विवेचन यांची विश्वसनीयता तपासावी लागते. त्याअनुषंगाने नवी विश्लेषणे करणे शक्य होते.

### **१.६.४ सर्वेक्षण पध्दती :**

संशोधनाच्या विषयाशी संबंधित स्थानिक पातळीवर माहिती गोळा करण्यासाठी सर्वेक्षण पध्दती उपयुक्त ठरते. लोकांचा सहभागातून माहिती गोळा करावी लागते.

### **१.६.५ मुलाखत पध्दती :**

समकालीन इतिहासाच्या संशोधनामध्ये मुलाखत पध्दतीचा वापर करता येतो. मुलाखत घेतानाचे सर्व शास्त्रीय निकष पाळून संशोधनाच्या विषयाशी संबंधित व्यक्तीकडून माहिती गोळा केली जाते.

या संशोधन पध्दतीद्वारे पुढील गोष्टींवर भर दिला जात आहे.

१.	संशोधनासाठी उपलब्ध झालेली प्रकाशित व अप्रकाशित संदर्भ साधने उजेडात आणणे व ज्ञात अशा ऐतिहासिक विवेचनाचे पुनर्मुल्यांकन, पुनर्विश्लेषण करणे.

२. संशोधनासाठी उपलब्ध संदर्भ माहितीची विश्वसनीयता तपासणे व त्या अनुषंगाने नवी विश्लेषणे करणे.

३. संशोधनासाठी उपलब्ध घटनांचे, तात्विक स्वरुप निश्चित करणे.

४. आंतरविद्याशास्त्रीय संशोधन पध्दतीचा वापर करणे.

५. पं. रमाबाईंच्या समकाळातील व्यक्तींच्या चरित्राच्या व आत्मचरित्रांच्या आधारे प्रस्तूत विषय संदर्भातील माहिती शोधणे.

६. पं. रमाबाई मुक्ति मिशनमधील अप्रकाशित अभिलेखीय दस्ताऐवज व कागदपत्रांचा अभ्यास करुन माहिती संकलित करणे.

७. मुक्ति मिशनच्या महत्वाच्या व्यक्तीकडून उपलब्ध माहितीचा वापर करणे.

८. मुक्ति मिशनचे पदाधिकारी, कर्मचारी वर्ग, मुक्ति मिशनच्या कार्याशी संबंधित परदेशी व्यक्ती व संस्था, संस्थेच्या कार्याचे लाभार्थी व संस्थेतील आश्रित स्त्रिया वा मुली यांचेकडून उपलब्ध माहितीचा वापर करणे.

## प्रकरण पहिले

# तळटीपा

१. देव प्रभाकर, इतिहासशास्त्र, संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, नाशिक, २००७, पृ. ९,११.

२. सरदेसाई बी. एन. इतिहास लेखनशास्त्र, कोल्हापूर, २००२, पृ. १९.

३. कार ई. एच. (अनुवाद–वि. गो. लेले), इतिहास म्हणजे काय, पुणे, १९९४, पृ. ४९.

४. तत्रैव, पृ. १२.

५. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. १६.

६. रेगे शर्मिला, महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण ग्रंथाचे प्रस्तावना पृष्ठ.

७. भोसले जालिंदर, वैद्य मोनिका (संपा.), आधुनिक भारताचे शिल्पकार, पुणे २०१३, पृ. २८१, २८२.

८. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. १३.

९. कार्व्हालो सिसिलिया, महाराष्ट्राचे शिल्पकार, मुंबई, २००७, पृ. १

१०. दीक्षित श्रीधर (राजा), १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील मध्यमवर्गाचा उदय, पुणे, २००९, पृ. १.

११. भोसले नारायण, महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण, पुणे २००८, पृ. ६२.

१२. तत्रैव, पृ. ६२.

१३. मोरे अरुणा, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या प्रबोधन कालखंडात विष्णुबुवा ब्रह्मचारींचे योगदान, पीएच. डी. चा अप्रकाशित प्रबंध, पुणे विद्यापीठ, २०१३, पृ.३.

१४. तत्रैव, पृ. ३.

१५. जावडेकर शं. द., आधुनिक भारत, पुणे, १९७९, पृ. ४५.

१६. जोगळेकर मृणालिनी, स्त्री अस्मितेचा अविष्कार १९ वे शतक, भाग ३ पंडिता रमाबाई, मुंबई, १९९१, पृ. १४५.

१७. देव प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. १८७.

# प्रकरण २ रे

# पं. रमाबाईंच्या समकाळातील स्त्री जीवन

## २.१ प्रस्तावना :

पं. रमाबाईंचा जन्म दि. २३ एप्रिल १८५८ रोजी झाला. त्यांचा मृत्यू दि. ५ एप्रिल १९२२ रोजी झाला. पं. रमाबाईंचा कालखंड १९ व्या व २० व्या शतकातील समाज जीवनाला व स्त्री जीवनाला स्पर्श करणारा आहे.

सन १८१८ ला महाराष्ट्रात ब्रिटीश राजवट सुरु झाली. इंग्रजी राजवट सुरु झाल्याबरोबर लगेचच महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती बदलली नाही. पेशव्यांच्या काळात जशी समाजाची स्थिती होती तशीच इंग्रजी कालखंडात होती. "त्यावेळी जाती–जमाती, रुढी प्रामाण्य, चातुर्वर्ण्यव्यवस्था समाजात रुढ होती. ब्राह्मणांचे वर्चस्व होते. गाव कामगार, गाव पंचायती, जातीच्या पंचायती, ब्राह्मणांची सत्ता आणि फौजदारांसारख्या अधिकाऱ्यांचा मन मानेल तसा अंमल या गोष्टींवर देशातील शांतता व सुव्यवस्था अवलंबून असे."[१]

सामाजिक जीवनामध्ये कुटुंब, जाती, वर्ण, परंपरा, सामाजिक दर्जा, संस्था, स्त्री जीवन यांचा अभ्यास येतो. एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक परिस्थितीचे वर्णन करताना असे म्हणावे लागते की, "वर्णजातीची विषमता प्रधान चौकट, स्वयं:पूर्ण व बंदिस्त ग्रामजीवन, अस्पृश्यता व स्त्री दास्य ही भारतीय समाज जीवनाची काही वैशिष्ट्ये तत्कालीन महाराष्ट्रालाही लागू पडत होती."[२] ग्रामसंस्था व जातीसंस्था महाराष्ट्राच्या सामूहिक जीवनाचे मुलभूत घटक होते.

महाराष्ट्राच्या पारंपरिक स्थितीमध्ये बदल एकोणिसाव्या शतकात सुरु झाला. एकोणिसावे शतक भारतातील प्रबोधनाचे शतक मानले जाते. "युरोपच्या आणि पर्यायाने जगाच्या इतिहासातील ज्या नवविचारांच्या आंदोलनासाठी प्रबोधन ही संज्ञा वापरली जाते."[३] जेव्हा साहित्य, कला, विज्ञान, सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात नवनवीन विचार मांडले जातात. पूर्वी कधीतरी या विचारांची मांडणी झालेली असल्यामुळे त्याची पुन्हा उजळणी सुरु होते, त्याला पुनरुज्जीवन असे म्हटले जाते.

"पुनरुज्जीवनाच्या चळवळीमुळे युरोपातील सर्व सामाजिक क्षेत्रात नव्या युगाचा जन्म झाला. धर्मसत्तेची पकड ढिली झाली. अंधश्रध्दा व धार्मिक कल्पनांना तडे जाऊ लागले.

धर्मनिरपेक्ष विचारांची वाटचाल सुरु झाली. स्त्रियांच्या जीवनाकडे सकारात्मकपणे पाहिले जाऊ लागले. चर्चच्या एकाधिकारशाहीचा अंत झाला. साहित्य, कला या क्षेत्रात प्रबोधन सुरु झाले."[३अ]

प्रबोधन युरोपमध्ये सुरु झाले युरोपीय लोकांनी केलेल्या साम्राज्य विस्ताराबरोबर ते सर्व जगभर पसरले. सन १८१८ मध्ये महाराष्ट्रात पेशवाई नष्ट होऊन इंग्रजी अंमल सुरु झाला. या राजकीय सत्तांतराची व तत्कालीन सामाजिक परिस्थितीची चिकित्सा विचारवंतांकडून होऊ लागली. प्रसिध्द भाषा शास्त्रज्ञ डॉ. अशोक केळकर यांनी म्हटल्याप्रमाणे "इंग्रज भारतात आल्यानंतर जे स्थित्यंतर सुरु झाले. त्यासाठी प्रबोधन हा शब्द अचूक आहे."[४] "युरोपीय प्रबोधन व भारतीय प्रबोधनामध्ये फरक हा आहे की, युरोपीय प्रबोधन हे स्वतंत्र राष्ट्रात झाले तर भारताचे पारतंत्र्यात झाले आणि ते व्यापारी कारागिरांकडून झाले नाही तर नवशिक्षित पंडितांकडून झाले."[५] भारतात जुन्या धर्मकल्पना व सामाजिक विचार यावर पाश्चात्य विचारांनी एकोणिसाव्या शतकात मोठा परिणाम झाला. "जुन्या धर्मनिष्ठा, जातीभेदाच्या कल्पना, स्त्रियांच्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, निसर्गात घडणाऱ्या घटना, त्याचा अर्थ लावण्याची पध्दती या सर्वावरच युरोपीय विद्यांनी मोठा प्रहार केला. समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया तेव्हापासून सुरु झाली. या नव्या परिवर्तनापासून भारतात प्रबोधन काळ सुरु झाला असे मानले जाते"[६]

एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध हा भारताच्या इतिहासातील संक्रमणाचा कालखंड होता. या शतकाच्या सुरुवातीला समाज सुधारणेचा विचार मोजक्या समाज सुधारकांच्या साहित्यातून प्रकट होऊ लागला. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत समाज सुधारणा विचार प्रत्यक्ष कृतीतून पुढे येऊ लागले. मानवी जीवनाकडे पाहण्याचा नवा आधुनिक दृष्टिकोन विकसित होऊ लागला. देशाच्या अवनतीचे मूळ सामाजिक अधोगतीत आहे अशी पक्की धारणा बनली. "नवे आधुनिक विचार समाजात रुजविण्यासाठी लेख, भाषणे, पुस्तके, संस्था यांच्या माध्यमातून त्यांनी नवविचारांचा प्रसार व प्रचार केला. हा वैचारिक क्रांतीचा, मुलभूत वैचारिक परिवर्तनाचा काळ म्हणजे भारतीय प्रबोधनाचा उषःकाल होय."[७]

एकोणिसाव्या शतकात समाज सुधारणेचे महत्वाचे अंग स्त्री सुधारणेला मानले गेले. "इ.स. १८०० ते १९०० या काळात महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने पुणे व मुंबई या शहरांमध्ये स्त्री

सुधारणेबद्दल सतत चर्चा होत होत्या."[८] स्त्रियांची स्थिती शोचनीय होती. महाराष्ट्रात उर्वरीत भारताप्रमाणे स्त्री दास्याची समस्या तीव्र होती. "चातुर्वर्ण्य पध्दतीत जे स्थान अस्पृश्यांना होते, तेच कुटूंबात व समाजात स्त्रियांना होते."[९] पुरुषप्रधान समाजात तिला दुय्यम व गौण स्थान होते. समाजात पुरुषाला जास्तीत जास्त स्वातंत्र्य देण्यात आले. स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली.

एकोणिसाव्या शतकामध्ये दुर्मुखलेल्या स्त्री जीवनाची जाणीव समाजाला झाली. स्त्री सुधारणेची नवी धडपड तत्कालीन समाजसुधारकांच्या कार्यातून दिसत होती. "वृत्तपत्रांचे संपादक, समाजसुधारक किंवा सनातनीच नव्हते तर सर्वसामान्य माणूसही वृत्तपत्रांच्या संपादकांना पत्रे पाठवून आपले मत नोंदवित असे."[१०] मराठी भाषेत प्रथम प्रसिध्द झालेले वृत्तपत्र 'दर्पण' (१८३२), त्यानंतर 'ज्ञानोदय' (१८४२), 'प्रभाकर' (१८४१), 'ज्ञानप्रकाश' (१८४९), 'इंदूप्रकाश' (१८६२), 'केसरी' (१८८१), 'सुधारक' (१८८९) इ. वृत्तपत्रांतून स्त्री सुधारणेविषयीची चर्चा त्याकाळी घडली. वृत्तपत्रांबरोबरच बाबा पद्मनजी, पं.रमाबाई, लोकहितवादी इत्यादींनी स्त्री सुधारणेसंदर्भात पुस्तके लिहीली. "संगित सावित्री सारखे स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे नाटक १८८८ साली लिहिले गेले." [११] प्रार्थना समाज, सामाजिक परिषद, वत्कृत्वोजक सभा, व्याख्यानमाला, किर्तने, सत्यशोधक समाज इ. संस्थांच्या व्यासपीठावर स्त्री सुधारणेविषयी भाषणे, चर्चा, वादविवाद घेत होते.

पं. रमाबाईंच्या समकालीन स्त्री जीवनावर पारंपरिक स्त्री जीवनाचा प्रभाव होता. स्त्री सुधारणा चळवळींच्या कालखंडामध्ये पं. रमाबाईंच्या जीवनाची जडणघडण झाली होती. पंडिता रमाबाईंच्या जीवन कार्याचे महत्त्व लक्षात घेण्यासाठी त्यांच्या समकालीन स्त्री जीवनाचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

पं. रमाबाईंच्या समकाळामध्ये स्त्रियांच्या संदर्भात अनेक रुढी, परंपरा समाजात प्रचलित होत्या. त्यातील काही पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## २.२ कन्येचा जन्म :

स्त्री जीवनातील समस्यांचा विचार मुलीच्या जन्मापासून होतो. कन्येच्या जन्माबद्दलची नाखुषी प्राचीन काळापासून आजपर्यंत भारतीय समाजाने जपली आहे. "वैदिक समाजात मुलगी

होणे एवढे दु:खाचे व दुर्भाग्याचे समजले जात नसे. तरीही अथर्ववेदामध्ये मुलीऐवजी मुलगाच व्हावा यासाठी काही मंत्र व विधी सांगितले आहेत. वेदकाळी मुलगीच झाली हो असा आजच्या सारखा दु:खावेग नसला तरी नाखुषी जरुर होती."[१२] वेदकाळात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान होते. विद्वान मुलगी जन्माला येणे भाग्याचे समजले जात होते. "वैदिक आर्य समाजात पुसंवन नावाचा एक संस्कार होता. स्त्रीला गर्भधारणा झाल्यानंतर तिसऱ्या किंवा चौध्या महिन्यात पुसंवन संस्कार करावा असे गृह्यसूत्रात सांगितले आहे."[१३] पुरुष अपत्य जन्माला येण्यासाठी करावयाच्या संस्काराला पुसंवन संस्कार असे म्हणत. यावरुन पुत्र जन्माचे महत्व वैदिक काळामध्ये असावे असे दिसते. युध्दे व वसाहतीचा विस्तार या कामी त्या काळी वीर पूत्रांची गरज होती. म्हणून पुत्र व्हावा असे वाटत असावे.

ज्ञानप्रसारक सभेपुढे ५ मार्च १८७५ ला विष्णुशास्त्री पंडित यांनी व्याख्यान दिले. त्यात ते म्हणतात, "मन्वादी स्मृतिकारांनी समाज जीवनात स्त्री आणि पुरुष या दोघांचेही महत्व सारखे मानले आहे. पूर्वीच्या कल्पात स्त्रियांना उपनयन संस्कार विहीत होता. त्याचप्रमाणे वेद अध्ययनाचाही पुरुषांच्या बरोबरीने अधिकार होता."[१४]

यावरुन असे लक्षात येते की, "वैदिक समाजात मुलीचा जन्म किंवा मुलगी होणे ही गोष्ट गौण, दखल न घेण्यासारखी मानण्यात येत असे."[१५] मात्र मुलींना समाज जीवनामध्ये फारसे जखडून ठेवले नव्हते. तिला स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्थान होते. कुटुंबातील स्त्रियांच्या अस्तित्वाला किंमत होती.

स्मृती व पुराणकाळापासून स्त्रियांचा दर्जा घसरण्यास सुरुवात झाली. या काळात आर्यांचे उत्तरेकडून दक्षिणेकडे स्थलांतर झाले. दक्षिणेतील आर्येत्तरांशी त्यांचा संबंध आला. आर्येत्तरांशी झालेल्या संघर्षात पुरुषवर्गाचे महत्व वाढले. स्त्रिया दुय्यम व कमी दर्जाच्या समजल्या जाऊ लागल्या. स्त्रियांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा लोप झाला. "सूत्र काळात स्त्रियांचा दर्जा खालावला याचे कारण या सुमारास वेदपठणाचे आणि यज्ञकर्माचे त्यांचे अधिकार रद्द ठरविण्यात आले."[१६] सूत्र काळ स्थूलमानाने वैदिक वाङमयानंतरचा काळ म्हणून ओळखला जातो.

स्मृति काळामध्ये मनू:स्मृती हा ग्रंथ रचला गेला. "भारताच्या ऐहिक आणि पारलौकिक जीवनाचे नियमन शतकानुशतके हा ग्रंथ करत आला आहे."[१७] हा ग्रंथ संस्कृतीच्या आचाराच्या

व सामाजिक व्यवहाराचा आधार ग्रंथ ठरला. त्यामुळे शेकडो वर्षे भारतीय स्त्री जीवनाचे संचालन या ग्रंथानुसार होत होते. “मुलीचे नाव आशीर्वादमय ठेवावे असे मनू म्हणतो.”[१८] मनुस्मृतीच्या तत्त्वज्ञानाचा फार वाईट परिणाम तत्कालीन स्त्री जीवनावर झाला.

स्मृतीकाळापासून एकोणिसाव्या शतकापर्यंत स्त्रियांच्या संदर्भातील परिस्थितीमध्ये फारसा फरक पडला नाही. “मुलाच्या जन्माचे जसे स्वागत होई, तसे स्वागत मुलीच्या वाट्याला येत नसे.”[१९] मुलगा वंशाचा दिवा म्हणून आनंद साजरा केला जात होता. “शेटजीस कन्या झाली असती तर असा उत्साह झाला नसता, पुत्रप्राप्तीची गोष्टच वेगळी आहे.”[२०] असे बाबा पद्मनजी ‘यमुना पर्यटन’ (१८५७) या पहिल्या सामाजिक कादंबरीत लिहितात. सन १८९६ साली ब्रिटीश समाज कार्यकर्त्या मेरी कार्पेटर भारतात आल्या होत्या. त्यांनी भारतीय स्त्री जीवनाविषयी महत्वाची निरीक्षणे नोंदविली आहेत. त्या म्हणतात, “हिंदू धर्मानेही पुत्राला अधिक किंमत प्रतिष्ठा दिलेली आहे. मुलीच्या जन्मापेक्षा मुलाचा जन्म हा आनंदाने साजरा केला जातो.”[२१]

मुलीच्या जन्माच्या नाखूषीमुळेच कन्या हत्येची चाल रुढ झाली. मुलगी जन्मताच मारुन टाकण्याची प्रथा माळवा प्रांतामध्ये रुढ झाली होती. “रणजित सिंगचा मुलगा दलिपसिंगने म्हटले होते की, तो लहान असताना त्याच्या बहीणींना जन्मल्याबरोबर एका पोत्यात घालून नदीत फेकून दिल्याची घटना त्याने प्रत्यक्ष पाहिली होती.”[२२] मध्ययुगातील राजपूत जमातीत बालहत्येचे प्रमाण जास्त होते.

कन्या हत्येमागील काही कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील. कन्या जन्माविषयी समाजामध्ये पारंपरिक कल्पना रुढ होत्या. “नको असलेली मुलगी जन्माला आल्यावर तिच्यावर संस्कार होण्या अगोदर जर तिला मारुन टाकले तर त्या मुलीचा आत्मा कायमचा त्या कुटूंबापासून दूर होतो. प्रत्येकाची इच्छा ही की, मुलगेच व्हावेत. त्यामुळे मुलगी झाली तर तीन दिवसाच्या आतच तिला मारुन टाकण्याची प्रथा पडली असावी.”[२३] कुटूंबातून मुलीचे अस्तित्व कायमचे संपविण्यासाठी ही चाल पडली असावी.

पालकांचे आर्थिक दारिद्र्य, बालविवाहाची प्रथा, स्त्री जीवनाशी निगडीत असणाऱ्या रुढी परंपरा, तत्कालीन स्त्रियांचे नकारात्मक जीवन ही कन्या हत्येमागची कारणे होती. मुलीच्या लग्नाविषयी सामाजिक प्रतिष्ठेच्या कल्पना होत्या.

"ही चाल मराठी समाजात रुढ नव्हती तरीही लोकहितवादींनी याची दखल घेतलेली दिसते."[२४] लोकहितवादींनी 'कन्या हत्या', 'गव्हर्नर साहेबांची बदली व ब्राह्मणांचे अज्ञान', 'लग्नाविषयी विचार', 'इंग्रज राज्यापासून लाभ' इ. निबंधातून कन्या हत्येसंदर्भात विचार मांडले आहेत. "नवरा पाहण्याची मेहनत करायला नको म्हणून मुलींना मारण्याची चाल पडली."[२५] असे लोकहितवादी म्हणतात. ते लिहितात, "सांप्रत हिंदू लोकांमध्ये फारच मुर्खपणा आहे. यास्तव स्त्रियांची दुर्दशा फार आहे. प्राचीन काळी असे नव्हते. तेव्हा स्त्रियांना मान फार होता. पुढे पुढे मुसलमानांच्या अनुकरणाने त्यांच्या चाली हिंदू लोकांमध्ये लागल्या. मुस्लिम आक्रमणामुळे हिंदू स्त्री जीवन असुरक्षित झाले. मुली बाटण्याचा धोका होता. यामुळे कन्या हत्येची मानसिकता आई–बापाची झाली होती."[२६]

कन्या हत्येची चाल बंद करण्याचा प्रयत्न इंग्रजांनी केला होता. "मुंबई प्रांताचा गव्हर्नर जनरल माऊंट एल्फिन्स्टनने कॅप्टन बर्नवेल याला कळविले की, सरकारने गोळा केलेल्या दंड वसुलीच्या पैशातून मुलींच्या बापांनी मुलींना मारुन टाकू नये म्हणून पेसे द्यावेत. सन १८२५ 'बालहत्या फंड' स्थापन झाला होता."[२७] इंग्रजांनी पैशाची प्रलोभने दाखवून कन्या हत्या थांबविण्याचा प्रयत्न केला होता असे दिसून येते.

एकोणिसाव्या शतकापर्यंत कन्या हत्या चाल समाजात रुढ होती. ही चाल २० व्या शतकामध्ये कमी झाली होती. ब्रिटीशांचे प्रयत्न व समाज सुधारकांची स्त्री सुधारणा चळवळ याचा परिणाम होऊन पं. रमाबाईंच्या समकाळात कन्या हत्येची चाल कमी झाली होती.

## २.३ सती प्रथा :

पं. रमाबाईंच्या समकाळामधील स्त्री जीवनाचा अभ्यास करताना 'सती' या प्रथेचा विचार करावा लागेल. "पती मरण पावल्यानंतर त्याच्या प्रेताबरोबर आत्मदहन करणाऱ्या स्त्रीला 'सती' म्हणत. ही प्रथा सहमरण, सहगमन, अन्वारोहण, अनुमरण इत्यादी नावांनी प्रचलित होती."[२८] "प्राचीन काळामध्ये इजिप्त, चीन, ग्रीक, सिरीयन व जर्मन संस्कृतीमध्ये विधवांना जिवंत जाळण्याची प्रथा होती. मात्र सतीच्या चालीचा एकही उल्लेख किंवा सतीच्या वेळी म्हटला जाणारा एकही मंत्र वेदवाङमयात आढळत नाही."[२९] "भारतीय समाज जीवनावर मोठा प्रभाव निर्माण करणाऱ्या मनु:स्मृतीमध्येही सती प्रथेची दखल घेतली नाही. याउलट मनु:स्मृतीमध्ये

विधवा स्त्रियांना सहगमनाचा मार्ग न सांगता ब्रम्हचार्याचा मार्ग सांगितला आहे."[३०] यावरुन स्पष्ट होते की, स्मृती काळापर्यंत सती प्रथा नव्हती.

पुराणकाळामध्ये सती प्रथेची उदाहरणे आहेत. रामायणामध्ये विधवा स्त्री सती गेल्याचे उल्लेख नाहीत. महाभारतामध्ये सती प्रथेचा उल्लेख आढळतो. "वासुदेवाबरोबर त्याच्या देवकी, भद्रा, रोहीणी आणि मंदिरा या चार स्त्रिया व श्रीकृष्णाच्या मृत्यूनंतर त्याच्या रुक्मिणी, गांधारी, शैल्या, हेमवती व जांबवती ह्या भार्या सती गेल्याचे उल्लेख आहेत. इतिहासात नमूद केलेले सतीचे पहिले उदाहरण इ.स. पूर्व ३१६ मध्ये आहे. अँटीगेनसशी लढत असता धारातीर्थी पडलेल्या सेनापतीबरोबर त्याची धाकटी पत्नी हसतमुखाने सती गेल्याचे ग्रीक लेखकाने वर्णन केले आहे."[३१]

इ.स.च्या पूर्व काळात सती प्रथे संदर्भात धार्मिक व सामाजिक दबाव नव्हता. "कल्हणच्या राजतरंगिणीमध्ये सती प्रथेचे उदात्तीकरण केले आहे. ब्रह्मपुराणामध्ये स्वामीबरोबर चितेत प्रवेश करणे हे स्त्री चे सर्वात मोठे धर्मकृत्य आहे. असे म्हटले आहे. पुराणकारांनी सती प्रथेचा पुरस्कार केला. या वाङ्मयग्रंथाचा प्रभाव समाजावर झाला. सती जाणे म्हणजे धर्मपालन करणे ही समजूत झाली."[३२]

"सतीची पध्दत ही प्रथम क्षत्रिय स्त्रियांनी प्रचारात आणली असली तरी हळूहळू ब्राह्मण विधवाही सती जाऊ लागल्या."[३३] ब्राह्मण विधवांना सुरुवातीस सती जाण्यापासून मनाई केली होती. स्वजातीच्या अभिमानापोटी त्या सती जात होत्या. "इसवी सनाच्या ७ व्या शतकात उत्तर भारतात सती प्रथा अस्तित्वात असल्याचे उल्लेख चिनी प्रवासी हुएन त्सँग याने तातांग–सियुकी या प्रवास वर्णनामध्ये केला आहे."[३४]

शिवकाळामध्ये सती प्रथा होती. शहाजी महाराजांच्या मृत्यूनंतर जिजाबाई सती जाण्यासाठी सिध्द झाल्या होत्या. पेशवाईत पहिल्या बाजीरावाच्या मृत्यूने मस्तानीने आत्मघात केला होता. एका अर्थाने ती सती गेली होती. "पहिल्या माधवरावांच्या पत्नी रमाबाई ह्या सती गेल्या. 'पेशव्यांची बखर' या बखरीमध्ये बापू गोखले यांचे पुत्र गोविंदराव सन १८१८ मध्ये मृत्यू पावल्यानंतर त्यांची १२ वर्षाची पत्नी सती गेली होती अशी नोंद आहे. अहिल्याबाई होळकर यांनी सासऱ्यांच्या विनंतीला मान देऊन सती जाण्याचे रद्द केले. त्यांची मुलगी मुक्ताबाई सन

१७९१ मध्ये सती गेली होती. सतीची चाल एकट्या ब्राह्मणातच नव्हती. कित्येक मराठा सरदारांच्या स्त्रिया सहगमन करीत."[३५]

सतीच्या चालीला धर्मशास्त्राची मान्यता होती. सती जाणाऱ्या स्त्रीला देवतेप्रमाणे मान मिळत होता. सती जाणाऱ्या स्त्री ला पारलौकिक कल्याणाचे प्रलोभन दाखविले होते. "जी स्त्री सती जाते ती स्वत:चे व भर्त्यांचे सर्व पाप दूर करणारे असून नरकोद्धारार्थ आहे. तसेच ते मुक्ती देणारे असून जन्मांतरी सौभाग्य, धन, पुत्रादिकांची वृद्धी करणारे कृत्य करते अशी समजूत होती."[३६] विधवा स्त्री सती गेल्याने मोक्ष मिळतो. ती सासर व माहेरच्या अनेक पिढ्यांचे कल्याण करते अशा कल्पना रुढ होत्या. "सती जाते वेळी सतीचे वाण हाती घेऊन, सौभाग्यलंकार घालून, न्हाऊन, हिरवे लुगडे-चोळी नेसून, सवाष्णींना हळदी-कुंकू देऊन, ओट्या भरुन ती निघाली."[३७] असे सती जाते प्रसंगाचे वर्णन काशीबाई कानिटकर करतात.

**सती प्रथा रुढ होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.**

बालविवाहाची प्रथा, विषम विवाह, स्त्रीचे पावित्र्य, स्त्रियांचे नकारात्मक जीवन, वारसा प्रश्न अशा कारणांमुळे स्त्रिया सती जात होत्या.

सन १८८८ साली बालविवाह व असंमत वैधव्य या विषयावर टिपणे लिहीणारे बेहरामजी मलबारी म्हणतात, "या क्षणी हिंदुस्थानमध्ये तीस वर्षाखालील २१ लाख स्त्रियांना विधवा रहावे लागते."[३८] या तरुण विधवांवर लैंगिक अत्याचार होत होते. प्रसंगी विधवा स्त्रिया वाममार्गाला लागण्याचा धोका होता. हे धोके टाळण्यासाठी परंपरेनुसार सती प्रथेने विधवेचा शेवट केला जात होता.

विधवा स्त्रियांना कुटूंबात अशुभ मानले जात होते. तिला निकृष्ट दर्जाचे जीवन जगावे लागत होते. तत्कालीन विधवांच्या स्थितीविषययी लोकहितवादी लिहितात, "ती बिचारी विधवा; तिकडून सासरा, दीर, सासू, जावा यांनी म्हणावे की, करंटी, अवदसा, नवरा मारुन तोंड कशास दाखविते, बाप आपले घरी का ठेविना ? बरे इकडे माहेरी यावे तो भाऊ-बहिणी म्हणतात आमचे घरी तुझे काय काम आहे ? येथे कशास येतेस ? बरे रस्त्यात फिरले तर लोक म्हणतात की बोडकी पुढे आली, याप्रमाणे खाटिकाचे घरी मेंढरांची देखील दुर्दशा नाही. तो त्यास एक वेळ सुरी लावतो, त्या वेळेस मात्र काय दु:ख होते तेवढेच; परंतु तेथपर्यंत तो हाल करीत नाही आणि हे हिंदू लोक किती दुष्ट आहेत की, जे आपल्या स्त्रियांची अशी दुर्दशा

करतात, यांस जगात तरी कोठे दुसरी तुळणा मिळेल की काय ?"[३९] तत्कालीन विधवेचे जीवन म्हणजे नरक यातना होत्या. अशाप्रकारे विधवा होऊन दुर्मुखलेले जीवन जगण्यापेक्षा सती जाण्याचा मार्ग निवडला जात होता

"प्राचीन काळी कौटुंबिक अर्थव्यवस्थेचे वारसा नियमन व विभाजन निश्चित करण्यासाठी 'दायभाग' संकल्पनेचा उदय झाला. या संकल्पनेनुसार पतीने स्वेच्छेने पत्नीला मालमत्तेचा हिस्सा दिल्यास तो कायदेशीर मानण्यात आला."[४०] मध्ययुगीन काळामध्ये स्त्रियांचा संपत्तीवरील हक्क नाकारला होता. पती निधनानंतर विधवेचा संपत्तीवरील हक्क नाकारण्यासाठी सती जाण्यास प्रवृत्त केले जात होते. "सती प्रथेची चाल रुढ करण्याचे कारण विधवेची इस्टेट मिळावी हे होते."[४१] डॉ. सरोजीनी बाबर आपल्या 'स्त्री प्रश्नांची वाटचाल' या ग्रंथात लिहितात की, वडिलोपार्जित संपत्तीतील हक्क नाहीसा करण्यासाठी सती प्रथेला उत्तेजन मिळाले.

मध्ययुगीन काळात भारताच्या निरनिराळ्या प्रातांवर इस्लामी आक्रमणे झाली. मुस्लीम कालखंडात सतत लढाया होत होत्या. सैनिकी सेवेमध्ये सैनिक मृत पावत. त्यांच्या स्त्रिया शील रक्षणासाठी सती जात होत्या. राजस्थानमध्ये स्त्रियांची शत्रूकडून विटंबना होऊ नये म्हणून 'जोहार' पध्दत रुढ होती. जोहार व सती या दोनही प्रथेमध्ये साम्य आढळते. आपल्या शरीराचे पावित्र्य अबाधित रहावे यासाठी स्त्रिया पतीच्या आत्यंतिक प्रेमापोटी सती जात होत्या. या संदर्भात पं. रमाबाई लिहितात, "The act was supposed to be altogether a voluntary, one and on doubt, it was so in many cases. Some died for the love stronger than death which they cherished for their husband"[४२]

### २.३.१ सती प्रथेस विरोध :

भारतामध्ये सती प्रथा बंद करण्याचा प्रयत्न एतद्देशीय राज्यकर्त्यांकडून झाला नाही. भारतात राजकीय सत्ता प्रस्थापित करणारे पहिले पोर्तुगीज होते. "सती प्रथा नष्ट करण्याचा पहिला प्रयत्न पोर्तुगीज गव्हर्नर अल्बुकर्क याने केला."[४३] "इंग्रजी राज्याच्या स्थापनेपूर्वीच दुसऱ्या बाजीराव पेशव्याने स्त्रियांनी सती जाऊ नये म्हणून प्रयत्न केलेले दिसतात."[४४] ईस्ट इंडिया कंपनीचा गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली व लॉर्ड हेस्टींग्ज यांनी सती प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला होता. २७ सप्टेबर १८२३ रोजी पुण्याचा कलेक्टर रॉबर्टसन याने मान्यवर

ब्राम्हणांची सभा बोलावून सतीचे प्रसंग कसे टाळता येतील यासंबंधी विचारविनिमय केला होता. असे एस. एन. दत्ता 'सती' या पुस्तकात लिहितात. "लॉर्ड एल्फिन्स्टनने 'नेटिव्ह पेन्शन फंड' उभा करुन लढाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या विधवा पत्नीला पेन्शन दिली जाईल असे जाहिर केले. पती निधनानंतर विधवेला आर्थिक मदत केल्यास ती सती जाणार नाही या हेतूने दुसरा बाजीराव व लॉर्ड एल्फिन्स्टनने पेन्शन योजना सुरु केलेली होती."[४५] अशाप्रकारे इंग्रज अधिकाऱ्यांमुळे सती प्रथेमागील अर्थशास्त्र पुढे आले. धर्मशास्त्राने सतीला केलेली सक्ती ब्रिटीश प्रशासनाने ऐच्छिक केल्याने विधवांचे मतपरिवर्तन झाल्याचे दिसते.

सन १८७६ साली सरकारी नोकरांच्या विधवा पत्नींना पेन्शन देणारी 'दि बॉम्बे विडोज पेन्शन फंड लिमिटेड' ही संस्था सुरु केली होती. "या संस्थेच्या वर्गणीदारांनी दर महिन्याला वर्गणी भरल्यानंतर वर्गणीदारांच्या विधवेला आयुष्यभर पेन्शन मिळण्याची सोय केलेली होती."[४६] विधवेला जगण्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागू नये म्हणून पेन्शनची सोय केली होती. या प्रथेमागील आर्थिक कारणांची मिमांसा मार्क्सवादी दृष्टिकोनातून सरोजीनी वैद्य यांनी केली आहे.

लोकहितवादींनी सती व प्रथेभोवतीचे दैवी वलय काढण्याचा प्रयत्न केला. ते म्हणतात, "जेव्हा पूर्वी हिंदू लोक भोळसर होते व पंडितांचे ऐकणारे होते, तेव्हा त्यांनी विधवांनी सती जावे म्हणून सांगितले व तेच लोकांनी कबुल करुन आपल्या सूना, मुली, बहीणी जिवंत जाळल्या... ते कलियुगातील राक्षस, माणसे खाणारेच समजावे."[४७] सती प्रथेचे उत्तेजन देणाऱ्यांची ते कडक भाषेत निर्भत्सना करतात. पुरोहित वर्गाने धर्मकृत्य म्हणून सती प्रथेला उत्तेजन दिले असे ते नमूद करतात. या संदर्भात लोकहितवादी लिहितात, "ब्राह्मणांनी जे निर्दय लेख व विधाने लिहून ठेवली आहेत, त्यास अनुसरुन लोक वागू लागल्याने आपले लोकांत किती नीचपणा आला आहे याचे गणित होणे मुष्किल आहे."[४८] लोकहितवादी शास्त्र वचनांना धर्मकृत्याचे स्वरुप कसे दिले याचे विवेचन शतपत्रांमध्ये करतात. "पुरोहित वर्ग, पुरुषांचे हितसंबंध आणि स्वार्थ जपणारी समाजरचना यांच्यामधला परस्परसंबंध लोकहितवादी दाखवून देतात."[४९]

ज्योतिबा फुले यांनी समाज सुधारणेचे प्रमुख अंग स्त्री सुधारणेला मानले. सती बद्दल लिहिताना ते म्हणतात, "..... पुरुषाला तिच्याबद्दल (मृत पत्नीबद्दल) दु:ख होऊन तो कधी

सता गेला आहे काय?"[५०] सती प्रथेमागे स्वार्थी समाजरचना आहे असे विचार ज्योतिबा फुले मांडतात.

गोपाळ गणेश आगरकरांनी सती प्रथेला खून म्हटले आहे. "विधवेच्या छळातूनच ही सहगमनाची रुढी येथे पडली. ही रुढी पुरुषांच्या हिताची होती, म्हणूनच पुरुष सतीची (सताची) उदाहरणे सापडत नाहीत."[५१] असे आगरकर म्हणतात. त्यांनी विधवेचे नकारात्मक जीवन टाळण्यासाठीच स्त्रिया सती जात होत्या असे मत मांडले.

१८८२ साली सती बद्दल लिहिताना ताराबाई शिंदे लिहितात, ".... तुमच्या बायका मेल्या, म्हणजे तुम्ही त्यांच्याबरोबर का सती जाऊ नये बरे? तुमच्यापेक्षा ती सती गेल्याने फार नुकसान होईल. कसे म्हणाल तर ती मेली म्हणजे तिच्यामागे तिची लहान लहान मुले असतात. त्यांना कोणी सांभाळावे? अरे, म्हण आहे, घोडे पेरता बाप मरावा, पण राहाटाने सूत कातणारी आई मरु नये बाप मेला तर ती आई पाहिजे ती तसे दु:ख सोसून मुलांना पोशील, पण तुम्ही आज ती मेली की उद्या दुसरी करुन त्या मुलास देशोधडी करता. करता की नाही हे ? पहा रोज बोंब ऐकू येतेच. याकरिता बायकोच्या आधी तुम्हालाच त्या कुंडात टाकावे..."[५२] सती जाणाऱ्या स्त्रीच्या दु:खाची दखल ताराबाई शिंदे यांनी घेतली आहे. स्त्री सती गेल्यावर तिच्या मुलांच्या पालनपोषणाचा प्रश्न उपस्थित करतात. पहिली पत्नी मेल्यावर लगेच दुसरे लग्न करणाऱ्या पुरुषाचा स्वार्थीपणा उघड करतात.

"ज्या विधवा स्वेच्छेने सती जात नाहीत त्यांना अफू किंवा तत्सम गुंगीचे औषध देऊन तिचे मन परिवर्तन करण्यात तिचे नातेवाईक आपली शक्ती पणाला लावत आणि शेवटी यातही यश आले नाही तर कृतीशिल धाकदपटशा करुन बळजबरीने सती जाण्यास भाग पाडत."[५३]

पं. रमाबाईंनी 'स्त्री-धर्म निती' हे पुस्तक १८८२ साली लिहिले. हे पुस्तक त्यांनी स्त्रियांना उद्देशून लिहिले आहे. वाङ्मयाच्या दृष्टीने पं. रमाबाई यांची ही पहिली व अद्वितीय कामगिरी आहे. पं. रमाबाई स्त्री उद्धाराचा मार्ग सांगतात की, "आता आमच्या या शोचनीय दशेत पडलेल्या स्त्री जातीच्या उत्कर्षाविषयी उपाय करणे तर त्याचा पाया आत्मावलंबन हा आहे."[५४] एकोणिसाव्या शतकात स्त्रियांनी स्वावलंबी व्हावे हा क्रांतीकारी विचार पं. रमाबाई मांडतात. स्त्रियांचे आत्मावलंबन झाल्यानेच त्यांचे शोषण बंद होईल हा विचार मांडतात.

सती प्रथेच्या विरोधात महाराष्ट्रात सर्वात प्रथम जगन्नाथ शंकरशेठ यांनी राजा राममोहन रॉय यांच्या मदतीने सती विरोधी कायदा करण्यासाठी ब्रिटीश सरकारला अर्ज केला होता. या अर्जातील तपशील असा होता की, "सती जाणाऱ्या स्त्रियांच्या निकट वारसांना त्यांच्या मृत्यूपासून लाभ होणार असल्यामुळे त्यांनी आपल्या पतीच्या चितेवर जाळून घ्यावे याबद्दल त्यांचे मन वळविल्याची अनेक उदाहरणे अर्जदारास प्रत्यक्ष किंवा विश्वासू साक्षीदारांच्या सांगण्यावरुन माहित आहेत. कोणत्याही शास्त्रांच्या दृष्टीने किंवा जगातील कोणत्याही लोकांच्या सारासार विचाराने पाहिले तरी हे सर्व खूनच आहेत. असे आपल्या अर्जदाराचे नम्र मत आहे."[५५]

राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नामुळे १८२९ साली लॉर्ड बेंटींग ने सतीची चाल कायद्याने बंद केली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सती जाणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी झाले. विसाव्या शतकात सती जाणाऱ्या स्त्रियांची संख्या फारच कमी होती.

## २.४ बालविवाह :

पं. रमाबाईंच्या समकाळातील स्त्री जीवनाशी निगडीत बालविवाह ही प्रथा रुढ होती. "शारीरिक आणि मानसिक परिपक्वता प्राप्त होण्यापूर्वीच मुला–मुलीचा झालेला विवाह म्हणजे बालविवाह."[५६] पं. रमाबाईंच्या समकाळातील बालविवाह या रुढीचा थोडक्यात इतिहास घेतला आहे.

"वैदिक काळात भारतात बालविवाहाची प्रथा अस्थित्वात नव्हती. त्या काळात मुलींचे विवाह तरुणपणीच होत असत. असे दर्शविणारे अनेक उल्लेख ऋग्वेदात आढळतात."[५७] यावरुन वेदकाळी लग्नाच्या वेळी मुली प्रौढ असत असे सिध्द होते. "स्मृतीपूर्व काळात मुलींच्या विवाहाचे वय १६ ते १८ असल्यामुळे मुली विवाहाच्या वेळी सज्ञान असत. त्यांना आपला पती कसा असावा याविषयी पुष्कळदा त्यांची जाणीवपूर्वक संमती घेत आणि काही प्रसंगी त्या जाणीवपूर्वक विरोधही करत."[५८] यावरुन प्राचीन काळामध्ये भारतीय स्त्री जीवन सुसह्य होते असे दिसते.

इ.स. च्या पहिल्या शतकापासून मुलींचे बालविवाह होऊ लागले. कारण या काळात स्त्री सत्तांचा ऱ्हास झाला. नव्या उत्पादनांच्या साधनांची मालकी पुरुषांकडे गेली. उत्पादनांच्या

साधनांवर पुरुषांचा हक्क प्रस्थापित झाला. स्त्रियांवर सामाजिक बंधने लादली गेली. त्यातून बालविवाहाची प्रथा सुरु झाली. मुलींच्या विवाहाच्या संदर्भात धामिक कल्पना समाजात रुढ झाल्या. "अष्टवर्षा भवेद्गौरी, नववर्षा तू रोहिणी। दशवर्षा भवेद्कन्या तत उर्ध्व रजस्वला."[५९]

वरील श्लोकाप्रमाणे आठ वर्षाच्या मुलीला गौरी म्हटले, नवव्या वर्षी तिला रोहीणी म्हटले, दहाव्या वर्षी मुलगी कन्या होते. दहा वर्षानंतर तिला रजस्वला म्हणत. रजस्वला म्हणजे ऋतूप्राप्त मुलगी. ऋतूप्राप्त मुलगी साधारणत: अकरा किंवा बारा वर्षांची असते. "रजोदर्शन होईपर्यंत जर मुलीचा विवाह झाला नाही तर माता पिता नरकात जाता."[६०] अशा कल्पना रुढ झाल्या. "इसवी सनाच्या दुसऱ्या शतकाच्या सुमारास लिहिलेल्या आपल्या ग्रंथात याज्ञवल्क्य रजोदर्शनापूर्वी पित्याने मुलीचे लग्न करुन दिले नाही, तर मुलीच्या प्रत्येक ॠतूकाळी तिच्या पित्याला भ्रुण हत्येचे पातक लागते असे लिहितो. इ.स. च्या सहाव्या शतकात यम म्हणतो, योग्य नवरा मिळाला नाही तरी चालेल पण रजस्वला मुलगी अविवाहीत ठेऊ नये."[६१] यावरुन मुलगी रजस्वला होण्यापूर्वी विवाह करण्याची प्रथा सुरु झाली असे दिसते.

या काळात पुरुष सत्ता निर्माण झाली. शेतीसाठी लोखंडाचा वापर सुरु झाला. जंगल तोडून शेतजमीन तयार करण्याची प्रक्रिया सुरु झाली. जमिनीच्या मालकीसाठी संघर्ष सुरु झाला. संघर्षासाठी मुलांची गरज भासू लागली. पुरुषाचे महत्व वाढले. जास्त मुलांना जन्म देणाऱ्या स्त्रीला प्रतिष्ठा मिळाली. "तिचा ऋतूकाळ वाया जाऊ न देण्याच्या धोरणामुळे बालविवाह सुरु झाले."[६२] "निर्णयसिंधू, मिताक्षरा व मनु:स्मृती या ग्रंथामध्ये मुलीचे विवाहयोग्य वय आठ सांगितले आहे."[६२अ] या ग्रंथांनी विवाहाच्या वयासंबंधी नियम तयार केले. समाजाने ते पालन केले. "हूण, मुसलमान इत्यादी विधर्मी लोकांच्या जाचामुळे व स्त्रियांना भिक्षुणी बनवण्यातल्या धोक्यामुळे मुलींची लग्ने एकदाची लवकर उरकून त्यांना कोणाच्या तरी हाती सोपवून जबाबदारीतून मुक्त व्हावे अशी आवश्यकता या कालखंडात उत्पन्न झाली."[६३] "वयाचे नियम ब्राम्हणांपुरतेच मर्यादित नव्हते आणि क्षत्रिय, वैश्य मुलींचे विवाह ऋतूप्राप्तीनंतर जरी क्वचित होत असले, तरी पुढे पुढे घराण्याचा कुलीनपणा टिकविण्यासाठी या आचार नियमांना प्राधान्य दिले गेले. अशा रीतीने बालविवाह हिंदू समाजात रुढ झाले."[६४] ही प्रथा भारतीय समाजात वर्षानुवर्षे टिकून होती.

पेशवे काळात बालविवाह सर्रास होत असत. मुलगी आठ वर्षापुढे लग्नावाचून राहू देणे हा पेशवाईत अधर्म मानला जात असे. "दुसऱ्या बाजीरावाचे लग्नाच्या वेळी वय ११ वर्षाचे तर पत्नी भागीरथी बाईंचे वय ८–९ वर्षाचे असावे."[६५] पेशवाईत राज्यकर्ते, जबाबदार पुरुष बालविवाह करीत. छत्रपतींच्या घराण्यात, पेशव्यांच्या घराण्यात तसेच त्यांचे सेनापती, सरदार, मुत्सद्दी यांच्यात बालविवाह प्रथा रुढ होती. पी. ए. गवळी यांनी 'पेशवेकालीन महाराष्ट्र' या पुस्तकात पेशव्यांच्या लग्नावेळच्या वयाचा तपशील पुढीलप्रमाणे दिला आहे. "विवाहाच्या वेळी बाळाजी बाजीराव (नानासाहेब) पेशवे यांचे वय ९ वर्षे, विश्वासराव पेशवे यांचे वय ८ वर्षे, पहिले माधवराव यांचे वय ९ वर्षे, नारायणराव पेशवे यांचे वय १० वर्षे, सवाई माधवराव यांचे वय ८ वर्षे, नाना फडणवीस यांचे वय १० वर्षे होते."[६६] मुलीचे लग्नाचे वय मुलापेक्षा कमी होते. मुलीच्या लग्नाच्या वयासंदर्भात काशीबाई कानिटकर लिहितात. "लग्नात तिकडचे वय सोळा वर्षाचे व माझे नऊ वर्षाचे होते. पुर्वी नऊ वर्षाची मुलगी म्हणजे लग्नाला मोठी झाली. गळ्याला लागली. डोकीवरुन पाणी गेले असे म्हणत."[६७]

बालविवाह करताना धर्म शास्त्राचा विचार होत होता. मुलीच्या शारीरिक व मानसिक परिपक्वतेचा विचार केला जात नव्हता. बालविवाहाकडे सामाजिक परंपरा म्हणून पाहिले जात होते. या संदर्भात न्या. रानडे म्हणतात, "जुन्या शास्त्रातील बंधनामध्ये आणखी एक घातक गोष्ट होती. त्यात केवळ आज्ञा केलेल्या असतात त्यामागे तर्काचे, कार्यकारणाचे, संयुक्तिकतेचे कसलेही विवेचन केलेले नसे."[६८] 'मुंबईचे वर्णन' मध्ये माडगावकर लिहितात की, "कित्येकांची इतक्या लहाणपणी लग्ने होत की, आई–बाप त्यांस कडेवर घेऊन जो विधी त्यांनी स्वत: करायचा तो आपण करतात."[६९]

२ जून १८८७ च्या अंकात 'ज्ञानोदय' कर्ते म्हणतात, "कऱ्हाडास एका तेल्याने आपल्या मुलाचे लग्न केले. मुलाचे वय ९–१० महिन्याचे व मुलीचे वय ३–४ महिन्याचे आहे. हा विवाहविधी या देशास शोभतो काय ?"[७०] यावरुन मुलामुलींचे विवाह अतिशय कमी वयात होत होते. बालविवाहाच्या प्रथेचे समाजावर प्राबल्य होते.

एकोणिसाव्या शतकातील सुधारकांचे विवाह लहान वयात झालेले दिसतात. रा. ब. दादोबा पांडुरंग यांचा विवाह १८२८ साली झाला. ते लिहितात, " मी त्यावेळी तेरा वर्षांचा होतो आणि नवरी आठ वर्षांची होती."[७१] गोपाळ हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी सन १८४८ पासून

बालविवाह पध्दतीच्या विरुध्द लिहित होते. "या अत्यंत जहाल अशा सुधारकाचा विवाह त्यांच्या वयाच्या ७ व्या वर्षी १८३० मध्ये झाला. तेव्हा त्यांच्या पत्नीचे वय ४ वर्षाचे होते."[७२] "१८३० साली दादाभाई नवरोजी यांचा विवाह झाला, तेव्हा त्यांचे वय ५ वर्षांचे होते. सावित्रीबाई फुल्यांना शिकवून तयार करणारे केशव शिवराम भवाळकर यांचा विवाह झाला तेव्हा त्यांचे वय ८ वर्षे होते. तर त्यांची पत्नी ५ वर्षांची होती."[७३] बालविवाहाची पध्दत होती म्हणून सुधारकांचे विवाह लहान वयात झाले होते ते सुधारक पुढील आयुष्यात झाले होते.

जातिव्यवस्था हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्ये आहे. जातिव्यवस्थेची श्रेणी निहाय संरचना होती. ब्राम्हणवर्गाचे स्थान सर्वात वरचे होते. धर्म शास्त्राचे पालन करण्यासाठी ब्राह्मण समाज आग्रही होता. शेठ बेहरामजी मलबारी म्हणतात, "बालविवाहाची पध्दत ब्राह्मणांकडून इतर जातीत पसरली...."[७४] धर्म नियमांचे पालन समाजाकडून व्हावे यासाठी ब्राह्मण समाजाचा मोठा दबाव होता.

वयात आलेल्या मुलीची नितिमत्ता बिघडण्याची भिती आई वडिलांना वाटे. मुलीची नितीमत्ता बिघडेल या भितीपोटी बालविवाहाची प्रथा रुढ झाली. "स्त्रीच्या लैंगिकतेची धास्ती तत्कालीन समाजाच्या मनात असावी असे दिसते. म्हणूनच तिला बांधून ठेवण्याचे, अडकवून ठेवण्याचे मार्ग शोधले गेले. बालविवाहाची पध्दत हा त्यातीलच एक मार्ग होता."[७५]

बालविवाहाची चाल पडण्यामागे कन्या विक्रय हे एक कारण होते. भारतात गुलामगिरीची चाल होती. स्त्री–पुरुषांची खरेदी विक्री होत होती. गरीब आई–बाप मुलींना विकत असत. तरुण व सुंदर मुलींना चांगली किंमत मिळत होती. "वधूची विक्री बापाने करु नये म्हणून दुसऱ्या बाजीरावाने विशेषत: कोकणात व वाई जिल्ह्यामध्ये कडक प्रतिबंध घातला. ही चाल थांबविण्यासाठी दुसऱ्या बाजीरावाने आणखीही हुकूम काढला की, नऊ वर्षांच्यावर मुली अविवाहीत राहता उपयोगाच्या नाहीत."[७६] कन्या विक्रय बंद व्हावा म्हणून दुसऱ्या बाजीरावाने चांगल्या हेतूने हुकूम काढला होता. पुढे नऊ वर्षाची अट पाळण्यासाठी अतिरेक झाला. दुसऱ्या बाजीरावाचा हुकूम बालविवाहाची चाल बळकट करण्यात कारणीभूत ठरला.

एकोणिसाव्या शतकात जरठ–कुमार विवाह प्रथा होती. या प्रथेमुळे बालविवाहाची चाल रुढ झाली. भारतीय समाज पुरुष प्रधान आहे. पुरुष स्त्रियांविषयीच्या लैंगिक हव्यास कायम जपतो. "नानासाहेब पेशव्यांनी पानिपतहून येताना वाखारे देशस्थ ब्राह्मणांच्या मुलीशी तिचे वय

आठ–नऊ वर्षाचे आहे तिच्याशी लग्न केले. लग्नाच्या वेळेस नानांचे वय चाळीस होते. नाना फडणविसांची एकंदर नऊ लग्ने झाली. त्यातील सात बायका त्याच्या हयातीत मरण पावल्या. पहिल्या पाच मरण पावल्या तेव्हा त्यांचे वय चाळीशीच्या पुढे गेले होते."[७७] श्रीमंत व प्रतिष्ठित घराण्यातील पुरुष असे विवाह करत होते. गरीब मातापित्यांना आर्थिक प्रलोभने दाखवून कमी वयाच्या मुलीबरोबर लग्ने केली जात होती. दि. १५ जूलै १८८४ च्या 'ज्ञानोदय' च्या बातमीनुसार "दुर्गा नावाच्या लहान मुलीचा विवाह बडोद्याच्या चिमणराव जामदार या ७० वर्षाच्या वृध्दाबरोबर झाला."[७८] अशी भरपूर उदाहरणे तत्कालीन समाजात आढळत होती.

आगरकरांनी लहान वयाच्या वधूशी लग्न करणाऱ्या वयस्क वराला उतावळा, दांडगा व क्रूर लांडगा म्हटले आहे. ते लिहितात, "जरठ कुमारी विवाह म्हणजे वाघ शेळीचा खेळ"[७९] कोणत्याही वयाचा पुरुष लग्नासाठी कमी वयाच्या मुलीचीच निवड करीत होता. त्यामुळे बालविवाह प्रथेला उत्तेजन मिळाले.

तत्कालीन समाजात बहुपत्नीत्वाची चाल होती. अनेक स्त्रियांशी लग्न करणे सामाजिक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात होते. "लहान वयात लग्न झालेली पत्नी मोठेपणी आवडत नाही म्हणून टाकून देण्याची चाल होती."[८०] राजे, सरदार, राजघराण्यातील पुरुष, श्रीमंत लोक यांमध्ये बहुपत्नीत्वाची चाल होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी सात स्त्रियांसोबत विवाह केला होता. सभासद लिहितो की, "राजियास प्रथम स्त्री संभाजी राजियांची माता होती. ती निवर्तली. त्याजवरी राजियांनी सहा स्त्रिया केल्या."[८१] "बृहदीश्वर शिलालेखात सहा राण्यांची नावे माहेर घराण्यासह दिली असून शेवटी आणखी दोन राण्या होत्या असे सांगून त्यांची फक्त माहेर दिली आहेत."[८२]

बहुपत्नीत्वाची चाल समाजमान्य होती. यासंदर्भात कायदेशीर व सामाजिक विरोध नव्हता. पुरुष पुनर्विवाहासाठी बालवधूची निवड करीत असे. त्यामुळे बालविवाहाची प्रथा अधिक रुढ झाली. "मुली पळवून नेऊन जबरदस्तीने विवाह झाल्याची बरीच उदाहरणे श्रीमंत वर्गामध्ये आढळतात. या चालीविरुध्द पेशव्यांचे न्यायाधीश न्यायमुर्ती रामशास्त्री प्रभुणे यांनी आज्ञा काढली की, अशा गुन्हेगारांना तुरुंगात टाकून आयुष्यभर भीक मागून पोट भरण्याची शिक्षा द्यावी."[८३] श्रीमंत लोक लहान मुलींना पळवून नेऊन लग्ने करीत असत. त्यामुळे बालवयात मुलीचे लग्न केले की, तिच्या जबाबदारीतून मुक्तता मिळते असा समज रुढ होता.

शेठ बेहरामजी मलबारी बालविवाहाची चाल रुढ होण्याची जबाबादारी मुसलमानी स्वाऱ्यांवर टाकतात ते म्हणतात, “मुसलमानांच्या सुरुवातीच्या स्वाऱ्यांमुळे बालविवाह लोकांवर लादला गेला असावा.”[८४] मुस्लिम स्वाऱ्यांच्या भितीने मुलींची लग्ने बालवयात करुन जबाबदारीतून मुक्तता मिळविण्याची मानसिकता होती. परकिय हल्ल्यांच्या भितीमुळेच स्त्रियांवरची बंधने वाढली असे मत शोभना तीर्थळी व्यक्त करतात. त्या लिहितात, “वारंवार परकिय हल्ले झाल्याने स्त्रियांचे रक्षण करण्याची गरज भासू लागली.”[८५] त्यातूनच बालविवाहाची प्रथा रुढ झाली.

### २.४.१ बालविवाह विरोधी चळवळ :

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात सुधारणेचे वारे वाहू लागले. स्त्री सुधारणाविषयक विचार तत्कालीन वृत्तपत्रे, ग्रंथ यामधून प्रकट होऊ लागला. सुधारकांच्या सर्वांगिण चळवळीत स्त्रीविषयक प्रश्नांना महत्वाचे स्थान होते.

बालविवाह प्रथेच्या विरुध्द लोकहितवादींनी १८४८ पासून लिहायला सुरुवात केली. “१७ जून १८४९ रोजी प्रभाकरमध्ये ‘धर्म सुधारणा’ नावाचा लेख लोकहितवादींनी लिहीला. त्यात बालविवाहाचा ते निषेध करतात. बालविवाहाच्या प्रथेने विवाहाचा मुलभूत उद्देश साधत नाही. नैतिक व शारीरिक नुकसान होते. बालविवाहामुळे वैधव्य, अशक्त संतती, मुर्खपणा, अल्पायुष्य यांसारखे दुष्परिणाम होतात म्हणून बालविवाहाची प्रथ बंद झाली पाहिजे असे ते प्रतिपादन करतात.”[८६]

लोकहितवादींच्या या विचाराचा पाठपुरावा नंतरच्या सुधारकांनी केला. बालविवाह या प्रथेविषयी सामाजिक उद्बोधन करण्याची मोहिम सुरु झाली. त्यामागे खालील तीन घटना कारणीभूत ठरल्या.

### १) रखमाबाई विरुध्द दादाजी खटला :

“सन १८७४ मध्ये रखमाबाई व दादाजी यांचा विवाह झाला होता. विवाहाच्या वेळी रखमाबाई यांचे वय १३ वर्षे होते. दादाजीचे वय १९ वर्षे होते. लग्नानंतर रखमाबाई माहेरी राहत. दादाजीने तिला सासरी येण्यासाठी आग्रह धरला. रखमाबाईंनी दादाजीसोबत संसार करण्यास नकार दिला. दादाजीने पत्नीने नांदायला यावे म्हणून कोर्टात दावा दाखल केला. या खटल्यामध्ये रखमाबाईंचा युक्तिवाद ग्राह्य मानला गेला. त्यांनी कोर्टात सांगितले की, मी लहान

नकळत्या वयात असताना माझा विवाह लावून देण्यात आला, तो मला पसंत नाही."[८७] मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधिश पिन्हे यांनी रखमाबाईंचा युक्तिवाद ग्राह्य मानला व रखमाबाईंच्या बाजूने निकाल दिला. या निकालानंतर दादाजीने वरील कोर्टात अपील केले. त्याचा निकाल १८८७ मध्ये दादाजींच्या बाजूने लागला. या निकालानुसार "रखमाबाईने दादाजीकडे नांदायला जावे. न गेल्यास सहा महिने तुरुंगवासाची शिक्षा भोगावी."[८८] रखमाबाईंनी नांदायला न जाण्याचा निर्णय घेतला व तडजोड मान्य केली.

बालवयात झालेला विवाह अमान्य करण्याची ही पहिलीच घटना होती. रखमाबाईंनी दादाजी सोबतचा विवाह नाकारण्याचे मुख्य कारण म्हणजे तो विवाह तिच्या बालवयात (अजाणतेपणी) म्हणजे "रखमाबाईंनी २९ जून १८८७ रोजी कोर्टात सादर केलेल्या निवेदनानुसार वयाच्या ११ व्या वर्षी झाला होता."[८९] नकळत्या वयातील विवाह नाकारुन तिने धर्मशास्त्राविरुध्द बंड पुकारले होते. तिने बालविवाह प्रथेला आव्हान दिले. रखमाबाई व दादाजी हा भारतीय वैवाहिक समस्येचा खटला होता. या खटल्यामुळे महाराष्ट्रात सनातनी मंडळी व सुधारक यांच्या वैचारिक द्वंद्व सुरु झाले. "टाईम्स, सुबोधपत्रिका, इन्दुप्रकाश, इंडियन स्पेक्टेटर, बॉम्बे गॅझेट वगैरे जवळजवळ सर्व वर्तमानपत्रांनी ह्या खटल्याची दखल घेतली व बातमी छापली."[९०] १९ ऑक्टोबर १८८५ च्या इन्दुप्रकाशच्या अंकात लिहिले होते की, "हा ठराव (पिन्हे यांचा निकाल) अपिलात फिरो किंवा कायम होवो. त्याच्या योगाने सध्याच्या आमच्या लग्न पध्दतीत काही एक फरक पडायचा नाही."[९१] २७ मार्च १८८७ च्या मराठा च्या अंकात लिहिले की, "रखमाबाई नवरा आवडत नाही, एवढ्याचसाठी त्याच्याकडे जायला नकार देते. हे कारण साधार नाही...."[९२]

रखमाबाईंच्या संदर्भात पं. रमाबाई म्हणतात, "मी स्वत: हिंदू धर्मशास्त्राचा अभ्यास केला आहे. स्त्री ला इतकी अन्यायी वागणूक देण्यास शास्त्राने कुठेही आधार दिलेला नाही."[९३] पं. रमाबाईंनी रखमाबाईंची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी रखमाबाईची बाजू योग्य असल्याचे सांगितले. तसेच ब्रिटीश न्यायालयाने रखमाबाई विरोधात दिलेल्या निकालाविषयी नाराजी व्यक्त केली.

रखमाबाई व दादाजी खटल्याची समाप्ती ५ जूलै १८८८ रोजी झाली. वरच्या कोर्टाच्या निकालानुसार रखमाबाईंनी तुरुंगवास स्विकारला.

## २) शेठ मेहरामजी मलबारी यांनी सन १८८४ मध्ये लिहिलेली बालविवाह व असंमत वैधव्य यावरील टिपणे :

१५ ऑगस्ट १८८४ रोजी शेठ बेहरामजी मलबारी यांनी गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांचेकडे 'हिंदुस्थानातील बालविवाह' हे टिपण पाठविले. या टिपणीत मलबारी म्हणतात, "समाजातील अनेक दु:खाचे कारण विशेषत: लादले जाणारे वैधव्य याला कारण बालविवाहाची पध्दत आहे.... मुली लहान वयातच संसाराला लागल्यामुळे त्यांची प्रकृती निस्तेज होते. कधीकधी तर मुलींना कायमचे अपंगत्व येते. पती लहान वयात वारला, तर या लहान स्त्रीवर जन्मभर विधवापण लादले जाते. तिचे पुढचे आयुष्य कष्टप्रद केविलवाणे होते...."[९४] मलबारींनी बालविवाह प्रथेचे दुष्परिणाम सरकारच्या नजरेस आणून दिले. बालविवाहावर सरकारने प्रत्यक्ष कायदेशीर बंदी आणण्यापेक्षा अप्रत्यक्ष दबाव आणावा असे मलबारींना वाटते.

"इंग्रज सरकारच्या रिवाजानुसार ही टिपणे हिंदुस्थानातील वेगवेगळ्या मान्यवर आणि सामाजिक दृष्ट्या जागरुक व्यक्तिंना पाठविली गेली. या टिपणांना जे प्रतिसाद आले त्यात ज्योतिराव फुले, बापुजी हरि शिंदे आणि विश्राम रामजी घोले यांची पत्रे आहेत."[९५]

मलबारींच्या टिप्पणीवर ज्योतिराव फुले यांनी डिसेंबर १८८४ ला प्रतिक्रिया पाठविली. "एकोणिस वर्षाखालील मुलास व अकरा वर्षाखालील मुलीस कायद्याने लग्न करण्यास परवानगी नाकारावी. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या पालकांवर काही प्रमाणात कर बसवून त्या पैशाचा विनियोग मध्यम आणि कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणासाठी करावा असे ज्योतिरावांनी सुचविले होते."[९६]

मलबारींच्या टिपणीवर बापूजी हरि शिंदे यांनी १८ डिसेंबर १८८४ रोजी प्रतिक्रया पाठविली. बापुजी हरि शिंदे हे बुलढाण्याचे सत्यशोधक समाजाचे सभासद होते. "इंग्रज सरकारने सती, भ्रुणहत्या, गुलामी आणि इतर अनेक दृष्ट प्रथा ज्याप्रमाणे मोडून काढल्या आहेत त्याप्रमाणेच बालविवाहासारखी प्रथा कायद्याच्या दंडुक्याने मोडून काढावी. बालविवाह हा गुन्हाच मानला गेला पाहिजे. कायद्याने बालविवाहावर बंदी आणावी अशी मागणी शिंदे यांनी केली."[९७] मलबारींच्या टिपणीमुळे बालविवाह प्रथेविषयी मोठी चर्चा, वादविवाद समाजात घडून आले.

### ३) **फुलमणी खटला :**

बंगाल प्रांतामध्ये ऑगस्ट १८९० मध्ये फुलमणी खटला गाजला होता. फुलमणी खटला संमती वयाचा कायदा वेगाने पास होण्यासाठी तत्कालीन कारण ठरला. या खटल्याचा वृत्तांत आगरकरांनी 'हा कलंक कसा जाणार?' या लेखात दिला आहे. ते लिहितात, "हरिमोहन आपल्या सासुरवाडीस राहत होता. त्याची निजण्याची खोली त्याच्या बायकोच्या खोलीच्या दूर होती. एके दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास आपली पुमोनी (फुलमणी) मोठमोठ्याने ओरडत आहे असे वाटून तिची आई घाबऱ्या-घाबऱ्या तिच्या खोलीत धावत गेली, तो निश्चेष्ट पडलेली पुमोनी आणि भिऊन गेलेले जावई तिच्या दृष्टीस पडले! पुमोनीचे अंथरुण रक्ताने भरुन गेले होते ! जावईबोवा हा काय प्रकार आहे? असे सासुबाईंनी विचारल्यावर त्यांनी असे उत्तर दिले की, हे असे कसे झाले हे मला ठाऊक नाही, पण हिचे ओरडणे ऐकून मी आपल्या खोलीतून या खोलीत आलो आणि पाहतो तो हा प्रकार! हे कसे झाले असेल ते मला ठाऊक नाही पण दहाव्या वर्षानंतर नवऱ्याने बायकोकडे जावे हे बेकायदेशीर होत नाही हे मात्र मला ठाऊक आहे."[९८]

हरिमोहन व फुलमणी हे विषम वयाचे जोडपे होते. आगरकर हरिमोहनचे वय तीसपेक्षा जास्त होते असे लिहितात. फुलमणी ११ वर्षाची होती. हरिमोहन व फुलमणी यांच्या समागमनाच्या वेळी तिचा मृत्यू झाला होता. हरिमोहनवर खटला दाखल झाला. "हरिमोहन गुन्हेगार ठरला पण त्याला पिनल कोड कलम ३७६ नुसार काळ्या पाण्याची शिक्षा न होता, तीन महिन्याच्या कैदेची शिक्षा झाली. पण त्यावर सरकारने वरिष्ट कोर्टात अपील केले. तेथे त्यास एक वर्षाची शिक्षा झाली."[९९]

या तीन घटनांमुळे बालविवाह प्रथेचे दुष्परिणाम समाजापुढे आले. या प्रथेविरुध्द सामाजिक वातावरण तयार होण्यास मदत झाली. रखमाबाई व फुलमणी एकोणिसाव्या शतकात बालविवाह प्रथेला बळी पडलेल्या बालवधूंचे प्रतिनिधीत्व करतात. "फुलमणीच्या मृत्यूनंतर सुधारकांनी गुन्हेगारी कायद्यातील ३७५ कलमातील स्वपत्नीशी संबंध ठेवण्याचे वय दहाच्या ऐवजी १२ करावे अशा तऱ्हेच्या अर्जाचा मसुदा तयार करुन त्यावर सह्या घेण्यासाठी गावोगावी पाठविण्यात आला."[१००]

१८९१ मध्ये सर ॲन्ड्र्यु स्कोबल यांनी संमती वयाचे बिल कायदे मंडळापुढे मांडले. हे बिल मांडताना सर स्कोबलने हेतू स्पष्ट केला की, "विवाहितांच्या संबंधात पत्नीचे वय पूर्वी जे दहा असे ते बारापर्यंत वाढवून अल्पवयात अकाली होणारा समागम टाळावा."[१०१]

संमती वयाच्या बिलाने सनातनी व सुधारक यांच्यांत वादविवाद घडून आले. आगरकरांनी 'सुधारक' पत्रामध्ये 'संमतीचे वय व जुन्या लोकांचा खोटेपणा' या लेखामध्ये लिहिले की, "संमतीचे वय बारा वर्षेपर्यंत वाढविण्याच्या हेतूने मि. स्कोबल यांनी जे बिल मुख्य कायदे कौंसिलपुढे आणले आहे ते पसार झाल्यास ज्या राक्षसी कामुकांच्या कामवासना अनावर होतील त्यास कडक शिक्षा देण्यास सापडेल."[१०२]

न्या. रानडे यांनी वयाचा दाखला दिल्याशिवाय विवाह होऊ नयेत असा विचार मांडला. "लालशंकर उमियाशंकर असे मत मांडले की, इ. ३ री व त्यापुढील पाठ्यपुस्तकातून बालविवाह पध्दती विरुध्दचे धडे द्यावेत व बालविवाहांना सरकारी ऑफिसर्सनी उपस्थित राहू नये. समाज सुधारक व्यंकट रंगो कट्टी यांनी सुचविले की, विवाहीत विद्यार्थ्यांना दुप्पट फी आकारावी."[१०३] बालविवाह रोखण्यासाठी सुधारक शिक्षणातून मार्ग काढताना दिसतात. त्या काळात शिक्षणाचा प्रसार झाला नव्हता. शिक्षणाद्वारे बालविवाह रोखणे शक्य नव्हते. त्यासाठी कायद्याची गरज होती. "२१ मार्च १८९२ मध्ये संमती वयाचा कायदा झाला. या कायद्याने मुलींचे समागमनाचे वय बारा झाले."[१०४] संमतीवयाच्या बिलाला पं. रमाबाईंनी पाठिंबा दिला होता. "त्यांनी आपल्या भाषणामध्ये पुरातन कालीन स्त्रियांची योग्यता त्यांचे विद्याविषयक प्रेम, समाजात मिळून मिसळून स्त्रियांची व्यवहार करण्याची रीत, प्रौढ विवाहाची जुनी चाल व नवीन काळात अशा विवाहांची आवश्यकता इ. गोष्टींविषयी चर्चा समाजामध्ये घडवून आणण्याचा प्रयत्न केला."[१०५]

अशाप्रकारे मुलींच्या समागमाच्या वया संदर्भातील चर्चा, वादविवाद, मतमतांतरे घडून आली. मुलींच्या विवाहाचे कायदेशीर वय ठरविले जात नव्हते. या काळात सुधारकांनी उद्बोधनाचे प्रयत्न केले. "१९२९ मध्ये बालविवाहावर बंदी घालणारे 'शारदा बिल' मध्यवर्ती कायदेमंडळापुढे चर्चेसाठी मांडले. ब्राम्हणेत्तर चळवळीतील नेत्यांनी शारदा बिलाचे समर्थन करुन सरकारवर दबाव आणला. अखेर हे बिल पास झाले. तरी भारतामध्ये बालविवाहाची चाल पूर्ण नाहीशी झाली नाही."[१०६]

बालविवाह रोखण्यासाठी सरकारी पातळीवर खालील कायदे करण्यात आले. त्याची माहिती केसरीच्या ६ नोव्हेंबर १८८३ च्या अंकात दिली आहे. "१८९४ मध्ये म्हैसूर सरकारने बालविवाह बंदीचा कायदा केला. या कायद्यान्वये आठ वर्षाखालील वयाच्या मुलीच्या विवाहास बंदी घातली. १९०४ मध्ये बडोदा सरकारने मुलीचे विवाहयोग्य वय बारा व मुलांचे सोळा ठरविले. १९२७ साली इंदूर सरकारने मुलींची वयोमर्यादा बारा व मुलांची चौदा ठरविली. १९२९ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा (शारदा बिल) सरकारने पास केले त्या अन्वये मुलीचे वय चौदा व मुलाचे वय अठरा असे निश्चित केले. १९५५ च्या हिंदू विवाह कायद्यान्वये मुलीचे वय पंधरा वर्षांचे ठरले व मुलाचे वय अठरा ठरले. पुढे १९७८ च्या कायद्यान्वये मुलीचे लग्नासाठी वय अठरा व मुलाचे एकवीस वर्षे ठरविण्यात आले."[१०६अ]

भारत सरकारच्या महिला व बालकल्याण विकास मंत्रालयाच्या लोकसंख्या परिषदेने २००६–०७ मध्ये 'द युथ इन इंडिया : स्टडी ॲण्ड नीड्स' हा अभ्यास केला होता. याची माहिती लोकसभेत लेखी उत्तराच्या स्वरुपात दिली होती. या माहितीनुसार "सर्वाधिक ५२.२% बालिका वधू बिहारमध्ये आहेत. राजस्थानमध्ये ४५.७%, झारखंडमध्ये ४२.७%, आंध्रप्रदेशात २७.६%, तामिळनाडूत ९.५% बालिकावधूंचे प्रमाण आहे."[१०६ब]

आत्ताच्या काळातील देशातील बालविवाहाची वरील आकडेवारी चिंताजनक आहे. उत्तर भारतापेक्षा दक्षिण भारतात बालविवाहाचे प्रमाण कमी आहे. बालविवाह रोखण्यासाठी सरकारी पातळीवर प्रयत्न केले आहेत. मात्र या प्रयत्नांना फारसे यश येताना दिसत नाही.

महाराष्ट्र सरकारने बालविवाहाबाबत डिस्ट्रिक्ट लेव्हल हाऊसहोल्ड ॲण्ड फॅसिलिटी सर्व्हे केला. या पाहणीत "राज्यातील जवळपास ५२% महिलांचे विवाह हे १८ वर्षे पूर्ण होण्याच्या आत होत असल्याचे उघडकीस आले होते. या पाहणीनंतर सरकारने बालविवाह रोखण्याचे कायदेशीर अधिकार ग्रामसेवक आणि अंगणवाडी सेविकांना दिले आहेत."[१०६क]

यावरुन बालविवाहाची समस्या आजही अस्तित्वात असल्याचे दिसते.

## २.५ विधवांची स्थिती :

एकोणिसाव्या शतकातील स्त्री जीवनाच्या संदर्भात विधवांची स्थिती हा केंद्रीभूत मुद्दा होता. पं. रमाबाईंच्या स्त्री सुधारणा कार्याचे महत्व स्पष्ट करण्यासाठी तत्कालीन स्त्री जीवनातील विधवांच्या स्थितीचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

मराठी विश्वकोशातील नोंदीनुसार "जिचा पती निधन पावला आहे व जिचे पुन्हा लग्न झाले नाही, अशी स्त्री म्हणजे 'विधवा' होय."[१०७] भारतीय संस्कृती कोशातील नोंदीनुसार "कष्टमय, खडतर, उपेक्षित आणि अपमानित जिणे जगणारी आणि त्याच बरोबर सहृदय अंत:करणाच्या माणसाच्या हृदयात दयेचा द्रव निर्माण करणारी कोणती व्यक्ती भारतीय समाजात असेल तर ती विधवा स्त्री होय. तशातच तिला मुलगा नसेल, आर्थिक परिस्थिती गरीबीची असेल तर त्या विधवा स्त्रीची स्थिती अधिकच केविलवाणी होते. विधवेकडे पाहण्याची समाजाची दृष्टी सामान्यत: सहानुभूतीशून्य होती. तिचा पती मृत होताच कुटुंबातल्या सर्वांनी ती तिरस्करणीय वाटू लागते. तिचे दर्शन देखील अपशकुनी मानले जाते. संन्यस्त वृत्तीने राहणे, एकत्र कुटूंबातील सर्वांच्या खस्ता खाणे, पोटभर अन्नावरही सत्ता नसणे आणि इतरांच्या केवळ दयाबुध्दीवर अवलंबून जे मिळेल त्यात समाधान मानणे, हेच भोग तिच्या वाट्याला येई."[१०८] यावरुन विधवांचे जीवन दु:खप्रद व नकारात्मक होते हे स्पष्ट होते.

"पूर्वजन्मीच्या पापामुळे स्त्री विधवा होते, अपवित्र होते अशा कल्पना फार प्राचीन काळापासून आहेत."[१०९] प्राचीन काळी 'नियोग' नावाची प्रथा होती. "एखाद्या स्त्रीचा पती मृत पावला वा काही कारणाने वंश खंडीत होण्याचा प्रसंग आला असेल तर घरातील वडिलधाऱ्यांच्या संमतीने आपल्या दीराशी वा नात्यातील एखाद्या पुरुषाशी विधीपूर्वक शरीरसंबंध करुन पूत्राची प्राप्ती करुन घेता येत असे."[११०] मृत पतीचा वंश त्याच्या नावाने चालावा हा नियोग प्रथेमागचा हेतू होता. पूत्र प्राप्तीनंतर त्यांना संपत्तीचा उपभोग घेता येत होता. त्यांच्या अतृप्त कामवासना नियंत्रित होत होत्या. "या सोईचा विचार करुनच स्वामी दयानंद सरस्वती यांनी नियोग पध्दती पुन्हा माफक प्रमाणात सुरु करावी अशी शिफारस केली होती."[१११] ही पध्दत पुढे बंद पडली. याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत. १) मूल दत्तक घेऊन वंश चालविण्याची पध्दत सुरु झाली. त्यामुळे नियोग पध्दतीला पर्याय उपलब्ध झाला. २)

नियोग पध्दतीमुळे कौटुंबिक वातावरणात गढूळपणा येऊ लागला. ३) समाजामध्ये स्त्रीने पतिव्रता म्हणून राहण्यासंदर्भात अपेक्षा वाढल्या.

"समाजात बालविधवा व प्रौढविधवा हे विधवांचे दोन प्रकार होते. बालविधवांच्या पुनर्विवाहाची व्यवस्था वसिष्ठ धर्म सूत्र, बोधायन धर्म सूत्र व ब्रम्हपुराण या धर्म ग्रंथात सांगितली. पती नाहिसा झाला, मृत झाला, त्याने संन्यास घेतला, तो नपुंसक असला किंवा एखादे महापातक करुन पतीत झाला तर अशा आपत्तीत स्त्रियांना दुसरा पती करता येतो असे अग्नी पुराणामध्ये सांगितले आहे."[११२]

विधवांच्या स्थितीमध्ये एकोणिसाव्या शतकापर्यंत बदल झाला नाही. या शतकात समाज सुधारणा चळवळींचा जन्म झाला. विधवांच्या दयनीय स्थितीविषयी चर्चा होऊ लागली. लोकहितवादींनी शतपत्रांमधून विधवांच्या अन्यायकारक स्थितीला वाचा फोडली. ते लिहितात, "प्रत्येकाच्या घरी विधवा नाही असे नाही आणि किती एकांच्या कन्या लहानपणी विधवा झाल्या आहेत की, त्यांस नवरा म्हणजे काय हे ठाऊक देखील नाही. तिला जेवायला कमी घालतात. ती केशरहित व अलंकाररहित होते आणि तिचे तोंड पाहिले तर देखील वाईट म्हणतात"[११३] लोकहितवादी शतपत्रांतून विधवांच्या स्थितीचे वर्णन करतात. 'पुनर्विवाह' या विषयावरील पत्रातून विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला.

ताराबाई शिंदे यांनी स्त्री–पुरुष तुलना या पुस्तकातून विधवांच्या स्थितीविषयी सडेतोड मते मांडली. त्या लिहितात, "एखादा त्याच्यावर ही आकाशाची कुऱ्हाड कोसळली की, त्या वैधव्याचे गाठोडे पदरात बांधून आपल्या भर्त्याचे गुण–अवगुण बाणीत व सर्व घरच्या दास्यांचा जाच काढीत मरुन जात."[११४] विधवांचे पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोगाप्रमाणे अनेक ठिकाणी व जातीत पसरली आहे असे वर्णन ताराबाई शिंदे करतात.

वैधव्य हे सामाजिक व धार्मिकदृष्ट्या आपत्ती मानली जात होती. "स्त्री ने मागील जन्मी पापे केलेली असतात. त्या पापांची शिक्षा म्हणून तिला या जन्मी वैधव्य प्राप्त होते अशी सर्रास समजूत होती."[११५]

पं. रमाबाई विधवांच्या स्थितीविषयी लिहितात की, "A widow is called a 'inauspicious'. The name 'rand' by which she is generally known, is the same thing that is borne by a Nauth girl or harlot. The relatives and neighbours of the young window's husband are always ready to call her bad names, and to

address her in abusive language at every opportunity."[११६] पं. रमाबाईंनी 'The High Caste Hindu Woman' हे पुस्तक लिहून भारतीय विधवांच्या स्थितीची माहिती अमेरिकेपर्यंत पोहोचविली. त्यांनी 'शारदा सदन' ही विधवांना शिक्षण देणारी संस्था सुरु केली. मुक्ति मिशन संस्थेमध्ये विधवांचा सांभाळ केला.

उच्चवर्णीय विधवा स्त्रियांना पुनर्विवाहास बंदी होती. "विधवांचा पुनर्विवाह केला तर धर्म बुडेल."[११७] अशी समजूत होती. बालविवाह व जरठकुमारी विवाह प्रथेमुळे विधवांचे प्रमाण जास्त होते. "किती एक म्हातारे पुरुष मरणास पात्र, ज्यांच्या तोंडात एकही दात राहिला नाही, डोळ्याने न्याहाळवत नाही, अंगावर सुरकुत्या पडल्या आहेत, असे वयस्कर लोक आपल्यास तरुण स्त्रिया नऊ-दहा वर्षांच्या करीतात."[११८] विधवांचे केशवपन केले जात होते. विधवांच्या केशवपनाचा संबंध दुराचाशी जोडला होता. १८३७ साली पुनर्विवाह प्रकरण लिहिणारा तैलंग ब्राह्मण म्हणतो, "मागे पुण्यात बहुत दुराचार झाला व विधवा केश राखून व्याभिचार करु लागल्या, तेव्हा श्रीमंतांनी एक दिवस नागझरीच्या काठी नेऊन भादरविल्या."[११९] केशवपन केलेल्या स्त्रियांना बोडक्या म्हणत. त्यांचे दर महिन्याला न्हाव्याकडून वपन केले जात होते. लोकहितवादी या संदर्भात लिहितात की, "पानसे हे तोफखान्यातील सरदार होते, त्यांचे घरी सत्तावन बोडक्या होत्या."[१२०] एका घरात ५७ विधवा होत्या. यावरुन विधवांची संख्या सर्वसाधाराण समाजामध्ये जास्त होती हे लक्षात येते.

तरुण विधवांच्या नैसर्गिक भावनांचा कोंडमारा होत होता. नातेवाईक, घरची मंडळी यांकडून व्याभिचार होत होते. त्यामुळे विधवा मातांची समस्या निर्माण होत होती. त्यामुळे गर्भपात, बालहत्या असे गुन्हे घडत. आगरकर 'वल्लभोपासना' लेखात लिहितात, "गतभर्तृकांनी दुराचारी निघू नये म्हणून त्यांना आम्ही कारागृहातल्या कैद्याप्रमाणे वागवितो. असे असून नद्यांत, रस्त्यावर व अनाथगृहात लहान मुलांची प्रेते आणि सजीव मुले कोठून येऊन पडतात?"[१२१]

बाबा पद्मनजी यांनी यमुना पर्यटन कादंबरीमध्ये विधवा मातांच्या स्थितीचे वर्णन 'पंढरपुरातील विधवा' या पुरवणीमध्ये केले आहे. ते लिहितात, "पंढरपूरसारख्या क्षेत्राच्या ठिकाणी असंख्या विधवा रस्त्यातून, नदीकाठी, देवळात मुक्तपणे हिंडत फिरत असतात. त्या

गर्भपात करुन घेण्याकरता किंवा लालशंकर, उमियाशंकर यांनी स्थापन केलेल्या आश्रमात जाऊन बाळंतपणे करुन, मुलाला तिथेच माघारी ठेऊन पुन्हा आपापल्या घरी जात."[१२२]

विधवाविषयक सुधारणा विचारास सामाजिक विरोध होता. सुधारकांना प्रतिकूल परिस्थितीमध्ये स्त्री सुधारणा कार्य करावे लागे. सुधारकांवर येणारी मर्यादा स्पष्ट करणारे वर्णन ज्ञानोदयच्या १ ऑगस्ट १८६५ च्या अंकात केले की, "विधवा विवाहाचे कुटूंब वाळीत पडते व त्यांची मुले औरस समजली जात नाहीत या भीतीने सुधारक ब्राम्हणसुध्दा आपली मते गुंडाळून अल्पवयस्क पोरीशी लग्न करतात. विधवा स्त्रिया मनात दु:ख भोगतात पण विवाहाला तयार होत नाहीत."[१२३] अशाप्रकारे विधवांची स्थिती अत्यंत दयनीय होती. विधवांच्या स्थितीत बदल करण्यासाठी सामाजिक मानसिकता अनुकूल नव्हती. त्यामुळे सुधारकांना समाजाचा विरोध होत होता.

### २.५.१ विधवांची संख्या :

एकोणिसाव्या शतकात बालविधवा व प्रौढ विधवांची संख्या मोठ्या प्रमाणावर होती. एकोणिसाव्या शतकातील विधवांची संख्या पुढील साधनांतून मिळू शकते.

१) २४ मार्च १८८७ च्या 'ज्ञानोदय' च्या अंकात पंडित नारायण केशव वैद्य यांच्या पुस्तकावरील अभिप्राय छापला होता. त्यांच्या पुस्तकाचे नाव 'पुनर्विवाह निबंधकास चष्मा अथवा हिंदुस्थानातील विधवांचे दर्शन' असे होते. या पुस्तकात विधवांची आकडेवारी पुढीलप्रमाणे दिली आहे. "या देशात एकंदर ९,६०,०९,२२७ पुरुष व ९,१९,२९,१२३ स्त्रिया आहेत. या स्त्रियांत २,०९,३८,६२९ विधवा आहेत. या विधवांपैकी १,६१,१९,१३५ हिंदू व मुसलमान, ख्रिस्ती, इस्त्राईल व इतर धर्मातील मिळून ४८,२१,४९४ विधवा आहेत. यापैकी २५ वर्षाच्या वर १,४७,१४,८३०, २५ ते १५ पर्यंत ११,६४,२२४ आणि १५ पासून ५ पर्यत २,३८,०८१ आहेत."[१२४]

वरील माहितीवरुन १८८७ साली एकूण स्त्री–पुरुष संख्येच्या तुलनेत विधवा स्त्रियांची संख्या ११.१४% होती. एकूण स्त्रियांच्या संख्येच्या तुलनेत विधवा स्त्रियांची संख्या २२.७७% होती. एकूण विधवा स्त्रियांच्या तुलनेत हिंदू विधवा स्त्रियांची संख्या ७६.९८% होती.

२) सन १८८८ मध्ये बेहरामजी मलबारी यांनी बालविवाह व असंमत वैधव्य या विषयावर टिपणे लिहीली. या टिपणामध्ये विधवांची आकडेवारी पुढीलप्रमाणे दिली आहे.

| अ.क्र. | वय | हिंदू विधूर | हिंदू विधवा |
|---|---|---|---|
| १ | १ ते ९ | २१,००० | ६३,००० |
| २ | १० ते १४ | ६५,००० | १,७४,००० |
| ३ | १५ ते १९ | १,०८,००० | ३,१२,००० |
| ४ | २० ते २४ | २,०६,००० | ६,१०,००० |
| ५ | २५ ते २९ | ३,३३,००० | ९,६१,००० |
| ६ | ३० ते ३९ | ७,८६,००० | २७,९७,००० |
| ७ | ४० ते ४४ | ८,७७,००० | ३६,०१,००० |
| ८ | ४५ ते ५९ | ८,६७,००० | ३४,०६,००० |
| ९ | ६० नंतर | ११,३३,००० | ४१,७७,००० |
| | एकूण | ४३,९६,००० | १,६१,०१,००० |

(संदर्भ : बेहरामजी मलबारींची टिपणे, स्त्री प्रश्नांची चर्चा १९ वे शतक, प्रतिभा रानडे पृ.क्र.१७२.)

वरील आकडेवारी तयार करताना बेहरामजी मलबारी लिहितात, “या क्षणी हिंदुस्थानमध्ये तीस वर्षाखालील २१ लाख स्त्रियांना विधवा रहावे लागते.”[१२५] पंडित नारायण केशव वैद्य यांनी हिंदू विधवांची संख्या १,६१,१९,१३५ अशी नमूद केलेली आहे. बेहरामजी मलबारी यांनी नमूद केलेली हिंदू विधवांची संख्या १,६१,०१,००० आहे. दोघांनी १८८७–८८ या कालावधीतील दिलेली हिंदु विधवांची संख्या जवळपास सारखी आहे. त्यामुळे ही सांख्यिकीय माहिती विश्वसनीय वाटते.

३) पं. रमाबाईंनी सन १८८१ च्या जनगणना अहवालानुसार भारतातील विधवांची संख्या पुढीलप्रमाणे दिली आहे. “Again according to the census of 1881, there were in India, 2,09,30,626 widows of all ages and castes. Among these were 6,69,100 widows under nineteen years of age nine and under nine years of age : 78,976, from 10 to 14 years of age : 2,07,388 from 15 to 19 years of age : 3,82,736”[१२६]

पं. रमाबाईंनी एकूण विधवांची संख्या २,०९,३०,६२६ दिली आहे. पंडित नारायण केशव वैद्य यांनी हीसंख्या २,०९,३८,६२९ दिली आहे. या दोनही संख्येत जवळपास साम्य आहे. त्यामुळे ही सांख्यिकीय माहिती विश्वसनीय वाटते.

आगरकरांनी २४ नोव्हेंबर १८८७ च्या सुधारक अंकात खानेसुमारीचा रिपोर्ट दिला होता. त्यात म्हटले आहे, “ब्राह्मण जाती संबंधाने पाहता मुलींचे लग्न सहापासून सात वर्षांपर्यंत होते. अशी सरासरी निघते. या स्थितीमुळे ब्राह्मण लोकांत इतर जातीपेक्षा विधवांचे प्रमाण

अधिक आहे. ब्राह्मणांच्या स्त्रियांपैकी तिसरा हिस्सा विधवा असतात. ब्राह्मणी स्त्रियांत जितक्या विधवा असतात, त्यापैकी एक तृतियांशाहून अधिक बालविधवा असतात."[१२७] वरील माहितीवरुन ब्राह्मण जातीमध्ये ब्राह्मण लोकसंख्येच्या तुलनेत विधवांची संख्या जास्त होती. ब्राह्मण जातीत पुनर्विवाह करण्यास बंदी होती. त्यामुळे विधवांची संख्या जास्त होती.

### २.५.२ विधवा पुनर्विवाह चळवळीचे प्रयत्न :

एकोणिसाव्या शतकामध्ये विधवा पुनर्विवाहाला धर्मशास्त्राचा आधार आहे. असे मानणारा एक सुधारकी गट तयार झाला. त्याला विरोध करणारा सनातन्यांचा गट होता. लोकहितवादींनी पुनर्विवाहचा पुरस्कार शतपत्रांतून केला. ते म्हणतात, "सांप्रत आपले लोकांमध्ये केवढा अनर्थ आहे की, स्त्रियांस पति वारल्यावर पुनरपि लग्ने करु देत नाहीत. ईश्वराने स्त्री व पुरुष सारखे उत्पन्न केले व उभयतांचे अधिकार समान आहे. असे असता पुरुषास पुन्हा विवाहाची आज्ञा आणि स्त्रियांस मात्र मनाई हा केवढा जुलूम आहे."[१२८] त्यांनी स्त्री–पुरुष समानतेचा पुरस्कार केला. विधवांच्या पुनर्विवाहासाठी समाज उद्‌बोधन केले. पुनर्विवाह या पत्रात ते लिहितात की, "पुनर्विवाहास शास्त्राधार नाही असे कोणी म्हणतात व कोणाचे मते अनुकूलता आहे. शास्त्र असो अथवा नसो, परंतु हित जाणून शास्त्र एकीकडे ठेऊन ही रुढी घालवी. कितीएक रुढीने शास्त्र रद्द होते व काळमानेंकरुन शास्त्र बंद करावे लागते."[१२९] लोकहितवादींनी विधवा पुनर्विवाहाची चाल समाजासाठी उपयुक्त आहे असे मत मांडले. बदलत्या काळाप्रमाणे रुढी शास्त्राचा फेरविचार करण्याचे आवाहन केले.

२९ डिसेंबर १८८९ रोजीच्या काँग्रेस अधिवेशनामध्ये पं. रमाबाई उपस्थित होत्या. यावेळी सामाजिक परिषदेमध्ये त्यांनी बालविवाह व केशवपन या रुढींचा निषेध केला. विधवा पुनर्विवाह सामाजिक स्वास्थ्यासाठी गरजेचे असल्याचे मत मांडले. पं. रमाबाई विधवा होत्या. त्यांनी तत्कालीन रुढीबध्द जीवन झुगारले. तत्कालीन विधवांसाठी रुढीबध्द असलेली व्यवस्था पं. रमाबाईंनी मोडून काढण्याचा प्रयत्न केला.

ज्ञानोदय ने विधवा पुनर्विवाहाच्या घटनांना ठळक प्रसिध्दी दिली. "१ एप्रिल १८६४ च्या ज्ञानोदय च्या अंकात एका हिंदु विधवेचा पुनर्विवाह झाल्याची बातमी प्रसिध्द झाली होती. १ ऑक्टोबर १८६४ च्या अंकात मिदनापूर जवळच्या रखैया गावी तारासुंदरी या विधवेची श्रीधर चक्रवत्री या सुधारक तरुणाशी पुनर्विवाह झाल्याची बातमी प्रसिध्द झाली होती."[१३०]

पुनर्विवाहाने विधवांचे जीवन सुसह्य होणार होते. हा विचार समाजमनावर ठसविण्याचा प्रयत्न सुधारक करत होते. “विष्णु शास्त्री पंडित यांनी लोकमत अनुकूल होण्यासाठी पुनर्विवाह शास्त्र संमत आहे. यास्तव सर्व प्रयत्न केले. प्रथमत: पुस्तक रुपाने व वर्तमानपत्राद्वारा लोकांची समजूत घालण्याचे प्रयत्न केले व नंतर याविषयी कोणास शंका असेल तर त्यांनी वादास उभे राहावे अशा अर्थाचे जाहिरनामे शहरोशहरी स्वत:च्या सहीनिशी लावले.”[१३१]

आगरकरांनी सुधारक पत्रातून विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. “पहिली पत्नी मरण पावली तर पुरुषाला लग्न करता येते, तर स्त्रीलाही पति निधनानंतर तिची इच्छा असल्यास पुनर्विवाहाची परवानगी असावी.”[१३२] असे विचार आगरकरांनी मांडले. पुनर्विवाह करणे त्या व्यक्तीच्या इच्छेचा प्रश्न आहे असे आगरकर म्हणतात.

विष्णु शास्त्री पंडित यांनी ईश्वरचंद विद्यासागर यांच्या विधवाविवाह या ग्रंथाचा मराठी अनुवाद केला. “लोकांच्या मनात विधवा विवाहाबद्दल अनुकूलता निर्माण होण्यास सुसंघटीत प्रयत्न व्हावेत म्हणून विष्णुशास्त्री पंडित यांनी २८ जानेवारी १८६६ रोजी पुनर्विवाहोत्तेजक मंडळाची स्थापना केली.”[१३३] “विधवांच्या तत्कालीन परिस्थितीचे वर्णन करणारी व विधवा विवाहाचा विचार, चर्चा करणारी सहा नाटके एकोणिसाव्या शतकात लिहीली गेली. अशी नोंद प्रा. सौ. कल्पना परांजपे यांनी मराठी सामाजिक नाटक व स्त्री समस्या या पुस्तकात केली आहे.”[१३४] महाराष्ट्रात झालेल्या विधवा पुनर्विवाहाच्या नोंदी तत्कालीन वृत्तपत्रांमधून आढळतात. “एकोणिसाव्या शतकात विधवा विवाहाच्या संदर्भात जेवढी चर्चा, वादविवाद झाले त्याप्रमाणात विधवा विवाह झालेले दिसत नाहीत. १८०० ते १९०० या शंभर वर्षांमध्ये नोंदवला गेलेला पहिला पुनर्विवाह १८४२ मध्ये झालेला दिसतो आणि १९०० सालापर्यंत महाराष्ट्रीय समाजामध्ये ३९ विधवा विवाह झालेले दिसतात तर महाराष्ट्रातील गुजराथी समाजामध्ये ३७ विधवा विवाह झालेले दिसतात.”[१३५]

२५ जूलै १८५६ रोजी हिंदु विधवांच्या पुनर्विवाहाचा कायदा झाला. या कायद्याच्या तरतूदींची माहिती यमुना पर्यटन च्या १८८२ सालच्या दुसऱ्या आवृत्तीत दिली आहे. “या कायद्याने पुनर्विवाहीत विधवेच्या मुलांना कायदेशीर संततीचा दर्जा मिळाला, वारसा हक्क ही मिळाला. पुनर्विवाहीतेच्या प्रथम नवऱ्याच्या मिळकतीवरील तिचा हक्क संपेल व तो हक्क इतर वारसदारांना मिळण्याची तरतूद केली. विधवेचा वारसा हक्क कायम ठेवण्यात आला.

पुनर्विवाहाच्या वेळी होणारे सर्व संस्कार, विधी, प्रथम विवाहाच्या वेळेप्रमाणेच केले जावेत. त्यामुळे पुनर्विवाह कायदेशीर ठरावा. ही महत्वाची कलमे या कायद्यामध्ये होती."[१३६]

### २.५.३ महाराष्ट्रातील विधवा पुनर्विवाह :

"इ.स. १८४२ मध्ये बेळगाव येथे दोन ब्राह्मण विधवांचा पुनर्विवाह झाला. परंतु त्याचा विशेष बभ्रा झाला नाही. प्रभाकर च्या वृत्तपत्रात ही बातमी २३ जानेवारी १८४२ च्या अंकात आली होती."[१३७] हा विवाह दोन ब्राह्मण विधवांचा झाला होता. ही बाब विशेष होती. हा विवाह बेळगाव या पुण्या–मुंबईपासून दूर ठिकाणी झाला होता. त्यामुळे या विवाहाची फारशी चर्चा झाली नाही.

"दुसरा विधवा विवाह सन १८६० मध्ये शेणवी जातीतील रघुनाथ जनार्दन मांजरेकर वय २२ यांनी नर्मदाबाई वय १६ हिच्याशी झाला होता. हा विवाहासाठी ज्योतिराव फुले यांचा पुढाकार होता."[१३८] "या विवाहास सहाय्य करणाऱ्यांवर बहिष्कार पडला होता. लग्न समारंभाचा स्वयंपाक करणाऱ्या आचाऱ्यास पळून दुसऱ्या गावी जावे लागले होते."[१३९] अशाप्रकारे विधवा पुनर्विवाह करणे धर्मबाह्य गोष्ट मानली होती. अशा विवाहांसाठी सुधारकांना समाजाचा रोष पत्करावा लागे.

"विष्णुशास्त्री पंडित यांच्या पुढाकाराने २३ नोव्हेंबर १८६५ रोजी नाना भिडे यांचा विधवेशी पुनर्विवाह करुन देण्यात आला."[१४०] या विवाहाविरुध्द सनातन्यांनी बहिष्कार घालण्याची धमकी दिली.

विधवांचे विवाह बहिष्काराच्या व विरोधाच्या भितीने गाजावाजा न करता उरकले जात. अशा विवाहांना लोकमान्यता मिळणे गरजेचे होते. म्हणून असे विवाह थाटामाटात साजरे करण्याचे विचार पुढे आला.

मोरोबा कान्होबा हे विधवा विवाह चळवळीचे कार्यकर्ते होते. "त्यांनी मुंबईतील स्वत:च्या बंगल्यात १६ वर्षाच्या विधवा वेणूबाईचा २५ वर्षाच्या करमकर नावाच्या गरीब शिक्षकाबरोबर विवाह लावून दिला. लग्नासाठी कुंकुमपत्रिका छापल्या होत्या. दूरवरुन या विवाहासाठी येणाऱ्यांना भाडेखर्च देण्यात आला. ४०० पाहुणे मंडळी उपस्थित होती. धार्मिक विधी काटेकोरपणे करण्यात आले बँड लावण्यात आला. पोलीस, घोडेस्वार व कॉन्स्टेबल

बंदोबस्तासाठी आलेले होते."[१४१] विधवा विवाहाला लोकमान्यता मिळावी म्हणून तो थाटामाटात साजरा केला होता.

मोरोबा कान्होबा यांनी स्वतःच्या विवाहासाठी वृत्तपत्रांत जाहिरात दिली होती. "स्वजातीय ३०-३५ वर्षांच्या विधवा वधूशी पुनर्विवाह करावयाचा आहे व वेळ पडल्यास आपल्या पश्चात आपल्या विधवेला दरमहा ५० रुपये मिळतील असे जाहिर केले. परंतु या जाहिरातीला प्रतिसाद मिळेना, तेव्हा त्यांनी प्रथम विवाहापासून एक मूल असलेल्या २१ वर्षांच्या विधवेशी पुनर्विवाह केला."[१४२] या घटनेचे सुधारकांनी स्वागत केले. मात्र मोरोबा कान्होबा यांना जातसभेमध्ये जातिबहिष्कृत केले. जिवे मारुन टाकण्याच्या धमक्या आल्या. पुढे "विवाह झाल्यावर दोन वर्षाच्या आतच १८ फेब्रुवारी १८७१ ला पहाटे स्वतःच्या वाड्याच्या विहीरीत मोरोबा व त्यांची पुनर्विवाहीत पत्नी यांची प्रेते एकमेकांना बांधलेल्या स्थितीत आढळली. त्यांचा खून झाला अशी सर्वसाधारण समजूत होती पण कोर्टाने मात्र ती आत्महत्या ठरविली आणि या दुर्दैवी घटनेवर पडता पडला."[१४३]

वरील घटनेवरुन विधवांच्या विवाहास प्रचंड विरोध होता हे लक्षात येते. सुधारणा कार्यासाठी मोरोबांना मृत्यू पत्करावा लागला. त्यांनी आत्महत्या केली असे मानले तर त्यांच्यावर मोठे मानसिक दडपण आणले होते असे दिसते. वरील घटनांमुळे सर्वसामान्यांचा सुधारणा चळवळींना पाठिंबा मिळत नव्हता.

गुजरातमध्ये कपोल बनिया हा कडव्या रुढी परंपरा पाळणारा समाज आहे. "या जातीच्या शेठ माधवदास रघुनाथदास यांनी मुंबई येथे कु. धनकुंवरशी पुनर्विवाह केला."[१४४] माधवदास नवविचारांचे पुरस्कर्ते होते. १८८८ मध्ये विधवा विवाहासाठी पुनर्विवाह मंदिर बांधून दिले. अनेक विधवा विवाह लावून दिले. २८ जूलै १८८९ च्या सुधारक च्या अंकात त्यांचा गौरव केला होता. सुधारक मध्ये लिहिले की, "माधवदासांचा जाहिर सत्कार केला जावा, कारण आजपर्यंत १६ पुनर्विवाह लावले व आपल्या जवळचे १०००० रु. खर्च केले! आमच्या इकडील बोलक्या १००० सुधारकांच्या अनेक व्याख्यानांनी जे झाले नसते ते एकट्या माधवदासाने केले."[१४५] यावरुन विधवा विवाह घडून येणे व घडवून आणणे किती धाडसी कार्य होते हे लक्षात येते. चालीरितीचे दडपण झुगारण्याची हिंमत सर्वसामान्य लोकांत नव्हती. त्यामुळे सुधारकांचे प्रयत्न फारसे यशस्वी होत नव्हते.

विष्णुशास्त्री पंडित पुनर्विवाह चळवळीचे खंदे पुरस्कर्ते होते. ते ४७ व्या वर्षी विधूर झाले. "त्यांनी दूरच्या नात्यातील कुसाबाई या २५ वर्षे वयाच्या विधवेशी २१ एप्रिल १८७४ रोजी मॅजिस्ट्रेटसमोर रजिस्टर पध्दतीने व १४ डिसेंबर १८७४ रोजी यथाशास्त्र पुनर्विवाह केला."[१४६] विष्णुशास्त्री पंडीत इंद्रीयसुखासाठी विवाह करीत आहेत अशी टिका झाली. विष्णुशास्त्री पंडित यांचे चरित्रकार श्री. स. पंडित हे "कर्तव्यनिष्ठेसाठी विष्णुशास्त्रींनी पुनर्विवाह केला."[१४७] असे लिहितात.

पं. रमाबाईंच्या शारदासदन ची पहिली बालविधवा विद्यार्थीनी गोदूबाई जोशी होती. तिचा पुनर्विवाह सुधारक धोंडो केशव कर्वे यांच्याशी सन १८९३ मध्ये झाला या विवाहाच्या संदर्भात धोंडो केशव कर्वे आपल्या आत्मचरित्रात लिहितात, "राहिलेले आयुष्य विधूरावस्थेत घालवून त्याला उपयुक्त दिशा लावणे आपणास साधेल की नाही या बद्दल मला शंका होती.... विवाह केला तर विधवेशीच करेल असे ठरवून टाकले. सामान्य माणसाप्रमाणे भ्याड मनाने जनरुढीला बळी न पडता, सद्‌विचारांचा जय झाला."[१४८]

पं. रमाबाईंनी स्वखर्चाने थाटामाटात हे लग्न लावून दिले. या विवाहाच्या निमंत्रण पत्रिकेवर आगरकरांची सही होती. "कर्वे मुलीशी चांगले वागतील, तिचे आयुष्य सुखाचे होईल याबद्दल खास तजवीज करतील याबद्दल आगरकर जामीन राहिले होते."[१४९]

या विधवा विवाहांवरुन असे दिसते की, पुनर्विवाहीतेशी तिचा नवरा चांगला वागेल याची खात्री देण्याची जबाबदारी सुधारक उचलत होते. वेणूताई, धनकुंवर या पुनर्विवाहीतांच्या नावे रक्कम ठेवली होती. कर्वेनीही आनंदीबाईंच्या नावे ३००० रु. ची विमा पॉलिसी केली होती. पुनर्विवाहानंतर विधवांना आर्थिक स्थैर्य देण्याचा प्रयत्न तत्कालीन सुधारकांनी व विधवा विवाह करणाऱ्यांनी केला होता.

डॉ. रा. गो. भांडारकर हे विधवा विवाहाचे पुरस्कर्ते होते. "त्यांची मुलगी शांताबाई १८७५ साली विधवा झाली. भांडारकर स्वत: विधवा विवाहाचे पक्षपाती असूनही त्यांची ही मुलगी अकरा वर्षे वैधव्यावस्थेतच राहिली म्हणून त्यांच्यावर वेळोवेळी टिका होत होती. अखेर त्यांनी शांताबाईचा पुनर्विवाह ११ मे १८९२ रोजी गोपाळ व्यंकटेश पाणंदीकर यांच्याशी केला."[१५०] डॉ. भांडारकर स्वत: सुधारणा चळवळीत सक्रीय होते. तरीही त्यांच्या विधवा

मुलीच्या पुनर्विवाहास विलंब झाला होता. विधवा विवाह प्रत्यक्ष कृतीत आणण्यात सुधारकांना वैयक्तिक पातळीवर मर्यादा येत होत्या.

न्या. रानडे हे विधवा विवाहाचे पुरस्कर्ते होते. "त्यांच्या पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर ते विधवेशी पुनर्विवाह करतील अशी सुधारक मंडळीची अपेक्षा होती. परंतु तसे न होता रानडे यांनी आपल्या वडिलांच्या आग्रहाला, दडपणाला बळी पडून वयाच्या ३२ व्या वर्षी ११ वर्षांच्या कुमारिकेशी विवाह केला."[१५१]

हरिभाऊ आपटे हे 'पण लक्षात घेतो कोण?' 'यमू', 'मी' या कादंबऱ्याचे लेखक होत. या कादंबरीतून त्यांनी स्त्री सुधारणा विचार प्रकट केले. करमणूक मासिकातून सुधारकी मते आग्रहाने मांडली, "हरिभाऊंची प्रथम पत्नी मरण पावल्यावर हरिभाऊ पुनर्विवाह करतील तशीच सर्वांची अपेक्षा होती. परंतु हरिभाऊंनी १८९२ मध्ये दुसरा विवाह केला तो रुढीनुसार बालकुमारीकेशीच."[१५२]

न्या. रानडे व हरिभाऊ आपटे यांच्या उदाहरणावरुन लक्षात येते की, बौद्धिक पातळीवर सुशिक्षितांस विधवा विवाह पटला होता. हा विचार स्वतःच्या आयुष्यात आणण्याचे मानसिक धैर्य त्यांच्यात नव्हते. ते सुधारकी मतांचा प्रचार करत होते. मात्र कौटुंबिक दडपण झुगारण्याचे साहस त्यांच्यात नव्हते.

"सन १८०० ते १९०० या शंभर वर्षात ३९ विधवा विवाहांची नोंद झालेली दिसते. त्यापैकी ३२ विधवा विवाह ब्राह्मण जातीत झालेले दिसतात. इतरांमध्ये शेणवी, पाठारे, प्रभु आहेत. या ३९ विधवा विवाह करणाऱ्यांपैकी शाळा मास्तर, तार ऑफिस, पोस्ट ऑफिसात काम करणारे, वकिली करणारे आहेत. आजच्या भाषेत ते मध्यमवर्गीयच होते."[१५३]

सन १९८८ मध्ये बेहरामजी मलबारी यांनी हिंदुस्थानात तीस वर्षाखालील २१ लाख स्त्रिया विधवा आहेत. अशी माहिती दिली आहे. १५ ते ३० हे विवाह योग्य वय धरले तरी या वयोगटातील विधवांची संख्या १८,८३,००० अशी दिली आहे. या तुलनेत १८०० ते १९०० या शंभर वर्षात ३९ विधवांचे पुनर्विवाह झाले. ही पुनर्विवाहीत विधवांची संख्या अत्यल्प होती. एकूण ३९ विधवांचे पुनर्विवाहापैकी ३२ पुनर्विवाह ब्राह्मण जातीत झाले ही बाब दखल घेण्याजोगी आहे. विधवा पुनर्विवाहाला शास्त्राधाराद्वारे विरोध करणारा ब्राह्मण समाज होता. त्याचवेळी रुढी परंपरांना आव्हान देऊन प्रबोधनाचे विचार स्विकारणारा ब्राह्मण समाज पुढे

होता असे लक्षात येते. विधवा पुनर्विवाह श्रीमंत लोकांमध्ये झाल्याचे दिसत नाही. मध्यमवर्गीय, सर्वसामान्य साधारण परिस्थितीतल्या लोकांनी विधवा विवाह प्रत्यक्ष व्यक्तिगत व्यवहारात आणला होता.

### २.५.४ विधवा पुनर्विवाहासाठी संस्थात्मक प्रयत्न :

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून समाजसुधारणा कार्य संस्थात्मक पातळीवर सुरु झाले. या संस्थांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. "दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी परमहंस सभा नावाची गुप्त संस्था १८४८ साली स्थापन करण्यात पुढाकार घेतला होता."[१५४] या संस्थेने धार्मिक व सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला. "१८६० पर्यंत म्हणजे सुमारे १५ वर्षे कार्य गुप्तपणे चालले."[१५५] अशाप्रकारे या सभेचे सभासद प्रतिष्ठित, राजमान्यता पावलेले होते. मात्र त्यांना समाजाची भिती, बहिष्काराची धास्ती वाटत होती.

१८६७ मध्ये प्रार्थना समाजाची स्थापना झाली. या संस्थेने महाराष्ट्रातील परिवर्तनामध्ये महत्वाचे योगदान दिले. "स्त्री शिक्षण, विधवा विवाह, संमती वयाचा वाद, पं. रमाबाईंना पाठिंबा या सर्वच बाबतीत प्रार्थना समाजाने आपली जबाबदारी पूर्णपणे उचललेली दिसते."[१५६] महर्षी धों. के. कर्वे व आनंदीबाई यांच्या पुनर्विवाहास प्रार्थना समाजाने पाठिंबा दिला होता.

विष्णुशास्त्री पंडित यांनी २८ जानेवारी १८६६ रोजी पुनर्विवाहोत्तेजक मंडळीची स्थापना केली. या संस्थेने स्त्रीविषयक प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले. पुनर्विवाहच्या प्रश्नाला गती देण्यासाठी व लोकमत जागृत करण्यासाठी विष्णुशास्त्री पंडितांचे कार्य पाहून लोकहितवादींनी त्यांना 'कलियुगातील ऋषि' असे संबोधले.

१८९३ मध्ये धोंडो केशव कर्वे यांनी विधवा विवाहोत्तेजक मंडळ ही संस्था स्थापन केली. पुढे "या संस्थेचे नाव विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळी असे ठेवले. (२० ऑगस्ट १८९५)"[१५७] विधवा विवाह समाजमान्य व्हावेत यासाठी प्रयत्न केले. विधवा विवाहातील सामाजिक प्रतिबंध दूर करण्याचा प्रयत्न केला.

### २.५.५ विधवांची मानसिकता :

विधवांचे जीवन सुसह्य करण्यासाठी त्यांचे पुनर्विवाह हा मार्ग होता. विधवा पुनर्विवाहाला समाज मान्यता मिळवून देण्याचा प्रयत्न अनेक सुधारक करीत होते. मात्र एकोणिसाव्या शतकामध्ये अत्यल्प विधवा विवाह झाले. पुनर्विवाह करण्याची विधवांची

मानसिकता नव्हती असे खालील मुद्द्यांवरुन दिसते. विधवा विवाहाला कायद्याची मान्यता मिळूनही विधवा पुनर्विवाहासाठी पुढे येत नसत. विधवा स्त्रियांच्या मानसिकतेची कारणे पुढीलप्रमाणे होती.

१) विधवा विवाहास समाजाचा होणारा विरोध

२) विधवा विवाह धर्मसंमत नसल्याची कल्पना

३) विधवा स्त्रियांच्या मनावर असलेले पारंपरिक संस्कार

४) स्त्रियांचे आर्थिक परावलंबित्व

५) विधवांना पतिव्रता म्हणून कायम विधवा राहण्यात वाटणारा गौरव

६) विधवांना मुले असतील तर पुन्हा वैवाहिक बंधनात पडण्याची इच्छा नसणे. विधवांच्या पहिल्या विवाहानंतर झालेल्या मुलांची काळजी.

७) पुनर्विवाहीत स्त्रियांच्या मुलांच्या भविष्याची चिंता.

या कारणांचा विचार करता असे लक्षात येते की, स्वसुखास तुच्छ मानण्याचा हिंदू स्त्रियांचा स्वभाव होता. समाजाचा रोष, त्यातून सहन करावे लागणारे हाल, पति–पत्नीचे जन्मजन्मांतरीचे पवित्र नाते या कल्पनांमुळे विधवा पुनर्विवाहासाठी पुढे येत नसत. प्रत्यक्ष स्त्रियांसाठी होऊ पहात असलेल्या सुधारणांसाठी स्त्रियांचा सहभाग फारसा नव्हता. पुढे २५ जुलै १८५६ रोजी विधवा पुनर्विवाहास मान्यता देणारा कायदा झाला. तरीही समाजातून फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

## २.६ स्त्री शिक्षण :

एकोणिसाव्या शतकात स्त्री शिक्षणाबद्दल समाजात उदासिनता होती. इंग्रजी अंमल सुरु झाल्यावर समाजात वैचारिक जागृती झाली. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे स्त्री शिक्षणाचा विचार होऊ लागला.

पं. रमाबाईंच्या समकाळात स्त्रियांच्या शिक्षणाचा फारसा प्रसार झाला नव्हता. “एका बाजूने स्त्री शिक्षणाला विरोध होत होता तर त्याच वेळी स्त्री शिक्षणाची बाजू उचलून धरली जात होती.”[१५८] अनेक सुधारकांना भारतीय समाजाचे मागासलेपण दूर करण्याचा मार्ग स्त्री

शिक्षणामध्ये दिसत होता. पं. रमाबाईंच्या समकाळातील स्त्री जीवनाचा आढावा घेताना स्त्री शिक्षणाच्या संदर्भात घडलेल्या घडामोडींचा अभ्यास पुढीलप्रमाणे केला आहे.

प्राचीन काळी मुलींना स्वतंत्र शैक्षणिक जीवन होते. "मुलींना विवाह होईपर्यंत ७/८ वर्षे शिक्षण घेता येत होते. मुलीही वेदाध्ययन करीत."[१५९] प्राचीन काळी विद्यार्थीनींचे दोन प्रकार होते. १) सद्योद्वाहा २) ब्रम्हवादिनी

"सद्योद्वाहा म्हणजे लवकर लग्न करुन संसारात पडणारी स्त्री. ब्रम्हवादिनी म्हणजे सभा संमेलनातून वादविवादात पडणारी स्त्री. ब्रम्हवादिनी स्त्रिया आजन्म ब्रम्हचर्य पाळून वेदविद्येचा व ब्रम्हविद्येचा अभ्यास करीत. वेद्वाङ्मयात विश्ववारा, घोषा, लोपमुद्रा, उर्वशी, अपाला, सूर्या, जुहू, वाक्, इन्द्राणी, श्रद्धा, शची, या ब्रम्हवादिनींची सुक्ते आढळतात."[१६०]

यावरुन वेदांमध्ये धर्मतत्वे प्रतिपादन करण्याचा अधिकार स्त्रियांना होता असे दिसते. स्त्री व पुरुषांचा बौद्धिक दर्जा समान मानला जात होता. वेदवाङ्मयाचे वैशिष्ट्ये असे की, "बायबलमधील एकही ओळ स्त्री ने लिहिलेली नाही. कुराणात स्त्रियांचा संबंध कोठेच येत नाही. पारशी धर्मग्रंथातही तीच स्थिती आहे. वेदवाङ्मयामध्ये मात्र पुरुषांबरोबर स्त्रियांनी लेखन केले आहे."[१६१] इतर धर्माच्या तुलनेत वैदिक धर्मात स्त्री शिक्षणाबाबत सुसह्य स्थिती होती असे दिसते.

स्मृतिकाळात आर्यांच्या जीवन पध्दतीत बदल झाला. त्यामुळे आर्यांच्या स्त्री शिक्षण विषयक दृष्टिकोनात बदल झाला. "स्मृतिकाळात नवव्या किंवा दहाव्या वर्षी मुलींची लग्ने होऊ लागल्यावर बऱ्याचशा मुली अशिक्षित राहू लागल्या. इ.स. चौथ्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत स्त्री शिक्षणाची अवहेलना होऊ लागली."[१६२]

स्त्री शिक्षणाच्या संदर्भात भारतीय मध्ययुगीन कालखंड प्रतिकूल होता. मुस्लिम समाजामध्ये, "विवाहीत तरुण स्त्रीने शुद्ध व निष्कलंक रहावे. घरातच राहून आपल्या पतीची चांगली सहचारिणी व्हावी अशी अपेक्षा असे."[१६३] त्यामुळे मुस्लिम समाजातील स्त्रिया शिक्षणापासून दूर होत्या. त्यामुळे मध्य काळात स्त्री शिक्षणाची आवश्यकता कमी झाली. "स्त्रियांच्या शिक्षणासाठी वेगळ्या शाळा स्थापन केलेल्या नव्हत्या. श्रीमंत व राजघराण्यातील मुलीच्या शिक्षणाची सोय घरीच केलेली असे."[१६४] सर्वसामान्य कुटूंबातील मुली शिक्षण घेत

नव्हत्या. मध्य काळातील इस्लामी आक्रमणांमुळे सामाजिक सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे बालविवाह पध्दत रुढ झाली. स्त्री शिक्षणाच्या विचारापासून समाज दूर गेला.

मराठा कालखंडात स्त्री शिक्षणाबद्दल व राज्यकर्त्यातही समाजात उदासिनता होती. धर्माचा समाज जीवनावर पगडा होता. “पेशवे व इतर ब्राह्मण सरदार यांच्या स्त्रिया बहुतेक साक्षर असत. त्यातील बऱ्याच जणींना पोथी वाचण्याचे, पत्रे लिहिण्याचे ज्ञान होते. राधाबाई, काशीबाई, आनंदीबाई, गंगाबाई, अनुबाई घोरपडे, भवानीबाई सचिव ह्या पेशवे काळातील स्त्रिया साक्षर होत्या.”[१६५] सर्वसामान्य घरातील मुली मात्र शिकत नव्हत्या.

एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्री शिक्षणासंदर्भात सामाजिक विचार मध्यकाळाप्रमाणेच अपरिपक्व होता. या शतकातील समाजावर रुढी परंपरांचा पगडा होता. एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्री शिक्षणासंदर्भात खालील गैरसमज होते.

१) स्त्री शिक्षणाचा संबंध स्त्रीच्या बुद्धिमत्तेशी न जोडता तिच्या नितीमत्तेशी जोडला होता. “स्त्रियांना विद्या शिकवू नये कारण व्याभिचार अधिक वाढेल.”[१६६] असा समज होता. स्त्रियांची लैंगिकता ताब्यात ठेवण्यासाठी त्यांना शिक्षणाचा अधिकार नाकारला होता.

२) स्त्रियांच्या वैधव्याचा संबंध स्त्री शिक्षणाशी जोडला होता. “मुलगी शिकली तर तिच्या (भावी) नवऱ्याचे आयुष्य कमी होते.”[१६७] स्त्रिया शिकल्या तर अल्पवयात विधवा होण्याची भिती होती. रमाबाई रानडे आपल्या आत्मचरित्रात लिहितात की, “माझी एक आत्या, ती व्यंकटेश स्तोत्र वगैरे वाचावयास शिकली होती. तिला पुढे दुर्दैवाने वैधव्य आल्यापासून आमच्या वडील चुलत्यांनी ठरविले की, आमच्या घरात बायकांनी लिहीणे, वाचणे, शिकणे धार्जिणेच नाही.”[१६८] त्या काळी बालविवाह, बालाजरठ विवाह, बहुपत्नीत्व, रोगराई, अपुऱ्या वैद्यकिय सुविधा यामुळे स्त्रिया विधवा होण्याचे प्रमाण जास्त होते. मात्र त्याचा संबंध स्त्री शिक्षणाशी जोडला गेला. विधवा होण्याच्या भितीने स्त्री शिक्षणाला विरोध होता.

३) स्त्री शिक्षणामुळे पुरुषांची कुटूंब व समाजव्यवस्थेतील पकड ढिली होईल असे वाटत होते. पुरुषांच्या मानसिकतेचे वर्णन करताना आगरकर लिहितात की, “सत्ता वापरण्याची अक्कल अंगी असो वा नसो, ज्यास ती प्राप्त झाली आहे त्यास ती सोडू नये असे वाटते. अनेक कारणांमुळे स्त्रियांवर पुरुषांचे वर्चस्व स्थापण्यात आले आहे. तेव्हा त्यास ते आपल्या

हातून जाऊ नये असे वाटणे अगदी स्वाभाविक आहे."[१६९] स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने शिकल्या तर बरोबरीचे हक्क मागतील ही भिती वाटत होती.

४) "शिक्षणामुळे घरातील मोठ्या माणसांचा अपमान होतो ही समजूत होती."[१७०] स्त्री शिक्षणामुळे घरातील मोठ्या माणसांच्या अधिकारपदाला धक्का पोहोचण्याची भिती वाटत होती. "स्त्रिया शिकल्या तर त्या तर्कटी, अमर्याद व जारिणी होतील अशी भिती त्यांना वाटे."[१७१] स्त्री शिक्षणास सनातनी मंडळीचा विरोध होता. सनातन्यांची मानसिकता स्पष्ट करताना लोकहितवादी तत्कालीन सामाजिक मानसिकतेविषयी लिहितात की, "स्त्रिया सुशिक्षित होतील तेव्हा आपला अधिकार स्थापतील आणि संसार सुखास हानी करणारे पंडितापासून तसा तहनामाच करुन घेतील."[१७२]

वरील समजुतीमुळे एकोणिसाव्या शतकात स्त्री शिक्षणास विरोध झाला. स्त्री शिक्षण दुर्लक्षित राहिले. शिक्षणाबाबत स्त्री व पुरुष वर्गामध्ये उदासिनता होती. या संदर्भात मुंबईचे वर्णन कर्ते माडगावकर लिहितात की, "मुलासच धड वाचता येत नसे, मग मुलीस वाचावयास व लिहावयास शिकविण्याच्या खटपटीत कोण पडतो आणि याशिवाय बायकांस वाचावयास व लिहावयास शिकवू नये असा हिंदु लोकांचा समज होता."[१७३]

हिंदु समाजात जातीनुसार उद्योगधंद्याचे शिक्षण पुरुष व स्त्रिया घेत होत्या. इंग्रजी अंमल सुरु झाल्यावर पोस्टखाते, तारखाते, रेल्वे या सामाजिक सेवा सुरु झाल्या. नवीन राज्य व्यवस्था सुरु झाली. या व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी इंग्रजांनी एत्देशीयांचे शिक्षण सुरु केले. त्यामुळे पुरुषांचे जाती पलिकडचे शिक्षण सुरु झाले. प्रचलित समजूतींमुळे स्त्री शिक्षण दुर्लक्षित राहिले.

### २.६.१ तत्कालीन शिक्षण पध्दती :

एकोणिसाव्या शतकामध्ये पारंपरिक शिक्षण पध्दती होती. तत्कालीन शिक्षण पध्दतीचे वर्णन करताना काशीबाई कानिटकर लिहितात, "त्यावेळी पुण्यात मराठी शाळा फारशा नव्हत्या. प्रत्येक पेठेत किंवा दोन पेठा मिळून खाजगी स्वरुपाची मराठी शाळा असे. स्टेट पाट्या किंवा दगडी पेन्सिल ऐकिवातही नव्हत्या. पाटीवर लिहीण्याची पध्दत म्हणजे विटकरीचे दोन तुकडे घेऊन ते एकमेकांवर घासून त्याची भूकटी पाटीवर पडायची व ती भूकटी सारखी पसरल्यावर त्यावर कामटीने अक्षरे काढायची. कागदावर लिहीणे झाल्यास खुरमांडी (एका पायावर दुसरी)

घालून त्यावर जाड पुष्टीपत्र ठेऊन बोरुच्या लेखणीने लिहीत असत."[१७४] यावरुन शिक्षण पध्दती, पारंपरिक होती असे दिसते. अर्थात हे प्रयत्न अपुरेच होते.

### २.६.२ स्त्री शिक्षणासाठी मिशनऱ्यांचे प्रयत्न :

भारतीय मुलींच्या शिक्षणासाठी पहिले प्रयत्न मिशनऱ्यांनी केले. "सन १८१४ मध्ये अमेरिकेकडून पाद्री (मिशनरी) आले. त्यांनी मुलींस शिकविण्याच्या शाळा जागोजागी काढल्या व या प्रित्यर्थ हजारो रुपये खर्च केले."[१७५]

मुंबई शिक्षण विभागाच्या नोंदीप्रमाणे "१८२४ साली मुंबई शहरात अमेरिकन मिशन सोसायटीने पहिली मुलींची शाळा सुरु केली. सन १८२९ पर्यंत नऊ शाळा मुलींसाठी सुरु झाल्या होत्या आणि त्यामध्ये ४०० मुली शिकत होत्या. चर्च मिशनरी सोसायटीने १८२६ मध्ये मुलींसाठी शाळा सुरु केली आणि दहा वर्षांच्या अवधीत नाशिक, ठाणे जिल्ह्यातही शाळा स्थापन केल्या. सन १८३१ मध्ये अहमदनगरमध्ये अमेरिकन मिशनने मुलींसाठी शाळा व वसतिगृह सुरु केले. १८३९ च्या स्कॉटिश अहवालानुसार स्कॉटिश मिशनच्या मुंबईतील सर्व शाळांमधून ५४७ मुली मराठी माध्यमातून शिकत होत्या. सन १८२६–२७ साली मिशनऱ्यांच्या सर्व शाळांमध्ये मिळून ३०० मुली जात होत्या. त्यांची संख्या १८४९–१८५० साली २००० झाली."[१७६]

वरील नोंदीवरुन लक्षात येते की, एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांमध्ये मुलींच्या शिक्षणासाठी एत्द्देशीयांकडून प्रयत्न झालेले दिसत नाहीत. मिशनऱ्यांनी सुरु केलेल्या शाळांची संख्या अत्यल्प होती. शाळेत जाणाऱ्या मुलींच्या संख्येत वाढ होताना दिसते मात्र हे प्रमाण अतिशय कमी होते.

स्त्री शिक्षणामागे मिशनऱ्यांचा हेतू ख्रिस्ती धर्मप्रसाराचा होता. "महाराष्ट्रात अमेरिकन मिशन, स्कॉटिश मिशन, लंडन मिशनरी अशा संस्था ख्रिस्ती धर्मप्रसाराचे कार्य करीत होत्या. धर्म प्रसाराच्या कार्यासाठी बॉम्बे मिशनरी युनियन, मुंबई बायबल सोसायटी, बॉम्बे ट्रस्ट बॅन्ड बुक सोसायटी, मुंबई टेंपरल सोसायटी इ. संस्था स्थापन झाल्या."[१७७]

धर्मप्रसारासाठी मिशनरी मराठी भाषा शिकले. बायबलचा मराठीत अनुवाद केला. भाषांतरीत प्रती मोफत वाटल्या. स्थानिक लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अतिशय कमी असल्याने त्याचा उपयोग झाला नाही. "मिशनऱ्यांच्या धर्म प्रसाराचे कार्य सोपे व सुलभ व्हावे म्हणून

त्यांनी शक्य तथे मुलामुलींच्या शाळा काढल्या. त्यांच्या कार्याने स्त्री शिक्षणाचा पाया घातला गेला."[१७८]

## २.६.३ स्त्री शिक्षणासाठी भारतीयांचे प्रयत्न :

"१३ जून १८४८ मध्ये स्थापन झालेली स्टुडंटस् लिटररी अॅण्ड सायंटिफिक सोसायटी ही मुलींसाठी शाळा सुरु करणारी पहिली एत्देशीय संस्था होती. डॉ. भाऊ दाजी लाड, रावसाहेब मंडलिक, दादाभाई नवरोजी इत्यादी मंडळी या संस्थेशी संबंधित होती."[१७९] स्त्रीशिक्षणाची चळवळ मिशनऱ्यांवर विसंबून न राहता स्वत: स्वतंत्रपणे चालविली पाहिजे हा विचार प्रथमत: पुढे आला.

महात्मा ज्योतिराव फुले १८४८ मध्ये मुलींसाठी शाळा पुणे येथे सुरु केली. हा एत्देशीयांनी मुलींसाठी शाळा सुरु करण्याचा दुसरा प्रयत्न होता. युरोपिअन लोकांच्या सहभागाशिवाय म. फुलेंनी ही शाळा सुरु केली होती. एका भारतीय व्यक्तीने भारतीय मुलींसाठी काढलेली ही पहिला शाळा होती. या शाळेत सुरुवातीच्या काळात युरोपिअन, उच्चवर्णीय व श्रीमंत घरातील मुलींचे शिक्षण सुरु झाले. पुढे मध्यम, कनिष्ठ वर्गीय व अस्पृश्य मुलींच्या शिक्षणासाठी पहिली शाळा ज्योतीराव फुले यांनी सुरु केली. "ज्योतीराव फुले यांनी बुधवार पेठेतील अण्णा चिपळूणकरांच्या वाड्यात ३ जुलै १८५१ रोजी शाळा सुरु केली. फुल्यांनी दुसरी शाळा १७ नोव्हेंबर १८५१ मध्ये रास्ता पेठेत काढली व तिसरी शाळा १५ मार्च १८५२ रोजी वेताळ पेठेत काढली. सन १८४८ ते १८५२ पर्यंतच्या काळात फुले दांम्पत्याने एकूण १८ शाळा काढल्या. या शाळांमध्ये स्वत: ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले तसेच त्यांचे सहकारी विष्णुपंत थत्ते, वामनराव खराडकर, सगुणाबाई क्षिरसागर, फातिमा शेख यांनी अध्यापनाचे कार्य निरपेक्ष वृत्तीने केले."[१८०] स्त्रीशिक्षणाच्या कार्याला फुलेंमुळे मोठी प्रेरणा मिळाली. फुलेंच्या या कार्याने स्त्री शिक्षणाचे मोठे पर्व भारतात सुरु झाले.

## २.६.४ स्त्री शिक्षणासाठी सरकारचे प्रयत्न :

एकोणिसाव्या शतकामध्ये स्त्री शिक्षणाला सामाजिक विरोध होता. स्त्री शिक्षणाद्वारे धर्मांतर होण्याची भिती समाजामध्ये होती. त्यामुळे कंपनी सरकारच्या सुरुवातीच्या काळामध्ये स्त्री शिक्षणासाठी फारसे प्रयत्न झाले नाहीत.

"१८५४ साली तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी याने सर्वप्रथम स्त्री शिक्षणासाठी सरकारने साहाय्य करावे असे मत कौंसिल ऑफ एज्युकेशनला कळविले. त्यानुसार १८५४ पासून स्त्री शिक्षणाची जबाबदारी सरकारने उचलावी असे ठरले. १८५४ साली महाराष्ट्रामध्ये मुलांच्या २८७५ शाळा होत्या आणि त्यामधून १०६०४० विद्यार्थी शिक्षण घेत होते. तर मुलींच्या ६५ शाळा होत्या आणि त्यातून ३५०० मुली शिकत होत्या."[१८१] अशी नोंद मुंबई शिक्षण विभागाच्या अहवालात आहे. १८५४ मध्ये मुलांच्या शाळांच्या संख्येच्या तुलनेत मुलींची संख्या अत्यंत कमी होती. शाळेत जाणाऱ्या मुलींचे प्रमाण अत्यल्प होते. साधारणत: युरोपिअन, उच्चवर्णीय व श्रीमंत घरातील मुली शाळेत जात होत्या.

लॉर्ड डलहौसीने स्त्रीशिक्षणासाठी मदत केली होती. या संदर्भात ज्ञानोदयकार लिहितात की, "नामदार वैथुनच्या मृत्यूनंतर लॉर्ड डलहौसी यांनी कलकत्त्याची मुलींची शाळा चालविली. दरमहा ७०० रु. ते खर्च शाळेसाठी करतात."[१८२] लॉर्ड डलहौसी स्त्री शिक्षणासाठी वैयक्तिक मदत करत होता ही बाब उल्लेखनीय होती. इंग्रज सरकारने स्त्री शिक्षणासाठी स्थानिक करातून मिळालेली रक्कम दिली होती. या रकमेमध्ये सतत वाढ केलेली दिसून येते. "सन १८६४–६५ साली सरकारचा स्त्री शिक्षणावरचा खर्च ३४१ रु. होता. तो १८७०–७१ साली एकदम ३९३३७ रु. इतका वाढला."[१८३]

मिस मेरी कार्पेटर ह्या ब्रिटीश समाजसेविका होत्या. ब्रिटनमध्ये त्यांनी बालगुन्हेगारी या संबंधात काम केले होते. त्यांच्या सूचनेनुसार "मुंबई सरकारने १८७० मध्ये पुण्याला आणि १८७१ मध्ये अहमदनगरला स्त्रियांसाठी ट्रेनिंग कॉलेज सुरु केली."[१८४] याच अहमदनगर येथील ट्रेनिंग कॉलेजमध्ये सावित्रीबाई फुले यांनी प्रशिक्षण घेतले होते. १८८४ साली सर विल्यम वेडरर्बन पुण्याचे कमिशनर होते. "त्यांना स्वत:च्या बंधूच्या स्मृती प्रित्यर्थ एक हजार रुपये स्त्री शिक्षणासाठी खर्च करायचे होते. त्यांच्या पुढाकाराने सप्टेंबर १८८४ साली फिमेल हायस्कूल पुण्याला स्थापन झाले. आज ती शाळा हुजूरपागा म्हणून ओळखली जाते."[१८५] यावरुन स्त्री शिक्षणासाठी सुरुवातीला माफक प्रमाणावर प्रयत्न झालेले दिसून येते.

### २.६.५ स्त्रियांचे उच्च शिक्षण :

१८७० नंतर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतून जाणाऱ्या मुलींची संख्या वाढली. सुशिक्षितांकडून मुलींच्या उच्च शिक्षणाची मागणी येऊ लागली. वुमेन्स इंडिया

असोसिएशन, द बॉम्बे प्रसिडेन्सी, वुमेन ग्रॅज्युएटस् युनियन, द बॉम्बे प्रेसिडेन्सी, बुमेन कौंन्सिल, द नॅशनल कौंन्सिल ऑफ वुमेन इंडिया या संस्थांनी स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी प्रयत्न केले.

स्त्रियांच्या उच्च शिक्षणाची परवानगी मिळण्याचे श्रेय एस. खरशेटजी यांना जाते. ते बेळगावचे पोस्ट मास्तर होते. "त्यांनी बॉम्बे युनिव्हर्सिटीला पत्र पाठवून आपल्या मुलीला मॅट्रीकच्या परीक्षेला बसण्याची परवानगी मागितली होती. आठ वर्षांनंतर म्हणजे १८८३ साली युनिव्हर्सिटी ॲक्ट बदलून स्त्रियांना युनिव्हर्सिटीच्या परीक्षा देण्याची परवानगी देण्यात आली."[१८६] "सन १८८७ मध्ये कॉर्नेलिया सोराबजी ही महाराष्ट्रातील पहिली स्त्री पदवीधर झाली."[१८७] तिने पुण्याच्या डेक्कन कॉलेजात प्रवेश घेतला होता. तिच्यासोबत तिनशे मुले उच्च शिक्षण घेत होती. तिनशे मुलांत ती एकटीच मुलगी होती. यावरुन तिने किती प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षण घेतले याची कल्पना येते. पदवीनंतर त्या इंग्लंडला जावून वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. "जो पर्यंत इंग्लंडलमध्ये स्त्री वकील नाहीत तोपर्यंत भारताने तशी प्रथा सुरु केली तर तो इंग्लंडचा अपमान होईल म्हणून तिला सनद दिली नाही."[१८८] ज्यावेळी इंग्लंडसारख्या पुरोगामी देशामध्ये एकही स्त्री वकिली करत नव्हती, त्यावेळी एका भारतीय स्त्रीने वकिलीची परीक्षा उत्तीर्ण केली होती ही बाब विशेष होती.

"मेरबाई अर्देसर ही विल्सन कॉलेजमधील विद्यार्थीनी मुंबईतील पहिली पदवीधर विद्यार्थीनी होती. (१८८९) १८८९ ते १९१२ या काळात ४१ पारशी, १३ ख्रिश्चन, अँग्लो इंडियन आणि युरोपियन्स, ८ हिंदु व ३ ज्यु विद्यार्थीनी पदवीधर झाल्या."[१८९] या वरुन असे लक्षात येते की, उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांमध्ये पारशी स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक होते. मुस्लिम स्त्रिया उच्च शिक्षणापासून दूर होत्या. "१९०० मध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलेली पहिली पीरोजा बानाजी फरदुनजी होती. १९१९ मध्ये पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून पदवीधर झालेली पहिली मुस्लिम विद्यार्थीनी अहमदन्निसा बेगम सिद्दीकी होती. १९३९–४० मध्ये विल्सन महाविद्यालयामध्ये आलू दस्तूर यांची इतिहासासाठी आणि एम. नानावटी यांची इंग्लिशसाठी प्राध्यापक म्हणून नेमणूक करण्यात आली होती. दस्तुर आणि नानावटी ह्या पहिल्या भारतीय व्याख्यात्या (Lecturer) होत्या."[१९०] ३ जून १९१६ रोजी धोंडो केशव कर्वे यांनी महिला विद्यापीठाची स्थापना केली. या विद्यापीठाचे नामकरण श्रीमती नाथीबाई दामोदर

ठाकरसी इंडियन विमेन्स युनिव्हर्सिटी असे झाले. या विद्यापीठाने मुलींना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. स्त्रियांच्या उच्च शिक्षणासाठी या विद्यापीठाने महत्वाचे कार्य केले.

### २.६.६ मुलींच्या शिक्षणासाठी प्रलोभने :

मुलींच्या पालकांची आर्थिक स्थिती हालाखीची होती. त्यामुळे ते मुलींना शाळेत पाठवत नसत. मुलींना शाळेत पाठवावे म्हणून पालकांना प्रलोभने दिली जात होती. शाळेसाठी मुलींना जमविण्यासाठी मिशनऱ्यांनी बराच पैसा खर्च केला. या संदर्भात मुंबईचे वर्णनकर्ते माडगावकर लिहितात की, "श्रीमंत लोक तर आपल्या मुलीस बिलकुल शाळेत पाठवित नसत, परंतु गरीब लोकांच्या मुलीस घागरे, चोळ्या, साड्या, पैसे अशी इनामे देऊन मुली जमवीत."[१९१] "स्कॉटीश मिशनही पुण्यामध्ये स्थापन केलेल्या शाळेत मुलींना दरमहा ३ रु. देत होते. त्यांच्या अन्न व वस्त्र इत्यादीची सोय केली होती."[१९२] असे पुणे शहराचे वर्णन पुस्तकात ना. वि. जोशी लिहितात. ज्योतिराव फुले यांनी मुलींनी शाळेत यावे म्हणून प्रलोभने दाखविली. २४ सप्टेंबर १८७६ च्या सत्यशोधक समाजाच्या वार्षिक सभेच्या इतिवृत्तात नमूद केले आहे की, "विद्येचा लाभ सर्व लोकांस सारखा व्हावा म्हणून आपल्यापैकी गरीगुरीब मुलींचे आईबापास फी देण्याचे सामर्थ्य नसल्याने मुलीस शाळेत पाठवित नाही. याजकरीता त्या कामी दरमहा पाच रुपये खर्च करावे, असा समाजाने ठराव केला आहे."[१९३] मुलींनी शाळेत यावे यासाठी म. फुले कपडे, खाऊ, पुस्तके, स्कॉलरशिप, रोख बक्षिसे देत होते असे सत्यशोधक समाजाच्या १८७६ च्या वार्षिक जमाखर्चात नोंदविले आहे. अशाप्रकारे मुलींनी शाळेत यावे यासाठी प्रलोभने दाखविली जात होती. मुलींच्या शिक्षणातील अडथळे दूर करण्याचे प्रयत्न केले जात होते.

### २.६.७ स्त्री शिक्षणासाठी आर्थिक मदत :

एकोणिसाव्या शतकात स्त्री शिक्षणासाठी मिशनरी, ख्रिश्चन अधिकारी व पारशी समाजाने आर्थिक मदत केल्याचे दिसते. या संदर्भात १५ मार्च १८५१ च्या ज्ञानोदय च्या अंकात छापले होते की, "ज्ञान प्रसारक मंडळीच्या कन्या शाळेस ९३९५ रु. ची देणगी मिळाली होती. मात्र हे सर्व ख्रिश्चन साहेबांचे पारश्यांचे अनुदान होते."[१९४] २ मे १८५३ च्या ज्ञानोदय अंकातही पारशी समाजाच्या कार्याविषयी बातमी छापली होती. "ज्ञान प्रसारक कन्या शाळेत पाचशे मुली परीक्षेस उपस्थित होत्या. या कामात पारशी लोक फार मेहनत घेत आहेत."[१९५]

पारशी समाज अल्पसंख्यांक होता. व्यापार क्षेत्रात या समाजाने प्रगती केली होती. त्यामुळे सामाजिक कार्यात मोठ्या प्रमाणावर पारशी समाज खर्च करीत होता. सुरुवातीच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याला हिंदु समाजाकडून प्रतिसाद मिळत नव्हता. "हिंदु लोक अशा उपयुक्त कामासाठी पैसे देत नाहीत ही लाजीरवाणी गोष्ट आहे."[१९६] अशी खंत १ मार्च १८५४ च्या ज्ञानोदयच्या अंकात व्यक्त केली होती. १५ मार्च १८५४ च्या ज्ञानोदयमधील बातमीत नमुद केले होते की, "रत्नागिरीत मुलींच्या शाळेची वार्षिक परीक्षा झाली. २४ मुली परीक्षेस होत्या. पण एत्‌देशीय लोक अगदी कमी हजर होते. कारण गाठचे काही द्रव्य द्यावे लागेल, अशी त्यास भीती वाटली."[१९७] वरील बातम्यांवरुन असा निष्कर्ष निघतो की, हिंदु समाजाने स्त्री शिक्षणाकडे नकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले. त्यामुळे हिंदु समाजातून या कार्यासाठी आर्थिक मदत मिळत नव्हती. हिंदु समाजाच्या तुलनेत पारशी व ख्रिश्चन समाजाने स्त्री शिक्षणास मोठा पाठिंबा दिला. सुरुवातीला मुलींच्या शाळेत पारशी व ख्रिश्चन मुलींचे प्रमाण जास्त होते. त्यामुळे या दोन्ही सधन समाजाकडून शिक्षणास आर्थिक मदत मिळत होती.

### २.६.८ स्त्री शिक्षणासंदर्भात सुधारकांची मते :

बालविवाह व अल्पवयातील मातृत्त्व यामुळे मुलींचे शाळेत जाण्याचे प्रमाण कमी होते. गृहकार्य हे मुलींचे विश्व मानले गेले. स्त्री शिक्षण हा धार्मिक आपत्तीसारखे मानले जात होते. श्रीमती काशिबाई कानिटकर तत्कालीन स्त्री वर्गाची नेमकी स्थिती मांडतात. त्या लिहितात की, "आमच्या सारख्या मोडक्या तोडक्या स्त्री वर्गाला लिहू का न लिहू वाटून लोकांची भीती वाटते यात नवल काय?"[१९८]

स्त्री शिक्षणाला समाजातून प्रोत्साहन मिळण्यासाठी सुधारकांनी समाज प्रबोधन केले. स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून दिले. स्त्री-पुरुष तुलना या पुस्तकात ताराबाई शिंदे लिहितात की, "स्त्रिया केवळ गोठणातील म्हशीप्रमाणे मूर्ख-त्यांना ना लिहीणे ना वाचणे म्हणून का ईश्वराने त्यांना काहीच बुध्दी दिली नसेल काय ?"[१९९] ताराबाई शिंदे यांनी अन्याय करणाऱ्यांना तिखट भाषेत जाब विचारला. शिक्षण घेण्यास स्त्रिया लायक आहेत असे त्यांनी ठामपणे मांडले.

स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारी मते लोकहितवादींनी मांडली. स्त्री शिक्षणाविषयीच्या तत्कालीन स्थितीविषयी ते लिहितात की, "स्त्री शिक्षणाविषयी समाजामध्ये जागृती निर्माण होण्यास किमान शंभर वर्षे तरी पाहिजेत."[२००] यावरुन स्त्री शिक्षणाविषयी समाजात किती

उदासिनता होती हे लक्षात येते. वर्तमान काळातील स्त्री शिक्षणाच्या स्थितीचा विचार करता लोकहितवादींचे विचार किती रास्त आहेत हे लक्षात येते. पुढील पिढीला चांगले वळण लावण्यासाठी स्त्री शिक्षणाची गरज आहे हे स्पष्ट करताना लोकहितवादी लिहितात की, “जोपर्यंत आम्ही आपल्या देशात बायकांस शहाण्या करणार नाही, तोपर्यंत आम्ही मूर्ख राहू. कारण की, बायकांचे हातात प्रथम मुलांस रीतभात लावणे आहे. तेथेच जर बिबा पडला तर पुढे सुधारत नाही. याजकरीता बायका शहाण्या पाहिजेत म्हणजे मुलही नीट होतील.”[२०१] मुलांवर चांगले संस्कार होण्यासाठी स्त्री शिक्षणाची गरज असल्याचे ते स्पष्ट करतात.

म. ज्योतिराव फुले हे कृतिशील सुधारक होते. ‘शूद्रातिशूद्रास उपदेश’ या अखंडामध्ये ते एक कडवे लिहितात की, “मानवपदाची जरा लाज धरा। विद्वान ती करा।। मुलीमुलें।।३९।।”[२०२] म. ज्योतिराव फुले यांनी स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी लोकोत्तर कार्य केले.

गोपाळ गणेश आगरकर यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. स्त्री शिक्षणाचे महत्व विशद करण्यासाठी त्यांनी ‘मुलांइतकेच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता’ हा लेख लिहिला. त्यात ते लिहितात की, “ज्या स्त्रीवर अपत्य संगोपनाचे येवढे जबाबदारीचे काम आपण सोपवितो तिला अक्षरशत्रू असू देणे हे अत्यंत अहितकारक आहे असे आम्हास वाटते.”[२०३] आगरकरांनी स्त्री शिक्षणास तर्कशुध्द समर्थन दिले. मराठेशाहीच्या ऱ्हासास स्त्री शिक्षणाचा अभाव हे कारण होते असे मत मांडले. “उच्च कुळातल्या मराठ्यांनी आपल्या स्त्रियांस आजपर्यंत गोषात कोंडून घातल्यामुळे जी अपकिर्ती संपादली आहे.”[२०४] असे लिहितात. स्त्री जीवनाशी निगडीत रुढी परंपरा शिक्षणामुळे नष्ट होतील. शिक्षणामुळे स्त्रियांचे जीवन सुसह्य होईल असा विश्वास व्यक्त करतात. या संदर्भात ते लिहितात की, “मुलींस थोडे बहुत लिहीणे वाचणे शिकवून, त्याबरोबर एखाद्या धंद्याचे ज्ञान करुन देण्यात येऊ लागेल, तर नवऱ्याच्या मृत्यूवार्तेबरोबर आपोआप मरणारी किंवा मारुन घेणारी स्त्री दिसेनाशी होईल.”[२०५] स्त्री–पुरुषांना एकच शिक्षण द्यावे व तेही एकत्र द्यावे हा विचार सर्वप्रथम आगरकरांनी मांडला. आगरकरांचा हा विचार क्रांतीकारी होता.

### २.६.९ **वैद्यकीय शिक्षणासंबंधी विचार** :

एकोणिसाव्या शतकात स्त्रियांना वैद्यकीय शिक्षण द्यावे हा विचार पुढे आला. शालिनतेमुळे स्त्रिया पुरुष डॉक्टरांना आजाराविषयी सांगत नसत. बाळंतपणे घरीच होत. “प्रसूतीशास्त्राचे शास्त्रशुध्द शिक्षण न घेता, अनुभव आणि अनुमान यांच्या भरवशावर सुईणीच

बाळंतपणे करीत."[२०६] वैद्यकीय अज्ञानामुळे बालमृत्यूचे प्रमाण जास्त होते. या विषयी माडगावकर गो. ना. वर्णन करतात की, "या देशात अशी चाल आहे की, गरोदर स्त्री प्रसूत होण्याचे वेळेस सुईणीस बोलावून तिच्या हातून बाळंतपण करवितात. परंतू त्या सुईणीस काही विद्या नाही. त्या अज्ञानी यामुळे कधी–कधी बाळंतीणीस ईजा पावतात. त्या जरी वाचल्या तरी कधी–कधी त्यांस शक्ती नाही असे होते व त्यांची प्रकृती काही दिवसांपर्यंत बिघडलेलीच राहते."[२०७] अशाप्रकारे स्त्रियांच्या आरोग्याचा फार मोठा प्रश्न होता असे दिसते.

पं. रमाबाईंनी स्त्रियांना वैद्यकीय शिक्षण देणे आवश्यक आहे अशी सर्वप्रथम मागणी केली होती. सप्टेंबर १८८२ मध्ये पं. रमाबाईंची हंटर कमिशनसमोर त्यांनी सूचविले की, "हिंदु मुली परक्या पुरुषांसमोर आपल्या अडचणी सांगू शकत नाहीत. त्यांच्या या वृत्तीमुळेच पुरुष डॉक्टरांना आपली प्रकृती दाखवून औषधे घेणे त्यांना अशक्य वाटते. त्यासाठी स्त्रियांना वैद्यकीय शिक्षणद्यावे व त्यासाठी मोठी योजना सरकारने आखावी."[२०८] स्त्रियांना वैद्यकीय शिक्षणाची गरज आहे असे पं. रमाबाई 'स्त्री धर्मनिती' पुस्तकात स्पष्ट करतात. "आपल्या शरीराचे, मुलाबाळांचे व इतर मंडळीचे आरोग्य काय–काय केल्यास राहिल, कशा रीतीने राहिले असता प्रकृती बिघडणार नाही इत्यादी समजण्यास थोडेसे वैद्यक आणि आजारी माणसे किंवा लहान मुलें यांचे जतन करण्याच्या सर्व तजविजी हे शिकले पाहिजे."[२०९] असा सल्ला स्त्रियांना देतात. पं. रमाबाईंच्या मागणीची दखल व्हिक्टोरीया राणीने घेतली. पं. रमाबाईंमुळे भारतीय स्त्रियांच्या वैद्यकीय शिक्षणास चालना मिळाली. मुंबईमध्ये १८३५ मध्ये ग्रँट मेडिकल कॉलेजची स्थापना झाली होती. "त्यानंतर ५४ वर्षांनी म्हणजे १८८९ साली पहिल्या हिंदु स्त्रीने प्रवेश घेतला. तिचे नाव मानक तर्खडकर होते."[२१०]

(मानक तर्खडकर – आत्माराम पांडूरंग तर्खडकर यांची मुलगी.)

१८८३ साली पं. रमाबाई वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेल्या. शारीरिक व्यंगामुळे त्या डॉक्टर बनू शकल्या नाहीत. डॉ. आनंदीबाई जोशी ह्या अमेरिकेतून वैद्यकीय शिक्षण घेऊन आल्या. भारतातील त्या पहिला महिला डॉक्टर होत्या. "१८८९ मध्ये रखमाबाई डॉक्टर बनण्यासाठी इंग्लंडला गेल्या. जुलै १८९४ ला डॉक्टरकीची तिसरी परीक्षा उत्तीर्ण झाल्या. २८ डिसेंबर १८९५ ला डॉक्टर बनून भारतात आल्या."[२११] वैद्यकीय शिक्षण भारतात सुरु करण्याचा प्रयत्न झाला. ख्रिश्चन व पारशी समाजाने मुलींना वैद्यकीय शिक्षण मिळावे

म्हणून आर्थिक मदत केली. "मेडिसीन ॲण्डसर्जरी क्षेत्रात महिलांनी प्रवेश घेऊन अभ्यास करायला उत्तेजन देण्यासाठी अमेरिकन उद्योगपती जॉर्ज किट्रेन यांनी सोराबजी शापूर्जी बेंगाली यांच्या मदतीने 'मेडिकल वुमेन ऑफ इंडिया' फंड उभारला. १८९२ मध्ये मेडिसीन ॲण्ड सर्जरी (एम. ॲण्ड एस.) ही पदवी घेतलेली पहिली महिला फ्रेनी कामा होती. हिंदु महिलांमध्ये १८९५ मध्ये मानक तर्खडकर, १९०५ मध्ये कृष्णाबाई केशवराव केवलकर यांनी एम् ॲण्ड एस् पदवी मिळविली. त्यानंतर काशिबाई नवरंगे (१९०७), सुंदराबाई किर्तने (१९१२) यांनी पदवी संपादन करुन पुण्यात स्वतःचे क्लिनिक सुरु केले."[२१२] दिल्ली येथे हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज फक्त महिलांसाठी सुरु झाले. स्त्रिया विविध क्षेत्रातील वैद्यकीय शिक्षण घेऊ लागल्या. "एम्.बी.बी.एस्. झालेल्या १९१४–१९२७ या काळात २९ हिंदु, २७ पारशी, २५ ख्रिश्चन, आणि १ ज्यू महिला होत्या. ही संख्या १९३९ पर्यंत ७०३ पर्यंत वाढली."[२१३] अशा प्रकारे पं. रमाबाईंनी आणि अनेक सुधारकांनी स्त्रियांच्या वैद्यकीय शिक्षणाबाबत मांडलेला विचार भारतीय समाजात फलद्रुप झाला.

पं. रमाबाईंच्या समकालीन स्त्री जीवनामध्ये स्त्री शिक्षण हा महत्वाचा मुद्दा होता. सामाजिक विरोध बाजूला सारुन स्त्री शिक्षणाला सुरुवात झाली होती. स्त्री शिक्षणाला ख्रिश्चन, पारशी समाजाने मदत केली. ज्योतिराव फुले यांनी मुलींसाठी शाळा काढल्या. स्त्री चे विविध क्षेत्रातील शिक्षण सुरु झाले. सुधारकांनी यासाठी प्रयत्न केले. वैद्यकीय शिक्षण, कायद्याचे शिक्षण, व्यवसायिक शिक्षण स्त्रिया घेऊ लागल्या. त्यातूनच सामाजिक सुधारणांना गती येत गेली. सामाजिक सुधारणेमध्ये पुरुषांबरोबर स्त्रियांचाही सहभाग सुरु झाला.

## प्रकरण दुसरे

## तळटीपा

१. वाळिंबे रा. श., महाराष्ट्राची सामाजिक पुर्नघटना, पुणे १९६२.

२. मोरे अरुणा, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या प्रबोधन कालखंडातील विष्णुबुवा ब्रह्मचारींचे योगदान, अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, पृ. ९.

३. गर्गे स. मा. (संपा.), भारतीय समाजविज्ञान कोश, लेखक–आठवले सदाशिव, पुणे, २००७, पृ. २४१.

३./अ मोरे अरुणा, पूर्वोक्त, पृ. ४७.

४. बेडेकर, भणगे, भारतीय प्रबोधन, पुणे १९७३, पृ. १०३.

५. तत्रैव, पृ. १०७.

६. गर्गे स. मा. (संपा.) पूर्वोक्त, पृ. २४५.

७. तत्रैव, पृ. २४५.

८. रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची वाटचाल, १९ वे शतक, मुंबई, १९९२, पृ. १

९. देशमुख शारदा, शिवकालीन व पेशवेकालीन स्त्री जीवन, पुणे १९६३, पृ. ६३.

१०. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. १

११. तत्रैव, पृ. १

१२. देशपांडे (देशमुख) शारदा, धर्म, संत व स्त्री, पुणे, १९९० पृ. ६.

१३. गायधनी, राहूरकर, प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पुणे, १९५५, पृ. ६७.

१४. सरदार गं. बा., महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी, पुणे, १९५१, पृ. १७३.

१५. देशपांडे (देशमुख) शारदा, पूर्वोक्त, पृ. ६.

१६. तत्रैव, पृ. ४४.

१७. जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृतीकोश खंड ६,२००६, पृ. १४०.

१८. मनुःस्मृती, स्त्रोत्र, २:३२, (देशपांडे (देशमुख) शारदा), पूर्वोक्त, पृ. ४७.

१९. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २९३.

२०. पद्मनजी बाबा, यमुना पर्यटन, पुणे, प्र. आ. १८५७, स. आ. १९९९, पृ. ८३.

२१. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २९३.

२२. गर्गे स. मा. (संपा.), पूर्वोक्त, पृ. ३६७.

२३. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २९५.

२४. तत्रैव, पृ. २९५.

२५. प्रियोळकर अं. का. (संपा.), लोकहितवादीकृत शतपत्रे, मुंबई, १९६७, पृ. ९७.

२६. सहस्त्रबुध्दे पु. ग., महाराष्ट्र संस्कृती, पुणे, २००३, पृ. ६७७.

२७. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २९५.

२८. काणे पां. बा., धर्मशास्त्राचा इतिहास, मुंबई, १९८०, पृ. २५.

२९. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृ. १८.

३०. देशपांडे (देशमुख) शारदा, पूर्वोक्त, पृ. २६.

३१. मालशे स. ग. विधवा विवाह चळवळ, मुंबई, १९७८, पृ. ३.

३२. देशपांडे (देशमुख) शारदा, पूर्वोक्त, पृ. १२०.

३३. भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पुणे, १९७६, पृ. २३२.

३४. जोशी पी. जी., प्राचीन भारताचा सांस्कृतीक इतिहास, नागपूर, २००३, पृ. ८२.

३५. भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ. २३३.

३६. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृ. १४४.

३७. वैद्य सरोजिनी (संपा.), काशिबाई कानिटकर आत्मचरित्र व चरित्र, मुंबई, १९८०, पृ.१.

३८. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. १७२.

३९. प्रियोळकर अं. का. (संपा.), लोकहितवादीकृत शतपत्रे, पूर्वोक्त, पृ. २२७.

४०. जोशी पी. जी., पूर्वोक्त, पृ. २१५.

४१. लांजेकर ज्योती, भारतीय समाज व स्त्री, पुणे, २००५, पृ. १७.

४२. Dongare-Medhavi Ramabai, The High Caste Hindu Women, 1887, Page. 29.

४३. गायकवाड रा. ज्ञा, भारताचा राजकीय व घटनात्मक इतिहास, सातारा, १९७२, पृ. २९.

४४. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. १८१.

४५. तत्रैव, पृ. १८२.

४६. तत्रैव, पृ. १८३.

४७. प्रियोळकर अं. का. (संपा.), लोकहितवादीकृत शतपत्रे, पूर्वोक्त, पृ. २५६.

४८. तत्रैव, पृ. ४५९.

४९. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. १९०.

५०. साळुंके पी. बी. (संपा.), महात्मा फुले गौरव ग्रंथ, मुंबई, १९८२, पृ. २०.

५१. आळतेकर मा. दा., गोपाळ गणेश आगरकर चरित्र, पुणे, १९९३, पृ. ४०६.

५२. मालशे स. ग. (संपा.), ताराबाई शिंदे स्त्री–पुरुष तुलना, मुंबई, १९७५, पृ. २०.

५३. भोसले नारायण, महाराष्ट्रातील स्त्रीविषयक सुधारणावादाचे सत्ताकारण, (१८४८–१९५६), पुणे, २००८, पृ. ५.

५४. पं. रमाबाई, स्त्री धर्मनिती, केडगाव, तृ. आ. १९६७, पृ. ५.

५५. जावडेकर शं. द., आधुनिक भारत, पुणे, १९७९, पृ. ६१.

५६. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), मराठी विश्वकोश, खंड ११, १९८२, पृ. ४७०.

५७. तत्रैव, पृ. १४०.

५८. देशपांडे (देशमुख) शारदा, पूर्वोक्त, पृ. ४९.

५९. तत्रैव, पृ. ५५, ५६.

६०. तत्रैव, पृ. ५६.

६१. देशपांडे शारदा, पूर्वोक्त, पृ. ५.

६२. भोसले नारायण, पूर्वोक्त, पृ. ६८.

६२/अ तत्रैव, पृ. ६८.

६३. देशपांडे (देशमुख) शारदा, पूर्वोक्त, पृ. ५६.

६४. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), पूर्वोक्त, पृ. ४७१.

६५. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृ. ४७१.

६६. गवळी पी. ए., पेशवेकालीन महाराष्ट्र, औरंगाबाद, २०००, पृ. ९५.

६७. वैद्य सरोजिनी (संपा.), काशिबाई कानिटकर आत्मचरित्र व चरित्र, मुंबई, १९८०, पृ. ४५.

६८. सहस्त्रबुध्दे पु. ग., पूर्वोक्त, पृ. ६५२.

६९. माडगावकर गो. ना., मुंबईचे वर्णन, मुंबई, १८८३, पृ. ३५२.

७०. अमेरिकन मराठी मिशन (संपा.), ज्ञानोदय २ जून १८८७, पृ. १५, १६.

७१. प्रियोळकर अं. का. (संपा.), दादोबा पांडुरंग आत्मचरित्र–चरित्र, मुंबई, १९४७, पृ. ४३.

७२. वैद्य सरोजिनी, गोपाळराव हरि, पुणे, १९७८, पृ. ४३.

७३. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ७८.

७४. तत्रैव, पृ. ७५.

७५. प्रियोळकर अं. का. (संपा.), दादोबा पांडूरंग आत्मचरित्र–चरित्र, पूर्वोक्त, पृ. ४३.

७६. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ११७.

७७. देशमुख शारदा, पूर्वोक्त, पृ. ८२.

७८. ज्ञनोदय लेखनसारसूची, खंड २ रा, भाग २ रा, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुबंई, २३:१४,१५ जुलै १८८४.

७९. नातू–देशपांडे (संपा.), आगरकर वाङ्मय, खंड १ मुंबई, १९८४, पृ. ३६९.

८०. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ८४.

८१. सभासद, सभासद बखर, पृ. ६९.

८२. पवार जयसिंगराव, शिवछत्रपति, डोंबिवली, २००५, पृ. १७.

८३. खोबरेकर वि. गो., मराठेकालीन सामाजिक व आर्थिक जीवन, मुंबई, पृ. ५६.

८४. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ७५.

८५. तीर्थळी शोभना, आधुनिक महाराष्ट्र, १९ वे शतक, पुणे, १९८०, पृ. ८८.

८६. तत्रैव, पृ. ९०.

८७. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ९०.

८८. वर्दे मोहिनी, डॉ. रखमाबाई एक आर्त, मुंबई, १९८१,पृ. ९१.

८९. तत्रैव, पृ. ७९.

९०. तत्रैव, पृ. ९१

९१. इन्दुप्रकाश, दि. १९ ऑक्टो. १८८५

९२. मराठा, दि. २७ मार्च १८८७.

९३. वर्दे मोहिनी, पूर्वोक्त, पृ. ५८.

९४. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ९१.

९५. भागवत विद्युत, स्त्री प्रश्नांची वाटचाल, पुणे, २००४, पृ. ३१.

९६. किर धनंजय, मालशे सं. ग., फडके य. दि. (संपा.), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, २००६, पृ. ३४७.

९७. भागवत विद्युत, पूर्वोक्त, पृ. ३३.

९८. नातू–देशपांडे (संपा.), पूर्वोक्त, पृ. ३४१.

९९. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ९२.

१००. फाटक न. र., न्या. रानडे चरित्र, पुणे, १९६६, पृ. २२७.

१०१. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. १५८.

१०२. प्रधान ग. प्र., आगरकर लेख संग्रह, दिल्ली, २००४, पृ. १९०.

१०३. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. १४४.

१०४. भोसले नारायण, पूर्वोक्त, पृ. ८३.

१०५. केळकर न. चि., लो. टिळक चरित्र, पुणे, १९२३, पृ. ३१५.

१०६. फाटक न. र., लोकमान्य, पुणे, १९९९, पृ. ७६.

१०६/अ केसरी, ६ नोव्हें. १८८३

१०६/ब दैनिक सकाळ, १९ जुलै, २००९, पृ. ६.

१०६/क दैनिक सकाळ, १८ जून २०१३, पृ. ५.

१०७. रेगे मे. पु. (संपा.), मराठी विश्वकोश, खंड १६, वाई, १९१९, पृ. ६०८.

१०८. जोशी महादेवशास्त्री (संपा.), भारतीय संस्कृती कोश, खंड ८ वा, २०००, पृ.

१०९. तत्रैव, पृ. ७०१.

११०. तत्रैव, पृ. ७०१.

१११. देशपांडे (देशमुख) शारदा, पूर्वोक्त, पृ. ११९.

११२. देशपांडे (देशमुख) शारदा, पूर्वोक्त, पृ. ६४.

११३. प्रियोळकर अं. का. (संपा.), लोकहितवादीकृत शतपत्रे, पूर्वोक्त, पृ. १७४.

११४. भोसले एस. एस. (संपा.), ताराबाई शिंदे, स्त्री पुरष तुलना, बुलढाणा, २००१, पृ.१०.

११५. जोशी महादेवशास्त्री (संपा.), पूर्वोक्त, पृ. ७०१.

११६. Medhavi-Dongare Ramabai, High Caste Hindu Women, Page. 165.

११७. प्रियोळकर अं. का. (संपा.), लोकहितवादीकृत शतपत्रे, पूर्वोक्त, पृ. २७.

११८. तत्रैव, पृ. ३१.

११९. मालशे स. ग. (संपा.), दोन पुर्नविवाहह प्रकरणे, १९ वे शतक स्त्री प्रश्नांची (रानडे प्रतिभा, मुंबई, १९९२), पृ. १९२.

१२०. प्रियोळकर अं. का. (संपा.), लोकहितवादीकृत शतपत्रे, पूर्वोक्त, पृ. ३२.

१२१. नातू–देशपांडे (संपा.), पूर्वोक्त, पृ. ३६९.

१२२. पद्मनजी बाबा, पूर्वोक्त, पृ. १७०.

१२३. ज्ञानोदय लेखनसारसूची, खंड २ रा, २९५७, २४:१५,१ ऑगस्ट१८६५ पृ. २३१.

१२४. पं. वैद्य ना. के., पुनर्विवाह निषेधकांस चष्मा अथवा हिंदुस्थानातील विधवांचे दर्शन व बालकांचे नाशन, (स्त्री प्रश्नांची चर्चा, १९ वे शतक, रानडे प्रतिभा), पृ. १७२.

१२५. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. १७२.

१२६. Medhavi-Dongare Ramabai, High Caste Hindu Women, Page. 175.

१२७. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. १७२.

१२८. प्रियोळकर अं. का. (संपा.), लोकहितवादीकृत शतपत्रे, पूर्वोक्त, पृ. २०.

१२९. तत्रैव, पृ. २५९.

१३०. ज्ञानोदय लेखनसारसूची, खंड २ रा, पूर्वोक्त, पृ. २०.

१३१. प्रथान ग. प्र., पूर्वोक्त, पृ. १६१.

१३२. डफ लता, आगरकरांची पत्रकारीता, नागपूर, २००५, पृ. ९४.

१३३. तीर्थळी शोभना, पूर्वोक्त, पृ. ९५.

१३४. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २४१.

१३५. मालशे स. ग., आपटे मंदा, पूर्वोक्त, पृ. १७०.

१३६. पद्मनजी बाबा, पूर्वोक्त, पृ. १७१.

१३७. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २५३.

१३८. ज्ञानोदय, २ एप्रिल १८६०

१३९. ज्ञानोदय, २ एप्रिल १८६०

१४०. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २५४.

१४१. तत्रैव, पृ. २५६.

१४२. तत्रैव, पृ. २५७.

१४३. मालशे–आपटे, पूर्वोक्त, पृ. ७०.

१४४. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २५९.

१४५. सुधारक, २५ जुलै १८८९

१४६. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २५९.

१४७. पंडित श्री. स., विष्णु परसराम शास्त्री यांचे चरित्र, पुणे, १९३६, पृ. ९३.

१४८. कर्वे धों. के. आत्मवृत्त–चरित्र, पुणे १९५८, पृ. १०८.

१४९. कर्वे आनंदीबाई, माझे पुराण, पुणे, १९४४, पृ. ४७.

१५०. मालशे–आपटे, पूर्वोक्त, पृ. ७९.

१५१. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २६३.

१५२. तत्रैव, पृ. २६४.

१५३. मालशे–आपटे, पूर्वोक्त, पृ. १४६.

१५४. तीर्थळी शोभना, पूर्वोक्त, पृ. ४७.

१५५. किर धनंजय, महात्मा फुले चरित्र, मुंबई, २००१, पृ. ६६.

१५६. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २७२.

१५७. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २७६.

१५८. तत्रैव, पृ. १

१५९. देशपांडे (देशमुख) शारदा, पूर्वोक्त, पृ. ७.

१६०. तत्रैव, पृ. ७

१६१. तत्रैव, पृ. ९.

१६२. तत्रैव, पृ. ९४.

१६३. चिटणीस कृ. ना., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, भाग २, पुणे १९८७, पृ. १२०.

१६४. तत्रैव, पृ. १२१.

१६५. भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ. ७१.

१६६. प्रियोळकर अं. का. (संपा.), लोकहितवादीकृत शतपत्रे, पूर्वोक्त, पृ. १७.

१६७. ज्ञानोदय लेखनसारसूची, खंड २ रा, भाग पहिला, २५४४, (१३:१२, १५ जून १८५४), पृ. १८५.

१६८. रानडे रमाबाई, आमच्या आयुष्यातील काही आठवणी, पुणे, २००२, पृ. २९.

१६९. प्रधान ग. प्र., पूर्वोक्त, पृ. १८१.

१७०. वैद्य सरोजिनी (संपा.), काशिबाई कानिटकर आत्मचरित्र व चरित्र, मुंबई, १९८०, पृ. २३५.

१७१. ज्ञानोदय लेखनसार सूची, खंड २ रा, भाग पहिला, १५ सप्टें. १८६३, पृ. २८१.

१७२. प्रियोळकर अं. का. (संपा.), लोकहितवातीकृत, पूर्वोक्त, पृ. २६२.

१७३. माडगावकर गो. ना., पूर्वोक्त, पृ.२१२.

१७४. वैद्य सरोजिनी (संपा.), काशिबाई कानिटकर आत्मचरित्र व चरित्र, पूर्वोक्त, पृ. ६७, ६८.

१७५. माडगावकर गो. ना., पूर्वोक्त, पृ. २१२.

१७६. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २७६.

१७७. लांजेवार ज्योती, पूर्वोक्त, पृ. १०९.

१७८. तत्रैव, पृ. ११०.

१७९. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २७६.

१८०. किर धनंजय, पूर्वोक्त, पृ. २८, ३६,४६.

१८१. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. १०, ११.

१८२. ज्ञानोदय लेखनसारसूची, खंड १ ला, भाग २ रा, ३३९८, (१३:५,१ मार्च १८५४), पृ. ७९.

१८३. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ११.

१८४. तत्रैव, पृ. १२

१८५. तत्रैव, पृ. १२.

१८६. तत्रैव, पृ. २६.

१८७. धारणकर सरल, आधुनिक भारतातील स्त्री जीवन, नाशिक, २००४, पृ. २८.

१८८. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २७.

१८९. धारणकर सरल, पूर्वोक्त, पृ. २८.

१९०. धारणकर सरल, पूर्वोक्त, पृ. २८.

१९१. माडगावकर गो. ना., पूर्वोक्त, पृ. २१२.

१९२. जोशी ना. वि., पुणे शहराचे वर्णन, पुणे, २००२, पृ. ५७.

१९३. किर धनंजय, स. ग. मालशे, य. दि. फडके, पूर्वोक्त, पृ. २२१.

१९४. ज्ञानोदय, १५ मार्च १८५१

१९५. ज्ञानोदय लेखनसारसूची, खंड १ ला, भाग २ रा, ३५९४, (१३:१४, २ मे १८५३), पृ. १३०.

१९६. ज्ञानोदय लेखनसारसूची, खंड १ ला, भाग २ रा, ३३९८, (१३:५,१ मार्च १८५४), पृ. ७९.

१९७. ज्ञानोदय लेखनसारसूची, खंड १ ला, भाग २ रा, ३४१५, (१३:८, १५ मार्च १८५४), पृ. ९२.

१९८. वैद्य सरोजिनी (संपा.), काशिबाई कानिटकर आत्मचरित्र व चरित्र, पूर्वोक्त, पृ. ८१.

१९९. खोले विलास (संपा.), शिंदे ताराबाई, स्त्री पुरुष तुलना, पुणे, १९९९, पृ. ११४.

२००. प्रियोळकर अं. का. (संपा.), लोकहितवादीकृत शतपत्रे, पूर्वोक्त, पृ. ७७.

२०१. तत्रैव, पृ. ३६.

२०२. किर धनंजय, स. ग. मालशे, य. दि. फडके, पूर्वोक्त, पृ. ६१५.

२०३. प्रधान ग. प्र., पूर्वोक्त, पृ. १७४.

२०४. तत्रैव, पृ. १७४.

२०५. तत्रैव, पृ. १७०.

२०६. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ६१.

२०७. माडगावकर गो. ना., पूर्वोक्त, पृ. २००.

२०८. टिळक दे. ना., महाराष्ट्राची तेजस्विनी, पं. रमाबाई, पुणे, २०१२, पृ. १०७.

२०९. पं. रमाबाई, स्त्री धर्मनिती, पूर्वोक्त, पृ. ११४.

२१०. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ६३.

२११. वर्दे मोहिनी, पूर्वोक्त, पृ. ७२.

२१२. धारणकर सरल, पूर्वोक्त, पृ. २९.

२१३. धारणकर सरल, पूर्वोक्त, पृ. २९.

# प्रकरण ३ रे

# पं. रमाबाईंच्या प्रारंभीक जीवनाचा आढावा

## ३.१ प्रस्तावना :

पंडिता रमाबाई अग्रेसर स्त्री सुधारक होत्या. एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील स्त्री सुधारणा चळवळीत त्यांचे स्थान महत्वाचे आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी स्त्री उद्धाराचे कार्य केले. मानवतावाद हा त्यांच्या समाजकार्याचा मूळ भाव होता. सन १८५८ ते सन १९२२ हा त्यांचा जीवनकाळ आहे. सन १८८९ मध्ये शारदासदनाच्या स्थापनेपासून त्यांच्या कार्याला सुरुवात झाली. त्यांनी स्त्री सुधारणा विषयक कार्य का निवडले ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी पं. रमाबाईंच्या लहाणपणापासून ते शारदासदनाच्या स्थापनेपर्यंतच्या कालखंडाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

पं. रमाबाईंच्या जीवन कार्याचा आढावा घेताना त्यांच्या जीवन कालखंडामध्ये स्त्री सुधारणा कार्याची प्रेरणा कशी मिळाली हे शोधणे गरजेचे आहे. त्यांच्या समकालीन घडामोडींमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला परिणाम तपासणे आवश्यक आहे. यांच्या चरित्रातून त्या स्त्री सुधारणा कार्यासाठी कशा सिध्द झाल्या याची माहिती घेणे महत्वाचे आहे. पं. रमाबाईंची जडणघडण कशी झाली ह्याचा शोध प्रस्तुत प्रकरणामध्ये घेतला आहे.

## ३.२ पूर्ववृत्तांत :

पंडिता रमाबाईंचे वडील अनंत पद्मनाभ परमेश्वर डोंगरे होते. ते चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण होते. "ते धर्माचरणी पुराणिक असले तरी स्वतंत्र विचारांचे होते."[1] त्यांचा जन्म १७८६ मध्ये झाला. "दक्षिण कर्नाटकातील मंगळूर जिल्ह्यातील माळहेरंजी हे त्यांचे मूळ गाव होते."[2]डोंगरे हे कुटुंब मूळचे महाराष्ट्रातील होते. "पोर्तुगीजांकडून होणाऱ्या धर्म छळामुळे काही चित्पावन घराणी दक्षिणेकडे गेली असावीत."[3]

अनंतशास्त्री यांचे लग्न १२ व्या वर्षी झाले.लग्नानंतर वेदाध्ययन करण्यासाठी घर सोडले. शृंगरीमठामध्ये शंकराचार्याच्या मार्गदर्शनाखाली शास्त्राभ्यास केला. पुढे वेदशास्त्र संपन्न रामचंद्रशास्त्री साठे यांच्याकडे चार वर्षे अध्ययन केले. पं. रमाबाईंना पांडित्यांचा वारसा

वडिलांकडून मिळाला होता. अनंतशास्त्री यांनी शास्त्राभ्यासाचे सर्व संस्कार पं. रमाबाईंवर केले होते.

"यावेळी पुण्यास दुसरे बाजीराव पेशव्यांच्या पत्नी वाराणशीबाई ह्यांना रघुवंश काव्य शिकायला रामचंद्रशास्त्री जात असत. त्याप्रसंगी अनंतशास्त्री त्यांच्या बरोबर असायचे. वाराणशीबाईंच्या विद्याभ्यासाचा फार मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला. त्याचवेळी अनंतशास्त्रींनी प्रतिज्ञा केली की, आपणही आपल्या गावी परत जाऊन आपल्या घरच्या बायकांना संस्कृत शिकविणार."[४]

डोंगरे यांच्या कुटूंबात निर्माण झालेला स्त्री शिक्षणाचा हा पहिला विचार होता. पं. रमाबाईंच्या जन्माअगोदर स्त्रीशिक्षणाचा प्रयत्न त्यांच्या कुटूंबात झाला होता. अनंतशास्त्री यांच्या पत्नीचे नाव यमुना होते."तिला त्यांनी संस्कृत शिकविण्याचा प्रयत्न केला पण आई वडिलांच्या कर्मठ वृत्तीमुळे त्यांच्या प्रयत्नाला यश आले नाही. त्यांची पत्नी ही शिकण्यास फार उत्सुक नव्हती. तशात त्या लवकर वारल्यामुळे अनंतशास्त्रांचा स्त्री शिक्षणाचा प्रयोग तेथेच थांबला."[५] पत्नीच्या मृत्यूनंतर अनंतशास्त्री काशी तीर्थयात्रेला गेले."काशी येथे षट्शास्त्रानिष्णांत प्रसिध्द पंडित भाऊशास्त्री नियोगी आणि प्रसिध्द नैय्यायिक गणेशशास्त्री दातार यांचेकडे दर्शनशास्त्राचे सतत चार वर्षे अध्ययन केले. त्यांनी वैष्णव पंथाची दीक्षा घेतली."[६] दर्शनशास्त्राच्या संस्कारातून अनंतशास्त्र्यांना ईश्वरभक्तीचे व मानवसेवेचे महत्व पटले. पं. रमाबाईंची जडणघडण ईश्वरभक्ती व मानवसेवेच्या वातावरणात झाली होती. मानवतेचे बीज त्यांच्यामध्ये वडिलांच्या संस्कारातून रुजले होते.

अनंतशास्त्री यांचा दुसरा विवाह लक्ष्मीबाईंशी झाला. प्रबोधनकार ठाकरे या विवाहाला 'विवाहाचा अवचित योग' असे म्हणतात. या विवाहाविषयी ते लिहितात की, "अभ्यंकर हे वैतागून आपली बायको आणि अंबाबाई नावाची अवघी नऊ वर्षाची एक कन्या बरोबर घेऊन रस्त्याने साष्टांग नमस्कार घालत काशीला चालले होते. अनंतशास्त्र्यांचे वय यावेळी ४४ वर्षाचे होते, तरी ते निरोगी, सशक्त नि तेजस्वी पाहून माधवराव अभ्यंकरांनी त्यांना अंबाबाईचे (लक्ष्मीबाईचे) शास्त्रोक्त पाणीदान करुन, ती नवरा बायको पुढे चालती झाली."[७] अनंतशास्त्रींनी दुसरा विवाह इंद्रीय सुखासाठी केला नव्हता. पत्नीला शिक्षण द्यावे ही त्यांची ईच्छा होती. "पेशवे पत्नी वाराणशीबाई ह्यांच्या सुसंस्कृततेमुळे मनात उत्पन्न झालेली ईर्षा लुप्त

झाली नव्हती. पहिल्या पत्नीने या बाबतीत त्यांना निराश केले होते. आता ह्या लहान मुलीचा स्विकार करुन आपण तिला पंडिता बनवू असे एक छानदार स्वप्न त्यांनी एका क्षणात उघड्या डोळ्यांनी पाहिले."[८]

अनंतशास्त्र्यांना स्त्री शिक्षणाचे ध्येय पूर्ण करायचे होते. त्यासाठी त्यांनी दुसरा विवाह केला होता. पत्नीला शिक्षित बनविण्याचा त्यांचा निर्धार होता. स्त्री शिक्षणाची प्रबळ इच्छा अनंतशास्त्रींच्या मनात होती. त्यांनी लक्ष्मीबाईस संस्कृत शिकवायला सुरुवात केली. त्यावेळचा हा धाडसी प्रयोग होता."पारंपरिक विचारांच्या घरच्या मंडळींचा विरोध झाला. समाजातील इतर ब्राह्मण मंडळीं ही खवळली. बहिष्काराची भाषा होऊ लागली."[९]

अनंतशास्त्रीनी स्त्री शिक्षणाचा हा प्रयत्न सन १८३० मध्ये केला होता. महात्मा फुले यांच्याही अगोदर स्वत:च्या पत्नीला शिकवून स्त्री शिक्षणाचा आद्य प्रयत्न अनंतशास्त्रींनी केला होता. या संदर्भात ठाकरे के. सी. लिहितात की, "स्वत:चे घर व सारा गाव बायकोच्या शिक्षणाला विरोध करतो असे दिसताच अनंतशास्त्री आपल्या अल्पवयी बायकोला बरोबर घेऊन एका वस्त्रानिशी वनवासाला निघाले. याला म्हणतात तत्वनिष्ठा!"[१०]

स्त्री शिक्षणासाठी अनंतशास्त्री प्रतिकूल परिस्थितीला सामोरे गेले. ते समाजापासून अलिप्त ठिकाणी राहू लागले. गंगामूळच्या जंगलात संसार सुरु केला. एकोणिसाव्या शतकातील समाज सुधारकांच्या पंक्तीमध्ये अनंतशास्त्रीचे नाव घेतले जात नाही. स्त्रीशिक्षणाच्या संदर्भात त्यांच्या कार्याची नोंद घेतली जात नाही. याठिकाणी स्त्री शिक्षणासाठी त्यांनी केलेला प्रयत्न व त्याग याचा विशेष उल्लेख करावा लागेल. पं. रमाबाईंना स्त्री शिक्षणाचे जीवनध्येय पित्याकडून मिळाले होते असे नमूद करावे लागेल.

"लक्ष्मीबाई संस्कृत शिकू लागल्यावर स्त्रियांना संस्कृत शिकविणे हे शास्त्राविरुध्द आहे आणि या कारणात्सव तुम्हाला जातिबहिष्कृत करण्यात येईल असा काही विद्वान शास्त्री अनंतशास्त्र्यांशी वाद घालू लागले."[११]

प्राचीन काळापासून स्त्रीशिक्षणाची पध्दत होती. स्त्रीशिक्षणाला शास्त्राधार आहे असे ठामपणे मांडण्याचा प्रयत्न अनंतशास्त्रींनी केला. "काही दिवसांनी शिरुर सोदे येथे पंडितांची एक मोठी सभा भरविण्यात आली. तीत कर्नाटकातील प्रसिध्द विद्वान, आचार्य, शास्त्री आणि पुराणिक मिळून सुमारे ४०० मंडळी अनंतशास्त्र्यांशी वाद घालायला आली होती.

अनंतशास्त्र्यांनी श्रृती, स्मृती, संग्रह, पुराणे आणि महाभारत, रामायणादि इतिहासातून स्त्रियांस शास्त्राध्ययन करण्याचा अधिकार असल्याची वचने गोळा करुन ती त्या विद्वानांपुढे टाकली. वाद लेखी चालला होता. शेवटी अनंतशास्त्र्यांनी तयार केलेला ग्रंथ प्रमाण म्हणून त्या सभेने मान्य केला. अशा रितीने स्त्रियांना संस्कृत शिकविण्याची एक आडकाठी दूर झाली."[१२]

अनंतशास्त्रींनी स्त्री शिक्षणाला शास्त्राधार मिळवून दिला. त्यांच्या या प्रयत्नाबद्दल पं. रमाबाई आपल्या आत्मचरित्रात लिहितात की,"My father appeared before the guru, the head priest and the assembly of pandits and gave his reasons for teaching his wife. He quoted ancient authorities, and succeded in convincing the guru and the chief Pandits that it was not wrong for women and Shudras to learn Sanskrit, Puranic literature."[१३]

अशाप्रकारे पं. रमाबाईंना नवविचारांचा वारसा मिळाला. त्यांच्या वडिलांचे सुधारकी विचार त्यांच्यात वारसाने आले होते. वडिलांच्या या प्रयत्नांचा त्यांना अभिमान वाटत होता. सन १८८२ मध्ये हंटर कमिशनसमोर पं. रमाबाईंची साक्ष झाली. त्यावेळी "ज्या गृहस्थाला आपल्या स्त्री शिक्षणविषयक मतांमुळे पुष्कळ छळ सोसावा लागला व ज्याला आपल्या मतांच्या पुरस्कारार्थ वादविवाद करावे लागले व आपली मते अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत प्रत्यक्षात आणून दाखवावी लागली त्या गृहस्थाची मी मुलगी आहे."[१४] अशी स्वतःची ओळख सांगितली.

अनंतशास्त्री व जोतीराव फुले यांनी आपापल्या पत्नींना शिकविले. दोघांनाही समाजाचा फार मोठा विरोध झाला. जोतिराव फुले यांनी या विरोधास एका स्थिर ठिकाणी (पुणे) वास्तव्य करुन तोंड दिले होते. मुलींच्या शाळेस स्त्री शिक्षिका मिळावी म्हणून त्यांनी सावित्रीबाईंना शिकविले होते. अनंतशास्त्रींनी आपले सुधारकी विचार पत्नीच्या शिक्षणापुरतेच मर्यादित होते. ते विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी संपूर्ण जीवन तीर्थयात्रा व भटकंतीत व्यतीत केले. "ज्ञानसाधना व तीर्थयात्रा हे अनंतशास्त्रींचे प्रमुख छंद होते."[१५] त्यांनी एका ठिकाणी वास्तव्य केले असते, सुधारकी विचार समाजात स्थिर ठिकाणी राहून रुजविले असते तर इतिहासामध्ये त्यांच्या नावाची नोंद आद्य स्त्री सुधारक म्हणून झाली असती.

अनंतशास्त्रींनी धर्मसभा जिंकली .त्यांना स्त्री शिक्षणासाठी शास्त्राधार मिळवला. ते पत्नीस शिकवू लागले. त्यांचे पुरोगामी विचार तत्कालीन समाजाला रुचले नाहीत. प्रतिगामी समाजाचा विरोध सुरु झाला म्हणून त्यांनी पत्नीसह गंगामूळच्या अरण्यात संसार सुरु केला.

अनंतशास्त्रींनी पत्नीच्या शिक्षणासाठी एकांतवास स्विकारला. या संदर्भात पं. रमाबाई आत्मचरित्रात लिहितात की, "जगातील कटकटींपासून दूर राहून शिक्षणकार्य करता यावे, शांतस्थळी देवदेवतांची भक्ती करता यावी व सतत भेटीगाठी येणाऱ्यांचा त्रास टाळता यावा याकरिता त्यांनी असे केले होते."[१६]

गंगामूळच्या जंगलात त्यांनी आश्रम सुरु केला. तेथे अध्ययनासाठी विद्यार्थी येऊ लागले. लक्ष्मीबाईंनी आश्रमात सुंदर फळबागा, फुलबागा लावल्या. "साऱ्या संसाराचा गाडा आता लक्ष्मीबाई ओढू लागल्या. त्यांनी दररोज पहाटे उठून दुध–दुभत्यांचे पहावे, सारे घरकाम करावे, आल्यागेल्याचे पहावे, बाग–बगीच्याची मशागत करावी आणि इतके करुन उरला सुरला सगळा वेळ अभ्यासात खर्च करावा. रात्रंदिवस खपून संस्कृत व्याकरण व न्यायशास्त्र ह्या विषयात त्या पारंगत झाल्या. पुष्कळ वेळेला अनंतशास्त्री कोठे बाहेरगावी गेले असले म्हणजे लक्ष्मीबाई त्यांच्या शिष्यांना पाठ देत असत."[१७]"अशाप्रकारे जिथे लोक यायला घाबरत, तिथे त्यांची कुटूंबातील सात–आठ माणसे, शंभर–सव्वाशे गुरे, विद्यार्थी, इतर कुटूंबे अशी वसाहत उभी झाली."[१८]

गंगामूळच्या जंगलात लक्ष्मीबाईंनी वसाहत उभी केली. पुढे पं. रमाबाईंनी केडगावच्या माळरानावर मुक्ती मिशनची वसाहत उभी केली. दोघींनी प्रतिकूल परिस्थितीत नंदनवन फुलविण्याचे धाडस केले. लक्ष्मीबाईंच्या कार्याचे कौतुक करताना प्रबोधनकार ठाकरे लिहितात की, "तिनेच आता खरे चित्पावनी पाणी प्रकट करुन आपला वाढता संसार आणि शिष्यांचा आणि यात्रेकरुंचा परिवार यांचा गाडा कर्त्या–सवरत्या गृहिणीप्रमाणे हाकला."[१९] पुढे पं. रमाबाईंनी मुक्ती मिशनची स्थापना केली. हजारो अनाथ, निराधार स्त्रियांना आश्रय दिला. अशी संस्था स्थापन करण्याची कर्तबगारी व ती चालविण्याची पात्रता पं. रमाबाईंना लक्ष्मीबाईंकडून मिळाली होती असे दिसते. लक्ष्मीबाईंचे व्यवस्थापन कौशल्य पाहून रमाबाईंचे एक सहकारी व चरित्रकार मिस फुल्लर आपल्या द ट्रायम्फ ऑफ ॲन इंडियन विडो (पृ.क्र.१२) या पुस्तकात लिहितात, "बंकिंगहॅम पॅलेस किंवा व्हाईट हाऊसचे व्यवस्थापन करायलासुध्दा लक्ष्मीबाई जराही गोंधळल्या नसत्या. पुढे ह्याहून मोठ्या संसाराचे कुशल व्यवस्थापन रमाबाईंनी केलेले दिसते."[२०] या विधानातील अतिशयोक्तीचा भाग सोडला तर पं. रमाबाईंमध्ये व्यवस्थापन कौशल्याचे बीज लक्ष्मीबाईंकडून प्राप्त झाले होते असे दिसते.

पं. रमाबाईंनी आईच उपकार कायम स्मरणात ठेवले. त्यांनी 'The High Caste Hindu Women'हे पहिले इंग्रजी पुस्तक लिहिले. त्यांनी हे क्रांतीकारी विचारांचे पुस्तक आपल्या आईला अर्पण केले. पं. रमाबाई आईविषयी कृतज्ञता व्यक्त करताना लिहितात की, "To the memory of my beloved mother LAXMIBAI DONGRE whose sweet influence and able instruction have been the light and guide of life is most reverently dedicated."[२१]

गंगामूळच्या आश्रामात डोंगरे कुटूंबाचे १३ वर्षे वास्तव्य होते. या काळात अनंतशास्त्री व लक्ष्मीबाई यांना सहा अपत्ये झाली. त्यातील तीन लहानपणीच वारली. कृष्णाबाई, श्रीनिवास व रमाबाई ही तीनजण जगले. अनंतशास्त्री एक सनातनी सुधारक होते.त्यांनी पत्नीला, दोन मुलींना व मुलाला शिक्षण दिले.

अनंतशास्त्रींनी कृष्णाबाईचा विवाह बालवयात १० व्या वर्षी केला. त्यांच्या आईने यासाठी हट्ट केला होता. मुलींच्या लग्नानंतरही तिच्या शिक्षणाची खबरदारी ते घेताना दिसतात. या संदर्भात पं. रमाबाई सिस्टर जिराल्डीन यांना लिहिलेल्या पत्रात लिहितात की, "My father had taken a lad of needy parents to be the husband of my sister for the reason that the might keep him and educate him with his daughter. Had he given her in marriage to the son of a wealthy and influential Hindu, She would have had to live with her father-in-law and be brought up in ignorance."[२२] (Nov. 1st 1883)

कृष्णाबाईचे लग्न १० व्या वर्षी करुन अनंतशास्त्रींनी परंपरेशी तह केला होता. लग्नानंतरही तिचे शिक्षण सुरु रहावे असे त्यांना वाटत होते. मुलगी श्रीमंत व सुखवस्तू कुटूंबात दिली तर तिला सासरी रहावे लागेल. तिथे तिचे शिक्षण पूर्ण होणार नाही अशी भिती त्यांना वाटत होती.त्यासाठी ते गरजू व होतकरु मुलाला पसंती देतात.मुलीच्या शिक्षणासाठी घरजावई करण्याचा पर्याय त्यांनी स्विकारला. यावरुन अनंतशास्त्री स्त्री शिक्षणाबाबत किती आग्रही होते हे दिसते.

## ३.३ रमाबाईंचे प्रारंभिक जीवन :

रमाबाईंचा जन्म गंगामूळ येथे २३ एप्रिल १८५८ रोजी झाला. तिचा जन्म अरण्यात झाला व आयुष्याची सुरुवात तीर्थयात्रेने करावी लागली. पं. रमाबाई लिहितात, “आई वडिलांनी घर सोडले, तेव्हा मी फक्त सहा महिन्यांची होते. अशाप्रकारे माझ्या यात्रेकरुच्या जीवनास मी बालवयातच सुरुवात केली.”[२३] पं.रमाबाईंच्या जन्माच्या वेळी डोंगरे कुटूंबाची वाताहात झाली होती.

पं. रमाबाईंच्या लहानपणी डोंगरे कुटूंब तीर्थयात्रा करीत होते. “एखाद्या मुक्कामाच्या क्षेत्रात धर्मशाळेत किंवा गावाबाहेर झाडाखाली छावणी घ्यायची. देवळात किंवा नदीच्या घाटावर संस्कृत पोथी उघडून पुराण सांगायचे. पोथीपुढे भाविक श्रोते चिमटी–मुठी तांदूळ किंवा दिडकी, दमडी टाकतील तेवढ्यावर निर्वाह करायचा आणि त्यातूनच क्षेत्रस्थ, उपाध्ये, गोसावी, साधूसंतांना दक्षणा दान द्यायची. एका जागी असे काही दिवस काढल्यावर पुढे प्रयाण करायचे असा क्रम सुरु झाला.”[२४]

अनंतशास्त्रींनी सन १८५८ पासून १८७८ पर्यंत म्हणजे तब्बल २० वर्षे तीर्थयात्रा केली. रमाबाई वनवासातच लहानाची मोठी झाली. “रमा सात वर्षांची होताच तिला संस्कृत शिकवायला प्रारंभ केला. आईने रोज पहाटे ४ वाजता उठावे आणि आपल्या चिमुकल्या रमेला संस्कृत, भागवत, पुराण, गीता व्याकरण नि अमरकोषाचे पाठ द्यावे. हे चांगले घोकवून घ्यावे. रमाबाई बारा वर्षांची झाली तेव्हा तिला भागवत पुराणाचे अठरा हजार संस्कृत श्लोक अस्खलित पाठ म्हणता येत असत. शिवाय गीता, स्तोत्रे नि कोश तर तोंडपाठ होतेच.”[२५]

पं. रमाबाईंची बुध्दी अतिशय कुशाग्र होती. बालवयात ऐवढे प्रचंड ज्ञान मिळविणारी ती एकमेव होती. ज्या काळात स्त्रियांचे शिक्षण धर्मबाह्य मानले जात होते. त्या काळात रमाबाईंनी प्रचंड धर्मज्ञान प्राप्त केले होते. ही बाब विशेष नमूद करण्याजोगी आहे. पं. रमाबाई आई विषयी कृतज्ञता व्यक्त करताना लिहितात की, “I received from my mother all the education, I had in my youth.”[२६]

अनंतशास्त्रींनी मुलामुलींना धर्मशिक्षण दिले. व्यवहारी शिक्षण दिले नाही. त्यामुळे त्यांच्या कुटूंबाचे आर्थिक हाल झाले. पं. रमाबाई लिहितात की, “आमच्या आई–वडिलांच्या

संग्रहात थोडासा पैसा होता. आमच्या रोजच्या व्यवहारी शिक्षणासाठी जर तो पैसा उपयोगात आणला असता तर आम्ही कसातरी आपला जीवन चरितार्थ चालविला असता."[२७]

### ३.३.१ आई–वडिलांचा मृत्यू :

इ.स. १८७४–७५ च्या सुमारास भारतात मोठा दुष्काळ पडला होता. या सुमारास डोंगरे कुटूंब मद्रास प्रांतात होते. या दुष्काळातील स्थितीचे वर्णन पं.रमाबाई आत्मचरित्रात करतात की, "अन्नपाण्याची फार मारामार होती. आमचा अभिमान आम्हाला भिक मागू देत नव्हता किंवा कष्टाचे काम करु देत नव्हता... आमची उपासमार व्हावी ऐवढेच आमच्या नशिबी होते."[२८]"आम्ही झाडपाला व खजुरीच्या बिया खाऊन कसेतरी अकरा दिवस व अकरा रात्री काढल्या. हा उपासमारीचा तीव्र तडाखा माझ्या वृध्द व अशक्त पित्यास सहन होईना."[२९]

अखेर अनंतशास्त्रींनी देहत्याग करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी रमाबाईस जवळ घेऊन अखेरचा उपदेश केला. "जे सत्, नित्य व धर्म्य आहे तेच तू आचर, नित्य देवाच्या मार्गाने चाल. नित्य देवाची सेवा कर हेच तुझे ध्येय असू दे."[३०]

अनंतशास्त्रींनी रमाबाईंना केलेला हा अंतिम उपदेश होता. तो जीवनकार्याची प्रेरणा देणारा ठरला. पं. रमाबाईंनी उत्तर आयुष्य ईश्वर भक्तीमध्ये व्यतीत केले. ईश्वरसेवेचा उपदेश मानवसेवेमध्ये बदलला. अनंतशास्त्रींच्या उपदेशाचा खोल परिणाम पं. रमाबाईंच्या लोकोत्तर कार्यामध्ये दिसून येतो.

जूलै १८७४ मध्ये अनंतशास्त्री मरण पावले."त्यांचा अंतिम विधी करण्यासाठी मदतीला कोणी नव्हते. शेवटी एकट्या श्रीनिवासने बापाचे प्रेत धोतरात बांधून पाठुंगळी घेऊन दोन मैलावर नेले व एका कनवाळू ब्राह्मणाच्या मदतीने पुरले."[३१]"अनंतशास्त्रींनी मृत्यूपुर्वी आतुर संन्यास घेतला होता."[३२] आतुर सन्यास म्हणजे मरणसमयी घाईघाईने घेतलेला सन्यास. त्यामध्ये संन्याशाला जाळण्याऐवजी पुरण्याची पध्दत आहे.

"वडिलांच्या पाठोपाठ सहा आडवड्यातच रमाबाईची आई भूक–भूक करत मृत्यूमुखी पडली."[३३] ऑगस्ट १८७४ मध्ये लक्ष्मीबाईंचा मृत्यू झाला. पुन्हा प्रेतक्रियेचा प्रश्न निर्माण झाला. "ह्या वेळीही प्रेत वाहून नेण्यासाठी माणसे मिळेनात. शेवटी दोन वाटसरुंना दया आली ते कबूल झाले. मग त्यांच्या मदतीने श्रीनिवास व स्वत: रमाबाई ह्यांनी शवाला खांदा देऊन तीन मैल प्रेत वाहून नेले."[३४]

हिंदू धर्ममान्यतेप्रमाणे प्रेताच्या तिरडीला स्त्रियांनी खांदा देण्याची प्रथा नाही. प्रेताच्या अंत्यविधीच्या वेळी स्त्रियांकडून कोणतेही विधी करवून घेतले जात नाहीत. पण परिस्थितीमुळे रमाबाईंनी अनेक धार्मिक रुंढीचे अडसर दूर केले. प्रतिकूल परस्थितीवर मात करण्याचे धैर्य त्यांना अशा प्रसंगातून मिळत गेले.

अनंतशास्त्री व लक्ष्मीबाई यांचे मृत्यू उपासमारीने झाले होते. या दोघांचे मृत्यू म्हणजे त्याकाळचे भूकबळी होते."सोळा वर्षीय रमेने पाहिलेले व अनुभवलेले हे पहिले भूकबळी होते."[३५]

सन १८९६–९७ मध्ये गुजरात प्रांतात मोठा दुष्काळ पडला होता. पं. रमाबाईंनी या प्रांतातून ३०० मुली आणल्या. त्यांना मुक्ती मिशनमध्ये आश्रय दिला. सन १९०० मध्ये मध्य प्रांतात दुष्काळ पडला होता. या भागातून स्त्रिया, मुली, मुले मिळून १३५० जणांस मुक्ती मिशनमध्ये आश्रय दिला होता. पं. रमाबाईंनी दुष्काळाचा अनुभव घेतला होता. म्हणून त्यांनी दुष्काळग्रस्त स्त्रियांसाठी मोठे कार्य केले होते.

जानेवारी १८७५ मध्ये रमाबाईंची थोरली बहिण कृष्णाबाईचा कॉलराने मृत्यू झाला. डोंगरे कुटूंबात भाऊ श्रीनिवास व रमाबाई असे दोघेच उरले. त्यांनी तीर्थयात्रा सुरु ठेवल्या. त्यांच्या प्रवासाविषयी प्रतिमा अस्थाना लिहितात की, "Ramabai and her brother Shrinivas walked the length and breath of India, nearly 3200 Kms in six years."[३६]

रमाबाई व श्रीनिवास यांनी स्वत:च्या गावी स्थिर जीवन  जगण्याचा निर्णय घेतला नाही. ते संपूर्ण भारतभर हिंडत राहिले. याविषयी १ नोव्हे. १८८३ रोजी लिहिलेल्या पत्रात पं.रमाबाई स्पष्ट करतात की, "After their (father and mother) death, because of the persecution which was carried on against us on account of my not being married and because he advocated female education."[३७] या भटकंतीच्या काळात त्यांनी स्त्रियांची स्थिती अनुभवली. स्त्री उद्धारासाठी त्यांची मानसिकता तयार झाली. त्या स्त्री उद्धाराचे कार्य करण्यासाठी सिध्द होत गेल्या. या संदर्भात प्रतिमा अस्थाना लिहितात की, "Her learning and unmarried status provoked the wonder and hostility of the people. But she trudged through all this, assimilating experience, watching the injustice and tyrannies with calm and critical eyes and unconsciously training

and preparing her self for the great work she was destined to take up in future."[३८] अशा प्रकारे पं.रमाबाईंना आलेल्या अनुभवांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व परिपक्व होत गेले. भविष्यकालीन स्त्री सुधारणा कार्याचे प्रशिक्षण त्यांना या अनुभवांतून मिळत गेले.

### ३.३.२ हिंदू धर्मातील भोंदूगिरीचा प्रत्यय :

पं. रमाबाईंवर सनातनी प्रवृत्तीचे संस्कार झाले होते. लहानपणापासून कुटूंबाचे उपासतापास, व्रतवैकल्य, पुण्यसंचय व मोक्ष प्राप्तीसाठी धडपड अनुभवली होती. मात्र त्यांच्या कुटूंबाच्या वाट्याला दुर्दैवी जीवन आले. रमाबाईंच्या दुर्दैवाचे वर्णन प्रबोधनकार ठाकरे करतात की,"साडेसाती साडेसात वर्षांचीच असते म्हणतात, पण आयुष्याच्या सुरुवातीचीच तब्बल २० वर्षे रमाबाईंच्या जीवनाचा उकिरडा करणारा ग्रह कोणता हे कोडे जोतिषांना ही सुटण्यासारखे नाही."[३९] पं.रमाबाईंच्या दुर्दैवाची मालिका मोठी आहे. ती केवळ आई–वडिलांच्या मृत्यूने संपली नाही. पुढील काळात बहिण, भाऊ श्रीनिवास, पती बिपीन बिहारीदास मेधावी व कन्या मनोरमा या सर्वांचे मृत्यू त्यांना पहावे लागले. अशा स्थितीत त्या झगडताना दिसतात. स्वतःचे दुःख बाजूला सारुन हजारो स्त्रियांना आधार देण्याचे त्यांचे कार्य असाधारण आहे.

पं. रमाबाई व श्रीनिवास वेगवेगळ्या धर्मस्थळांना भेटी देत होते. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी विचित्र अनुभव येत होते. त्याकडे त्या डोळसपणे पहात होत्या. या प्रवासात हिंदू धर्मातील जुन्या श्रध्दा पुसु लागल्या. नव्या विचारांचा जन्म होऊ लागला. त्या हिंदू धर्मातील विधी, विचारांची चिकित्सा करु लागल्या. या काळात त्यांच्या संवेदनशील मनाला हिंदूधर्म कसा जाणवत गेला हे खालील प्रसंगावरुन स्पष्ट होते.

#### १) पापनाशिनी नदीत पाप धुतली जातात :

"दक्षिणेतील तिरुपतीजवळ व्यंकटगिरी पर्वतावर वैष्णवांचे मोठे तीर्थक्षेत्र आहे. तिथे पापनाशिनी नदी असून तिच्या धबधब्याखाली स्नान केले की पापे धुतली जातात व त्याचा तवंग पाण्यावर तरंगतो, असे पुजारी यात्रेकरुंना सांगत. त्या धबधब्याखाली बसून आम्ही सर्वांनी पापनाशिनीचे पाणी आमच्या डोक्यावरुन वाहू दिले. मग आमच्या डोक्यावरील तेलाचे तवंग आम्ही खाली प्रवाहात पाहिले. पापे धुवून गेली ह्याचे काही प्रमाण आम्हाला पटले नाही. भिक्षुकांची ढोंगे मात्र आम्ही पहात होतो."[४०]

या प्रसंगामध्ये पं.रमाबाई कार्यकारण भाव शोधण्याचा प्रयत्न करतात. पाण्याच्या पृष्ठभागावर वाहणारा तवंग डोक्यातील तेलाचा होता हे त्यांच्या कुशाग्र बुध्दीमत्तेने जाणले होते. या प्रसंगातून पुजाऱ्यांचा खोटेपणा त्यांना स्पष्ट जाणवत होता.

**२) कृष्णाची बुडालेली द्वारका समुद्रातून वर येते :**

"सन १८७१ मध्ये डोंगरे कुटूंब द्वारका येथे होते. ह्याच मुक्कामात कपिलाषष्ठीचा योग आला. त्या दिवशी पुण्यवान लोकांना समुद्रात बुडालेल्या सुवर्ण नगरीचे दर्शन होईल असे पुजारी सांगत होते. अखेर द्वारका दर्शनाचा दिवस उजाडला संध्याकाळपर्यंत कोणालाही द्वारकेचे दर्शन झाले नाही. मात्र सायंकाळी मावळत्या सूर्याचे तांबडेपिवळे किरण समुद्रावर पडले. लोक त्यालाच द्वारका दिसली असे ओरडू लागले. पुजाऱ्यांच्या थैल्यामात्र पैशाने भरुन गेल्या होत्या."[४१]

या प्रसंगातून पं.रमाबाईंच्या मनात पापपुण्याविषयीच्या भ्रामक कल्पना स्पष्ट होऊ लागल्या. द्वारकेचे दर्शन हा केवळ आभास असल्याचे त्यांना जाणवले. हिंदू धर्मातील मर्यादा त्यांच्या मनामध्ये स्पष्ट होऊ लागल्या. हळहळू त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास होऊ लागला.

**३) रेवलसर सरोवरातील सप्तर्षि :**

"उत्तर भारतातील मंडी गावाजवळ रेवलसर सरोवर आहे. त्यात काही तरंगत्या टेकड्या आहेत. माणूस पूण्यवान असेल तर टेकड्या जवळ येऊन दर्शन देतात असे तिथले पुजारी सांगत. श्रीनिवास रात्री गुपचुप सरोवरात उतरले व टेकड्यांजवळ गेले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, लाकडांचे तराफे बनवून त्यावर माती, दगड व झाडे ठेवून टेकड्या बनविल्या आहेत. दान-दक्षिणा भरपूर देणारा आला तर पाठीमागून ढकलत त्या टेकड्या जवळ आणत."[४२]

या प्रसंगातून पुजाऱ्यांचा ढोंगीपणा व स्वार्थीपणा त्यांच्या लक्षात आला. पुजाऱ्यांना केवळ पैसा कमविण्यासाठी केलेली फसवणूक त्यांच्या लक्षात आली. या प्रसंगाकडे त्या चिकित्सक वृत्तीने पहात होत्या. त्यामुळेच टेकड्या सरकण्याचे नेमके सत्य त्यांना जाणून घेता आले.

अशा अनेक भोंदूगिरीच्या प्रसंगामुळे पं. रमाबाई निराश होत गेल्या. त्यांच्या मनाने हिंदू धर्माच्या मर्यादा स्पष्ट होऊ लागल्या. पं. रमाबाई मुक्ती प्रेअर बेलच्या अंकात लिहितात की,

"अशा चमत्कारांनी भाबडे यात्रेकरु भारुन जात. त्यांची मने इतकी संज्ञाशून्य झालेली असत की ह्या चमत्कारामागे सत्य शोधुन काढावे, प्रश्न विचारावेत. हा विवेक त्यांना उरलाच नाही."[४३] हे अनुभवून पं.रमाबाईंची ग्रंथप्रामाण्य वृत्ती कमी होऊ लागली. याविषयी पं. रमाबाई लिहीतीत, "पवित्र ग्रंथातील सर्व नियम व अटी आम्ही पुऱ्या केल्या आणि आमच्या समजूतीप्रमाणे सर्व नियम आम्ही पाळले. परंतु देव आम्हावर प्रसन्न झाले नाहीत. अनेक वर्षांच्या निष्फळ तपामुळे आमचा देवावरील विश्वास उडाला. ग्रंथावरील विश्वास पार नाहीसा झाला."[४४]

या भटकंतीच्या काळातच पं.रमाबाईंच्या मनात स्त्री मुक्तीचे बीज रुजले होते. स्त्रियांच्या उद्धारासाठी कार्य करण्याचा निर्धार त्यांनी या काळात केला. त्या लिहितात, "This made us think much of how it was possible to improve the condition of women and raise them out of their degradation."[४५]

पं. रमाबाई शहरांतून व गावांतून स्त्रियांच्या व मुलांच्या शिक्षणाची गरज पटवून देत होत्या. त्या काळात पं. रमाबाईंच्या व्यक्तिमत्वाला कसा आकार प्राप्त झाला हे दिसते. "आयुष्यात आलेल्या दु:ख, दैन्य, दारिद्र्य, उपासमारीच्या कटू अनुभवांनी त्यांची संवेदनशीलता बोथट होण्याऐवजी अधिक तरल होत गेली. आपण जे दु:ख भोगले व पाहिले ते भोगणाऱ्यांच्याविषयी मनात तीव्र सहानुभूती वाढत गेली व त्यांना मदत करुन दु:खमुक्त करण्याची प्रेरणा पण बळावत गेलेली दिसते."[४६] यावरुन पं.रमाबाईंच्या मनामध्ये भावी कार्या विषयीचे बीज पेरले गेलेले दिसते. त्यांची पारंपरिक विचारसरणी बदलली. त्यांची हिंदू धर्माविषयीची कट्टरता कमी झाली.

## ३.४ पं. रमाबाईंचे बंगालमधील वास्तव्य : (सन १८७८ ते १८८२)

पं. रमाबाई व श्रीनिवास सन १८७८ मध्ये कलकत्ता येथे आहे. त्यांचे हे आगमन संक्रमणकारी ठरले. त्यांचा संबंध नवीन विचारांशी व नवीन संस्कृतीशी आला.

कलकत्ता ही त्याकाळी नव विचारांची संक्रमणभूमी होती. बंगालमध्ये ब्रिटीश सत्ता स्थिर झाली होती.ख्रिस्ती मिशनऱ्यांचे कार्य विस्तारले होते."ख्रिस्तीधर्मातील एकेश्वरी धर्मसाधना, भूतदया, सेवावृत्ती, स्त्री–पुरुष समानता ह्या विचारामुळे सुशिक्षित बंगाली समाज प्रभावित झाला होता."[४७] ख्रिस्ती धर्मातील सहजता व हिंदू धर्मातील क्लिष्टता याची तुलना होऊ लागली. स्त्री–क्षुद्रांविषयीच्या अमानवीय दृष्टिकोनाची चिकित्सा होऊ लागली. धर्म सुधारणेचे कार्य ब्राम्हो

समाजाचे कार्यकर्ते करीत होते. “वेदांतातील परमात्म्याच्या शुद्ध आणि उच्च कल्पनांचा लोकांत प्रसार व्हावा आणि मूर्तीपूजा व गूढ धर्मकल्पना व आचार यांचा निरास व्हावा हा ब्राम्हो समाजाचा हेतू होता.”[४८]

ब्राम्हो समाजाची स्त्रियांविषयी उदारमतवादी मते होती. “आपल्या कल्पनेतील नव्या भारतीय स्त्रीची प्रतिमा रमाबाईंच्या रुपाने साकार झालेली पाहून ही मंडळीपण त्यांच्याकडे कौतुकाने आकर्षित झाली.”[४९] रमाबाई प्रौढ होत्या, अविवाहित होत्या. बुद्धीमान व शिक्षित होत्या. नवविचारांतील आदर्श स्त्री प्रतिमा रमाबाईंच्या व्यक्तिमत्वामध्ये दिसत होती.

कलकत्त्याच्या सिनेट हाऊसमध्ये पं. रमाबाईंचा सत्कार करण्यासाठी मोठी सभा बोलावली होती. “एखाद्या स्त्रीचा सत्कार करण्यासाठी बोलावलेली भारतातील ती पहिलीच सभा होती.”[५०] या सभेत विद्वानांनी रमाबाईंना पंडिता व सरस्वती या पदव्या दिल्या. या संदर्भात एम्. संतोषकुमार लिहितात की, “Pandita Ramabai was the first woman to be accorded the title ‘Pandita’ and ‘Saraswati’ by Pandits of Culcutta.”[५१]

ब्राम्हो समाजाच्या पुढाकाराने पं. रमाबाई कलकत्ता, श्रीहट्ट, ढाका स्त्री शिक्षणाला प्रेरणा देणारे विचार मांडू लागल्या. त्या प्राचीनकाळी स्त्री शिक्षणाची प्रथा होती. हे सिध्द करण्याचा प्रयत्न करीत होत्या. त्यासाठी प्राचीन वाङ्मयाचे दाखले दिले. “कलकत्त्यात ‘आर्य वंशाचा विकास व ऱ्हास’, ‘प्राचीन काळातील प्रतिष्ठित स्त्री जीवन’ या विषयावर रमाबाई बंगालीच्या ज्ञानाअभावी संस्कृतमधूनच बोलत होत्या व अनेक थोर मंडळी त्यांच्या दुभाष्याचे काम हौसेने करीत होती.”[५२] प्राचीन काळातील स्त्री जीवनाविषयी त्या सांगत की, “पूर्णपणे थाटलेल्या व गजबजलेल्या दरबारात द्रौपदी आपल्या पित्याबरोबर बसत असे. युधिष्ठीरालाही जुगार न खेळण्याविषयी ती बजावयाची उघड्या दरबारात श्रीकृष्ण आपल्या मातेसह बसायचा यावरुन असे सिध्द होते की, त्या पुरातनकाळी स्त्रियांना आताप्रमाणे वाळीत टाकीत नसत. आपण शास्त्राध्ययन केले म्हणजे दिसून येईल की, पूर्वीच्या भारताने बालविवाहाला मान्यता दिली नव्हती.”[५३]

पं. रमाबाईंनी स्त्री जीवनाशी निगडीत समस्या मांडल्या. हिंदू स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला. हिंदू धर्मकांडावर टिका केली. पंडिता म्हणून मिळालेल्या मान्यतेमुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला होता. त्यांच्या विचारांची वाटचाल पोथीनिष्ठतेकडून सुधारणेकडे सुरु झाली. याठिकाणी

धर्माचे कार्य मन:शांती देणे या विचारापर्यंत त्या पोहोचलेल्या दिसतात. आत्मसमाधान न देणारा धर्म नाकारण्याचा अधिकार त्यांनी स्विकारलेला दिसतो. "कर्मकांडाने पुण्य गोळा करुन मोक्ष मिळविण्याची हिंदू धर्माने दिलेली वाट निरुपयोगी आहे. हे अनुभवातून त्या शिकल्या होत्या."[५४] अशाप्रकारे पं. रमाबाईंचे वैचारीक परिवर्तन झाल्याचे दिसते. हिंदू धर्मग्रंथातील पारंपरिक विचारांना त्या आव्हान देऊ लागल्या. त्यांच्या या कार्याविषयी काव्हाला सिसिलिया लिहितात, "एका वस्त्रानिशी आपल्या भावाबरोबर आलेली रमा पंडिता रमाबाई सरस्वती बनली आणि भारतीय स्त्री शिक्षणाचा दीपस्तंभ ठरली."[५५]

## ३.५ ख्रिस्ती धर्माचे प्रथम दर्शन :

पं. रमाबाईंच्या जीवनात धर्मप्रेरणा सर्वात महत्वाची बाब ठरली. वयाच्या २२ व्या वर्षापर्यंत त्यांनी सनातन हिंदू धर्माचे प्रतिनिधीत्व केले. पुढे ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज असा प्रवास केला. अखेर संपूर्ण जीवन ख्रिस्त श्रद्धेत समर्पित केले. त्यातील ख्रिस्ती धर्मांगिकार हा महत्वाचा टप्पा होता.

पं. रमाबाईंनी ख्रिस्त शब्द लहानपणीच ऐकला होता. त्या लिहितात की, "माझ्या लहानपणी एक ख्रिश्चन माणूस माझ्या वडिलांकडे आला होता. त्यांच्या बोलण्यातले दोन शब्द येशू ख्रिस्त मी पुरे दिवसभर बडबडत राहिले. आईच्या कानावर जेव्हा ही गोष्ट कृष्णाने (मोठी बहिण) घातली तेव्हा आईने हे म्लेच्छांच्या देवाचे नाव पुन्हा घेऊ नका म्हणून बजावले मग मी ते नाव घेतले नाही पण ते नाव विसरलेपण नाही."[५६]

पं. रमाबाईंना बालवयात येशू ख्रिस्ताचा नाम परिचय झाला. त्यांचे नाव घ्यायला आईने प्रतिबंध केला. त्यामुळे येशू विषयी जिज्ञासा व अधिक माहिती घेण्याचे तिथेच थांबले. त्यानंतर बरीच वर्षे ख्रिस्ताशी त्यांचा संबंध आला नाही.

बंगालमधील वास्तव्यात त्यांनी हिंदू धर्मातील रुढीबध्द व्यवस्था नाकारली. मात्र धर्माची गरज व्यक्त होत होती. त्या म्हणतात, "कोणत्या तरी धर्माची मला गरज होती, पण हिंदू धर्मात माझ्यासाठी काहीच आशा नव्हती."[५७]

पं. रमाबाई मन:शांती देणाऱ्या धर्माचा शोध घेत होत्या. हा शोध ब्राम्हो समाजाच्या सान्निध्यात काही अंशी पूर्ण झालेला दिसतो. ब्राम्हो समाज व ख्रिस्ती धर्ममतांमध्ये साम्य

आढळते. "केशवचंद्र सेनानी पं. रमाबाईंना एक सर्व धर्मातील नितीतत्वे संग्रहित केलेले पुस्तक भेट म्हणून दिले होते. त्यातही सर्वाधिक वचने बायबल मधीलच होती."[५८] ह्या सर्वांतून ब्राम्हो मंडळीचा ख्रिस्ती मतांकडे असलेला ओढा स्पष्ट होतो.ब्राम्हो मंडळींचे व ख्रिस्ती लोकांचे संबंध स्नेहाचे होते.पं. रमाबाई ब्राम्हो मंडळींमध्ये वावरत होत्या. त्यामुळे त्या ख्रिस्ती मतांकडे वळलेल्या दिसतात.

पं. रमाबाई एका ख्रिस्ती मेळ्याला उपस्थित राहिल्या होत्या. तेथे त्यांना ख्रिस्ती लोकांनी बायबलची एक प्रत भेट दिली होती. यासंदर्भात पं. रमाबाई लिहितात, "त्या विनयशील ख्रिस्ती लोकांनी मला पवित्र शास्त्राची संस्कृत आवृत्ती व काही उत्तम वस्तू दिल्या. त्यांनी पवित्र शास्त्राच्या वाचनाने माझे परिवर्तन व्हावे म्हणून नक्कीच प्रार्थना केली असावी."[५९]

पं. रमाबाईंना मिळालेली बायबलची ही पहिली प्रत होती. पं. रमाबाई त्या प्रतिचे वर्णन पवित्र शास्त्राची माझी पहिली प्रत असे करतात. पं. रमाबाईंना बायबल भेट देण्यामागील ख्रिस्ती गृहस्थांचा उद्‌देश स्पष्ट होता. पं. रमाबाई विद्वान व प्रतिभासंपन्न होत्या. तिच्यावर ख्रिस्ती धर्ममतांचा प्रभाव निर्माण करावा असा हेतू होता.

## ३.६ पं. रमाबाईंचा विवाह :

पं. रमाबाईंचा विवाह "१३ जून १८८० रोजी बांकीपूर येथील रजिस्ट्रारपुढे श्री. बिपीन बिहारी दास ह्यांच्याबरोबर रजिस्टर पध्दतीने नोंदविण्यात आला."[६०] विवाहाच्या वेळी पं. रमाबाईंचे वय २२ वर्षे होते. २२ व्या वर्षापर्यंत रमाबाईंचे अविवाहीत राहणे समाजमान्य व शास्त्र संमत नव्हते. "ऋतूमती होऊनही अविवाहीत राहिल्याने भोवतालच्या सनातनी समाजाचा रोष झाला होता."[६१] त्यांच्या संदर्भात अफवा पसरविण्यात आल्या. पं. रमाबाईंच्या लग्नासाठी अनेक प्रस्ताव आले. त्या प्रस्तावांना त्यांनी नकार दिला होता. भाऊ श्रीनिवास जिवंत असेपर्यंत त्या लग्नाच्या कोणत्याही प्रस्तावाचा त्यांनी विचार केला नाही. त्या सांगतात "महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, मध्य हिंदुस्थान, बंगाल प्रांतातील अनेक सुशिक्षित व सुखवस्तू माणसांकडून भावाजवळ लग्नासाठी मागण्या येत होत्या. पण आपला भाऊ जोपर्यंत पाठीशी आहे, तो पर्यंत काळजी करण्याचे कारण नाही असे वाटून मी त्या सर्व मागण्या नाकारल्या."[६२]

श्रीनिवास याचे ८ मे १८८० रोजी निधन झाले. पं. रमाबाई एकाकी पडल्या. भावाच्या निधनानंतर त्यांनी तडकाफडकी विवाहाचा निर्णय घेतला. विवाहापूर्वी महाराष्ट्रात जाण्याचा पर्याय उपलब्ध होता. महाराष्ट्रात नोकरीची संधी उपलब्ध होती. "मुंबईच्या स्टुडंटस् लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटी तर्फे चालवण्यात येत असलेल्या मुलींच्या शाळेत चालिका म्हणून निमंत्रित केले होते."[६३]पं.रमाबाईंनी हा प्रस्ताव स्विकारला नाही. येथे त्यांनी 'उदरनिर्वाहाची सोय' हा तात्पुरता विचार केला नाही. त्याऐवजी बंगालमध्येच राहून विवाहबध्द होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या विवाहाच्या निर्णयाबद्दल टिळक दे. ना. लिहितात की, "रमाबाईंच्या आपल्या मागे लागलेल्या हितचिंतकांच्या सूचनांतून कीव करणाऱ्या उसाशांतून, काकदृष्टीच्या कटाक्षातून निसटण्याचा एकच मार्ग होता व तो म्हणजे विवाहबध्द होऊन आपल्या भोवती पतीरक्षणाचा कोट उभा करणे."[६४] श्रीनिवासचा मृत्यू झाला नसता तरी पं. रमाबाई विवाहापासून फार काळ दूर राहू शकल्या नसत्या. आपण आजन्म अविवाहीत राहू असे विवाहापूर्वी त्यांनी कोठेही नमूद केलेले दिसत नाही.

पं. रमाबाईंचा विवाह अनेक बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण होता.

**१) पं. रमाबाई व बिपीन बिहारी दास मेधावी यांचा प्रेमविवाह होता.**

बिपीन बिहारी दास हे श्रीनिवास शास्त्रींचे स्नेही होते. रमाबाई व बिपीन बिहारी दास यांच्या विवाह पूर्वीपासून परिचय होता. "१७ डिसेंबर १८७९ रोजी श्रीहट्ट (सिल्हेट) येथे रमाबाई व श्रीनिवास यांच्या सन्मानार्थ मोठी सभा भरविण्यात आली होती. ह्या सभेस बिपीन बिहारी दास हजर असून बाईंच्या पूर्वीच्या जीवनाचा इतिहास आपल्या ओजस्वी भाषेत श्रोत्यांना सांगितला. ह्याच मुक्कामात बिपीनबाबूंचा व श्रीनिवासचा दाट परिचय झाला. श्री. बिहारींची विद्वता, संघटनक्षमता व इतर गुणांमुळे श्रीनिवास मोहून गेले व त्या वृत्तीने पुढे दृढ स्नेहात रुपांतर झाले. ह्याच मुक्कामात बिपीनबाबूंनी रमाबाईंना विवाहाबद्दल विचारले व भावाची अनुमती असल्यास आपली काही हरकत नाही असे रमाबाईंनी त्यांना सांगितले."[६५]

पं. रमाबाई पूर्णत: एकाकी होत्या. विवाहाचा त्यांचा निर्णय पूर्णत: व्यक्तिगत होता. अनोळखी व्यक्तीबरोबर विवाह करण्यापेक्षा परिचयाच्या व्यक्तिशी विवाह करणे त्यांना सुरक्षित वाटले. हा विवाह केवळ परस्परांच्या पसंतीच्या मुद्द्यावर झाला होता. या विवाहाबद्दल पद्मिनी सेनगुप्ता लिहितात की, "जातिधर्माच्या पलिकडे जाऊन झालेला हा प्रेमविवाह होता."[६६]

पं.रमाबाईंचे चरित्रकार प्रभाकर दिघे लिहितात की, "रमाबाई व बिपीन बिहारी ह्या दोघांचा एकमेकांशी दाट परिचय झाला. दोघांना ऐकमेकांविषयी आकर्षण वाटू लागले. दृढपरिचय झाल्यावर एक दिवस बिपीन बिहारींनी त्यांना प्रेमपत्र लिहीण्याचे धाडस केले."[६७] बिपीन बिहारींनी पं. रमाबाईंना विवाहपूर्वी पाच प्रेमपत्रे पाठविल्याचे नमूद केले आहे. प्रत्युत्तरादाखल पं. रमाबाईंनी एक पत्र पाठविले होते. यावरुन दोघांची परस्पर संमती होती असे दिसते. म्हणून पं. रमाबाई व बिपीन बिहारी दास यांच्या एकोणिसाव्या शतकात झालेला प्रेमविवाह वैशिष्टपूर्ण होता.

**२) पं. रमाबाईंचा विवाह हा प्रौढ विवाह होता.**

विवाहाच्या वेळी पं. रमाबाईंचे वय २२ वर्षे होते. "बिपीनबिहारी यांच्या जन्म दिनांकाची निश्चित नोंद मिळत नाही. त्यांचा जन्म १८५२ ते १८५७ च्या दरम्यान झाला असावा."[६८] त्यानुसार बिपीनबिहारींचे लग्नाच्यावेळी वय २३ ते २९ वर्षे असावे. तत्कालीन समाजाच्या विवाहयोग्य वयाच्या समजूतीनुसार रमाबाई बऱ्याच प्रौढ होत्या. त्यांचे २२ वर्षे एकाकी अवस्थेत अविवाहीत राहणे हे अपवादात्मक होते. त्यामुळे हा विवाह प्रौढ विवाह होता.

**३) पं. रमाबाईंचा विवाह आंतरजातीय (Inter Caste Marrage) होता.**

पं. रमाबाई सनातनी कोकणस्थ चित्पावन ब्राह्मण जातीच्या होत्या. बिपीन बिहारी मेघावी यांच्या नेमक्या जातीविषयी संभ्रम आढळतो. "हिंदुस्थान स्टँडर्डमध्ये लिहिले आहे की, बिपीन बिहारी हरिजन होते. 'शतजीवनी' पुस्तकारत म्हटले होते की, बिपीन बिहारी जातीने सुत्रधार होते. 'साहित्य संवाद' नावाच्या पत्रिकेत म्हटले होते की, महाराष्ट्रीय ब्राह्मण कन्या रमाबाईने एका शूडीशी विवाह केला."[६९] देवदत्त नारायण टिळक यांच्या मतानुसार बिपीन बिहारी हे हरिजन, सूत्रधार किंवा शूडी ह्यापैकी कोणीही नव्हते. ते साहा (शहा) जातीचे होते. बंगाल डिस्ट्रिक्ट गॅझेटमध्ये साहा जातीचा उल्लेख 'Lower Caste' असा केला आहे. (पृ. क्र. २९) पं. रमाबाईंचे चरित्रकार एम. संतोषकुमार लिहितात की, "Bipin was from the Sudra community."[७०]स्वत: पं. रमाबाई 'माझी साक्ष' मध्ये नमूद करतात की, "एका शुद्र जातीच्या बंगाली सभ्य गृहस्थाशी मी लग्न केले."[७१]

पं. रमाबाई व बिपीन बिहारी यांची जात भिन्न होती. त्यामुळे हा विवाह आंतरजातीय होता. एकोणिसाव्या शतकामध्ये पं. रमाबाईंनी आंतरजातीय विवाह केला. हा त्यांचा निर्णय धाडसी होता.

**४) पं. रमाबाईंचा विवाह आंतरप्रांतीय होता.**

पं. रमाबाईंच्या डोंगरे घराण्याचे मूळ महाराष्ट्रात आहे. त्या चित्पावन ब्राह्मण होत्या. "चित्पावनांची एकंदर ३०० उपनावे आहेत.त्यात डोंगरे हे एक आहे. कित्येक वर्षापूर्वी चित्पावनी घराण्यातील लोकांनी कोंकण सोडून दक्षिण कन्नडमध्ये वस्ती केली."[७२] बिपीनबिहारी दास मेधावी हे मूळचे बंगाली होते. बंगाल प्रांतातील करीमगंज उपविभागातील मथ्यातिकान्दी हे त्यांचे मूळ गाव होते. रमाबाई व मेधावी हे भिन्न प्रांतीय होते. त्यामुळे त्यांचा विवाह आंतरप्रांतीय होता.

**५) पं. रमाबाईंचा विवाह नोंदणी पध्दतीचा होता.**

"१३ जून १८८० रोजी रमाबाईंचे लग्न सिल्हेट कोर्टातील वकील बिपीन बिहारीदास मेधावी यांच्याशी बांकीपूर रजिस्ट्रारपुढे रजिस्टर पध्दतीने नोंदविण्यात आला."[७३] तत्कालीन समाजात नोंदणी पध्दतीने केलेले विवाह शास्त्र संमत मानत नसत.

पं. रमाबाई व बिपीनबिहारी दास यांनी नोंदणी पध्दतीने विवाह का केला असेल असा प्रश्न पडतो.

या दोघांचा विवाह आंतरजातीय व आंतरप्रांतीय होता. या विवाहाला समाज मान्यता मिळणार नव्हती.याची जाणीव दोघांना होती. त्यांनी समाज मान्यता झुगारुन नोंदणी पध्दतीने विवाह करुन शासन मान्यता मिळविली.त्याकाळी नोंदणी विवाह फारसे होत नव्हते.या बद्दल पं.रमाबाई लिहितात "त्यांचा आणि माझा हिंदू धर्मावर अगर ख्रिस्ती धर्मावर मुळीच विश्वास नव्हता. म्हणून आमचे लग्न सिव्हील मॅरेज कायद्याप्रमाणे झाले."[७४] पं.रमाबाईंनी हिंदू धर्माची बंधने झुगारली रुढीबद्धता नाकारली. विवाह नोंदणीचा आधुनिक दृष्टिकोन बाळगला.

**६) पं. रमाबाईंचा विवाह प्रतिलोम विवाह (Cross Caste Marrage) होता.**

'प्रतिलोम' या शब्दाचा अर्थ उलटा, विपरीत असा होतो. प्रतिलोम विवाह म्हणजे "उच्च वर्णाच्या स्त्रीचा हलक्या वर्णाच्या पुरुषाशी झालेला विवाह."[७५] पं.रमाबाई उच्च वर्णीय होत्या. बिपीन बिहारी दास शुद्र जातीचे होते. या संदर्भातील खुलासा मागील पृष्ठावर दिला आहे. त्यामुळे त्याचां विवाह प्रतिलोम विवाह होता.

पं. रमाबाईंनी लग्नाचा निर्णय विचारपूर्वक घेतला होता. त्यांचा आंतरजातीय विवाहाचा निर्णय धाडसी होता. खरे तर अनेक उच्च विद्याविभूषित तरुणांकडून लग्नासंदर्भातील मागण्या

रमाबाईंना येत होत्या पण अपरिचित माणसाशी लग्न करुन धोका पत्करण्यापेक्षा आपली मते, ध्येय ज्याला माहित आहेत अशा परिचयाच्या सुशिक्षित व्यक्तिशी विवाह करणे रमाबाईंना योग्य वाटले असावे. “पैसा, सुरक्षितता, आराम ह्यांच्या बदल्यात आपले स्वातंत्र्य व करिअर गोठविण्याची त्यांची इच्छा नव्हती.”[७६]

### ३.६.१ पं. रमाबाई व बिपीनबिहारी दास मेधावी यांच्या विवाहाच्या दिनांकाविषयी मतभिन्नता :

१) पं. रमाबाईंचे चरित्रकार द. ना. टिळक यांनी महाराष्ट्राची तेजस्वीनी पं. रमाबाई या पुस्तकात “१३ जून १८८० रोजी रमाबाईंचे लग्न बांकीपूर येथील रजिस्ट्रारपुढे श्री. बिपीनबिहारी दास यांच्याबरोबर रजिस्टर पध्दतीने नोंदविण्यात आले.”[७७] अशी विवाहाच्या दिनांकासंबंधी नोंद आहे.

२) प्रबोधनकार ठाकरे यांनी पंडिता रमाबाई सरस्वती या चरित्रग्रंथात पं. रमाबाईंचा विवाह “ऑक्टोबर १८८०”[७८] मध्ये झाला असा उल्लेख आहे.

३) एम. संतोषकुमार यांनी ‘What one woman can do : A life of Pandita Ramabai’ हा चरित्रग्रंथ लिहीला. त्यामध्ये पं.रमाबाईंच्या विवाहसंदर्भात पुढील नोंद आहे. “They got married on 13$^{th}$ September 1880 according to the civil law.”[७९]

४) महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्राचे शिल्पकार ही चरित्र मालिका प्रकाशित केली. या चरित्र मालिकेत पं. रमाबाईंचे चरित्र प्रकाशित केले. हे चरित्र डॉ. सिसिलिया कार्व्हालो यांनी लिहिले. या चरित्रात पं. रमाबाईंचा विवाह “१३ जून १८८०”[८०] असा उल्लेख आहे.

५) पं. रमाबाईंचे चरित्र पभाकर दिघे यांनी लिहिले. ते सरस्वती या चरित्रामध्ये “पं. रमाबाईंचा विवाह १३ जून १८८० रोजी झाला”[८१] असे लिहितात.

६) पं. रमाबाई स्वत:च्या विवाहाबद्दल १ नोव्हेंबर १८८३ च्या पत्रात लिहितात की, “In the year 1880, when we were in Dacca. My brother died, and then I was alone in the world. Six month after, I Married a Bengalee gentleman.”[८२]

पं. रमाबाईंचे बंधू श्रीनिवासशास्त्री यांच्या मृत्यूची बातमी १० जून १८८० च्या ज्ञानोदयमध्ये छापली होती. ज्ञानोदयकार लिहितात, “प्रख्यात विदुषी रमाबाई हिचे बंधू श्रीनिवास शास्त्री हे बंगाल्यास १५ मे १८८० रोजी स्वर्गस्थ झाल्या कारणाने रमाबाई तुर्त

परदेशात एकाकिनी अशी मोठ्या पेचात पडली आहे."[८३]श्रीनिवास शास्त्रींच्या मृत्यूनंतर सहा महिन्यांनी विवाह केला असे पं. रमाबाई १ नोव्हेंबर १८८३ च्या पत्रात स्वत: नमूद करतात. यावरुन पं.रमाबाईंचा विवाह हा ऑक्टोबर वा नोव्हेंबर १८८० मध्ये झाला होता असा तर्क करता येतो. तसेच ११ नोव्हेंबर १८८० च्या ज्ञानोदयच्या अंकात पं. रमाबाईंच्या विवाहास पाठिंबा देणारा मजकूर छापला होता. ज्ञानोदयकार लिहितात, "रमाबाई इतकी सुधारलेली असेल, असे आम्हास वाटत नाही. इतक्यावर तिने सदरहूप्रमाणे बाबू हे ब्राह्मण जातीचे नाहीत तरी विद्वान व योग्य आहेत असे पाहून त्याजशी शरीरसंबंध केला असेल, तर ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे."[८४] वरील नोंदीवरुन पं.रमाबाईंचा विवाह ऑक्टोबर वा नोव्हेंबर १८८० मध्ये झाला होता असा तर्क करता येईल.

पं. रमाबाई व बिपीन बिहारी यांना एक कन्यारत्न झाले. तिचे नाव मनोरमा होते."तिचा जन्म ईस्टरच्या पूर्वरात्री म्हणजे शनिवार ता. १६ एप्रिल १८८१ रोजी झाला."[८५] पं.रमाबाईंच्या लग्नानंतर अकरा महिन्यांनी मनोरमेचा जन्म झाला होता. त्यानुसार त्यांच्या विवाहाचा दिनांक १३ जून १८८० असावा असा तर्क करता येतो.

"After 19 months of blissful married life, her husband died of Cholera, at the age of thirty on 4 Fabruary 1882."[८६]या नोंदीवरुन बिपीन बिहारीदास यांच्या मृत्यूच्या दिनांकावरुन तर्क करता येतो की, पं. रमाबाईंचा विवाह सप्टेंबर १८८० मध्ये झाला असावा. वरील सर्व नोंदीवरुन पं. रमाबाईंच्या विवाहाच्या दिनांकाविषयी भिन्न नोंदी आढळतात. दे. ना. टिळक यांचे वडील नारायण टिळक हे पं. रमाबाईंचे समकालीन होते. ते मुक्ति मिशनच्या कार्यात सहभागी होते. त्यामुळे दे. ना.टिळकांचाही पं. रमाबाईंच्या कार्याशी प्रत्यक्ष संबंध आला होता. म्हणून त्यांनी नमूद केलेला १३ जून १८८० हा दिनांक अधिक सत्य वाटतो.

### ३.६.२ पं. रमाबाईंचे वैवाहिक जीवन :

पं. रमाबाई व बिपीन बिहारी दास यांचा आंतरजातीय विवाह होता. तो सामाजिक विद्रोह होता. त्यांच्या लग्नामुळे समाजात मोठी खळबख उडाली. या संदर्भात जोत्स्ना देवधर लिहितात की, "बाईंच्या लग्नाची बातमी येऊन थडकताच कित्येक देव्हाऱ्यातले देव पारोसे

राहिले."[८७] पं.रमाबाईंचे लग्न समाजाने स्विकारले नाही. सनातन्यांना हा विवाह धार्मिक बंड वाटले.

लग्नानंतर त्यांचे सिल्चर येथे वास्तव्य होते. बिपीन बिहारी दास वकिलीसाठी दिवसभर बाहेर असत. पं. रमाबाई आपला बराचसा वेळ वाचनात घालवत असत. बिपीन बिहारी दास यांचा छोटासा पुस्तक संग्रह होता. या संदर्भात पं. रमाबाई आत्मचरित्रात लिहितात. "आमच्या पुस्तकालयात एक लहान पुस्तक मला सापडले... ते घेऊन मोठ्या आवडीने वाचावयास सुरुवात केली. ते बंगाली भाषेतील ल्युकाचे शुभवर्तमान होते. सिल्चरमध्ये श्री. ॲलन नावाचे मिशनरी राहत होते. ते निरनिराळ्या प्रसंगी आमच्या घरी येऊन आम्हाला शुभवर्तमान सांगत असत."[८८]हिंदू पुराणे व शास्त्रे यापेक्षा बायबलच्या उत्पत्तीच्या कथा वेगळ्या आहेत असे पं.रमाबाईंना जाणवले. त्यांचा हिंदू धर्मावरील विश्वास डळमळीत व्हायला लागला.त्यांनी ख्रिस्ती घेण्याची ईच्छा व्यक्त केली. "बिपीन बिहारी दास यांना ख्रिस्ती म्हणवून घेणे पसंत नव्हते. शिवाय तुच्छ मानलेल्या ख्रिस्ती समाजात जाहिर बाप्तिस्मा घेऊन आपल्या पत्नीने प्रवेश करणे हे त्यांना त्याहून अधिक नापसंत होते."[८९] त्यांनी रेव्ह. ॲलन यांना घरी येण्याचे बंद केले.

वरील प्रसंगातून पं. रमाबाईंची सत्य शोधनाची तळमळ दिसून येते. पती सोबत त्या सुखासीन जीवन जगत होत्या. पत्नी धर्माचे पालन करीत होत्या. मात्र एक स्त्री म्हणून त्यांना दुय्यमत्व स्विकारलेले दिसत नाही. धर्मांतराची ओढ तीव्र झाली असती तर त्यांनी वैवाहिक बंधन झुगारले असते, असे पुढील वाक्यातून स्पष्ट होते. त्या लिहितात, "ते आणखी जगले असते तर काय झाले असते ते मला सांगता येत नाही."[९०] या काळात त्या नव्या धर्माच्या शोधात होत्या. स्त्रीजीवन सुसह्य करणारी धर्मतत्वे असणाऱ्या धर्माचा शोध घेत होत्या.

वरील प्रसंग वगळता त्यांच्या वैवाहिक जीवनात मतभेद झाल्याची नोंद नाही. "पं. रमाबाई पतीला बी–बी नावाने हाका मारीत असत."[९१] हे त्यांच्या पुरोगामी विचाराचे दर्शक होते. बी–बी म्हणजे बिपीन बिहारी या नावाची अद्याक्षरे होती. पं. रमाबाईंच्या वैवाहिक जीवनाचा अंत अवघ्या १९ महिन्यांमध्ये झाला. "४ फेब्रुवारी १८८२ रोजी बिपीन बिहारी दास मरण पावले."९२ Asiatic Chollera ने त्यांचा बळी घेतला. त्यावेळी मनोरमेचे वय अवघे १० महिने होते.

बिपीन बिहारी यांना जातिबहिष्कृत केले होते. त्यामुळे त्यांच्या अंत्य विधीसाठी कोणी आले नाही. "महाप्राण श्रीराम हरिचरणदास बहादूर यांच्या मदतीने शवाची व्यवस्था झाली. अशा प्रकारे आपल्या आयुष्यातील अत्यंत प्रिय अशा वडील, आई, बहीण, भाऊ, पती यांच्या अंत्यविधीचे दारुण सोहळे रमाबाईंना बघावे लागले."[९३]

त्यांच्या वैवाहिक जीवनाविषयी प्रबोधनकार ठाकरे लिहितात, "रमाबाईंचा हा वैवाहिक संस्कार दुर्दैवाने औट घटकेचा बुडबुडाच ठरला."९४ सरोजीनी वैद्य लिहितात,"खरं तर आपल्या नशिबात संसार सुख नाही असे वाटून रमाबाई जन्मभर अविवाहीत राहण्याच्या विचारात होत्या. पण विचारास बाधा येण्या पुरताच त्यांना संसार सुखाचा लाभ घडला."[९५]

पती निधनाने पं. रमाबाई एकाकी पडल्या. त्यांच्यावर मनोरमेची जबाबदारी होती. वयाच्या चोविसाव्या वर्षी त्या विधवा झाल्या होत्या. सनातनी मंडळींनी त्यांच्या वैधव्याविषयी विपरीत तर्क काढले. "ब्राह्मणाच्या मुलीने शुद्राशी विवाह केल्याबद्दल देवाने छान प्रायचित्त दिले."[९६] पं.रमाबाईंचा आंतरजातीय विवाह पापकर्मासारखे मानले व वैधव्य त्याची शिक्षा आहे असा प्रचार सुरु झाला. सनातनींनी त्यांच्या वैधव्याचा संबंध त्यांच्या शिक्षणाशी जोडला. पं. रमाबाई शिकलेल्या होत्या, म्हणून त्या विधवा झाल्या असा प्रचार सुरु झाला.

## ३.७ **पं. रमाबाईंचे महाराष्ट्रात आगमन** (सन १८८२) :

पति निधनानंतर पं. रमाबाई मनोरमेसह महाराष्ट्रात आल्या. त्या विधवा, निराधार होत्या. तरीही त्या खचून केल्या नाहीत. नव्या उमेदीने त्या स्त्री सुधारणा कार्याला लागल्या. धोंडो केशव कर्वे पं. रमाबाईचे समकालीन होते.ते थोर स्त्री उद्धारक होते.ते आपल्या आत्मवृत्तात पं. रमाबाईंच्या धीरवृत्तीचे व कर्तृत्वाचे कौतुक करतात. ते लिहितात, "वैधव्य प्राप्त होणे ह्याहून अधिक दु:खदायक प्रसंग हिंदू स्त्रियांच्या आयुष्यात नाही. ही गोष्ट कोणीही कबूल करील, पण शहाण्या स्त्रियांनी त्या प्रसंगाचा सुध्दा स्वत:च्या व इतरांच्या उन्नतीच्या कामी उपयोग करुन घेतला आहे. याचे एक ठळक उदाहरण पं.रमाबाई होत."[९७]

. ३१ मे १८८२ मध्ये पं.रमाबाई पुण्याला आल्या. पं. रमाबाईंना पुण्यास येण्याचे निमंत्रण प्रार्थना समाजातील सुधारकांनी दिले होते. या समाजाचे कार्य न्या. रानडे, डॉ. रामकृष्ण

भांडारकर, न्या. तेलंग इ. सुधारक करीत होते. न्या. रानडे व रमाबाई रानडे यांनी त्यांना मानसिक आधार दिला.

पुणे हे देशातील संक्रमणशील शहर होते. येथे सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ सुरु होती. समाजसुधारणेचे कार्य सुधारकांकडून घडून येत होते. पं. रमाबाईंच्या आगमनापूर्वीच स्त्री सुधारणा कार्याची सुरुवात पुण्यात झाली होती. मात्र ही चळवळ गर्भावस्थेमध्ये होती. समाजमनावर पारंपरिक विचारसरणीचा पगडा होता. स्त्री जीवनाशी निगडीत बालविवाह, विधवांची स्थिती, स्त्री शिक्षणाबाबत नैराश्य, विधवा पुनर्विवाहास विरोध, केशवपन, स्त्रियांचे अनारोग्य इ. समस्या समाजात होत्या.

पं. रमाबाईंच्या आगमनापूर्वी प्रार्थना समाजाचे स्त्री सुधारणा कार्य सुरु केले. मात्र ते मर्यादित चौकटीत होते. "त्या वेळेस पुण्यात बायकांची एक सभा भरत असे.ह्या सभेचा बोभाटा नव्हता."[९८] या सभेस बिनबोभाटी सभा म्हणत. पं. रमाबाईंनी या सभेमध्ये व्याख्याने दिली. रमाबाई रानडे लिहितात की, "पंडिताबाईंचे पहिले पुराण आमच्या घरी झाले. तेथून प्रत्येक आठवड्यात एकेकाच्या घरी पुराण व्हावे असे ठरले."[९९] याप्रमाणे त्यांची प्रबोधनपर व्याख्याने होत होती. पं. रमाबाईंची वक्तृत्वशैली उत्तम होती. त्यांच्या मोहक भाषणासंबंधी रमाबाई रानडे लिहितात, "आधीच पंडिताबाईंची वाणी अस्खलित व गोड असून विषय प्रतिपादन करण्याची शैली उत्तम. बोलत असताना श्रोत्यांचे मन आपल्या भाषणाकडे आकर्षण करुन घेण्याची त्यांची विलक्षण हातोटी होती. हे गुण त्यांच्यामध्ये असल्यामुळे शहरातील सर्व जुन्या व नव्या शिक्षणेच्छुक विद्वानांना पंडिताबाईंचे कौतुक व अभिमान वाटू लागला."[१००] त्यांची सुरुवातीची व्याख्याने म. गो.रानडे, लोकहितवादी, काशिनाथ बाळकृष्ण मराठे यांच्या घरी झाली होती.

पं. रमाबाईंनी स्त्री हक्कासंबंधी सामाजिक प्रबोधन केले. त्या पुराणातील घटना चिकित्सकपणे मांडत होत्या. "त्यांनी प्रार्थना समाजासमोर नारदाच्या एका श्लोकावर निरुपण केले. त्यात नारद व्यासांना परमेश्वरी अवतार म्हणतो याचा अर्थ सांगताना त्या म्हणतात, ईश्वराने यांच्या ठायी असाधारण सामर्थ्य ठेवले होते, इतकाच अर्थ घ्यायचा."[१०१] अशा प्रकारे चिकित्सकपणे पुराणातील घटनांचे विश्लेषण त्या करीत होत्या. त्या आपल्या व्याख्यानात सांगत, "पुरुषांना वाटते की, स्त्री त्यांची मालमत्ता आहे. धर्मशास्त्रात तर न स्त्री स्वातंत्र्यमर्हति असे म्हटले आहे. स्त्री ला या दास्यातून मुक्त करण्यासाठी माझे प्रयत्न आहेत. लोक म्हणतात

की, हे पुरुषांविरुध्द बंड आहे. त्यामुळे हे पाप आहे. परंतु मला वाटते, स्त्रियांविषयी पुरुषांचा असलेला संकुचित दृष्टिकोन आपण बदलत नाहीत आणि स्त्रिया स्वत:ला मुक्त करण्याचा प्रयत्न करीत नाहीत, तर हेच मोठे पाप आहे."[१०२] पं. रमाबाई स्त्री शिक्षणासंदर्भात ठाम भूमिका घेत होत्या. त्या स्त्री शिक्षणाच्या आड येणाऱ्या पुरुषी सत्तेला आव्हान देत होत्या. त्या सांगतात, "चोवीस तास बायकांनी काबाडकष्ट करावेत... एवढे करुनही कोठे काही चुकले की लाथबुक्यांशी गाठ असे जे जुलमी पुरुष त्यांच्या ताब्यात न राहता मोकळे व्हा!"[१०३] अशा विचारांमुळे पं. रमाबाईंची पुरुषी वर्चस्वास आव्हान देणारी स्त्री अशी प्रतिमा तयार झाली होती. पं. रमाबाईंनी स्त्रीशक्तीचे सामर्थ्य जागृत करण्याचा प्रयत्न केला. स्त्रीमुक्ती चळवळीमागील संकल्पना शंभर वर्षापूर्वी रमाबाईंच्या या बोलण्यात स्वच्छपणे प्रतिबिंबीत झालेल्या दिसतात. त्या व्याख्यानाद्वारे समाज शिक्षिकेची भूमिका पार पाडीत होत्या.

"पंडिताबाईंची व्याख्याने, पुराणे वगैरे जे काही होईल त्याच्या निमंत्रणपत्रिकेत एक अट नेहमी घातलेली असे, ती ही की, जे कोणी पुरुष व्याख्यानाला येतील यांनी आपली पत्नी, मुलगी, सून, बहिण, भावजय अशांपैकी आपल्या घरची स्त्रीबरोबर आणल्याशिवाय त्यांना रांगेत बसता येणार नाही."[१०४]

"एकदा अशी गोष्ट झाली की, केरो नाना छत्रे पं.रमाबाईंकडे गेले होते व त्याचवेळी सभेची वेळ झाली होती. ते पाठीमागच्या एका रिकाम्या बाकावर ऐकावयास बसले. व्याख्यानाचा विषय स्त्रीशिक्षण होता. पं. रमाबाईंनी केरोनानास घरची सून, मुलगी कोणी बरोबर आणली आहे का ?असे विचारले, नाही असे सांगताच यांनी त्यास उठावयास लावले."[१०५]

पं. रमाबाईंच्या या कृतीतून स्त्री शिक्षणाबद्दल किती आग्रही व ठाम होत्या हे दिसून येते. त्याकाळी सुधारक पुरुषवर्ग स्त्री शिक्षणाबद्दल बोलत असे. स्त्री शिक्षणाविषयी अनेक ठराव सभांमधून होत होते. या सभा केवळ पुरुषांच्या होत्या. स्त्रियांना सभेस जाणेस परवानगी नव्हती. "ज्या काळी स्त्रीशिक्षण व स्त्रियांनी सभा व्याख्यान आदीकरता घराबाहेर पडणे या वादग्रस्त बाब होत्या, त्याकाळी ही घटना खळबळजनक होती."[१०६] स्त्रियांना सभेत येता यावे. स्त्रियांचे उद्‌बोधन व्हावे, त्यांना स्वत:च्या प्रगतीची दिशा मिळावी. यासाठी पुरुषांसोबत घरच्या स्त्रियांनी यावे हा सभेपुरता नियम केला होता. लिंगसापेक्षवादी समाजामध्ये लिंगसमभावाची भावना रुजविण्याचा हा प्रयत्न होता.

पं. रमाबाईंच्या या नियमामुळे स्त्रियांची सभेसाठी येण्याची संख्या वाढली. स्त्रियांना स्त्रीशिक्षणाचे महत्व पटू लागले. स्त्रिया घराच्या चौकटीबाहेर पडल्या. सुधारणावादी विचारांच्या चर्चा सुरु झाल्या. स्त्रियांना समाजस्थितीचे भान येऊ लागले.

## ३.८ आर्य महिला समाजाची स्थापना :

"आर्य महिला समाजाची स्थापना १ मे १८८२ रोजी पुण्यात झाली."[१०७] पंडिता रमाबाईंचे पहिले संस्थात्मक कार्य होते. महिलांचे संस्था पातळीवरील हे पहिलेच संघटन होते. या संस्थेच्या स्थापनेविषयी रमाबाई रानडे लिहितात की, "प्रार्थना समाजाच्या जागेत आमची सभा होती.तिलाच जोडून पंडिताबाईंनी एक सभा स्थापन केली. तिला आर्य महिला समाज हे नाव दिले."[१०८] स्त्रियांचा उद्धार हे या समाजाचे प्रमुख उद्दिष्ट होते. पारंपारिक रुढी–परंपरेमुळे स्त्रियांवर होणारे अत्याचार दूर करणे हे ध्येय होते. स्त्रीशिक्षण व स्वावलंबनाचा पुरस्कार या समाजाने केला.

आर्य महिला समाजाची उद्दिष्टे तत्कालीन समाजाला पटली नाहीत. समाजसुधारणा क्षेत्रामध्ये पुरुषांची मक्तेदारी होती. "सुधारणेच्या प्रकल्पात एका स्त्रीचा शिरकाव व नेतृत्त्वाच्या दिशेने होणारी वाटचाल काहींना असह्य झाली."[१०९] पुरुषसत्ताक प्रांतामध्ये पं.रमाबाईंचे एक स्त्री म्हणून केलेल्या कार्याला उदारमतवादी पुरुषांनी पाठिंबा दिला होता. विरोधी पक्षाचा विरोध कायम होता. "महाराष्ट्रातील अडाणी बायकांना पंडिता बाईंपासून काहीच फायदा होण्यासारखा नाही."[११०] अशी टिका होत होती. पं. रमाबाईंच्या सुधारणा क्षेत्रातील कार्य सुधारणाविरोधी पक्षाकडून स्विकारले नाही. सुधारणा चळवळीचे नेतृत्त्व स्त्रीने करावे ही कल्पना त्यांना मान्य झालेली दिसत नाही. "स्वत: पंडिता रमाबाई या पंडिता आणि सुधारक असल्या तरी स्त्री असल्यामुळे समाज सुधारणेत त्यांनी ढवळाढवळ करणे सुधारणा विरोधी पक्षाकडून अप्रशस्त समजले जात होते."[१११] पं.रमाबाईंना समाज सुधारणेचे नेतृत्त्व करणे किती अवघड होते हे लक्षात येते. एका स्त्रीचे नेतृत्त्व स्विकारण्याची मानसिकता तत्कालीन समाजाची दिसत नाही.

### ३.८.१ आर्य महिला समाजाचे उद्देश व नियम :

"३० एप्रिल १८८२ रोजी पुण्यात फडतरे वाड्यात स्त्रियांची सभा घेऊन पं. रमाबाईंनी आर्य महिला समाजाची स्थापना करण्यामागचा हेतू व नियम स्पष्ट केले."[११२]

आर्य महिला समाजाचे उद्देश व नियम याचे सविस्तर लेखन टिळक दे. ना. यांच्या महाराष्ट्राची तेजस्वीनी पंडिता रमाबाई या चरित्रग्रंथात स्वतंत्र परिशिष्ट क्र. ६ (पृ.क्र. ४८०, ४८१) जोडून केले आहे. ते पुढीलप्रमाणे दिले आहे.

१) आम्हां स्त्री वर्गाचा अभिलाप पूर्ण होण्याकरीता स्थापन केलेल्या ह्या समाजाचे नाव आर्य महिला समाज असे ठेविले आहे.

२) भारतवर्षातील सर्व सभ्य स्त्रियांवर फार दिवसांपासून चालत आलेल्या अंधपरंपरेच्या चालीप्रमाणे जे अत्याचार होत आहेत, त्यापासून स्त्रियांची मुक्तता होण्यासाठी आणि स्त्रियांचा धर्म, निती व व्यवहार वगैरेंची हल्ली असलेली शोषनीय स्थिती जावून पुढे त्याची उन्नती व्हावी याकरीता झटणे हे या समाजाचे दोन हेतू आहेत.

३) हिंदुस्थानच्याच रहिवाशी सर्व स्त्रिया या समाजाच्या मुख्य सभासद होतील.

४) विदेशीय स्त्रिया या समाजाचे सहाय्य करु इच्छितील त्या सहाय्य सभासद होतील.

५) कुलीन व सच्चारित्र अशा स्त्रियाच या समाजाचे सभासद पदी येऊ शकतील.

६) या समाजाच्याद्वारे होणारी सर्व कृत्ये व्यक्ती विशेषाची नसून सार्वजनिक आहेत. यास्तव ह्या समाजातील सभासदांनी काही विशेष आग्रह वा पक्षपात करु नये.

७) ह्या समाजात सर्व सभासदांचा सारखा अधिकार आहे.

८) या समाजाकडून जे काहीकार्य होणे ते सभ्य मंडळींपुढे त्याबद्दल काय तो निश्चय होऊन सर्वांची मते घेतल्यावर ज्या पक्षाला जास्ती सभासदांचे अनुमोदन आहे असे समजेल तोच पक्ष अवलंबन करण्यात येईल.

९) ह्या समाजाचे सभासद होण्यासाठी कमीत कमी दरवर्षी सहा रुपये वर्गणी दिली पाहिजे.

१०) ज्या स्त्रिया सधन असतील यांनी आपल्या शक्तीप्रमाणे वर्गणीबद्दल वा विशेष दान म्हणून जास्ती रुपये दिले पाहिजेत.

११) ज्या स्त्रिया अगदी गरीब असतील त्यांजपासून वर्गणीदाखल ३ रुपयांपेक्षा कमी घेतले जाणार नाहीत.

१२) सभासदांनी दिलेल्या वर्गणीपैकी खर्च वजा जाता बाकी राहिलेला पैसा समाजाच्या नावाने बँकेत ठेवला जाईल.

१३) या समाजाच्या सभासदांनी या सार्वजनिक कृत्यामध्ये पक्षपात किंवा दुराग्रह सोडून आमचा प्राण आहे. तोवर आम्ही आमच्याने होईल तितके सहाय्य करु अशी सर्व साक्षी परमेश्वरा व धर्माला स्मरुन प्रतिज्ञा केली पाहिजे.

१४) आपल्या प्रतिज्ञेच्या आणि समाजाच्या नियमांविरुध्द ज्या स्त्रिया आचरण करतील त्यांचे नाव सभासदांच्या यादीतून काढून घेतले जाईल."[११३]

आर्य महिला समाजाच्या वरील उद्‌देश व नियम यांची चिकित्सा केली असता असे लक्षात येते की, पं. रमाबाईंनी तत्कालीन समाज स्थितीच्या प्रभावाखाली या समाजाची स्थापना केली होती. सभासत्त्वासाठी भारतीय रहिवाशी असल्याची अट घातली. विदेशी आर्थिक मदतीची गरज असल्याची जाणीव दिसून येते. पं. रमाबाईंनी फक्त कुलीन व सच्चरित्र स्त्रियांनाच सभासत्त्व देण्याची अट घातली होती. मात्र पुढील काळात पं. रमाबाईंनी दुर्वर्तनी स्त्रियांच्या पुर्नवसनाचे कार्य केल्याचे दिसते. पं. रमाबाईंनी विवादात्मक स्थितीमध्ये निर्णय प्रक्रियेत लोकशाही पध्दतीचा अवलंब केला होता. या समाजाच्या यशासाठी आर्थिक सबलतेची गरज त्यांनी नमूद केली. या नियमावलीतून स्त्री उद्धारासाठीचे उद्देश स्पष्ट करतात.

### ३.८.२ आर्य महिला समाजाच्या कार्याचा आढावा :

"पुण्यामध्ये आर्य महिला समाजाच्या स्थापनेच्या पहिल्याच दिवशी १६ स्त्रिया सभासद झाल्या."[११४] प्रार्थना समाजाच्या वतीने दर रविवारी स्त्रियांची सभा भरत होती. ही सभा आर्य महिला समाजामध्ये विलीन झाली. आर्य महिला समाजाच्या मुंबई, सोलापूर, पंढरपूर,बार्शी, अहमदनगर येथे या समाजाच्या शाखा सुरु झाल्या. स्त्रियांसाठी विविध उपक्रम सुरु केले.

"स्त्रियांची स्वतंत्र उपासना केंद्र सुरु करण्यात आली. गरीबांसाठी मोफत दूध वाटप केंद्र, पंढरपूरचे बाल हत्या प्रतिबंधक गृह चालविणे तसेच राममोहन इंग्लिश स्कूल चालविणे यांसारखी कामे समाजाने सुरु केली. गरीब स्त्रियांसाठी मोफत औषधोपचार सुरु केला. स्त्रियांसाठी पतपेढी, उद्योग समूह, खरेदी विक्री केंद्र इ. उद्योग समाजातर्फे सुरु केले."[११५]

पं. रमाबाईंनी स्त्रियांसाठी स्वतंत्र पतपेढी सुरु करुन स्त्रियांच्या अर्थकारणाला चालना दिली. स्त्रियांसाठी उद्योग समूह स्थापन करुन त्यांना पारंपरिक चौकटीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. खास स्त्रियांसाठी मोफत औषधोपचार सुरु करुन स्त्रियांच्या आरोग्यविषयी जागरुकता निर्माण केली. सन १८८४ रोजी पुण्यात हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स ही मुलींची

शाळा स्थापन झाली. यासाठी अनुकूल पार्श्वभूमी आर्य महिला समाजाच्या कार्यातून तयार झाली होती. ह्या शाळेचे नामांतर हुजूरपागा असे झाले. हुजूरपागा शाळेने कतृत्त्ववान स्त्रियांची परंपरा निर्माण केली."डॉ. कृष्णाबाई केळवकर, द्वारकाबाई करमकर, डॉ. काशीबाई नवरंगे, वेणूताई नामजोशी, कमलाबाई देशपांडे, इरावती कर्वे, शकुंतला परांजपे, अनुसयाबाई काळे ह्या त्यापैकी प्रमुख स्त्रिया होत."[११६] या स्त्रियांनी सामाजिक, राजकिय, साहित्य क्षेत्रामध्ये महत्त्वाची कामगिरी केली.

## ३.९ हंटर कमिशनसमोरील साक्ष :

सन १८८२ साली लॉर्ड रिपनच्या सूचनेवरुन एक कमिशन नेमले होते. भारतातील शिक्षण पध्दतीची पुनर्रचना करण्याची जबाबदारी या कमिशनवर होती.

या कमिशनचे स्वागत आर्य महिला समाजाने केले. या कमिशनच्या स्वागतासाठी एक स्वागत समारंभ आयोजित केला होता. या समारंभात पं.रमाबाईंनी भाषण केले. या भाषणात १८८१ च्या खानेसुमारीतील आकडेवारीविषयी मते मांडली. "ब्रिटीश सत्तेखाली असलेल्या ९,९७,००,००० स्त्रियांपैकी केवळ ९९,५०० स्त्रिया साक्षर आहेत असे १८८१ च्या अहवालात म्हटले आहे. तसेच दोन लाख स्त्रियांना लिहीता वाचता येते असे नमूद केले आहे."[११७] पं.रमाबाईंनी या अहवालातील आकडेवारी वस्तुस्थितीला धरुन नसल्याचे सिध्द केले. "देशात दोन लाख स्त्रियांना लिहीता वाचता येते पण त्या स्त्रिया खरोखरच शिकलेल्या आहेत ही गोष्ट संशयास्पद आहे. कारण मुलींच्या शाळेत जाण्याचा काळ अवघा सात वर्षापासून नऊ वर्षापर्यंतचा आहे आणि नवव्या वर्षी त्यांना शाळेतून काढले जाते. एवढ्या अवधीत त्या मुलींना दोन तीन क्रमिक पुस्तकांचे वाचन, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार एवढा अभ्यास फार तर होऊ शकेल. एवढ्यावरुन दोन लाख स्त्रिया शिक्षीत झाल्या असे म्हणता येणार नाही."११८ वरील मत नोंदवून पं.रमाबाईंनी सरकारी अहवालालाच आव्हान दिले.

पं. रमाबाई साक्षरता या संकल्पनेचा विचार सर्वांगाने करताना दिसतात. केवळ अक्षर ओळख झाली म्हणजे साक्षरता हा विचार त्या नाकारतात. साक्षरता म्हणजे जाणीव जागृती हा आधुनिक विचार त्या व्यक्त करतात. १८८१ च्या खानेसुमारीच्या अहवालातील आकडेवारीवर त्यांनी आक्षेप घेतला होता.

५ सप्टेंबर १८८२ रोजी पं. रमाबाईंची हंटर कमिशनसमोर साक्ष झाली. "पं. रमाबाईंनी मराठीत दिलेली साक्ष सौ. मिचेल (रेव्हरंड मरे मिचेल यांच्या पत्नी व फीमेल ट्रेनिंग कॉलेजच्या मुख्याध्यापिका) यांनी इंग्रजीमध्ये भाषांतर करुन कमिशनपुढे मांडली. ही साक्ष टाईम्स ऑफ इंडियाच्या ७ सप्टें. १८८२ च्या अंकात प्रसिध्द झाली होती."[११९] Education commission (Bombay) Report 1882 च्या volume II मध्ये ही साक्ष नोंदविली आहे. त्या साक्षीचे मराठी भाषांतर पुढीलप्रमाणे–

"प्रश्न : १ भारतीय शिक्षण पध्दतीवर मतदान करण्यास त्या विषयाचा काय अनुभव मिळाला? तुम्ही कोणत्या भारतीय प्रांताविषयी सांगणार आहात ?"[१२०]

या प्रश्नाचे उत्तर देताना पं. रमाबाईंनी वडील, आई, बंधू व पती यांची शिक्षणविषयक पार्श्वभूमी स्पष्ट केली. वडिलांच्या स्त्रीशिक्षणविषयक कार्याचा अभिमान व्यक्त केला. स्त्रीशिक्षणासाठी आयुष्यभर काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

"प्रश्न : २ मुलींच्यासाठी शिक्षकांचा योग्य पुरवठा करण्याचा सर्वोत्तम मार्ग कोणता ?"[१२१]

या प्रश्नाचे उत्तर देताना पं.रमाबाईंनी पुढील मार्ग सुचविले.

१. "मुलींच्या शिक्षणासाठी स्त्री शिक्षिकांचीच नेमणूक करावी.
२. नेमणूक केलेल्या स्त्री शिक्षिका प्रशिक्षित असाव्यात.
३. त्यांना मातृभाषेचे व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.
४. स्त्री शिक्षिकांची नेमणूक कुमारीका, विवाहीत वा विधवा स्त्रियांमधून करावी.
५. स्त्रीशिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी शिष्यवृत्त्या देण्यात याव्यात.
६. मुलांच्या शाळेतील शिक्षकांपेक्षा मुलींच्या शाळेतील अध्यापिकांना अधिक पगार द्यावा.
७. कॉलेजच्या आवारातच विद्यार्थीनी व शिक्षिका यांच्या निवासाची सोय करावी.
८. वसतीगृहाची इमारत मोठी व सर्व तऱ्हेच्या उपकरणांनी सुसज्ज असावी.
९. मुख्याध्यापकाची एत्‌देशीय व सामाजिक दर्जा उच्च असलेल्या महिलेची नेमणूक करावी.
१०. मुलींच्या शाळेची पाहणी (इन्स्पेक्शन) करण्यासाठी पुरुषांऐवजी स्त्री निरीक्षक नेमाव्यात."[१२२]

वरील विचारांवरुन पं. रमाबाईंची स्त्री शिक्षणाविषयीची दूरदृष्टी दिसून येते. स्त्री शिक्षणातील अडथळे लक्षात घेऊन विविध मार्ग सुचविले.

"प्रश्न ३ आतापर्यंत तुम्ही दाखविलेत त्याखेरीज आणखी कोणते दोष सध्याच्या शिक्षण पध्दतीमध्ये तुम्हाला आढळले? व ते दूर करण्याचे कोणते मार्ग तुम्ही सुचवाल?"[१२३]

या प्रश्नाचे उत्तर देताना पं.रमाबाईंनी ऐतिहासिक सूचना केली होती. त्या म्हणतात, "हिंदुस्थानात स्त्री डॉक्टरांची अतिशय जरुरी आहे व ती उणीव दूर व्हावी. आमच्या देशाच्या स्त्रिया इतर देशांच्या स्त्रियांपेक्षा लाजाळू आहेत.आपल्या रोगासंबंधी एखाद्या पुरुषास काही सांगत बसण्यापेक्षा त्या जीव देणे पत्करतील म्हणून मी सरकारला विनंती करेन की, स्त्रियांना वैद्यकीय शिक्षण देण्याची व्यवस्था व्हावी. ह्या शिक्षणाच्या अभावी ह्या देशातील मोठी संख्या आज मृत्यूमुखी पडत आहे."[१२४]

पं. रमाबाईंची साक्ष क्रांतीकारी ठरली. काळाच्या पुढे जाणारे विचार त्यांनी मांडले. सन १८८२ मध्ये मांडलेल्या सूचना आजच्या काळातही महत्वपूर्ण आहेत. त्यांनी सूचविलेले विचार आजच्या शिक्षण व्यवस्थेचा भाग आहेत. एकविसाव्या शतकातील शिक्षण व्यवस्थेचे चिंतन त्यांनी एकोणिसाव्या शतकात राहून केले होते.

भारतीय स्त्रियांसाठी वैद्यकिय शिक्षणाची तरतूद करावी. हा विचार मांडणाऱ्या पं. रमाबाई या पहिल्या भारतीय होत्या. तत्कालीन काळात स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न प्रजननापुरताच महत्वाचा मानला जात होता. स्त्रियांच्या आयोग्याकडे लक्ष दिले जात नव्हते. पं. रमाबाईंच्या महिला डॉक्टरांचा प्रस्तावाला मोठा विरोध झाला. "आज आमच्या स्त्रियांना महिला डॉक्टरांची गरज नसून व्यवस्थित शिक्षण घेतलेल्या सुईणींची गरज आहे."[१२५] अशी प्रतिक्रिया सनातनी मंडळींनी दिली. "बंगाल देशातील भारतवर्षी ब्राम्हो समाजाचे पुढारी केशवचंद्र सेन ह्यांचे असे मत पडले की, स्त्रियांस विश्वविद्यालय (युनिव्हर्सिटी) मधून परीक्षा देण्याची सुध्दा मोकळीक नसावी आणि वैद्यक शिकल्याने स्त्रियांचे स्त्रित्व राहणार नाही."[१२६] अशा पुरुष सुधारकाकडून प्रतिक्रिया आल्या.

हंटर कमिशनचे कार्य शालेय शिक्षणाशी निगडीत होते. तरीही मि. हंटर यांना स्त्रियांच्या वैद्यकिय शिक्षणाचा प्रस्ताव त्यांना महत्वपूर्ण वाटला. मि. हंटर म्हणतात, "वैद्यकी हा विषय

साधारण विद्या शिक्षणात मोडत नसल्यामुळे त्याविषयी सरकारास ह्या मंडळींकडून आमच्याने सुचना करवणार नाही. परंतु मी घरगुती रीतीने ही गोष्ट वरीष्ठ सरकारापुढे आणीन."[१२७]

पं. रमाबाईंच्या साक्षीचा मि. हंटर यांच्यावर विलक्षण परिणाम झाला. "एडिन्बरोमध्ये मि. हंटर ह्यांनी 'रमाबाई व त्यांची कामगिरी' या विषयावर व्याख्यान दिले. हे व्याख्यान व्हिक्टोरीया राणीच्या वाचनात आले व त्यांनी भारतीय स्त्रियांच्या वैद्यकीय शिक्षणास चालना दिली. ह्यानंतर स्त्रीशिक्षण, स्त्री डॉक्टर व स्त्रियांसाठी दवाखाने त्यांचा भारतात उदय झाला."[१२८]

अशाप्रकारे पं. रमाबाईंच्या साक्षीमुळे भारतीय स्त्रियांच्या आरोग्याचा विचार सरकारने केला. त्यांच्या साक्षीचा परिणाम आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला. टिळक दे. ना. या संदर्भात म्हणतात, "कलकत्त्याने महाराष्ट्राला बाईंची ओळख करुन दिली तशी हंटर साहेबांनी इंग्लंडला त्यांची ओळख करुन दिली. नुसते इंग्लंडच नव्हे तर अमेरिकाही त्यांच्याविषयी आता वाचू-बोलू लागली."[१२९]

अशाप्रकारे हंटर कमिशन समोरील साक्ष पं. रमाबाईंच्या कार्याला कलाटणी देणारी ठरली. या साक्षीमुळे भारतात स्त्रियांच्या वैद्यकीय शिक्षणाचा नवा अध्याय सुरु झाला. या साक्षीमुळे प. रमाबाईंच्या भावी कार्याची पायाभरणी झाली असे म्हणावे लागेल.

## ३.१० इंग्लंडला जाण्याचा निर्णय :

पं. रमाबाईंच्या सामाजिक जीवनाची सुरुवात सन १८७८ मध्ये कलकत्ता येथे झाली. सन १८७८ ते सन १८८२ ही चार वर्षे त्यांचे वास्तव्य बंगालमध्ये होते. सन १८८२ ते एप्रिल १८८३ पर्यंत त्यांनी महाराष्ट्रामध्ये प्रबोधनाचे कार्य केले. २० एप्रिल १८८३ रोजी त्या इंग्लंडला गेल्या. पं. रमाबाई डॉक्टरकीचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेल्या होत्या. त्यांनी इंग्लंडला जाण्याचा निर्णय का घेतला? या प्रश्नाचे उत्तर शोधणे गरजेचे आहे.

सन १८८१ चा खानेसुमारीचा रिपोर्ट पं. रमाबाईंनी अभ्यासला होता. या रिपोर्टमधील सांख्यिकीय माहितीच्या आधारे त्यांनी हंटर कमिशनसमोर साक्ष दिली होती. या रिपोर्टमधील माहितीचा मोठा परिणाम त्यांच्यावर झाला. त्या रिपोर्टवरुन दिसून येते की, "हिंदुस्थानची त्या वेळची लोकसंख्या २८,९१,८७,३१५ इतकी होती. ह्यात लिहीता वाचता येणारे केवळ १,२०,९७,५३० एवढेच होते. २४ व्यक्तीत एक पुरुष लिहू वाचू शकत होता व ५३२ व्यक्तीत

एक स्त्री लिहू वाचू शकत होती. साऱ्या हिंदुस्थानात साक्षर स्त्रियांची संख्या केवळ ५,४३,४९५ होती. सरासरी एकोणतीस कोटीत २,३०,००,००० विधवा होत्या. त्यातील पाच ते नऊ वर्षातल्या ५१,८७५ होत्या तर चार वर्षाखालील १०,१६५ होत्या."[१३०]

ह्या आकडेवारीवरुन भारतात स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी होते असे दिसून येते. विधवा स्त्रियांची संख्या जास्त होती. बालविधवांची संख्याही मोठी होती. पं. रमाबाईंना या आकडेवारीमुळे स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्याची गरज वाटली. विधवांच्या दुर्दैवी स्थितीमध्ये बदल घडून येण्याची आवश्यकता भासली. यातूनच त्यांनी हिंदू विधवांसाठी आश्रम सुरु करण्याची कल्पना मांडली. त्यावेळी त्यांना कोणी मदत केली नाही. पं. रमाबाई इंग्लंडला जाण्याच्या निर्णयाबद्दल लिहितात की, "हिंदु विधवांच्या वसतिगृहाचा एक आराखडा तयार करुन तो आपल्या देशबांधवांपुढे मांडावा असे एक मोठे जोराचे विचारचक्र माझ्या डोक्यात फिरु लागले. ह्या कामासाठी कोठून काही मदत मिळते का? हे पाहण्यासाठी मी सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ खटपटीत घालवला. पण मला काही यश आले नाही. मग असा विचार डोकावू लागला की आपल्या ह्या गरीब भगिनींसाठी काही करायचे तर स्वतःच डॉक्टर होऊन का नाही त्यांना सहाय्य करु? काही मार्ग जर उघडला तर त्यासाठी इंग्लंडला ही जाण्याची माझी तयारी होती."[१३१] पं. रमाबाईंच्या विधवाश्रमाच्या कल्पनेला पाठिंबा मिळाला असता तर वैद्यकिय शिक्षण घेण्याचा विचार त्यांनी केला नसता. त्यांनी हंटर कमिशनपुढे स्त्रियांच्या वैद्यकिय शिक्षणाची मागणी केली होती. स्वतःचा विचार स्वतःच कृतीत आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

त्याकाळी मद्रासमध्ये वैद्यकीय शिक्षणाची सोय होती. तरीही पं.रमाबाईंनी डॉक्टर होण्यासाठी इंग्लंडला जाण्याचा निर्णय घेतला. या संदर्भात त्या लिहितात, "मद्रास मेडीकल कॉलेजात शिकावे तर मला माझ्या देशभगिनींच्या उपयोगी पडण्यास जितके ज्ञान पाहिजे तितके मद्रासेत नाही... लंडन युनिव्हर्सिटीची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा हिंदुस्थानातील मॅट्रीक्युलेशनपेक्षा सुलभ आहे. तेथे राहून ती परीक्षा मी सव्वा किंवा दोन वर्षात देऊ शकेन अशी मला उमेद आहे.परंतु हिंदुस्थानात राहून चार वर्षांनीही मला ही परीक्षा देण्याची शक्ती आली नसती."[१३२]

इंग्लंडमध्ये वैद्यकीय शिक्षण कमी वेळेत होऊ शकेल असा विचार त्या करताना दिसतात. तेथील उत्साहवर्धक वातावरणात त्या लवकर वैद्यकीय पदवी मिळवू शकतात असा

विश्वास त्या व्यक्त करतात. या संदर्भात त्या लिहितात, “या उत्तेजक देशात हिंदुस्थानपेक्षा अभ्यास जास्त वेळ करता येतो. कारण हा मुलूख थंड असल्याकारणाने सतत बारा तास मेहनत केली तरी थकवा येत नाही. परंतु अशी मेहनत हिंदुस्थानसारख्या उष्ण मुलूखात माझ्यासारख्या मनुष्याच्याने कदापि व्हायची नाही.”[१३३]

थोडक्यात वैद्यकीय शिक्षण पूर्ण करण्यासाठी इंग्लंडमध्ये अनुकूल परिस्थिती होती. ह्याचा अभ्यास केल्यामुळे त्यांनी इंग्लंडला जाण्याचा निर्णय घेतला.

पं. रमाबाईंनी इंग्लंडला जाण्याचा निर्णय घेण्यामागे एक तात्कालिक कारण सांगितले जाते. त्याच सुमारास त्यांच्याकडे एक बालविधवा आली होती. या घटनेविषयी एम्. संतोषकुमार लिहीतीत की, “In 1882, Godubai a twelve years old widow, her head shaven, was brought before pt. Rambai who took her up. Godubai had been married at five years and her husband had died a few days after marriage. she had undergone untold mental torture at the hands of her mother-in-law. her mother-in-law had accused her of eating up her son and of being a great de mon.”[१३४]

वरील घटनेने विधावाश्रम सुरु करण्याची कल्पना तीव्र झाली. या कल्पनेला मूर्त रुप देणे भारतात शक्य नव्हते. म्हणून त्यांनी इंग्लंडला जाण्याचा निर्णय घेतला.

**३.१०.१ इंग्लंडला जाण्याच्या निर्णयाची चिकित्सा :**

त्याकाळी इंग्लंडला जाणे ही सोपी गोष्ट नव्हती. देशांतर व परदेशगमन याचा संबंध धार्मिक गोष्टींशी जोडला होता. “समुद्र उल्लंघन करणे ही गोष्ट त्या काळी धर्मबाह्य मानली जात होती. देशांतर करणाऱ्या व्यक्तीवर बहिष्कार घातला जाई.”[१३५] देशांतरामुळे व्यक्तीचे सामाजिक अस्तित्व धोक्यात येत असे. हिंदू लोकांनी परदेशात जावू नये ही हिंदूंची मानसिकता होती.

पं. रमाबाई स्वतंत्र विचारांच्या होत्या. इंग्लंडला जाण्याचा निर्णय त्यांनी स्वतंत्रपणे घेतला होता. देशांतरांच्या निर्णयामुळे होणाऱ्या परिणामांची त्यांना जाण होती. त्या परिणामांची फिकीर करताना त्या दिसत नाहीत. पं. रमाबाई या संदर्भात लिहितात, “इग्लंडला जाण्याची तीव्र इच्छा माझ्या मनात होती. समुद्र उल्लंघन करणे ही गोष्ट एका हिंदू स्त्रीच्या दृष्टीने फार भयंकर होती. ती करणे म्हणजे स्वतःला स्वतःच्या समाजापासून तोडून टाकण्यासारखेच होते.”[१३६]

पं. रमाबाईंना इग्लंडला जाण्याचा निर्णय तत्कालिन समाजव्यवस्थे विरुध्दचे बंड होते. यावरुन त्यांच्या कणखर मानसिकतेचा प्रत्यय येतो. प्राच्यविद्या विशारद प्रो. मॅक्समुल्लर म्हणतात की, “रमाबाईचा देशांतराचा निर्णय हा नेपोलियनच्या रशिया स्वारी निर्णयापेक्षा अधिक धैयाचा होता.”[१३७]

पं. रमाबाईंच्या निर्णयामुळे त्यांच्या मित्र मंडळीमध्ये व विरोधकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. त्यांच्या प्रवासाला हरकती घेणारी पत्रे आली. त्यापैकी काही हरकतींना उत्तरे त्यांनी इंग्लंडचा प्रवास या पुस्तकामध्ये दिली आहेत.

पं. रमाबाईंनी इंग्लंडला जावू नये याची खालील कारणे विरोधक देतात.

१. प्रकृतीची अशक्तता व मुलगी लहान आहे.

२. पं. रमाबाईंना इंग्रजी येत नाही.

३. पं. रमाबाई इंग्लंडला गेल्यावर आर्य महिला समाजाचे कार्य बंद होईल.

४. ख्रिश्चन लोकांच्या सहवासात राहणे योग्य नाही.

५. इंग्लंडसारख्या चैनबाजीच्या मुलूखात ह्या तरुण वयात जाणे धोक्याचे आहे.

६. त्या देशाची माहिती नसून तेथे अपाय होण्याचा धोका आहे.

पं. रमाबाई वरील हरकतींना उत्तर देताना लिहितात की, “आज सुमारे आठ वर्षांपासून सतत प्रवासात माझे आयुष्य गेले असून शेकडो ठिकाणचे हवापाणी माझ्या प्रकृतीला मानवले आहे आणि सुमारे २००० मैल काही एक वाहन नसताना पायांनीच प्रवास केल्याने शीतोष्णसहिष्णुताही माझ्या अंगी आहे. सतत मित भोजन व मिताचार असल्याने सहसा रोग होण्याचे भय नाही... या प्रवासात मुलीच्या प्रकृतीचा बराच परिचय झाला आहे. त्यावरुन तिला येथील हवा मानवणार नाही असे वाटत नाही.”[१३८] इंग्लंडमधील प्रतिकूल हवामानाचा दोघींवर परिणाम होणार नाही असे त्या ठामपणे सांगतात.

त्यांना इंग्रजी येत नाही हा आक्षेप त्या खोडून काढतात, त्या बहुभाषी भारतात फिरल्या होत्या. अनेक प्रांताची भाषा वेगळी होती. अशावेळी त्यांनी स्थानिक भाषा आत्मसात करुन भाषिक व्यवहार केला होता. त्यामुळे इंग्लंडची भाषा अपरिचित असली तरीही ती प्रयत्नपूर्वक शिकण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

आर्य महिला समाजविषयीच्या आक्षेपाला त्या उत्तर देतात की, "आर्य महिला समाज म्हणजे एके ठिकाणी आहे असे नाही. सर्वच ठिकाणी मी हजर राहू शकत नाही. समाज स्थापन करण्यासाठी लोकांपाशी विनंती करणे हे माझे काम आहे. परंतु चालु करणे आणि त्याची उन्नती करणे हे प्रत्येक सभासदाचे काम आहे."[१३९] समाज चालविण्याची जबाबदारी सभासदांची आहे असे त्या सांगतात.

विरोधकांना त्या इंग्लंडला जाऊन धर्मांतर करतील अशी भिती होती. याविषयी केसरी कार लिहितात की, "ते काही असले तरी बाई ख्रिस्ताला वश करुन न येवो म्हणजे झाले."[१४०] पं.रमाबाईंच्या धर्मांतराची भिती काशीबाई कानिटकर यांनी व्यक्त केली होती. त्या आपल्या आत्मचरित्रात लिहितात, "पं. रमाबाई युरोपला जायला निघाल्या तेव्हा आमच्या घरी भेटीला आल्या होत्या. मी त्यास सांगितले, तुम्ही हिंदू म्हणून युरोपला जाता, पण तशा परत याल अशी खात्री तुमच्याबद्दल देता येत नाही. त्यावर पंडिता रमाबाई म्हणाल्या, ही जशी माझी धर्मांतर करण्याची खात्री तुम्हाला वाटते, तशीच मीही प्रतिज्ञेवर सांगते की, मी ख्रिस्ती धर्म स्विकारणार नाही."[१४१]

इंग्लंडला जाते वेळी पं. रमाबाईंचे वय पंचवीस होते. ह्या तरुण वयात एकटीने इंग्लंडमध्ये गेल्यास अपाय होण्याची भिती विरोधकांना वाटत होती. या आक्षेपाला उत्तर देताना त्या भारतातील बालाजरठ विवाहाचे उदाहरण देतात.चैनीसाठी तरुण व वृध्द असा भेद नसतो. विशिष्ट प्रांताचेही बंधन नसते. हे त्या सप्रमाण सिध्द करतात. स्वत:च्या चारित्र्यावरील ठाम विश्वास व्यक्त करतात. "मलाह्या चैनबाजीच्या मुलूखातच माझ्या मनाची परीक्षा करायची आहे."[१४२] असा स्वत:च्या चारित्र्यावरील ठाम विश्वास त्या व्यक्त करतात.

पं. रमाबाईंच्या इंग्लंडला जाण्यामागील भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. भारतातील आध्यात्मिक व धार्मिक ज्ञान समाज सुधारणेसाठी उपयोगी नव्हते. त्यासाठी पाश्चात्य ज्ञानाची गरज त्यांना वाटू लागली.
२. पाश्चात्य व शास्त्रीय ज्ञान इंग्रजी भाषेत होते. ते भारतात व्यापक दृष्टीने मिळणार नव्हते. त्यासाठी इंग्लंडला जाण्याची गरज त्यांना वाटली.
३. स्त्री सुधारणेबाबत भारतीय समाज व सुधारकांकडून निराशा झाली होती.
४. त्यांना पाश्चात्य स्त्री सुधारणा चळवळींचे निरीक्षण करावयाचे होते.

५. त्यांना पाश्चात्य समाजस्थितीचा व त्यातील स्त्री जीवनाचा अभ्यास करावयाचा होता.

६. ख्रिस्ती धर्माविषयीचे आकर्षण इंग्लंडला जाण्यासाठी प्रेरीत करीत होते.

७. भारतातील सुधारणा चळवळीसाठी आर्थिक मदत मिळविण्याचा हेतू होता.

८. ख्रिस्ती धर्मांगिकाराची मानसिकता भारतातच तयार झाली होती. या मानसिकतेला मूर्त रुप देण्यासाठी त्या इंग्लंडला गेल्या.

९. इंग्लंडला जावून त्यांना वैद्यकीय शिक्षण घ्यायचे होते.

## ३.११ पं. रमाबाईंचे धर्मांतर :

दि. २९ सप्टेंबर १८८३ रोजी पं. रमाबाईंचा बाप्तिस्मा झाला. हा विधी वाण्टेज येथील चर्च ऑफ इंग्लंड मध्ये रेव्ह. कॅनन बटलर यांचे हस्ते झाला. इंग्लंडला आल्यानंतर अवघ्या पाच महिन्यात त्यांचे धर्मांतर झाले होते. वयाच्या पंचवीस वर्षापर्यंत त्या सनातनी हिंदू धर्माचे प्रतिनिधीत्व करीत होत्या. इंग्लंडमध्ये मतपरिवर्तन होऊन त्यांनी ख्रिस्ती धर्म स्विकारला होता. पं. रमाबाईंच्या धर्मांतराच्या कारणाचा शोध घेणे महत्वाचे आहे.

इंग्लंडमध्ये या ख्रिस्ती मठवासिनींच्या सहवासात राहत होत्या. तेथील भगिनींनी इंग्रजी भाषेचे व ख्रिस्ती धर्मतत्वांचे शिक्षण दिले. पं. रमाबाई फुलहॅम येथील पतिताश्रम बघायला गेल्या होत्या. तेथील स्त्री सुधारणेचे कार्य पाहून त्या प्रभावित झाल्या. या अनुभवाविषयी त्या लिहितात, “फुल्हॅम येथे पतित स्त्रियांसंबंधी चाललेले दयेचे काम पाहिल्यानंतर मला प्रथम हिंदू धर्म व ख्रिश्चन धर्म यातील फरक जाणवला. तिथल्या सिस्टर्सनी मला ख्रिस्ताला पतितांविषयी वाटणारे अथांग प्रेम त्यांच्या शब्दात समजावून सांगितले. स्त्रियांनी धरलेल्या चुकीच्या मार्गावरुन त्यांना कुणी वळविल्याचे मी कधीही ऐकले नव्हते. हिंदू धर्म ग्रंथ असल्या स्त्रियांच्या बाबतीत कोणताही दयेचा व्यवहार करीत नाही.”[१४३]

पं. रमाबाईनी फुलहॅम येथील रेसक्यु होम (अनाथालय) ला भेट दिली होती. “तेथे अनाथ, अपंग, टाकलेल्या, माथी फिरलेल्या, लुळ्या, पांगळ्या, रोगी, रक्तपित्या अशा शेकडो स्त्रिया पाहिल्या.”[१४४] तिथे त्यांची जोपासना केली जात होती. येशूची शिकवण प्रत्यक्ष कृतीत तेथे आणली जात होती. पं. रमाबाईंनी हिंदू धर्म व ख्रिस्ती धर्माची तुलना केली. स्त्रियांविषयी दोनही धर्मांमध्ये असलेल्या दृष्टिकोनात भिन्नता आढळली.

फुलहॅम भेटीनंतर त्यांनी शोरोमनी स्त्रीची कथा ऐकली. शोरोमनी ह्या पतित स्त्रीचा येशू उध्दार करतो अशी ही कथा आहे. त्यांनी संत योहानाच्या शुभवर्तमानाचा चौथा अध्याय वाचला. त्याचा पं.रमाबईंवर परिणाम झाला की, "ख्रिस्त हा एक तारणहार असून भारतामधील अगर कोणत्याही देशांतील समाजाने पायाखाली दडवून टाकलेल्या स्त्रियांचा उध्दार करण्यास समर्थ आहे. स्वत:ची अशी खात्री पटल्यामुळे बाईंनी प्रेम, स्वार्थत्याग आणि सेवा यांचे मूर्तिमंत स्वरुप जो प्रभु येशू ख्रिस्त त्यांच्या चरणी मिठी मारली."[१४५]

पं. रमाबाईंवर ख्रिस्ताचा प्रभाव निर्माण करणारी व्यक्ती म्हणजे फादर नेहम्या गोऱ्हे होत. ते धर्मांतरीत ख्रिश्चन होते. पं. रमाबाई त्यांच्याविषयी लिहितात की, "त्यांच्याखेरीज इतर कोणालाही माझे मन ब्राम्हो धर्माकडून ख्रिश्चन धर्माकडे वळवता आले नसते."[१४६]फादर गोऱ्हेंनी हिंदूधर्म, ब्राम्हो धर्म व प्रार्थना समाज यांच्या मर्यादा स्पष्ट केल्या. "फादर गोऱ्हे तिच्यासाठी मराठीत जे पुस्तक लिहिले ते वाचल्यावर तिच्या अंत:करणात प्रकाश पडून सर्व संशयाची निवृत्ती झाली व ख्रिस्ती धर्म अंगीकारण्याविषयी तिच्या मनात एकदम निश्चय झाला."[१४७] पं.रमाबाई धर्मांतराविषयी लिहितात की, "बाबा गोरे (Father Goreth) यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या वाचनाकडून त्याच्या सत्याविषयी माझी बौद्धिक खात्री झाली आणि १८८३ च्या उत्तरार्धात चर्च ऑफ इंग्लंडमध्ये माझा बाप्तिस्मा झाला."[१४८] फादर गोऱ्हे यांच्यामुळे येशू प्रणित सेवा दयेचा ख्रिस्ती धर्म त्यांना समजला.

पं. रमाबाईंच्या धर्मांतराची पार्श्वभूमी ही त्यांनी अनुभवलेल्या हिंदू धर्मात होती. हिंदू धर्मसंबंधाने असलेल्या असमाधानी मन:स्थिती हे धर्मांतराचे कारण होते. हिंदू धर्मातील स्त्रिया व शुद्र यांचे कनिष्ठ स्थान हे असमाधनाचे कारण होते. हिंदू धर्माविषयी असमाधान व्यक्त करताना त्या लिहितात की, "हिंदू धर्मग्रंथांनी जे देऊ केले होते त्यापेक्षा उत्तम अशा गोष्टीसाठी मी भुकेली होते. ते मला ख्रिस्ती पवित्र शास्त्रात मिळाले व माझे समाधान झाले."[१४९] पं.रमाबाईंच्या धर्मांतराची भूमिका स्पष्ट करणारे पत्र ज्ञानोदयकारांनी छापले होते. त्यात त्या लिहितात, "ज्याने ख्रिस्तीसारखा प्रौढ, विचाराने पूर्ण, सर्वांना समजण्याजोगा व जो पहिल्यापासून शेवटपर्यंत त्याचप्रमाणे वागला अशा एकातरी उपदेशकाचे उदाहरण हिंदूच्या कोणत्यातरी ग्रंथात पाहिलेली आठवते का?"[१५०] यावरुन हिंदू धर्माविषयी नाराजी स्पष्ट होते. तत्कालीन हिंदू धर्मापेक्षा कृतिशील, प्रेममय, ख्रिस्ती धर्म त्यांना समाधानकारक वाटला.

ख्रिस्ती धर्मातील 'स्त्री–पुरुष समानता' हे त्यांच्या धर्मांतरामागील एक कारण आहे. पं. रमाबाई माझी साक्षमध्ये स्पष्टपणे लिहितात की, "माझा बाप्तिस्मा झाल्यावर मी सुखावले होते. कारण मला असे वाटत होते की, पुरुष आणि स्त्रिया यांना सारखेच हक्क देणारा धर्म मला सापडला. त्यात जाती, वर्ण किवा लिंग असा काही भेद नव्हता."[१५१] ख्रिस्ती धर्मात स्त्री–पुरुष समानता होती. जी हिंदू धर्मशास्त्रात त्यांना आढळली नाही. पं.रमाबाईंच्या धर्मांतराची दोन उद्दिष्टे ठळकपणे जाणवतात. भारतीय स्त्रियांच्या उद्धारासाठी बळ व दिशा ख्रिस्ती धर्मांच्या आश्रयाखाली मिळू शकेल याची खात्री त्यांना वाटली. म्हणून त्यांनी धर्मांतर केले. धर्मांतरामागे सत्याचा शोध हे महत्वाचे कारण होते.धर्मांतरानंतरही त्यांचा सत्याचा शोध थांबलेला दिसत नाही. त्यांचा ख्रिस्ती धर्मग्रंथांचा अभ्यास चालू होता. त्यांच्या इंग्लंडमधील वास्तव्यात पुस्तक खरेदीचा खर्च मोठा होता. त्या सिस्टर जिराल्डीन (आजीबाई) यांना १९ मार्च १८८५ रोजी लिहिलेल्या पत्रात कळवितात, "If you don't mind my buying books, you can send as much money as you can."[१५२]पं.रमाबाईंना ख्रिस्ती धर्माचे अनुकरण अंधपणे करणे नाकारले. तसेच क्रुसावर लॅटीन शब्द कोरण्यास विरोध केला. या संदर्भात त्यांनी ऑक्टो १८८४ ला आजीबाईंना लिहिलेल्यापत्रात स्पष्ट केले की, "If I must have cross, I should like to see Sanskrit words written upon it instead of the Latin words, more over, I do not myself understand the Latin, neighter (do) my country women (with some exception) And even also Latin is not the mother tongue of Marathi people. So our Indian sisters will not find a single word in it."[१५३]यावरुन सामान्य ख्रिस्ती माणसाच्या श्रध्दा व त्यांच्या श्रध्दा यात फरक जाणवतो. त्या ख्रिस्त शिकवण सर्वोत्तम मानतात. पं. रमाबाईंनी धर्मांतर वैचारिक पातळीवर केले होते. ख्रिस्ती धर्मातील मनाला पटणाऱ्या गोष्टी स्विकारल्या. "ख्रिस्ताचे उपदेशपर प्रवचन (Sermon on the mount) त्यांना मन:पूर्वक पटले होते, परंतु ख्रिस्त चरित्रातील निगडीत असलेले चमत्कार त्यांना मान्य नव्हते."[१५४]

पं. रमाबाईंनी ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे वर्चस्व नाकारले. ईश्वरइच्छा व पुरोहितांची इच्छा यात त्या फरक असल्याचे सांगतात. त्या १२ मे १८८५ रोजी सिस्टर जिराल्डीनला पाठविलेल्या पत्रात लिहितात की, "I am not bound to accept every word that falls down from the lips of priests or bishops."[१५५]

पं. रमाबाईंचा ख्रिस्ती धर्मपरंपरेतील प्रभु भोजनातल्या मद्यपानाला त्यांचा आक्षेप होता. या संदर्भात त्या म्हणतात की, “द्राक्षाचा रस घेणे वेगळे व त्यापासून सडविलेली दारु घेणे निराळे. कुजवलेले फळांचे रस ही देवाची निर्मिती आहे असे मला वाटत नाही.”[१५६] प्रभु भोजनविधी बाबत पं. रमाबाईंनी भारतीय पध्दत वापरली. याप्रसंगी धर्मगुरु वा मिशनरी पाव कापून त्याचे लहान लहान तुकडे करत. सोबत द्राक्षरस वा सौम्य मद्य घेत असत. पं. रमाबाईंनी यात बदल केला. “त्यांनी पावाच्या तुकड्याच्या जागी पोळीचे तुकडे आणि द्राक्षरस व मद्याच्या ऐवजी मनुका भिजत घालून व कुस्करुन तयार केलेले एक गोड पेय वापरण्यास सुरुवात केली.”[१५७]

पं. रमाबाईंनी धर्मांतरानंतरही आहार बदलला नाही. त्यांनी मूळचा शाकाहार सोडला नाही. त्याबद्दल सिस्टर जिराल्डीन यांच्याशी वाद घातला त्या १५ ऑक्टोबर १८८५ रोजी लिहिलेल्या पत्रात म्हणतात, “You have made the word ‘Pride’ almost meaningless by applying it to everything that you see in me. But it is not my buisness to judge you from what you say. You may if you like trace my pride in pies and puddings, butter and milk, water and rice, shoes and stockings and even in the enormous quantity of coals that I daily burn.”[१५८]

पं. रमाबाईंनी बाप्तिस्मा देण्याचा पारंपारिक विधी नाकारला. ख्रिस्ती धर्मांतराच्या वेळी कपाळावर वाटीतील पाणी लावतात व पवित्र वचनांचा उच्चार करतात. पं. रमाबाईंनी ख्रिस्ती धर्मांतरासाठी भारतीय पध्दत वापरली. “केडगावात धर्मांतराचा विधी करण्यासाठी रमाबाईंनी एक लहान हौद बांधला.  ज्यांना धर्मांतर करावयाचे असेल त्यांनी या पाण्याने भरलेल्या हौदात बुडी मारायची असे.”[१५९] भारतामध्ये तीर्थक्षेत्री नदीपात्रात बुडी मारुन स्नान करण्याची पध्दत आहे. पं. रमाबाईंनी गतकाळात तीर्थक्षेत्री फिरत असताना हा अनुभव घेतला होता. म्हणून पाण्यात बुडी मारुन धर्मसंस्कार करण्याची भारतीय पध्दत त्यांनी वापरली.

यावरुन पं.रमाबाईंची व्यक्ती स्वातंत्र्यावरील निष्ठा दिसून येते. धर्मांतरानंतरही त्यांची व्यक्ती स्वातंत्र्यावरील निष्ठा कमी झाली नाही. स्वातंत्र्यावरील निष्ठा पुढील पत्रावरुन दिसून येते. सिस्टर जिराल्डीनला दि. ८ मे १८८५ रोजीच्या पत्रात त्या ठामपणे लिहितात की, “It was very kind of you to give me a home in this country for which I shall remain greatful to you all my life, but at the same time, I must tell you that

when I find out that you or your friends have no trust in me and they want whether directly or indirectly to interfere with my personal liberty, I must say 'good bye' to you."[१६०]

त्यांची ही स्वातंत्र्याची आकांशा स्वत:पुरती नव्हती. त्यांनी केडगावला मुक्ति मिशन स्थापन केले. स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी म्हणजेच मुक्तिसाठी संस्था स्थापन केली. म्हणून मुक्ति हा शब्द त्यांनी हेतूपुर्वक वापरला होता हे स्पष्ट होते. त्यांनी चालविलेल्या मासिकाला मुक्ति प्रेअर बेल हे नाव दिले. त्यावर अमेरिकेतील Liberty Bell चे चित्र छापत असत.

पं. रमाबाईंच्या धर्मांतरामुळे महाराष्ट्रात खळबळ उडाली. तत्कालीन वृत्तपत्रांनी त्यांच्यावर टीका केली. "या पंडितेने मित्र व शत्रू या दोघांशीही प्रतारणा करुन त्यांची निराशा केली."[१६१] असे भाष्य मराठाने केले. (४ नोव्हेंबर १८८३) इंदुप्रकाशमध्ये लिहिले, "पंडिता रमाबाईचे संबंधाने आलेले वृत्त ऐकून आम्हास फारसे नवल वाटले नाही कारण हा प्रकार असा केव्हा ना केव्हा तरी होणारच होता... हिने आपल्या अंगच्या अल्प विद्येने आमच्या ह्या प्रांतातल्या पुष्कळ समंजस लोकांस देखील थक्क करुन सोडले आणि शेवटी फसवले."[१६२] पं.रमाबाईंच्या धर्मांतराची कुचेष्टा इंदुप्रकाश पत्रात करण्यात आली. "बाई चंचल आहे, ती हिंदू होती ती ब्राम्हो झाली आणि आता ख्रिस्ती ह्यावरुन मुसलमानी धर्म हाच सर्वात उत्तम तारण मार्ग आहे असे चित्तवेधक बोध करणारा जर कोणी काजी कधी तीस मिळाला तर ती कदाचित मुसलमानही होईल."[१६३] अशाप्रकारे त्यांच्या धर्मांतराची खिल्ली उडवली होती. पं. रमाबाईंच्या धर्मांतराविषयी बेहरामजी मलबारी इंडियन स्पेक्टटर च्या अंकात लिहितात, "पंडिताबाईंनी दाखविलेला विचित्रपणा आणि आपल्या देशबांधवांची केलेली फसगत याचे समर्थन करण्याची आमची इच्छा नाही. परंतु आमचे अजून ठाम मत आहे की, त्यांचे धर्मांतर ही गोष्ट काही क्षणिक लहरीचा परिणाम नव्हे. या बाबतीत त्यांची वर्तणूक योग्य नव्हे हेच खरे."[१६४] मलबारींनी पं.रमाबाईंच्या धर्मांतराबाबत प्रार्थना समाजाला दोष दिला.

जोतीराव फुले यांनी या धर्मांतराला पाठिंबा दिला नाही. मात्र दोषही दिला नाही. या धर्मांतराचा उपयोग त्यांनी ब्राह्मण वर्गाला खिजविण्यासाठी केला होता. यांनी मत मांडले की, "त्यांनी विलायतेस जाऊन हिंदू व ख्रिस्ती धर्माची तुलना केल्यामुळे त्यांस हिंदू धर्माचा हेकड व पक्षपतीपणा दिसून आल्याबरोबर त्यांनी हिंदू धर्माचा धिक्कार करुन ख्रिस्ती धर्माचा अंगीकार

केला."[१६५] जोतीराव फुलेंनी सन १८८५ मध्ये सत्सार (The Essence of Truth) हे पुस्तक लिहिले.त्यात पं.रमाबाईंच्या धर्मांतराची चर्चा घडवून आणली. जोतिरावांचा धर्मांतराविषयीची भूमिका तत्कालीन परंपरेला धरुन होती. आपल्या जिवितकार्याच्या परिपूर्तीसाठी धर्मांतर करणे त्यांना मान्य नव्हते.

पं. रमाबाईंच्या धर्मांतरानंतर त्यांच्या कार्याची थोरवी नष्ट झाली. त्यांचे धर्मांतर सामाजिक व धार्मिक बंड मानले गेले. त्यांचा समाजाश्रय संपला. पं. रमाबाईंच्या धर्मांतरानंतरच्या स्थितीविषयी धनंजय किर लिहितात की, "धर्मांतरानंतर रमाबाईंच्या आत्म्याची थोरवी आणि भव्यता नष्ट झाली होती, धर्मांतरानंतर बाईची भूमिका ना उरली संतांची ना राष्ट्रीय विमोचकाची. धर्मांतरामुळे त्यांच्या जिवितकार्याचा, बंधुप्रीतीचा व परोपकार बुध्दीचा कणाच मोडून गेला."[१६६]

अशा प्रकारे पं. रमाबाईंच्या धर्मांतरामुळे त्यांचे जीवनाचे एक पर्व संपले. त्यांचे कुटूंबासोबतचे सहजीवन, बंगालमधील कार्य, वैवाहिक जीवन, महाराष्ट्रातील कार्य व इंग्लंडमधील वास्तव्य या जीवनातील प्रमुख टप्प्यांवर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली. सनातन धर्मोपदेश ते धर्मांतरीत ख्रिस्ती महिला अशी त्यांची वाटचाल झाली. स्त्रीसुधारणा कार्याचे बीजारोपण या काळात झाले. या कार्यासाठी लागणारे नैतिक बळ त्यांना ख्रिस्ती धर्मातून मिळाले. पुढील काळात याच बळावर स्त्री सुधारणा कार्य केले. पुढील काळातील लोकोत्तर कार्याची सिध्दता या काळात झाली.

## प्रकरण तिसरे

## तळटीपा

१. जोगळेकर मृणालिनी, स्त्री अस्मितेचा अविष्कार, पं. रमाबाई भाग–३, १९९१, पृ. १.

२. रामटेके सु. धो., अग्रेसर स्त्री कैवारी, पं. रमाबाई, केडगाव, १९५७, पृ. १.

३. टिळक दे. ना., महाराष्ट्राची तेजस्विनी, पं. रमाबाई, पुणे, १९१२, पृ. १४.

४. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. १५.

५. वैद्य द्वा. गो., पंडिता रमाबाई, पुणे, १९२२, पृ. १९३.

६. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. १७.

७. ठाकरे के. सी., पण्डिता रमाबाआी सरस्वती, मुंबई, १९५०, पृ. २.

८. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. १९.

९. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. २.

१०. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. ३.

११. रामटेके सु. धो., पूर्वोक्त, पृ. ३.

१२. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २१.

१३. Pandita Ramabai, A Testimony, Page. 13.

१४. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. १०५.

१५. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. १.

१६. पं. रमाबाई, माझी साक्ष, अनुवादक–रेव्ह. आर. जोशी, रमाबाई मुक्ति मिशन, केडगाव, १९९९, पृ. १३.

१७. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २४.

१८. वैद्य द्वा. गो., पूर्वोक्त, पृ. १९६.

१९. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ.

२०. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. ८.

२१. Pandita Ramabai, High Caste Hindu Woman, या पुस्तकाची अर्पणपत्रिका

२२. Shah A. B. (Edited By), The Letters and correspondence of Pandita Ramabai, Mumbai, 1977, Page. 17.

२३. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. १३, १४.

२४. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. ८.

२५. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. ८.

२६. Shah A. B. पूर्वोक्त, पृ. १६.

२७. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. १९.

२८. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. १९.

२९. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ४७, ४८.

३०. देवधर ज्योत्स्ना, रमाबाई, मुंबई, १९८९, पृ. २१.

३१. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. ६.

३२. डोंगरे कुलवृत्तांत, पृ. २१२.

३३. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. ७.

३४. वैद्य द्वा. गो., पूर्वोक्त, पृ. १९८.

३५. कार्व्हालो सिसिलिया, महाराष्ट्राचे शिल्पकार, पंडिता रमाबाई, मुंबई, २००७, पृ. ९

३६. Asthana Prathima, Women's movements in India, Delhi, 1974, Page. 35.

३७. Shah A. B., पूर्वोक्त, पृ. १७.

३८. Asthana Prathima, पूर्वोक्त, पृ. ३५.

३९. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. १९.

४०. मुक्ति प्रेअर बेल, सप्टेंबर १९०७.

४१. तत्रैव,

४२. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ५२.

४३. मुक्ति प्रेअर बेल, सप्टेंबर १९०७.

४४. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. २०.

४५. Shah A. B., पूर्वोक्त, पृ. १७.

४६. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. १६.

४७. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. १९.

४८. जावडेकर शं. द., आधुनिक भारत, पुणे, २००१, पृ. ९८.

४९. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. १९, २०.

५०. तत्रैव, पृ. २०.

५१. M. Santoshkumar, What One Woman, Can Do – A Life of Pandita Ramabai, Chennai, 2005, Page. 1.

५२. वैद्य सरोजिनी, संक्रमण, पुणे १९८५, पृ. २९.

५३. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ५२.

५४. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. २१.

५५. कार्व्हालो सिसिलिया, पूर्वोक्त, पृ. १०.

५६. पंडिता रमाबाई, मोडक वेणूताई (अनुवादक), शब्दबीज, केडगाव, पृ. ४

५७. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. ३१.

५८. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. २३.

५९. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. २१.

६०. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ८०, ८१.

६१. जोगळेकर मृणालिनी, स्त्री मुक्तीच्या उद्गात्या, स्वाती प्रकाशन, पुणे १९८८, पृ. ११.

६२. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. १२२.

६३. सेनगुप्ता पद्मिनी, पं. रमाबाई, पृ. ७४.

६४. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ८०.

६५. तत्रैव, पृ. ६१.

६६. सेनगुप्ता पद्मिनी, पूर्वोक्त, पृ. ७५.

६७. दिघे प्रभाकर, सरस्वती, मुंबई, १९९२, पृ. १५१.

६८. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ६३.

६९. तत्रैव, पृ. ८१.

७०. M. Santoshkumar, पूर्वोक्त, पृ. ३८.

७१. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. २६.

७२. डोंगरे कुलवृत्तांत, पृ. २२०.

७३. दिघे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. १५९.

७४. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. २५.

७५. आपटे वा. गो.,मराठी शब्द रत्नाकर, पुणे १९२९, पृ.३७२.

७६. जोगळेकर मृणालिनी, स्त्री मुक्तिच्या उद्गात्या, पूर्वोक्त, पृ. १३.

७७. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ८०, ८१.

७८. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. २५.

७९. M. Santoshkumar, पूर्वोक्त, पृ. ३८.

८०. कार्व्हालो सिसिलिया, पूर्वोक्त, पृ. १३.

८१. दिघे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. १५९.

८२. Shah A. B., पूर्वोक्त, पृ. १७.

८३. ज्ञानोदय, १० जून १८८०

८४. ज्ञानोदय, ११ नोव्हेंबर १८८०

८५. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ८६.

८६. M. Santoshkumar, पूर्वोक्त, पृ. ३८.

८७. देवधर ज्योत्स्ना, पूर्वोक्त, पृ. ५८.

८८. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. २६.

८९. तत्रैव, पृ. २७.

९०. तत्रैव, पृ. २७.

९१. कार्व्हालो सिसिलिया, पूर्वोक्त, पृ. १३.

९२. तत्रैव, पृ. १४.

९३. तत्रैव, पृ. १४.

९४. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. २६.

९५. वैद्य सरोजिनी, श्रीमती काशिबाई कानिटकर÷आत्मचरित्र आणि चरित्र, मुंबई, १९९१, पृ. ८६, ८७.

९६. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. २७.

९७. कर्वे धों. के. आत्मवृत्त, पुणे, १९२८, पृ. ११४.

९८. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ९१.

९९. रानडे रमाबाई, आमच्या आयुष्यातील आठवणी, पुणे, १९५३, पृ. १०३.

१००. तत्रैव, पृ. १०६.

१०१. ज्ञानोदय, १२ एप्रिल १८८२.

१०२. कार्व्हालो सिसिलिया, पूर्वोक्त, पृ. १७.

१०३. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. ६३.

१०४. कोसंबी मीरा, पंडिता रमाबाई, पुणे २०१०, पृ. ३०,३१.

१०५. वैद्य सरोजिनी, पूर्वोक्त, पृ. ८८.

१०६. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ३१.

१०७. कार्व्हालो सिसिलिया, पूर्वोक्त, पृ. १७.

१०८. रानडे रमाबाई, पूर्वोक्त, पृ. ८२.

१०९. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ३५.

११०. केसरी, १३ जून १९९२.

१११. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ३६.

११२. कर्वे स्वाती, स्त्रियांची शतपत्रे (इ.स. १८५० ते इ.स. १९५०), पुणे, २००९, पृ. ६३.

११३. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ४८०, ४८१.

११४. कर्वे स्वाती, पूर्वोक्त, पृ. ६४.

११५. तत्रैव, पृ. ६४.

११६. तत्रैव, पृ. ६६.

११७. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. १०४.

११८. दिघे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. १९२, १९३.

११९. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ४३.

१२०. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. १०५.

१२१. तत्रैव, पृ. १०५.

१२२. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ४३.

१२३. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. १०६.

१२४. तत्रैव, पृ. १०७.

१२५. कोसंबी मीरा, पूर्वोक्त (नेटिव ओपीनिअन १७ सप्टेंबर १८८२) पृ. ४५.

१२६. पंडिता रमाबाई, युनायटेड स्टेटस्‌ची लोकस्थिती व प्रवासवृत्त, मुंबई, १९९६, पृ. ८.

१२७. तत्रैव, पृ. ७.

१२८. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ११०.

१२९. तत्रैव, पृ. ११०.

१३०. तत्रैव, पृ. १११.

१३१. मुक्ति प्रेअर बेल, सप्टेंबर १९०७.

१३२. पं. रमाबाई, इंग्लंडचा प्रवास, मुंबई, १८८३, पृ. १७.

१३३. तत्रैव, पृ. १८.

१३४. M Santoshkumar, पूर्वोक्त, पृ. ४०.

१३५. फाटक न. र., न्या. रानडे चरित्र, पुणे. १९६६, पृ. १००.

१३६. आढाव एम. एस., पं. रमाबाई, पृ. १३.

१३७. तत्रैव, पृ. १३.

१३८. पं. रमाबाई, पूर्वोक्त, पृ. ७.

१३९. तत्रैव, पृ. ८.

१४०. केसरी, १६ नोव्हेंबर १८८३.

१४१. वैद्य सरोजिनी, पूर्वोक्त, पृ. ९१.

१४२. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ४८७.

१४३. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. २९.

१४४. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. ३७.

१४५. रामटेके सु. धो., पूर्वोक्त, पृ. ३०.

१४६. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. ३४.

१४७. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ५५.

१४८. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. ३०.

१४९. तत्रैव, पृ. ३०.

१५०. ज्ञानोदय, १६ मे १८८९.

१५१. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. ३३.

१५२. Shah A. B., पूर्वोक्त, पृ. ३६.

१५३. तत्रैव, पृ. २८, २९.

१५४. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ५८.

१५५. Shah A. B., पूर्वोक्त, पृ. ५९.

१५६. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. १३३.

१५७. कार्व्हालो सिसिलिया, पूर्वोक्त, पृ. ७०.

१५८. Shah A. B., पूर्वोक्त, पृ. १०८.

१५९. कार्व्हालो सिसिलिया, पूर्वोक्त, पृ. ७०.

१६०. Shah A. B., पूर्वोक्त, पृ. ५०.

१६१. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ५५.

१६२. वैद्य सरोजिनी, संक्रमण, पुणे १९८५, पृ. ४५.

१६३. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. १४४.

१६४. किर धनंजय, मालशे स. ग., फडके य. दि., महात्मा फुले समग्र वाङ्मय, मुंबई २००६, पृ. ३६५.

१६५. किर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले, मुंबई, २००५, पृ.२२०.

१६६. तत्रैव, पृ. २२०.

# प्रकरण ४ थे

# पं. रमाबाईंचे शारदासदनाच्या कालखंडातील कार्य

(सन १८८९ ते सन १८९८)

## ४.१ प्रस्तावना :

पं. रमाबाई जीवनातील सन १८८९ ते सन १८९८ हा कालाखंड महत्वाचा मानला जातो. याच काळात त्यांनी स्त्री सुधारणा चळवळीचे नेतृत्त्व केले. त्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये विधवा स्त्रियांना शिक्षण देण्याचे कार्य केले. उपरोक्त कालखंड शारदासदनाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. पं. रमाबाईंनी स्त्रियांना साधारण व व्यवसायिक शिक्षण दिले. विधवा स्त्रियांचे सक्षमीकरण घडवून आणले. त्यांचे हे कार्य क्रांतिकारक होते. त्यांच्या धर्मांतरामुळे या कार्याला समाज मान्यता मिळाली नाही. या कार्याविषयी स्त्री जाणिवेच्या अंगाने लेखन झाले नाही.

प्रस्तुत प्रकरणामध्ये शारदासदनाच्या कालखंडातील पं. रमाबाईंच्या कार्याचा अभ्यास केला आहे. या काळातील समाजस्थिती, त्यांच्या कार्याला झालेला विरोध या पार्श्वभूमीवर पं. रमाबाईंच्या कार्याचे ऐतिहासिक मूल्य दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

## ४.२ शारदासदन स्थापनेची पार्श्वभूमी :

### ४.२.१ पं. रमाबाईंचा अमेरिकेला जाण्याचा निर्णय :

पं. रमाबाईंचे इंग्लंडमधील वास्तव्य तीन वर्षे होते. इंग्लंडहून त्या अमेरिकेला गेल्या. अमेरिकेतील वास्तव्याच्या काळात त्यांच्या कार्याला दिशा मिळाली. स्त्री सुधारणेच्या कार्यासाठी आर्थिक मदत मिळाली. पं. रमाबाई व अमेरिका हे नाते त्यांच्या आयुष्याच्या शेवटपर्यंत राहिले.

"आनंदीबाई जोशींनी १८८३ मध्ये पेनसिल्व्हानिया येथील वूमन मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता आणि चार वर्षांचा अभ्यासक्रम तीनच वर्षात पूर्ण करुन त्या भारतातील पहिल्या महिला डॉक्टर झाल्या होत्या. त्यावर फक्त शिक्कामोर्तब व्हायचे होते ते ११ मार्च १८८६ रोजी आयोजिलेल्या पदवीदान समारंभात."[१] या समारंभाला उपस्थित राहण्याचे निमंत्रण डीन डॉ बॉडले यांनी पं. रमाबाईंना दिले. या निमंत्रणामुळे त्यांच्या कर्तृत्त्वासाठी नवी संधी उपलब्ध झाली.

पं. रमाबाईंना निमंत्रित करण्यामागे डॉ बॉडले यांचा हेतू होता की, आनंदीबाईंना भारतातील भावी आयुष्यात पं. रमाबाईंचे सहकार्य मिळेल. डॉ. रैचेल एल. बॉडलें यांनी पं. रमाबाईंना पाठविलेल्या २८ डिसेंबर १८८५च्या पत्रात स्पष्ट करताना लिहितात की, "My thought in inviting you to come to America early in 1886 has been that if the tiding might be sent to India that you braved a wintry ocean to witness Anandibai receive her degree as a Doctor of Medicine. you in a certain sense gave your sanction to her act and enfolded her and her work in your own future leadership"[२] पं. रमाबाईं आनंदीबाईंच्या पदवीदान समारंभास उपस्थित राहिल्या तर त्यांच्या या कार्यास पाठिंबा मिळणार होता. याच पत्राचा फार मोठा परिणाम पं. रमाबाईंवर झाला. या पत्रातून डॉ बॉडले यांनी संदेश दिला की,"Your mission in India is that of on inspirer rather than that of a teacher"[३]या संदेशातून भविष्यकालीन कामाची दिशा मिळाली. स्त्री सुधारणा कार्याच्या प्रेरक बनण्याची भूमिका स्पष्ट झाली. या पत्रामुळे आनंदीबाईंच्या पदवीदान समारंभाला जाण्याची नैतिक जबाबदारी पडली.

पं. रमाबाई अमेरिकेला जाण्याच्या निर्णयाबद्दल दि.१२ डिसेंबर १८८५ रोजीच्या पत्रात लिहितात,"I think it is my duty to go there, first because the kind of

> people who have given kind of help to my cousin to study medicine want to see me, and have invited me again & again. Secondly if I do not go, I shall greatly injure the cause of my country woman, for those kind people will think it very rude of me and interest which they take in my country woman will in some measure be lessoned. I have unfortunately not been able to study medicine, but I must not be the cause of shutting the way which is open to my country women in America."[४]

या पत्रावरुन पं. रमाबाईंची नैतिकता दिसून येते. देशभगिनींविषयी उत्तर दायित्वाची भावना स्पष्ट होते.

### ४.२.२ पं. रमाबाईंचे अमेरिकेतील वास्तव्य :

पं. रमाबाईंचे अमेरिकेमध्ये अडीच वर्षे वास्तव्य होते. त्या तेथे फक्त तीन महिन्यांसाठी गेल्या होत्या. मात्र अमेरिकेतील अनुकूल परिस्थितीमुळे त्यांनी हा विचार बदलला. त्यांच्या कार्यासाठी आशादायक वातावरण होते म्हणून त्यांनी अमेरिकेत दीर्घ काळ वास्तव्य

केले."१८८६ च्या मार्च महिन्यापासून १८८८ च्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीपर्यंत तेथे राहून त्या देशात सुमारे ३०००० मैलांइतका प्रवास करुन काही गोष्टींची माहिती मिळवली."[५] तेथील सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांची पाहणी केली.

पं. रमाबाई इंग्लंडला गेल्या. त्यावेळी त्यांच्याकडे ठराविक उच्च शिक्षणाच्या कल्पना होत्या. अमेरिकेत त्यांचे लक्ष बालशिक्षण पध्दतीकडे गेले. १० मे १८८६ रोजीच्या सिस्टर जिराल्डीन (आजीबाई) यांना लिहिलेल्या पत्रात त्या लिहितात, "I am going to take a special course of study in the Philadelphia Training College for Female Teachers in order to fit myself for my future profession. I am also thinking of studing froebel and other philosopies on child culture."[६] याच पत्रामध्ये त्या नमूद करतात की,"In the meantime, I am occupying myself in visiting different public and private school and colleges in philadelphia to gain an in sight in to the general educaiton system and school organization adopted by (the) people of this country."[७]

यावरुन पं. रमाबाईंच्या कार्यव्याप्त जीवनाची कल्पना येते. सतत नवीन क्षमता निर्माण करण्याची धडपड दिसून येते. त्याकाळी बालशिक्षण या संकल्पनेचा स्पर्श ही भारतीय समाजाला झाला नव्हता. या पार्श्वभूमीवर पं. रमाबाई बालशिक्षणाच्या फ्रोबेल पध्दतीचे प्रशिक्षण घेत होत्या ही बाब उल्लेखनीय आहे. या संदर्भात टिळक दे. ना. लिहितात की, "आपल्याकडे त्या वेळेस तात्या पंतोजीचा छडी–घोडी आंगढ्याचा काळ होता. त्या वेळेस जेव्हा अमेरिकन 'प्री प्रायमरी स्कूल'पध्दत त्यांच्या दृष्टीस पडली, तेव्हा त्यांचे लक्ष या बालशिक्षणाकडे खिळून गेले."[८] बालशिक्षण पध्दतीचा भारतामध्ये प्रयोग करण्याचा त्यांनी निर्धार केला. ही पध्दती बालविधवांना शिक्षण देण्यासाठी उपयुक्त आहे. असे त्यांना वाटले. बालशिक्षण पध्दतीचे महत्व विशद करताना त्या लिहितात की, "How to teach the children and their mother is the thing for me to be learnt at present"[९]

पं. रमाबाईंनी मिस ॲना हॅलोवेल यांच्याकडून फ्रोबेलची तत्वे समजावून घेतली. मिस ॲना हॅलोवेल ह्या एकवीस किंडरगार्टन शाळेच्या अधिक्षिका होत्या. फ्रोबेल शिक्षण पध्दतीचा अमेरिकेमध्ये प्रसार मिस एलिझाबेथ पिबडी यांनी केला."मिस इलिझबेथ पीबडी ह्या महामान्य वृध्द बाईस एत्‌देशीय लोक बालशिक्षणाची आई असे म्हणतात. ह्या सज्जन बाईने नाना

प्रकारच्या विपत्ती भोगून आणि विघ्ने व प्रतिकूल लोकमत यांच्याशी झुंजून बहुत वर्षे दीर्घ प्रयत्न करुन ह्या देशात फ्रोबेलच्या किंडरगार्टन शिक्षण पध्दतीचा प्रसार केला."[१०] पं. रमाबाईंनी त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली होती. फ्रोबेल शिक्षण पध्दतीवर चालणाऱ्या शाळा पाहिल्या. भारतीय प्रबोधन कार्यासाठी या पध्दतीचा उपयोग करण्याचा विचार केला. फ्रोबेल शिक्षण पध्दती म्हणजे बालशिक्षण पध्दती. लहान मुलांना आनंददायी वातावरणामध्ये कृतीयुक्त शिक्षण यामध्ये दिले जाते. या पध्दतीच्या उपयुक्तते संदर्भात पं. रमाबाई सांगतात की, "ही फ्रोबेल शिक्षण पध्दती सर्व संवेदनांना शिक्षण देते, विचार करायला शिकवते आणि शिक्षणाचा खरा उद्देश हाच असतो. सत्य हा त्याचा आत्मा आहे. हे शिक्षण जर आपल्या बायका मुलांना मिळाले तर त्यांच्या अंधश्रध्दा आपोआप नष्ट होती."[११]

पं. रमाबाईंनी किंडरगार्टन या शिक्षण पध्दतीचा पहिल्यांदा ओळख भारतास करुन दिली. किंडरगार्टन पध्दत सुरु करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय व्यक्ती होत्या. या पध्दतीचा प्रयोग त्यांनी प्रथमच शारदासदनमध्ये केला होता.

पं. रमाबाई मिस. फ्रॉन्सिस इ. विलर्ड या स्त्री चा विशेष प्रभाव पडला. अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन येथे किर्ती महाल (Hall of Fame) आहे. तेथे अमेरिकेतील प्रख्यात व्यक्तींचे पुतळे आहेत. तेथे फक्त एकाच स्त्रीचा पुतळा आहे, हा पुतळा फ्रान्सिस इ. विलर्ड यांचा आहे. तिच्या शेजारी अमेरिकेचे पहिले अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांचा पुतळा आहे. यावरुन त्या स्त्रीची योग्यता समजते. "ज्याला व्हॉल्स्टेड कायदा म्हणून ओळखण्यात येऊ लागले, त्या अमेरिकेतील दारुबंदीच्या कायद्याची भूमिका तयार करण्याचे महान कार्य ह्या बाईने केले."[१२] विलर्ड बाईंचा पुतळा तिच्या हयातीत उभारला गेला ही विशेष बाब होती.अमेरिकन समाजाचा स्त्रियांविषयी असणारा समतावादी दृष्टिकोन यातून स्पष्ट होतो.

पं. रमाबाईंनी मद्यपान निषेधाच्या चळवळीत भाग घेतला होता. अमेरिकेसारख्या दूरच्या देशात जावून सामाजिक कर्तृत्त्व दाखविण्याचे धाडस त्यांनी केले. "१८८७ च्या नवेंबर महिन्यात, टेनेसी संस्थानातील न्याषविल् नावाच्या गावी, युनाइटेड् स्टेटस्च्या स्त्रियांच्या राष्ट्रीय मद्य निषेधक मंडळींचा चौदावा वार्षिक महोत्सव झाला."[१३] या महोत्सवाला पं. रमाबाईंना खास निमंत्रण होते. या महोत्सवात त्यांनी व्यसनांच्या दुष्परिणामांविषयी सांगितले की, "व्यसनाच्या फंदात पडून दिवसेंदिवस अधिकाधिक पुरुष सर्वस्वाला मुकून, सुखाला,

संभावितपणाला किंबहुना आयुष्याला आचकू लागले. त्यांच्या पायी बिचाऱ्या बायकांची व त्यांच्या तान्ह्या, कोवळ्या लेकरांची फारच दुर्दशा होऊ लागली. किती हजारो प्रतिव्रता बायका आपले नवरे ह्या दुर्व्यसनाच्या पायी सर्वस्वी बुडत आहेत. असे पाहून मनातल्या मनात कुढू लागल्या."[१४]या महोत्सवामधील भाषणामुळे त्यांना विशेष प्रसिध्दी मिळाली. या सभांमुळे अमेरिकेतील ख्रिस्ती लोकांना पं. रमाबाईंची ओळख झाली.

१३ डिसेंबर १८८७ रोजी बोस्टन शहरात सार्वजनिक सभा भरली होती. या सभेत, "पंडिता रमाबाईंनी आपल्या साध्या भाषेत व अस्खलित वाणीने हिंदुस्थानातील विधवांची करुन कहाणी सांगून श्रोतुसमूह हालवून सोडला."[१५]अमेरिकेतील मुक्त सामाजिक जीवनामुळे त्यांचा उत्साह वाढला. याच काळात हिंदुस्थानात विधवांसाठी शाळा स्थापन करावी असे निश्चित केले. यासाठी आर्थिक मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. अमेरिकन जनतेसमोर भारतातील विधवांचे करुन स्थितीचे चित्र प्रभावीपणे उभे केले. भारतातील बालविवाह पध्दतीचे दुष्परिणाम सांगितले. विधवांच्या दुर्मुखलेल्या जीवनाची ओळख करुन दिली.

पं. रमाबाईंना ह्या भाषणावर आधारित 'High Caste Hindu Women' हे पुस्तक लिहिले. "भारतीय स्त्री ने लिहिलेले हे पहिले इंग्रजी पुस्तक आहे."[१६] या लेखनाचा मुख्य उद्देश भारतीय स्त्री जीवनाचा पाश्चात्यांना परिचय करुन देणे हा होता. स्त्री जीवनाशी निगडीत रुढी परंपरांविषयीची चीड पुस्तकातून व्यक्त केली. हे पुस्तक "अमेरिकन लोकांच्या मनाला इतके भिडले की, त्यांच्या सर्व प्रती हातोहात खपल्या. आणखी आवृत्ती काढावी लागली. त्यामुळे रमाबाईंना खूप मोठा चाहतावर्ग लाभला."[१७] या पुस्तकाला डॉ बॉडले यांनी प्रस्तावना लिहिली होती. त्या लिहितात की, "हजारो वर्षांची शांतता भंगली आहे. एका अपरिचित वेदनेचा पहिला उद्गार सुखी अमेरिकन महिलांच्या कानावर ह्याद्वारे पडला. हे पुस्तक वाचताना माझ्या डोळ्यातून पानांवर सांडलेली आसवं माझ्या आयुष्यातील सर्वात दु:खी आसवं आहेत."[१८]

या पुस्तकाची निर्मिती पं. रमाबाईंच्या पुढील वाटचालीसाठी महत्वाची ठरली. त्यांच्या कार्याची गरज अमेरिकन समाजाला समजली. त्यांच्या भावी कार्याविषयीचा विश्वास अमेरिकन समाजाच्या मनात निर्माण झाला. या पुस्तकातून निर्माण झालेल्या प्रभावाविषयी क्लेमेंटिना बटलर लिहितात की, "She held the attention of the audience as she spoke of the

condition and needs of her sex, the life and relations of Hindu woman hood, and make an apeal for sympathy in her proposed work."[१९]

पं. रमाबाई या पुस्तकाच्या 'The Appeal' प्रकरणामध्ये आश्रमाची योजना अमेरिकन लोकांपुढे सविस्तरपणे मांडली. त्या लिहितात की,

1. "Houses should be opened for the young and high-caste child widows where they can take shelter without the fear of losting their caste or of being disturbed in thier religious belief and caste rules.
2. In order to help them make an honourable and independent living, they should be taught in these houses to be teachers, governesses, nurses, and house keepers and should become skilled in other forms of hand work according to their taste and capacity.
3. These houses should be under the superintendence and management of influential Hindu ladies and gentlemen.
4. The Services of well-qualified American ladies as assistants and teachers should be secured in order to afford the occupants of the houses the combined advantage of eastern and western civilization and education.
5. Libraries containing the best books on history, science, art, religions and other department of literature should be established in these houses for the benefit of their inmates and of other woman in their vicinity who may wish to read. lecture ships should also be established in the libraries, and the lecturers should be engaged with the distinct under standing that they do not speak irreverently of any religion or sacred custom while lecturing in that house or library, the lecturers should embrace in their topics hygiene, geography, elementary science, foreign travel etc. and lectures should be designed primarily to open the eyes and ears of those who long have dwelt in the prison-house of ignorance, knowing literally nothing of God's beautiful world."[२०]

अशा प्रकारे पं.रमाबाईंनी आश्रमाविषयीचा स्पष्ट आराखडा मांडला होता. हा आश्रम तरुण व उच्च जातीतल्या विधवांसाठी सुरु करण्याचे स्पष्ट उद्देश नमूद केला आहे. विधवा

स्त्रियांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडविण्याचा विचार त्यांनी मांडला. त्यासाठी व्यावसायिक शिक्षणाचा अंतर्भाव आश्रमामध्ये करताना दिसतात. या आश्रमाचे प्रशासकीय व्यवस्थापनाचे स्वरुप स्पष्ट केले. आश्रमात शिकविल्या जाणाऱ्या विषय ज्ञानाची निश्चिती केली. धार्मिक शिक्षणाऐवजी व्यावहारीक शिक्षणाचा विचार केला. आश्रमासाठी ग्रंथालयाची अभिनव कल्पना त्याकाळी मांडली.

पं. रमाबाईंनी पारंपरिक रुढी व परंपरापासून मुक्त जीवनाची रुपरेषा मांडली. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे "१३ डिसेंबर १८८७ रोजी बोस्टन शहरी रमाबाईंच्या कार्याला आर्थिक मदत करण्यासाठी रमाबाई असोसिएशन ची स्थापना अमेरिकन लोकांनी केली."[२१]

पं. रमाबाईंच्या भावी कार्याला पाठिंबा देणारी शिफारसपत्रे लिहीली गेली. प्रतिष्ठितांनी या कल्पनेला पाठिंबा व्यक्त केला. प्रो. मॅक्समुलर यांनी या कार्याला पाठिंबा व्यक्त करताना लिहिले की, "भारताचा भावी उद्धार, भारताच्या स्त्रियांच्या उद्धारावर अवलंबून आहे. बालविधवांच्या ह्या वसतीगृहावर व शालागृहावर पुढील सुखी गृहे व सुशिक्षित बायका व स्वावलंबी माता निर्माण करण्याची कामगिरी अवलंबून राहिल."[२२] मुंबईचे गव्हर्नर सर विल्यम बेडरबर्न यांनीही त्यांच्या कार्याचे कौतुक केले. ते लिहितात की, "पंडितेच्या नॉर्मल स्कूल विषयी ऐकून आम्हाला परम संतोष होत आहे व त्या कामी करता येईल ती मदत करण्यास आम्ही तयार आहों"[२३]

पं. रमाबाईंच्या विधवाश्रमाच्या संकल्पनेविषयी सिस्टर जिराल्डीन यांनी आंनद व्यक्त केला. त्या याविषयी लिहितात की, "I am crying for joy, that my dream of years has became a reality"[२४]

रमाबाई असोसिएशनची मुख्य शाखा बोस्टन येथे होती. या संस्थेस मदत करण्यासाठी रमाबाई सर्कल्स स्थापण्यात आली होती."पहिल्याच वर्षी अशी १८ रमाबाई सर्कल्स अस्तित्वात आली. पुढे पाच वर्षात त्यांची संख्या ७५ झाली.... त्यानंतर २६ जूलै १८८८ रोजी द रमाबाई असोसिएशन ऑफ पॅसिफिक कोस्ट नावाची एक संस्था स्थापून पश्चिम अमेरिकेतील लोकांना रमाबाईंच्या कार्याला हातभार लावण्यास सुरुवात केली."[२५]

रमाबाई असोसिएशनची योजना होती की, "प्रत्येक मंडळाने (सर्कल) आपल्या सभासदाकडून मदत गोळा करुन मुख्य शाखेकडे बोस्टनला पाठवायची व तिथून हरसाल

५००० डॉलर्स रमाबाईंना हिंदुस्थानात विधवाश्रम चालविण्यासाठी पाठवायचे... शिवाय सुरवातीला आश्रमाची इमारत उभारण्यासाठी २५००० डॉलर्स इतकी रक्कम द्यायची."[२६]

पं. रमाबाईंनी लिहिलेल्या 'High Caste Hindu Women' पुस्तकाची त्यांच्या कार्याला आर्थिक मदत झाली. ह्या पुस्तकाच्या १०००० प्रती खपल्या. याचा छपाईचा खर्च वजा होता बराच फायदा झाला. पं. रमाबाईंनी भावी विधवाश्रमातील विद्यार्थीनींसाठी अक्षर ज्ञानाची पुस्तके लिहीली. त्याची छपाई केली. रंगीत चित्रांची पुस्तके, तक्ते, मॉडेल्स वगैरे तयार करुन घेतले. या कामाच्या संदर्भात १३ ऑगस्ट १८८८ रोजी मनोरमेला लिहिलेल्या पत्रात त्या नमूद करतात की, "I smatch at any moment that I can get and write stories for the school books that I am preparing for children in our country. I have lots of pictures, all very nice and beautiful designs for the little pages."[२७]

पं. रमाबाईंनी अमेरिकेच्या वास्तव्यामध्ये सतत प्रवास केला. सभांमध्ये भाषणे दिली. त्याचवेळी आश्रमातील शिक्षणासाठी साधने उभी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अमेरिकेतून उत्तमोत्तम गोष्टी भारतात नेण्यासाठी सतत धडपड केली. तेथे स्त्री सुधारणा कार्यासाठी आर्थिक मदत मिळविली. अविकासित देशांच्या विकासासाठी परकी मदत मिळविण्याची कल्पना अभिनव होती. आजही विकसित देश मोठी मदत मागास देशांना करतात. मात्र हा उपक्रम पं. रमाबाईंनी १२५ वर्षापूर्वी केला होता. ही विशेष बाब होती. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्वाचा मोठा प्रभाव अमेरिकन समाजावर झाला. त्यांच्या या प्रभावाबद्दल क्लेमेंटिना बटलर लिहितात की, "No one who was present that day can ever forget the slight figure of the little widow in her white gard and with the close shaven head indicative of her despised estate, as she gave her burning plea for justice for the child-widow of India"[२८]

### ४.२.३ पं. रमाबाईंचे जपानमधील वास्तव्य :

पं. रमाबाईंना नियोजित रक्कम मिळाली. त्या जपानमार्गे भारतात परतल्या. जपानमध्ये त्यांचे तेरा दिवसांचे वास्तव्य होते. या काळात जपानी जनजीवनाचे व तेथील निसर्गाचे वर्णन त्यांनी सिस्टर जिराल्डीन यांना ३ जानेवारी १८८९ रोजी लिहिलेल्या पत्रात केले आहे. या पत्रामध्ये तेथील स्त्रियांची सुरेख महाविद्यालये व शाळा पाहून आनंद व्यक्त करतात. त्या नमूद करता की, "There are also schools for women. The empress takes an active

interest in women's progress and has founded a college for ladies. I was very much pleased to see the handsome college building and many schools for women are treated much more respectfully in Japan than in any other orient country."[२९] पं. रमाबाईंची स्त्री जीवनाविषयीची निष्ठा या पत्रावरुन दिसून येते. जपानमधील स्त्री जीवनाचे आकलन करुन घेण्याचा प्रयत्न त्यांनी अल्पावधीत केला होता. पं. रमाबाई जपानमध्येही परिचित होत्या असे दिसते. कारण "जपानचे युवराज व युवराज्ञी यांच्या आमंत्रणावरुन त्या भेटायला राजवाड्यात गेल्या होत्या."[३०] तेरा दिवसांमध्ये त्यांना आठ ठिकाणी सभेसाठी निमंत्रित केले होते. त्या लिहितात की, "I spoke in at least eight meeting and the young women who acted as my interpreters did their part beautifully."[३१] येथील सभांमधून त्यांनी स्त्री शिक्षणातून होणाऱ्या सामाजिक फायद्याचे विवंचन केले. स्त्री उद्धारातूनच होणाऱ्या राष्ट्रीय प्रगतीविषयी आशादायी चित्रण केले.

पं. रमाबाईंचे हाँगकाँगमध्ये सात दिवस वास्तव्य होते."तेथे एका भारतीय व्यापाऱ्याच्या घरी त्यांची उतरण्याची सोय झाली होती. रमाबाईंची ओळख करुन देण्याच्या उद्देशाने एक स्वागत समारंभ त्याने आपल्या घरी आयोजित करुन अनेक स्थानिक भारतीयांना व काही युरोपियनांना बोलावले होते, असे वृत्त हाँगकाँग डेली प्रेस (१६ जानेवारी १८८९) या वर्तमान पत्रात केला आहे."[३२] या समारंभात स्त्रियांसाठी आश्रमशाळा काढण्याचे उद्दिष्ट विशद केले. स्त्रियांना, बालविधवांना पाश्चात्य शिक्षण देण्याचे फायदे सांगितले. अमेरिकेतून मिळालेल्या आर्थिक मदतीचा उल्लेख केला. स्वकीयांकडून त्यात भर पडावी अशी अपेक्षा व्यक्त केली."मेल सप्लिमेंट टू द हाँगकाँग डेली प्रेस (२३ जानेवारी १८८९) च्या पुरवणीत बालविवाह व असंमत वैधव्य या चालींनी जखडलेल्या भारतीय स्त्रियांना बंदिवासातून मुक्त करण्याच्या रमाबाईंच्या भावी कार्याला सदिच्छा दिल्या आहेत."[३३] यावरुन पं. रमाबाईंच्या भावी कार्याची दखल जपान व हाँगकाँगमध्ये घेतलेली दिसते.

पं. रमाबाईंनी भारतीय स्त्री जीवनाचा परिचय जपान, हाँगकाँगला करुन दिला. भारतीय स्त्री जीवनाची चर्चा आंतरराष्ट्रीय पातळीवर घडवून आणली. एप्रिल सन १८८३ ते जानेवारी १८८९ या काळात त्यांनी इंग्लंड, अमेरिका, जपान, हाँगकाँग असा प्रवास केला. या काळात त्यांचे आंतरराष्ट्रीय व्यक्तिमत्व सिध्द झाले. असे परदेशगमन करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला होत्या. परकीय देशातून आर्थिक मदतीचा स्त्रोत निर्माण करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय

होत्या. त्यांच्या कार्याचा प्रभाव इतका मोठा होता की, पं. रमाबाईंच्या मृत्यूनंतरही ही आर्थिक मदत बंद झाली नाही. एवढेच नाही तर ती मदत आजही २०१३ मध्येही सुरु आहे.

पं. रमाबाई 'हिंदु पंडिता' म्हणून परदेशात गेल्या होत्या. धर्मांतर करुन त्या भारतात परतल्या होत्या. त्यावेळी भारतीय समाजाने त्यांचे स्वागत केले. त्यांचे धर्मांतर विसरुन त्यांच्या भावी कार्याचे कौतुक केले. सुबोध पत्रिकेमध्ये पं. रमाबाईंच्या कार्याचे कौतुक करताना लिहिले की, "एकट्या स्त्री ने अमेरिकेसारख्या सातासमुद्रापलीकडच्या देशी जावे, तिकडील लोकांच्या अंत:करणात आपल्या भगिनींविषयी कळवळा उत्पन्न करावा, त्यांच्याकरीता सत्तेचे विद्यालय व दहा वर्षेपर्यंत त्याला लागणारा खर्च मिळवून आणावा; याला जर अलौकिक पराक्रम म्हणू नये तर कशाला म्हणावा?"[३४] 'इंदूप्रकाश' या पत्रामध्ये त्यांच्या कार्याची स्तुती करताना लिहिले की,"पंडिता रमाबाईंचे धर्मांतर मात्र मनात न आणता त्यांच्या दृढ मेहनतीची आणि कळकळीची स्तुती करावी तितकी थोडीच आहे. सांप्रतच्या काळात ही एक अद्वितीय बुद्धिमत्ता स्त्री निर्माण झाली आहे. यात संशय नाही."[३५] केसरीकारांनीही पं. रमाबाईंच्या कार्याला महत्वाचे मानले. ते लिहितात की, "परक्या देशात पाच पन्नास हजार रुपये मिळविणे हे अजब कृत्यच आहे. आणि हे एका स्त्रीने, एका निराश्रित अबलेने, आपल्या दृढनिश्चयाने आपल्या सौजन्यादी गुणांनी तडीस नेले हे पाहून आम्हास आमच्या पुरुष मंडळीची कीव येते आणि असली अलौकिक स्त्री आम्हाला निपजली हा विचार मनात येऊन आम्हाला थोडा अभिमान ही वाटतो."[३६]

पं. रमाबाईंचे कौतुक करणारी वरील पत्रे शारदासदनाची स्थापना होण्यापुर्वीची आहेत. यावरुन त्यांच्या भावी कार्याची गरज समाजाला पटलेली दिसते. स्थानिक सुधारकांनी या कार्याला पाठिंबा व्यक्त केलेला दिसतो. मात्र त्यांच्या धर्मांतराविषयीचा खेद सर्वत्र व्यक्त होत होता.

## ४.३ शारदासदनाची स्थापना :

"शारदासदनाची स्थापना ११ मार्च १८८९ रोजी चौपाटीवर विल्सन कॉलेजच्या पिछाडीस असलेल्या एका इमारतीमध्ये झाली."[३७] ही इमारत आता अस्तित्वात नाही. या इमारतीपासून चौपाटीकडे जाणाऱ्या रस्त्याला 'पंडिता रमाबाई मार्ग' असे नाव आहे. शारदासदनाच्या उद्‌घाटन सोहळ्याला मुंबईतील प्रतिष्ठित मंडळी जमली होती. या सभेचे

अध्यक्ष स्थान सौ. काशीबाई कानिटकर यांनी भूषविले होते. “जाहीर सभेचे अध्यक्षपद एका हिंदी स्त्रीने स्विकारल्याची ही पहिलीच वेळ होती. आजपर्यंत कोणत्याही सभेने अध्यक्षपद कुणा स्त्रीला द्यावे असे कधीच कुणी सूचविले नव्हते आणि सूचविले असते तरीही कुणा हिंदी स्त्रीला ते पद स्वीकारण्याचे धाडस झाले नसते. ही वस्तुस्थिती होती.”[३८] अशा प्रकारे शारदासदनाची सुरुवातच क्रांतीकारी घटनेने झाली. काशिबाई कानिटकर यांनी आपल्या आत्मचरित्रात ह्या समारंभाचे वर्णन केले आहे. त्या लिहितात की, “शारदासदनाची जागा चौपाटीवर एका बंगल्यात मुक्रर केली होती. बंगल्याच्या एका भागात पंडिताबाई, त्यांची मुलगी आणि त्यांच्या बरोबर आलेली डॉ. रायडर या राहत असत. आरंभाला मुली म्हणजे गंगाधरपंत गद्रे यांची मुलगी कुमारी शारदा व त्या वेळच्या गोदुबाई जोशी ह्या होते. समारंभास डॉ. आत्माराम पांडुरंग, नामदार त्र्यंबक तेलंग, प्रार्थना समाजाची बहुतेक मंडळी, काही ख्रिस्ती मिशनरी, डॉ. मकीचंद वगैरेसारखी पुढारी मंडळी आली होती.”[३९] उद्‌घाटन समारंभाला मान्यवरांची उपस्थिती म्हणजे पं. रमाबाईंच्या कार्याला सुशिक्षित समाजाने दिलेली पावती होती. “इंदुप्रकाश सारख्या पत्रात या सोहळ्याचे वर्णन ‘डॅझलिंग ग्रॅंड गॅदरींग, व्हेरी ग्रॅंड ऑकेजन’ अशा शब्दात केले होते. आणि काशीबाईंना मिळालेले अध्यक्षपद तेव्हा एकमेवाद्वितीय असल्याचे म्हटले होते.”[४०]

गंगाधरपंत गद्रे यांची मुलगी शारदा ही या शाळेची पहिली विद्यार्थीनी होती. तिच्या नावावरुन या शाळेला शारदासदन नाव दिले. ती बालविधवा नव्हती. या सदनात दाखल झालेली पहिली विधवा म्हणजे गोदूबाई जोशी होती. गोदुबाई म्हणजे आनंदीबाई (बाया) कर्वे होय. शारदा कुमारीका असल्याने बहुधा आनंदीबाई कर्वेंनी आपल्या आत्मवृत्तात “आपणच सदनाच्या पहिल्या विद्यार्थीनी”[४१] म्हटले आहे. महर्षि कर्वे यांनी याबाबतचा खुलासा आपल्या आत्मवृत्तात केला आहे. ते म्हणतात की, “मुंबईला शारदासदनाची सुरुवात झाली व नरहरीपंतांनी गोदूबाईला पहिली विधवा विद्यार्थीनी म्हणून दाखल केली. हिच्यापूर्वी गंगाधरपंत गद्रे यांची कुमारी शारदा ही दाखल जाली होती व तिजवरुनच पंडिता बाईंनी संस्थेला शारदासदन हे नाव दिले होते.”[४२]

भारतामध्ये विधवांसाठी आश्रम सुरु करण्याची ही पहिलीच घटना होती.“शारदासनाची स्थापना होण्यापुर्वी मागील पंधरा वर्षामागे (१८७२) विधवांकरीता कलकत्त्यास एका नॉर्मल क्लास काढण्यात आला. पण विधवा न आल्याने तो बंद पडला, नत्तोर येथे पण राजा चंद्रनाथ यांनी विधवांकरीता विधवा गृह काढले. ते पण चालले नाही.”[४३] या पार्श्वभूमीवर पं. रमाबाईंनी

शारदासदनाची स्थापना केली होती. शारदासदनचे कार्य गेली १२५ वर्षे अखंडितपणे चालू आहे ही एक ऐतिहासिक बाब आहे.

पं. रमाबाईंच्या या कार्याचे ऐतिहासिक मूल्य ज्ञानोदय ने जाणलेले होते. शारदासदनाची स्थापना एक ऐतिहासिक घटना असल्याचे ते नमूद करतात. या संदर्भात ज्ञानोदयकर्ते लिहितात की, "आजपावतो खूप लढाया झाल्या, पण प्लासीच्या किंवा वॉटर्लूच्या लढाईला इतिहासात विशेष मानले जाते. कारण त्यामुळे राजकीय फेरफार झाले. त्याप्रमाणे सध्या शाळा खूप आहेत, पण रमाबाईंच्या शाळेचे महत्व वेगळेच आहे. आता स्त्री शिक्षणात नवीन क्रांती व फेरफार होणार आहेत.... आजपासून २५ वर्षांनी या शाळेच्या परिश्रमास अशी प्रतिफळे मिळतील की, शाळेच्या विरोधकांची तोंडे बंद होतील. त्यास समजेल की, हिंदु स्त्री दु:ख परिमार्जन शकास इ.स.११ मार्च १८८९ रोजी आरंभ झाला. ह्या शककर्तीचे नाव पं. रमाबाई होय."[४४]

अशाप्रकारे शारदासदनाची सुरुवात शकाच्या प्रारंभाइतकी महत्वाची होती. या शकास हिंदु स्त्री दु:ख परिमार्जन शक असे म्हटले. पं. रमाबाईस शककर्ती स्त्री असे संबोधले. शारदासदनाच्या भावी कार्याविषयीचा विश्वास ज्ञानोदयमध्ये व्यक्त केला होता.

### ४.३.१ शारदासदनाची वाटचाल :

शारदासदनाच्या घडामोडींविषयची माहिती पं. रमाबाईंच्या पत्र व्यवहारावरुन समजते. रमाबाई असोसिएशनच्या वार्षिक सभांमधील इतिवृत्तामध्ये शारदासदनाविषयीची महत्वाची माहिती मिळते.

शारदासदनाची सुरुवात दोन विद्यार्थीनीच्या प्रवेशावर झाली. पहिल्या तीन महिन्यांमध्ये सदनाला चांगला प्रतिसाद मिळाला. मुलींची संख्या वाढली. पं. रमाबाईंनी ४ जून १८८९ रोजी सिस्टर जिराल्डीन यांना पाठविलेल्या पत्रात लिहिले की, "I have seven girls staying with me, six of them are of the Brahmin Caste, I have eighteen girls in my class"[४५]

सप्टेंबर १८८९ पर्यंत मुलींची संख्या आणखी वाढली होती."सहा महिन्यात जेऊन खाऊन राहणाऱ्या ५, दिवसा फक्त अभ्यासासाठी येणाऱ्या ३ व इतर सर्व मिळून २५ महिला विद्यार्थीनींची संख्या झाली."[४६] २५ महिला विद्यार्थीनींपैकी १७ विद्यार्थीनी कुमारीका होत्या. पहिल्या सहा महिन्यात ८ विधवा शारदासदनमध्ये प्रवेशित होत्या. यावरुन पं. रमाबाईंनी प्रवेशासंदर्भातील विहीत नियमांना मुरड घातलेली दिसते. विधवांसोबत कुमारीकांनाही प्रवेश दिला होता. प्रवेशासाठी विधवेचे वय २० वर्षापेक्षा जास्त असावे अशी अट होती. "गोदुबाई या

विधवेचे प्रवेश घेताना वय वीस नव्हते. तर चोवीस होते."[४७] यावरुन पं. रमाबाई मुलींच्या प्रवेशासंदर्भात तांत्रिक गोष्टीत अडकलेल्या दिसत नाहीत. कुमारिका, विधवा असो वा जास्ती वयाच्या असो पं. रमाबाईंनी सर्वच गरजू स्त्रियांना शारदासदनमध्ये प्रवेश दिला. पं. रमाबाई मुक्ती मिशनने सन १९८९ मध्ये शताब्दी आवृत्ती प्रकाशित केली होती. त्यातील कालपटामध्ये"सन १८९१ मध्ये २६ विधवा व १३ कुमारीका शारदासदनमध्ये शिकत होत्या तर १८९६ मध्ये ३९ विधवा व ९ कुमारीका प्रवेशित होत्या. अशी माहिती दिली आहे."[४८] १२ मार्च १८९० च्या रमाबाई असोसिएशनच्या वार्षिक सभेच्या इतिवृत्तामध्ये"शारदासदनमध्ये ५१ विद्यार्थीनी प्रवेशित होत्या, त्यापैकी ३४ विद्यार्थीनी विधवा होत्या."[४९] असे नमूद केले आहे.

### ४.३.२ शारदासदनातील प्रवेशित विद्यार्थीनींचा सांख्यकिय तपशील :

| अ.क्र. | वर्ष | विधवांची संख्या | विधवा नसलेल्या मुलींची संख्या | शारदासदनात राहणाऱ्या | फक्त शाळेसाठी येणाऱ्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८८९ | ३४ | १७ | | | ५१ |
| २ | १८९१ | २६ | १३ | ३४ | ०५ | ३९ |
| ३ | १८९२ | ३० | १० | ३८ | ०५ | ४३ |
| ४ | १८९३ | ३८ | ११ | | | ४९ |
| ५ | १८९६ | ३९ | २६ | ४९ | १६ | ६५ |
| ६ | १८९७ | ८६ | १३ | | | ९९ |
| ७ | १८९८ | ७५ | | | | ७५ |

(संदर्भ : रमाबाई असोसिएशनचे सन १८९० ते १८९८ चे वार्षिक अहवाल.)

### ४.३.३ शारदासदनचे पुणे येथे स्थलांतर :

नोव्हेंबर १८९० मध्ये शारदासदनचे स्थलांतर मुंबईहून पुणे येथे झाले. याकाळी पुणे शहरात समाज सुधारणा चळवळी सुरु होत्या. या सुधारणांना विरोध करणारा मोठा सनातन्यांचा गट होता. त्यामुळे पं. रमाबाईंच्या सुधारणा कार्याला विरोध होण्याचा संभव होता. शारदासदनाचे पुण्यात स्थलांतर म्हणजे "वैरियाच्या उरावरी पाय ठेवावा."[५०] असा प्रयोग होता.

पं. रमाबाईंनी कोणतीही भिती बाळगली नाही. त्यांनी मुलींना पुण्यात आणले. हा धाडसी प्रयोग होता."पुण्यास आल्यावर विद्यार्थीनींची संख्या ६४ होती. त्यात दुर्गाबाई किर्लोस्कर, काशीबाई देवधर, वेणुताई नामजोशी ह्या विद्यार्थीनी होत्या."[५१]

**शारदासदनाच्या स्थलांतराची कारणे पुढील होती.**

१) मुंबई हे महागडे शहर होते. तेथे वसतिगृह चालविण्याचा खर्च फार मोठा होता. या संदर्भात कृष्णाबाई गद्रे लिहितात की, "सुमारे एक वर्षाने रमाबाईंनी मुंबईचे ठाणे हलवून खर्चाच्या मानाने स्वस्त व हवेशील अशा पुणे शहरी ते आणले."[५२]

२) मुंबईचे हवामान दमट आहे. त्यामानाने पुण्याची हवा आल्हाददायक आहे. त्यामुळे शारदासदनचे स्थलांतर पुणे येथे केले होते.

३) पुणे हे समाज संक्रमणाचे केंद्र होते. समाज परिवर्तनाची फार मोठी पार्श्वभूमी या शहराला होती. पं. रमाबाईंच्या परिचयाची सुधारक मंडळी पुण्यामध्येच होती. शारदासदनाच्या कार्याला प्रार्थना समाजाने पाठिंबा दर्शविला होता. डॉ. रामकृष्ण भांडारकर यांनी स्पष्ट केले होती की, "तुम्ही अमेरिकन भगिनी हिंदुस्थानच्या स्त्रियांची दु:खे कमी करण्यासाठी पुढे येत आहां म्हणून आम्हाला फार आनंद होत आहे. तुम्हाला सर्व प्रकारची मदत देण्याचे आम्ही अभिवचन देतो."[५३] अशाप्रकारे पुण्यामधून शारदासदनासाठी प्रतिष्ठित मंडळींचा व समाजसुधारकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी शारदासदनचे स्थलांतर पुणे येथे केले.

४) पं. रमाबाईंनी शारदासदन उच्चवर्णीय विधवांच्या शिक्षणासाठी सुरु केले होते. पुणे येथे उच्चवर्णीय समाज जास्त होता. मुंबईच्या तुलनेत पुण्यातील स्त्री जीवन रुढी परंपरेने जास्त बध्द होते. शारदासदनासाठी विधवा विद्यार्थीनी पुण्यात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होणार होत्या. म्हणून शारदासदनचे स्थलांतर पुणे येथे करण्यात आले.

५) रमाबाई असोसिएशनच्या मूळ घटनेमध्ये "पंडिता रमाबाईंनी पश्चिम हिंदुस्थानातील पुणे शहरात किंवा त्या शहराजवळ उच्चवर्णीय बालविधवांसाठी शाळा काढून चालवावी."[५४] असे नमूद केले होते. मात्र पं. रमाबाईंनी काही मित्रांच्या सल्ल्यामुळे शारदासदन मुंबईस सुरु केले होते. ही बाब घटनेच्या विपरीत होती. म्हणून घटनेनुसार शारदासदनाचे स्थलांतर पुणे येथे केले होते.

पुण्यात शारदासदनाची तात्पुरती व्यवस्था आगाखान पॅलेसमध्ये करण्यात आली होती. त्यानंतर कॅम्पच्या अतिशय चांगल्या वस्तीमध्ये "शारदासदन सुरु झाले. शारदासदनाची नवीन

इमारत ४२००० रु. खर्च करुन बांधण्यात आली होती. तिचा उद्‌घाटन समारंभ २६ जुलै १८०२ रोजी डॉ. आत्माराम पांडुरंग ह्यांच्या अध्यक्षतेखाली झाला."[५५]

### ४.३.४ शारदासदनमधील शिक्षण :

पं. रमाबाईंच्या पत्रव्यवहारावरुन व रमाबाई असोसिएशनच्या अहवालावरुन तेथील शिक्षण पध्दती व प्रक्रियेची माहिती मिळते. पं. रमाबाईंनी सिस्टर जिराल्डीन यांना पाठविलेल्या पत्रात लिहिले की, "Reading, writing, arithmetic, geography, history, needlework and English fill our curriculum. We soon hope to increase our list of subject."[५६] यावरुन सुरुवातीला वाचन, लेखन, गणित, भूगोल, इतिहास इ. पायाभूत ज्ञानावर आधारित अभ्यासक्रम सुरु केला होता. पं. रमाबाईंनी स्त्रियांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्या व्यावसायिक शिक्षण देत होत्या. त्या लिहितात, "I am going to start as industrial department in my school prety soon. We shall at first teach the girls how to make caps with silver embroidery upon them. They will also be taught drawing plans and designs. They are at present taught plain sewing, mending and embroidery."[५७]

शारदासदनातील मुलींसाठी प्रस्तुत केलेला अभ्यासक्रम महत्वाकांक्षी असून त्याचे दोन भाग केले होते. एक भाग म्हणजे साधारण शिक्षण (General Educaiton) यामध्ये विद्यार्थीनींच्या इच्छेप्रमाणे मराठी, गुजराती, इंग्रजी व संस्कृत या भाषा शिकविल्या जात होत्या. तसेच त्या भाषेचे व्याकरण शिकविले जात होते. भूगोल, खगोल, इतिहास, गणित, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, भूगर्भशास्त्र, आरोग्यशास्त्र, शरीरशास्त्र इत्यादी विषयांचे आवश्यक ज्ञान दिले जात होते. अभ्यासक्रमाचा दुसरा भाग, व्यवसायिक शिक्षण हा होता. स्त्रियांचे आर्थिक परालंबित्व ही त्यांच्या अवनतीचे कारण आहे असे त्यांना वाटत होते. यासाठी त्यांना व्यवसाय शिकविणे गरजेचे होते. "शारदासदनमध्ये शिवणकाम, काशिदा, लोकरीचे काम, चित्रलेखन, चिनी मातीच्या भांड्यावर नक्षी व चित्रे काढणे, मातीची चित्रे करणे, फोटोग्राफ घेणे, लाकडावर नक्षी कोरणे, बुरुड काम, किंडरगार्टन शिक्षण पध्दतीचे शिक्षण इत्यादी विषयांचा समावेश होता."[५८] विद्यार्थीनींना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करुन देण्यासाठी व्यवसायिक शिक्षण दिले जात होते.

शारदासदनामध्ये अभ्यासपूरक उपक्रमांचा समावेश केला होता. पं. रमाबाईंना विद्यार्थीनीमध्ये चांगली जीवनमूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला. त्याचा एक भाग म्हणून "A short lecture on ethics is delivered by Ramabai each morning from 10 to 10:30, when all the pupils are present in the large school room."[५९] शालेय, व्यवसायिक शिक्षणाबरोबरच इतर संस्कार केले जात. महाराष्ट्र शासनाने अलिकडच्या काळात मूल्यशिक्षणाचा समावेश शालेय शिक्षणामध्ये केला आहे. हा प्रयोग पं. रमाबाईंनी १२५ वर्षापूर्वी केला होता.

शारदासदनमध्ये मुलींमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात होता. शारदासदनामध्ये अंधश्रद्धा निर्मुलनाचा खास उपक्रम होत होता. त्याचा एक भाग म्हणून "Miss Hamlin has tried to remove many of the superstitious feelings from the minds of the Hindus"[६०] शारदासदनमधील मुलींमधील अंधश्रध्दा दूर करण्यासाठी मिस हॅम्लीन यांनी खास वर्ग घेतले. जीवनातील स्थित्यंतरे कार्यकारण भावाच्या कसोटीवर तपासण्याचे शिकविले. या संदर्भात पं. रमाबाईंच्या चरित्रकार क्लेमेंटिना बटलर लिहितात की, "With her usual courage she denounced as a wild superstition the belief that if the widow wore their hair long it would serve to bind their husband in hell and asked the men how they would like to have their heads shaved because of the death of a wife."[६१] विधवांच्या केशवपनाला त्यांनी विरोध केला. केशवपन, बालविवाह इ. रुढींमागील अंधश्रध्दांवर टिका केली.

शारदासदनमध्ये बालशिक्षण पध्दतीचे वर्ग सुरु होते. त्याला किंडरगार्टन शिक्षण पध्दती म्हणतात. भारतामध्ये ही अभिनव शिक्षण पध्दती होती. पं. रमाबाई सन १८९२ च्या अहवालात नमूद करतात की, "We have added a new department to our school since last october. A Kinder Garton training class has been started which is making good progress. fourteen pupils and two teachers have joined the class."[६२] किंडरगार्टन वर्गासाठी अनेक विधवांना प्रशिक्षित केले. या वर्गामध्ये नियमितपणे लहान मुला-मुलींना बालशिक्षण दिले जात होते. यावरुन बालशिक्षण पध्दतीचा भारतातील पहिला यशस्वी प्रयोग शारदासदनमध्ये राबविला होता. याशिवाय शारदासदनात चित्रकला वर्ग, संगीत वर्ग चालविले जात होते.

जाने १८७६ मध्ये मॅडम सोराबजी यांनी पुण्यामध्ये व्हिक्टोरिया हायस्कूल सुरु केले होते. त्यांनी रमाबाई असोसिएशनच्या कार्यकारी मंडळाला २७ जानेवारी १८९३ रोजी पत्र पाठविले त्यात शारदासदनाच्या अभ्यासक्रमाबद्दल गौरवोद्गार काढले मॅडम सोराबजी लिहितात, “The Government school schedule defines the curriculum of studies, but beyond this, she is training them to be thrifty, helpful and energetic. It is a liberal education in the true sense of the term.”[६३]

पं. रमाबाईंनी शारदासदनमध्ये अनौपचारिक अभ्यासक्रमातून जीवनोपयोगी शिक्षण दिले. शिक्षणातून समाजपयोगी नागरिक घडविण्याचा प्रयत्न केला. मॅडम सोराबजी शारदासदनच्या शिक्षणाविषयी खात्री देताना लिहितात की, “I am sure that with God’s blessing, she will succeed in educating these girls, so that they will become useful members of society.”[६४] शारदासदनने हा विश्वास सार्थ ठरविला होता.

शारदासदन शाळेत मुलींना सर्व सोई सुविधा पुरविल्या जात होत्या. “मुलींना फुकट शिक्षण देणे, निर्वाहापुरते आर्थिक बळ नसलेल्यांना शाळेत राहण्याची जागा देणे, अन्न–वस्त्र, पुस्तके पुरविणे इत्यादी सोई पुरविल्या होत्या.”[६५] आर्थिक परिस्थितीनुसार फी आकारली जात होती. मात्र ती ऐच्छिक होती. त्याकाळी स्त्री शिक्षण लोकसंमत नव्हते. विधवांचे शिक्षण पाप मानले जात होते. अशा परिस्थितीत स्त्रियांना साधारण व व्यावसायिक शिक्षण देऊन त्यांचे सक्षमीकरण साधण्याचा पं. रमाबाईंचा उपक्रम क्रांतीकारक होता.

पं. रमाबाईंच्या शैक्षणिक कार्याविषयी जयंती चक्रवर्ती लिहितात की, “She was the first to introduce Kindergraton System of educaiton and also the first to give a vocational bias to school education in India.”[६६]

### ४.३.५ शारदासदनमधील वातावरण :

पं. रमाबाईंनी पुण्याला स्टेशनजवळील बंगल्यात शारदासदन सुरु केले. येथील वस्ती (Camp Area) अतिशय चांगली होती. तिथे सुंदर वातावरण, आरामशीर राहणी, विधवांचे कौतुक याचे सुरेख वर्णन कृष्णाबाई गद्रे यांनी केले आहे. कृष्णाबाई गद्रे ह्या शारदासदनाची पहिली विद्यार्थीनी शारदा हिची मोठी बहीण होती. पं. रमाबाईंचे सहकारी गंगाधरपंत गद्रे यांची कन्या होती. ती शारदासदनची विद्यार्थीनी होती. पं. रमाबाईंनंतर त्यांनी बरीच वर्षे मुक्तीसदनचे काम पाहिले. त्या ‘स्मृतिसुमने’ या पुस्तकात लिहितात

की, "काय त्या बंगल्याची शोभा व काय तो सुंदर फुलांनी शृंगारलेला बगीचा! जिकडे पाहिजे तिकडे मोकाट फिरण्याची आम्हाला मुभा! दिवाणखाना देखील आमची बैठकीची जागा, सुंदर कोचा खूर्च्यांवर बसून गप्पा माराव्यात! बागेत जाऊन जाई-जुई, मोगरा, चमेली, बकुळा व मधुमालतीच्या वेण्या गुंफून केसांवर लादाव्यात; रमाबाईंनी आम्हाला फुलांची व झाडांची माहिती देऊन दुर्बिणीतून त्यांचे परीक्षण करण्यास शिकवावे, काय ते लाड अशा सुंदर वातावरणात आपले दिवस घालवायला कोण बालविधवा येणार नाहीत. चित्रे व पुस्तके यांचा हवा तेवढा संचय, कधी कधी रमाबाई स्वत: पहाटे उठून आम्हाला आगाशीवर नक्षत्रे व तारे पाहण्यास नेत असत व त्यांची नावे आम्हाला मोठ्या आवडीने शिकवीत असत."[६७]

शारदासदनाचे वातावरण पाहून पं. रमाबाईंचा जीवनाकडे पाहण्याचा आधुनिक दृष्टिकोन स्पष्ट होतो. 'आनंददायी वातावरणात आनंददायी शिक्षण' ही अभिनव कल्पना राबविली होती. शारदासदनात येण्यापूर्वी विधवा अत्यंत नकारात्मक जीवन जगत होत्या. त्यांच्यामध्ये निसर्गातील रसिकता निर्माण करण्याचा प्रयत्न पं. रमाबाईंनी केला होता. त्यांनी ग्रह-ताऱ्यांची खगोलीय माहिती दिली. त्यामुळे ग्रह-ताऱ्यांशी संबंधित अंधश्रध्दा व समजूती दूर होण्यास मदत झाली. "रमाबाईंनी मुलींना निसर्गातल्या फुला-पानांचे सौंदर्य पाहायला शिकविले, प्राण्यांवर प्रेम करायला शिकविले."[६८] त्यांनी मुलींची संवेदनशीलता जागृत केली. या संदर्भात प्रबोधनकार ठाकरे लिहितात, "कौटुंबिक व सामाजिक छळवादाने ज्यांचे जीवन नरकतूल्य झाले आहे अशा शेकडो अनाथ नि अपंग भगिनींना प्रेम व माणुसकीचा जिव्हाळा मला प्रत्यक्ष पटवून द्यायचा आहे. चित्रे नि पुस्तके दाखवून जगाची त्यांना माहिती द्यायची आहे."[६९] असे पं. रमाबाईंना वाटत होते. पं. रमाबाईंनी विधवांना एक व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा मिळवून दिली. आत्मप्रेरणेचे बळ दिले. स्त्रियांचे विशेषत: विधवा स्त्रियांचे आनंददायी अस्तित्व ही संकल्पना त्यांनी शारदासदनमध्ये सिध्द करुन दाखविली. आजच्या आधुनिक स्त्री वादाच्या चळवळीचे आद्यमूळ शारदासदनमध्ये दिसून येते.

पं. रमाबाईंनी प्रवेशित विधवांचे केशवपन बंद केले. त्यांना केस वाढवायला मुभा दिली. ही गोष्ट आनंदीबाईंच्या अनुभवावरुन दिसून येते. "आनंदीबाई सदनात आल्यावर हळू हळू बाईंनी आनंदीबाईंना केस वाढविण्यास उत्तेजन दिले. आपण केस वाढवित आहे हे कोणास

कळून नये म्हणून आनंदीबाई डोक्यावरुन पदर घेत व हनुवटीखाली सेफ्टीपीन लावून तो घट्ट बसवीत."[७०] अशाप्रकारे पं. रमाबाईंनी शेकडो वर्षांच्या परंपरांविरोधात सुधारणेचे कार्य केले. विधवांना सकेशा राहण्याचा मौलिक अधिकार प्राप्त करुन दिला. स्त्रियांच्या मुक्तीचे आद्य प्रवर्तनाचे काम शारदासदनमध्ये सुरु होते. पं. रमाबाई स्त्रियांच्या मुक्तीच्या आद्य प्रवर्तिका होत्या. आनंदीबाई कर्वे आपल्या 'माझे पुराण' या आत्मचरित्रात लिहितात, "अतिशय हालातून व दु:खातून आलेल्या ह्या विधवांना घरच्या सारखे वाटून त्यांचे दिवस सुखात जावेत ह्यासाठी रमाबाईंची खटपट असे."[७१] शारदासदनाच्या वातावरणाविषयी प्रबोधनकार ठाकरे लिहितात की, "पुणे येथील शारदा सदनातील व्यवस्था नि वागणूक आश्रमस्थ मुलींना अगदी माहेरघरासारखी वाटत असे."[७२] शारदासदनाच्या आश्रमीय जीवनाविषयी एका विद्यार्थीनीने लिहिले आहे. ती म्हणते, "बाई आमच्याशी वाटेल तितका वेळ बोलत खेळत उपदेश करीत बसायच्या. मुलींना अगदी सभ्यपणे वागावे. भांग सरळ, पदर ठाकठीक, पोषाख साधा असावा, छानछुकी त्यात नसावी, मोठ्याने बोलू नये किंवा खिदळू नये. वडील जनास मान द्यावा. विद्याभ्यासात गर्क नि पडेल त्या कामाला तत्पर असावे हेच त्यांचे आम्हाला शिक्षण असे."[७३]

शारदासदनाच्या आश्रमीय जीवनातील अनुभव विद्यार्थीनींनी लिहिले आहेत. येथील विद्यार्थीनी पत्राद्वारे अनुभव कथन केले आहे. चंद्राबाई हिने ३० मे १८८९ मध्ये शारदासदनमध्ये प्रवेश घेतला होता. दहाव्या वर्षी ती विधवा झाली होती. ती रमाबाई असोसिएशनला पाठविलेल्या पत्रात लिहीते की, "All the teachers are very kind to us, and teach us very nicely and carefully, so when I see Pandita Ramabai and all our teacher's trying to make us happy."[७४]चंद्राबाईच्या पत्रावरुन शारदासदनमध्ये विधवा मुलींची काळजी घेतली जात होती असे दिसते. द्वारकाबाई ही विद्यार्थीनी नवव्या वर्षी विधवा झाली होती. तिने असोसिएशनला मराठीमध्ये पत्र लिहिले. त्याचा भाषांतरीत सारांश खालीलप्रमाणे आहे, ती लिहीते की, "I also am one of the little girls but I am very fond of singing, we learn some small baby Marathi songs to English tunes. There are five or six of us little ones and we have some very nice games together in the evenings. We love staying here very much, all here are kind."[७५]द्वारकाबाई यांच्या पत्रावरुन शारदासदनाच्या आनंददायी वातावरणाची कल्पना येते. विधवांच्या कलागुणांना वाव दिला जात होता असे दिसून येते. बरमाबाई ही सातव्या वर्षी

विधवा झाली होती. अत्यंत गरीब होती. उपासमारीने त्रस्त होती. तिच्या जीवनात निराशा होती. ती फेब्रुवारी १८९० मध्ये शारदासदनमध्ये दाखल झाली. ती लिहीते की, “I am very glad to inform you that I am very happy here and Pandita Ramabai and our dear teachers are trying their best to make us happy.”[७६] बरमाबाई सारख्या नकारात्मक जीवन जगणाऱ्या विधवांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे काम शारदासदनमध्ये होत होते.

कृष्णाबाई ही विद्यार्थीनी बाराव्या वर्षी विधवा झाली होती. ती शारदासदनाच्या संदर्भात लिहीते की, “I think there is no other school in India where the girls are so happy and where they have their own ways and customs and such good system of teaching.”[७७] कृष्णाबाईंनी या पत्रातून शारदासदनविषयी अभिमान व्यक्त केला. येथे सर्व विधवांना स्वतःच्या रुढींचे पालन करण्याची मुभा होती.

वरील पत्रांतील मजकूरांवरुन लक्षात येते की, शारदासदनातील विद्यार्थीनी आनंदी सहजीवनाचा सुखद अनुभव घेत होत्या. विधवा म्हणून समाजाने त्यांना झिडकारले होते. येथे त्यांना प्रेमाची ऊब मिळाली. येथील शिक्षणामुळे माणूस म्हणून जगण्याची संधी मिळाली. त्या विधवांना स्वअस्तित्वाचा सन्मान मिळाला.

शारदासदनाच्या वातावरणात विधवांमध्ये सकारात्मक बदल होत होता. पं. रमाबाई त्या बदलांची नोंद घेत होत्या. शारदासदनाच्या अहवालामध्ये त्यांनी पाठविलेल्या पत्रांमध्ये, रोजनिशीमध्ये विधवांमध्ये होत असलेले बदल लिहीत होत्या. विधवांमध्ये होत असलेल्या बदलांची नोंदी त्यांनी ७ ऑक्टोबर १८८९ रोजी सिस्टर जिराल्डीन यांना पाठविलेल्या पत्रात केली आहे. त्या लिहितात, “There were a good many flower plants in our compound. but no child seemed to care for them for a long time. So one day I gathered a number of different kinds of flowers, showed them and gave a talk on flowers, to the girls, told them the uses and varieties, and showed the beauty of flowers. Ever since that time a day not passed by on which a flower was not brought to me by one or another child with a sweet look and expression in her eyes.”[७८]

अशा प्रकारे शारदासदनामध्ये विधवांच्या मूळच्या स्थितीमध्ये आमुलाग्र बदल झाले. या बदलांचे रुपांतर परिवर्तनामध्ये झाले त्यामुळे स्त्री परिवर्तनाच्या चळवळीत शारदासदनचे स्थान महत्वपूर्ण आहे.

## ४.४ महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा विवाह :

महर्षी कर्वे व गोदुबाई यांचा विवाह ११मार्च १८८३ रोजी झाला. गोदुबाई ही शारदासदनातील पहिली विधवा विद्यार्थीनी होती. "पहिले लग्न झाले तेव्हा गोदुबाईचे वय अवघे आठ वर्षाचे होते. तर तिचे बिजवर पती तिच्यापेक्षा सतरा वर्षांनी मोठे होते. लग्न वैशाखात झाले आणि पुढे भाद्रपदात त्यांना वैधव्य आले. विधवेवर असणारी सर्व बंधने एवढ्या बालवयात गोदुबाईंवर आली."[७९]

सदनात येण्यापूर्वी गोदुबाईंनी दोन वेळा आत्महत्येचा प्रयत्न केला होता. गोदुबाईने शारदासदनमध्ये ११ मार्च १८८९ रोजी प्रवेश घेतला होता. त्यावेळी तिचे वय २४ होते. ती प्रथम घरी राहूनच सदनाच्या शाळेत जात होती. पुढे ती सदनात रहायला आली. "गोदुच्या कामासाठी बदली म्हणून घरी गडी ठेवायला गोदुच्या बाबांना पंडिता रमाबाई ५० रु. देत."[८०] गोदुबाई चार वर्षे शारदासदनात राहिल्या. शारदासदनातील मुक्त व प्रसन्न वातावरणामुळे तिच्या जीवनाला नवी दृष्टी मिळाली.

पं. रमाबाईंनी धोंडो केशव कर्वे व गोदुबाई यांच्या विवाहाच्या प्रस्तावास हरकत घेतली होती. "कर्वे यांची प्रकृती किरकोळ आहे. शिवाय त्यांना बारा वर्षाचा पहिला मुलगा आहे. त्यांचा पगार थोडा आहे."[८१]असे सांगण्याचा त्यांचा हेतू होता. कर्वे शरीराने किरकोळ होते. ते गरीब होते. त्यामुळे ते गोदुबाईला सुखात ठेवतील याचा विश्वास त्यांना वाटत नव्हता. "पुढे या लग्नास मान्यता देताना त्यांनी व्यवहारी धोरण ठेवून कर्व्यांना त्यांची ३००० रु. ची विमा पॉलिसी गोदुबाईच्या नावावर करायला लावली व लग्न थाटाने लावून दिले."[८२] यामागे गोदुबाईची भविष्यकालीन आर्थिक सुरक्षितता हा हेतू होता. पति निधनानंतर स्त्रीची आर्थिक सुरक्षितता जपण्याच प्रयत्न त्यांनी केला. "या विवाहाच्या लग्न पत्रिकेवर श्री. रामभाऊ जोशी व गोपाळ गणेश आगरकर यांच्या सह्या होत्या व कर्वे मुलीशी चांगले वागतील, तिचे आयुष्य सुखाचे होईल याबद्दल खास तजवीज करतील याबद्दल आगरकर जामीन राहिले होते."[८३]

विधवा पुनर्विवाहाचा विचार शारदासदनात प्रत्यक्ष कृतीत आणला होता. पं. रमाबाईंनी पुढे मुक्ति सदनामध्ये विवाह विभाग स्थापन केला. हजारो अनाथ व विधवा मुलींचे विवाह घडवून आणले. "गोदुबाईच्या वाट्याला आलेला खडतर वैधव्य काळ जाऊन पुन्हा सौभाग्यवतीचे आनंदमय जीवन केवळ पं. रमाबाईंमुळेच आले होते."[८४]

## ४.५ पं. रमाबाईंच्या कार्याचा इंडोनिशियावर प्रभाव :

एकोणिसाव्या शतकात इंडोनेशिया हा सनातन विचारसरणीचा मुस्लिम देश होता. या देशावर डचांचे राज्य होते. तेथे "स्त्रियांना वयाच्या बाराव्या वर्षानंतर घराच्या बाहेर पडणे हे सामाजिक पातक समजले जाई. स्त्री शिक्षणाची कल्पना कोणी करु शकत नव्हता."[८५] इंडोनेशियाच्या राजकन्येचे नाव कार्टिनी होते. डच अधिकाऱ्यांच्या उत्तेजनामुळे तिला प्राथमिक शाळेत शिकण्याची परवानगी मिळाली होती. ती फ्रेंच भाषा शिकली होती. "एकदा एका फ्रेंच वर्तमान पत्रात रमाबाईंच्या कार्याविषयी तिने वाचले व आपल्या देशातही स्त्रियांची प्रगती व्हायला हवी ही कल्पना त्या मुलीच्या लहानशा डोक्यात घोळू लागली. तिने युरोपमध्ये पुष्कळशा पत्र मैत्रिणी (Pen Friends) मिळविल्या. आपल्या चार भिंतीच्या आत बसून करता येईल ते ती करु लागली व तिच्या खटपटीने स्त्री शिक्षणास सुरुवात झाली."[८६]

आज इंडोनेशिया पुरोगामी विचारांचा देश म्हणून ओळखला जातो. जगातील सर्वाधिक मुस्लिम लोकवस्ती या देशात आहे. आज तिथे आधुनिक विचारसरणी आढळते. येथील स्त्रिया सर्व तऱ्हेचे शिक्षण घेत आहेत व राष्ट्राच्या प्रगतीला हातभार लावत आहेत.

"राजकन्या कार्टिनीचा पत्रसंग्रह पुढे 'Through Darkness in to light'ह्या नावाने प्रसिध्द करण्यात आला. त्यात आपल्या ह्या कामाचे उत्तेजन आपल्याला रमाबाईंच्या उदाहरणाने प्राप्त झाले असे तिने म्हटले आहे."[८७] इंडोनेशियामध्ये स्त्री शिक्षणाची सुरुवात पं. रमाबाईंच्या स्फूर्तीने झाली असे त्यात नमूद केले आहे.

## ४.६ पंडिता रमाबाईंची राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनातील कामगिरी : (डिसें. १८८९)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे पाचवे अधिवेशन २६ डिसेंबर ते २८ डिसेंबर १८८९ रोजी मुंबई येथे भरले होते. "या अधिवेशनामध्ये आर्य महिला समाज व मद्यपान निषेध सभेच्या आठ

स्त्री प्रतिनिधी सहभागी झाल्या होत्या."[८८] ह्या दोन्ही संस्था पं. रमाबाईंच्या नेतृत्त्वाखाली चालल्या होत्या. राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात भाग घेणाऱ्या त्या पहिल्या महिला प्रतिनिधी होत्या.

राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन संपल्यावर त्याच मंडपात सामाजिक परिषद भरत असे. या सामाजिक परिषदेमध्ये श्री. सुब्रमण्यम अय्यर यांनी केशवपनासंबंधी ठराव मांडला होता. त्याला अनुमोदन देताना पं. रमाबाईंनी क्रांतीकारी विचार मांडले. त्या म्हणाल्या, "विधवा वयात आल्यावर आपण कसे राहायचे ते ठरविण्याची तिला संपूर्ण मोकळीक असावी. आपले केस वाढवावे असे जर तिला वाटत असेल तर तसे करण्यास तिला संपूर्ण स्वातंत्र्य असावे."[८९] इच्छेविरुध्द केशवपन हा पीनल कोडखाली गुन्हा होता. असे कृत्य करणाऱ्यास तीन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा होती. मात्र या कायद्याचे पालन होत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. केशवपनाच्या संदर्भात या अधिवेशनात ठराव मांडला होता की, "The disfiguremet of child that age without the consent of the widow, recorded in writing before a Panch and a magistrate, should be prohibited by law"[९०] पं. रमाबाईंनी या ठरावामध्ये दुरुस्ती सुचविली. केशवपनासंदर्भात १८ वर्षाची अट रद्द करावी असे सुचविले. या सामाजिक परिषदेत त्यांनी स्त्रियांच्या मुलभूत निर्णय स्वातंत्र्याचा आग्रह धरला. समाज सुधारणेसाठी लोकजागृती सोबत कायद्याची गरज असल्याचे सांगितले. स्त्रियांना कायद्याचे ज्ञान पाहिजे, तसेच कायदे वापरण्याचे धैर्य हवे हा क्रांतीकारी विचार मांडला. पं. रमाबाईंच्या या कामगिरीविषयी एम. संतोषकुमार लिहितात की, "This marked the beginning of the women's entry into politics and their involvement in political and national welfare activities."[९१] राजकीय व्यासपीठावर विचार मांडणाऱ्या त्या पहिला महिला होत्या.

## ४.७ **संमती वयाच्या बिलास पाठींबा :** (ऑगस्ट १८९०)

पं. रमाबाईंनी संमती वयाच्या बिलाला पाठिंबा दिला होता. या कायद्यासंदर्भात सामाजिक चळवळ सुरु होती. त्यांनी यात स्त्रियांची बाजू मांडली होती. "१८६० च्या पीनल कोडच्या कलम ३७५ कायद्यानुसार १० वर्षाच्या आतील पत्नीशी केलेले समागम हा बलात्कार

ठरला होता."[९२] दहा वर्षाच्या आतील स्त्रीशी पुरुषाने संभोग केला तर नवऱ्याला कायद्याने शिक्षा व्हावी, ही कायद्याची बाजू होती.

संमतीवयाचा कायदा सन १८९१ मध्ये पास झाला. हा कायदा होण्यास फुलमणी खटला तत्कालीक कारण ठरला. "फुलमणिला दहा वर्षे संपूर्ण अकरावे लागले. तेव्हाच तिचा जबरी संभोगाने मृत्यू ओढावला होता, म्हणून कोर्टमध्ये तो बलात्कार ठरला नव्हता."[९३] यामुळे संमती वयाचा वाद सुरु झाला. संमतीचे वय १० ऐवजी १२ करावे अशी चर्चा सुरु झाली. पं. रमाबाईंनी संमतीचे वय वाढविण्यासाठी सामाजिक प्रबोधन केले. संमती वयाच्या बिलाचा हिरीरीने पुरस्कार केला. "संमती वयाचा विचार करण्यासाठी आर्य महिला समाजाची सभा भरली होती. या सभेस १०० कुलीन स्त्रिया हजर होत्या. या सभेत पं. रमाबाईंनी लग्न झालेल्या मुलीचे समागमनाचे वय वाढविणाऱ्या बिलाचा जोरदार पुरस्कार केला."[९४] या सभेत मुलीचे समागमनाचे वय १२ असावे अशी मागणी गेली. १४ वर्षाच्या आतील मुलीने मातृत्त्व स्विकारु नये असे सुचविले. पं. रमाबाईंनी स्त्री ची शरीररचना, तिचे वयात येणे व लहान वयात लैंगिकतेवर येणारा दबाव याविषयी चर्चा घडवून आणली.

संमतिबिलाच्या संदर्भात तत्कालीन सुधारकांनी व सनातनी मंडळींनी सकारात्मक व नकारात्मक भूमिका मांडली. या बिलास विरोध करणाऱ्यांची भूमिका धर्म भावनेशी जोडलेली होती. ते स्त्रियांच्या नैसर्गिक जीवनाचा विचार करीत नव्हते. पंडिता रमाबाईंनी"संमति वयाच्या कायद्याची मागणी करणाऱ्यांचे अभिनंदन केले. आपला पाठिंबा दिला आणि सरकारने संमति वयाचा कायदा करावा असा अर्ज सरकारकडे पाठविला. त्या अर्जावर पुण्यातला तिनशे स्त्रियांनी सह्या केल्या होत्या."[९५] पं. रमाबाईंनी या बिलाचा संबंध मुलीच्या शारीरिक परिपक्वतेशी जोडला. अल्पवयीन मुलींना समागमनासाठी प्रवृत्त करणेही त्यांना मान्य नव्हते. मुलींमध्ये स्त्री–पुरुष संबंधातील नैसर्गिक भावनेतील परिपक्वता आल्यावर समागम व्हावा हा महत्वाचा विचार मांडला. अल्पवयातील समागमाची सक्ती केल्यावर मुलींमध्ये निर्माण होणाऱ्या शारीरिक व्याधींकडे लक्ष वेधले. पं. रमाबाईंच्या दृष्टीने संमतिबिल महत्वाचे होते. या संदर्भात त्या लिहितात, "Last year when a great agitation concerning the Age of Consent Bill was exciting the country and another movement in the interest of stopping terrible opium traffic was urged among our people:"[९६]

संमतिवयाच्या बिलामुळे मुलींचे समागमनाचे वय वाढणार होते. या बिलाकडे पंडिता रमाबाईंनी सकारात्मक सामाजिक बदल या दृष्टीने पाहिले.

## ४.८ शारदासदनमधील विद्यार्थीनींच्या हकिकती :

पं. रमाबाईंचे एक चिकटबुक मुक्ति मिशनच्या संग्रहालयात आहे. त्यात मुलींच्या हकिकती लिहून ठेवलेल्या आहेत. पं. रमाबाईंनी सिस्टर जिराल्डीन यांना पाठविलेल्या पत्रामध्ये विधवा मुलींची माहिती लिहीली होती. रुक्मिणीबाई ही विधवा विद्यार्थीनी होती. वयाच्या २१ व्या वर्षी ती विधवा झाली होती. वयाच्या २२ व्या वर्षी ती शारदासदनमध्ये दाखल झाली होती. अशी माहिती रमाबाई असोसिएशनच्या सन १८९१ च्या वार्षिक अहवालामध्ये प्रसिध्द झाली होती. “तिच्या सासू-सासऱ्याने तिचा अनन्वित छळ मांडला होता. आढ्याला दोर बांधून त्यावर तिला घोडी देत. म्हणजे वरती आढ्याला बांधलेल्या दोरीला टांगत, तिने खाली उडी मारु नये म्हणून खाली काटे किंवा निखारे पसरीत. अशा रीतीने बिचारीला तास न् तास लोंबकळत रहावे लागे.”[९७]

पं. रमाबाईंनी सिस्टर जिराल्डीनला २३ डिसेंबर १८९२ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये तारा या बालविधवेची हकिकत दिली आहे. त्या लिहितात, “She is a Brahmin by caste. When only 5 years of age, she was sold by her parents who took Rs.100 from a man of 45 years of age and gave her in marriage to him. He died within a year after this miserable marriage leaving a baby widow of six years behind him... from the time of her husband’s death. She began to be treated most cruelty by these people.”[९८]“तिचा सासू, दीर व जाऊ यांच्याकडून छळ होत होता. तिच्या तोंडावर आणि साऱ्या अंगावर तापलेल्या पळीचे डागच डाग देण्यात आले होते.”[९९] पं. रमाबाईंनी तिची सुटका करण्यासाठी दोन माणसे पाठविली होती. “तिला बाईंच्या लोकांनी ताबडतोब मुसलमानी मुलीचा पोषाख चढविला आणि तिघे स्टेशनवर पोहोचले.”[१००] अशाप्रकारे तारा या बालविधवेची सुटका केली.

पं. रमाबाईंनी सन १८९२ च्या पत्रामध्ये सरस्वती ची हकिकत दिली आहे. सरस्वती अठरा वर्षांची वैश्य विधवा होती. “तिच्या आई-वडीलांनी आठव्या वर्षी कुंटणखान्यात विकण्याचा प्रयत्न केला होता. तेथून तिची सुटका शेजाऱ्यांमुळे झाली. ११ वर्षांची झाल्यावर तिचा विवाह झाला. तिला एक मूल झाले... तिचा नवरा हृदयविकाराने मरण पावला. तिचा छळ

सुरु झाला. शेवटी मूल कोणाच्या तरी दारात टाकून द्यायचे व आत्महत्या करायची असे तिने ठरविले"[१०१] पं. रमाबाईंनी तिला आसरा दिला.

जिऊ नावाच्या बालविधवेची कथा हृदयद्रावक आहे. "जिऊचं लहानपणीच एका वृध्दाशी लग्न लावून देण्यात आले. म्हातारा आजारी पडला. नऊ वर्षाची जिऊ त्याची सेवा करीत होती. नवरा बरा व्हावा म्हणून तिच्यामागे व्रत, उद्यापनं लावून दिली. नवरा मेला, तिच्या पूर्वजन्मीचं पाप म्हणून छळ वाढला. ती पोर माहेरी पळून आली. तिथेही अपशकुनी म्हणून डिवचण्यात आले. पुढे आई-बाप वारले. भावभावजयींनी छळ केला. शेवटी छळ सोसवेना म्हणून जीव द्यायला नदीवर केली, पण मेली नाही."[१०२] पुढे पोलीसांनी दिला शारदासदनमध्ये आणले. पं. रमाबाईंनी तिचा सांभाळ करुन शिक्षण दिले.

पं. रमाबाई ७ ऑक्टोबर १८८९ च्या पत्रामध्ये काशी या बालविधवेचे वर्णन करतात. त्या लिहितात, "Kashi – this is her name – looked nothing but a Skeleton covered with skin. She had such a sad forlorn look. it made my heart ache and tears came in my eyes to see that child in such a bad condition."[१०३] काशीबाई ही ब्राम्हण विधवा १२ व्या वर्षी शारदासदनात आली होती. ११ व्या वर्षी ती विधवा झाली होती. नवऱ्याकडील लोकांनी तिचे खूप हाल केले होते. उपासमारीने वाईट अवस्था झाली होती.

वरील बालविधवांचा उल्लेख उदाहरणादाखल केला आहे. शारदासदनमध्ये प्रवेशित विद्यार्थीनींचा तपशिल पुढील तक्त्यामध्ये दिला आहे. या तक्त्यामध्ये दर्शविलेल्या विद्यार्थीनी शारदासदनाच्या सन १८९० मध्ये पटावर होत्या.

## शारदासदनमधील प्रवेशित विद्यार्थीनींचा तपशील (सन १८९०)
### विधवा विद्यार्थीनी

| अ.क्र. | विद्यार्थीनीचे नाव | जात | प्रवेश घेते वेळी वय | विधवा विवाहीत की अविवाहीत | विधवा होते वेळचे वय | पत्ता | प्रवेश घेताना मराठीचे ज्ञान | प्रवेश दिनांक | निवासी की अनिवासी | मदत कोणी केली | शारदासदनमध्ये प्रवेशा पूर्वीची स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोदुबाई | ब्राह्मण | २२ | विधवा | ८ | रत्नागिरी | नाही | ११ मार्च १८८९ | निवासी | शारदासदन | कुटूंबाकडून काळजी घेतली जात नव्हती, दु:खी जीवन, ध्येयहीन जीवन |
| २ | चंद्राबाई | वैश्य | १९ | विधवा | १० | मुंबई | ३ इयत्ता | ३० मे १८८९ | निवासी | शारदासदन | सुस्थितीत होती, बालशिक्षिका होती, हुशार होती. |
| ३ | विठाबाई | वैश्य | १९ | विधवा | ११ | मुंबई | नाही | १५ जून १८८९ | निवासी | शारदासदन | सदनात येण्यापूर्वी उपासमार होत होती, आता आनंदी आहे. |
| ४ | ठकूबाई | ब्राह्मण | २० | विधवा | ७ | पुणे | २ इयत्ता | १ जुलै १८८९ | निवासी | शारदासदन | निराधार मदतहीन व उपासमारीने त्रस्त होती. |
| ५ | भागूबाई | वैश्य | २० | विधवा | १५ | मुंबई | नाही | १५ जुलै १८८९ | निवासी | शारदासदन | निराधार मदतहीन व उपासमारीने त्रस्त होती. |
| ६ | काशीबाई | ब्राह्मण | १२ | विधवा | ११ | बासेन | प्राथमिक | ३० जुलै १८८९ | निवासी | शारदासदन | नवऱ्याकडील नातेवाईकांकडून हाल केले जात होते, उपास-मारीने वाईट अवस्था. |
| ७ | पार्वतीबाई | वैश्य | १२ | विधवा | ११ | मुंबई | प्राथमिक | जून १८९० | निवासी | शारदासदन | भावाकडून चांगली वागणूक मिळत होती. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | बरमाबाई | ब्राह्मण | १६ | विधवा | ७ | हैद्राबाद | -- | फेब्रुवारी १८९० | निवासी | शारदासदन | अत्यंत गरीब, जीवनामध्ये निराशा होती, उपासमारीने त्रस्त. |
| ९ | तुंगाबाई | ब्राह्मण | १५ | विधवा | १२ | दुर्गा मंगळूर | नाही | १५ जून १८९० | निवासी | शारदासदन | निराधार मदतहीन व अत्यंत वाईट जीवन जगत होती. |
| १० | मथुराबाई | ब्राह्मण | १२ | विधवा | ११ | राहूरी | नाही | मे १८९० | निवासी | शारदासदन | उपासमारीने त्रस्त व वाईट वागणूक मिळत होती. |
| ११ | जानकीबाई | ब्राह्मण | २० | विधवा | १७ | पारनेर | प्राथमिक | १५ जून १८९० | निवासी | शारदासदन | मित्रांकडून काळजी घेतली जात होती मात्र नेहमी आजारी असे. |
| १२ | गिरीजाबाई | ब्राह्मण | २० | विधवा | १९ | पुणे | प्राथमिक | ऑगस्ट १८९० | निवासी | मित्रांनी | सुस्थितीत होती मात्र जीवनामध्ये निराशा होती. |
| १३ | सईबाई | ब्राह्मण | १७ | विधवा | ६.५ | बडोदा | नाही | सप्टेंबर १८९० | निवासी | शारदासदन | बेघर निराधार भटके जीवन होते, उपासबारीने त्रस्त होती. |
| १४ | कृष्णाबाई | ब्राह्मण | १५ | विधवा | १२ | पुणे | १ इयत्ता | नोव्हेंबर १८९० | अनिवासी | मित्रांनी | सुस्थितीत होती, नातेवाईकां-कडून काळजी घेतली जात होती. |
| १५ | द्वारकाबाई | ब्राह्मण | ९ | विधवा | ८ | पुणे | प्राथमिक | नोव्हेंबर १८९० | निवासी | शारदासदन | अत्यंत गरीब, नातेवाईकांनी घराबाहेर काढले होते. |
| १६ | रुक्मीणीबाई | ब्राह्मण | २२ | विधवा | २१.५ | माला मंगळूर | नाही | नोव्हेंबर १८९० | निवासी | शारदासदन | स्थिती बरी होती मात्र सतत आजारी असे. |
| १७ | रुक्मीणीबाई | ब्राह्मण | १७ | विधवा | १६ | दुर्गा मंगळूर | नाही | नोव्हेंबर १८९० | निवासी | शारदासदन | अत्यंत गरीब, जबरदस्तीने वाईट मार्गाला लावले होते. |
| १८ | काशीबाई | ब्राह्मण | ९ | विधवा | ८ | दुर्गा मंगळूर | नाही | नोव्हेंबर १८९० | निवासी | शारदासदन | नातेवाईकांकडून अत्याचार होत होता, वाईट प्रभाव पडला होता. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | प्रेमाबाई | ब्राह्मण | २३ | विधवा | २१ | सातारा | २ इयत्ता | डिसेंबर १८९० | निवासी | शारदासदन | बेघर निराधार भटके जीवन होते, उपासमारीने त्रस्त होती. |
| २० | रुक्माबाई | ब्राह्मण | २३ | विधवा | १३ | कोल्हापूर | प्राथमिक | डिसेंबर १८९० | निवासी | शारदासदन | बेघर निराधार भटके जीवन होते, उपासमारीने त्रस्त होती. |
| २१ | रंगूबाई | ब्राह्मण | १५ | विधवा | १२ | सातारा | २ इयत्ता | डिसेंबर १८९० | निवासी | शारदासदन | भावाकडून चांगली काळजी घेतली जात होती, ती सुशिक्षित व्हावी ही त्याची इच्छा होती. |
| २२ | सुंदरबाई | क्षत्रिय | १२ | विधवा | ११ | पुणे | नाही | जानेवारी १८९१ | निवासी | कुटुंब | अत्यंत गरीब होती, सभोतालच्या वाईट गोष्टींचा परिणाम झाला होता. |
| २३ | नर्मदाबाई | ब्राह्मण | २१ | विधवा | ७ | मालवण | प्राथमिक | जानेवारी १८९१ | निवासी | शारदासदन | नातेवाईकांकडून काळजी घेतली जात होती मात्र जीवनात निराशा होती. |
| २४ | सुभद्राबाई | ब्राह्मण | २५ | विधवा | २५ | दुर्गा मंगळूर | प्राथमिक | नोव्हेंबर १८९० | निवासी | शारदासदन | बेघर निराधार भटके जीवन होते, उपासमारीने त्रस्त होती. |
| २५ | काशीबाई | वैश्य | १४ | विधवा | १३ | अहमदनगर | १ इयत्ता | नोव्हेंबर १८९० | निवासी | शारदासदन | सुस्थितीमध्ये होती, मात्र गरीब होती, शिकावे ही नातेवाईकांची इच्छा होती. |
| २६ | नर्मदाबाई | ब्राह्मण | २३ | विधवा | १४ | मालवण | नाही | २० जाने. १८९१ | निवासी | शारदासदन | अत्यंत गरीब, सतत आजारी, जीवनात निराशा, उपासमारीने त्रस्त होती. |

## विधवा नसलेल्या विद्यार्थीनी

| अ.क्र. | विद्यार्थीनीचे नाव | जात | प्रवेश घेते वेळी वय | विधवा विवाहीत की अविवाहीत | विधवा होते वेळचे वय | पत्ता | प्रवेश घेताना मराठीचे ज्ञान | प्रवेश दिनांक | निवासी की अनिवासी | मदत कोणी केली | शारदासदनमध्ये प्रवेशा पूर्वीची स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रंगूबाई | वैश्य | १८ | परितक्त्या | | मुंबई | १ इयत्ता | जून १८९० | निवासी | शारदासदन | अत्यंत वाईट वागणूक मिळत होती, आत्महत्येचा प्रयत्न केला होता. |
| २ | शारदाबाई | ब्राह्मण | १३ | अविवाहीत | | मुंबई | ३ इयत्ता | ११ मार्च १८८९ | निवासी | कुटुंब | पालकांकडून चांगली काळजी घेतली जात होती, ती सुशिक्षित व्हावी ही त्याची इच्छा होती. |
| ३ | लक्ष्मीबाई | वैश्य | ११ | परितक्त्या | | मुंबई | नाही | मे १८८९ | निवासी | शारदासदन | अत्यंत वाईट वागणूक मिळत होती, आत्महत्येचा प्रयत्न केला होता. |
| ४ | सोनाबाई | वैश्य | १८ | परितक्त्या | | मुंबई | नाही | जुलै १८८९ | निवासी | शारदासदन | अत्यंत वाईट वागणूक मिळत होती, तिच्या हत्येचा प्रयत्न झाला होता, उपासमारीने त्रस्त होती. |
| ५ | चंद्रभागा | ब्राह्मण | १३ | विवाहीत | | कोल्हापूर | प्राथमिक | जून १८८९ | निवासी | कुटुंब | काळजी घेतली जात होती, शिकण्याची नवऱ्याची इच्छा होती. |
| ६ | गोमती | वैश्य | १७ | अविवाहीत | | मांडवी | नाही | जून १८९० | निवासी | कुटुंब | जबरदस्तीने वाईट मार्गाला लावले होते. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | कृपा | ब्राह्मण | १७ | अविवाहीत | | खामगाव | प्राथमिक | जानेवारी १८९० | निवासी | कुटुंब | जीवनात भटकंती होती. |
| ८ | गंगू | ब्राह्मण | १० | अविवाहीत | | पारनेर | प्राथमिक | सप्टेंबर १८९० | निवासी | कुटुंब | काळजी घेतली जात होती. |
| ९ | भागी | ब्राह्मण | ९ | अविवाहीत | | पुणे | प्राथमिक | नोव्हेंबर १८९० | निवासी | कुटुंब | काळजी घेतली जात होती. |
| १० | सुभद्रा | ब्राह्मण | ७ | अविवाहीत | | माला मंगळर | नाही | नोव्हेंबर १८९० | निवासी | कुटुंब | अनाथ होती. |
| ११ | ताराबाई | ब्राह्मण | २१ | अविवाहीत | | पुणे | प्राथमिक | नोव्हेंबर १८९० | अनिवासी | कुटुंब | आनंदी कौटूबिक जीवन, शिकावे ही नवऱ्याची इच्छा होती. |
| १२ | सुंद्राबाई | ब्राह्मण | १७ | विवाहीत | | पुणे | २ इयत्ता | नोव्हेंबर १८९० | अनिवासी | कुटुंब | आनंदी कौटूबिक जीवन, शिकावे ही नवऱ्याची इच्छा होती. |
| १३ | राधाबाई | ब्राह्मण | १६ | विवाहीत | | पुणे | २ इयत्ता | नोव्हेंबर १८९० | अनिवासी | कुटुंब | आनंदी कौटूबिक जीवन, शिकावे ही नवऱ्याची इच्छा होती. |

(Source : Report of Annual Meeting of Ramabai Association held March 2, 1891)

या तक्त्यावरुन लक्षात येते की, शारदासदनमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी सर्वच विधवांची स्थिती वाईट होती. त्यांची उपासमार होत होती. त्या निराधार व मदतहीन होत्या. त्यांच्या जीवनामध्ये अत्यंत निराशा होती. त्यातील काही बेघर होत्या.

पं. रमाबाईंनी या विधवांचे पुनर्वसन केले, त्यांना शिक्षण दिले. त्यांना सुस्थिर व निर्भय जीवनाचा आनंद मिळवून दिला. त्यांच्या स्त्री जीवनाला मूल्य प्राप्त करुन दिले.

## ४.९ शारदासदनवर धर्मांतराचे आरोप :

ख्रिस्त निष्ठा हा पं. रमाबाईच्या जीवनातील स्थायीभाव होता. अमेरिकेतून मिळणारी मदत व ख्रिस्त निष्ठा या बळावर त्यांनी शारदासदन सुरु केले होते. त्याकाळी स्त्रीला कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. अशा वेळी पं. रमाबाईंनी ख्रिस्ती धर्म आपणहून स्वीकारणे ही क्रांती होती. या अगोदर पुष्कळ पुरुषांनी ख्रिस्त धर्म स्विकारला होता. त्यांच्या बरोबर पत्नी धर्म म्हणून नाईलाजाने त्यांच्या पत्नीही ख्रिस्ती झाल्या होत्या. परंतु, "बुध्दीला पटले म्हणून स्वत:च्या निवडीने ख्रिस्ती झालेली पं. रमाबाई ही पहिलीच मराठी स्त्री होती."[१०४]

शारदासदनाच्या स्थापनेच्या वेळी ख्रिस्ती संस्था म्हणून समाजाने संशय घेतला होता. शारदासदनाच्या उद्घाटनास जाण्यास काशीबाई कानिटकर यांनी नाकारले होते. शारदासदनात धर्मांतराचे प्रयोग होतील असा त्यांना संशय होता. "ही संस्था ख्रिस्ती नसेल, या संस्थेत येणाऱ्या स्त्रियांना ज्ञान दिले जाईल व आपापल्या इच्छेनुसार धर्माचरणही करता येईल अशी हमी पंडीताबाईंनी दिल्यावरच काशीबाई शारदासदनाच्या उद्घाटनाला गेल्या."[१०५]

शारदासदन पुण्यामध्ये आल्यानंतर धर्मांतराविषयी आरोप झाले. "शारदासदनबद्दलची शंका सुरुवातीपासून लोकांच्या मनात होती. तरीही पं. रमाबाईंची धडाडी, स्त्रियांबद्दल वाटणारी कळकळ, यांची विद्वता आणि अमेरिकेतून हजारो रुपये मिळवून शारदासदनासारखी संस्था काढण्यामधले त्यांचे कर्तृत्त्व या सगळ्याने प्रभावित होऊन डॉ. भांडारकर, न्या. रानडे, रा.ब. भट यांनी शारदासदनचे सल्लागार म्हणून आवडीने काम पत्करले."[१०६]

सुरुवातीला शारदासदनाच्या कार्याला सुधारक मंडळींनी पाठिंबा दिला होता. त्यांच्या कार्याचे कौतुक केले होते. विधवांच्या शिक्षणाच्या कार्याला उत्तेजन दिले होते. पं. रमाबाई त्यांच्या मदतीविषयी आभार मानताना लिहितात की, "Many thanks are also due to the

memebers of our advisory board of Bombay and Poona. They have always been ready to give me their advice and help whenever I wanted them."[१०७] पं. रमाबाई शारदासदनाच्या कार्याला मिळालेल्या मदतीचा व्यक्तीश: उल्लेख करतात. त्या लिहितात,"Our good friend Mr. Chandvarkar has shown great kindness toward us in doing the necessary legal work free of charge... The Hon. Mr. M. G. Ranade helped us in drawing the title-deed in correct form. Dr. R. G. Bhandarkar, R. B. G. G. Gokhali, R. B. Kanitkar and other gentleman have been very prompt in giving their help and advice on many occasions. Rao saheb C. N. Bhat has kindly audited our accounts and helped us in many other ways."[१०८]

यावरुन शारदासदनाच्या कार्याची गरज सुधारकांना वाटत होती. ते शारदासदनाच्या कामामध्ये मदत करीत होते. पं. रमाबाईंना मिळणाऱ्या पाठिंब्याविषयी मिस. सराह डी. हॅमलिन लिहितात की, "I find in Poona even among the orthodox Hindu such a love and respect for the beautiful woman of your noble sister hood."[१०९]

यावरुन सुरुवातीला सनातनी मंडळींनाही पं. रमाबाईंच्या कार्याविषयी आदर वाटत होता असे दिसते. पुढील काळात शारदासदनातील ख्रिस्ती प्रभाव वाढला. तशा बातम्या वर्तमानपत्रामध्ये छापून आल्या. या बातम्यांनी लोक अस्वस्थ झाले. वृत्तपत्रांमधून पं. रमाबाईंच्या ख्रिस्ती प्राथनेवर आक्षेप घेतला होता. "पं. रमाबाई खोलीचे दरवाचे नेहमीच उघडे ठेवत. पहाटे पाच वाजता त्या मनोरमा व शाळेतील एक ख्रिस्ती शिक्षकीण बाईंच्या खोलीत गाणी म्हणून बायबलमधून शास्त्रभाग वाचीत व प्रार्थना करीत. आधी कुतूहल म्हणून मुली बाहेरुन डोकावून पहात मग त्या आत येऊन बसून लागल्या व शेवटी प्रार्थनेतही भाग घेऊ लागल्या."[११०] या प्रार्थनेचा प्रभाव बालविधवांवर पडू लागला. यावरुन पं. रमाबाईंचे सल्लागार मंडळींशी मतभेद झाले. सल्लागार मंडळीतील आर. जी. भांडारकर, न्या. रानडे, एम. जी. रानडे व सी. एन. भट यांनी १३ ऑगस्ट १८९३ रोजी रमाबाई असोसिएशनला राजीनामा लिहून पाठविला. ते लिहितात की, "सदनाचा उपयोग जर उघड उघड मुली बाटविण्यासाठी (avowed proselytising) करायचा असेल तर आम्हाला ह्या संस्थेशी काही संबंध ठेवता येणार नाही."[१११]

पं. रमाबाईंनी आपली तटस्थ वृत्ती वेळोवेळी जाहिर केली. आपल्या धर्मनिरपेक्षतेची हमी दिली. मात्र धर्मनिरपेक्षतेचा अर्थ वेगवेगळा लावला गेला. हिंदु समाजाच्या दृष्टीने धर्मनिरपेक्षता म्हणजे ख्रिस्ती धर्माचा प्रसार न करणे असा अर्थ लावला. तर पं. रमाबाईंची धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मस्वातंत्र्य असा अर्थ लावला. शारदासदनातील मुलींना धर्म स्वातंत्र्य दिले होते. “सदनात येणाऱ्या मुलींना धर्माचरणाची मोकळीक होती. सोवळे, ओवळे, उपासतापास, स्नानपूजा इत्यादी नित्यनेम पाळण्याची मोकळीक होती.”[११२]

पं. रमाबाईंची धर्म निरपेक्षतेच्या बाबतीत भूमिका स्पष्ट होती. त्यांच्या धर्म स्वातंत्र्याच्या कल्पना आधुनिक विचारसरणीच्या द्योतक होत्या. शारदासदनातील मुलींना त्यांच्या धर्माचे अनुसरण करण्याची मुभा आहे. तसेच स्वातंत्र्य मलाही आहे असे त्या स्पष्ट करतात. याबाबतीत त्या म्हणतात, “मी माझ्या व माझ्या मुलीच्या कल्याणासाठी माझ्या खोलीत प्रार्थना करते. आता ते दार लावून मुलींना आत येण्यास नकार देणे हे धर्म स्वातंत्र्य नव्हे.”[११३] स्वत:च्या धर्माचरणावर बंधने लावून घेणे त्यांच्या सद्सदविवेकबुध्दीला पटत नव्हते. दि. १५ ऑगस्ट १८९१ रोजी सिस्टर जिराल्डीनला पाठविलेल्या पत्रात नमूद करतात की, “I had never forced religious instruction upon them, neighter had I ever said a Christian prayer in the school room, but carried on the school on strictly secular plan.”[११४] रमाबाई असोसिएशनच्या घटनेप्रमाणे शारदासदन निधर्मी ठेवण्याची स्पष्टोक्ती त्यांनी या पत्रातून दिली आहे. वैयक्तिक धर्माचरणाच्या बाबतीत त्या ठाम होत्या.

केसरी वृत्तपत्राने शारदासदनाच्या विरोधात मोठी मोहिम उघडली. केसरी मध्ये २३ जून १८९१ रोजी ‘शारदासदन व रा. ब. रानडे यांची मध्यस्थी’ हा अग्रलेख छापला होता. त्यामध्ये हिंदु चालीरिती झुगारुन देऊन मुलींना ख्रिस्ती धर्माकडे वळविण्याचा प्रयत्न रमाबाई करतात असा आरोप केला होता. केसरीकार लिहितात की, “अमेरिकी लोकांना केवळ लोकहिताच्याच दृष्टीने सदनास पैसे दिले नसून त्यांचा हेतू धर्मप्रसाराचा असावा. ही एक शुभवर्तमानाच्या प्रसाराची शाळा समजली पाहिजे व पंडितेला मिशनरी म्हटले पाहिजे.”[११५] या अग्रलेखामध्ये पं. रमाबाई व न्या. रानडे यांच्यावर टिका केली होती. पं. रमाबाई ह्या रानडे व भांडारकर यांना फसवतात व धर्मांतर घडवून आणतात असा आरोप केला होता. “केसरी वृत्तपत्राच्या ७ जुलै

१८९१ च्या अंकामध्ये 'सदनातील बाई व कोठीवरील बाई' हा अग्रलेख लिहीला होता. त्यात रमाबाईवर आधी केलेल्या धर्म प्रसाराच्या आरोपांचा पुनरुच्चार केला."[११६]

शारदासदनावर सर्वसाधारण उच्चवर्णीयांचा रोष होता. याचे कारण म्हणजे पं. रमाबाईंनी विधवांचे लाड केले हे होते. कृष्णाबाई गद्रे ह्या स्तुतिसुमने या पुस्तकात लिहितात की, "रमाबाई आपल्या मुलींना दुधातुपांत लोळवते, कधी कशाची तूट म्हणून माहितच नाही. मेजवान्यांचा थाट तर आजवर लोकांच्या मनात सारखा घोळत आहे."[११७] त्याकाळी बहुसंख्य लोक साधारण परिस्थितीत राहत होते. शारदासदनमधील विधवांची जीवनशैली पाहून लोकांना मत्सर वाटत होता. "कुठल्याही पुरुषालाही जे उपलब्ध नव्हते ते सर्व फक्त बायकांना आणि त्यात सुध्दा विधवांना मिळावे. हे या लोकांना खटकण्यासारखे होते."[११८] त्याकाळी विधवांचे जीवन रुढी परंपरेने बध्द केले होते. केशवपन करुन तिला विद्रुप केले जात होते. पं. रमाबाईंनी विधवा मुलींना केस वाढवायला उत्तेजन दिले. विधवांच्या आहारात दूध, तुप वर्ज्य होते. शारदासदनात दुध, तूप मुबलक प्रमाणात मिळत होते. सणावाराला विधवांवर बहिष्कार टाकला जात होता. शारदासदनामध्ये "लोणची, पापड, कुरड्या, शेवाया करणे ही मे महिन्यातील नेमकी कामे पेढे, बर्फी, लाडू, करंज्या, जिलब्या, कापण्या, चकोल्या, शेव, चिवडा, साखरभात, नारळीभात, मोदक एक ना दोन, शेकडो पक्वाने सणावाराला तयार होत असत."[११९] विधवांना चांगले जीवन जगू देणे सनातनी लोकांच्या मते गुन्हा होता. यामुळे शारदासदनविषयी लोकांची मने कलुषित झाली. शारदासदनामधील या परिस्थितीविषयी केसरीमध्ये 'शारदासदन व विधवा मिशन गृह' हा अग्रलेख छापला. त्यामध्ये "हे सदन म्हणजे केवळ मिशन गृहच नव्हे तर हिंदु मुलींना बाटविण्याचा मायावी बाजार आहे."[१२०] असे छापले होते. या लेखामध्ये पं. रमाबाईंना विश्वासघातकी, समाजद्रोही असे संबोधले.

अशाप्रकारे शारदासदनवर धर्मांतराचे आरोप होत होते. शारदासदनमुळे तत्कालीन पुराणमतवादी विचारांना धक्का बसला होता. त्यामुळे शारदासदनाला एत्देशीयांचे आर्थिक सहकार्य मिळाले नाही. यासंदर्भात श्री. वा. बा. केळकर लिहितात की, "शारदासदन हे सर्वस्वी पुराणमतवादी पध्दतीने चालेल किंवा चालावे, अशी फुकट्या हिंदु समाजाने अपेक्षा तरी का करावी? त्यातल्यापैकी अधिक जुन्या पध्दतीचे शिक्षण पाहिजे असल्यास त्यांनी वर्गण्या काढून स्वतंत्र संस्था का काढू नये?"[१२१]विधवांना शिक्षण देणारी संस्था स्वखर्चाने महर्षि धोंडो केशव

कर्वे यांनी सुरु केली. त्यामागे शारदासदनाची प्रेरणा होती. या उदाहरणाव्यतिरिक्त इतर कोणी विधवांच्या शिक्षणासाठी शाळा सुरु केल्याचा उल्लेख दिसत नाही.

सनातनी मंडळी शारदासदनवर धर्मांतराचे आरोप करीत होती. त्यांनी धर्म स्वातंत्र्याचा अर्थ मर्यादित अर्थाने घेतला होता. त्यांच्या मते धर्म स्वातंत्र्य म्हणजे हिंदु धर्माचरणाचे स्वातंत्र्य. शारदासदनमध्ये "काही मुलींना सोवळे ओवळे पाळण्यास (observe Caste) धरुन सांगण्यात आलेले होते. त्यांच्यासाठी वेगळी जागा त्यांना देऊन जिला तिला आपल्या जाती रिवाजाप्रमाणे सर्व नियम पाळण्यास व सोवळे ओवळे पाळण्यास मुभा होती."[१२२] शारदासदनमधील काही जणींना पालक नव्हते. त्यांचे पालन पोषण पं. रमाबाई करीत होत्या. या मुलींना प्रार्थनेला बसण्यासाठी कोणाची परवानगी घेण्याची गरज नव्हती. काही मुलींना त्यांच्या पालकांकडून प्रार्थनेला बसण्याची परवानगी मिळाली होती. काही मुली प्रार्थनेला बसण्याची परवानगी मागत. पं. रमाबाई त्यांच्या पालकांना विचारुन निर्णय घेत होत्या.

येथे पं. रमाबाई धर्म भावनेकडे व्यापक दृष्टिकोनातून पहात होत्या. त्यांच्या मते धर्म स्विकार ही मनाची अवस्था आहे. सत्याचा शोध घेण्याची उन्नत मानसिक अवस्था म्हणजे धर्म भावना होय. पं. रमाबाईंनी मुलींच्या धर्म भावनांचा आदर केला. मन परिवर्तनातून धर्म स्विकार त्यांनी त्याज्य मानला नाही. सुरुवातीच्या काळात मुली धर्म स्विकार करण्याची मागणी करीत होत्या, तेव्हा पं. रमाबाईंनी उघड उघड बाप्तिस्मे देणे टाळले होते. पं. रमाबाईंचा वरील दृष्टिकोन सिस्टर जिराल्डीन यांना लिहिलेल्या पत्रातून स्पष्ट होतो, त्या लिहितात, "Godubai is of legal age and may do what ever she likes. She can not bear the idea of hurting her parents feeling by embracing Christianity openly. I do not urge upon her and indeed I never. So much as mention the idea to her. I have left the work of her and other conversion in the hand of God."[१२३]

पं. रमाबाई ख्रिस्ती धर्माचरण करीत होत्या. शारदासदनची मुख्य व्यक्ती ख्रिस्ती होती. त्यामुळे ख्रिस्ती वातावरणामध्ये (Under Christian influence) राहणे अपरिहार्य होते. "ऑगस्ट १८९३ मध्ये सदनात ५३ मुली होत्या व त्यापैकी २० मुली बाईंच्या पहाटेच्या प्रार्थनेला हजर राहत... ह्यावर सल्लागार बोर्डाच्या सभासदांनी आपले राजीनामे पाठविले व

आपल्या सह्यानिशी एक पत्रक काढून सदनात मुली पाठवू नयेत असे पालकांना कळविले."[१२४] अशा प्रकारे मुलींच्या प्रार्थनेला हजर राहण्याची नाराजी सल्लागार मंडळींनी दर्शविली.

शारदासदनमधील धर्मांतराच्या बातम्या पुणे शहरात चर्चेचा विषय बनल्या. शारदासदनावर चोहोबाजूंनी धर्मांतराचे आरोप होऊ लागले. सप्टेंबर १८९३ पर्यंत सदनातील एकाही मुलीला बाप्तिस्मा दिला नव्हता. तरीही केसरी व तत्सम हिंदुत्ववादी पत्रे पं. रमाबाईंवर आरोप करीत होती. संतापलेल्या लोकांच्या भावनांचा प्रातिनिधीक उद्रेक केसरीतील सन १८९० ते सन १८९२ मधील अंकातील बातम्यांवरुन दिसून येतो. त्याचा परिणाम असा झाला की, "पुणे शहरातील अनेक लोकांनी आपापल्या सुना, मुली सदनातून शेपाटून घरी नेल्या. जाताना त्या टाहो फोडीत कित्येकींना तर त्यांच्या पालकांनी लाजलज्जा गुंडाळून ढोरासारखे बडवून ओढीत नेले. ६०–७० मुलींपैकी अवघ्या १५ मुली काय त्या सदनात राहिल्या. पुणे शहरात रमाबाईंच्या निंदा टवाळीने भयंकर उग्र रुप धारण केले. घाणेरड्या शिव्यागाळींनी भरलेल्या पत्रांचे तर रोज ढिगच येऊ लागले."[१२५] या प्रकरणी पं. रमाबाई अत्यंत संयमाने व आत्मसन्मानाने सामोऱ्या गेल्या. प्रबोधनकार ठाकरे लिहितात, "रमाबाईंच्या ठिकाणी दुसरी कोणी बाई असती तर त्या विरोधाला तोंड देता–देता वेडी झाली असती किंवा सदनाचा उद्योग गुंडाळून स्वस्थ बसली असती."[१२६] यावरुन पं. रमाबाईंचा त्यांच्या कार्यावरचा ठाम विश्वास दिसून येतो. स्वत: विधवा असताना विधवांच्या उद्‌धाराची तळमळ दिसून येते. त्या सामाजिक संघर्षाचा सामना करीत होत्या. असे दुसरे उदाहरण १९ व्या शतकाच्या भारताच्या इतिहासात आढळत नाही.

## ४.१० शारदासदनमधील तुळशी प्रकरण :

शारदासदनाच्या कालखंडामध्ये तुळशी प्रकरण विशेष गाजले होते. या प्रकरणामुळे सामाजिक विरोध तीव्र झाला. तुळशी प्रकरण गोपाळराव जोशी व वासुदेव गणेश जोशी (सार्वजनिक काका) यांनी उचलून धरले. हे दोघे प्रतिष्ठित होते. त्यापैकी गोपाळराव जोशी भारताच्या पहिल्या स्त्री डॉक्टर आनंदीबाई जोशी यांचे पती होते."त्यांनी उकरुन काढलेल्या पंच हौद मिशनमधील चहा प्रकरणाची झळ लो. टिळक व न्या. रानडे यांना बसली होती.... अल्पवयीन मुलीचे लग्न लावणाऱ्या सहाय्यक न्यायाधीशाला हास्य विषय बनविण्यासाठी त्यांनी

जाहिरपणे गाढवा–गाढवीचे लग्न लावून दिले होते....''[१२७] वासुदेव गणेश जोशी हे पुण्यातील सुप्रसिध्द सार्वजनिक (काका) व्यक्तिमत्व होते. ते चित्रशाळा मुद्रणालयाचे मालक होते. टिळक पक्षाचे कडवे अनुयायी व लो. टिळकांचे मित्र होते. या दोघांनी तुळशी प्रकरण उचलून धरले. वासुदेव गणेश जोशी यांच्या चरित्रामध्ये या प्रकरणाचा तपशील पुढील प्रमाणे दिला आहे.

''रमाबाईंच्या गैरहजेरीत त्यांनी (जोशीव्द्याने) पुष्कळशा तुळशीच्या कुंड्या शाळेतील हिंदु मुलींकरीता पाठवून दिल्या. रमाबाई मंगळुराहून परत येताच त्यांनी लाथा मारुन त्या कुंड्या फोडून टाकल्या.''[१२८] पं. रमाबाईंनी तुळशीच्या कुंड्या फोडल्याचे समर्थन केले असे या चरित्रामध्ये लिहिले आहे. तुळस ही हिंदु धर्मात पवित्र मानली जाते. पं. रमाबाईंनी तुळशीच्या कुंड्या फोडून हिंदु धर्माचा अपमान केला अशी चर्चा सुरु झाली. त्या हिंदु धर्माविरुध्द आहेत असे आरोप झाले.

पं. रमाबाईंनी तुळशी प्रकरणाचा खुलासा केला की, ''ज्या ख्रिस्ती लोकांना केवळ भूतदयेने प्रेरीत होऊन मुलींच्या सांभाळासाठी व शिक्षणासाठी पैसा दिला आहे. त्यांच्या धर्माचे शिक्षण दिले जात नसताना जी गोष्ट त्यांच्या धर्माविरुध्द आहे ती त्यांच्याच पैशाने चालविलेल्या सदनात करु देणे रास्त होणार नाही. तुळस स्वैपाकीण बाईने लावली होती ती काढून जवळच विहीरीपाशी लावली आहे. तेथे कोणासही तुळशीची पूजा करता येईल.''[१२९] पं. रमाबाई तुळशीच्या कुंड्या लाथाडून उपटून फेकून दिल्याचा आरोप खोटा व निराधार असल्याचे स्पष्ट करतात. मुलींना व्यक्तिगत पातळीवर धर्माचरण करण्यास त्यांनी हरकत घेतलेली दिसत नाही. तुळशी प्रकरणामुळे पं. रमाबाई अडचणीत आल्या.

तुळशी प्रकरण हे पं. रमाबाईंना बदनाम करण्यासाठी उभे केले होते. शारदरसदनाला जो विरोध झाला तो स्वाभाविक नसून पध्दतशीर योजना करुन केला होता. तुळशी प्रकरण त्याचाच एक भाग होता. जोशीव्द्यांनी कट करुन रमाबाईंवर तुळशी प्रकरणाचे कुभांड रचले असे देवदत्त टिळक लिहितात. या संदर्भात ते लिहितात, ''शारदासदन धर्मातीत ठेवायचे ह्या आपल्या जाहीर वचनाला व ब्रीदाला बाई डोळ्यात तेल घालून जागत. परंतु पुण्यातील एक विशिष्ट गटाच्या मते बाईंना तसे करणे शक्यच नाही व त्यांचा अंतस्थ हेतू मुलींना फूस लावून बाटवणे हा आहे असे वाटे व त्यांना हे सिध्द करावयाचे होते, म्हणून त्या गटाने बाईंना त्यांच्या कार्यात कधी स्वस्थता लाभू दिली नाही.''[१३०]

शारदासदन हिंदु धर्माप्रमाणे चालावे असे सनातनी मंडळींना वाटत होते. “जून्या कर्मठ लोकांना शारदासदन हे सनातनी ब्राह्मण वसतिगृह असावे असे वाटत होते.”[१३१] ज्ञानोदय ने पं. रमाबाई शारदासदनाचा उपयोग धर्मोपदेश करण्यासाठी करीत नाही म्हणून त्यांच्यावर टिका केली. सनातनी मंडळी स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार हिंदु धर्माच्या चौकटीतून करीत होते. बाबा पद्मनजी सारखे ख्रिस्ती स्त्री प्रश्नाचे मूल्यमापन ख्रिस्ती धर्माच्या संदर्भात करीत होती. सामाजिक प्रश्न व व्यक्तिच्या श्रध्दा ह्या स्वतंत्र बाबी आहे हा विचार पुढे येत नव्हता. शारदासदनाला ‘मिशनरी संस्था’ असे संबोधले जात होते. याच मानसिकतेमुळे शारदासदनाला विरोध होत होता.

या आरोपांना उत्तर देण्याचा प्रयत्न पं. रमाबाईंनी केला. त्या म्हणतात, “आमच्या देशबंधूनी योग्य आश्रय व उत्तेजन दिले असते तर शारदासदन ही संस्था ख्रिस्ती होण्याची काहीच जरुरी नव्हती. हिंदु लोक असली शाळा घालण्याकरता पैसे देईनात म्हणून मी ख्रिस्ती लोकांपाशी भिक्षा मागितली. आता ती शाळा तुम्ही चालविण्यास सिध्द असाल तर आमच्या ख्रिस्ती आश्रयदात्यांकडून बिलकूल अडथळा येणार नाही.”[१३२] हिंदु लोक विधवा शिक्षणाच्या कार्यात आर्थिक मदत करीत नाहीत याची खंत त्यांनी व्यक्त केली. अशाप्रकारे शारदासनाला होणारा विरोध हा हेतू पुरस्सर केला जात होता. धर्मश्रद्धा, धर्माचरणाच्या हट्टापायी स्त्री उद्धाराचे महान कार्याकडे दुर्लक्ष केले जात होते. शारदासदनावरचा ख्रिस्ती प्रभाव नष्ट व्हावा असा सनातन्यांचा आग्रह होता. सनातनी मंडळी धर्मभावनेकडे एकांगीपणे पहात होती. त्यामुळेच शारदासदनाच्या कार्याला त्यांचा विरोध होत होता.

## ४.११ शारदासदनाची ख्रिस्तीकरणाकडे वाटचाल :

पं. रमाबाईंची उच्चवर्णीय हिंदु विधवांना शिक्षण देण्यासाठी शारदासदनची स्थापना केली होती. वैयक्तिक जीवनातील ख्रिस्त निष्ठेला बाजूला सारुन त्या शारदासदन चालवू शकत नव्हत्या. वैयक्तिक पातळीवर त्यांनी स्वत:च्या धर्मनिष्ठांचा आदर केला.

शारदासदनच्या विरोधामध्ये केसरी ने आग्रही भूमिका घेतली. आगरकरांनी सुधारक पत्रातून शारदासदनची पाठराखण केली. पं. रमाबाईंच्या संदर्भात केसरी व सुधारक यांच्यात वाग्युध्द सुरु झाले. “केसरीकारांनी व इतरांनी शारदासदनाचा आणि रमाबाईंचा छळ चालविला

आहे."[१३३] असा प्रत्यारोप सुधारक पत्रातून आगरकरांनी केला. सुधारक पत्रातून आगरकरांनी शारदासदनाच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याला पाठिंबा दिला. शारदासदन काढून पं. रमाबाईंनी महाराष्ट्रावर उपकार केले आहेत. अशी भूमिका मांडली. त्यांनी केसरीमध्ये होणाऱ्या आरोपांना उत्तरे दिली.

"शारदासदनातील ख्रिस्ती झालेली पहिली मुलगी गोमतीबाई होती."[१३३/अ] तिच्या धर्मांतरामुळे शारदासदनावरील धर्मांतराच्या आरोपांना पुष्टी मिळाली. गोमतीबाई विषयी १८९० च्या अहवालात माहिती दिली आहे. गोमती ही वैश्य जातीतील अविवाहीत मुलगी होती. वयाच्या १७ व्या वर्षी ती जून १८९० मध्ये शारदासदनमध्ये दाखल झाली होती. ती मूळची गुजराथ प्रांतातील मांडवी येथील होती. तिच्या धर्मांतराविषयी टिळक दे. ना. लिहितात, "अमेरिकन रमाबाई मंडळाच्या नियमानुसार सदनात गोमतीबाईस बाप्तिस्मा घेण्यास बाईंनी मनाई केली. पण गोमतीबाईंची श्रध्दा अढळ असल्याने त्यांनी ठाणे एम. ई. मिशनचे मिशनरी ह्यांचे हस्ते बाप्तिस्मा घेऊन प्रसिध्दपणे प्रभूचा सन्मान केला."[१३४]

गोमतीबाईंच्या धर्मांतरामुळे शारदासदनावरील आरोपांची तीव्रता अधिक वाढली. "गोमतीबाईस ख्रिस्ती धर्माचा उपदेश गुप्त पध्दतीने होत होता."[१३५] असा आरोप सुबोध पत्रिकेमधून करण्यात आला. केसरीमध्ये 'पुण्यातील धर्मवेडाचा दंगा आणि खून होण्याचा संभव' हा अग्रलेख लिहीला होता. या अग्रलेखात म्हटले की, "धर्मांतर म्हणजे एक प्रकारचे मरण असल्यामुळे शारदासदनातील धर्मांतर म्हणचे खूनच!... मुलींना पोसवत नसेल, तर विहीरीत ढकलून द्या, पण ख्रिस्ती होऊ देऊ नका."[१३६] अशी जहाल टिका करण्यात आली.

गोमतीबाईंचा बाप्तीस्मा तिच्या सज्ञान वयात झाला होता. "ती कच्छ भूज मधील मुलींच्या शाळेमध्ये गुजराथी सहाव्या इयत्तेपर्यंत शिकली. त्यानंतर माझ्या शाळेत मराठी पाचव्या आणि इंग्रजी चौथ्या इयत्तेपर्यंत शिकली."[१३७] असे प्रमाणपत्र पं. रमाबाईंनी स्वहस्ताक्षरात दिले होते. यावरुन गोमतीबाई सुशिक्षीत होत्या हे स्पष्ट होते. यावरुन गोमतीबाई बाप्तिस्मा देण्यास रमाबाईंनी नकार दिला होता. तिने पळून जाऊन धर्मांतर केले होते. तरीही तिच्या धर्मांतराला पं. रमाबाईस जबाबदार धरले होते. या संदर्भात आगरकरांनी पं. रमाबाईंची प्रदीर्घ मुलाखत घेतली होती. ती मुलाखत २१ ऑगस्ट १८९३ च्या सुधारक च्या अंकात प्रसिध्द झाली होती. त्यात पं. रमाबाई म्हणतात, "मी आपणाहून मुलींना ख्रिस्ती होण्यास

उद्युक्त करीत नाही. पण कोणी माझ्या प्रार्थनेच्या वेळेस बसल्या. बायबल समजून घेण्यास उत्सुक असल्यास मी नाही म्हणत नाही...सदनात येताना मुलींचा धर्म हिंदु असला तरी त्यातून बाहेर पडताना तो हिंदु धर्म राहिलचे असा जिम्मा माझ्याने घेववत नाही."[१३८] याच अंकात रमाबाई स्पष्ट करतात की, "मी ख्रिस्ती नसते तर मुळी शारदासदनच अस्तित्वात आले नसते. जे मी करीत आहे ते मी चांगले समजून करीत असल्यामुळे त्याचा परिणाम कसाही झाला तरी त्याबद्दल मला पश्चाताप होणार नाही."[१३९]

या मुलाखतीचा प्रतिकूल परिणाम समाजावर झाला. पं. रमाबाई धर्मांतराचे प्रयोग करतात असा समज पसरला. "याच वर्षी आणखी ११ मुली पालकांच्या परवानगीने ख्रिस्ती झाल्या."[१४०] पं. रमाबाईंनी हेतू पुरस्सर धर्मांतरासाठी कोणावरही दबाव आणला नाही. मात्र मतपरिवर्तनातून होणाऱ्या धर्मांतराला प्रतिबंधही केला नाही. पं. रमाबाई ख्रिस्ती आचरण करीत होत्या. त्याचा प्रभाव अप्रत्यक्ष मुलींवर पडत होता.

त्यामुळे शारदासदनातून "मुली भराभर काढून घेण्यात येऊ लागल्या. शारदासदनची शारदा गद्र्यांनी काढून घेतली. आगरकरांनी सदनातून आपली मामे बहिण वेणूताई नामजोशी हिला काढून घेतली."[१४१] स्त्री शिक्षण हा आगरकरांचा जिव्हाळ्याचा विषय होता. मात्र कोणत्याही लाभासाठी धर्मत्याग करणे त्यांना मान्य नव्हते. 'शारदासदन व ख्रिस्ती धर्मप्रसार' या लेखात ते लिहितात, "शारदासदनातील असणाऱ्या मुलींना स्वधर्मत्याग करण्याची बुध्दी होऊ न देण्यास्तव रमाबाई जितकी खबरदारी घेण्यास राजी आहेत असे आम्हास आजपर्यंत वाटत होते तितकी त्या घेत नाहीत अशी थोड्या दिवसात आमच्या नजरेस आलेल्या काही गोष्टींवरुन आमची खात्री झाली आहे आणि म्हणून आजपर्यंत त्यासदनाचा जितका अभिमान आम्ही वाहीला तितका तो यापुढे वाहणे अशक्य आहे असे आम्ही मोठ्या कष्टाने कबूल करतो."[१४२] आगरकरांना शारदासदनाचा पाठिंबा काढून घेतला याचे दु:ख होत होते ते यावरुन स्पष्ट होते होते. पं. रमाबाई निधर्मी पध्दतीने स्त्री शिक्षणाचे प्रयत्न करतात यावरही त्यांचा विश्वास उरला नव्हता. पं. रमाबाई धर्मांतरासाठी अनुकूल वातावरण तयार करतात असे त्यांचे मत बनले होते. त्यामुळे आगरकरांनी नाईलाजास्तव शारदासदनाचा पाठिंबा काढून घेतला होता.

यानंतर शारदासदनावर बहिष्कार पडला. “सदनातून पालकांनी काढून घेतलेल्या मुली व तिथल्या अनाथ मुली यांच्या निर्वाहाची, शिक्षणाची व्यवस्था धर्मार्थ वर्गणी जमवून करण्याचे ठरले. या मुलींची सोय हुजूरपागामध्ये करण्यात आली.”[१४३] या कार्यामध्ये लो. टिळकांनी विशेष पुढाकार घेतला होता. शारदासदनातील धर्मांतराच्या तक्रारी रमाबाई असोसिएशनकडे गेल्या होत्या.शारदासदनातील धर्मांतराची चौकशी करण्यासाठी मिसेस ज्युडिथ अँड्र्युज यांना पाठवले. त्या रमाबाई असोसिएशनच्या पदाधिकारी होत्या. त्यांनी आपल्या अहवालात म्हटले आहे की, “रमाबाईंनी धर्म निरपेक्षतेच्या सर्व अटी पाळल्या आहेत. हिंदु मुलींचे सोवळे–ओवळे अजूनही पाळले जात आहे. स्वत: रमाबाई धर्मबाह्य असल्यामुळे स्वयंपाक घर, जेवणाची खोली वगैरे ठिकाणी त्यांना मज्जाव होता.”[१४४]मिसेस ज्युडिथ अँड्र्युज यांनी पं. रमाबाईंना दोषमुक्त ठरविले.

सन १८९५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन पुण्यात भरले होते. या अधिवेशनाला नामवंत पुढारी जमले होते. “पं. रमाबाईंची किर्ती एकून पुढाऱ्यांपैकी कित्येकांनी सदनाला भेट दिली. तोपर्यंत १२ मुलींचा बाप्तीस्मा झाला होता... या अधिवेशनात केशवपनाचा व विधवांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचा ठराव झाला.”[१४५] या अधिवेशनातील व्यासपीठावर शारदासदनाविषयी पुढील मते मांडण्यात आली. इंडियन सोशल रिफॉर्मचे संपादक श्री. के. नटराजन यांनी म्हटले की, “विधवांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करण्याचा जो पायंडा पंडिता रमाबाईंनी घालून दिला आहे व ह्या शहरात त्याचे कार्य जे इतक्या यशस्वीपणे चालू आहे, त्याची प्रशंसा केल्याखेरीज राहवत नाही.”[१४६]श्री. एम. व्ही. महाजनी यांनी म्हटले आहे की, “जर आपण आपली सदने काढण्याची फिकीर करीत नाही तर पं. रमाबाईंच्या संस्थांची निंदा करण्याच काही उपयोग नाही.”[१४७]श्री. नारायण राय वर्मा यांनी म्हटले की, “मी कट्टर हिंदु आहे व तसाच राहण्याचा माझा विचार आहे. तरी पण पं. रमाबाई जे करीत आहेत त्याबद्दल मला पूर्ण सहानुभूती आहे. ह्यांचे साधे कारण असे की, ह्या अबलेने जे कार्य करुन दाखविले आहे ते आपल्यापैकी कोणाही पुरुषापेक्षा जास्त आहे.”[१४८] श्री. नारायण राय वर्मा ह्यांनी शारदासदनाला प्रत्यक्ष भेट दिली होती. त्यावेळी बारा मुली ख्रिस्ती झाल्या. ह्यात काही वावगे झाले नाही असा अभिप्राय यांनी जाहीर केला. अशाप्रकारे काँग्रेसमधील प्रतिष्ठित व्यक्तींनी पं. रमाबाईंच्या कार्याला जाहिरपणे पाठिंबा दर्शविला होता.

१८९५ च्या सामाजिक परिषदेमध्ये शारदासदनाच्या कार्यावर चर्चा झाली. तेथील विधवांच्या शिक्षण विषयक कार्याचे कौतुक केले. त्याचा परिणाम म्हणजे सामाजिक परिषदेमध्ये विधवांना शिक्षण देऊन स्वावलंबी करण्याचा ठराव केला गेला. यावरुन स्पष्ट होते की, शारदासदनासारख्या विधवा गृहांची गरज सर्वांना पटत होती. हिंदु लोकांनी शारदासदनाकडून प्रेरणा घेऊन हे कार्य करण्याची आवश्यकता व्यक्त केली होती.

केसरी वृत्तपत्रांमध्ये १२ मुली धर्मांतराबाबत जळजळीत टिका केली होती. केसरीकार लिहितात, "हिंदु धर्मातील १२ मुली नाहीशा झाल्या, त्याबद्दल आमच्या अंत:करणात काही देखील चटका न लावता पुन्हा कोडग्यासारखे सदनात जावून आम्ही आपल्या मनातील समाधान व्यक्त करुन घेतो. यास काय म्हणावे आम्हास सूचत नाही."[१४९]

लो. टिळक प्रखर राष्ट्रवादी होते. जहाल विचारांचे राष्ट्रवादी नेते होते. धर्मांतराची प्रक्रिया राष्ट्रीय चळवळीला बाधक आहे असे त्यांचे मत होते. त्यांनी शारदासदनातील धर्मांतराची प्रक्रिया राष्ट्रांतरासारखी मानली. ख्रिस्ती धर्मांतर राष्ट्रद्रोहाप्रमाणे मानले. अशा धर्मांतरास पाठिंबा देणारे देशाचे शत्रू आहेत अशी जहाल टिका केली.

पं. रमाबाईंनी धर्मांतराच्या प्रक्रियेला नैसर्गिक मानले. धर्मांतराविषयीच्या स्वातंत्र्याचा त्यांनी आदर केला. शारदासदनातील बारा मुलींनी धर्मांतर केले होते. याचे स्पष्टीकरण देताना त्या लिहितात, "The chief cause of this faling off of the number is the conversion of same twelve girls to Christianity.... All the girls who have embraced Christianity are independent. They have never induced by any one to leave their ancestral religion to accept Christianity. Each are has followed her own conviction, and has done what she thought was right."[१५०]

पं. रमाबाईंनी शारदासदन स्थापन केले. त्यामागे ख्रिस्ती धर्मप्रसाराच सुप्त हेतू होता असे त्यांच्या आत्मचरित्रातील नोंदीवरुन दिसून येते. त्या लिहितात, "सान्फ्रान्सिस्कोहून निघाल्यापासून मुंबईला उतरेपर्यंत, आपल्या मनात असे ठरविले की, जरी उघड धर्म शिक्षण देता आले नाही तरी मी रोज पवित्र शास्त्र मोठ्याने वाचून दाखवीन आणि खऱ्या देवाची ख्रिस्ताच्या नामाने प्रार्थना करीन; त्यामुळे माझ्या सदनातील सर्वांना धर्म शिक्षण मिळेल आणि माझ्या देश भगिनी हे चाललेले पाहून व ऐकून खरा धर्म व मुक्ती याविषयी चौकशी करु लागतील."[१५१] पं. रमाबाईंनी पवित्र शास्त्राचा प्रसार करण्याची योजना अमेरिकेतील प्रवासातच

केली होती असे दिसते. शारदासदनातील मुलींवर ख्रिस्ती धर्माचा प्रभाव निर्माण करण्याचा त्यांचा हेतू होता. पं. रमाबाईंनी स्वतःच्या आचरणातून मुलींवर ख्रिस्ती प्रभाव निर्माण केला. तरीही त्यांचा मुळ हेतू समाजसेवा हा होता. धर्मांतरे घडवून आणणे हा मूळ हेतू नव्हता.

शारदासदनमध्ये जाहिरपणे ख्रिस्तीकरणाला मनाई होती. रमाबाई असोसिएशनची घटना तशी होती. त्यामुळे पं. रमाबाईंवर धर्मांतराविषयी बंधने होती. मात्र पुढील काळात हे बंधन संपुष्टात आले. तेव्हा पं. रमाबाईंनी जाहिरपणे धर्मांतरे घडवून आणली. त्या लिहितात, "शाळा या नावाने आमच्या संस्थेची पहिली दहा वर्षे संपल्यावर घटनेत थोडा बदल करण्यात आला. तेव्हापासून शाळेत नाव दाखल केलेल्या विद्यार्थीनीला धार्मिक शिक्षण देण्यात आले."[१५२]

शारदासदनमध्ये धर्मांतरासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण केली जात होती. मुलींच्या हृदयपरिवर्तनासाठी अप्रत्यक्षपणे प्रयत्न होत होते. यासंदर्भातील आठवणी आनंदीबाई कर्वे सांगतात, "आपला समाज जवळ करणार नाही अशा चुकून फसलेल्या गरीब विधवा दिसल्या तर त्यांना त्या ख्रिस्ती बायका जवळ घेऊन दोन्ही धर्माच्या गोष्टी सांगत. त्या म्हणत, 'ह्या तुमच्या धर्मात देव तरी कसे? समाजही तसाच.... असला धर्म व समाज कशाला? तुला पोटाशी धरतो त्या येशू प्रभूला शरण जा... त्यांचे (मुलींचे) दुःखी मन गोड बोलण्याकडे वळे व अशा काही मुली आपण होऊन ख्रिस्ती झाल्या. पण त्याचा आरोप पंडिता रमाबाईंवर आला."[१५३] अशा प्रकारे शारदासदनात हृदयपरिवर्तनाचे प्रयत्न होत होते हे स्पष्ट होते. पं. रमाबाई याविषयी अनभिज्ञ असूच शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष धर्मांतराच्या प्रयत्नांना कसून विरोध झाला.

सन १८९५ नंतर शारदासदनमध्ये जाहिर बाप्तिस्मे झाले. सन १८९५ मध्ये १२ मुलींची धर्मांतरे झाली. याचा उल्लेख मागे आला आहे. सन १८९८ पर्यंत "शारदासदनात आलेल्या एकंदर ३५० विद्यार्थीनींपैकी ४९ जणींनी बाप्तिस्मा घेऊन ख्रिस्ताचा स्विकार केला होता."[१५४]

'मुक्ती किरण' च्या चर्च शताब्दी अंकामध्ये धर्मांतरीत मुलींविषयी माहिती दिली आहे. शारदासदन पुणे येथे सुरु असतानाच केडगावमध्ये मुक्ति मिशनची नवीन वसाहत सुरु होती. या नव्या वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणावर ख्रिस्ती धर्मांतरे घडून आली. रेव्ह. डब्ल्यू. डब्ल्यू. ब्रुअर यांनी चालविलेल्या विशेष प्रार्थना सभांमुळे नोव्हेंबरच्या १५ तारखेला (१८९७) ११६ बालविधवा व स्त्रिया यांनी बाप्तिस्मा घेतला.... पुढे ४ जुलै १८९८ पासून ७५ जणींनी ख्रिस्तावर

विश्वास प्रकट करुन बाप्तिस्मा घेतलेल्या दोनशे पन्नास आणि ७५ मिळून तरुणींची एक मोठी मंडळी तयार झाली."[१५५] अशा प्रकारे शारदासदनच्या कालखंडात धर्मांतरीत मुलींची संख्या वाढत होती. या कामी पुणे व इतर भागातील मिशनरींनी मुक्ति मिशनला मदत केली होती. ख्रिस्ती धर्म शिक्षण देण्यासाठी शब्बाथ शाळेची सुरुवात झाली होती. बायबलच्या अभ्यासाचे खास वर्ग सुरु केले होते. सुवार्तिकांचा (ख्रिस्त संदेश देणाऱ्या स्वयंसेविका) गट तयार केला होता. "सुवार्तिका आसपासच्या १५ खेड्यांमध्ये गेली दोन वर्षे सुवार्ताप्रसार करीत होत्या. गेली नऊ महिने शेतातील मजूर, सुतार, गवंडी व विहीरीवर व बांधकामावर असलेले मजूर या सर्वांना दररोज सुवार्ता सांगितली जात होती."[१५६]

पं. रमाबाईंनी ख्रिस्ती धर्म स्विकारण्याची जबरदस्ती मुलींवर केली नव्हती. परंतु शारदासदनातील ख्रिस्ती प्रभाव वाढला होता. त्यातून मुली ख्रिस्ती धर्माकडे ओढल्या गेल्या. शारदासदनामध्ये बालविधवांची संख्या मोठी होती. काही मुली अनाथ होत्या. हिंदु धर्मातील कर्मठतेमुळे त्यांचे जीवन यातनादायी होते. त्यांना ख्रिस्ती धर्मातील मानवतेची तत्वे अधिक जवळची वाटली. त्यामुळे शारदासदनामध्ये धर्मांतर करणाऱ्या मुलींची संख्या वाढू लागली. पं. रमाबाई शारदासदनातील धर्मस्वातंत्र्याविषयी लिहितात, "I put Bible and the Vedas together on the Shelves of the school library."[१५७] पं. रमाबाई धर्म स्वातंत्र्याचा दावा करतात. तरीही त्यांच्या धर्माचरणामुळे धर्मांतरासाठी अप्रत्यक्ष प्रभाव पडत होता. शारदासदनातील मुलींवर धर्मांतरासाठी सक्ती केली नसली तरी ख्रिस्ती धर्म स्विकारल्याने त्या हिंदू रुढी परंपरांपासून मुक्त होणार होत्या. धर्मांतरातून सुस्थिर व यातना मुक्त जीवन मिळवण्यासाठी मुली धर्मांतरे करीत होत्या. त्यातूनच शारदासदनची वाटचाल ख्रिस्ती करणाकडे झाली.

## ४.१२ पं. रमाबाईंची दुष्काळातील स्त्रियांसाठी केलेले कार्य :

सन १८९७ मध्ये भारताच्या मध्य प्रांतामध्ये मोठा दुष्काळ पडला होता. पं. रमाबाई या दुष्काळी प्रांतामध्ये गेल्या. दुष्काळातील स्त्रिया व मुली यांना मदत केली. दुष्काळी भागातून शेकडो निराधार, अपंग, रोगी मुली व स्त्रियांना घेऊन आल्या. पं. रमाबाईंना या दुष्काळी भागात "आपल्या मुलींना नेऊन विकणारे आईबाप आढळले. एक रुपयाला, काही थोड्याशा

आण्यांना किंवा थोड्या भाकरीच्या पिठालाही ह्या पोरी फुंकून टाकण्यात येत होत्या. स्त्रियांची व मुलींची विक्री करणारे व्यापारी गोळा झाले होते. त्यांना वेश्या व्यवसायासाठी प्रवृत्त करणारे गुंड फिरत होते."[१५८] पं. रमाबाईंनी या मुलींना आसरा दिला.

पं. रमाबाईंनी बुंडेलखंडातील नौगावाहून शारदासदनाला एक पत्र लिहिले होते. त्या पत्रात पं. रमाबाई म्हणतात, "आज गाडीतून प्रवास करीत असताना रानावनांतून शेकडो गरीब लोकांना इकडे तिकडे हिंडताना पाहिले. बिचाऱ्यांना निवाऱ्याची जागा नाही. अंगावर चिंध्या, त्याही भिजून चिंब झालेल्या, पोटात भुकेचा जाळ, बाहेरुन थंडीवाऱ्याची पीडा कोणी झाडांना, कोणी पडीतभिंतींना चिकटून कुडकुडत उभी राहिली आहेत. पुरुष, बायका, मुले, म्हातारी, तरणी सगळ्या प्रकारची माणसे मरणासन्न अवस्थेत देहभार कसा तरी वाहत आहेत."[१५९] पं. रमाबाईंनी अशा मरणासन्न अवस्थेतील मुली व स्त्रियांची सुटका केली. केवळ भूतदयेने प्रेरित होऊन त्यांनी दुष्काळग्रस्त स्त्रियांना मदत केली होती. हे मानवतेचे मोठे काम त्यांनी केले होते. यातून त्या उच्च ध्येयाने प्रेरित झाल्या होत्या असे दिसते. त्यांच्या या मानवतेच्या कार्याकडेही संशयाच्या नजरेने पाहिले गेले. शारदासदनातील धर्मांतराची सल हिंदु समाजाच्या मनात कायम राहिली.

मध्य प्रांतामध्ये पडलेल्या दुष्काळाचा संबंध पं. रमाबाईंनी केलेल्या प्रार्थनेशी जोडला गेला. "१८९६ मध्ये बाई १५ धर्मकन्या घेऊन लोणावळ्याला गेल्या होत्या. त्यांचे बाप्तिस्मे झाले होते. शारदासदनातील त्या विधवा होत्या.... बाईंनी ह्या १५ ना बरोबर घेऊन परमेश्वराची अशी आग्रहाची प्रार्थना चालविली की, ह्या पंधराचा वर्ग करुन एका वर्षाच्या आत मला १५ च्या जागी २२५ धर्मकन्या दे."[१६०]

दुर्दैवाने पुढच्याच वर्षी मध्य प्रांतात मोठा दुष्काळ पडला. तेथून शेकडो मुली व स्त्रिया शारदासदनामध्ये आश्रयास आल्या. पं. रमाबाईंना धर्मांतरासाठी मुली मिळाव्यात म्हणून देवाने दुष्काळ पाडला असा आरोप झाला. डॉ. भांडारकर हे मोठे विद्वान होते. त्यांनीही पं. रमाबाईंच्या प्रार्थनेचा चुकीचा अर्थ लावला ते लिहितात, "Pandita has carried the theory of prayer to a childish extent, believing that the famine was sent to answer her prayer to increase the number of her converts to the square of the number famine which rendered many female children orphans whom she took and baptised."[१६१]

या आरोपामागे कोणताही कार्यकारणभाव दिसत नाही. त्यांनी दुष्काळ पडू दे अशी प्रार्थना केली नव्हती. ज्यावेळी प्रार्थना केली होती, तेव्हा भारतात कुठेही दुष्काळ पडण्याची चिन्हे दिसत नव्हती. तरीही पडलेल्या दुष्काळास पं. रमाबाईंना सनातन्यांनी जबाबदार धरले. यावरुन हिंदु समाजाची मने शारदासदनविषयी कलुषित झाली होती हे दिसते. "पांढरपेशा प्रतिष्ठित समाजातून सदनात विधवा येईनाशा झाल्या म्हणून बाईंनी ही फुकटी टोळधाड जमा केली आहे."[१६२] असा आरोप पं. रमाबाईंवर केसरीकारांनी केला.

मात्र पं. रमाबाईंच्या या कार्याचे कौतुक त्यांच्या चरित्रकारांनी केलेले आहे. द्वा. गो. वैद्य लिहितात की, "शारदासदन ख्रिस्ती झाल्याने आपण होऊन तीत कोणी मुली पाठविनासे झाल्याने दुष्काळाची संधी साधून आयते आणलेले पीक जमा करण्यासाठी रमाबाई दुष्काळग्रस्त प्रांतात गेल्या व त्यांना तिथे कल्पनेच्या बाहेर लाभ झाला असे कित्येक म्हणतात. पण हे खरे नाही. हजारो माणसे अन्नान्न दशेत असताना घरी बसून दोन घास सुखाने खाणे त्यांस बरे वाटले नाही म्हणून पं. रमाबाई बाहेर पडल्या."[१६३] पं. रमाबाईंना दुष्काळातील मुलींना मानवतेच्या दृष्टिकोनातून आश्रय दिला असे दिसते.

दारिद्र्य व उपासमार पं. रमाबाईंनी अनुभवले होते. १८७६–७७ च्या दुष्काळात त्यांच्या कुटूंबाची झालेली वाताहत त्या विसरल्या नव्हत्या. त्यामुळे दुष्काळग्रस्तांसाठी त्यांनी भूतदयेच्या, माणूसकीच्या भावनेने कार्य केले होते. तरीही तत्कालीन समाजाला या कार्याविषयी फारसा आदर वाटला नाही. दुष्काळग्रस्त भागातून पं. रमाबाईंनी "६०० अनाथ स्त्रिया व मुले व मुली बरोबर आणली होती. त्यांच्यापैकी ज्यांना खरोखर मदतीची गरज होती अशीच ३०० आपल्याजवळ ठेऊन घेऊन बाकीच्यांची रवानगी त्यांनी इतर ठिकाणी केली."[१६४] ह्या इतर मुली व मुले यांची जबाबदारी मिशनरी संस्थांनी घेतली होती.

शारदासदनमध्ये फक्त ५० मुलींच्या राहण्याची सोय होती. पं. रमाबाईंनी शारदासदनाच्या शेजारी झोपड्या बांधल्या. ज्यादा स्त्रियांच्या राहण्याचा प्रश्न सोडविला. मुलींची संख्या वाढली. त्यातून आर्थिक बोजा वाढला. म्हणून ख्रिस्ताकडे मदतीची याचना करु लागल्या. याविषयी पं. रमाबाई आपल्या आत्मचरित्रामध्ये लिहितात, "माझे सर्व ओझे मी प्रभूवर टाकल्यामुळे माझा सर्व त्रास व काळजी नाहीशी झाली आहे."[१६५] त्याच वेळी पुण्यात

प्लेगची साथ सुरु झाली. म्युनिसिपाल्टीने दुष्काळी मुलींना पुण्यात ठेवण्यास मनाई केली. अखेर पं. रमाबाईंनी शारदासदनातील मुलींना केडगाव येथे नेले.

## ४.१३ शारदासदनाच्या कार्याचा सारांश :

सन १८८९ ते सन १८९८ हा शारदासदनचा दहा वर्षाचा कालखंड होता. हा कालखंड पं. रमाबाईंच्या जीवनातील संघर्षाचा होता. स्त्री सुधारणा कार्यासाठी संस्थापक पातळीवर केलेला हा पहिला प्रयोग होता. शारदासदन उच्चवर्णीय हिंदू विधवांच्या शिक्षणासाठी स्थापन केले होते. समाजातील नकारात्मक जीवन जगणाऱ्या शेकडो मुली व स्त्रियांना शारदासदनमध्ये आश्रय दिला होता. शेकडो विधवांची रुढी परंपरेच्या जोखाडातून सुटका शारदासदनमुळे होऊ शकली. पं. रमाबाईंच्या चरित्रकार मिसेस डायर यांनी या मुलींची सुटका 'पूर्वकालीन नीग्रो गुलामांच्या सुटकेइतकी खळबळजनक होती' असे म्हटले आहे. शारदासदनचा प्रयोग तत्कालीन हिंदू विचारसरणीला धक्का देणारा होता. पं. रमाबाई हिंदू असत्या तरीही त्यांच्या या कार्याला समाजाचा विरोध झाला असता. मिस सराह हॅमलिन ह्या सिस्टर जिराल्डीन यांना पाठविलेल्या पत्रात लिहितात की, "If she were labouring as the missionaries lobour mostly with the lower caste, but that she should confine her work to them and a convert rouses a strong spirit of hostility. It is difficult to find common ground of sympathy."[१६६] पं. रमाबाईंनी मिशनऱ्यांप्रमाणे आदिवासी, खालच्या जातींच्या वर्गात काम केले असते तर त्यांच्या बाबतीत सामाजिक विरोध फारसा झाला नसता. त्यांनी उच्चवर्णीयांमध्ये काम केले म्हणून सामाजिक विरोध झाला. धर्मांतराच्या प्रकरणामुळे लोकांच्या मनात कडवटपणा आला.

पं. रमाबाईंनी स्थापन केलेल्या शारदासदनाला समाजाश्रय न मिळण्याची कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) विधवांना शिक्षण देणे, त्यांचे पुनर्वसन करणे हा विचार पाप मानले जात होते. त्यामुळे विधवांच्या शिक्षणाचा प्रयोग समाजाला पटला नाही. परिणामी शारदासदनाला समाजाश्रय मिळाला नाही.

२) आंतरजातीय विवाह, धर्मांतर व वैधव्य ह्या बाबींमुळे पं. रमाबाईंच्या अस्तित्वाला समाजामध्ये फारसा सन्मान मिळाला नाही. तसेच केसरीसारख्या वृत्तपत्रांनी त्यांच्या विरुध्द आघाडी उघडली.

३) शारदासदनवर ख्रिस्ती धर्माचा प्रभाव वाढला. अनेक मुलींनी बाप्तिस्मा घेतला. समाजाने धर्मांतराच्या प्रक्रियेला विरोध केला. त्यामुळे शारदासदनास समाजाश्रय मिळाला नाही.

थोडक्यात शारदासदनातील कार्य धर्मद्रोहासारखे मानले. पं. रमाबाईंचे धर्मांतर राष्ट्रांतरासारखे मानले. धर्मांतराच्या प्रक्रियेला राष्ट्रद्रोह मानले. या कारणामुळे पं. रमाबाईंच्या स्त्री सुधारणा कार्याचे मूल्य समाजाला समजले नाही. पं. रमाबाई व हिंदू समाज यांच्यात कायमचा दुरावा निर्माण झाला.

पं. रमाबाई पतीत स्त्रियांसाठी झटल्या तरीही पंडिता रमाबाईंना थोर समाजसेविका मानण्यास प्र. के. अत्रे नकार देतात ते म्हणतात, "ख्रिस्ती धर्माचा स्विकार करुन त्यांनी हिंदी ख्रिस्ती समाजाची फार मोठी सेवा केली यात संशय नाही, पण ज्या हिंदू समाजात त्यांचा मूळ जन्म झाला होता, त्या समाजाला त्यांची थोर बुध्दीचा, ज्ञानाचा आणि कर्तृत्त्वाचा मुळीच फायदा मिळू शकला नाही. असे मात्र खेदाने म्हणावे लागते. धर्मांतर न करता पंडिता रमाबाई यांनी विद्या दानाचे आणि समाज सुधारणेचे कार्य जर आपल्या समाजात केले असते तर विष्णुशास्त्री चिपळूणकर, रानडे, टिळक, आगरकर आणि धोंडोपंत कर्वे यांच्या तेजस्वी मालिकेत पंडिता रमाबाईंचे नाव महाराष्ट्राला नि:संशय घालावे लागले असते."[१६७]

प्र. के. अत्रे प्रतितयश व मोठे साहित्यिक होते. त्यांनी पं. रमाबाईंच्या कार्यापेक्षा धर्म महत्त्वाचा मानला. समाज सुधारकाचा धर्म वा जात महत्त्वाची नसते. त्यांचे काम महत्त्वाचे असते. त्यांच्या कामातून समाजाला मिळालेली दिशा महत्त्वाची असते. समाज प्रबोधनातील त्यांची कामगिरी महत्त्वाची असते. या संदर्भात पंडिता रमाबाईंचे शारदासदनातील काम अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून समाज सुधारणा चळवळीचे अभ्यासक डॉ. अनंत राऊत लिहितात, "त्यांचा अनाथ माता म्हणून गौरव करण्यात काहीही अतिशयोक्ती होणार नाही."[१६७अ]

शारदासदनची पहिली दहा वर्षे सन १८९८ ला संपली. कराराप्रमाणे "रमाबाई असोसिएशन बंद करण्यात आले. सारी इस्टेट बाईंना बक्षिस देऊन टाकली. नवीन असोसिएशन स्थापन करण्यात येऊन तिचे नाव अमेरिकन रमाबाई असोसिएशन असे ठेवण्यात आले. बाईंना मिळालेली सर्व इस्टेट बाईंनी त्या नव्या असोसिएशनच्या नावे करुन दिली."[१६८] यावरुन पं. रमाबाई स्त्री उध्दाराच्या उदात्त भावनेने प्रेरीत झालेल्या दिसतात. त्यांना असोसिएशनकडून मिळालेली संपत्ती व केडगावची जमीन या संपत्तीच्या बळावर त्या एका जमीनदारासारखे सुखचैनी जीवन जगू शकल्या असत्या. मात्र त्यांनी सर्व संपत्ती नव्या असोसिएशनच्या नावे करुन नि:स्वार्थीपणा दाखविला.

पं. रमाबाई सन १८९८ मध्ये दुसऱ्यांदा अमेरिकेत गेल्या. तेथे रमाबाई असोसिएशनची १६ मार्च १८९८ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. या सभेला त्या उपस्थित राहिल्या. या सभेसमोर पं. रमाबाईंनी शारदासदनाच्या दहा वर्षाच्या कार्याचा अहवाल सादर केला. त्या लिहितात की, "We have purchased a farm, as you know, about thirty four miles from the school, you sent me nearly five thousand dollars for it. The money has not been spent in vain; for the farm has been great blessing to us, and I hope will be in the future. It has sheltered more than three hundred girls and it is supplying vegetables and I hope it will be able to supply fruit in the future. You hold a property in India, in the school of fifty thousand dollers and in the farm of ten thousand dollars. Out of the ninety five thousand dolllars you sent to me. Sixty thousand are thus given back to you."[१६९]

पं. रमाबाईंनी केडगाव येथे जमीन खरेदी केली. यामागे दूरदृष्टीपणा दिसून येतो. भविष्यकाळात या जमिनीमुळे उत्पन्न मिळेल. अशी योजना त्यांनी १८८५ मध्येच करुन ठेवली होती. रमाबाई असोसिएशनकडून मिळालेल्या पैशाचा हिशेब त्यांनी पारदर्शकपणे सादर केला.

रमाबाई असोसिएशनच्या एक्झीक्युटीव्ह कमिटीच्या अध्यक्षा ज्युडिथ डब्ल्यू. ॲन्ड्रयू यांनी शारदासदनाविषयीचा अहवाल १६ मार्च १८९८ च्या सभेत सादर केला. त्या लिहितात की, "The Sharada Sadan today is worth $50,000 without one rupee of debt upon it. Throught it have passed three hundred and fifty child widow and girls, the average number in the home being fifty. The past year closed with seventy five. Fourteen pupils have been trained as teachers, nine of whom are teaching in different schools and two have opened schools of their own, of eight trained as nurses, five are employed. Seven are matrons; two are houses keepers; while ten have happy homes of their own and were not married before they were twenty one of the three hundred and fifty who have been in the Sadan for longer or shorter time. Fourty – eight have become Christians, Twenty three of whom are voluntary Christian workers."[१७०]

शारदासदनातील मुलींची सांख्यिकीय माहितीमुळे मुलींमध्ये झालेल्या परिवर्तनाचा तपशिल समजतो. त्या मुलींच्या जीवनामध्ये आमुलाग्र बदल झाला. पं. रमाबाईंनी या मुलींच्या जगण्याला स्वतंत्र अस्तित्व मिळवून दिले. ज्युडीथ डब्ल्यु ॲन्ड्र्यु वरील सांख्यिकीय माहितीला 'glorified statastics' असे म्हणतात. रमाबाई असोसिएशनच्या अध्यक्षा रेव्ह. लायमन अबोट

डी. डी. ह्यांनी शारदासदनातील कार्याविषयी समाधान व्यक्त केले. पं. रमाबाईंचे कौतुक करताना त्या लिहितात, "By faith Pandita Ramabai won the hearts of American and emancipated her sisters in India."[१७१] पं. रमाबाईंनी शारदासदनचा १० वर्षातील उपलब्धीचा अहवाल सादर केला. यावरुन त्यांच्या व्यवहारातील चोखपणा दिसून येतो. मुलींच्या सांख्यिकीय माहितीमुळे फलनिष्पत्तीचा विश्वास व्यक्त होतो.

## ४.१४ रमाबाई असोशिएशन :

शारदासदन (Home of Wisdom) साठी रमाबाई असोशिएशनने दहा वर्षे मदत केली. रमाबाई असोशिएशनला ७५ रमाबाई सर्कल्स संलग्न होते. प्रत्येक सर्कलच्या स्वतंत्र घटना होत्या. त्या रमाबाई असोशिएशनच्या घटनेबरहुकूम होत्या. रमाबाई असोशिएशनची घटना टिळक दे. ना. यांनी महाराष्ट्राची तेजस्विनी पं. रमाबाई या पुस्तकात पृ. क्र. २०७ वर खालीलप्रमाणे दिली आहे.

१) पं. रमाबाईंनी पश्चिम हिंदुस्थानातील पुणे शहरात किंवा त्या शहराजवळच उच्चवर्णीय बालविधवांसाठी शाळा काढून चालविली म्हणून संस्था स्थापण्यात येत असून तिचे नाव द रमाबाई असोशिएान असे ठेवण्यात येत आहे.

२) ह्या संस्थेची शैक्षणिक पध्दती निधर्मी राहून ती पंडिता रमाबाई यांच्या नियंत्रणाखाली राहील. असोशिएशनच्या बोर्ड ऑफ ट्रस्टीज्ला त्या जबाबदार राहतील.

३) असोशिएशनचे सभासद दहा वर्षेपर्यंत दरसाल कमीत कमी एक डॉलर वर्गणी देतील. दरसाल १०० डॉलर्स दहा वर्षेपर्यंत देणाऱ्या सभासदाला शिष्यवृत्ती दाता म्हणण्यात येईल.

४) असोशिएशनचे हुद्देदार खालीलप्रमाणे असतील.

अध्यक्ष (एक किंवा अधिक), उपाध्यक्ष, खजिनदार (एक किंवा अधिक), चिटणीस, विश्वस्त मंडळ, सल्लागार मंडळ व कार्यकारी मंडळ.

५) कार्यकारी मंडळ संस्थेच्या कामकाजावर देखरेख करेल व अहवाल विश्वस्त मंडळाकडे सादर करील.

६) बोस्टन येथील विश्वस्त मंडळ शाळेसंबंधीच्या सर्व तऱ्हेच्या आर्थिक जबाबदाऱ्या हिंदुस्थानातील सल्लागार मंडळाच्या सल्ल्याने पार पाडेल.

७) असोशिएशनची वार्षिक सभा डिसेंबरमध्ये अध्यक्ष ठरवतील त्या जागी व त्या वेळी भरविण्यात येईल.

८) विश्वस्त मंडळाच्या बैठका वर्षातून दोनदा व कार्यकारी मंडळाच्या दरमहा भरत जातील.

९) वेगवेगळी रमाबाई सर्कल्स असोशिएशनच्या शाखा म्हणून काम पाहतील.

१०) ह्या घटनेत फेरफार करण्याचा अधिकार वार्षिक सभेला असेल. असा फेरफार करण्यासाठी मताधिकार असलेल्या हजर सभासदांपैकी दोन तृतियांश सभासदांची मते पडली पाहिजेत.

रमाबाई असोशिएशनची वार्षिक सभा मार्च महिन्यामध्ये होत होती. या सभेसाठी शारदासदनाच्या वार्षिक कार्याचा अहवाल पं. रमाबाई पाठवित असत. या असोशिएशनच्या वार्षिक सभेचे अहवाल अमेरिकेतील येल विद्यापीठाच्या ग्रंथालयात जतन करण्यात आले आहेत. या अहवालावरुन शारदासदनाच्या दहा वर्षांचा आढावा घेता येतो.

**रमाबाई असोशिएशनने शारदासदनास केलेली आर्थिक मदत** (डॉलर्समध्ये)

| अ.क्र. | अहवाल वर्ष | वार्षिक वर्गणी व सभासद फी | इमारत निधी | शिष्यवृत्ती | सामान्य निधी | इतर व एकूण निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८८९ | | ६२९५.०० | | | १८१८१.०० |
| २ | १८९०–९१ | ५५०३.१२ | १८५५.१६ | ५०० | | ३०८९१.०० |
| ३ | १८९१–९२ | ३८०५.४९ | २२७.६१ | ७०० | १७३.५५ | ३५७९८.१७ |
| ४ | १८९२–९३ | ६२७९.२४ | ३९५.०० | ५०० | ६५७.२८ | ४३७४०.०५ |
| ५ | १८९५–९६ | ४९९३.०० | | १००० | १८८.५३ | ७८४२४.६९ |
| ६ | १८९६–९७ | ३७२८.८३ | | १००० | २०६.३८ | ८३३५९.९० |
| ७ | १८९७–९८ | २५१६.०५ | १०.०० | ५०० | १२१५.२५ | ८७७२५.०० |

(संदर्भ : सन १८८९ ते १८९८ चे वार्षिक अहवाल (ट्रेझरी रिपोर्टवरुन))

सन १८९३–९४ व सन १८९४–९५ या काळातील अहवाल उपलब्ध नाहीत. वरील देणगी तक्त्यावरुन दिसून येते की, रमाबाई असोशिएशनकडून शारदासदनासाठी भरघोस आर्थिक मदत मिळत होती. शारदासदनच्या गरजेप्रमाणे पहिल्या तीन वर्षांसाठी इमारतीसाठी पुरेसा निधी मिळाला. विद्यार्थीनींना शैक्षणिक प्रोत्साहन देण्यासाठी शिष्यवृत्तीसाठी खास निधी को मिळत होता. शिष्यवृत्तीच्या रकमेमध्ये दरवर्षी वाढ होताना दिसते. शारदासदनाच्या व्यवस्थापनासाठी दिलेल्या निधीमध्ये दरवर्षी वाढ होताना दिसते.

रमाबाई असोशिएशनच्या आर्थिक मदतीमुळेच शारदासदन दहा वर्षाचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण करु शकले. भारतासारख्या दूर प्रदेशातील विधवा स्त्रियांच्या उध्दारासाठी अमेरिकन समाजाने दिलेली ही मदत होती. प्रगतीशील अमेरिकी समाज सामाजिक उत्तरदायित्त्व बाळगतो याचे हे उत्तम उदाहरण होते. रमाबाई असोशिएशनने शारदासदनची जबाबदारी निरपेक्ष व निधर्मी भावनेने घेतली होती. पं. रमाबाईंची सामाजिक तळमळ पाहून असोशिएशनने ही मदत केली होती.

## ४.१५ शारदासदन शाळेचा वर्षनिहाय तपशिल :

रमाबाई असोशिएशनच्या वार्षिक सभेचे सन १८८९ ते १८९८ या काळातील काही अहवाल उपलब्ध आहेत. त्या अहवालांचा वर्षनिहाय आढावा घेतला आहे. यावरुन शारदासदन विषयीच्या कार्याचा आढावा येऊ शकतो.

**१) सन १८८९-१८९० :**

मार्च १८९० मध्ये रमाबाई असोशिएशनची वार्षिक सभा संपन्न झाली. या सभेच्या अहवालामध्ये पं. रमाबाईंच्या पूर्व आयुष्याचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये शारदासदनातील घडामोडींविषयी माहिती दिली आहे.

११ एप्रिल १८८९ रोजीच्या पत्रात पं. रमाबाईंनी सदनाच्या उद्‌घाटन सोहळ्याविषयी माहिती दिली आहे. ११मार्च १८८९ रोजी शारदासदनाची स्थापना झाली. दोन विद्यार्थीनींनी सुरुवातीला प्रवेश घेतला होता. त्यात शारदा गद्रे ही कुमारीका होती. गोदुबाई जोशी ही बालविधवा होती. उद्‌घाटन सोहळ्याचे अध्यक्षपदी श्रीमती काशीबाई कानिटकर होत्या. ही घटना पं. रमाबाईंना क्रांतीकारी वाटते. त्या लिहितात, "This is the first instance in history (of this presidency, at least) in which a high caste Hindu lady presided over such a gathering..... it was time we have changing the stereo typed pages of custom."[१७२]

पं. रमाबाईंनी २१ मे १८८९ रोजीच्या पत्रामध्ये विद्यार्थीनींच्या संख्येचा तपशिल दिला आहे. त्या लिहितात, "We have fifteen pupils in the school. Five more widows of high – caste have applied for admission."[१७३] यावरुन दोन महिन्यांमध्ये संख्या वाढली

होती असे दिसते. पं. रमाबाईंनी ११ जून १८८९ रोजीच्या पत्रात “There are twenty two girls in the school now. Nine girls are living with me.”[१७४] अशी माहिती दिली आहे.

२३ ऑगस्ट १८८९ च्या पत्रामध्ये पं. रमाबाई रमाबाई सर्कल्सचे आभार मानतात, शारदासदनातील धर्म स्वातंत्र्याची हमी देताना त्या लिहितात की, “The pupils should have perfect freedom in religious matter.”[१७५] सन १८८९ मध्ये इमारती व सामान्य निधीसाठी ६२९५.०० डॉलर्स मिळाले. शाळेच्या व्यवस्थापनासाठी १८१८१.०० डॉलर्स इतका निधी मिळाला होता. ‘The High Caste Hindu Women’ या पुस्तकाच्या विक्रीतून ४८०.०० डॉलर्स असोशिएशनकडे जमा झाले. ती रक्कम शारदासदनासाठी पाठविण्यात आली. (Source : Report of Annual meeting of Ramabai Association held on March 1890)

**२) सन १८९० – १८९१**

पं. रमाबाईंनी ३० जानेवारी १८९१ ला शारदासदनचा सना १८९० चा वार्षिक अहवाल रमाबाई असोएिशनला पाठविला. त्यात त्या नमूद करतात की, “We have twenty six widow in the Sharada Sadan, of whom twenty four line in this house and two attend the school as day scholars. Also we have thirteen non-widown girls, of whom ten live in the Sharada Sadan and three attend the school daily.”[१७६] यावरुन शारदासदनमध्ये ३९ मुली प्रवेशित होत्या. सन १८८९ च्या तुलनेत विद्यार्थीनींची संख्या वाढली होती. २८ जानेवारी १८९१ रोजी चंद्राबाई, चंद्रभागा, द्वारकाबाई, वरमाबाई, कृष्णाबाई, काशी देवरुखकर, गोदुबाई इ. विद्यार्थीनींनी रमाबाई असोशिएशनला पत्रे लिहीली होती. त्यामध्ये शारदासदनमुळे त्यांच्या जीवनात झालेल्या बदलांविषयी लिहिले होते. शारदासदन शाळेची वेळ स.१०.०० ते सायं.४.३० अशी होती. दररोज सकाळी पं. रमाबाई मूल्य शिक्षणावर व्याख्यान देत. शाळेमध्ये ३री, ४ थी व ५ वी मराठी इयत्तेपर्यंतचे वर्ग होते. वाचन, लेखन, गणित, भूगोल, इतिहास, बुध्दीमत्ता, व्याकरण इ. विषयांचा अभ्यासक्रम समावेश होता. दहा मुलींसाठी खास संस्कृतचा वर्ग सुरु केला होता. निवासी मुलींना घरगुती कामाचे प्रशिक्षण दिले जात होते. या प्रशिक्षणामध्ये स्वच्छता, निटनेटकेपणा, चांगले शिष्टाचार, सहकार्यवृत्ती इत्यादी बाबींचा समावेश होता. सन १८९० मध्ये शारदासदनचे स्थलांतर मुंबईहून पुणे येथे झाले. डॉ. आर. जी. भांडारकर यांनी १५ जून १८९१ ला शारदासदनला भेट दिली

होती. ते सल्लागार मंडळाचे सदस्य होते. त्यांनी या भेटीचा अभिप्राय असोशिएशनला पत्राद्वारे कळविला की, "I visited the Sharada Sadan on $15^{th}$ of this month and examined the pupils in reading (Marathi and English) Parsing, explanation and arithmetic. The girls acquitted themselves creditably and the school seemed to be well conducted."[१७७] (Source : Report of Annual Meeting of Ramabai Association held March 11, 1891)

## ३) सन १८९१ – १८९२

पं. रमाबाईंनी दि. २९ जानेवारी १८९२ रोजी सन १८९१ चा वार्षिक अहवाल असोशिएशनला पाठविला. त्यामध्ये त्या प्रवेशित मुलींविषयी लिहितात की, "We have thirty young widows, three deserted wives, three married girls and seven unmarried girls studying in the Sharada Sadan."[१७८] यावरुन शारदासदनची गरज समाजाला पटलेली दिसते. स्त्री शिक्षणाचा क्रांतीकारी प्रयत्न शारदासदनमध्ये होत होता.

सन १८९१ मध्ये संमती वयाच्या बिलाविषयी चर्चा सुरु होती. शारदासदनाने सरकारकडे या बिलाच्या बाजूने याचिका दाखल केली होती. संमती वयाचे बील मंजूर होण्यासाठी शारदासदनने पाठिंबा दर्शविला होता. ऑक्टोबर १८९१ मध्ये शारदासदनमध्ये बाल शिक्षण पध्दती (Kindergarten) चे वर्ग सुरु झाले. याविषयी पं. रमाबाई लिहितात की, "A Kindergarten training class has been started which is making good progress. Fourteen pupils and two teachers have joined the class."[१७९] किंडर गार्टन पध्दती भारतात प्रथमच सुरु झाली. सुरुवातीलाच या शिक्षण पध्दतीला चांगला पाठिंबा मिळाला होता.

मार्च सन १८९१ मध्ये शारदासदनाला म्हैसूरे महाराज व त्यांच्या शिष्ट मंडळाने भेट दिली. त्यांनी शारदासदनचे कौतुक केले. त्यांनी ५०० रु. ची देणगी दिली होती. श्री. दयाराम गिडूमल हे सिंध प्रांताचे न्यायाधीश होते. त्यांनी शारदासदनाच्या कार्याला क्रांतीकारी म्हटले. त्यांनी शारदासदनसाठी वार्षिक १२० रु. वर्गणी सुरु केली. मिस. सॉमरसेट ह्या केंब्रिज, इंग्लंडच्या समाजसेविका होत्या. मिस सॉमरसेट यांनी शारदासदनसाठी ५५६ रु. ची देणगी गोळा करुन पाठविली. मिस इमा एच. पाल्मर यांनी शारदासदनमध्ये बॉडली स्मृती ग्रंथालय (Bodley Memorial Library)सुरु करण्यासाठी ४५० रु. चा निधी गोळा केला. श्री. हरिश्चंद्र विठ्ठल यांनी १० रु. ची देणगी दिली. या वर्षी शारदासदनासाठी नवीन इमारत व मैदान

खरेदीचा व्यवहार झाला. या व्यवहारात विधी विषयक कामे श्री. चंदावरकर यांनी केली. त्यासाठी त्यांनी मानधन घेतले नाही. शारदासदनच्या नव्या मालमत्तेच्या नोंदणीविषयक कायदेशीर प्रक्रिया न्या. रानडे यांनी पूर्ण केली. नामदार गोपाळ कृष्ण गोखले, आर. बी. कानिटकर, डॉ. आर. जी. भांडारकर ही प्रतिष्ठित मंडळी शारदासदनाच्या विविध कार्यक्रमाला उपस्थित राहत होती. त्यांचे बहुमोल मार्गदर्शन शारदासदनला मिळत होते. सन १८९१ च्या वार्षिक जमाखर्चाच्या लेखा परिक्षणाचे काम रावसाहेब सी. एन. भट यांनी केले. शारदासदनमध्ये चंद्राबाई, मथुराबाई (धर्मांतरीत ख्रिस्ती), मालनबाई, मिस केम्प या अध्यापनाचे काम करीत होत्या. (Source : Report of Annual Meeting of Ramabai Association held March 11, 1892)

### ४) सन १८९२ – १८९३

पं.रमाबाईंनी सन १८९२ सालचा वार्षिक अहवाल दि. २७ जानेवारी १८९३ ला असोशिएशनला पाठविला होता. २६ जुलै १८९२ मध्ये शारदासदनचे नवीन इमारतीमध्ये स्थलांतर झाले. या वर्षात विद्यार्थीनींची संख्या वाढल्याचे त्या नमूद करतात. त्या लिहितात की, “We have thirty eight widows as against thirty at this time last year and there are eleven non widow pupils. All these forty nine girls board in the school.”[१८०] यावेळी शारदासदनमध्ये मराठी माध्यमाच्या सहा इयत्ता होत्या. इंग्रजी माध्यमाच्या चार इयत्ता होत्या. तत्वज्ञान, मूल्यशिक्षण, इतिहास, स्वच्छता इत्यादी विषयांचे अध्यापन केले जात होते. इतर विषयांचे औपचारिक शिक्षण दिले जात होते.

प्रा. मॅक्स मुल्लर हे प्राच्यविद्या विद्वान होते. त्यांनी शारदासदनच्या कामाचे कौतुक केले. त्यांनी १० पौंड जमा केले. शारदासदनासाठी पुणे, बडोदा व इतर ठिकाणच्या सद्गृहस्थांनी ५०० रु. देणगी दिली. मिस पिक ओव्हर व श्रीमती एलिस यांनी २५० रु. देणगी पाठविली. बॉम्बे गार्डीयन वृत्तपत्राचे संपादक मि. डायर यांनी १०० रु. देणगी पाठविली. ११ मार्च सन १८९३ च्या अहवालामध्ये शारदासदन शाळेचे वेळापत्रक दिले आहे. शारदासदनमधील कामकाज शिस्तबध्द पध्दतीने चालत होते. मुलींवर स्वावलंबनाचे संस्कार केले जात होते. शालेय शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण दिले जात होते. मुलींना सतत कार्यकम्न ठेवणारे वेळापत्रक होते.

पं. रमाबाई १८९३ च्या अहवालात नमूद करतात की, दररोज सकाळी सात वाजता मुलींना दूध व नाष्टा दिला जात होता. चहा वा कॉफी पिण्यास मनाई होती. मुलींना राहण्याच्या खोल्या, वस्तू, कपडे निटनेटक्या ठेवाव्या लागत. स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जात होते. दर शनिवार शाळा सकाळी ७.०० ते सकाळी १०.३० या वेळेत भरत होती. आजच्या काळातील शनिवार अर्धा दिवस शाळा ही संकल्पना शारदासदनात एकोणिसाव्या शतकात राबविली होती. रविवारी शाळेला सुट्टी दिली जात होती. (Source : Report of Annual Meeting of Ramabai Association held March 11, 1893)

**५) सन १८९५ – १८९६**

पं.रमाबाईंनी सन १८९५ चा वार्षिक अहवाल दि. ३१ जानेवारी १८९६ रोजी पाठविला होता. सन १८९५ मध्ये शारदासदनाची एकूण पटसंख्या ६५ होती. त्यामध्ये ३९ विधवा होत्या. २६ अविवाहीत मुली होत्या. या वर्षी हायस्कूलचे वर्ग सुरु झाले. शारदासदनमध्ये मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण दिले जात होते. या अहवाल वर्षात चार विधवांचे पुनर्विवाह झाले. चार मुली प्रशिक्षित होऊन इतर शाळेत शिक्षिकेची नोकरी करीत होत्या. सौ. मेरीबाई उर्फ शेवंतिकाबाई निकुंबे ह्या पं. रमाबाईंच्या सहकारी होत्या. "त्यांनी उच्चवर्णीय विधवांसाठी, गृहिणींसाठी व अविवाहीत कन्यकांसाठी एक नमुनेदार शाळा काढली."[१८१] रमाबाई असोशिएशनच्या अहवालात या शाळेविषयी लिहिले आहे की, "Mrs. Nikambe's school is the direct out come of Sharada Sadan."[१८२] एका विद्यार्थीनीने स्वतःचे बालशिक्षण गृह सुरु केले. या अहवाल वर्षात चार मुली पारिचारीका म्हणून प्रशिक्षित झाल्या. इतर हॉस्पीटलमध्ये पारिचारीका म्हणून नोकरी करीत होत्या. तीन मुलींना शिक्षिकेचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्या शारदासदन शाळेत अध्यापनाचे काम करीत होत्या. दोन स्वयंसेविका विधवांच्या शुश्रृषेचे काम करीत होत्या. दोन मुली उपेक्षित महिलांसाठी काम करीत होत्या. एक मुलगी दलित व अस्पृश्य महिलांना शिक्षण देत होती.

सन १८९५ मध्ये १२ मुलींनी ख्रिस्ती धर्म स्विकारला. मुलींना इच्छेनुसार ख्रिस्त धर्म शिक्षण घेण्यासाठी झनाना मिशनमध्ये पाठविले जात होते. बायबलचे अध्ययन करण्याची परवानगी मुलींना दिली होती. बाप्तिस्मा घेऊ इच्छिणाऱ्या मुलींच्या धर्मांतराला पं. रमाबाई परवानगी देत होत्या.

(Source : Report of Annual Meeting of Ramabai Association held March 11, 1896)

## ६) सन १८९६ – १८९७

पं. रमाबाईंनी सन १८९६ चा वार्षिक अहवाल २७ जानेवारी १८९७ रोजी असोशिएशनकडे पाठविला. या वर्षातील विद्यार्थीनी संख्येविषयी लिहितात की, "Eighty six young widows and thirteen non widow girls are under instruction."[१८३] सन १८९६ मध्ये शारदासदनमधील प्रवेशित मुलींची संख्या ९९ झाली होती. शारदासदनाला होणाऱ्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर ८६ ही विधवा मुलींची संख्या फार मोठी होती. शारदासदनमध्ये ८ इयत्तेपर्यंतचे वर्ग सुरु होते. तसेच येथे मॅट्रीक्युलेशनचे वर्ग सुरु होते. एकूण सात शिक्षिका अध्यापनाचे कार्य करीत होत्या. शालेय शिक्षणाबरोबरच चित्रकला वर्ग, संगीत वर्ग सुरु होते. किंडरगार्टनसाठी प्रशिक्षित शिक्षिका तयार करण्याचा प्रशिक्षण वर्ग सुरु होता. किंडरगार्टन वर्गात २० बालके शिकत होती. सन १८९६ मध्ये मध्य प्रांतात मोठा दुष्काळ पडला होता. पं. रमाबाईंनी दुष्काळी प्रांतातून विधवा शारदासदनमध्ये आणल्या त्या लिहितात की, "I succeeded in getting forty-seven young widows from the famine districts."[१८४](Source : Report of Annual Meeting of Ramabai Association held March 17, 1897)

## ७) सन १८९७ – १८९८

रमाबाई असोशिएशनच्या सन १८९८ च्या वार्षिक सभेसाठी पं. रमाबाई स्वत: उपस्थित होत्या. त्यांनी सन १८९७–९८ या वर्षातील अहवाल वाचन स्वत: केले. या अहवालामध्ये शारदासदनच्या दहा वर्षाचा आढावा घेतला. सन १८९८ ला रमाबाई असोशिएान बरखास्त केले. शारदासदनाला मदत करावयाचा दहा वर्षाचा कालावधी संपला. तेथेच रमाबाई असोशिएशन बरखास्त करुन द अमेरिकन रमाबाई असोशिएान या नव्या संस्थेची निर्मिती केली होती. या नव्या संस्थेच्या पं. रमाबाईंच्या कार्याला पाठिंबा दिला. या वर्षी शारदासदनात ७५ विधवा प्रवेशित होत्या. किंडरगार्टन शाळेत ७० विद्यार्थी शिक्षण घेत होते. या अहवाल वर्षात ४८ मुलींनी ख्रिस्ती धर्म स्विकारला. शारदासदनाच्या नऊ वर्षाच्या काळात एकूण ३५० मुली उत्तीर्ण झाल्या. (Source : Report of the Annual Meeting of Ramabai Association Held March 16, 1898)

## प्रकरण चौथे

# तळटीपा

१. कोसंबी मीरा, पंडिता रमाबाई, पुणे, २०१०, पृ. ६३.

२. Shah A. B. (Edited by), The Letters and Correspondence of Pandita Ramabai, Bombay, 1977, Page. 165.

३. तत्रैव, पृ. १६५.

४. तत्रैव, पृ. १६३.

५. पं. रमाबाई, युनायटेडची लोकस्थिती व प्रवासवृत्त, मुंबई, १८८९, पुनर्मुद्रण १९९६, प्रस्तावना पृष्ठ.

६. Shah A. B. (Edited by), पूर्वोक्त, पृ. १९४.

७. Shah A. B. (Edited by), पूर्वोक्त, पृ. १९४.

८. टिळक दे. ना., महाराष्ट्राची तेजस्विनी–पंडिता रमाबाई, पुणे, २०१२, पृ. १९४.

९. Shah A. B. (Edited by), पूर्वोक्त, पृ. १७३.

१०. पं. रमाबाई, युनायटेड स्टेटस्ची लोकस्थिती व प्रवासवृत्त, पूर्वोक्त, पृ. १३५.

११. आढाव एस. एम., पंडिता रमाबाई, पृ. २४.

१२. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. १९५.

१३. पं. रमाबाई, युनायटेड स्टेटस्ची लोकस्थिती व प्रवासवृत्त, पूर्वोक्त, पृ. २१८.

१४. तत्रैव, पृ. २२२.

१५. तत्रैव, पृ.२०५.

१६. आढाव एस. एम., पूर्वोक्त, पृ. ८८.

१७. जोगळेकर मृणालिनी, स्त्री अस्मितेचा अविष्कार, १९ वे शतक भाग ३, पं. रमाबाई, मुंबई, १९९१, पृ. ७३.

१८. तत्रैव, पृ. ७३.

१९. Butlar Clementina, Pandita Ramabai Saraswati, Fleming H. Revell Company, London, 1922, Page. 20.

२०. Pandita Ramabai, High Caste Hindu Women, Philadelfia Publishing House, America, 1987.

२१. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. ७३.

२२. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २०६.

२३. तत्रैव, पृ. २०६.

२४. Shah A. B. (Edited by), पूर्वोक्त, पृ. १९२.

२५. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २०८, २०९.

२६. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. ७४.

२७. Shah A. B. (Edited by), पूर्वोक्त, पृ. २१९.

२८. Butlar Clementina, पूर्वोक्त, पृ. २१.

२९. Shah A. B. (Edited by), पूर्वोक्त, पृ. २२८.

३०. Report of Annual Meeting of Ramabai Assocation, 1890, Page.15.

३१. Shah A. B. (Edited by), पूर्वोक्त, पृ. २२८.

३२. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, (हाँगकाँग डेली प्रेस १६ जानेवारी १८८९) पृ. ८८.

३३. तत्रैव, (हाँगकाँग डेली प्रेस २३ जानेवारी १८८९) पृ. ८८.

३४. वैद्य द्वा. गो, पंडिता रमाबाई, मुंबई, १९२२.

३५. इंदुप्रकाश, १८ फेब्रुवारी १८८९.

३६. केसरी, १२ फेब्रुवारी १८८९.

३७. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ९०.

३८. दिघे प्रभाकर, सरस्वती, मुंबई, १९९२, पृ. २५९

३९. वैद्य सरोजिनी, श्रीमती काशिबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र, मुंबई, १९९१, पृ. ९२, ९३.

४०. ढेरे अरुणा, विस्मृती चित्रे, पुणे १९९८, पृ. २८३.

४१. कर्वे आनंदीबाई, माझे पुराण, मुंबई, १९४४, पृ. १९.

४२. कर्वे धोंडो केशव, आत्मवृत्त व चरित्र, (चरित्र लेखक–ना. म. पटवर्धन), पुणे १९५८, पृ. ११७.

४३. ज्ञानोदय, १३ ऑक्टोबर १८८७.

४४. ज्ञानोदय, २१ मार्च १८८९.

४५. Shah A. B. (Edited by), पूर्वोक्त, पृ. २३८.

४६. ठाकरे के. सी., पंडिता रमाबाअी सरस्वती, गिरगाव, मुंबई, १९५०, पृ. ४३.

४७. दिघे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. २६०.

४८. पं. रमाबाई मुक्ति मिशन शताब्दी अंक, केडगाव, १९८९. पृ. ६

४९. Report of Annual Meeting of Ramabai Association held on March 12, 1890.

५०. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. ४५.

५१. कर्वे धोंडो केशव, पूर्वोक्त, पृ. १८८.

५२. गद्रे कृष्णाबाई, स्मृतिसुमने, केडगाव, प्र. आ. १९३९, दु. आ. २०१३, पृ. ३९.

५३. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २०७.

५४. तत्रैव, पृ. २२५.

५५. तत्रैव पृ. २२५.

५६. Shah A. B. (Edited by), पूर्वोक्त, २३८.

(Letter from Pt. Ramabai to Sister Giraldin on Dated January 4, 1889)

५७. Shah A. B. (Edited by), पूर्वोक्त, २४९.

(Letter from Pt. Ramabai to Sister Giraldin on Dated August 27, 1889)

५८. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ९१.

५९. Report of Annual Meeting of Ramabai Association held on March 11, 1891, Page. 14.

६०. तत्रैव, पृ. १३.

६१. Butlar Clementina, पूर्वोक्त, पृ. ७७.

६२. Report from Pt. Ramabai to Ramabai Association dated on January 29, 1892.

६३. Letter from Madam Sorabaji to Executive committee of Ramabai Association dated on January 27, 1893.

६४. तत्रैव,

६५. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ९१.

६६. Jayanti Chacravarti's Article namedPandita Ramabai: A woman ahead of her times Dated on March 8, 2008.

६७. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ३९.

६८. आढाव एस. एम.,पूर्वोक्त, पृ. १७.

६९. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. ४५.

७०. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २२२.

७१. कर्वे आनंदीबाई, पूर्वोक्त, पृ. २२.

७२. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. ४५.

७३. तत्रैव, पृ. ४७.

७४. Letter from Chandrabai to Ramabai Association dated on January 28, 1891.

७५. Letter from Dwarakabai to Ramabai Association dated on January 28, 1891.

७६. Letter from Varamabai to Ramabai Association dated on January 28, 1891.

७७. Letter from Krushnabai to Ramabai Association dated on January 28, 1891.

७८. Shah A. B. (Edited by), पूर्वोक्त, पृ.२४२.

७९. चाफेकर सुधा, मराठी कन्यांचा कल्पवृत्त, महर्षि धोंडो केशव कर्वे, पुणे, १९९५, पृ.२८.

८०. तत्रैव, पृ.२९.

८१. तत्रैव, पृ. ३१.

८२. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. ९७.

८३. रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची चर्चा, १९ वे शतक, मुंबई, १९९२, पृ. २६०.

८४. चाफेकर सुधा, पूर्वोक्त, पृ. ३३.

८५. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २३९.

८६. तत्रैव, पृ.२३९.

८७. तत्रैव, पृ. २४०.

८८. तत्रैव, पृ. २८८.

८९. तत्रैव, पृ. २९४.

९०. तत्रैव, पृ. २९५ (As quated in Report of the fifth Indian National Congress Proceeding)

९१. M. Santoshkumar, What One Woman Can Do, A Life of Pandita Ramabai I Chennai, 2005, Page. 66.

९२. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. १३७.

९३. तत्रैव, पृ. १२३.

९४. सुधारक, दि. २० जुलै १८९१.

९५. फाटक न. र., न्या रानडे चरित्र, पुणे १९६६, पृ.२८७.

९६. Report of Annual Meeting of Ramabai Association held on March 11, 1892. Page. 24.

९७. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ.२३४, २३५.

९८. Letter from Pt. Ramabai to Siste Giraldin on dated December 23, 1892.

९९. दिघे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ.२७७.

१००. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २३८.

१०१. तत्रैव, पृ. २४३.

१०२. देवधर जोत्स्ना, रमाबाई, मुंबई, १९९२, पृ. १३२.

१०३. Letter from Pt. Ramabai to Sister Giraldin on Dated October, 7, 1889.

१०४. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. २७५.

१०५. वैद्य सरोजिनी, पूर्वोक्त, पृ. ९५.

१०६. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ४०.

१०७. Report of Annual Meeting of Ramabai Association held on March 11, 1892, Page. 27.

१०८. तत्रैव, पृ. २७.

१०९. Letter from Sarah D. Hamlin to Sister Giraldin on Dated August 17, 1890.

११०. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २५२.

१११. तत्रैव, पृ. २५४.

११२. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. ४८.

११३. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २५२.

११४. Letter from Pt. Ramabai to Sister Giraldin on Dated September 15, 1891.

११५. केसरी, २३ जून १८९१.

११६. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. १०८.

११७. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ४०.

११८. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. १०५.

११९. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ४०.

१२०. केसरी, दि. २९ ऑगस्ट १८९३.

१२१. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २६८.

१२२. तत्रैव, पृ. २५६.

१२३. Letter from Pt. Ramabai to Sister Giraldin on Dated June 21, 1889.

१२४. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २५७, २५८.

१२५. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. ४९.

१२६. तत्रैव, पृ. ५०.

१२७. टिळक दे. ना., पूर्वोक्त (सुधाकर १२ डिसेंबर १८९०), पृ. २६१.

१२८. टिळक दे. ना., पूर्वोक्त (वासूकाका जोशी चरित्र पृ. १८७, १८८).

१२९. केसरी, दि. २ डिसेंबर १८९०.

१३०. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २६८.

१३१. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. ९५.

१३२. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २६८, २६९.

१३३. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, (सुधारक दि. २० जुलै १८९१) पृ.१०८.

१३३/अ टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३१४.

१३४. टिळक दे. ना. पूर्वोक्त, पृ. ३०८.

१३५. टिळक दे. ना., पूर्वोक्त (सुबोधपत्रिका दि. २४ सप्टेंबर १८९३), पृ. ३०८.

१३६. केसरी, दि. २२ ऑगस्ट १८९३.

१३७. पं. रमाबाईंनी १० फेब्रुवारी १८९६ रोजी दिलेले प्रमाणपत्र.

१३८. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त (सुधारक दि. २१ ऑगस्ट १८९३), पृ. ४०, ४१.

१३९. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ४१.

१४०. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ११२.

१४१. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३१४.

१४२. तत्रैव, पृ. ३१५.

१४३. केसरी, दि. ३ ऑक्टोबर १८९३.

१४४. रमाबाई असोशिएशनचा वार्षिक अहवाल, १८९४, पृ. १७.

१४५. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. ४२.

१४६. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. ११३.

१४७. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३१७.

१४८. तत्रैव, पृ, ३१७.

१४९. केसरी, दि. २१ जानेवारी १८९६.

१५०. Report of Annual Meeting of Ramabai Association held on March 18, 1894, Page. 14.

१५१. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. १७.

१५२. तत्रैव, पृ. ४७.

१५३. कर्वे आनंदीबाई, पूर्वोक्त, पृ. ४४.

१५४. टिळक दे. ना. पूर्वोक्त, पृ. ३३९.

१५५. मुक्ति किरण, चर्च शताब्दी अंक, (१८९९–१९९९), केडगाव, १९९९, पृ. १३.

१५६. पं. रमाबाई मुक्ति मिशनचा वार्षिक अहवाल, ऑगस्ट १८९९.

१५७. Report of Annual Meeting of Ramabai Association held on March 16, 1898, Page. 34.

१५८. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३३४.

१५९. रामटेके सु. धो., अग्रेसर स्त्री कैवारी, पंडिता रमाबाई, केडगाव, १९५७, पृ. ३८.

१६०. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३२७.

(डॉ. भांडारकर यांच्या डायरीमध्ये ७ जानेवारी १८९९ रोजी लिहिलेला मजकूर)

१६१. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. २४६.

१६२. ठाकरे के. सी., पूर्वोक्त, पृ. ५८.

१६३. वैद्य द्वा. गो., पूर्वोक्त, पृ. २४६.

१६४. टिळक दे. ना. पूर्वोक्त, पृ. ३४३.

१६५. पं. रमाबाई, माझी साक्ष, पूर्वोक्त, पृ. ४४.

१६६. Letter from Sarah D. Hamlin to Sister Giraldin on Dated August 17, 1890.

१६७. अत्रे प्र. के., मराठी माणसे, मराठी मने, मुंबई, २००३, पृ. ४३.

१६७/अ राऊत अनंत, समाज सुधारकांची तुतारी, औरंगाबाद, २००६, पृ. ११६.

१६८. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३३९.

१६९. Report of Annaul Meeting of Ramabai Association held on March 16, 1898, Page. 36.

१७०. Report of Annaul Meeting of Ramabai Association held on March , 16, 1898, Page. 17, 18

१७१. Report of Annaul Meeting of Ramabai Association held on March 16, 1898, Page. 28.

१७२. Letter from Pt. Ramabai to Ramabai Association dated on April 11, 1889.

१७३. Letter form Pt. Ramabai to Ramabai Association dated on May 21 1889.

१७४. Letter form Pt. Ramabai to Ramabai Association dated on June 11 1889.

१७५. Letter form Pt. Ramabai to Ramabai Association dated on August 23, 1889.

१७६. Report of Annual Meeting of Ramabai Association held on March 11, 19891, Page. 36.

१७७. Letter form Dr. R. G. Bhandarkar to Ramabai Association dated on January 30, 1891.

१७८. Letter from Pt. Ramabai to Ramabai Association dated onJanuary 29, 1892.

१७९. Report of anual Meeting of Ramabai Association held on March 11, 1892, Page. 25.

१८०. Letter from Pt. Ramabai to Ramabai Association dated on January 27, 1893.

१८१. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३२१.

१८२. Report of Annual Meeting of Ramabai Association held on March 12, 1894, Page. 27.

१८३. Letter from Pt. Ramabai to Ramabai Association dated onJanuary 27, 1897

१८४. Letter from Pt. Ramabai to Ramabai Association dated on Janaury 27, 1897.

# प्रकरण ५ वे

# मुक्ति मिशनचे कार्य

(सन १८९८ ते सन १९८९)

## ५.१ मुक्ति मिशनच्या स्थापनेची पार्श्वभूमी :

सन १८९६–९७ मध्ये केडगाव येथे मुक्ति सदन हा तात्पुरती वसाहत तयार केली होती. केडगाव हे ठिकाण दौंड तालुक्यात पुणे जिल्ह्यामध्ये आहे. २४ सप्टेंबर १८९८ रोजी मुक्ति सदनचे नामांतर 'मुक्ति मिशन' असे झाले.

१८८५ साली पं. रमाबाईंनी "पुण्यापासून ३५ मैलावर केडगाव नावाच्या गावी १०० एकर बरड जमीन स्वस्त मिळाली म्हणून खरेदी करुन ठेवली होती."[1] ह्या व्यवहारामागे पंडिता रमाबाईंची दूरदृष्टी दिसून येते. शारदासदनासाठी रमाबाई असोशिएशनने मदत करण्याचे वचन दहा वर्षांसाठी दिले होते. ही मुदत संपत आली होती. या काळात सनातनी मंडळींनी शारदासदनाला समाजाचा आश्रय मिळू दिला नाही. त्यामुळे "अमेरिकन पाठिंबा नाहिसा झाल्यावर महाराष्ट्र शारदा सदनाची जबाबदारी आपल्या शिरावर घेईल ही आशा वेडगळपणाची होती."[2] विधवा स्त्रियांचे सामाजिकीकरण याबाबी धर्मबाह्य होत्या. शारदासदनातील धर्मांतरे हिंदू समाजापुढील आव्हान होती. त्यामुळे शारदासदन व हिंदू समाज यामध्ये संघर्ष झाला. हिंदू समाज शारदासदनाला मदत करील ही आशा नष्ट झाली.

सुरुवातीला सुधारकांनी शारदासदनाला पाठिंबा दिला होता. शारदासदनची वाटचाल ख्रिस्तीकरणाकडे होऊ लागली. तेव्हा सुधारक मंडळी स्त्री सुधारणा की धर्म भावना या वैचारिक द्वंद्वात अडकली. स्त्री सुधारणा चळवळीच्या तुलनेत धर्म भावना प्रबळ ठरली. शारदासदनातील कार्य हिंदू धर्मावरील संकट मानले.

पं. रमाबाईंनी स्त्री उध्दाराचे कार्य आत्मनिर्भरतेच्या पायावर उभे करायचे होते. पं. रमाबाईंच्या वडिलांनी शेती उत्पन्नातून आश्रम चालविला होता. हीच प्रेरणा त्यांनी घेतली व केडगाव येथे शेतीसाठी जमीन खरेदी केली. यामागे हेतू हा की, "तेथे शेती, फळबागा वगैरे लावून आपल्या वडीलांप्रमाणे आपल्या विशाल कुटूंबाचा योगक्षेम करायचा व मुलींना पण स्वावलंबी जीवनाचे धडे द्यायचे."[3]

केडगावच्या जमिनीवरच मुक्ति मिशनची वसाहत उभी राहिली. गेली शंभर वर्षे ही संस्था हजारो अनाथ व गरजू स्त्रियांचा आधार बनली. पं. रमाबाईंनी दाखविलेली दूरदृष्टी व योजकता महत्त्वाची ठरली. पं. रमाबाईंच्या चरित्रकार मिस फुल्लर या जमिनीचे वर्णन "It was to bare, stony, treeless, shelterless, waterless place that Ramabai eventually took he waifs."[४] असे करतात.

ही जमीन खरेदी करण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते. याबाबत त्यांनी रमाबाई असोशिएशनकडे विचारणा केली होती. "रमाबाई असोशिएशनच्या घटनेप्रमाणे असोशिएशनला आपल्या पैशाचा अशा रीतीने विनियोग करण्याचा अधिकार नव्हता. त्यांनी आपली दिलगिरी व्यक्त करुन मोठ्या नाखुषीने रमाबाईच्या सूचनेला नकार दिला."[५] पं. रमाबाईंच्या अमेरिकेतील मैत्रिणींनी पैशाची तरतूद केली होती. त्यातून त्यांनी जमिन खरेदी केली. जमिनीसाठी पैसा उभा करण्यासाठी "त्यांनी स्वत:ची विमा पॉलिसी गहाण ठेवल्यास पैशाची काही तरतूद होते का, ह्याचा मुंबईस जाऊन प्रयत्न केलेला दिसतो."[६]

या जमिनीचा उपयोग १८९७ च्या सुमारास दोन कारणांसाठी झाला. १८९६–९७ च्या दुष्काळी प्रांतातून पं. रमाबाईंनी ३०० मुली आणल्या होत्या. या मुली व स्त्रियांच्या पुनर्वसनासाठी केडगावच्या जमिनीचा उपयोग झाला. सन १८९७ मध्ये पुण्यात प्लेगची साथ पसरली होती. यावेळी दुष्काळातील मुलींना पुण्यात ठेवण्यास मनाई करण्यात आली. "अठ्ठेचाळीस तासाच्या आत मुली पुण्याच्या बाहेर नेण्याची नोटीस सिटी मॅजिस्ट्रेटकडून आली."[७] पं. रमाबाईंनी पुण्याहून केडगावला जागापालट केली. केडगावच्या माळरानावर तंबू ठोकून मुलींची वसाहत सुरु केली. या नव्या वसाहतीस 'मुक्ति सदन' असे नाव दिले.

केडगावची जमीन हाताशी नसती तर शारदासदनाच्या समाप्तीबरोबरच पंडिता रमाबाईंच्या कार्याला पूर्णविराम मिळाला असता. केडगावची जागा मुलींसाठी प्रतिकूल व असुरक्षित होती. पैशाचे व माणसांचे पाठबळ नव्हते. पं. रमाबाईंची येशूवरील श्रध्दा अढळ होती. "Open thy mouth and I will fill it."[८] या वचनावर त्यांचा विश्वास होता. याच श्रध्देच्या जोरावर त्यांनी मुक्ति सदन सुरु केले होते. पुण्यामध्ये लो. टिळक व अनुयायांनी शारदासदनाला विरोध केला होता. पुण्यामध्ये शारदासदनचा जनाधार संपला होता. मुलींच्या

ख्रिस्ती धर्मांतरामुळे पुण्यातील लोकमत पं. रमाबाईंच्या विरुध्द गेले होते. म्हणून पं. रमाबाईंनी पुण्यापासून दूर केडगाव येथे मुक्ति सदन सुरु केले होते.

केडगावचे मुक्ति सदन व पुण्यातील शारदासदन अशी दुहेरी जबाबदारी पं. रमाबाईंवर होती. त्यांनी पुण्यातील शारदासदनची जबाबदारी सुंदराबाई पवार यांच्यावर सोपविली. केडगावच्या माळरानावर तंबू ठोकले. तेथे मुलींच्या निवासाची सोय केली. त्यांच्या खर्चाचा ताण पडला, त्याचवेळी त्यांनी अमेरिकेहून तार आली की, “There was not money in the treasury for this quarter’s expenses of the Sharada Sadan.”[९] अशा स्थितीत पुण्यामध्ये शारदासदन चालविणे खर्चिक व अशक्य होते. त्या लिहितात, “There were the travelling expenses and other heavy expenses to be taken into account. This proved to expensive an affair to be continued year after. There was not only the bubonic plaque to be feared; there were other plaques besides this one and it was impossible for me to keep the school there, so I brought the Sharada Sadan to Kedgaon to avoid these and a hundred additional troubles.”[१०]

पुण्यामध्ये अमेरिकन मदतीशिवाय उत्पन्नाचा स्त्रोत नव्हता. केडगावची जमीन हे उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन होते. म्हणूनच केडगावला पैशाची समस्या सुटणार होती. पुण्यातील प्लेग हे स्थलांतराचे निमित्तमात्र कारण होते.

१८९७ मध्ये मध्यप्रांत व सन १९०० मध्ये गुजराथमध्ये मोठा दुष्काळ पडला होता. ह्या दुष्काळातून आणलेल्या शेकडो मुलींची व्यवस्था पुण्यातील शारदासदनात करणे शक्य नव्हते. मध्यप्रांत व गुजराथ “या खेरीज आणखी कितीतरी प्रांतातून मद्रास ते मुंबई, बनारस ते कलकत्ता, अलाहाबाद ते रायचूर, पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर अशा चोहो दिशांतून मुली येऊ लागल्या. पुण्यातला ७० मुलींना पुरेसा बंगला आता एवढ्या मोठ्या संस्थेला कसा काय पुरणार? ह्या कारणामुळेच शारदासदन ही संस्था रमाबाईंनी केडगावात आणून जुळविली व ती आज रमाबाई मुक्ति मिशन या नावाने चालू आहे.”[११] पं. रमाबाईंनी मुक्ति मिशन सुरु करण्यामागे पुण्यातील प्लेग, पुण्यात ख्रिस्ती धर्मप्रसाराला होणारा विरोध, आर्थिक समस्या व दुष्काळातील मुलींच्या निवासाचा प्रश्न इत्यादी कारणे होती. त्यापेक्षाही त्यांना भूतदयेतून दुष्काळातील मुलींना आसरा दिला. त्यांचे व्यवस्थापन यशस्वीपणे करण्यासाठी त्यांना केडगावला स्थलांतर करण्यावाचून पर्याय नव्हता असे दिसते.

## ५.२ मुक्ति मिशनची उभारणी :

सन १८९८ मध्ये मुक्ति मिशनची स्थापना झाली. तेव्हापासून पं. रमाबाईंनी आपल्या सर्व कामाचे केंद्र केडगाव हेच केले. शारदासदन पुण्याहून केडगावला आणण्यात आले. मुक्ति मिशनमध्ये वेगवेगळे विभाग पाडले. त्यांच्या कामाचा व्याप वाढला. मध्यप्रांत व गुजराथ येथून "स्त्रिया व लहान मुले मिळून एकंदर १३५० जणांस केडगावास आणले."[१२] त्यांची व्यवस्था तात्पुरत्या तंबूमध्ये करण्यात आली होती."सन १८९७ च्या अस्तापूर्वी ८५००० डॉलर्स ह्या इमारती बांधण्यासाठी धडपडू लागले. त्यांच्या धडपडींना यश येऊन केडगावास टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या."[१३] ही मदत परदेशी मैत्रिणींनी दिली होती. मुक्ति मिशनच्या उभारणी संदर्भात प्रेअर बेलच्या शताब्दी अंकात लिहिले आहे की, "The first permanent building known as 'The Barn' was completed and dedicated on 24th September 1898."[१४] मुक्ति मिशनमध्ये विविध विभाग होते. या विभागांची विभागवार माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे.

### ५.२.१ कृपासदन (Home of Grace)

'कृपासदन' नावाचा एक विभाग आहे. पं. रमाबाई "इंग्लंडमध्ये असताना त्यांचे ख्रिस्ती धर्माकडे विशेष लक्ष गेले त्या 'Sisters of merces' च्या धर्तीवर हे सदन काढण्यात आले."[१५] पं. रमाबाईंनी कृपासदनमध्ये दुवर्तनी स्त्रियांना आश्रय दिला. तत्कालीन समाजात दुवर्तनी स्त्रियांना, वाकडे पाऊल पडलेल्या स्त्रियांना बहिष्कृत केले जात होते. तरुण विधवांवर लैंगिक अत्याचार होत होते. काही वेळेला तरुण विधवा नैसर्गिक वासनेला बळी पडत होत्या. अशा स्त्रियांना दुवर्तनी समजले जात होते. समाजामध्ये तिला 'कुलटा, रांड' म्हणत होते. अशा दुवर्तनी स्त्रियांसमोर दोनच पर्याय शिल्लक राहत होते, आत्महत्या करणे वा देहविक्रय करुन (वेश्याव्यवसाय) पोट भरणे.

पं. रमाबाईंनी समाजातून बहिष्कृत केलेल्या स्त्रियांना कृपासदनमध्ये आश्रय दिला. कृपासदनमध्ये त्यांना नवजीवनाची संधी मिळाली. अशा पतित स्त्रियांना प्रेमाने स्विकारुन सन्मार्गाला लावणारी एकही संस्था हिंदुस्थानात नव्हती. पं. रमाबाईंना कृपासदन सुरु करण्याची प्रेरणा येशूच्या शिकवणीतून मिळाली होती. या संदर्भात पं. रमाबाई म्हणतात, "When in England early in 1883, the sisters of wantage took me to see their rescue work. Here for the first time in my life I came to know that something should be done

to reclaim the so called fallen women... These unfortunate women were degreaded in the eyes of society. I had not heard any one speaking kindly of them, nor making any effort to turn them from the evil path they had chosen in their folly."[१६]

बायबलमध्ये शोरोमनी स्त्रीची कथा आहे. या कथेचा विशेष प्रभाव पं. रमाबाईंवर पडलेला दिसतो. शोरोमनी या पतित स्त्रीचा उद्धार येशूने केला होता असा संदर्भ बायबलमध्ये आहे. पं. रमाबाईंनी कृपासदनमध्ये अशा पतित स्त्रियांना आश्रय दिला. दुर्वर्तनी स्त्रियांचे पुनर्वसन ही कल्पना तत्कालीन समाजाला मानवणारी नव्हती. त्या काळात पं. रमाबाईंनी समाजातील अत्यंत उपेक्षित स्त्रियांचा विचार केला होता.

कृपासदनातील स्त्रिया वयात आलेल्या होत्या. त्या निराश्रीत व अनाथ होत्या. "त्या अगदी अशिक्षित, काही अर्धवट, रानवट, काही भुताखेतांनी पीडलेल्या आणि भयंकर रोगांनी जर्जर झालेल्या होत्या. त्यांचा उपसर्ग इतर चांगल्या मुलींना पोहोचतो की काय याची पं. रमाबाईंना भिती वाटत होती."[१७] त्यातील बऱ्याच जणींवर कुप्रवृत्तीच्या पुरुषांनी अत्याचार केले होते. अशा स्त्रियांची स्वतंत्र व्यवस्था करणे गरजेचे होते. त्यांच्यासाठी स्वतंत्र इमारत बांधण्यासाठी पुरेसा पैसा नव्हता. याकामी सिस्टर एडमंड व मिस बेकर यांनी खूप मदत केली. "मिसेस बेकर ही महिला अमेरिकन ख्रिस्ती मिशनमध्ये काम करीत होत्या. तिला उद्धार गृहासंबंधीचा विशेष अभ्यास होता. तिला त्यासंबंधी बराच अनुभव होता. केवळ एक दिवस केडगावला राहायला आलेली मिसेस बेकर कायमची इथे काम करीत राहिली."[१८] दोन वर्षे काम केल्यानंतर मिस एडमंड यांनी बेळगाव येथे उद्धारगृह सुरु केले.

दि. २० मार्च १८९९ रोजी कृपासदनसाठी स्वतंत्र इमारतीची कोनशिला बसविली. "त्यावेळी तेरा मुली प्रवेशित होत्या. या इमारती भोवती काटेरी कुंपण संरक्षणासाठी घातले. सन १९०० ते १९०२ या दुष्काळातील काळात ३५० मुलींचा प्रवेश होता. सन १९०३ मध्ये २०० मुली या कृपासदनात होत्या."[१९]

एवढ्या मोठ्या संख्या असलेल्या पतित स्त्रियांमध्ये सुधारणा करणे म्हणजे एक आव्हान होते. त्यांच्या नैसर्गिक वासनांना नियंत्रित करणे अवघड काम होते. पं. रमाबाईंनी या कामी येशूवर भिस्त ठेवलेली दिसते. "त्यांच्यासारखी विद्वान समाज सेविका आपल्या भारतात

अद्याप झालेली नाही असे ज्या काही विद्वानांचे म्हणणे आहे त्यांची सत्यता मनाला पटल्यावाचून राहत नाही."[२०]

कृपासदनातील कार्याद्वारे पं. रमाबाईंनी समाजापुढे माणुसकीचे पहिले उदाहरण घालून दिले. परंतु तत्कालीन समाजाला हे कार्य फारसे आवडलेले दिसत नाही. दुर्वर्तनी स्त्रियांवर संस्कार करणे, त्यांना ख्रिस्ती करणे यामुळे केसरीकारांनी पंडिता रमाबाईंवर कडक टीका केली. ते लिहितात, "त्यांना आमची शेवटची एकच सूचना आहे की, हिंदूत्वाचा जो एक कलंक त्यांच्या नावाच्या मागे पंडिता पदवी रुपाने लावला आहे तो नाहिसा करुन तेथे त्यांनी रेव्हरंडा हे पवित्र उपपद धारण करावे."[२१] केसरीकारांनी वापरेलेला रेव्हरंडा या शब्दाचा नेमका अर्थ सांगण्याची गरज नाही. रेव्हरंडा हा शब्द योजून केसरीकारांनी पं. रमाबाईंच्या कार्याविषयी घृणा व्यक्त केली होती. कृपासदन आजही मुक्ति मिशनमध्ये कार्यरत आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये पतित स्त्रियांच्या पुनर्वसनाचे कार्य कृपासदनमध्ये अविरतपणे चालू आहे.

### ५.२.२ प्रिती सदन (Home of Love)

मुक्ति मिशनमध्ये प्रिती सदन नावाचा विभाग आहे. पं. रमाबाईंनी या विभागामध्ये वृध्द, अशक्त स्त्रियांना प्रवेश दिला. प्रिती सदनात लंगड्या, लुळ्या, मुक्या, बहिऱ्या, पांगळ्या, आंधळ्या स्त्रिया व मुलींची व्यवस्था केली होती. "पं. रमाबाईंचे विशेष लक्ष ह्या लंगड्या, लुळ्या, मुक्या, बहिऱ्या अशा स्त्रियांकडे असे. त्यांच्या सुखासाठी, आरामासाठी परमेश्वर आपल्याला सामर्थ्य देत आहे, तेव्हा त्यांना सुखी, आनंदी ठेवणे हे त्या आपले कर्तव्य मानीत."[२२] या सर्व स्त्रिया व मुली दुष्काळी प्रांतातून आणल्या होत्या. विकलांग स्त्रियांची समाजात अवहेलना होत होती. त्यांना अपूर्ण व्यक्ती समजले जात होते. अशा निराधार अपंग स्त्रियांची जबाबदारी समाज घेणे शक्य नव्हते. त्यांचे जीवन परावलंबी होते. अपंगत्वामुळे आलेले परावलंबीत्त्व त्यांना शाप होते. त्यांना वैद्यकीय उपचाराची गरज होती. त्यांना प्रेमाची गरज होती. "आपल्या परावलंबी जीवनाचा विसर पडेल अशा गोष्टी सांगून पं. रमाबाई त्यांचे मनोरंजन करायच्या. त्यांना आनंदी ठेवण्याकडे पं. रमाबाईंचे विशेष लक्ष असे."[२३] पं. रमाबाईंनी अपंगाविषयी सामाजिक बांधिलकी जपली. प्रितीसदन हे मानवतेचे उदाहरण होते. पं. रमाबईंनी या स्त्रियांना वैद्यकीय सेवा पुरविली. त्यांच्या शारीरिक क्षमतेचा विचार करुन व्यवसायिक कौशल्ये शिकविली. त्यांना स्वावलंबी बनविले. "बैलगाडीने शेकडो मैल उन्हातान्हात,

पावसाळ्यात प्रवास करीत हे रोगी, लुळेपांगळे, उपाशी, जर्जर ३००० लोक रमाबाईंनी दयाभावाने प्रेरीत होऊन आणले."[२४] त्यांची अवस्था अत्यंत वाईट होती. त्यातील बरेचजण भूकबळी ठरले. अशा स्त्रियांचे पुनर्वसन प्रीतीसदनमध्ये केले. त्यातून प्रितीचा संदेश संपूर्ण देशाला दिला. प्रिती सदनविषयीची माहिती कृष्णाबाई गद्रे देतात की, "प्रितीसदन हे सुमारे साठ–सत्तर स्त्रियांचे वसतीस्थान आहे. ह्या स्त्रिया शेतकी, धोबीकाम, नर्सकाम, स्वयंपाक इत्यादी कामे करुन मिशनला सहाय्य करतात व आपले उपजीवन चालवितात. ह्या आपल्या कामात नेहमी विश्वासू व तत्पर असतात."[२५] या अपंग स्त्रियांची समाजाला फारशी गरज नव्हती. मात्र मुक्ति मिशनमध्ये अशा स्त्रिया एक खास घटक होऊन बसल्या होत्या असे कृष्णाबाई गद्रे म्हणतात.

### ५.२.३ बार्तमी सदन (Home of Bartimaeus)

मुक्ति मिशनमध्ये अंधांसाठी एक स्वतंत्र विभाग आहे. पं. रमाबाईंनी या विभागाचे नाव बार्तमी सदन असे ठेवले. "बायबलमध्ये बार्तमी नावाच्या अंधाची गोष्ट आहे."[२६] पं. रमाबाईंचे चरित्रकार टिळक दे. ना. लिहितात की, "ही भारतातील पहिली अंधशाळा होय."[२७] येथील अंध स्त्रिया व मुलींना प्रेमाने वागविण्यात येत होते. त्यांना ब्रेल लिपीतून शिक्षण दिले जात होते. हाताच्या बोटांनी चाचपून अक्षरवाचन करण्याचा अभिनव व क्रांतिकारक प्रयोग भारतात प्रथमच घडवून आणला होता. मनोरमाबाईंनी अंधशाळेचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. त्या अंधशाळेची जबाबदारी घेत होत्या. पं. रमाबाई मुक्ति मिशनच्या शताब्दी अंकामध्ये लिहिले आहे की, "Manoramabai, on her return from U.S.A. in 1901 took a special interest in teaching there children. In spite of many heavy responcibilities, she maintained this interest right through her life."[२५]

या शाळेमध्ये अंध मुली व स्त्रियांना इंग्रजी, मराठी लेखनवाचन, गणित इत्यादी विषय शिकविले जात. त्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी व्यवसायिक शिक्षण दिले जात होते. "स्वेटर विणणे, वेताच्या खूर्च्या विणणे, केळीच्या सोपटाच्या टोपल्या तयार करणे, मणी भरणे, वाकाच्या दोऱ्या विणणे इत्यादी कामे अंध स्त्रिया मोठ्या कुशलतेने करीत होत्या."[२९] मनोरमाबाई अमेरिकन रमाबाई असोशिएशनला दि.३० जानेवारी १९१४ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये लिहितात की, "Our blind girls have learned a little knitting and cane-weaving this year. They have also done a little bead and reed curtain work, and

now they are learing some rug making."[३०] पं. रमाबाई येथील व्यवसायिक शिक्षणाविषयी लिहितात की, "The blind girls learn to make mats, bead, curtains, serviette rings, belts and other things for which we hope to find a good sale."[३१]

वरील नोंदीवरुन बार्तमी सदनातील अंधस्त्रिया व्यवसाय प्रविण होत्या असे दिसते. पं. रमाबाईंनी अंध स्त्रियांना स्वतंत्र अस्तित्व मिळवून दिले. पं. रमाबाईंनी त्यांना आसरा दिला नसता तर त्यांची अवस्था काय झाली असती याची कल्पना करता येणार नाही. "अशा संस्थेवाचून अशा शिक्षणावाचून बिचाऱ्यांचे आयुष्य केवळ दे माय धरणी ठाय झाले असते. भिकेच्या धंद्यापलिकडे दुसरा धंदा त्यांच्या वाट्याला कोणता आला असता?"[३२] अशा प्रकारे पं. रमाबाईंनी अंध स्त्रियांना आत्मसन्मानाचा नवा मार्ग दाखविला. अंध ही स्वतंत्र व्यक्ती असते, तिचे स्वतंत्र अस्तित्व असते, हा आधुनिक विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीमध्ये आणला. बार्तमी सदन हे अंध स्त्रियांचे पुनर्वसन करणारे भारतातील पहिले केंद्र होते.

### ५.२.४ सदानंद सदन :

पं. रमाबाईंनी मुक्ति मिशनमध्ये मुलांसाठी सदानंद सदन सन १९०२ मध्ये सुरु केले. "हे सदन उघडण्याची प्रेरणा बाईंना स्त्रोत १४४:१२ या वचनावरुन झाली."[३३] या सदनाचे काम मिस कौंच पहात होत्या. लहान मुलांवर संस्कार करुन त्यांना सुशिक्षित, प्रशिक्षित करण्याचा हेतू होता. पं. रमाबाईंचा मानसिक कल मुलींच्या पुनर्वसनाकडे होता. त्यामुळे मुलांचे पुनर्वसन अलिप्त ठिकाणी केले. "दौंडचे सुप्रसिध्द मिशनरी रेव्ह. नॉर्टन यांनी मुलांच्या सदनाची जबाबदारी घेतली होती. त्यांनी मुलांसाठी दौंड येथे शाळा सुरु केली होती व ती अद्याप चालू आहे. सदानंद सदनाचे स्थलांतर बी. सी. एच. मिशन (मुलांचे ख्रिस्तगृह) येथे केले."[३४] मुलींच्या पुनर्वसनाच्या कार्याला मर्यादा पडतील असे पं. रमाबाईंना वाटले. म्हणून सदानंद सदन त्यांनी बंद केले होते.

### ५.२.५ मुक्ति मिशन चर्च :

मुक्ति मिशन हे पं. रमाबाईंच्या ख्रिस्तावरील प्रेमाचे प्रतिक होते. पं. रमाबाईंनी मुक्ति मिशनमध्ये ख्रिस्त आराधनेसाठी चर्च बांधले. "मंदिराची इमारत उभारण्याला सुरुवात होण्यापूर्वीच प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणारी एक जीवंत मंडळी मुक्तिमध्ये प्रस्थापित झाली.... पंडिता रमाबाई, मिस अब्राहम आणि पहिले पालक रेव्ह. ब्रुअर यांनी मुक्ति मंडळीची

स्थापना केली. पवित्र शास्त्रांच्या आधारावर मंडळीची स्थापना केली."३५ अशाप्रकारे मुक्ति मिशनमध्ये फार मोठा ख्रिस्ती गट तयार झाला होता. त्यांची आध्यामिक गरज म्हणून चर्च उभारणी केली होती.

सुरुवातीला शब्बाथ शाळेसाठी मोठी इमारत नव्हती. त्यामुळे ती तीन विभागात भरविली जात होती. या पार्श्वभूमीवर एक प्रशस्त व सर्व उपासकांना सामावून घेईल असे उपासना मंदिर निर्माण करण्याची गरज निर्माण झाली. मुक्ति मिशनच्या आवारामध्ये केंद्र जागी २० सप्टेंबर १८९९ रोजी चर्चच्या इमारतीची कोनशिला बसविण्यात आली. या चर्चविषयी मुक्ति मिशनच्या शताब्दी अंकात पुढील माहिती दिली आहे. "The centre of attraction of Mukti compound is the big cross shaped church. The church building is a beautiful structure with seating capcity of 2000 people. It is built of dark gray stone and roofed with mangalore red tiles. The floor is of teak wood. The inside measurement is 135 feet long, 43 feet wide, and from wing to wing 115 feet long. The foundation stone is date 20th September, 1899."[३५]

या चर्चची बांधणी वैशिष्ट्यपूर्ण आहे. चर्चची इमारत साधी व प्रेक्षणीयं आहे. आतील बाजूस जमीन थिक् लाकडाच्या फळ्यांनी आच्चादलेली आहे. लाकडी फळ्यांचे जोड देण्यासाठी लाकडी खिळ्यांचा वापर केला आहे. खालची लाकडी जमिन चांगली गुळगुळीत आहे.

या उपासना मंदिराचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या चर्चवर ख्रिस्ती धर्मसूचक कोणतीही सजावट नाही. चर्चच्या बाहेरील व आतील बाजूस येशू ख्रिस्त वा मदर मेरीच्या इतर चर्चमध्ये आढळणाऱ्या मूर्ती नाहित. चर्चच्या बांधकामात भपका नाही. चर्चभेद दर्शविणाऱ्या बाबी या चर्चमध्ये नाहीत. चर्चला रंगीत काचेच्या खिडक्या किंवा मनोरे नाहीत. चर्चची मूळ बांधकाम शैली पाश्चात्य पध्दतीची असली तरी येथील चर्चवर हा प्रभाव दिसत नाही. याच चर्चवर भारतीय प्रभाव स्पष्टपणे जाणवतो.

पं. रमाबाईंना ठराविक पध्दतीनेच येशूची प्रार्थना करणे मान्य नव्हते. देवाची प्रार्थना अंत:र्मनातून व्हावी, पवित्र भावनेने व्हावी असे त्यांचे मत होते. प्रार्थनेभोवती कोणत्याही बाह्य कृतीचे व चिन्हांचे बंधन त्या मान्य करीत नव्हत्या. म्हणून येथील चर्चमध्ये मूर्ती आढळत नाहीत. ख्रिस्ती धर्माची बाह्य प्रतिके आढळत नाहीत. प्रार्थनेसाठी मेणबत्या व फुले यांचा

अट्टहास धरला नाही. सर्व उपासक जमिनीवर खाली बसून ख्रिस्त आराधना करतात. पं. रमाबाईंच्या जगण्यातला साधेपणा त्यांच्या धर्मांगिकारामध्ये दिसतो.

चर्चची ही इमारत त्यांच्या अभेद्य ख्रिस्तनिष्ठेची साक्ष देते. “ख्रिस्तावरील भरभक्कम विश्वासाची चिरकाल आठवण देणारी ही इमारत आहे.”[३६] पं. रमाबाई प्रार्थनविषयी लिहितात की, “Take way all outword shows of your words and grand ceremonies and teach simply the words of Christ. as they fell from his lips, without making any comments and you will see what power they have of enchanting the people’s hearts.”[३७]

या चर्चच्या पश्चिम बाजूस कोनशिलेचा दगड बसविलेला आहे. त्यावर पवित्र शास्त्रातील उतारा मराठीत लिहीला आहे. “बलाकडून नाही, पराक्रमाकडून नाही तर माझ्या आत्म्याने कार्यसिध्दी होईल असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो. तो खडक तर ख्रिस्त होता. ह्या खडकावर मी आपली मंडळी रचीन व तिच्यापुढे अधोलोकाच्या दाराचे काही चालायचे नाही. ख्रिस्त येशू हाच कोनशिला आहे. त्याच्यामध्ये प्रत्येक इमारत जोडून रचिली असता वाढत वाढत प्रभूच्या ठायी पवित्र मंदिर होते. आमचे पुत्र आपल्या तारुण्याच्या भरांत उंच वाढलेल्या रोपासारखे आहेत. आमच्या कन्या राजमंदिराच्या कोपऱ्यात कोरलेल्या खांबासारख्या आहेत.ता. २० सप्टेंबर १८९९ रोजी मंदिराचा पाया प्रभूमध्ये घातला.”[३८] मुक्ति मिशन चर्च हे पुणे जिल्ह्यातील सर्वात जुने चर्च आहे ते संपूर्ण भारतातील जुन्या चर्चपैकी एक आहे.

**५.२.६ मुक्ति मिशनमधील विहीरी :**

मुक्ति मिशन ही केडगावच्या माळरानावर वसले होते. तेथे दरवर्षी पाऊस अनिश्चित असे. या जमिनीवर शेत करुन उदरनिर्वाह करावा अशी पं. रमाबाईंची योजना होती. केडगावाला पाण्याचे दुर्भिक्ष होते. “कित्येकदा तर पाण्याचे रेशनिंग करावे लागे.सुरुवातीला चाळीस एकर जमीन लागवडीसाठी निवडली होती.”[३९]

पं. रमाबाईंनी मुक्ति परिसरात १२ विहीरी खणल्या. तेथील पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविला. “शंभर वर्षापूर्वी खणलेल्या ह्या विहीरी आजही ऐन उन्हाळ्यात संजीवनी ठरत आहेत. सुमारे १०० एकर क्षेत्रामध्ये या विहीरी खोदल्या असून त्या काळात पं. रमाबाईंनी भविष्यातील गरज म्हणून या विहीरी बांधल्या होत्या. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात कसलीही पाणी

टंचाई जाणवत नसल्याची माहिती पं. रमाबाई मुक्ति मिशनचे प्रशासक बी. ए. गुढे यांनी दिली."[४०]

मुक्ति मिशनमधील १२ विहीरींना वेगवेगळी नावे दिली होती. प्रत्येक विहीरीच्या निर्मितीची वेगवेगळी कथा सांगितली जाते की, "पंचवीस फूट खणल्यानंतरही पाणी लागले नाही म्हणून खणणाऱ्यांचा धीर सुटायची पाळी आली. विहीर खणणारे मजूर निराश झाले. खोदाईची आपली हत्यारे बाईपुढे टाकून निघून गेले. रमाबाईंनी अत्यंत आग्रहाने प्रार्थना केली. सकाळी विहीर पाण्याने भरुन गेली. निराश न होता त्यांनी प्रार्थना केली व तिचे फळही धीर देणारी विहीर म्हणून त्या विहीरीला धीर हेच नाव देण्यात आले."[४१]

पं. रमाबाईंनी नऊ विहीरींना नावे दिली होती. प्रीती, तारण, शांती, येशूकृपा, धीर, उपकार, विश्वास, आशा आणि जीवन अशी अर्थपूर्ण नावे विहीरींना दिली होती. सन १९२६ मध्ये आदोन दिवेकर यांनी नऊ विहीरींचे गाणे लिहिले होते. याशिवाय याकोबाची विहीर, बडीमोटची विहीर, पालकाची विहीर या विहीरी पं. रमाबाईंच्या काळात खणल्या होत्या. या विहीरी दगडांनी बांधलेल्या आहेत. "पं. रमाबाईंच्या मृत्यूनंतर १९५० साली स्तुती मावशी यांनी खणलेल्या विहीरीला स्तुती विहीर असे नाव आहे."[४२] स्तुती मावशींचे मूळ नाव मिस जे. आय. क्रयाडॉक असे होते. त्या अमेरिकन होत्या. त्यांनी अंधांच्या शाळेचे व शेवटी सुपरिंटेंडटचे काम दहा वर्षे केले. वरील सर्व विहीरींतून मुक्ति मिशनला पिण्यासाठी व शेती सिंचनासाठी पाणी पुरवठा केला जातो.

"एका दात्याने विहीरी खणण्यासाठी तेरा हजार आठशे चौदा रुपयांची देणगी पाठविली. पण तो देणगीदार अज्ञातच राहिला ."[४३] पंप, इंजिन, नळ इत्यादी साहित्य देणगीतून मिळाले. "इंग्लंडलमधील एका धार्मिक स्त्रीने देवाच्या कामासाठी पैसे साठविले होते. ते तिने मुक्तिच्या कार्यासाठी पाठविले. त्या देणगीच्या पैशामुळे एक मोठा थोरला विजेचा जनरेटर खरेदी करता आला."[४४] मिस जे. आय. क्रयाडॉक (स्तुती मावशी), मिस ई. काऊच, मिस मॅकफेयर (सोनू मावशी) या परदेशी महिला मुक्ति मिशनच्या सेवेत होत्या. त्यांनी साठविलेला पैसा मुक्ति मिशनसाठी दिला. त्यातून विजेचे खांब, विजेच्या तारा व दिवे खरेदी केले होते.

### ५.२.७ मुक्ति मिशनमधील मुद्रणालय :

मुक्ति मिशनमध्ये स्वतंत्र छापखाना (मुद्रणालय) होता. पं. रमाबाईंनी इंग्लंडमधील वास्तव्यामध्ये मुद्रणकलेची माहिती घेतलेली होती अशी माहिती मुक्ति मिशनच्या शताब्दी अंकामध्ये दिली आहे.

"Around 1901 Ramabai obtained a Demy printing press for Mukti. By 1910 there were four large machines, a 12 HP (Hourse Power) engine and stereo typing plant."[४५] यावरुन येथील मुद्रणालयाचे स्वरुप लक्षात येते. सुरुवातीला छपाईचे व खिळे जुळविण्याचे काम मुले करीत होती. ती मुले दुष्काळी प्रांतातून आणलेली होती. पुढे हे काम मुली व स्त्रियांना शिकविले. त्या प्रशिक्षित झाल्यावर मुद्रणालयाचे सर्व काम मुली व स्त्रिया पाहू लागल्या. या संदर्भात मुक्ति प्रेअर बेल च्या १९८९ च्या अंकात लिहिले आहे की, "Later she decided that her girls could do it just as well and so it was that in a few years more than 100 women were not only setting type in Marathi, Hindi, English, Hebrew and Greek but were also able to take the engine apart for cleaning and put it together again."[४६]

संपूर्ण स्त्रियांनी चालविलेला भारतातील पहिला व एकमेव छापखाना होता. त्याकाळी छापखाने सरकारी आस्थापनेमध्ये असत. खाजगी वृत्तपत्राचा स्वतंत्र मालकीचा छापखाना असे. मात्र संस्थेकडे छापखाना असल्याची बाब एकमेव होती. केडगावसारख्या ग्रामीण भागात छापखाना असणे हे वैशिष्ट्यपूर्ण होते.

छापखान्यातील कंपोझिंग व प्रिंटींगची कामे स्त्रियाच करीत होत्या. येथील कामावर देखरेख करण्यासाठी "मिस् म्याकग्रेगर या अमेरिकन स्त्रीची योजना केली होती."[४७] या छापखान्यात पं. रमाबाईंनी १८ वर्षे अविश्रांत काम केले. त्यांनी बायबलचे मराठीत भाषांतर केले. सर्व सामान्य लोकांना गितेतील धर्मज्ञान समजावे म्हणून १३ व्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहीली होती. गीतेच्या भाषांतरामुळे ज्ञानेश्वरांना देवत्त्व प्राप्त झाले. पं. रमाबाईंनी सर्वसामान्यांना बायबलमधील ख्रिस्ती धर्मज्ञान समजावे म्हणून त्याचे मराठी भाषेत भाषांतर केले. मात्र त्यांच्या या कृतीला समाजाश्रय मिळाला नाही.

पं. रमाबाईंनी हिब्रु (जुन्या कराराची मूळ भाषा) व ग्रीक (नव्या कराराची मूळ भाषा) या भाषांचा अभ्यास केला होता. सन १९०४ मध्ये त्यांनी बायबलच्या भाषांतराचे कार्य सुरु

केले होते. “या कामासाठी त्यांनी १०० मुलींची नेमणूक केली होती. त्यांना इब्री, ग्रीक, मराठी व इंग्रजी या चार भाषेत टाईप जुळविण्यास प्रवीण केले होते. याच मुली रमाबाईंच्या मुख्य कंपोझिटर्स, बुक बाईंडर्स, प्रुफरीडर्स व इंजीन ड्रायव्हर्स होत्या. त्यांना शिकविण्यासाठी दोन प्रिंटर होते.”[४८]

मनोरमाबाई दि.२८ जानेवारी १९१० रोजीच्या वार्षिक अहवालात लिहितात की, “Forty-five out of the one hundred and twenty girls who work here are compositors. They set type in four languages, English, Greek, Hebrew and Marathi. There are three large rooms in which this work is done by girls only.”[४९] हिब्रु व ग्रीक भाषेतील मजकूराची छपाई येथे होत होती. ही बाब या छापखान्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

पवित्र शास्त्राची पहिली मराठी आवृत्ती या छापखान्यात छापली होती. ती सन १९२४ मध्ये म्हणजे पं. रमाबाईंच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनी प्रसिध्द झाली होती. याशिवाय “या छापखान्यात पवित्र शास्त्राच्या सुमारे ५००० प्रती, नवा करार (एकूण ६ आवृत्या) १८००० प्रती, हजारो शुभवर्तमाने, प्रभू येशूचे चरित्र, निवडक गीते, स्त्रोत्रे, व्याकरण, रोजचा उजेड व दुसरी पुष्कळ पुस्तके, मासिके इत्यादी छापली गेली. तसेच इंग्रजीत Prayer Bell, My Testimony, Trying to be saved their own merit, Baptism of the Holy Ghost and fire, Revival in Korea इत्यादी पुस्तके येथेच प्रसिध्द झाली. आणखी पुष्कळ ट्रॅक्टस् व तीस पस्तीस लहान लहान पुस्तकांच्या हजारो प्रती चोहोकडे पाठविण्यात आल्या होत्या.”[५०] कृष्णाबाई गद्रे यांनी छापखान्याची वरील माहिती सन १९३९ साली दिली आहे. यानंतरही पुष्कळ पुस्तके छापली होती. मुक्ति प्रेअर बेलचे मराठी व इंग्रजी अंक दर महिन्याला छापून प्रकाशित केले जात होते.

### ५.२.८ **शांतिसदन** :

‘शांतिसदन’ ची स्थापना २९ सप्टेंबर १९१३ रोजी मनोरमाबाईंनी केली होती. हे सदन गुलबर्गा येथे होते. गुलबर्गा हे निजामाच्या काळातील पारंपरिक विचारसरणीचे शहर होते. तेथे मुलींना शिक्षण देणारी शाळा नव्हती. “तेव्हा गावातील लोक तेथल्या कोणा एका गॉर्डन नावाच्या मिशनरीच्या मागे लागले की, येथे मुलींची शाळा काढा. त्यांच्या विनंतीवरुन मनोरमाबाईंनी ही शाळा काढली.”[५१] शांतिसदन ही मुलींची निवासी शाळा होती. स्थानिक विरोधाला तोंड देत

शांतिसदनाचा कारभार पाहिला. दि. २४ जुलै १९२१ रोजी मनोरमाबाईंचे निधन झाले. त्यांनतर पं. रमाबाईंनी ही शाळा मेथॉडिस्ट मिशनकडे सोपविली. याशिवाय मुक्ति मिशनमध्ये आवश्यकतेनुसार शयनगृहे, शाळागृहे, व्यावसायिक शिक्षणाच्या खोल्या, कार्यालयीन इमारत, वाचनालय इत्यादी इमारती उभारल्या होत्या.

## ५.३ पं. रमाबाईंचे मुक्ति मिशनमधील कार्य (सन १८९८ ते सन १९२२) :

पंडिता रमाबाईंनी १८९८ ला मुक्ति मिशन सुरु केले होते. त्यांनी मृत्यूपर्यंत संपूर्ण जीवन मुक्तिच्या सेवेत व्यतीत केले. मुक्ति मिशनच्या स्थापनेपासून त्यांचे सार्वजनिक चरित्र संपले असा विचार प्रवाह रुढ झाला. जो पर्यंत त्या पुण्यात शारदासदनचे कार्य करीत होत्या तो पर्यंतच त्यांचे चरित्र आहे, पुढे अंधार अशी भूमिका चरित्र लेखकांनी घेतली.

पं. रमाबाईंचे समाजपरिवर्तनातील योगदान सन १८९८ पर्यंतच मर्यादित होते असा समज झाला. त्यापुढील मुक्ति मिशनला ख्रिस्त गृह संबोधले गेले. तत्कालीन समाजाने या संस्थेला वाळीत टाकले. शारदासदनावरील होणाऱ्या टीकेमुळे ते चर्चेत राहिले होते. धर्मांतराचा संवेदनशील मुद्दा टीकेमागे होता. या काळात पं. रमाबाईंच्या कार्याची चर्चा समाजात होत होती. सन १८९८ नंतर शारदासदनचे स्थलांतर केडगावला झाले. तेथेच मुक्ति मिशनची मोठी वसाहत स्थापन झाली. केडगाव हे पुण्यासारख्या संक्रमणशील शहराच्या परिकक्षेबाहेर होते. पं. रमाबाई २२ वर्षे या ठिकाणी सेवा कार्य करीत होत्या. मात्र त्यांचे हे कार्य दुर्लक्षितच राहिले.

पं. रमाबाईंचे मुक्ति मिशनमधील कार्य ख्रिस्ती संत परंपरेतील संतांच्या बरोबरीचे होते. मदर तेरेसा यांनी बंगालमध्ये अनाथ, पिडीतांची सेवा केली. त्या मूळच्या ख्रिस्ती होत्या. त्यांचा जन्मही परकीय भूमीत झाला होता. मात्र त्यांचे भारतातील मानवतेचे कार्य समाजाने स्विकारले. भारत सरकारने त्यांना भारत रत्न किताब देऊन गौरविले. यामुळे त्यांच्या कार्याला राजाश्रयही मिळाला. पं. रमाबाई मूळच्या हिंदू होत्या. त्यांचा जन्म भारतातच झाला होता. त्यांनी मुक्ति मिशनमध्ये मदर तेरेसांसारखेच मानवतेचे कार्य केले होते. मात्र त्यांच्या कार्याला समाज मान्यता मिळाली नाही. पं. रमाबाईंच्या संदर्भात मुंबईच्या जाहिर सभेत सरोजिनी नायडू म्हणाल्या, "हिंदू संत मालिकेत जिचे नाव प्रविष्ट करण्यात येईल अशी पहिली ख्रिस्ती व्यक्ति"[५२] यावरुन पं. रमाबाईंचे कार्य संतांच्या बरोबरीचे होते हे स्पष्ट होते.

मुक्ति मिशनमध्ये अस्पृश्यांपासून ब्राम्हणांपर्यंत सर्व जातीतील मुली व स्त्रियांचा समावेश होता. देशातील विविध प्रांतातील मुली व स्त्रिया मुक्ति मिशनमध्ये आश्रयास होत्या. "त्यांच्या डोक्यातील उवा, लिखा काढण्यापासून तर त्यांच्या हातापायांवर वाढलेल्या खरजेच्या खरपुड्या खरडण्यापर्यंत सर्व कामे पं. रमाबाई जातीने करीत."[५३] त्यांनी दुष्काळातील मुलींवर व स्त्रियांवर स्वच्छतेचे संस्कार केले. खोटे बोलणे, चोऱ्या करणे, मारामाऱ्या करणे असे दुर्गुण त्यांच्यामध्ये होते, ते दूर करण्यासाठी पं. रमाबाईंनी अथक प्रयत्न केले होते. मुक्ति मिशनमधील मुली पूर्वीच्या शारदासदनातील मुलींप्रमाणे सुसंस्कृत व मध्यम वर्गातल्या नव्हत्या. त्या अनाथ, निराधार होत्या. त्यातील काही अस्पृश्य व गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जातीतील होत्या. ती वेगवेगळ्या शारीरिक व मानसिक गरजा असणाऱ्या सुमारे दोन हजार स्त्रिया व मुलींची गर्दी होती.

पं. रमाबाईंचे मुक्ति मिशनमधील मुलींशी रक्ताचे नाते नव्हते. तरीही त्यांनी मुक्ति मिशन ही एक सुसंस्कृत व शिस्तबध्द वसाहत उभी केली, ही बाब फार मोठी आहे. पं. रमाबाईंनी या रानटी मुलींतून सुसंस्कृत, कार्यकुशल व शिस्तबध्द समूदाय उभा केला. ही बाब जगाच्या इतिहासात विशेष दखल घेण्यासारखी आहे. तत्कालीन काळात एवढ्या मोठ्या संख्येने मुलींचे पुनर्वसन केल्याची नोंद इतिहासात आढळत नाही.

पं. रमाबाईंच्या कार्याविषयी रेव्ह. डॉ. ह्यूम लिहितात की, "To see that simple, white-rubed, devoted women managing an institution like the Sharada Sadan is a lesson for any man or woman in the world, as she administrators the affairs of organization for nearly, two thousand persons. To manage a native regiment of adult Indians requires two colonels, often two lieutenant colonels, and a large body of majors, captains, lieutenants and non-commissioned officers; and then to think how that simple woman, with her God given gift of administration, can almost simple handed conduct that work."[५४]

पं. रमाबाईंच्या कार्यामागे दैवी देणगी होती. असे डॉ. ह्यूम नमूद करतात. त्यांनी हजारो मुली व स्त्रियांच्या अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजांची पूर्ती केली होती. शिक्षण व आरोग्याच्या गरजा पुरविल्या होत्या. त्यासाठी मुक्ति मिशनमध्ये वेगवेगळे विभाग स्थापन केले होते.

### ५.३.१ मुक्ति मिशनवर होणारी टीका :

शारदासदनच्या कार्याच्या संदर्भात जेवढी टीका झाली, त्यामानाने मुक्ति मिशनवर फारशी टीका झाल्याचे दिसत नाही. मुक्ति मिशनच्या सुरुवातीच्या काळात पुढील टीका झाली होती.

**१) पंडिता रमाबईंची शिस्त फार कडक होती :**

पं. रमाबाईंच्या कडक शिस्ती संदर्भात त्यांना सर्वांनीच दोष दिला होता. “त्यांच्या ताब्यात कोणत्या प्रकारच्या मुली, बाया, मुले होती याचा चांगलासा विचार न करता, त्यांच्या कडक शिस्ती बद्दल काही ख्रिस्ती लोकही त्यांस दोष देत होते.”[५५] अनाथ मुलींना त्या धाकात ठेवतात, कडक शिस्तीच्या नावाखाली अत्याचार करतात अशी टीक होत होती. “तर काहींना संस्थेची शिस्त व मामुली बंधनेसुध्दा सहन न झाल्याने त्या बंडखोरी करत व उलट आपल्याला बळजबरीने तिथे आणल्याचा आरोप संस्थेवरच करत त्रागा मांडत असत.”[५६]

पं. रमाबाईंनी दोन हजार असंस्कृत मुली व स्त्रियांची जबाबदारी स्विकारली होती. त्यांना सुसंस्कृत समाजात आणणे हे मोठे अवघड काम होते. त्यासाठी शिस्तीचा अवलंब करणे गरजेचे होते. मुक्ति मिशनमधील बहुतेक स्त्रिया तरुण होत्या. नैसर्गिक काम वासनेला त्या बळी पडण्याचा धोका होता. त्यांच्या संगतीचा वाईट परिणाम इतर मुलींवर होण्याचा संभव होता. त्यामुळे कडक शिस्त हा मुक्ति मिशनमधील आवश्यक भाग होता.

पं. रमाबाईंच्या कडक शिस्तीचे समर्थन त्यांच्या चरित्रकारांनी केले आहे. या संदर्भात टिळक दे. ना. लिहितात की, “दोन पासून तीन हजार रानवट, अक्षरशत्रू माणसांना माणसाळविण्याचे काम कोणी केले ? त्या कामातील अडचणींचा अनुभव कोणी घेतला आहे? त्या वर्गातील मुलींचे वर्तन इतर मुलींच्या शीलास बट्टा लावण्यासारखे होऊ लागले. म्हणून थोडा बहुत कडकपणाचा अवलंब करावा लागला तर त्याबद्दल रमाबाईंना दोष देता येत नाही.”[५७]

कृष्णाबाई गद्रे ह्या दादासाहेब गद्रे यांच्या कन्या होत्या. तिने संपूर्ण आयुष्य मुक्ति मिशनच्या सेवेत व्यतीत केले. त्या पं. रमाबाईंच्या कडक शिस्ती विषयी लिहितात की, “जरी त्या प्रेमळ होत्या, तरी त्या तितक्याच तीव्र वृत्तीच्याही होत्या. त्यांचे डोळे पाहिले की, दरादरा घाम सुटे. त्यांच्या शिक्षा म्हणजे खांबाला बांधून फटके देणे, कोंडून ठेवणे, मीठ भात व पाणी

देणे, उठबशा देणे, उपाशी ठेवणे, भांडणाऱ्यांना एकाच जात्यावर दळायला लावणे इत्यादी. पण जरी त्यांच्या शिक्षा इतक्या कडक असत तरी त्या संबंधीचा आमचा राग तात्पुरता राही. कारण त्या नेहमी शिक्षेचे कारण समजावून देत व शिक्षा संपताच दुपटीने जवळ उराशी धरुन लाडीवाळे चुंबन घेत रहात."[५८]

पं. रमाबाईंनी कडक शिस्तीचा अवलंब केला होता. मात्र मुलींवर प्रेमही भरपूर केले होते. मुक्ति मिशनमधील शिस्त हा व्यवस्थापनाचा एक भाग होता. मुक्ति मिशनचे संचालन सांघिक पध्दतीने होत होते. यामध्ये विस्कळीतपणा येऊ नये, कुणाची गैरसोय होऊ नये यासाठी कडक शिस्तीचा अवलंब केला होता.

पं. रमाबाईंनी कडक शिस्तीद्वारे मुलींवर अन्याय केला नाही. या शिस्तीमागील उद्देश लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. "मुलींनी सभ्य वागावे, भांग सरळ, पदर ठाकठीक, पोशाख चानछुकीचा नसावा, मोठ्याने बोलू किंवा खिदळू नये, वडीलांस मान द्यावा, विद्याभ्यासात गर्क, कामात तत्पर, शास्त्रवचनात प्रवीण असावे, हेच त्यांचे शिक्षण. त्यातून एखाद्या गोष्टीत जरी कोण चुकले त्याचे प्रायश्चित भोगावे लागायचे[५९] यावरुन पं. रमाबाईंची कडक शिस्त अन्यायमूलक नव्हती हे स्पष्ट होते. मुलींवर चांगले संस्कार होण्यासाठी त्यांनी शिस्तीचा अवलंब केला होता. याबाबी कडक शिस्तीविषयी टीका करताना टीकाकारांनी लक्षात घेतलेल्या दिसत नाहीत.

पं. रमाबाईंच्या अंत:करणामध्ये द्वेषाला व तिरस्काराला जागा नव्हती. हे अनेक प्रसंगातून स्पष्ट होते. त्या अत्यंत प्रेमळ व दयाळू होत्या कृष्णाबाई गद्रे त्यांच्या प्रेमळ स्वभावाविषयी लिहितात की, "रमाबाईंची खोली म्हणजे लहान बाळाचे एक संगोपनालयच असे. कित्येकांना तर त्यांनी आपल्या खुद्द ताटातील घासातला घास चारुन वाढविले. अशक्तांना तर उराशी धरुन धरुन त्या खाऊ घालीत. एखाद्या स्वत:च्या आईप्रमाणे त्या ह्या बाळांचे लाड पुरवित."[६०] मुक्ति मिशनमधील हजारो स्त्रिया त्यांना आई म्हणून पूज्य मानतात.

यावरुन पं. रमाबाईंवर कडक शिस्तीसंदर्भात केलेली टीका पूर्वग्रह दूषित होती. टीकाकारांचा दृष्टिकोन व्यक्तिनिष्ठ व एकांगी आहे असे म्हणावे लागेल.

## २) मुक्ति मिशन म्हणजे २५०० बायकांचा तुरुंग :

मुक्ति मिशन केडगावला स्थिर झाल्यावरही केसरीकारांनी मुक्ति मिशनवर टीका केली होती. २८ जानेवारी १९०२ च्या केसरीत 'मुक्ति म्हणजे २५०० बायकांचा तुरुंग' हा लेख लिहीला होता. या लेखामध्ये लिहिले की, "भूलथाप किंवा भुरळ पाडून हव्या तेवढ्या मुली दुष्काळग्रस्त प्रदेशातून आणणे, त्या सदनात आल्यानंतर त्यास जुलमाने धर्मांतर करावयास लावणे, त्या धर्मांतर करीत नसल्यास खावयास नीट न घालणे व बाहेरही जाऊ न देणे, सदनातल्या सदनात शिक्षण तर राहू द्या, पण त्यांच्याकडून होईल तेवढे काम करुन घेणे, त्या बाहेर पडल्या असता पुढे व पाठीमागे कैद्याप्रमाणे रामोशाचा पहारा वगैरे सर्व कैदखान्यातले प्रकार चालू आहेत."[६१] या लेखामध्ये मुक्ति सदन म्हणजे मोठा तुरुंग आहे असे म्हटले होते. पं. रमाबाईंना 'जेलरीण' असे संबोधले होते. मुक्ति मिशनमधील बहुतेक स्त्रिया बाहेर पडण्यास उत्सुक असल्याचा दावा केला होता. शेवटी गव्हर्नरला विनंती केली होती की, प्रत्यक्ष जाऊन मुक्ति चा तपास करावा. त्याप्रमाणे गव्हर्नरांनी मुक्ति मिशनला भेट दिली होती. या भेटीचे वर्णन करताना पं. रमाबाई लिहितात, "पुण्याच्या कलेक्टरनी मुलींना विचारले की, तुम्हाला तुमच्या घरी जावेसे वाटते का? त्यावेळी तेथे हजर असलेल्या एकाही मुलीने हात वर केला नाही."[६२] यावरुन बहुतेक मुली बाहेर पडण्यास उत्सुक आहेत हा केसरीकारांचा दावा फोल ठरतो.

पं. रमाबाईंनी मुक्ति मिशनच्यासभोवती उंच भिंती बांधल्या होत्या. या उंच भिंतींमुळे मुक्ति मिशनचा स्थानिक गावाशी संबंध येत नव्हता. "मुक्ति मिशनच्या भिंती खूप उंच होत्या. कारण आत साऱ्या स्त्रियाच रहात होत्या. बाहेरुन कोणी गुंडाने त्रास देऊ नये, आत प्रवेश करु नये यासाठी ती व्यवस्था होती अणि लोकमान्य टिळकांनी त्याला तुरुंग संबोधले होते."[६३] मुक्ति मिशनमधील मुलींना गावगुंडांपासून संरक्षण मिळावे, आतील संपत्तीचे चोरांपासून संरक्षण व्हावे यासाठी उंच भिंती बांधल्या होत्या.

पं. रमाबाईंनी रामोशी जातीतील लोकांचा पहारा बसविला होता. रामोशी लोकांविषयी एक जरब व भिती लोकांमध्ये होती. पं. रमाबाईंनी मुक्ति मिशनच्या संरक्षणाची जबाबादारी रामोशांवर सोपविली. त्यांना पारंपरिक चोऱ्या, दरोडे व्यवसायापासून परावृत्त केले. त्यांना विघातक कामातून परावृत्त करुन उपयोगी कामात गुंतविले. वाईट प्रवृत्तींच्या लोकांना जरब बसावी, मुक्ति मिशनच्या मुलींकडे वाईट नजरेने कोणी पाहू नये म्हणून रामोशांचा पहारा उभा

केला होता. पं. रमाबाईंनी मुलींच्या संरक्षणासाठी स्विकारलेला हा मार्ग योग्य होता. त्यामुळे रामोशांचा पहारा ठेवला म्हणून केलेली टीका वास्तव परिस्थितीला धरुन नाही.

मुक्ति मिशनमध्ये मुलींना शिक्षण दिले जात नाही असा दावा टीकाकारांनी केला होता. हा दावा सत्य स्थितीला धरुन नाही. मुक्ति मिशनमध्ये शारदासदन नावाने शाळा सुरु होती. तेथे पदवीपूर्व परीक्षेपर्यंतचे शिक्षण दिले जात होते. मुलींना स्वावलंबी बनविण्यासाठी व्यावसायिक शिक्षण दिले जात होते. अंधांसाठी खास वर्ग सुरु होते. बालशिक्षणपध्दतीचे वर्ग सुरु होते. मुलींना वैद्यकिय शिक्षणासाठी मदत केली जात होती. पदवी प्रवेशासाठी इतर विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळवून जात होता. याशिवाय ख्रिस्ती धर्मशास्त्राचे खास प्रशिक्षण दिले जात होते. यावरुन येथे शिक्षण दिले जात नव्हते हा केसरीचा आरोप चुकीचा होता. लोकमान्य टिळक जहाल राष्ट्रवादी विचारसरणीचे होते. ख्रिस्ती धर्मांतरावर टीका करणे ही त्यांची राजकीय गरज होती. "केसरीकारांनी प्रतिकूल मत केडगावला भेट न देता बनविले होते."[६४] मुक्ति मिशनवरील त्यांची टीका गैरसमजूतीतून झाली होती. त्यानी मुक्ति मिशनमधील मानवतेचे कार्य व पं. रमाबाईंचे व्यवस्थापन कौशल्य याकडे दुर्लक्ष केले होते.

### ३) मुक्ति मिशनमध्ये दुष्काळातील मुलींचे बाप्तिस्मे केले होते :

मुक्ति मिशन हे पं. रमाबाईंचे स्वसंचालित असे स्त्री सुधारणा गृह होते. मुक्ति मिशनमध्ये हजारो मुलींनी धर्मांतर केले होते ही बाब सत्य आहे "डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी या महिन्यात जवळजवळ १२०० लोकांचा बाप्तिस्मा करण्यात आला."[६५] अशी नोंद १९०२ च्या वार्षिक अहवालामध्ये केली आहे. अनाथ व निराधार मुलींना जबरदस्तीने ख्रिस्ती केले असा आरोप केला जातो."हिंदू स्त्रिया व मुले यांना ख्रिस्ती धर्माच्या दावणीत बांधण्याच्या कामीच रमाबाईंच्या कार्याचा शेवट झाला."[६६] असा आरोप धनंजय किर करतात. बायबल वचनांचा प्रसार करण्याचे प्रयत्न होत होते. सुवार्ता प्रसाराचे कार्य करण्यासाठी धर्म प्रचारक नेमले होते. या संदर्भात रेव्ह. डब्ल्यू. एम. फ्रँकलीन लिहितात, "जवळजवळ ७०० मुली आणि स्त्रिया आजुबाजूच्या खेड्यात उपदेश करण्यासाठी जातात. त्यांचे प्रत्येकी १५ प्रमाणे गट केले आहेत. दर दिवशी चार गट याप्रमाणे ह्या आळीपाळीने सुवार्ता प्रसारासाठी जातात."[६७]

वरील नोंदीवरुन मुक्ति मिशनमध्ये धर्मांतरे घडून आली हे सत्य नाकारता येत नाही. मात्र दुष्काळातील मुलींच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेऊन धर्मांतरे घडवून आणली ही टीका

योग्य वाटत नाही. हजारो निराधार मुलींचे मुक्ति मिशन हे स्वत:चे घर बनले होते. पं. रमाबाई त्यांच्या आई बनल्या होत्या. मुक्ति मिशनचे संपूर्ण वातावरण ख्रिस्तमय होते. या पार्श्वभूमीवर येथील मुलींचे धर्मांतर जबरदस्तीने केले नव्हते. त्यांनी ख्रिस्त धर्माचा स्विकार केला होता. स्वत:हून हजारो मुली ख्रिस्ती झाल्या होत्या. या संदर्भात श्री. रुस्तमजी लिहितात "She did not force her girls to learn the Bible. She had a class and they were asked to come if they were willing."[६८] टिळक दे. ना. पं. रमाबाई मुक्ति मिशनच्या अधिक्षिका ग्लॉडीस फ्लेचर यांचे मत नमूद करतात की, "Ramabai did not baptise any the girls unless she requested it."[६९]

पं. रमाबाईंचा उद्देश ख्रिस्ती संख्या वाढविण्याचा नव्हता. त्यांना ख्रिस्ताचा संदेश रुजवायचा होता. मुक्ति मिशनमध्ये स्वत:चा धर्म व धर्माचरण करण्याची मोकळीक होती. पं. रमाबाईंच्या चरित्र लेखिका मिस क्लेमेंटिना बटलर यानी मुक्ति मिशनला भेट दिली होती. "त्यावेळेस सनातनी रिवाजाप्रमाणे आपले नियमधर्म पाळणाऱ्या काही उच्च वर्णीय हिंदू विधवा तेथे आढळ्याचे त्यांनी आपल्या पुस्तकात नमूद करुन ठेवले आहे."[७०] मुक्ति मिशनमधील कित्येक मुली ख्रिस्ती धर्म न स्विकारता रहात होत्या. त्यांनी इच्छा व्यक्त केल्यानंतरच धर्मांतर केले जात होते. मुलींच्या धर्मांतराची पार्श्वभूमी लक्षात घेतल्यास असे जाणवते की, पं. रमाबाईंचे धर्मांतर व मुक्ति मिशनमधल्या मुलींचे धर्मांतर यामध्ये फार मोठा फरक होता. पं. रमाबाईंनी आत्म्याची गरज म्हणून धर्मांतर केले होते. त्यांच्या धर्मांतराला बौद्धिक आकलनाचे पाठबळ होते. म्हणून त्यांचे धर्मांतर मन्वंतराच्या मार्गाने झाले असे म्हणावे लागेल. नारायण वामन टिळक यांचे धर्मांतरही मन्वंतराच्या मार्गाने झाले होते."रेव्ह. नारायण वामन टिळक हे 'तुका निर्मित सेतुवरुनी मी ही झालो ख्रिस्त चरणी' असे म्हणणारे होते. त्यांचा मराठी संतवाङ्मयाचा अभ्यास होता. ख्रिस्त त्यांना भावला. पण तो भारतीय रुपात आणण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले."[७०अ] थोडक्यात मुक्ति मिशनमधील मुलींची धर्मांतर करताना पं. रमाबाई व ना. वा. टिळकांच्या प्रमाणे आत्मिक उन्नती झाली नव्हती असे म्हणावे लागेल. त्या मुली परिस्थितीने गांजलेल्या होत्या. अपरिपक्व विचाराच्या होत्या. मुक्ति मिशनमध्ये त्यांना निवारा मिळाला होता. येथे त्यांच्या भौतिक गरजांची पूर्ति झाली होती. त्यांच्या रोजच्या जेवणाची चिंता मिटली होती. त्यामुळे त्यांना जगण्याचा आधार ख्रिस्ती होण्यामध्ये मिळू शकेल असे वाटले.

धर्मांगिकार करण्यासाठी धर्म कळावा लागतो. दोन धर्माची चिकित्सा करण्याची वैचारिक कुवत असावी लागते. ती येथील मुलींमध्ये निश्चितच नव्हती. पं. रमाबाई व ना. वा. टिळकांना ख्रिस्त जसा कळला तसा मुक्ति मिशनमधील अशिक्षित मुलींना कळणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांचे धर्मांतर धर्मांगिकार वा मन्वंतर नव्हते हे स्पष्ट होते. मुक्ति मिशनमधील धर्मांतरे गोडीने, ख्रिस्ती प्रभावाखाली, अमिषे दाखवून झाली असण्याची जास्त शक्यता आहे. धर्मांगिकार करणे हा सुबुद्धीचाच गुण असतो, असा गुण दुष्काळातून आलेल्या रानवट मुलींकडे असणे शक्य नव्हते.

थोडक्यात टीकाकार धर्मांतर व धर्मांगिकार यातील फरक लक्षात घेताना दिसत नाहीत. मुक्ति मिशनमधील धर्मांतरे ही हिंदू धर्माविरुध्दची प्रतिक्रिया नव्हती. ती निराधार मुलींची भौतिक गरज होती. त्यांना प्रेमाने वर्षाव करणारा धर्म हवा होता. असा धर्म त्यांनी येशू ख्रिस्तामध्ये दिसला. त्यामुळे मुक्ति मिशनमध्ये धर्मांतराची चळवळ सुरु झाली. हजारो मुलींनी ख्रिस्ती धर्म स्विकारला.

### ४) मुक्ति मिशनमुळे पं. रमाबाईंचे सार्वजनिक आयुष्य संपले :

पं. रमाबाईंनी १८९८ ते १९२२ च्या काळात मुक्ति मिशनची जबाबदारी स्विकारली. मुक्ति मिशनमुळे त्यांचे सार्वजनिक आयुष्य संपले अशी टीका केली जाते. पं. रमाबाई "केडगावला गेल्या त्या तिकडेच गडप झाल्या. त्यांचे नाव महाराष्ट्राला ऐकू आले नाही."[७१] असे म्हटले जाते. पं. रमाबाईंच्या आयुष्यातील शेवटची चोवीस वर्षे केडगावला गेली. या काळात पुण्यातील सनातनी व परिवर्तनवादी संस्थांनी मुक्ति मिशनला वाळीत टाकले. पुढील काळात मुक्ति मिशनवर टीका करण्याचेही टाळले. परिणामी पं. रमाबाई चर्चेत राहिल्या नाहीत. त्या महाराष्ट्राच्या विस्मरणात गेल्या.

पं. रमाबाई या काळात पूर्णपणे ख्रिस्ताला शरण गेल्या होत्या. मुक्ति मिशनच्या सर्व गरजांची पूर्ती करण्यासाठी त्या ख्रिस्तावर अवलंबून राहू लागल्या. त्या लिहितात की, "माझे सर्व ओझे मी प्रभूवर टाकल्यामुळे माझा सर्व त्रास व काळजी नाहीशी झाली आहे. देव पित्यावर आम्ही सर्वस्वी अवलंबून आहोत."[७२] पं. रमाबाई मुलींचे पालनपोषण व ख्रिस्ती धर्माचरण या बाबींची विशेष काळजी घेत होत्या. त्यामुळे सामाजिक प्रश्नांपासून त्यांनी फारकत घेतली होती. ख्रिस्ती संस्था म्हणून महाराष्ट्राने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. पं. रमाबाई ही महाराष्ट्राच्या वाट्याला गेल्या नाहीत.

पं. रमाबाईंनी सुमारे अडीच हजार मुली व स्त्रियांची जबाबदारी स्विकारली होती. मुक्ति मिशनच्या कार्यात त्या सतत व्यग्र राहिल्या. त्यामुळे मुक्ति मिशनच्या पलिकडे जावून समाज सुधारणा चळवळीत सहभागी झाल्या नाहीत. याचे समर्थन करताना टिळक दे. ना. लिहितात, "एका लहानशा कुटूंबातील चार पोरे उनाडक्या करु लागली म्हणजे त्या कुटूंबातील वडील माणसांची कोण त्रेधा उडून जाते. तेव्हा एवढ्या मोठ्या कुटूंबाचे चालविताना, एवढी मोठी जबाबदारी शिरावर वाहताना, त्यांचे शिक्षण, त्यांचा भविष्यकाळ, त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था ही सारी उरकता उरकता बाईंना केडगावाच्या बाहेर पडायला एका क्षणाचा तरी मोकळा वेळ सापडणे शक्य होते काय ?"[७३] त्यामुळे त्या मुक्ति मिशनच्या कार्यात गुंतून राहिल्या हे स्पष्ट होते.

सन १९०४ ते सन १९२२ या काळात त्यांनी पवित्र बायबलचे भाषांतर केले. या कामात त्यांनी रात्रंदिवस मेहनत घेतली. या पार्श्वभूमीवर सामाजिक प्रश्नांविषयी त्यांनी सहभाग घेतला नाही. त्यामुळे मुक्ति मिशनमुळे त्यांचे सार्वजनिक चरित्र संपले ही टीका रास्त होती.

## ५.४ द अमेरिकन रमाबाई असोशिएशन :

१६ मार्च १८९८ रोजी द अमेरिकन रमाबाई असोशिएशनची स्थापना बोस्टन येथे केली होती. या नवीन संस्थेने पूर्वीच्या रमाबाई असोशिएशनचे कार्य चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनची पहिली वार्षिक सभा २४ मार्च १८९९ रोजी संपन्न झाली होती. या सभेच्या वार्षिक अहवालात मुक्ति मिशनच्या स्थापनेचा हेतू स्पष्ट केला आहे की,"Sharada Sadan was opened for high caste child widows. Who could not be reached by missionaries nor by foreign teachers of any kind. To these are now added deserted wives, whose condition is even more cruel that the condition of widows, also unmarried women & girls for whom the work might be well call rescue work."[७४]

द अमेरिकन रमाबाई असोशिएशनने शारदासदन व मुक्ति सदन या दोन्ही संस्थांची जबाबदारी स्विकारली होती. त्यासाठी कालमर्यादेचे बंधन घातले नव्हते. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनने मुक्ति मिशनवर धार्मिक बंधने घातली नाहीत. ख्रिस्ती धर्माचरण व धर्मांगिकाराचे

स्वातंत्र्य मुक्ति मिशनला होते. शारदासदन ही फक्त शालेय शिक्षण देणारी संस्था होती. मुक्ति मिशन शालेय, धार्मिक, व्यावसायिक शिक्षण देणारी संस्था होती.

रमाबाई असोशिएशनच्या उपशाखांनी द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचे सभासदत्व स्विकारले होते. या नवीन संस्थेने करावयाच्या आर्थिक मदतीविषयी १८९९ च्या अहवालात लिहिले की, “In the new association the subscription fees are the same before, not less than one doller a year from each subscriber, and from that sum upword to any extent the heart and puse may agree to go. A scholarship for the Sadan is 100$ annually, For mukti $45 annually. The Reorganization Committee thought it wiser to omit the ten years’ pledges, and make no limit as to time.”[७५]

द अमेरिकन रमाबाई असोशिएशनने शारदासदन व मुक्ति मिशन या दोन्ही संस्थांसाठी स्वतंत्र निधी दिला जात होता असे सन १८९९ ते१९२३ च्या वार्षिक अहवालातील Treasureris Report वरुन दिसून येते. याशिवाय जनरल फंड नावाचा स्वतंत्र निधी पाठविला जात होता. हा निधी गरजेनुसार दोन्ही संस्थांसाठी वापरण्याची मुभा होती.

### ५.४.१ द अमेरिकन रमाबाई असोशिएशन तर्फे दिलेली आर्थिक मदत :

सन १८९८ नंतर मुक्ति मिशनच्या खर्चाची जबाबदारी द अमेरिकन रमाबाई असोशिएशन या संस्थेने घेतली होती. अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये या संस्थेच्या उपशाखा होत्या. त्यांना रमाबाई सर्कल्स म्हणत. अशा सर्कल्सची संख्या ६५ होती. वर्षनिहाय ही संख्या कमी जास्त झालेली दिसते. या सर्व सर्कल्स्मधून जमा होणारा निधी द अमेरिकन रमाबाई असोशिएशन या शिखर संस्थेकडे जमा होत होता. त्यानंतर हा निधी मुक्ति मिशनच्या कार्यासाठी पाठविला जात होता. या असोशिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा दरवर्षीच्या मार्चच्या शेवटच्या आठवड्यात होत होती. या सभेमध्ये पं. रमाबाई व मनोरमाबाई यांनी पाठविलेला वार्षिक कामाचा अहवाल वाचला जात होता. तसेच मुक्ति मिशनला भेट देणाऱ्या परदेशी व्यक्तींचे अहवाल वाचले जात होते. या संस्थेच्या अध्यक्षांचा सर्वसाधारण अभिप्राय नोंदविला जात होता. अहवाल वर्षातील जमा खर्चाची माहिती Treasurer Report मध्ये दिली जात होती.

## द अमेरिकन रमाबाई असोशिएशन तर्फे दिली गेलेली आर्थिक मदत

**सन १८९८ ते सन १९२५** (सर्व आकडे डॉलर्समध्ये)

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | शारदा सदन | मुक्ति मिशन | कृपा सदन | जनरल फंड | एकूण निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८९८–१८९९ | ४१८५.३९ | ४४८४.७१ | – | ५२१२.२४ | १३८८२.४४ |
| २ | १९००–१९०१ | ६७१०.५७ | १५१६१.४७ | – | २५२३.६२ | २४३९५.६६ |
| ३ | १९०१–१९०२ | ६२५४.४८ | ६७७६.१६ | – | १७५०.४८ | १४७८१.१२ |
| ४ | १९०२–१९०३ | ५४३६.७१ | १४२९.९८ | ५.०० | ९१८.२५ | ७७८९.९४ |
| ५ | १९०३–१९०४ | ५३३०.१४ | १००४.६२ | १८.५० | २४७.७० | ६६००.९६ |
| ६ | १९०४–१९०५ | ४५२४.०६ | ५२२.८१ | १२.०० | ६२०.८६ | ५६७९.७३ |
| ७ | १९०५–१९०६ | ३८२३.२२ | ४७३.९३ | १०.०० | ७८१.४१ | ५०८८.५६ |
| ८ | १९०६–१९०७ | ३८३५.१६ | ६९३.१९ | १९.०० | २२१९.४१ | ६७६६.७६ |
| ९ | १९०७–१९०८ | ३२७५.५७ | ८९८.२५ | १५.५० | ४५.०० | ४२३४.३२ |
| १० | १९०८–१९०९ | ३३६८.८८ | ६३४.०० | २८.११ | ६८.०० | ४०९८.९९ |
| ११ | १९०९–१९१० | १९९३.०५ | ९५५.५० | १९.०५ | ३३४.५० | ३३०२.१० |
| १२ | १९१०–१९११ | २३४६.०३ | ६२५.५० | २७.८५ | १०९.५० | ३१०८.३८ |
| १३ | १९११–१९१२ | २४१५.१९ | ७१५.०५ | ३६.०० | १७५.०० | ३३४१.२४ |
| १४ | १९१२–१९१३ | २२७४.४९ | १६९.५२ | ३२.०० | ५०.०० | २५२६.०१ |
| १५ | १९१३–१९१४ | ४८६७.५८ | १९७.०० | २४.६५ | ५२.०० | ५१४१.२३ |
| १६ | १९१४–१९१५ | २२००.२७ | २३८.५० | २२.५० | ४८.०० | २५०९.२७ |
| १७ | १९१५–१९१६ | २०९६.०५ | २२३.०० | २४.२५ | ४७.०० | २३९०.३० |
| १८ | १९१६–१९१७ | १८३०.३४ | १९६.०० | ५७.५० | ५५.०० | २१३८.८४ |
| १९ | १९१७–१९१८ | ३१९.०० | ३१२.६५ | २५.०० | २१२४.५० | २७८१.१५ |
| २० | १९१८–१९१९ | २०६.७० | १७४.०० | २१.०७ | २२.१०.१९ | २६११.९६ |
| २१ | १९१९–१९२० | २७०.२५ | २१३.२० | २०.०० | १७६९.६० | २२७३.०५ |
| २२ | १९२०–१९२१ | १११.०९ | २४८.०० | – | २६२२.९६ | २९८२.०५ |
| २३ | १९२२–१९२३ | ३४.०० | २०.०० | – | २१४१.४९ | २१९५.४९ |
| २४ | १९२३–१९२४ | २२.०० | ५०.०० | – | २१३२.२४ | २२०४.२४ |
| २५ | १९२४–१९२५ | ५८३.५० | १७६९.३० | २७.०० | २३७९.८० | ४७५९.६० |
| | एकूण | ६८३१३.७२ | ३८१८६.४४ | ४४४.९८ | ३०६३८.२५ | १३७५८३.३९ |
| | सरासरी | २७३२.५५ | १५२७.४६ | १७.८० | १२२५.५३ | ५५०३.३४ |

Source –Annual Meeting Report of The American Ramabai Association from 1898 to 1925.




सन १८९८ ते सन १९२५ या काळात मुक्ति मिशनकडे पाठविलेल्या आर्थिक माहितीच्या तक्त्यावरुन तयार केलेल्या आलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, शारदासदन, मुक्ति मिशन व कृपा सदन या तीनही विभागाला स्वतंत्र निधी दिला जात होता.

शारदासदनचा १० वर्षाचा कालखंड व मुक्ति मिशनचा २४ वर्षाचा कालखंड अशी एकूण ३४ वर्षे असोशिएशनने मदत केली होती. पं. रमाबाईंचा कार्याचा हा प्रभाव होता. अमेरिकी समाजाने दीर्घ काळासाठी केलेली मदत म्हणजे पं. रमाबाईंवरील विश्वासाची पावती होती. त्यांच्या सामाजिक कार्याची साक्ष होती. अमेरिकन समाज आपली वैश्विक जबाबदारी कशी पार पाडतो याचे हे उत्तम उदाहरण होते. पं. रमाबाईंच्या नावाने अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, न्युझीलंड, ऑस्ट्रेलिया या सर्वदूर देशांमध्ये उपशाखा निर्माण झाल्या. त्या दीर्घकाळ टिकल्या. ही विशेष नोंद घेण्यासारखी बाब आहे. यावरुन पं. रमाबाईंच्या कार्याचा आंतरराष्ट्रीय प्रभाव निर्माण झाला होता. हे लक्षात येते. देशोविदेशातील शेकडो स्वयंसेवक, मिशनरींनी मुक्ति मिशनमध्ये सेवा पुरविली. ते मुक्ति मिशनच्या कार्यात प्रत्यक्ष सहभागी झाले. साधारणत: दरवर्षी “पाहुण्या रावळ्यांची संख्या दीड हजारावर जाई.”[७६] अशाप्रकारे मुक्ति मिशन ही परदेशी मदतीवर चालणारी भारतातील त्या काळातील सर्वात मोठी संस्था होती.

## ५.५ मुक्ति मिशनमधील व्यवस्थापकीय विभाग :

मुक्ति मिशनचे व्यवस्थापन सुयोग्य पध्दतीने होण्यासाठी पं. रमाबाईंनी व्यवस्थापकीय विभाग पाडले होते. या विभागावार रचनेमुळे मुक्ति मिशनच्या या व्यवस्थापकीय विभागांची माहिती पुढीलप्रमाणे आहे. सदर माहिती १८९८ ते१९२२ या कालखंडातील आहे.

### ५.५.१ **कौटुंबिक विभाग** (Family Life)

मुक्ति मिशनमध्ये स्त्रिया व मुलींची विभागणी वयोगटानुसार केली होती. त्यामध्ये नर्सरी (Nursery), Buds (बड्स), ब्लोसूम (Blossoms) असे गट केले होते. प्रत्येक गटात साधारणत: २० ते २५ जणींचा समावेश केला होता. प्रत्येक गटाची व्यवस्था पाहण्यासाठी मेट्रनची नेमणूक केली होती. तिशी, चाळीशी, पन्नाशी असे वयोगट होते. वर्षातून एकदा बढतीचा दिवस साजरा केला जात होता. त्या दिवसाला 'Moving Day' किंवा 'Promotion Day' असे म्हणत. या संदर्भात मुक्ति मिशनच्या शताब्दी अंकात लिहिले आहे की, "3 & 4 year olds would graduate from the Nursery to the Buds compound, Buds would became Blossoms, Blossoms would transfer to the children's Compound, late called Pherl Bagh or fruit Garden A and B,"[७७] मुक्ति मिशनमध्ये काही मुली निवासी नव्हत्या. त्यांची सोय एलिम गार्डन (Home of Palm) मध्ये केली होती. मुक्ति मिशनमधील वरील व्यवस्था ढोबळ होती. त्यामुळे सर्वच वयोगटातील मुलींना गर्दी करुन ठेवणे योग्य नव्हते. वयानुसार आशा, आकांक्षा व गरजा बदलतात. येथील जीवन आनंददायी व्हावे यासाठी वरील रचना केली होती.

द अमेरिकन रमाबाई असोशिएशनच्या वार्षिक अहवालामध्ये मुक्ति मिशनमधील मुलींची संख्या दिलेली आहे. सन १९०० मध्ये २००० मुली व स्त्रिया मुक्ति मिशनमध्ये होत्या. सन १९०१ च्या अहवालात "It is spreading its branches and growing all the time, out of it have grown Mukti Sadan with 1430 widows and orphans girls and the Krupa Sadan with 170 inmate."[७८] अशी सांख्यिकीय माहिती सादर केली आहे. सन १९०२ च्या अहवालामध्ये मुलींच्या संख्येचा तपशिल "The number of pupils in the Sharada Sadan is 165, but the mother home and its branches together include nearly two thousand."[७९] असा दिला आहे.

मनोरमाबाईंनी लिहिलेल्या ३० जानेवारी १९१४ च्या पत्रामध्ये "Mukti mission - a settlement of thirteen hundred and fifty people."[८०] अशी सांख्यिकीय माहिती दिली आहे. असोशिएशनचे अध्यक्ष रेव्ह. हॅरलन पी. बीच सन १९१७ च्या अहवालामध्ये "In this little village where Ramabai has seventeen Hundred women gathered together everything is done by the women themselves."[८१] अशी माहिती दिली आहे.

वरील नोंदीवरुन मुक्ति मिशन ही मोठी वसाहत होती असे स्पष्ट होते. रेव्ह. हॅरलन पी. बीच यांनी मुक्ति मिशनला 'The little village' असे संबोधले. येथे विविध वयोगटाच्या मुली व स्त्रिया होत्या. प्रत्येकीची शारीरिक, मानसिक व बौद्धिक गरज वेगळी होती. त्याची पूर्ती करण्याचे आव्हान पं. रमाबाईंसमोर होते. मुक्ति मिशनमधील मोठी संख्या हीच व्यवस्थापनातील मोठी समस्या होती. पं. रमाबाईंनी या मोठ्या संख्येला वयोगटानुसार विभागले. मुक्ति मिशनला एक आदर्श वसाहत बनविले. मनोरमाबाई पं. रमाबाईंच्या या कामगिरीविषयी लिहितात की, "It is not an easy matter to plan for each girl to receive the individual care and attention which seem specially necessary in a work like this. My mother needs much wisdom for the performance of her difficult task."[८२]

पं. रमाबाईंनी वयानुसार विभागणी करुन सर्वांना शिस्तबध्द सूत्रात बांधले होते. समान वयानुसार त्यांच्या गरजा पुरविणे शक्य झाले होते. पं. रमाबाई प्रत्येक मुली व स्त्रिला सतत कार्यमग्न ठेवत होत्या. त्यांनी सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत सर्वांना कार्यरत राहण्यासाठी सकारात्मक कार्यक्रम दिला होता. मुक्ति मिशनच्या कामकाजाची दैनंदिनी जानेवारी १९१७ च्या अहवालात प्रकाशित केली होती. दर शनिवारी सकाळी अर्धा दिवस शाळा भरत होती. रविवारी शाळेला सुट्टी दिली जात होती. रविवारी इच्छेप्रमाणे संडे स्कूल, चर्च प्रार्थना यांना उपस्थित राहण्याची मुभा होती.

पं. रमाबाईंनी सप्ताह पध्दतीचा वापर केला होता. आधुनिक काळातील ही पध्दत पं. रमाबाईंनी १०० वर्षापूर्वीच अंमलात आणली होती. मुक्ति मिशनमधील सर्व व्यवहार सामुदायिक उत्तरदायित्त्वाच्या भावनेतून होत होते असे अहवालावरुन दिसून येते. साम्यवाद ही आधुनिक संकल्पना मुक्ति मिशनमध्ये अस्तित्वात होती. गटाने स्वयंपाक करणे, गटाने पाणी भरणे, लाकडे गोळा करणे, कपडे धुणे, स्वच्छता ठेवणे, शाळेत वर्ग कमी पडतात म्हणून आळी–पाळीने भरविणे इत्यादी कम्युन्सच्या वातावरणाशी जुळणाऱ्या गोष्टी मुक्ति मिशनमध्ये चालत होत्या. असोसिएशनच्या सन १९२१ च्या अहवालात ३७ कामांची यादी दिली आहे. ही कामे गटवार पध्दतीने केली जात होती. मुलींच्या आवडीनिवडीचा व क्षमतांचा विचार करुन कामे सोपविली जात होती. ही कामे सांघिक भावनेने केली जात होती. कामे करताना कर्तव्य ही

भावना होती. आर्थिक उपलब्धीचा विचार नव्हता. यावरुन मुक्ति मिशन ही भारतीय कम्युनिझमची छोटी आवृत्ती होती असे म्हणावे लागेल.

मिस रॅचेल नाडार यांनी 'Mukti – I seen' या पुस्तकात "हजारो भिन्न जातीच्या, भिन्न वयाच्या, भिन्न संस्काराच्या मुलींना घेऊन आपले मुक्ति मिशन सुरळीतपणे चालवताना दिसतात."[८३] असे वर्णन केले आहे. मुक्ति मिशनला अनेक परदेशी पाहुणे भेट देत होते. त्यांनी मुक्ति मिशनच्या कौटुंबिक जीवनाविषयी माहिती दिली आहे. "१० मे १९१० च्या मुक्ति प्रेअर बेलमध्ये ॲनी स्कॉट यांचा लेख छापला होता. त्या लेखाचे शीर्षक 'मधमाश्यांचे पोळे' असे होते. यामध्ये मधमाशा जशा जराही आळस न करता एकजुटीने मध गोळा करत असतात, तशी इथं सतत काम करणारी माणसं दिसतात, असे वर्णन केले आहे."[८४] पं. रमाबाईंनी अस्तित्वात आणलेली वयोगट पध्दती १९५६ पर्यंत मुक्ति मिशनमध्ये अस्तित्वात होती.

### ५.५.२ विवाह विभाग (Marriage Department)

'विवाह' हा भारतीय संस्कृतीमध्ये अत्यंत महत्वाचा संस्कार मानला जातो. भारतीय समाजात विवाह संस्थेमागे धार्मिक, सामाजिक, आर्थिक व जातीय संदर्भ आढळतात. भारतीय विवाह संस्था पारंपरिक विचारांनी बध्द आहे. तितकीच ती संवेदनशील आहे. विवाह ही प्रत्येक स्त्री–पुरुषाची शारीरिक व मानसिक गरज आहे. मुलीचा विवाह करणे ही पालकांची जबाबदारीमानली जाते.

मुक्ति मिशनमधील अनाथ मुलींची संख्या फार मोठी होती. त्या सर्वांसाठी सुयोग्य वर शोधणे पं. रमाबाईंना शक्य नव्हते. अनाथ मुलींशी लग्न करण्यासाठी स्वत:हून तयार होणाऱ्या मुलांची संख्या फार कमी होती. मुक्ति मिशनमध्ये विवाहयोग्य वयाच्या शेकडो मुली होत्या. त्यांच्यासाठी योग्य जीवनसाठी शोधणे अवघड काम होते. योग्य वयात विवाह न केल्यामुळे त्या दुर्वर्तनाकडे झुकण्याचा धोका होता. परिसरातील गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून याचा गैरफायदा घेतला जाण्याचा धोका होता.

"पं. रमाबाई या मुलींकरीता योग्य जीवनसाथी शोधण्याची पराकाष्ठा करीत असत. मुलींना ख्रिस्ती केंद्रीत गृह उभारावे असे त्यांना वाटायचे."[८५] त्यासाठी पं. रमाबाईंनी विवाह विभाग स्थापन केला होता. पं. रमाबाईंनी शारदासदनाच्या काळात विधवा विवाहाचा पुरस्कार केला होता. गोदूबाई जोशी या बालविधवेचा विवाह धों. के. कर्वेंशी लावून दिला होता. सन

१८९६ मध्ये शारदासदनात चार विधवांचे पुनर्विवाह झाले होते अशी नोंद रमाबाई असोशिएशनच्या १८९७ च्या वार्षिक अहवालामध्ये केली आहे. मनोरमाबाई सन १९०६ च्या अहवालात नमूद करतात की, “Since March 1905, there have been twenty-two weddings here at Kedgaon”[८६] मिस लिसा हेस्टी जानेवारी १९२३ रोजीच्या पत्रामध्ये “During the last five months of 1922, 25 girls were married.”[८७] अशी माहिती दिली आहे. सन १९२४ च्या वार्षिक अहवालामध्ये “Thirty six girls were married.”[८८] अशी माहिती दिली आहे.

वरील नोंदीवरुन मुक्ति मिशनमध्ये मुलींचे विवाह करण्याचे प्रयत्न होत होते. मुलींचे विवाह ठरविताना पं. रमाबाई विशेष काळजी घेत होत्या. मुलींच्या विवाहानंतर त्यांची आर्थिक सुरक्षितता महत्वाची मानली होती. त्यासाठी विवाहाच्या वेळी शक्य तेवढी आर्थिक मदत त्या देत होत्या. “मुक्ति मिशनच्या मुलींसाठी परमेश्वर प्रशिक्षित व देवभीरु ख्रिस्ती तरुणांना जीवनसाथी म्हणून स्विकारण्यास मुक्तीकडे पाठवित आहे.”[८९] अशी पं. रमाबाईंची गाढ श्रध्दा होती.

मुक्ति मिशनमधील विवाह फक्त ख्रिस्ती धर्मपरंपरेप्रमाणेच होतात असा समज आहे. येथील प्रत्येक मुलगी ख्रिस्ती धर्म स्विकारते असा गैरसमज रुढ आहे. मुक्ति मिशनमध्ये स्वत:चा मूळचा धर्म न बदलता असणाऱ्या मुली व स्त्रिया आढळतात. यासंदर्भात सन १९०३ च्या अहवालात नमूद केले आहे की,“more than a hundred of the pupils present were member of the Sharada Sadan and nearly seventy of them were Hindus.”[९०] त्यामुळे मुक्ति मिशनमध्ये शेकडो मुलींचे विवाह हिंदू धर्म परंपरेप्रमाणे झाले होते. साखरपुडा, हळदी कार्यक्रम इत्यादी हिंदू विधी हौसेने केले जात होते. पं. रमाबाईंनी विवाह विभागातर्फे शेकडो मुलींचे विवाह लावले.

### ५.५.३ वैद्यकीय विभाग :

पं. रमाबाईंनी मुक्ति मिशनमध्ये वैद्यकीय सेवा विभाग स्थापन केला होता. त्या मुलींच्या आरोग्याविषयी दक्ष होत्या. स्त्रियांचे आरोग्य हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. मुक्ति मिशनमध्ये हजारो मुली व स्त्रिया होत्या. त्यांचे आरोग्य व्यवस्थित ठेवणे हे फार मोठे आव्हान होते. मुक्ति मिशनमधील मुली व स्त्रियांच्या आरोग्याविषयी मिस सेवेरीन सोरेनसेन (Miss

Severine Sorensen) लिहितात की, "There are number of girls with a tendency to tubercular abscesses, sore eyes and consumption, besides a number who suffer from the results of weakened digestive organs, fever etc."[९१] मुक्ति मिशनमधील मुली व स्त्रिया दुष्काळी प्रांतातून आल्या होत्या. त्या कुपोषित होत्या. त्यांना शारीरिक व्याधी जडलेल्या होत्या. पं. रमाबाईंनी मुक्ति मिशनमध्ये एक छोटासा दवाखाना सुरु केला होता. "आजाऱ्यांची सुश्रुषा करण्यास व औषधपाणी देण्यास एक अनुभवशीर व हुशार डॉक्टर डॉ. भास्करराव गोवंडे होते. त्यांना मदत करण्यास सरकारी दवाखान्यातून पास झालेल्या नर्स म्हणजे डॉ गोवंडे यांचे कुटूंब होते."[९२] डॉ. गोवंडे यानी 'ज्वरबिंदू' हे प्रसिध्द औषध तयार केले होते. अशाप्रकारे पं. रमाबाई मुली व स्त्रियांच्या आरोग्याविषयी दक्ष होत्या.

शारदासदनाच्या काळातही पं. रमाबाईंनी मुलींना वैद्यकीय प्रशिक्षण दिले होते. "Four others learning to nurse in different Hospitals"[९३] असे त्या सन १८९६ च्या अहवालात नमूद करतात. मुक्ति मिशनमधील काही मुलींनाही पारिचारीकेचे प्रशिक्षण दिले होते. यावरुन पं. रमाबाई मुक्ति मिशनमधील मुलींना वैद्यकीय शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करीत होत्या असे दिसते. पं. रमाबाई सन १९०७ च्या अहवालात नमूद करतात की, "Chandrabai is countinuing her medical course in Bombay University. Tungabai is taking the nurse course in Cama Hosiptal"[९४] पं. रमाबाई मुलींना वैद्यकीय शिक्षणासाठी पुणे, मुंबई या शहरांत पाठवित होत्या. चंद्राबाई यांच्या वैद्यकीय शिक्षणाचा खर्च ऑस्ट्रेलियन मदत निधीतून केला होता. "चंद्राबाईंच्या वैद्यकीय शिक्षणासाठी दि.२७ मार्च १९०६ रोजी ७५ अमेरिकन डॉलर्स व दि. १८ जूलै १९०७ रोजी ७५ अमेरिकन डॉलर्स जमा झाले होते."[९५] ह्याच चंद्राबाई देवरुखकर यांनी सन १९१० मध्ये मुंबईच्या ग्रँड मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय पदवी मिळवली. त्या मुक्ति मिशनच्या पहिल्या डॉक्टर विद्यार्थीनी झाल्या.

सन १९०२ मध्ये पुणे शहर व परिसरात प्लेगचा विशेष प्रभाव होता. या संदर्भात पं. रमाबाई लिहितात की, "The plague has been very bad indeed and the city is almost deserted. Thousand of people have fled, ships are closed and most of the traffic in the city is stopped. the death-rate hase risen to one hundred and fifty a day."[९६] वरील नोंदीवरुन प्लेगच्या परिणामांची कल्पना येऊ शकते. या काळात केडगाव परिसरातही प्लेगचा प्रादूर्भाव वाढला होता. प्लेगने मुक्ति मिशनमधील एका मुलीचा मृत्यू झाला

होता. याच वेळी टी.बी., कॉलरा इ. साथीचे रोग पसरले होते. मुक्ति मिशनमधील मुलींचे रोगांपासून संरक्षण व्हावे म्हणून येथील आरोग्य विभागाने विशेष परिश्रम घेतले होते. मुलींच्या वैयक्तिक व मुक्ति मिशनच्या सार्वजनिक स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले होते.

मिस सेवेरीन सोरेनसेन ह्यांनी मुक्ति मिशनमध्ये सन १९०४ते १९०७ या काळात वैद्यकीय सेवा केली होती. त्या मूळच्या डेन्मार्कच्या होत्या. त्यांच्या मदतीला १० प्रशिक्षित नर्स होत्या. मिस हॉपमन या मुक्ति मिशनच्या दवाखान्यात मुख्य पारिचारीका होत्या. (Head Nurse). "सन १९०७ मध्ये मिस रॉबर्ट यांची डॉक्टर म्हणून नियुक्ती केली होती. डॉ. मिस रॉबर्ट व मिस हॉपमन यांनी केडगाव परिसरातील गावांमध्ये वैद्यकीय सेवा पुरविली होती."[९७] त्यांनी अनेक गावकऱ्यांवर यशस्वी शस्त्रक्रिया केल्याच्या नोंदी आढळतात. यावरुन मुक्ति मिशनबाहेरील रुग्णांवरही येथील दवाखान्यात वैद्यकीय उपचार केले जात होते असे दिसते. मुक्ति मिशनमधील आरोग्य विभागाने केलेली कामगिरी विशेष दखल घेण्यासारखी आहे.

मुक्ति मिशनचा दवाखाना लहान होता. तेथील वैद्यकीय सुविधा मर्यादित होत्या. अशावेळी आरोग्या विभागातर्फे रुग्णांना पुणे शहरातील मोठ्या रुग्णालयात दाखल केले जात होते. या संदर्भात पं. रमाबाई लिहितात की, "Some of the sick girls who need desire hospital treatment in their sickness are sent to Pune to the Zanana Mission Hospital or to Sassoon General Hospital."[९८] यावरुन पं. रमाबाई रुग्ण मुलींची विशेष काळजी घेत होत्या असे दिसते. वरील मर्यादा दूर करण्यासाठी त्यांनी दवाखान्याचा विस्तार केला. छोट्या दवाखान्याचे रुपांतर रुग्णालयात केले. डॉ. एस. डब्ल्यू. स्टीफन्स यांनी नोव्हेंबर १९११ च्या पत्रात मुक्ति मिशनच्या रुग्णालयाविषयी लिहिले आहे की, "Now I find only about twenty beds in the entire hospital, a responsible matron at the head of each ward and everything clean and tidy"[९९] यावरुन पं. रमाबाईंनी आरोग्य विभागाचे व्यवस्थापन कार्यक्षमतेने केले होते असे दिसते.

मुक्ति मिशनमधील आरोग्य विभागातर्फे क्षयरोग नियंत्रणासाठी विशेष मोहीम अंमलात आणली होती. क्षयरोग्याला कौटुंबिक व्यवहारातून दूर केले जात होते. पं. रमाबाईंनी क्षयरोग्यांना दूर न टाकता त्यांना जवळ केले. त्यांच्यावर उपचार केले. क्षयरोग मुक्ति मिशनमधील मुलींना होऊ नये म्हणून काळजी घेतली. या संदर्भात सन १९१३ च्या अहवालात त्या लिहितात की, "Dr. Rosa Lee Oxer and Mrs. Stephens M. D. kindly helped to examinig every

one of the thirteen hudred girls we have in Mukti for tuberculosis. We were thankful to find that there were very few that actually had the disease but quite a number were marks as suspicious cases.... it would be best to separate them from the healthy girls, and give them special care and extra food and open air exercise."[१००]

पं. रमाबाई मुक्ति मिशनमधील प्रत्येक मुलीची आरोग्य तपासणी करवून घेत होत्या. क्षयरोगाची तपासणी करण्यासाठी त्यांनी निष्णांत डॉक्टरांची नेमणूक केली होती. क्षयरोग्यासाठी स्वतंत्र दक्षतागृहाची सोय केली होती. रोगी मुलींचा संसर्ग निरोगी मुलींना होऊ नये म्हणून त्या काळजी घेत होत्या. त्यांच्यावर दीर्घकाळ चालणारे उपचार केले जात होते. रोग्यांना पोषक आहार व नियमित औषधे पुरविली जात होती.

पहिल्या महायुध्दाच्या काळात हजारो सैनिक जखमी होत होते. त्यांना वैद्यकीय सुविधा पुरविण्याचे कार्य मुक्ति मिशनने केले. येथील मुलींचा एक गट रेड क्रॉस संघटनेशी संलग्न होता. या संदर्भात क्लेमेंटीना बटलर लिहितात की, "beyond this for the past two and half years of war her girls have been enganged in Red Cross work."[१००अ] मुक्ति मिशनमध्ये आरोग्य विभागाने रेड क्रॉस सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या कामात योगदान दिले. मुक्ति मिशनचे मानवतेचे कार्य आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरु होते. ह्या कामाची विशेष उल्लेखनीय म्हणून दखल घेणे महत्वाचे आहे.

"पं. रमाबाई प्रार्थना करतात व रोग्यांना औषधोपचार करु देत नाहीत असा आचरट आरोप एका टीकाकाराने केला होता."[१०१] मुक्ति मिशनमधील आरोग्य विभागाची वरील माहिती पाहिल्यास या आरोपामध्ये तथ्य नसल्याचे जाणवते. "त्या स्वत: कधीच औषध घेत नव्हत्या."[१०२] पं. रमाबाईंची येशू ख्रिस्तावर अढळ व गाढ श्रध्दा होती. त्यामुळे आजारातून बरे होण्यासाठी लागणारे मानसिक बळ त्यांच्यामध्ये होते. ते त्यांनी प्रार्थनेच्या मदतीने मिळविले होते. म्हणून त्या स्वत: औषध घेत नव्हत्या. परंतु मुक्ति मिशनमधील मुलींमध्ये हे मानसिक बळ असणे शक्य नव्हते. या संदर्भात प्रभाकर दिघे पं. रमाबाईंवरील चरित्रग्रंथात लिहितात की, "पंडिता रमाबाई मात्र औषधोपचार करण्यासाठी दवाखान्यात कधी दिसल्या नाहीत, कारण श्रद्धोपचार हाच त्यांचा एकमेव आधार होता."[१०३] मात्र पं. रमाबाईंनी सर्वांनीच श्रद्धोपचार करुन घेण्याच आग्रह धरला नाही. टीकाकाराने केलेला आरोप खरा असता तर मुक्ति मिशनमध्ये

ऐवढा मोठा दवाखाना सुरु केला नसता. यावरुन पं. रमाबाई श्रध्दा व अंधश्रध्दा यातील फरक जाणत होत्या असे दिसते.

मुक्ति मिशनच्या आरोग्य विभागाच्या कामाची दखल द अमेरिकन रमाबाई असोशिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी वेळोवेळी घेतली होती. आरोग्य विभागाचे कौतुक करताना क्लेमेंटीना बटलर लिहितात की, "There has been improvement in the medical and sanitary arrangement"[१०४] क्लेमेंटीना बटलर ह्यांनी मुक्ति मिशनच्या सवेत काही वर्षे घालविली होती. त्यामुळे त्यांनी आरोग्य विभागाविषयी केलेली नोंद महत्वाची आहे.

मुक्ति मिशनच्या आरोग्य विभागाची सरकारी समितीकडून दरवर्षी तपासणी केली जात होती. या समितीने मुक्ति मिशनच्या आरोग्य विभागाविषयी पुढील मत नोंदविले होते. "I had inspected this institution. There is now to be noticed a marked improvement in the general health and physical condition of the inmates. The sanitary and medical arrangement which have been greatly improved. The public health of the children has been excellent."[१०५] अशा प्रकारे मुक्ति मिशनच्या आरोग्य विभागाच्या कामाची नोंद सरकारी अभिलेखात झाली होती. हजारो मुलींसाठी मोफत वैद्यकीय सेवा पुरविण्याचे ऐतिहासिक कार्य या विभागाने केले होते.

### ५.५.४ **शेती विभाग** (Agriculture Department)

मुक्ति मिशनमध्ये शेती विभाग हा स्वतंत्र विभाग आहे. शेती हा मुक्ति मिशनच्या उत्पन्नाचा मर्यादित स्त्रोत होता. मुक्ति मिशनने या शेतीस अनुकूल नसलेल्या जमिनीवर शेती सुरु केली. त्याच जमिनीचे वर्णन एक दोन वर्षामध्ये झालेल्या बदलानंतर पं. रमाबाई करतात की, "The desert place is turned into a nice settlement, full of building and newly planted shade trees, around the houses add to its beauty."[१०६]

मुक्ति मिशनच्या शेती विभागाने अल्पावधीत खडकाळ जमिनीचे रुपांतर शेतजमिनीमध्ये केले. या विभागाने मुक्ति मिशनच्या अन्नपाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. शेतीची कामे मुली व स्त्रिया मिळून करीत होत्या. शेती विभागाचे वर्णन करताना पं. रमाबाई लिहितात की, "Best of all is the sight of so many pretty young girls working in the field some weeding, some transplanting young trees and shrubs, some clearing the ground, some watering the plants, some picking red peppers,

tomatoes, vegetable, marrows, pumpkins, beans, and other vegetables, other digging carrots, white and red radish, sweet potatoes, onions, beet-roots etc. The girls are just now engaged in reaping jawar and Bajara."[१०७]

वरील वर्णनावरुन शेतीमध्ये मुली गटवार पध्दतीने काम करीत होत्या असे दिसते. शेतीमध्ये काम करण्यासाठी साधारणत: ५० मुलींचा एक गट असे गट तयार केले होते. शेतीची कामे सामुदायिक पध्दतीने केली जात होती. यावरुन मुक्ति मिशनमध्ये कम्युन पध्दतीचा अवलंब केला होता असे दिसते. शेतीतील जड कामे रोजंदारीवर करुन घेतली जात होती. नांगरणी करणे, खणणे इत्यादी जड कामे मुलींना सांगितली जात नव्हती. त्यासाठी केडगाव परिसरातील शेतकरी रोजंदारीवर शेतात काम करीत. मुक्ति मिशनच्या शेतीमुळे परिसरातील गरजू लोकांना रोजगार उपलब्ध झाला. त्या काळी काम मागण्यासाठी शेकडो मजूर मुक्ति मिशनच्या दारात जमा होत होते.

मुक्ति मिशनची अन्न पाण्याची गरज मोठी होती. येथील शेती उत्पन्नावर ती पूर्ण होत नव्हती. मुक्ति मिशनमधील सर्व मुली स्त्रियांना जेवणासाठी "दररोज ६ पोती (६०० किलोग्रॅम) धान्य लागत होते."[१०८] शेतीतून निघणाऱ्या उत्पन्नातून केवळ दोन महिन्यांची गरज पूर्ण होत होती. त्यासाठी ज्वारी व बाजरीची हंगामी पिके घेतली जात होती. शेतीतून पिकणारा भाजीपाला रोजची गरज पूर्ण करीत होता. शेतीमध्ये फळझाडांची लागवड केली होती. शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी एकूण १५ विहीरी खणल्या होत्या. त्यापैकी १२ विहीरी पं. रमाबाईंच्या काळात खणल्या होत्या. मुक्ति मिशनच्या शताब्दी अंकामध्ये शेती संदर्भात माहिती दिली आहे की, "Green fodder constantly needed for the cattle occupies a large area of farm. The cash crop sugercane has been sown"[१०९] शेतीमधून मोठ्या प्रमाणावर चारा निर्मिती केली जात होती. पारंपरिक शेती उत्पन्नाबरोबरच ऊसासारखी व्यापारी पिके घेतली जात होती.

### ५.५.५ **पशुपालन विभाग** (Animal Husbandary)

मुक्ति मिशनमध्ये 'पशुपालन' हा स्वतंत्र विभाग होता. या विभागात प्रामुख्याने दुभती जनावरे पाळली जात होती.मुक्ति मिशनमध्ये दुग्धालयाची सुरुवात कशी झाली हे स्पष्ट करताना पं. रमाबाई लिहितात की, "A kind English lady sent us about fifty pounds some six month ago. We were able to buy some milky cows and buffeloes with

this money"[११०] या विभागातर्फे मुलींची दुधाची गरज भागविली जातहोती. या विभागामध्ये लोणी व तूपाचे उत्पादन घेतले जात होते. पशुपालन हा शेती व्यवसायासाठी पूरक व्यवसाय ठरत होता. या विभागामध्ये मुली गटवार पध्दतीने काम करीत होत्या. जनावरांची निगा राखणे, स्वच्छता राखणे, दूध काढणे, जनावरांना औषधोपचार करणे इत्यादी कामे मुली स्वत: करीत होत्या.

मुक्ति मिशनसाठी "दूध घुसळण्याचे यंत्र (churns – machine for making butter by shaking milk) पाठविण्यात आले होते. या यंत्रामुळे दुधापासून लोणी (Butter) बनविण्याचे काम जलदगतीने होत होते."[१११] या यंत्रामुळे मुलींचे श्रम व वेळ वाचला. अशाप्रकारे पशुपालन विभागातर्फे दूधाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर होत होते असे दिसते. मुलींना नाष्ट्यासोबत दूध दिले जात होते. मुलींना सकस आहार पुरविण्यामध्ये या विभागाचे विशेष योगदान होते.

या विभागातील जनावरांच्या निश्चित संख्येविषयीची माहिती सन १९२२ अहवालात दिली आहे. पं. रमाबाई जनावरांच्या संख्येविषयी माहिती देतात की, "We have about fifty cows and milking buffoloes besides more than a hundred goats"[११२] याशिवाय याच अहवालातील नोंदीनुसार या विभागात ५० पेक्षा जास्त बैल व बैलगाड्या होत्या. बैलांचा उपयोग शेतीसाठी व मालवाहतुकीसाठी केला जात होता. या विभागामध्ये दोन रेडे पाळले होते. ते गावकऱ्यांनी देवासाठी सोडलेले होते. या रेड्यांना गाडी ओढण्याचे प्रशिक्षण दिले होते.

पशुपालन विभागातून "४०० लि. दूधाचे उत्पादन दर दिवशी होत होते. त्यापैकी १५० लि. दूध रोज मुक्ति मिशनमधील मुलींच्या उपयोगासाठी आणले जात होते. उरलेले दूध सरकारी दूध सोसायट्यांना विकले जात होते."[११३] दूध उत्पादनातून मुक्ति मिशनलला आर्थिक फायदा होत होता. मुलींची अन्नाची गरज भागत होती.

पं. रमाबईंचा एक आवडता कुत्रा होता. त्याचे नाव दरबार ठेवले होते. "इंग्लंडच्या राजाचा राज्यरोहणाचा दिवस दरबार दिवस म्हणून (११ डिसेंबर) पाळला जात होता. त्या कुत्र्याचा जन्म दिल्ली दरबार दिवसाच्या दिवशी झाला होता. म्हणून त्याचे नाव दरबार ठेवले होते."[११४]दरबारच्या दिवशी या कुत्र्याच्या गळ्यात फिती किंवा फुले घालण्यात येत होती. "मुक्तितील मुली आपल्या पिठातून थोडे पीठ बाजूला ठेऊन त्याची एक चांदकी करुन बाईंना

बक्षिस द्यायच्या."[११५] पं. रमाबाई मुक्ति मिशन मधील सर्व जनावरांना या चांदक्या घाऊ घालत. "म्हशी, मग गाई व बैल व सरतेशेवटी शेळ्या व मेंढ्या सर्व रीतसर येऊन रमाबाईंच्या हातून भाकरी घाऊन तृप्त होत व निघून जात."[११६]

मुक्ति मिशनच्या या विभागामध्ये एक गाढवीण, एक घोडी होती. या प्राण्यांचा पं. रमाबाईंना विशेष लळा होता. या विभागात मोठा पिंजरा होता. त्यात मोर, पोपट व कबुतरे पाळली होती. यावरुन पं. रमाबाईंचा मुक्या प्राण्यांविषयी कमालीचा दयाळू दृष्टिकोन होता असे दिसून येते. जनावरासारखी अवस्था झालेल्या मुलींची सेवा त्या करीत होत्या. तसेच प्रत्यक्ष जनावरांचाही मानवतावादी दृष्टिकोनातून विचार करीत होत्या.

मुक्ति मिशनमध्ये मांजरीची संख्या मोठ्या प्रमाणावर होती. "We also have a large number of cats to keep down the ever growing family of rats."[११७] असे पं. रमाबाई सन १९२२ च्या अहवालात नमूद करतात. मुक्ति मिशनमधील सामानाच्या खोल्यांमध्ये ५० मांजरी पाळल्या असल्याचे त्या नमूद करतात. पं. रमाबाईंनी मोठ्या संख्येने मांजरी हेतूपुरस्सर पाळल्या होत्या. याची पुढील कारणे होती.

१) द बुबॉनिक प्लेग या साथीच्या रोगाचा प्रादूर्भाव पुणे परिसरामध्ये वारंवार होत होता. हा रोग पसरविण्यात उंदीर कारणीभूत होते. त्यासाठी पं. रमाबाईंनी मोठ्या संख्येने मांजरी पाळल्या होत्या. सन १९१७ मध्ये पुणे, अहमदनगर, दौंड, केडगाव परिसरात प्लेगची भयंकर साथ पसरली होती. या साथीमध्ये ५% लोक मृत्यू पावल्याची नोंद असोशिएशनच्या १९१७ च्या अहवालात आहे. "याच वेळी मुक्ति मिशनमधील दोन मुलींचा मृत्यू प्लेगने झाला होता. परिसरामध्ये प्लेगचे शेकडो रुग्ण आढळले होते."[११८] प्लेगचा प्रसार होऊ नये व मुक्ति मिशनमध्ये मुलींचे प्लेगपासून संरक्षण व्हावे म्हणून मांजरी पाळल्या होत्या.

२) मुक्ति मिशनमधील धान्याची व अन्न पदार्थाची नासधूस उंदरांकडून होत होती. ही नासाडी थांबविण्यासाठी पं. रमाबाईंनी प्रत्येक विभागामध्ये मांजरी पाळल्या. त्याचा फार मोठा सकारात्मक परिणाम झालेला दिसतो. त्या नमूद करता की, "This also means a great saving in grain and food stuffs which would otherwise be

destroyed by the rats."[११९] मांजरांमुळे धान्याची नासाडी वाचवू शकलो असे त्या नमूद करतात.

मुक्ति मिशनमधील पशुपालन विभागातील नोंदीवर दिसून येते की, पं. रमाबाई भूतदयेच्या भावनेतून प्राण्यांचे पालनपोषण करीत होत्या. पशुपालन व्यवसाय आधुनिक पध्दतीने करीत हात्या. पशुपालनामागील आर्थिक व व्यवहारीक दृष्टिकोन बाळगत होत्या.

**५.५.६ शिक्षण विभाग :**

मुक्ति मिशनमध्ये शिक्षण विभाग अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. शिक्षण विभागाचे कार्य शारदासदन नावाने चालत होते. या शिवाय बार्तमी सदन, किंडर गार्टन, व्यवसायिक शिक्षण देणारे शैक्षणिक विभाग होते. "पुण्यामध्ये प्लेगची साथ आल्यामुळे १५ ऑक्टोबर १९०१ रोजी पुण्यातील शारदासदन बंद करण्यात आले."[१२०] शारदासदन शाळेमध्ये पुण्यातून स्थलांतरीत झालेल्या मुली, मुक्ति मिशनच्या आश्रयास असलेल्या मुली व परिसरातील मुली शिकत होत्या.

मुक्ति मिशनमधील शैक्षणिक कार्य सन १८९८ मध्येच सुरु झाले होते. शारदासदनातील प्रशिक्षित मुलींनी शिक्षिकेचे काम सुरु केले होते. शाळेच्या स्वरुपाविषयी त्या लिहितात की, "Five hours are given to school study and four hours to industrial training every day"[१२१] यावरुन पं. रमाबाई शालेय शिक्षणाबरोबर व्यवसायिक शिक्षण देण्याचा प्रयत्न करीत होत्या. "सईबाई व्यवसायिक शिक्षण विभागाचे कामकाज पहात होत्या."[१२२]

मुक्ति मिशनमधील शाळेत मुलींची संख्या वाढत होती. सन १९०३-०४ या वर्षात "शारदासदन मध्ये १७० मुली प्रवेशित होत्या. त्यापैकी २५ मुली अविवाहीत होत्या. १४५ मुली विधवा होत्या. २७ जणींना शिक्षिका बनण्याचे प्रशिक्षण दिले जात होते. ४८ मुली व्यवसायिक शिक्षण घेत होत्या. अंध शाळेत १७ मुली होत्या."[१२३] यावरुन शारदासनमध्ये शिक्षण घेणाऱ्या विधवा मुलींची संख्या जास्त होती. त्या विधवा मुली दुष्काळग्रस्त भागातून आल्या होत्या. अंधशाळेत चौथी पर्यंतचे वर्ग सुरु होते. अंध शाळेतील मुली ब्रेल लिपीचा वापर करुन वाचन करीत होत्या. "पंचमी नावाची अंध मुलगी नकाशाचे वाचन करुन नेमका देश ओळख्याचे कौशल्य मिळविले होते."[१२४] अंध मुलींमध्ये शिक्षणाचा प्रकाश निर्माण करण्याचा प्रयत्न पं. रमाबाई करीत होत्या. "मिस इ. एस. कार्नेलियस ह्यांनी मद्रास विद्यापीठातून पदवी मिळविली

होती. त्या. शारदासदन शाळेत निवासी शिक्षिका म्हणून काम करीत होत्या. सुभद्राबाई व चनाणाबाई मॅट्रीक्युलेशनची परीक्षा उत्तीर्ण होऊन शिक्षिकेचे काम करीत होत्या."[१२५] पं. रमाबाईंनी प्रशिक्षित व उच्च शिक्षित शिक्षिकांची नेमणूक केली होती. पं. रमाबाईंच्या शैक्षणिक कार्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जात होती. त्यामुळेच मिस ए. एस. कार्नेलियस सारख्या परदेशी महिला सेवाभावी वृत्तीने काम करताना दिसतात.

सन १९१८ पर्यंत शारदासदन ही मुंबई सरकारच्या शिक्षण विभागाकडे नोंदणीकृत व मान्यताप्राप्त शाळा नव्हती. पं. रमाबाईंनी शारदासदन शाळेच्या शासन मान्यता घेण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. या संदर्भात शासकीय नियम व अटी जाचक वाटत होत्या. त्याच शाळांना नोंदणीकृत व मान्यताप्राप्त शाळा समजले जात होते. शाळेला नोंदणीकृत व मान्यताप्राप्त होण्यासाठी शासनाच्या खालील अटी होत्या.

"1. Both registered and recognized schools need to have four hours secular instructions.

2. Registered schools receiving grants – in – aid must submit their accounts to Government.

3. Books used by either schools must be those taught in Government schools or such books as are submitted to the proper authorities and sanctioned by them."[१२६]

वरील नियमांचे पालन करणे पं. रमाबाईंच्या स्वतंत्र वृत्तीला पटले नाही. मुक्ति मिशनमध्ये ख्रिस्तीकरणासाठी मिळालेले स्वातंत्र्य गमाविण्याची त्यांची तयारी नव्हती. त्यामुळे धर्मनिरपेक्ष शिक्षण देण्याचे बंधन त्यांनी टाळलेले दिसते. मुक्ति मिशन व शारदासदनाच्या कार्यासाठी अमेरिकेतून निधी येत होता. त्यामुळे शाळेसाठी शासकीय अनुदानाची गरज त्यांना वाटली नाही. शाळेचे लेखापरिक्षण शासनाकडे सादर करण्याचे बंधन त्या स्विकारताना दिसत नाहीत. शासनाने मंजूर केलेलाच अभ्यासक्रम स्विकारणे त्यांच्या स्वतंत्र वृत्तीला पटले नव्हते. शारदासदनात शालेय शिक्षणाबरोबरच व्यवसायिक शिक्षण दिले जात होते. मुलींच्या सर्वांगिण विकासाठी शारदासदनात अनौपचारिक शिक्षणावर भर होता. शासकीय अभ्यासक्रम स्विकारल्यामुळे मुक्ति मिशनमधील मुलींची शैक्षणिक गरज पूर्ण होणार नव्हती. त्यामुळे त्यांनी शासकीय मदतीविना शाळा चालविण्याचा निर्णय घेतला होता. या संदर्भात त्या लिहितात की,

"To register the school and place it under government may mean endless slavery. We have neither time nor means to meet the requirements of the educational department and it seems best that the school should remain as it is, independent of government support."[१२७]

शासकीय मान्यता घेतल्यामुळे शाळेवर अनेक बंधने येणार होती. अशी बंधने स्विकारणे म्हणजे गुलामगिरी आहे असे पं. रमाबाईंचे मत होते. त्यामुळे शासनाचे आर्थिक अनुदान त्यांनी नाकारले व शारदासदन ही एक स्वतंत्र व स्वायत्त शाळा म्हणून स्विकारली. मुक्ति मिशनमधील मुलींच्या गरजांची पूर्ती करणारा अभ्यासक्रम तयार केला.

शारदासदन ही नोंदणीकृत शाळा नव्हती. त्यामुळे येथील मुलींना मॅट्रीक्युलेशनची परीक्षा देता येत नव्हती. पं. रमाबाईंना या कामी पुण्याच्या टेलर हायस्कूलने मदत केली होती. या हायस्कूलच्या प्राचार्या मिस फॉक्स यांनी शारदासदनातील मुलींना त्यांच्या हायस्कूलतर्फे मॅट्रीक्युलेशनची परीक्षा देण्याची परवानगी दिली होती. या संदर्भात पं. रमाबाई लिहितात की, "Krishnibai is one of our pupils who was sent to the Taylor High School of Poona under the new condition"[१२८] यावरुन पं. रमाबाईंचा दृष्टिकोन व्यापक दिसतो. मुक्ति मिशनमधील मुलींना फक्त प्राथमिक वा माध्यमिक शिक्षण देण्याचा मर्यादीत हेतू दिसत नाही. मुलींच्या उच्च शिक्षणासाठी त्या प्रयत्न करीत होत्या. त्यांच्या प्रयत्नांमुळेच मुंबई विद्यापीठाचा अभ्यासक्रम काही मुली पूर्ण करु शकल्या.

मुक्ति मिशनमधील शिक्षण विभागांतर्गत हिब्रु व ग्रीक भाषांचे अध्ययन वर्ग सुरु होते. या संदर्भात मनोरमाबाई लिहितात की, "We have therefore opened a class in Greek and Hebrew which is composed of forty-six young women, forty one of whom are from the Sharada Sadan. They meet about four times a week and they are doing very well."[१२९]

बायबलचा जुना करार हिब्रु भाषेत आहे व नवा करार ग्रीक भाषेत आहे. पं. रमाबाईंना बायबलच्या भाषांतराच्या कार्यात हिब्रु व ग्रीक भाषांचे ज्ञान असणाऱ्या मुलींची गरज होती. तसेच मूळ भाषेतील बायबल शिकण्याची इच्छा काही मुलींची होती. म्हणून त्यांनी हिब्रु व ग्रीक भाषेचे वर्ग सुरु केले होते. जागतिक पातळीवरील अभिजात भाषा मुक्ति मिशनमध्ये शिकविल्या जात होत्या ही बाब वैशिष्ट्यपूर्ण होती.

मुक्ति मिशनच्या शिक्षण विभागांतर्गत बायबल स्कूल चालविले जात होते. मुक्ति मिशनमध्ये ख्रिस्ती धर्मांतर केलेल्या मुलींची संख्या मोठी होती. बायबलचे प्रशिक्षण मिळणे ही त्यांची आध्यात्मिक गरज होती. "पंडिता रमाबाईंनी ख्रिस्ती मुलींसाठी रोज सकाळी ५ वाजता प्रार्थना घेणे सुरु केले. तसेच शिक्षिका बनू इच्छिणाऱ्या मुली व कार्यकर्ते यांच्यासाठी पवित्रशास्त्र अभ्यासवर्ग सुरु केला."[१३०] बायबल स्कूलमधून पवित्र शात्रांच्या वचनांचा परिचय मुलींना करुन दिला. या शाळेतील मुली पुढे सुवार्ता प्रसारकाचे काम करीत होत्या.

सुरुवातीला पं. रमाबाईंचे संस्कृत भाषेवर फार प्रेम होते. "मुक्ति मिशनमध्ये संस्कृत शिकवण्यासाठी त्यांनी ताटके शास्त्रींची नेमणूक केली होती."[१३१] पं. रमाबाईंचे मातृभाषेवरही फार प्रेम होते. शाळेतील अभ्यासक्रम मराठी भाषेत शिकविला जात होता. मुक्ति मिशनमधील भाषिक व्यवहार मराठीतून होत होते. मुलींना म्हणण्यासाठी मराठी प्रार्थना तयार केल्या होत्या. "रेव्ह. टिळकांच्या सांगण्यानुसार इनॉक धैर्यशील गवई यांस केडगावी बोलावून त्यांच्याकडून देशी संगीतावर आधारीत चाली बसवून घेतल्या. शास्त्रीय संगीत विषयक सुलभ संगीत बोध पुस्तक लिहवून, छापवून घेतले."[१३२] मुक्ति मिशनमध्ये संगीताचे खास प्रशिक्षण दिले जात होते. मुक्ति मिशनमधील संगीत वर्गांविषयी मनोरमाबाई लिहितात की, "I am glad to say that we have at last been able to start a regular class in Indian music. My mother has engaged an Indian Christian musician to set her translation of the Psalms to Indian Chant Tunes."[१३२अ] याशिवाय मुक्ति मिशनमध्ये लघूलिपी (Short hand) व टंकलेखन (Type writing) शिकविले जात होते असे मनोरमाबाई सन १९१० च्या वार्षिक अहवालात नमूद करतात. यावरुन पं. रमाबाई मुक्ति मिशनमधील मुलींना पारंपरिक परिघाबाहेरचे शिक्षण देत होत्या असे दिसते.

सन १९१३ मध्ये मुंबई शासनाने प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांच्या शिक्षकांच्या अर्हता असणे अनिवार्य केले. या संदर्भात पं. रमाबाई लिहितात की, "The government of Bombay have made very stringent rules regarding primary and higher schools. They will not recognize any teacher in any school as a qualified teacher unless he or she has passed certain prescribed examinations"[१३३] त्याकाळी शारदासदनातील शिक्षिका प्रशिक्षित होत्या मात्र त्यांनी अर्हता प्राप्त होण्यासाठीची परीक्षा उत्तीर्ण केली नव्हती. अशा अर्हता प्राप्त शिक्षिका मिळणे त्याकाळी अवघड होते.

पं. रमाबाईंनी मनोरमाबाई व इतर मुलींना पुण्यामधील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिकण्यासाठी पाठविले होते. त्यांचा खर्च शारदासदनासाठी आलेल्या मदत निधीतून केला होता. मनोरमाबाईंनी केडगाव पुणे असा रोज प्रवास करुन शिक्षण शास्त्राचा अभ्यास सुरु केला होता. त्यांच्या प्रवासावर होणाऱ्या खर्चासाठी पं. रमाबाईंनी असोशिएशनकडे परवानगी मागितली होती. त्या लिहितात की, "I therefore wish to ask you permission to pay the expenses of her college education and journeying from here to Poona and back out of the money which you are sending for the support of the Sharada Sadan."[१३४] यावरुन पं. रमाबाईंच्या आर्थिक व्यवहारातील पारदर्शकता दिसून येते. असोशिएशनकडून आलेल्या पैशांचा विनियोग करण्याचे त्यांना स्वातंत्र्य होते. तरीही मनोरमेच्या शिक्षणासाठी त्या नम्रपणे परवानगी मागत होत्या. "मनोरमाबाईंनी पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये बी. ए. ची पदवी मिळविली. व पुढे १९१७ मध्ये वयाच्या छत्तीसाव्या वर्षी तिला शिक्षकाचे प्रमाणपत्र मिळाले."[१३५] मनोरमाबाई मोटारीने रोज केडगाव–पुणे–केडगाव असा प्रवास करीत होत्या. त्यासाठी त्यांनी वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती (Driving Licence) काढली होती. वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती मिळविणाऱ्या त्या पुणे जिल्ह्यातील पहिल्या महिला होत्या.

सन १९१७ मध्ये शारदासदन शाळा शासन मान्यता प्राप्त झाली. या संदर्भात पं. रमाबाई लिहितात, "We are in a position to ask that our school may be recognized by the educaiton department"[१३६] शारदसदन शाळेला शासन मान्यता मिळाल्यामुळे येथील मुली शाळेतर्फे मॅट्रीक्युलेशनची परीक्षा घेऊ शकणार होत्या. शासन मान्यता मिळण्यासाठीचे निकष शाळेने पूर्ण केले होते. शारदासदन शाळा पुढील नावाने शासन दरबारी नोंदणीकृत झाली. १) शारदासदन प्राथमिक शाळा, २) शारदासदन अँग्लो व्हर्नाक्युलर शाळा त्यानंतर शारदासदनमध्ये पदवीपूर्व पर्यंतचा अभ्यासक्रम सुरु झाला. सन १९१९ मध्ये "शासनाच्या शिक्षण विभागाकडून शारदासदन शाळेची पुनर्तपासणी झाली होती. त्यानुसार शारदासदनला कायमस्वरुपी मान्यता मिळाली."[१३७] "सन १९२० मध्ये शिक्षणाधिकारी विज्ञान निरीक्षक व इतर शासकीय अधिकाऱ्यांनी शारदासदन शाळेची तपासणी केली होती. त्यांनी शाळेच्या प्रगतीविषयी, कामकाजाविषयी व व्यवस्थापनाविषयी समाधान व्यक्त केले होते."[१३८]

यावरुन शारदासदन शाळेतील मुलींची प्रगती समाधानकारक होती. मुलींना चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न होत होता.

मनोरमाबाई व कृष्णाबाई गद्रे ह्या पदवीधर झालेल्या पहिल्या विद्यार्थीनी होत्या. या दोघींचा उल्लेख पं. रमाबाईंनी सन १९२० च्या अहवालात केला आहे. त्या लिहितात की, "Manorama has passed the teachers examination in addition to the B. A. examination and Krishnabai Gadre who passed the B.A. examination of the Allahabad University."[१३९] मनोरमाबाईंनी बी.ए.ची पदवी पुण्याच्या डेक्कन कॉलेजातून मिळविली होती. कृष्णाबाई गद्रे यांनी बी. ए. ची पदवी लखनौ येथील इसाबेला थॉबर्न कॉलेजमधून मिळविली होती. पं. रमाबाई कृष्णाबाईंना लखनौसारख्या दूरच्या शहरात ठेवून शिक्षणासाठी प्रोत्साहीत करीत होत्या.

पं. रमाबाईंचा शिक्षणामागील केवळ पदव्या मिळविणे असा मर्यादीत हेतू नव्हता. त्यांची महत्त्वाकांक्षा असे की, "जरी मुली पदवीधर झाल्या नाहीत तरी त्यांना निदान आपल्या पायावर तरी उभे राहण्यापुरता काही धंदा मिळवावा व आपले पावित्र्य राखून आदबीने आयुष्य कंठावे."[१४०] त्यासाठी शालेय शिक्षणासोबत व्यवसायिक शिक्षणाची जोड त्यांनी दिली होती. शिक्षणातून आत्मनिर्भरता यावी यासाठी त्या प्रयत्न करीत होत्या.

शारदासदनातील मुलींना खेळाचे प्रशिक्षण दिले जात होते. पारंपरिक खेळ खेळले जात होते. परदेशी स्वयंसेवकांच्या मदतीने पाश्चात्य खेळही शिकविले जात होते. "मुंबईच्या गव्हर्नरच्या पत्नी मिस लेडी लॉईड (Miss Lady Lioyd) यांनी पुणे येथे खास महिलांसाठी क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले होते."[१४१] शारदासदनातील मुलींनी त्यात भाग घेऊन प्राविण्य मिळविले होते. अशाप्रकारे मुक्ति मिशनमध्ये क्रिडा संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न पं. रमाबाई करीत होत्या. मुक्ति मिशनमधील क्रिडाविषयक माहिती देताना पं. रमाबाई लिहितात की, "I have been able to make more satisfactory arrangement for out of door games and for physical culture. We have a tennis court now. Where a number of our girls have great fun six evenings in the week."[१४२]

टेनिस हा पाश्चात्य खेळ उच्चभ्रू व श्रीमंत लोकांचा म्हणून ओळखला जातो. सन १९१७ साली केडगावसारख्या खेडेगावात टेनिस कोर्ट असणे ही बाब विशेष नोंद घेण्याजोगी आहे. भारतीय ग्रामीण भागात असलेले ते पहिले टेनिस कोर्ट होते. टेनिससारखा उंची समजला

जाणारा पाश्चात्य खेळ शारदासदमधील मुली खेळत होत्या. यावरुन शारदासदनातील वातावरणाची कल्पना येते.

केडगाव परिसरातील लोकांचा मुक्ति मिशनशी रोजंदारीच्या निमित्ताने संबंध येत होता. येथील शैक्षणिक कार्यामुळे ते प्रभावित झाले होते. येथील शैक्षणिक कामाचा प्रसार त्यांच्या गावात व्हावा असे त्यांना वाटत होते. त्याकाळी अस्पृश्य मुलामुलींना सर्वसाधारण शाळेत प्रवेश मिळत नव्हता. गावकऱ्यांनी विनंती केली होती की, "Village school for low-caste children should be opened by mission"[१४३] मुक्ति मिशनच्या आवाराबाहेर अशी शाळा काढणे पं. रमाबाईंना शक्य झाले नाही. मात्र शारदासदनमध्ये अस्पृश्य मुला मुलींसाठी प्रवेश दिला होता. पं. रमाबाईंनी जातीयतेच्या पलिकडे जाऊन शिक्षणाचा प्रसार केला होता.

मुक्ति मिशनमधील शिक्षण विभागांतर्गत अंधशाळा हा वैशिष्टपूर्ण विभाग होता. या अंधशाळेत सुरुवातीला चौथीपर्यंतचे वर्ग होते. कालांतराने विस्तार होऊन सातवीपर्यंतचे वर्ग सुरु केले होते. या शाळेत ब्रेललिपीचा वापर केला जात होता. सन १९०१ मध्ये या अंधशाळेत ११, सन १९०६ मध्ये २०, सन १९१० मध्ये २३, सन १९१६ मध्ये ४०, सन १९२० मध्ये ८५ अशी प्रवेशित संख्या द अमेरिकन रमाबाई असोशिएशनच्या वार्षिक अहवालांमध्ये दिली आहे."मनोरमाबाई स्वत: ब्रेललिपी शिकल्या होत्या. सुरुवातीला त्यांनी अध्यापनाचे काम केले."[१४४]शारदासदनातील काही मुलींना ब्रेललिपी शिकविली. त्यांना अंध शाळेसाठी शिक्षिका म्हणून प्रशिक्षित केले. सन १९१२ मध्ये "मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सिडनहॅम व त्यांच्या पत्नी लेडी सिडनहॅम यांनी मुक्ति मिशनला भेट दिली होती. त्या दिवशी दिल्ली दरबार होता. त्यांनी अंधशाळेतील कामाविषयी कौतुक केले होते."[१४५] पं. रमाबाईंच्या या कार्याला राजमान्यता मिळत होती असे दिसते. अनेक परदेशी स्वयंसेवकांनी सामाजिक कार्यासाठी पं. रमाबाईंवर विश्वास व्यक्त केलेला दिसून येतो. "मिस बनार्ड ह्या स्कॉटलंड मिशन चर्च, पुणे येथील मिशनरी होत्या. त्यांनी भारतात बरीच वर्षे अंधांची सेवा केली होती. निवृत्तीनंतर त्यांनी आपली अंधशाळा बंद केली. तेथील अंध मुली व शिक्षिकांना मुक्ति मिशनच्या शाळेत पाठविले."[१४६] यावरुन मिस बर्नार्ड यांनी पं. रमाबाईंवर विश्वास व्यक्त केला होता असे दिसते. त्यांचे उत्तर कार्य मुक्तिमिशनमध्ये पूर्ण होऊ शकेल याची खात्री त्यांना वाटली होती.

"मिस क्रॅडोक (Miss Craddock) या अंधशाळेत शिक्षिका होत्या. त्या इंग्लंडहून आल्या होत्या. त्यांच्या विषयी पं. रमाबाई लिहितात की, "When miss Craddock is free to give her whole time to the blind girls, I hope that we may have a really good blind school."[१४७] मुक्ति मिशनच्या अंधशाळेत परदेशी प्रशिक्षित शिक्षिका काम करीत होत्या. या अंधशाळेचा प्रभाव परदेशात निर्माण झाला होता. मुक्ति मिशनमधील अंधशाळेची किर्ती संपूर्ण भारतभर पसरली होती. भारताच्या दूर प्रांतातून अंधमुली येथे शिक्षणासाठी येत होत्या. या संदर्भात मनोरमाबाई लिहितात की, "We have blind girls from Poona, Satara and Culcutta and other places of India."[१४८] या वरुन मुक्ति मिशनमधील अंधशाळेला राष्ट्रीय स्वरुप आले होते असे दिसते.

मुक्ति मिशनमधील शिक्षण विभागांतर्गत किंडरगार्टन हा स्वतंत्र विभाग होता. बालशिक्षण पध्दती तत्कालीन काळात भारतीय समाजाला अपरिचित होती. हा विभाग मुक्ति मिशनच्या स्थापनेपासूनच सुरु केलेला होता. दरवर्षी सरासरी ५० लहान बालकांचा या विभागात समावेश होता. शारदासदनातील प्रशिक्षित मुली या विभागाचे काम पहात होत्या. याशिवाय काहीपरदेशी स्वयंसेविका या विभागासाठी योगदान देत होत्या. मनोरमाबाई लिहितात की, "Miss ferguson our Kindergarten and drawing teacher, has now returned to us from Australia with a full Kindergarten teacher's certificate"[१४९] मिस फर्ग्युसन यांनी बालशिक्षण विभागाची दीर्घकाळ सेवा केली होती.

अशाप्रकारे पं. रमाबाईंच्या काळातील मुक्ति मिशन शिक्षण विभागाचा आढावा घेतला आहे. यावरुन तेथील शिक्षण पध्दती, शाळेचे स्वरुप समजण्यास मदत होते. मुक्ति मिशनमध्ये बंदिस्त व औपचारिक शिक्षणावर फारसा भर दिलेला दिसत नाही. मुलींचे वय, मानसिक कल लक्षात घेऊन शिक्षण दिले जात होते. येथील शाळांमध्ये मुक्ति मिशनमधील अनाथ मुली व विधवा शिकत होत्या. केडगाव परिसरातील मुलींनाही शिक्षणाची संधी दिली जात होती. शारदासदन शाळेत प्रवेशित मुलींची सन १९०० ते १९२१ या काळातील सांख्यकिय माहिती खालील तक्त्यामध्ये दिली आहे.

Statistical information of Admitions of Sharada Sadan, Kedgaon

| Sr. No. | Year | Admission in Sharada Sadan School | Admission in Sharada Sadan of Mukti Missions girls | Admission in Blind School | Admissions in Kindargarten School | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1900 | - | - | - | - | 161 |
| 2 | 1901 | - | - | 11 | - | 166 |
| 3 | 1902 | - | - | - | - | 178 |
| 4 | 1903 | - | - | - | - | - |
| 5 | 1904 | 170 | - | 17 | - | 187 |
| 6 | 1905 | - | - | - | - | 177 |
| 7 | 1906 | 94 | 61 | 20 | - | 155 |
| 8 | 1907 | - | - | - | - | 155 |
| 9 | 1908 | - | - | - | - | 161 |
| 10 | 1909 | - | - | - | - | 204 |
| 11 | 1910 | - | - | 23 | - | 242 |
| 12 | 1911 | - | - | - | - | 287 |
| 13 | 1912 | - | - | - | - | - |
| 14 | 1913 | 118 | 134 | - | - | 252 |
| 15 | 1914 | 110 | 220 | - | - | 330 |
| 16 | 1915 | 127 | 99 | - | - | 226 |
| 17 | 1916 | 151 | 85 | 40 | 48 | 236 |
| 18 | 1917 | 132 | 32 | - | - | 164 |
| 19 | 1918 | 128 | 62 | - | - | 190 |
| 20 | 1919 | - | - | - | - | 250 |
| 21 | 1920 | - | - | 85 | - | 255 |
| 22 | 1921 | - | - | 35 | 70 | 272 |

( - ) Means Statistical Information not available in Reports.

(Source – Anuual Reports of American Ramabai Associationfrom year 1900 to 1922)

अनाथ व विधवा स्त्रियांमध्ये शिक्षण त्याकाळी शक्य नव्हते. अशा मुलींच्या शिक्षणाचा विचार होत नव्हता. या पार्श्वभूमीवर केडगाव सारख्या खेडेगावातील शारदासदन ही शाळा वैशिष्ट्यपूर्ण ठरते. मुलींच्या शिक्षणासाठी दीर्घकाळ कार्यरत असणारी ही शाळा विशेष नोंद घेण्यासारखी आहे. शारदासदनमध्ये अनाथ, निराधार व विधवा मुलींना सुशिक्षित व प्रशिक्षित बनवले होते. तत्कालीन काळात विधवांचे शिक्षण सामाजिक व धार्मिक बंड मानले जात होते. या संदर्भात रुस्तमजी म्हणतात की, "Educaiton of widow is crime against civilization, a crime against society"[१५०] यावरुन विधवांच्या शिक्षणासंदर्भातील सामाजिक मानसिकता स्पष्ट होते. साहजिकच मुक्ति मिशनमधील शैक्षणिक कार्यालाही फार मोठा सामाजिक विरोध झाला होता. हा विरोध पत्करुन येथील स्त्री शिक्षणाचे कार्य अखंडीतपणे सुरु होते मुक्ति मिशनच्या कार्याला होणाऱ्या विरोधासंदर्भात मिस एलिझाबेथ

निकोलस यांनी "War to the knife between pt. Ramabai's school and Hindus"[१५१] असे वर्णन केले. यावरुन मुक्ति मिशनमधील शैक्षणिक कार्याला विरोध होता हे दिसून येते.

### ५.५.७ मुक्ति मिशनमधील व्यवसाय विभाग :

(Industrial Department of Mukti Mission)

मुक्ति मिशनमध्ये व्यवसाय विभाग हा महत्त्वाचा विभाग होता. या विभागामध्ये मुली वस्त्रियांना धंदेवाईक शिक्षण दिले जात होते. मुलींनी स्वावलंबी व्हावे, अर्थार्जनासाठी सिध्द व्हावे यासाठी त्यांना उद्योगप्रवीण बनविले जात होते.

मुक्ति मिशनमध्ये तेलघाणा (Oil mill) हा उद्योग सुरु होता. हा मुक्ति मिशनमध्ये सुरु केलेला पहिला उद्योग होता. मुक्ति मिशनमधील अन्नाच्या गरजेपोटी खाद्य तेलासाठी मोठ्या प्रमाणावर पैसे खर्च होत होते. त्यासाठी तेलाची गरज भागविण्यासाठी पं. रमाबाईंनी तेलघाणा सुरु केला होता. या संदर्भात पं. रमाबाई लिहितात की, "for the last two months, we have been able to get nice fresh oil at a very cheap price for both the schools. A little OX, who is a great pet, and fine stronge girls may be seem working at the oil mill."[१५२] या तेलघाण्यामुळे खाद्य तेलाच्या खर्चात बचत झाली. तेल गाळण्याचे काम स्वत: मुलीच करीत होत्या. मुक्ति मिशनमध्ये एक लॉन्ड्री चालविली जात होती. धोब्यांच्या मदतीशिवाय हे काम चालत होते. लॉन्ड्रीसाठी लागणारे साहित्य देणगी रुपाने मिळाले होते. या संदर्भात पं. रमाबाई लिहितात की, "Mrs. Quincy A Shaw sending several wash boards, washing tubs, iron stove, and other things to help start laundry"[१५३] या लॉन्ड्री व्यवसायामुळे बचत झालेल्या पैशाचा वापर चर्चच्या कार्यासाठी वापरला जात होता.

मुक्ति मिशनसाठी दूध घुसळण्याचे यंत्र (Churns Machine) अमेरिकेवरुन पाठविण्यात आले होते. मुक्ति मिशनमधील मुली या यंत्रांच्या मदतीने दुग्धजन्य पदार्थ तयार करीत होत्या. असे पं. रमाबाई सन १८९९ च्या अहवालामध्ये नमूद करतात. मुक्ति मिशनसाठी तूप व लोणी या पदार्थांचे उत्पादन घेतले जात होते.

मुक्ति मिशनमध्ये हातमागावर कापड तयार करण्याचा उद्योग सुरु केला होता. या संदर्भात पं. रमाबाई लिहितात की, "some months ago we bought some hand-looms and employed two teachers to teach the girls weavings"[१५४] या उद्योगामुळे मोठ्या

संख्येने असणाऱ्या मुली व स्त्रियांना साड्या पुरविता आल्या. या विभागातर्फे एका मुलीला वर्षाला तीन साड्या दिल्या जात होत्या. पं. रमाबाईंनी या उद्योगाकडे व्यापारी दृष्टिकोनातून पाहिले होते. अतिरिक्त उत्पादन झालेले कापड त्या बाजारामध्ये विकत होत्या. त्यामुळे हातमागाच्या उद्योगातून मुक्ति मिशनसाठी आर्थिक उपलब्धी होत होती.

पं. रमाबाईंच्या चरित्रकार क्लेमेंटीना बटलर यांनी सन १९०७ च्या अहवालामध्ये हातमाग उद्योगाचे सविस्तर वर्णन केले आहे. त्या लिहितात, "This weaving room is very attractive with the bright – coloured web of cotton 'saris' on the scores of looms and the busy brown fingers throwing the shuttles to and fro so swiftly. There are some improved looms with mechanical shuttles, but the larger number are the simple Indian looms.... further on were the looms with cotton rugs, attractive with their bright red and black strips and of durable texture."[१५५]

या विभागामध्ये 'Simple India Loom' तयार होत होते असा उल्लेख क्लेमेंटीना बटलर करतात. त्यालाच खादीचे कापड म्हटले जात होते. स्वदेशी कापड म्हणून खादीला प्रतिष्ठा होती. "मुक्ति मिशनमधल्या हातमागावरील वस्त्रेच रमाबाई सकट सर्व नेसत."[१५६] लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी सूत्राला पं. रमाबाईंनी प्रत्यक्ष कृतीतून पाठिंबा दिला होता. गांधीयुगाच्या अगोदर खादीचा प्रयोग पं. रमाबाईंनी केला होता.

सन १९१२ मध्ये मिस एलिझाबेथ निकोलस यांनी मुक्ति मिशनला भेट दिली होती. त्यांनी येथील हातमाग उद्योगांविषयीच्या नोंदी सन १९१३ च्या अहवालात नोंदविल्या आहेत. त्या लिहितात की, "There are sixty hand looms there. Then there is the embriodery and the drawn work"[१५७] यावरुन मुक्ति मिशनमध्ये हातमागाची मोठी संख्या होती असे स्पष्ट होते.

पं. रमाबाईंनी मुक्ति मिशनमध्ये रेशीम उद्योग (Silk Industry) सुरु केला होता. मनोरमाबाईंनी रेशीम उद्योगांविषयी सन १९१६ च्या अहवालामध्ये माहिती दिली आहे. त्या लिहितात की, "We are trying to start a silk industry. My mother has planted a number of mulberry trees and castor oil plants and we have now a number of worms spinning their cocoons in baskets made by our own girls"[१५८] या नोंदीवरुन

मुक्ति मिशनमध्ये रेशीम उद्योग शास्त्रीय पध्दतीने केला जात होता असे स्पष्ट होते. मात्र हा उद्योग दीर्घकाळ चालला नाही असे त्या नमूद करतात.

रेव्ह. रॉबर्ट ए. ह्यूम यांनी मुक्ति मिशनच्या व्यवसाय विभागाची महत्वाची नोंद केली आहे. पं. रमाबाई ऑर्डरी घेऊन माल पुरवित होत्या असे ते नमूद करतात. या संदर्भात ते लिहितात की, "Another part of her industrial work is to take contracts from the great Indian Peninsular Railway for the little G.I.P. badges which the railway employees wear on their arms. These are made in hundreds and as you go around the railway any where in western India and can see this little badges, you know it is made at the Pandita Ramabai's Mukti Mission."[१५९]

वरील नोंदीवरुन पं. रमाबाईंना बॅजेस पुरविण्याचे सरकारी कंत्राट मिळाले होते. रेल्वेतील गार्ड, पोर्टर व इतर कर्मचाऱ्यांच्या गणवेशावर लागणारे बॅज त्या पुरवित होत्या. एखाद्या स्त्रियांनी चालविलेल्या संस्थेला बॅजेस पुरविण्याचे सरकारी कंत्राट मिळत होते ही बाब विशेष उल्लेखनीय आहे. आजच्या आधुनिक काळात निविदा घेऊन माल पुरविण्याची अशी पध्दत पं. रमाबाईंनी शंभर वर्षापूर्वी अंमलात आणली होती. मुक्ति मिशनच्या मुलींनी सन १०३५ पर्यंत बॅजेस पुरविण्याची काम अखंडीतपणे केले होते. "सन १९२९ साली मुलींनी १०००० बॅजेस शिवण्याचे विक्रमी उत्पादन केले होते."[१६०] यावरुन मुक्ति मिशनमधील मुलींची कार्यक्षमता दिसून येते. रेल्वेसारख्या महत्त्वाच्या सरकारी खात्याने मुक्ति मिशनवर विश्वास टाकला होता.

मुक्ति मिशनमध्ये शिवणकामाचा स्वतंत्र विभाग होता. या विभागात मुक्ति मिशनमधील मुली व स्त्रियांसाठी कपडे शिवले जात होते. शिवणकामाविषयी कृष्णाबाई गद्रे लिहितात की, "शिवणकामाच्या खोलीत ३४ जणी आपल्या शिवणकामात गर्क होऊन गेलेल्या दिसतील. हातरुमाल, टेबलक्लॉथ, पलंगपोशी, ड्रेसिंग सेटस् वगैरे शेकडो सुंदर कलेची कामे तेथे तयार होता. शिवाय संस्थेच्या सर्व मुलाबाळांसाठी, अधू गरजूंसाठी लागणारे कापड, परकर, पोलकी, फ्रॉक्स, चोळ्या, विजारी येथे शिवली जातात."[१६१]

अशाप्रकारे पं. रमाबाईंनी गरजांशी निगडीत उद्योग/व्यवसाय सुरु केले होते. मुक्ति मिशनमधील मुलींच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मोठा खर्च येत होता. त्या खर्चामध्ये बचत करण्यासाठी लहान मोठे उद्योग सुरु केले होते.

मुक्ति मिशनमधील मुलींचे दोन गट केले होते. एक गट सकाळच्या सत्रामध्ये शालेय शिक्षण घेत होता. त्याचवेळी दुसरा गट व्यवसायिक शिक्षण घेत होता. दुपारच्या सत्रामध्ये पहिला गट व्यवसायिक शिक्षण घेत होता. त्याचवेळी दुसरा गट शालेय शिक्षण घेत होता. पं. रमाबाईंच्या कामाध्ये कल्पकता व उद्योगकता आढळते. हेच गुण मुलींमध्ये आणण्याचा त्या प्रयत्न करीत होत्या.

मुक्ति मिशनच्या शताब्दी अंकामध्ये येथील उद्योगांची यादी दिली आहे. त्यामध्ये तेलघाणा, लॉन्ड्री, बेकरी, शोभेचे दागिने तयार करणे, लाख तयार करणे, टोप्या, बटण, झाडू व टोपल्या तयार करणे, रग–साड्या व इतर कपडे विणणे व शिवणे, त्यावरील भरतकाम, कशिदा काम, व कलाकुसर करणे, भांड्यांना कल्हई करणे, भांड्यावर नावे लिहीणे, दोऱ्या वळणे, चटया तयार करणे इत्यादी लहान मोठे उद्योग मुक्ति मिशनमध्ये सुरु होते, अशी माहिती दिली आहे. ही गरजेची कामे मुलींकडून करुन घेतली जात होती. ही कामे नियोजित वेळापत्रकाप्रमाणे व शिस्तीने होत होती.

पं. रमाबाईंनी कुटीरोद्योग व स्त्री उद्योजकता याची सुरुवात शंभर वर्षापूर्वी केली होती. मुक्ति मिशनसारख्या मोठ्या वसाहतीमध्ये "गंगाधरपंत गद्रे, डॉ. गोवंडे, ताटके शास्त्री अशी तुरळक पुरुष नावे आढळतात. येथे लोहारी, सुतारी, गवंडी कामे, खोदकाम, हातमाग, छपाई, सर्व व्यवस्थापन, हिशोब ही कामे मुली व स्त्रियाच करीत होत्या."[१६२] ही विशेष नोंद घेण्यासारखी बाब आहे. पं. रमाबाईंनी पुरुषांशिवाय आपण आत्मसन्मानाने जगू शकतो हा अनुभव मुलींना दिला होता. "मुक्तीतील सर्व उद्योगांसाठी रमाबाई प्रथम बाहेरुन प्रशिक्षित माणसे बोलावत व मुली त्यांच्या हाताखाली तयार झाल्या की त्यांना रजा देत."[१६३] पं. रमाबाईंनी येथील उद्योगांमध्ये पुरुषांचा सहभाग नाकारला. अनेक उद्योग मुलींना स्वतंत्रपणे चालवायला शिकविले. या उद्योगांमुळे आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. तसेच या उद्योगांकरवी मुलींच्या गरजेची कामे करता आली. यातून पैशाची बचत झाली. "३००० लोकांच्या ह्या वस्तीतील सांडपाण्याची भूमिगत व्यवस्था व मैल्यापासून खत व पाणी शेतात देण्याची योजना पण रमाबाई राबवित होत्या."[१६४] यावरुन पं. रमाबाईंनी मुक्ति मिशनची रचना आदर्श पध्दतीने केली होती असे दिसते. त्यांचे याबाबतचे विचार काळाच्या

पुढचे होते. सांडपाण्याचा पुनर्वापर हा आजच्या आधुनिक विचार पं. रमाबाई शंभरवर्षापूर्वी प्रत्यक्ष कृतीत आणताना दिसतात.

पं. रमाबाईंचा निव्वळ बौद्धिक शिक्षणावर विश्वास नव्हता. मुलींना आर्थिकदृष्ट्या स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न त्या करीत होत्या. मुलींचे आर्थिक परावलंबित्त्व नष्ट करण्यासाठी त्यांना व्यवसायिक कौशल्ये शिकविली जात होती. मुक्ति मिशनमधील व्यवसाय विभाग म्हणजे स्त्री सबलीकरणाचा आद्य प्रयत्न होता. पं. रमाबाईंनी स्त्री सबलीकरणाचे प्रयोग शंभर वर्षापूर्वी केले होते.

## ५.६ मुक्ति मिशन मधील धर्मसंजीवन : (Revival in Mukti Mission)

धर्म संजीवन प्रक्रियेला ख्रिस्ती धर्मामध्ये अत्यंत पवित्र मानले जाते. जगातील पहिल्या धर्म संजीवन सोहळ्याविषयी बायबलमधील प्रेषितांची कृत्ये या प्रकरणात अध्याय २, वचने १ ते ४ मध्ये सविस्तर माहिती दिली आहे.

येशूच्या वधानंतर जेव्हा पन्नासाव्या दिवसाचा सण प्रथम आला. त्यावेळी त्यांचे शिष्य एकत्र येऊन प्रार्थना करु लागले. त्यावेळी धर्मसंजीवनाचा पहिला अनुभव शिष्यांना आला असा दृष्टांत धर्मसंजीवनाच्या बाबतीत प्रचलित आहे.

"ख्रिस्ती धर्मश्रध्देप्रमाणे पवित्र आत्म्याचा प्रवेश मनुष्य देहात होतो. त्यात मनुष्यातला हिन, खोटेपणा जळून जातो. व एक विलक्षण सात्विक आनंद त्याला लाभतो. ह्याला धर्मसंजीवन असे म्हणतात."[१६५]

सन १९०५ च्या सुमारास मुक्ति मिशनमध्ये 'धर्म संजीवन' हा अद्‌भूत प्रकार बराच काळ चालू होता असे सांगितले जाते. भारतामध्ये एकूण ८१ ठिकाणी धर्मसंजीवन प्राप्त झाले आहे. त्यापैकी महाराष्ट्रात २८ ठिकाणी धर्म संजीवन प्राप्त झाले आहे. अशी माहिती मुक्ति मिशनमधील रेव्ह. गुढे यांनी दिली आहे. "भारतामध्ये लखनौ, अलाहाबाद, अडनसोल, मोरादाबाद, बरेली, खासिया हिल्स आणि केडगाव"[१६६] इत्यादी ठिकाणी धर्मसंजीवन घडले असल्याची माहिती अमेरिकेतून प्रकाशित होणाऱ्या 'Assemblies of God Heritage' या नियतकालिकामध्ये दिली आहे.

धर्मसंजीवन मुक्ति मिशनमध्ये प्राप्त व्हावे अशी पं. रमाबाईंची इच्छा होती. त्यासाठी सन १९०२ पासूनच प्रयत्न करीत होत्या. त्या संदर्भात नोंद मिळते की, "Stirred by hearing of Revival in Austrlia, Ramabai sent her daughter Manoramabai and Miss Abrams, to New-zealand and Austrelia in 1903 to urge christians to pray for revival in India. As the prayed and expected great things happened in Mukti and India."[१६७]

यावरुन मुक्ति मिशनमध्ये धर्मसंजीवन घडून यावे ही पं. रमाबाईंची तीव्र इच्छा होती. यासाठी ख्रिश्चन जगताला त्या आवाहन करीत होत्या. सन १८९८ मध्ये पं. रमाबाई लंडनमधील केस्वीक धर्मपरिषदेला उपस्थित राहिल्या होत्या. त्यावेळी "जवळजवळ ४००० ख्रिस्त लोक तेथे एकत्र जमून, देवाविषयी सखोल शोध करीत होते. त्यावेळी भारतातील सर्व ख्रिस्ती लोकांवर पवित्र आत्म्याने वर्षाव करावा अशी तेथे उपस्थित असलेल्या लोकांना मी विनंती करावी अशी प्रेरणा मला प्राप्त झाली."[१६८] असे त्या नमूद करतात.

धर्मसंजीवनाच्या मुद्द्यावर पं. रमाबाईवर टीका केली जाते. भारतामध्ये ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी अनुकूल स्थिती प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी धर्मसंजीवनाचा आग्रह धरला असे सांगितले जाते. धर्म संजीवन संदर्भातील तत्कालीन नोंदीवरुन त्यांचा असा मर्यादीत हेतू असल्याचे स्पष्ट होत नाही. धर्मसंजीवनच्या बाबतीत पं. रमाबाईंची मानसिकता आध्यात्मिक प्रेरणेने प्रभावित असलेली दिसून येते. त्या पूर्णपणे ख्रिस्ताला शरण गेल्या होत्या. कोणतीही आध्यात्मिक व्यक्ती त्याने धारण केलेल्या धर्मातील सात्विक आनंद मिळविण्याचा प्रयत्न करते. धर्मनिष्ठेला शरण गेलेली व्यक्ती आध्यात्मिक अत्युच्च परमानंद प्राप्त करण्याची इच्छा बाळगते. अशी इच्छा बाळगणे त्या व्यक्तीची धार्मिक गरज असते. पं. रमाबाई ख्रिस्ती धर्मातील अत्युच्च परमानंद प्राप्तीची इच्छा धरताना दिसतात. त्यांची ही इच्छा धर्मसंजीवनातून पूर्ण होणार होती. देवाचे प्रत्यक्ष अस्तित्व सिध्द करण्यासाठी धर्म संजीवन प्राप्त करण्याची त्यांची इच्छा नैसर्गिक होती.

पं. रमाबाईंना मुक्ति मिशनमधील मुलींमध्ये परिवर्तन अपेक्षित होते. धर्मसंजीवनामागे हेच कारण होते. धर्मसंजीवनाचा हेतू स्पष्ट करताना पं. रमाबाई म्हणतात की, "What is to be noted, is that the aim and consequence of this revival was in the first place and

chiefly the abandonment of evil practices and the experience of joy in the devine love and the divine forgiveness"[१६९]

सन १९०४ पर्यंत मुक्ति मिशनमधील ख्रिस्ती धर्म स्विकारणाऱ्या मुलींची संख्या १५०० होती. ख्रिस्ती धर्मांतरानंतरही त्यांच्यात असंस्कृतपणा मोठ्या प्रमाणावर होता. मुलींच्या वागण्यात नैतिकता यावी अशी पं. रमाबाईंची इच्छा होती. मुलींमध्ये होणाऱ्या सकारात्मक परिवर्तनाला पं. रमाबाई पवित्र आत्म्याचे कार्य संबोधतात. बाप्तिस्मा घेतलेल्या मुलींमध्ये पवित्र आत्म्याचे कार्य दिसून येत नव्हते. त्यासाठी त्या प्रार्थनेचा अवलंब करीत होत्या. पं. रमाबाई धर्म संजीवनाच्या आवश्यकतेविषयी म्हणतात की, "पुष्कळच गोष्टीत बदल होण्याची जरुरी होती. नीचवृत्तीची जागा पावित्र्याने घ्यायला हवी होती. खोटेपणा व फसवेगिरी जावून तथे सच्चेपणा व स्वाभिमान त्यांची स्थापना व्हायला हवी होती. घुमेपणा व उदासिनता जाऊन ती जागा आनंदी वृत्तीने भरुन काढायला हवी होती. पुष्कळशा मुली दास्यातून बाहेर पडलेल्या होत्या. पदतली तुडविल्या गेलेल्या व अवनत स्थितीस पोहोचलेल्या वर्गातून त्या आलेल्या असल्याने त्यांच्या अंगी मुरलेल्या दास्योद्‌भव दुर्गूणांची पाळेमुळे खणून काढण्याचे काम सोपे नव्हते. ही जात प्रार्थनेवाचून दुसरी कशानेही निघत नाही."[१७०] अशाप्रकारे धर्मसंजीवनाद्वारे मुलींमधील वाईट सवयींचा नायनाट करावयाचा होता. असंस्कृत मुलींमध्ये सुसंस्कृत करण्यासाठी धर्मसंजीवनाची गरज होती असे पं. रमाबाईंचे मत होते.

मुक्ति मिशनमधील धर्म संजीवनाची माहिती देताना मिस हेलर डायर लिहितात की, "The news of the revival in wales brought much gladness to Ramabai. In January 1905, she told her pupils about it, called for volunteers to meet with her daily for special prayer for revival in India. Seventy come forward and from time to time others joined. In June five hundred and fifty were meeting twaice daily in this praying band."[१७१] धर्मसंजीवनासाठी पं. रमाबाईंनी प्रार्थना गट तयार केले होते. हे गट पवित्र आत्म्याची कृपा व्हावी म्हणून रात्रंदिवस प्रार्थना करीत होते. या प्रार्थनेचे फलित म्हणजे "२९ जून १९०५ रोजी मुक्ति मिशनमध्ये पवित्र आत्म्याद्वारे संजीवन अवतरले."[१७२]

धर्मसंजीवनाच्या प्रत्यक्ष स्थितीविषयी टिळक दे. ना. लिहितात की, "जून महिन्याच्या २९ तारखेस मोठ्या पहाटे ३।। वाजता या तीस मुलींपैकी जमनाबाई भानू

(केशर आक्का) नावाच्या एका मुलीवर पवित्र आत्मा ओतला गेला. असे जेव्हा झाले तेव्हा तिच्या शेजारी निजलेली बाई जागी झाली आणि आपली शेजारीण अग्नीने आच्छादलेली पाहून पोहराभर पाणी आणण्यासाठी धावली. तिजवर पाणी ओतणार इतक्यात तिच्या पाहण्यात आले की, जमनाबाई भानू तिच्या अंगास आग लागलेली नाही. या गोष्टीस एक तास झाला नाही तो आसपासच्या सर्व तरुण बाया त्या ठिकाणी गोळा झाल्या व मोठमोठ्याने रडून प्रार्थना करु लागल्या व देवाजवळ आपली पापे कबूल करु लागल्या. नुकताच पवित्र आत्मा प्राप्त झालेली मुलगी सर्वांच्या मध्यभागी बसलेली होती व देवाने आपणासाठी काय केले आहे हे ती इतरांस सांगत होती."[१७३]

धर्मसंजीवनाच्या सोहळ्यात मुली आध्यात्म्याच्या अत्युच्च पातळीवर पोहचत होत्या. या धर्म संजीवनाचे तीन अनुभव महत्वाचे होते. १) अन्यभाषांतून बोलणे २) अग्नीचे प्रगटीकरणाचा भास ३) पापांगिकार. या तीन अनुभवांविषयी शास्त्रीय खुलासा करता येणार नाही. हिंदू धर्मांतील देव अंगात येणे यासारखा काहीसा हा प्रकार होता. ही पूर्णत: आध्यात्मिक प्रक्रिया असल्याने त्याचा कार्यकारण भाव स्पष्ट करणे शक्य नाही. या धर्म संजीवनीविषयी स्वत: पं. रमाबाई म्हणतात, "पवित्र आत्मा प्राप्त झाल्याची खूण म्हणजे परिपूर्ण प्रेमाची अनुभूती, मात्र रोग निवारण्याची शक्ती भविष्यकथनाची शक्ती किंवा अन्य भाषांमध्ये बोलण्याची शक्ती ह्या पवित्र आत्मा मिळाल्याच्या खूणा नाहीत असे निश्चितपणे म्हणता यावयाचे नाही."[१७४]

यावरुन पं. रमाबाई संजीवनाने मुलींमध्ये झालेले बदल पवित्र आत्म्याची कृपा असल्याचे कबूल करतात. पं. रमाबाईंनी संजीवन अनुभव स्वत: घेतला नव्हता. मुलींना येणारे अनुभव तटस्थपणे अनुभवत होत्या. हिंदू धर्मातील कर्मकांडाचे चिकित्सक विश्लेषण त्यांनी केले होते. मात्र या धर्म सोहळ्याविषयी त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली होती. मुलींचे आभासी अग्नीदाह झाल्यामुळे ओरडणे, विव्हळणे हे पवित्र आत्म्याच्या प्रभाव असल्याचे मान्य करतात. पं. रमाबाई धर्मनिष्ठा व धर्मचिकित्सा यातील तफावत मान्य करताना दिसत नाहीत. धर्म संजीवनाच्या आध्यात्मिक प्रक्रियेमध्ये त्या धर्मचिकित्सेची सुप्त शक्ती हरवून गेल्या होत्या असे दिसते. धर्म संजीवनाचा कार्यकारणभाव त्या शोधीत नव्हत्या. धर्म संजीवनातून प्राप्त झालेली उपलब्धी त्यांना महत्त्वाची वाटत होती. त्यांना हजारो असंस्कृत मुलींमध्ये सामाजिक व धार्मिक अधिष्ठान प्राप्त करुन द्यायचे होते. मुक्ति मिशनमध्ये एक सुसंस्कृत समाज उभा करावयाचा

होता. त्यासाठी हजारो मुलींवर वैयक्तिक संस्कार करणे शक्य नव्हते. आध्यात्मिक संस्कारातून कमी वेळेत सामूहिक संस्कार घडवून आणणे सोपे होते. त्यामुळेच पं. रमाबाई धर्मसंजीवनातून प्रकट झालेल्या पवित्र आत्म्याचे अस्तित्व मान्य करतात.

मुक्ति मिशनमधील धर्म संजीवनाचे पुढील परिणाम झाले होते.

१) मुक्ति मिशनमधील धर्म संजीवनाचा पं. रमाबाईंच्या दृष्टीने चांगला परिणाम झाला तो म्हणजे "मुली आपापल्या चुका, गुन्हे, लबाड्या कबूल करु लागल्या. भिन्न पातळीवरच्या मुली एका नैतिक पातळीवर येऊ लागल्या."[१७५] मुलींवर चांगले संस्कार झाले. दुर्वर्तनापासून लांब राहू लागल्या.

२) धर्म संजीवनानंतरच खऱ्या ख्रिस्ताचे अस्तित्व जाणवू लागले. त्यानंतर त्या पूर्णपणे येशू ख्रिस्तावर अवलंबून राहू लागल्या. प्रार्थनेमुळे आजार बरे होतात. पं. रमाबाईंच्या बुद्धीवादाची जागा ख्रिस्त निष्ठेने घेतली. पं. रमाबाईंचा एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून पूर्ण विकास घडून येण्यासाठी धर्मसंजीवन कारणीभूत ठरले.

३) धर्म संजीवनामुळे पं. रमाबाईंचे मिशनरीपण प्रकट झाले. अशी टीका केली गेली. या चळवळीला आध्यात्मिक न मानता अंधश्रध्दा म्हणून पाहिले गेले. या संदर्भात सरोजिनी वैद्य लिहितात की, "अंधश्रध्देकडे झुकत चाललेल्या आपल्या मनोवृत्तीचे वाटेकरी त्यांनी मुलींनाही करुन घेतले आणि बाईमध्ये व इतर कट्टर मिशनऱ्यांमध्ये जाणवावे एवढे वेगळेपण राहिलेच नाही."[१७६]

वरील टीका धर्मभेदाच्या भावनेतून केलेली होती. हिंदू धर्मामध्येही ईश्वराचे प्रकटीकरण स्विकारले आहे. संतांची आध्यात्मिक चळवळ भक्ती चळवळ म्हणून ओळखली जाते. अंधश्रद्धांना पुष्टी देणारे अनेक दाखले संत कथांमध्ये आढळतात. खरं तर संतांनी दिलेली शिकवण पं. रमाबाई प्रत्यक्ष कृतीमध्ये आणत होत्या. जोत्स्ना देवधर याबद्धल लिहितात की,"पंडिता रमाबाईंनी हे सगळं धर्मरिवर्तन न करता केले असते तर पुण्यश्लोक अहिल्याबाईंच्या पंक्तीला जाऊन बसल्या असत्या."[१७७]

मुक्ति मिशनमधील धर्म संजीवन हा हिंदू भूमीवरील प्रयोग होता. त्यामुळे या धर्म संजीवनाची चिकित्सा हिंदू धर्माच्या प्रभावाखाली राहून केली होती. या घटनेकडे तटस्थपणे पाहिले नाही. कोणत्याही धर्मातील आध्यात्मिक घटनांची शास्त्रीय चिकित्सा

करता येत नाही. या घटनांमागील कार्यकारण भाव शोधण्याचा प्रयत्न केल्यास त्या घटनेच्या मर्यादा स्पष्ट होतात. एका विशिष्ट धर्माच्या प्रभावाखाली राहून दुसऱ्या धर्मातील आध्यात्मिक चळवळीची केलेली चिकित्सा व्यक्तिनिष्ठ असते. त्यामुळे धर्म संजीवनाच्या संदर्भातील टीकेकडे याच दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे.

४) मुक्ति मिशनमधील धर्म संजीवन चळवळीचा प्रभाव (Waves) सुमारे दीड ते दोन वर्षे होता. धर्म संजीवनाआधी मुक्ति मिशनचे स्वरुप अनाथालय वा स्त्री सुधार गृह असे होते. धर्म संजीवनामुळे येथील पावित्र्य वाढले. मुक्ति मिशनला तीर्थक्षेत्राचे स्वरुप प्राप्त झाले. मुक्ति मिशनचे कार्य केडगावच्या सीमा ओलांडून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले. या संदर्भात मुक्ति मिशनच्या शताब्दी अंकात लिहिले आहे की, "Revival broke out in number of the institutions and orphanges – Korku Mission, the friends mission at Hoshangabad. The Alliance mission and several methodist and Presbyterian instituions. The revival also spread when the student in a school in Japan heard the story of mukti."[१७८]

धर्म संजीवनामुळे मुक्ति मिशन ख्रिस्ती समाजाचे श्रद्धास्थान बनले. यापूर्वी मुक्ति मिशनला स्त्री सुधारणा कार्यासाठी मदत मिळत होती. धर्म संजीवनामुळे धार्मिक कार्यासाठी मदत सुरु झाली. स्वयंसेवी ख्रिस्ती समाज मुक्ति मिशनकडे आकर्षित झाला. देशविदेशातील ख्रिस्ती मिशनरी येथे वास्तव्यासाठी आले. पं. रमाबाईंच्या सामाजिक कार्याला धार्मिक अधिष्ठान प्राप्त झाले.

## ५.७ मुक्ति मिशनचे कार्य :

### ५.७.१ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनचे कार्य (सन १९२३ ते सन १९८९) :

पं. रमाबाईंचा मृत्यू ५ एप्रिल १९२२ रोजी झाला. त्यांच्या मृत्यूनंतरही मुक्ति मिशनचे सेवाकार्य अखंडीतपणे सुरु आहे. भारतामध्ये स्त्री शिक्षणाची सुरुवात महात्मा जोतिराव फुलेंनी केली. त्यांनी मुलींसाठी शाळा सुरु केल्या. "एवढ्या जोमाने सुरु केलेल्या फुल्यांच्या शाळा पुढे मात्र काही काळाने बंद पडल्या."[१७९] पं. रमाबाईंनी संस्थात्मक पातळीवर सुरु केलेले कार्य आजही सुरु आहे. ही बाब विशेष नोंद घेण्याजोगी आहे. मुक्ति मिशनने स्त्री सुधारणेचे कार्य

वारसा हक्काने सुरु ठेवले. पं. रमाबाईंच्या अनेक चरित्रकारांनी त्यांच्या मृत्यूपर्यंतच्या कार्याचे लेखन केले आहे. सन १९२३ नंतरच्या मुक्ति मिशनच्या कार्याविषयी लेखन झाले नाही. प्रस्तुत प्रकरणाच्या उत्तरार्धात सन १९२३ ते सन १९८९ या काळातील मुक्ति मिशनच्या कार्याचा अभ्यास केला आहे.

पं. रमाबाईंनी स्त्री उद्धाराचे स्फुल्लिंग आपल्या अनुयायांमध्ये निर्माण केले. या संदर्भात क्लेमेंटिना बटलर लिहितात, "This little woman is creating a class of women in India every blessed in the education of child – widow"[१८०] अशा प्रकारे पं. रमाबाईंनी स्त्री सुधारणा कार्यासाठी स्त्री वर्ग तयार केला. "जनरल आर्मस्ट्राँग यांनी पं. रमाबाईंच्या कामाची तुलना अमेरिकेतील हॅम्पटन इन्स्टिट्युटशी केली आहे."[१८१] हॅम्पटन इन्ट्टिट्यूट ही अमेरिकेतील संस्था आहे. ती काळ्या लोकांच्या उद्धारासाठी काम करते. मिस हॅम्पटन यांनी काळ्या लोकांच्या उद्धारात रस घेणारा वर्ग तयार केला. त्यामुळे त्यांचे कार्य दीर्घकाळ सुरु राहिले. पं. रमाबाईंनी विधवांच्या शिक्षणात रस घेणारा एक वर्ग तयार केला. या वर्गाने मुक्ति मिशनची धुरा दीर्घकाळ सांभाळली. त्यामुळेच आपल्या मृत्यूनंतरही दीर्घकाळ आपल्या कार्याचा प्रभाव निर्माण करणाऱ्या मोजक्या व्यक्तींमध्ये पं. रमाबाईंची गणना होऊ शकेल. म्हणूनच "डॉ. एडवर्ड हॉल यांनी पं. रमाबाईंची तुलना धर्म सुधारणा करणाऱ्या मार्टिन ल्युथर किंगशी केली आहे. तर प्रो. मॅक्समुल्लर यांनी पं. रमाबाईंचा उल्लेख समाजसुधारक राम मोहन रॉय, केशवचंद्र सेन, निलकांत टागोर यांच्या रांगेतील सुधारक असा केला आहे."[१८२] डॉ. रॉबर्ट इ. फ्रायकेनबर्ग हे अमेरिकेतील ब्लु आय संस्थेचे संचालक होते. ते पं. रमाबाईंच्या कार्याविषयी लिहितात, "त्यांचा दर्जा महात्मा गांधीबरोबर गणला जाऊ शकला असता. त्यांच्यासारखे त्यांनासुध्दा महात्मा किंवा महान आत्मा म्हणून संबोधले जाऊ शकते."[१८३]

समाज सुधारकांचे विचार त्यांच्या अनुयायांकडून प्रत्यक्ष कृतीमध्ये येताना फारसे दिसत नाहीत. या पार्श्वभूमीवर पं. रमाबाईंच्या पश्चात त्यांचा विचार प्रत्यक्ष कृतीमध्ये मुक्ति मिशनने आणला ही बाब विशेष महत्वाची आहे. "परस्पर विरोधी आणि टोकाच्या दृष्टिकोनातून पंडिता रमाबाईंकडे पाहण्याचा परिपाठ त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन करतानाही कायम राहिला."[१८४] मुक्ति मिशनकडे एक ख्रिस्ती संस्था म्हणून पाहिले गेले.

मुक्ति मिशन सन १९२३ ते सन १९८९ या काळातील कार्याचा अभ्यास करताना या संस्थेच्या विविध विभागांच्या कार्याची माहिती घेतली आहे. सन १९८९ हे मुक्ति मिशनचे शताब्दी वर्ष होते. या दीर्घ काळात "जीवने वाचविण्याचे, त्यांना उभारी देण्याचे, त्यांची पुनर्स्थापना व पुनर्नवीकरण करण्याचे गौरवी कार्य चालूच राहिले."[१८५] अनाथ मुली व स्त्रियांच्या जीवनाला आकार देण्याचे कार्य सुरु राहिले.

### ५.७.२ मुक्ति मिशनचा नामविस्तार :

जूलै १९२२ मध्ये मुक्ति मिशनच्या नावामध्ये बदल केला. या नाम बदलाला द अमेरिकन रमाबाई असोशिएशनच्या १० मे १९२३ च्या वार्षिक सभेमध्ये मान्यता देण्यात आली. या संदर्भात अधिक्षिका मिस लिसा हेस्टी लिहितात की, "The committee here decided that it would be good to revise the name of the mission and hence forth call it 'The Ramabai Mukti Mission"[१८६] मुक्ति मिशनच्या नावामध्ये सन १९७० मध्ये दुसऱ्यांदा बदल केला होता. "रमाबाई मुक्ति मिशनला पंडिता रमाबाई मुक्ति मिशन असे नाव देण्यात आले."[१८७]

वरील नाम बदलावरुन दिसून येते की, पंडिता रमाबाईंचे नाव मुक्ति मिशनच्या नावाशी जोडले होते. खरं तर ह्याला नाम बदल म्हणता येणार नाही. मुक्ति मिशनचा हा नामविस्तार होता. "पं. रमाबाईंची स्मृती जतन करण्याची इच्छा नाही आणि त्यांनी विस्मृतीतही ढकलता येत नाही. अशी द्विधा मन:स्थिती महाराष्ट्रीयन समाजाची दिसते."[१८८] या पार्श्वभूमीवर त्यांच्या अनुयायांनी मुक्ति मिशनला पं. रमाबाईंचे नाव देऊन त्यांच्यावरील ऋण व्यक्त केले. या नामविस्तारामुळेच मुक्ति मिशनने पं. रमाबाईंच्या नावापासून फारकत घेतली नाही.तसेच ते समाजाच्या विस्मृतीत जाऊ दिले नाही.

### ५.७.३ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनची कायदेशीर नोंदणी :

भारताच्या स्वातंत्र्यानंतर संस्था नोंदणी अधिनियम अस्तित्वात आला. त्यानुसार "रमाबाई मुक्ति मिशन या नावाने या संस्थेची नोंदणी सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट१९५० अन्वये प्रथम करण्यात आली."[१८९] ही नोंदणी पूर्वलक्षी प्रभावानुसार करण्यात आली. हा अधिनियम अस्तित्वात येण्याअगोदर रमाबाई मुक्ति मिशन स्थापन झाले होते. त्यामुळे रमाबाई मुक्ति मिशनची स्थापना ७ ऑगस्ट १९०६ पासून अधिग्रहीत मानण्यात आली.

"द बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये रमाबाई मुक्ति मिशनची नोंदणी १४ मे १९५३ रोजी करण्यात आली. सुरुवातीचा नोंदणी क्र. ई ८४ (E 84) असा होता. पंडिता रमाबाई मुक्ति मिशन या नामविस्तारानंतर २९ ऑक्टोबर १९७४ रोजी झालेल्या नोंदणीनुसार नोंदणी क्रमांक एफ. ७७६ (F 776) असा झाला."[१९०]

पंडिता रमाबाई मुक्ति मिशन स्त्रिया व बालकांच्या संगोपनाचे कार्य करीत होती. त्यानुसार संस्थेची नोंदणी स्त्रिया व बालकांची संस्था म्हणून करणे क्रमप्राप्त झाले. "The women's and children Institutions (Licencing) Act of 1956 नुसार ऑगस्ट १९५९ मध्ये नोंदणी करण्यात आली."[१९१] यामुळे स्त्रिया व बालकांसाठी कार्य करणारी संस्था म्हणून अधिकृत मान्यता मिळाली.

पंडिता रमाबाई मुक्ति मिशन नोंदणीकृत संस्था झाल्यामुळे पुढील फायदे झाले.

१) देणगीदारांच्या देणग्या आयकर कायदा ८० जी नुसार करमुक्त झाल्या. त्यामुळे देणगीदारांचा ओघ या संस्थेकडे वाढला.

२) या संस्थेच्या शैक्षणिक कार्याला मान्यता मिळाली.

३) या संस्थेच्या सामाजिक कार्याला कायदेशीर अधिष्ठान प्राप्त झाले.

४) या संस्थेच्या धार्मिक कार्याला संरक्षण प्राप्त झाले. ख्रिस्ती धर्माचरण, ख्रिस्ती धर्मानुकरण व ख्रिस्ती धर्म प्रसार इत्यादी बाबींसाठी घटनात्मक संरक्षण प्राप्त झाले.

५) अनाथ लेकरांचे संगोपन व अनाथ स्त्रियांचे सबलीकरण व दत्तकग्रहण या संवेदनशील बाबींविषयीची कायदेशीर मान्यता मिळाली.

६) या संस्थेला शासकीय मान्यता मिळाल्यामुळे सामाजिक विरोध कमी झाला.

## ५.८ **पंडिता रमाबाई मुक्ति मिशनमधील कुटूंब पध्दती** (Family life in Pandita Ramabai Mukti Mission):

संपूर्ण मुक्ति मिशन एक कुटूंब मानण्यात येते. येथील मुली व स्त्रियांची संख्या फार मोठी आहे. पं. रमाबाईंनी वयोगटानुसार गट पध्दतीचा अवलंब केला होता. सन १९२३ ते सन १९५५ पर्यंत याच पध्दतीचे अनुकरण केले जात आहे. सन १९५६ मध्ये अधिक्षिका मिस ग्लॉडी फ्लेचर यांनी वयोगट पध्दतीऐवजी कुटूंबपध्दती सुरु केली होती. या संदर्भात त्या लिहितात, "For long time it had been felt that the age group dormitory system

was not altogether satisfactory much prayer, thought the planning went into the changing over to the family group system"[१९२]

नवीन पध्दतीमध्ये विविध वयाच्या मुलींचा समावेश एकाच गटात करण्यात आला होता. एका कुटूंब गटात साधारणत: १५ मुलींचा समावेश केला होता. "तीन ते १८ वयोगटातील मुलींना फुलांची नावे असलेल्या कुटूंबात ठेवले होते."[१९३] कुटूंब गटातील लहान मुलींची जबाबदारी मोठ्या मुली घेत होत्या. या पध्दतीमुळे कुटूंब व्यवस्थेचा परिचय मुलींना झाला. कुटूंब गट पध्दतीमुळे लहान वयाच्या मुलींची काळजी मोठ्या मुली घेऊ लागल्या. त्यांच्यात परस्पर जबाबदारीची भावना निर्माण झाली. पं. रमाबाईंनी सुरु केलेली कुटूंबपध्दती बदलली मात्र त्यांच्या तत्त्वांशी फारकत घेतली नाही ही बाब विशेष उल्लेख करण्याजोगी आहे. या संदर्भात मिस. ग्लॉडी फ्लेचर लिहितात, "The pattern of family life may have undergone changes, through the years, but the principles which Ramabai held so strongly remain same"[१९४] नव्या कुटूंब पध्दतीत मुलींचे संगोपन करणे, शालेय शिक्षण देणे, व्यावसायिक कौशल्य शिकविणे इत्यादी गोष्टी पूर्वीप्रमाणेच सुरु होत्या.

२६ ऑक्टोबर १९५६ रोजी १२ कुटूंबगटाची घोषणा करण्यात आली. प्रत्येक कुटूंब गटाला फुलांची नावे देण्यात आली. प्रत्येक कुटूंबगटासाठी पालक म्हणून जेष्ठ स्त्रीची नेमणूक केली होती. तिच्या मदतीला अधिसेविका नियुक्त केल्या होत्या. पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या सन १९५६ मधील कुटूंब गटांविषयी पुढील माहिती दिली आहे.

| अ.क्र. | कुटूंब गटाचे नाव | पालक स्त्रीचे नाव |
|---|---|---|
| १ | इव्हर लास्टींग (Everlasting) | मिस ज. हॉरेल |
| २ | फ्रॅन्गीपनी (Frangipanni) | मिस एम्. विल्यम |
| ३ | जास्वंद (Hibiscus) | मिस आर. बॉलमन |
| ४ | जस्मीन (Jasmine) | मिस जे. कॅलन |
| ५ | निशिगंधा (Lily) | मिस ई. रोहरेर |
| ६ | कमळ (Lotus) | मिस सी. हेरी |
| ७ | ऑर्किड (Orchid) | मिस व्ही. डोंगरे |
| ८ | रातराणी (Queen of Night) | मिस के. देशपांडे |
| ९ | गुलाब (Rose) | मिस बी. हरिश्चंद्रा |
| १० | रॉयल फॉन्सीएना (Royal Poinciana) | मिस व्ही. निकोल्मन |
| ११ | आकाश फूल (Sky Flower) | सि जे. मॅक ग्रेगर |
| १२ | सूर्यफूल (Sun Flower) | मिस जी. फ्लेचर |

**वरील कुटूंबगटामध्ये वर्षनिहाय खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली.**

| अ.क्र. | कुटूंब गटाचे नाव | वर्ष | पालक स्त्रीचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मॉर्निंग ग्लोरी | १९५७ | मिस ए. मोकॅटा |
| २ | हनि सकल | १९५८ | मिस एल्. डॉर्कसेन |
| ३ | कॉरल फ्लावर | १९६० | मिस आर. गद्रे |
| ४ | मॅग्नोलिया | १९६१ | मिस एस्. वर्गीस |
| ५ | बॉगनव्हिलिया (अंध मुली) | १९६१ | मिस ए. सिमेन्स |
| ६ | पॉन्सेटिया (मंदबुध्दी मुली) | १९६४ | मिस एच. जॉन्स्टोन |
| ७ | व्हायलेट (शारीरिकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या अपंग मुली) | १९८७ | |
| ८ | सूर्योदय (Arun Prabha) | १९८६ | |

Source : Centonary Edition, Annual Report of Prayer Bell (1889-1989)

प्रत्येक कुटूंब गटाला फुलांची नावे देऊन मुलींचा संबंध निसर्गतत्त्वांशी जोडण्याचा प्रयत्न केला होता. कुटूंब गटाची काळजी घेण्यासाठी पालक म्हणून काही परदेशी स्त्रियांची नेमणूक केली होती. त्यांनी येथील अनाथ मुलींची काळजी घेण्याचे काम सेवाभावी वृत्तीने केले होते.

पं. रमाबाई मुक्ति मिशनमध्ये दाखल होणाऱ्या मुली अनाथ असत. या मुलींच्या पार्श्वभूमीविषयी शताब्दी अंकात लिहिले आहे की, "Most of these children are eighter orphans or have one parents only and several though 10 of 11 years of age had never attended school or known the name of Jesus"[१९५] अशा वातावरणातील मुलींची शैक्षणिक प्रगती करणे अवघड होते. त्यांच्यासाठी उपचारात्मक अध्यापनाचे ज्यादा वर्ग चालविले जात होते. मुंबईच्या रस्त्यांवरील अनेक निराधार मुलींना येथे आश्रय मिळाला होता. अशा मुलींवर कुटूंबगट पध्दतीमुळे संस्कार करणे शक्य झाले.

कुटूंबगटामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन केले जात होते. या संदर्भात मार्गारिट विल्यम लिहितात की, "The Jasmine family won both prizes in the House and Garden compititions"[१९६] यावरुन कुटूंबगटांना त्यांच्या निवासाचा परिसर, बागबगीचा नीटनेटका ठेवण्यास प्रोत्साहन मिळत होते. कुटूंबगटातील मुलींसाठी सहलींद्वारे बाह्य परिसराची ओळख करुन दिली जात होती. "सन १८९८ मध्ये चार कुटूंब गट मालाड बीच, महाबळेश्वर, काली व हैद्राबाद या ठिकाणी सहलींसाठी गेले होते."[१९७] मुलींच्या सहलीचा संपूर्ण खर्च या संस्थेद्वारे केला जात होता.

अशा प्रकारे पंडिता रमाबाई मुक्ति मिशनमधील कुटूंबगट पध्दतीची रचना व स्वरुप होते. या पध्दतीमुळे व्यवस्थापन करणे सुलभ झाले. मुलींच्या गरजांची पूर्ती करणे सुलभ झाले. या संस्थेमध्ये "स्त्रिया व मुली निराश परिस्थितीतून नवऱ्यांनी त्यागलेल्या अवस्थेत किंवा मुलांकडून उपेक्षिलेल्या स्थितीतून येतात"[१९८] असे अधिक्षिका वेणू इंगळे म्हणतात. त्यातील काही जणींना क्षमतेप्रमाणे कामधंदा देण्यात येतो. कुटूंबगटात अशक्त व दुबळ्या जणींची काळजी घेतली जाते.

## ५.९ कृपासदन :

पं. रमाबाईंच्या मृत्यूनंतरही कृपासदन हा विभाग कायम राहिला आहे. या विभागातील स्त्रियांच्या स्थितीविषयी क्लेमेंटिना बटलर लिहितात की, "We have about to imbeciles and weak minded women. Some of them really get quite mad at time and we have tried to get one or two into the Lunatic Asylum"[१९९] या विभागात दाखल झालेल्या स्त्रिया पतीत होत्या. त्यातील काही कुमारीका माता होत्या. अशा स्त्रियांना आधार देण्याचे कार्य येथे होत होते. या विभागातील स्त्रियांविषयी केलेल्या कार्याविषयी क्लेमेंटिना बटलर लिहितात, "They have gone out to make a new start with new vision and a new out look on life"[२००] कृपासदनातील स्त्रियांच्या गतकालीन जीवनाचा विसर पडावा म्हणून त्यांना विविध कामात गुंतविले जात होते. त्यांच्या जीवनाची नव्याने सुरुवात केली जाते.

पं. रमाबाई मुक्ति मिशनच्या सामाजिक कार्यकर्त्या कुमारी सरोज बारसे होत्या. त्यांनी कृपासदनातील एका अविवाहित मातेची माहिती पुढील प्रमाणे दिली आहे. "रेणुका (नाव बदलले आहे) ह्या तरुण स्त्रिला एका तरुणाने जबरस्तीने शारीरिक संबंध करण्यास प्रवृत्त केले होते. त्यातून ती गरोदर राहिली. तिच्या कुटूबांनी वा नातेवाईकांनी तिला मदत किंवा सहकार्य केले नाही. अखेर ती मुक्ति मिशनमध्ये दाखल झाली. त्यावेळी ती पाच महिन्यांची गरोदर होती. मुक्ति मिशनच्या कर्मचाऱ्यांनी तिचे समुपदेशन केले. तिच्यात धैर्याने भविष्याला तोंड देण्याचा विश्वास दिला. रेणुका आता एका मुलीची माता आहे."[२००अ]

कृपासदनातील अविवाहीत मातांपैकी रेणुका हे केवळ एक उदाहरण आहे. समाजाने नाकारलेल्या स्त्रियांना स्विकारणे, त्यांची काळजी घेणे आणि त्यांची जीवने बदलून त्यांना सबल

करणे हे कार्य कृपासदनात चालते."भारतीय समाजाने तुच्छ लेखलेल्या आणि धिक्कारलेल्या अविवाहीत मातांना आत्महत्या करुन आपला जीवनाचा अंत करावासा वाटला याच्या अनेक साक्षी या विभागातील स्त्रिया देतात."[२०१]

"सन १९२५ ते सन १९६० या काळात कृपासदनाची जबाबदारी मिस एलिझाबेथ मॉरीस यांनी सांभाळली. सन १९६१ ते सन १९८१ या काळात मिस बेटी ग्रे यांनी कृपासदनातील स्त्रियांची सेवा केली."[२०२] या दोघेही परदेशी मिशनरी महिला होत्या. त्यांनी अनुक्रमे ३५ वर्षे व २० वर्षे पतीत स्त्रियांसाठी काम केले. या दोघींनी निंद्य ठरलेल्या स्त्रियांच्या उद्धारासाठी आयुष्य समर्पित केले.

मुक्ति मिशनमधील समाजसेविका सुलभा चांदेकर कृपासदनाच्या यशस्वीतेविषयी लिहितात की, "In the last 25 years, the home of Mercy has continued to be a refuge for many but for a temparary period most young women have been accepted back into their families"[२०३] यावरुन स्त्रियांना जगण्याचा आधार व अधिकार मिळवून देण्याचे कार्य कृपासदनात होते असे दिसते.

कृपासदनाशी संबंधीत जुलै १९८८ ते जून १९८९ या कालावधीतील सांख्यिकीय माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे.

१) पुणे येथील समाजकल्याण संस्थांमार्फत दाखल करण्यात आलेल्या अविवाहीत मातांची संख्या ८ होती.

२) स्वत:हून दाखल झालेल्या अविवाहीत मातांची संख्या ७ होती.

३) अविवाहीत मातांनी ५ बालकांचा ताबा मुक्ति मिशनला दिला.

४) मुक्ति मिशनमधील २ विवाहीत माता प्रसुतिसाठी दाखल झाल्या.

५) आपल्या मुलांसह ४ माता तात्पुरती मदत घेण्यासाठी दाखल झाल्या.

६) ५ नवजात अर्भके कृपासदनमध्ये दाखल झाली. त्यांचा ताबा घेण्यासाठी कोणीही आले नाही. त्यातील दोन मुली मतिमंत होत्या.

७) २ बेवारस बालके दाखल करण्यात आली.

८) एका विधवा स्त्रीच्या वडीलांनी एक बालक गुप्तपणे दाखल केले.

९)	९ बालके दत्तक घेण्यात आली. त्यातील ७ मुलगे व २ मुली होत्या. त्यातील सर्वात लहान बाळ ३ महिन्यांचे होते व सर्वात मोठे बालक साडेपाच वर्षांचे होते.

(Source : Centonary Edition 1989. Page 14)

वरील सांख्यिकीय माहितीवरुन कृपासदनातील काम किती संवेदनशील होते हे लक्षात येते. अनौरस बालकांना सांभाळण्याचे कार्य कृपासदनमध्ये गेली शंभर वर्षे सुरु आहे. कृपासदनाचे हे कार्य निश्चितच मानवतावादी आहे.

## ५.१० पंडिता रमाबाई मुक्ति मिशनमधील शैक्षणिक विभाग :

पं. रमाबाईंनी सन १८८९ मध्ये शारदासदन ही शाळा सुरु केली होती. या शाळेला १२४ वर्षांची परंपरा व इतिहास आहे. या शाळेतून हजारो विद्यार्थीनी शिक्षण घेऊन स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा विकास केला आहे. पं. रमाबाईंच्या काळात सुरु केलेले शारदासदन, अंधशाळा, किंडरगार्टन हे शैक्षणिक विभाग आजही कार्यरत आहेत.

पं. रमाबाई मुक्ति मिशनमध्ये एकूण ५ शाळा आहेत. तसेच व्यवसायिक व संगणक प्रशिक्षण देणारी केंद्रे आहेत. ती शारदासदन प्राथमिक शाळा, मनोरमा स्मृति मुलींची माध्यमिक शाळा, मनोरमा स्मृति इंग्रजी माध्यमाची शाळा, अंध व अपंगासाठी शाळा, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, संगणक अकादमी, ऑनर्स अकादमी, पंडिता रमाबाई उच्चमाध्यमिक विद्यालय अशी आहेत.

शारदासदन ही खाजगी प्राथमिक शाळा आहे. या शाळेमध्ये इ. १ ली ते ४ थी पर्यंतचे मुलामुलींचे वर्ग सुरु आहेत. सन १९२९ पर्यंत या शाळेत माध्यमिक शिक्षणाचे वर्ग होते. सन १९२९ मध्ये माध्यमिकचे वर्ग बंद करण्यात आले. "सन १९२३ मध्ये शारदासदन शाळेमध्ये २७५ विद्यार्थी शिकत होते."[२०४] मुलामुलींचे स्वतंत्र वर्ग भरविले जात होते. शारदासदनमध्ये सुरुवातीला अध्यापनाचे कामकाज कृष्णाबाई गद्रे, मिस हेरी, मिस रिबेकाबाई आयपे यांनी केले. त्यांनी शारदासदनातील प्रशिक्षित मुलींना मदत केली होती.

शारदासदनातील मुली ज्ञानाच्या प्रसाराचे महत्त्वपूर्ण कार्य करीत होत्या. या संदर्भात मिस लिसा हेस्टी लिहितात, "We are very glad to have our Sharada Sadan girls go out to other places because it means that the light and knowledge they have

gained here is being diffused by them through this land of India and as a little leaven leaveneth the whole lamp. So in time light, truth and knowledge will be spread in many many places."[२०५]

शारदासदनातील प्रशिक्षित मुलींनी भारतातील वेगवेगळ्या भागात आश्रम काढले होते. "शेवंतीबाई निकंबे यांनी मुंबईस शाळा काढली व शोरत चक्रवर्ती ह्यांनी अलाहाबादेत आश्रम काढला."[२०६] शारदासदनाच्या शेकडो मुलींनी सेवाकार्याला वाहून घेतले. यावरुन स्त्री मुक्तीच्या चळवळीला पायाभूत असलेली स्त्री जागृती घडवून आणण्यात शारदासदनाचे कार्य उपयुक्त ठरलेले दिसते.

### ५.१०.१ शारदासदनाच्या मुख्याध्यापिकांचा तपशील:

| अ.क्र. | मुख्याध्यापिकेचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १ | पं. रमाबाई – संस्थापिका | सन १८८९ ते सन १९०० |
| २ | मनोरमाबाई मेधावी | सन १९०० ते सन १९२१ |
| ३ | कृष्णाबाई गद्रे | सन १९२२ ते सन १९२८ |
| ४ | रिबेकाबाई आयपे | सन १९२८ ते सन १९३० |
| ५ | कृष्णाबाई गद्रे | सन १९३१ ते सन १९३९ |
| ६ | भिमाबाई हरिश्चंद्र | सन १९३९ ते सन १९४० |
| ७ | मिस ई. शेवर | सन १९४० ते सन १९४२ |
| ८ | मिस एन फिलिप्स | सन १९४२ ते सन १९४७ |
| ९ | मिस जे. मॅक ग्रॅगर | सन १९४७ ते सन १९५२ |
| १० | मिस एल. डॉर्कसेन | सन १९५२ ते सन १९५६ |
| ११ | विमलाताई डोंगरे | सन १९५६ ते सन १९७१ |
| १२ | मिस एस. वर्गीस | सन १९७१ ते सन १९७५ |
| १३ | मिस व्ही. एल. रोमन | सन १९७६ ते सन १९९१ |
| १४ | श्रीम. के. भगत | सन १९९१ ते सन १९९६ |
| १५ | श्रीम. एल. केदारी | सन १९९६ ते सन २००६ |
| १६ | श्रीम. एम. एस. मनोहर | सन २००६ ते सन २००९ |
| १७ | श्रीम. एम. पावले | सन २००९ ते सन २०१३ |

(संदर्भ : शारदासदन शाळेने प्रसिध्द केलेला कालपट)

शारदासदन शाळा भारतातील जुन्या शाळांपैकी एक शाळा आहे. शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षामध्ये सलग कार्यरत असणारी ही भारतातील शाळा आहे. हे या शाळेचे

महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. १९ व्या, २० व्या व २१ व्या शतकाची शारदासदन साक्षीदार आहे. स्थापनेपासून या शाळेचे व्यवस्थापन स्त्री शिक्षकाकडेच आहे असे वैशिष्टे असणारी ती भारतातील एकमेव शाळा आहे. गेल्या १२४ वर्षामध्ये मुख्याध्यापिका पदावर स्त्रियांचीच नेमणूक केली होती. तसेच अध्यापनासाठी फक्त स्त्री शिक्षिकाच नियुक्त केल्या होत्या. ज्या काळामध्ये स्त्री शिक्षणाचा विचार समाजाने स्विकारला नव्हता त्या काळात या शाळेत स्त्री शिक्षणाचे कार्य फक्त स्त्रियांकडून चालविले जात होते ही बाब विशेष नोंद घेण्याजोगी आहे.

### ५.१०.२ विद्यार्थी संख्या :

शारदासदन शाळेमध्ये विद्यार्थी नोंदणी रजिस्टर (नमूना नं. १) उपलब्ध आहे. त्यामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नोंदी आहेत. या शाळेच्या सन १९१७ पासूनच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती उपलब्ध आहे. हे रजिस्टर जीर्ण झालेले असून हाताळण्या योग्य नाही.

**१) शारदासदन शाळेतील प्रवेशित विद्यार्थी संख्या :**

| अ.क्र. | कालावधी | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | १९१७ ते १९९० पर्यंत | ६८२१ |
| २ | १९९१ ते २००१ | १४११ |
| ३ | २००१ ते २००८ | १०८४ |

शारदासदनमध्ये सन २००८ अखेरपर्यंत ९३१६ विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण दिले आहे ही या शाळेची मोठी उपलब्धी आहे.

**२) मनोरमा स्मृती मुलींचे विद्यालय :**

| अ.क्र. | सन | विद्यार्थी संख्या | अ.क्र. | सन | विद्यार्थी संख्या | अ.क्र. | सन | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९६६–६७ | २५ | ११ | १९७६–७७ | १६७ | २१ | १९८६–८७ | २३६ |
| २ | १९६७–६८ | ६८ | १२ | १९७७–७८ | १७१ | २२ | १९८७–८८ | २४७ |
| ३ | १९६८–६९ | ९८ | १३ | १९७८–७९ | १५५ | २३ | १९८८–८९ | २२१ |
| ४ | १९६९–७० | १३२ | १४ | १९७९–८० | २६८ | २४ | १९८९–९० | २३० |
| ५ | १९७०–७१ | १३९ | १५ | १९८०–८१ | १६१ | २५ | १९९०–९१ | २७३ |
| ३ | १९७१–७२ | १७० | १६ | १९८१–८२ | १४७ | २६ | १९९१–९२ | २९९ |
| ७ | १९७२–७३ | २१५ | १७ | १९८२–८३ | १५१ | २७ | १९९२–९३ | ३०१ |
| ८ | १९७३–७४ | १४८ | १८ | १९८३–८४ | १७३ | २८ | १९९३–९४ | ३४० |
| ९ | १९७४–७५ | १८० | १९ | १९८४–८५ | २०९ | २९ | १९९४–९५ | ३५४ |
| १० | १९७५–७६ | १६२ | २० | १९८५–८६ | २१३ | ३० | १९९५–९६ | ३०९ |
| | | | | | | ३१ | १९९६–९७ | ३७५ |

मनोरमा स्मृती मुलींचे विद्यालयाने केडगाव परिसरातील व मुक्ति मिशनमधील अनाथ मुलींसाठी विद्यालयीन शिक्षणाची संधी उपलब्ध केली. मुलींच्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामध्ये शाळेने मोठी कामगिरी केलेली दिसून येते.

**३) मनोरमा स्मृती इंग्रजी माध्यमाची शाळा :**

| Sr.No. | Year | Girls | Boys | Total | Sr.No. | Year | Girls | Boys | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1993-94 | 12 | 15 | 27 | 12 | 2004-05 | 126 | 166 | 292 |
| 2 | 1994-95 | 15 | 20 | 35 | 13 | 2005-06 | 116 | 149 | 265 |
| 3 | 1995-96 | 18 | 30 | 48 | 14 | 2006-07 | 118 | 195 | 313 |
| 4 | 1996-97 | 16 | 40 | 56 | 15 | 2007-08 | 154 | 246 | 400 |
| 5 | 1997-98 | 16 | 45 | 61 | 16 | 2008-09 | 169 | 290 | 459 |
| 6 | 1998-99 | 40 | 58 | 98 | 17 | 2009-10 | 178 | 284 | 462 |
| 7 | 1999-00 | 47 | 65 | 112 | 18 | 2010-11 | 222 | 235 | 457 |
| 8 | 2000-01 | 52 | 59 | 111 | 19 | 2011-12 | 245 | 277 | 522 |
| 9 | 2001-02 | 56 | 79 | 135 | 20 | 2012-13 | 257 | 326 | 583 |
| 10 | 2002-03 | 78 | 147 | 225 | 21 | 2013-14 | 285 | 363 | 648 |
| 11 | 2003-04 | 108 | 120 | 228 | | Total | 2328 | 3209 | 5537 |

नव्वदच्या दशकापासून इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या मुलामुलींची संख्या वाढली, त्यामुळे मुक्ति मिशनने सन १९९३–९४ पासून मनोरमा स्मृती इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु केली. या शाळेतून सन २०१३–१४ पर्यंत ५५३७ विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण दिले आहे. एकूण विद्यार्थ्यांपैकी २३२५ मुलींना इंग्रजी शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली ही बाब उल्लेखनीय आहे. आज ह्या शाळेचा दर्जेदार शिक्षणाच्या बाबतीत विशेष नाव घेतले जाते.

वरील माहितीवरुन शारदासदनने व मुक्ति मिशनने हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे गौरवी कार्य केल्याचे दिसते. शारदासदन ही १९६६ पर्यंत मुलामुलींची शाळा इ. ७ वी पर्यंत होती. सन १९६६ मध्ये इ. ५ ते ७ वी पर्यंतचे वर्ग हायस्कूलला जोडण्यात आले. शारदासदनामध्ये मुलांना फक्त ४ थी पर्यंतच प्रवेश दिला जातो. पुढील इयत्तांसाठी मुलांना स्थानिक शाळेत जावे लागते.

सन १८९८ ते सन १९३८ या ४० वर्षांच्या कालावधीमध्ये शारदासदन शाळेचे वर्ग चर्चमध्ये व चर्चच्या व्हरांड्यामध्ये भरविले जात होते. “सन १९३८ मध्ये चर्चच्या पाठीमागील जागेत ४ दगडी वर्गखोल्या बांधल्या.”[२०७] तेव्हापासून शारदासदनचे नियमित वर्ग या इमारतीत सुरु आहेत.

शारदासदन शाळा सन १९३५ मध्ये अनुदानित झाली. या संदर्भात लिहिले आहे की, “First grant received from District school board Rs. 731/-”[२०८] सन १८८९ ते सन १९३५ या प्रदीर्घ काळात या शाळेला शासकीय अनुदान मिळाले नव्हते. सुरुवातीच्या ४६ वर्षामध्ये या शाळेला शासकीय मदत मिळाली नाही. एवढ्या प्रदीर्घ कालावधीमध्ये शासकीय मदतीविना शारदासदनचे कार्य यशस्वीपणे सुरु होते ही बाब विशेष महत्त्वाची आहे.

शारदासदन शाळेला शारीरिक शिक्षणासाठी खास अनुदान सन १९४९–५० मध्ये मिळाले. या अनुदान पत्रात लिहिले होते की, “I have the honour to say that the physical educaiton grant of Rs. 170/- is sanctioned to your school for the year 1949-50.”[२०९] या पत्रान्वये शासनाने क्रिडा विभागासाठी खास अनुदान मंजूर केले होते. महाराष्ट्र शासनाने शारदासदन शाळेला खाजगी अनुदानित शाळा म्हणून दर्जा दिला आहे. या शाळेला वेतन अनुदान जिल्हा परिषद, पुणे कडून मिळते.

## ५.११ दत्तक विभाग :

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनमध्ये दत्तक विभाग हा स्वतंत्र विभाग आहे. निराधार बालकांना कायदेशीर पालक मिळवून देण्याचे कार्य या विभागाकडून केले जाते. भारतामध्ये दत्तक देणे वा घेणे संदर्भात ब्रिटीशकाळापासून कायदे अस्तित्वात आहेत. त्यामध्ये Guardians and wards act (GWA) 1890 हा कायदा स्वातंत्र्यपूर्व काळातील आहे. स्वातंत्र्यानंतर Hindu Adoptions and Maintenance Act (HAMA) हा कायदा १९५६ साली अस्तित्वात आला. पंडिता रमाबाई मुक्ति मिशनला दत्तक घेणे व देणे या संदर्भातील कायदेशीर मान्यता सन १९७३ मध्ये मिळाली. या संदर्भात दत्तक विभागाच्या व्यवस्थापिका मिस हिथर जॉनस्टोन लिहितात, “In 1973 a new era began when our adoptions were legalised through the appropriate court.”[२१०] दत्तक घेणे व देणे या संदर्भात परवानगी मिळणेकामी मुक्ति मिशनने न्यायालयात याचिका दाखल केली होती.

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनमधील लेकरे भारतात व भारताबाहेर दत्तक दिली जातात. लेकरे दत्तक देताना अत्यंत काळजी घेतली जाते. पालकांची पार्श्वभूमी तपासून अधिकार मंडळ निर्णय घेते.

सन १९७३ ते सन १९८८ या कालावधीतील दत्तक दिलेल्या बालकांची संख्या

| अ.क्र. | कालावधी | भारत | भारताबाहेर |
|---|---|---|---|
| १ | १९७३ ते १९८२ | ४० | ११८ |
| २ | १९८३ ते १९८८ | ६८ | ०७ |
| | एकूण | १०८ | १२५ |

| Sr. No. | Year | Girls | Boys | Total |
|---|---|---|---|---|
| | | 7 | 4 | 11 |
| 2 | 1990 | 7 | 5 | 12 |
| 3 | 1991 | 7 | 3 | 10 |
| 4 | 1992 | 6 | 2 | 8 |
| 5 | 1993 | 9 | 6 | 15 |
| 6 | 1994 | 6 | 4 | 10 |
| 7 | 1995 | 2 | 3 | 5 |
| 8 | 1996 | 5 | 2 | 7 |
| 9 | 1997 | 4 | 1 | 5 |
| 10 | 1998 | | 3 | 3 |
| 11 | 1999 | 4 | 2 | 6 |
| 12 | 2000 | 2 | 3 | 5 |

| Sr. No. | Year | Girls | Boys | Total |
|---|---|---|---|---|
| 13 | 2001 | 2 | 2 | 4 |
| 14 | 2002 | 1 | | 1 |
| 15 | 2003 | 5 | 3 | 8 |
| 16 | 2004 | 4 | 1 | 5 |
| 17 | 2005 | 3 | 2 | 5 |
| 18 | 2006 | 2 | 2 | 4 |
| 19 | 2007 | | 3 | 3 |
| 20 | 2008 | 1 | 3 | 4 |
| 21 | 2009 | 3 | 2 | 5 |
| 22 | 2010 | 3 | 3 | 6 |
| 23 | 2011 | 3 | 3 | 6 |
| 24 | 2012 | 3 | 2 | 5 |

सन १९७३ ते सन १९८८ या १६ वर्षाच्या कालावधीत एकूण २३३ बालके दत्तक दिली होती. सन १९७३ ते १९८२ या दहा वर्षांच्या कलावधीमध्ये भारताबाहेर मोठ्या संख्येने बालके दत्तक दिली होती. वरील परदेशी पालकांना बालके दत्तक देताना विशेष काळजी घ्यावी लागते. परदेशी पालकांची विश्वासार्हता तपासण्यासाठी त्यांची परीक्षा घेतली जाते. त्यांचे नागरिकत्व, सामाजिक पार्श्वभूमी, संबंधित देशाच्या दत्तक विधानासंबंधी कायदे याचा बारकाईने अभ्यास केला जातो. त्यांच्या व्हिसा संबंधीच्या कायदेशीर बाबी तपासल्या जातात. पंडिता रमाबाई मुक्ति मिशनशी संबंधित आंतरराष्ट्रीय परिषदांच्या शिफारशींचा विचार केला जातो. मुक्ति मिशनचे बालक सुरक्षित हातात जावे यासाठी प्रार्थना केल्या जातात.

दत्तक दिलेल्या मुलींची संख्या मुलांच्या संख्येपेक्षा जास्त आहे. मिस हिथर जॉनस्टोन लिहितात, “In 1986, 15 children (6 boys and 9 girls) were taken by excited, greatful parents and In 1987, 19 children (5 boys and 14 girls) were taken.”[२११] येथील दत्तक विभागातर्फे मुली जास्त प्रमाणात दत्तक दिल्या जातात ही बाब विशेष आहे.

## ५.१२ वैद्यकिय सेवा विभाग(Medical Service Department)

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनमध्ये वैद्यकिय सेवा विभाग रुग्णांच्या सेवेमध्ये कार्यरत आहे. “आजुबाजूच्या गावकऱ्यांना मुक्ति मिशनच्या बाहेर वैद्यकिय सेवा पुरविण्यासाठी दवाखाना होता.”[२१२] सुरुवातीला पारंपरिक औषधांचा वापर केला जात होता. या संदर्भात मिस ग्लॉडी टिलेट लिहितात, “We use only simple remedies in to dispensary. Salt has been a great stand by. A baby’s terribly burnt arm was soaked in salt solution and in two weeks the shoulder to fingertips was covered with new skin.”[२१३]

यावरुन येथील दवाखान्यात उपचारासाठी साध्या व पारंपरिक पध्दतींचा वापर केला जात होता हे दिसून येते. सन १९४८ पर्यंत वैद्यकीय सेवा मुख्य इमारतीच्या व्हरांड्यात सुरु होती. व्हरांड्यातच चार तात्पुरत्या मोठ्या खोल्या तयार केल्या होत्या. तेथे रुग्णांवर उपचार केले जात होते. अशा व्यवस्थेमध्ये ५० वर्षे वैद्यकिय सेवा पुरविली जात होती. हे काम करणे अत्यंत अडचणीचे व गैरसोयीचे होते.

“सन १९४९ मध्ये नवीन कृष्णाबाई स्मृति इस्पितळ सुरु करण्यात आले”[२१४] या इस्पितळाला सन १९३३ ते सन १९५७ या काळात मार्गारेट हॉस्पीटलने मदत केली होती. या हॉस्पीटलचे तज्ञ डॉक्टरांचे पथक मुक्ति मिशनला नियमितपणे भेटी देत होते. या संदर्भात मुक्ति प्रेअरी बेलच्या १९८९ च्या अंकात लिहिले आहे की, “Dr. Greefield, Dr. Rankine, Dr. Chandekar who made weekly or twice – weekly visits”[२१५]

यावरुन असे दिसून येते की, ज्यावेळी केडगावसारख्या खेडेगावात वैद्यकीय सेवा अत्यंत प्राथमिक अवस्थेत होती, त्यावेळी मुक्ति मिशनमधील मुलींना तज्ञ परदेशी डॉक्टरांची सेवा उपलब्ध होत होती. ही सेवा परिसरातील रुग्णांनाही उपलब्ध होती. पंडिता रमाबाई मुक्ति मिशन ही मुली व स्त्रियांची वसाहत होती. येथील मुली व स्त्रियांवर उपचार करण्यासाठी स्त्री डॉक्टरांची गरज होती. “१९५७ च्या फेब्रुवारी महिन्यात डॉ. शिला गुप्ता यांनी कृष्णाबाई स्मृति इस्पितळात सेवा पत्करली. त्यांच्या सोबत मिस अँड्रीनी मोकाटा (फिजिओथेरपीस्ट) मुक्तिच्या सेवेत रुजू झाल्या.”[२१६]त्यांच्या नियुक्तीमुळे मुक्ति मिशनला निवासी स्त्री डॉक्टर मिळाल्या. १९६२ साली अमेरिकेतील बायोला कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी फिरत्या दवाखान्यासाठी गाडी

देणगी दिली. फिरत्या दवाखान्याची गाडी आसपासच्या खेड्यांमध्ये जाऊन रुग्णांवर उपचार करीत होती.

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनने मुक्तितील रहिवासी व परिसरातील रुग्णांना वैद्यकिय सेवा पुरविली होती. या मानवतेच्या कार्याद्वारे ख्रिस्ती धर्म प्रसाराचे प्रयत्न झालेले दिसतात. फिरत्या दवाखान्याबरोबर बायबल स्त्रिया खेड्यापाड्यामध्ये जात होत्या. द ख्रिश्चन ॲण्ड मिशनरी अलायन्सच्या १९२९ च्या वार्षिक अहवालामध्ये नमूद केले आहे की, "The dispensary has been an instrument also in spreading the Gospel. Every outside petient who comes gets a bit of the Gospel along with his treatment"[२१७]

यावरुन खेड्यातील रुग्णांवर उपचार करताना त्यांना ख्रिस्ती धर्मतत्त्वे शिकविली जात होती हे स्पष्ट होते. परिसरातील लोकांना पुरविलेली वैद्यकिय सेवा सुवार्ता प्रसाराचे साधन म्हणून अंमलात आणली जात होती. मात्र यामुळे खेड्यापाड्यातील लोकांना चांगली वैद्यकिय सेवा उपलब्ध झाली. मात्र परिसरातील लोकांनी या सर्व प्रसाराअंती ख्रिस्ती धर्म स्विकारला नाही हे वास्तव आहे.

"पंडिता रमाबाई मुक्ति मिशनमध्ये डॉ. बोगा यांनी १९७२ साली दातांचा दवाखाना सुरु केला"[२१८] सन १९७२ ते सन १९९९ या काळात केडगाव परिसरामध्ये हा एकमेव दाताचा दवाखाना होता. यावरुन दातांच्या उपचारासाठी दीर्घकाळ परिसरातील लोक मुक्ति मिशनच्या दवाखान्यावर अवलंबून होते. आज ह्या दातांच्या दवाखान्यात अत्याधुनिक सुविधा आहेत. डेंटल चेअर, एक्स–रे मशिन, कॉम्प्रेसर आणि इतर उपकरणे आहेत. येथे दंतविषयक आजारांसाठी आधुनिक पध्दतीने उपचार केले जातात.

कृष्णाबाई स्मृति इस्पितळामध्ये कायमस्वरुपी निवासी डॉक्टरांची नियुक्ती केली होती. डॉ. इला पाल ह्या ऑक्टोबर १९८५ पासून व डॉ. एन. निनान ऑगस्ट १९८९ पासून निवासी स्त्री डॉक्टर म्हणून मुक्ति मिशनला वैद्यकिय सुविधा देत आहेत.

कृष्णाबाई स्मृति इस्पितळामध्ये खालील तीन विभागात काम केले जाते.

१) पहिल्या विभागामध्ये मुक्ति मिशनमधील रुग्णांची व परिसरातील रुग्णांवर उपचार केले जातात. या विभागात ऑपरेशन थिएटर, लेबर वॉर्ड, प्रसुतिगृह तात्पुरत्या व कायम स्वरुपात रुग्णांना दाखल करण्यासाठी वॉर्ड आहेत.

२)  या इस्पितळात आवाराबाहेरील बाजूस छोटे चिकित्सालय आहे. तेथे स्थानिक लोकांवर उपचार केले जातात. या विभागामध्ये स्थानिक व परिसरातील महिलांसाठी प्रसुतिगृह चालविले जाते.

खालील तक्त्यामध्ये प्रसुत स्त्रियांची संख्या दिली आहे.

| अ.क्र. | वर्ष | प्रसुति झालेल्या स्त्रियांची संख्या |
|---|---|---|
| १ | १९८७ | २८२ |
| २ | १९८८ | १८९ |
| ३ | मे १९८९ ते ३१ ऑगस्ट१९८९ | १०० |

केडगाव पंचकोशीमध्ये प्रसुतिगृहाची सोय असलेले हे एकमेव हॉस्पीटल होते. त्यांना अत्यंत माफक दरामध्ये वैद्यकिय सेवा पुरविली जात होती. गरीब स्त्रियांसाठी मोफत वैद्यकिय सेवा दिली जात होती. या इस्पितळामध्ये गुंतागुंतीच्या व अवघड प्रसुति केल्या जात होत्या. मे. १९८९ ते ३१ ऑगस्ट १९८९ या चार महिन्याच्या काळातील गुंतागुंतीच्या व अवघड प्रसुतिंची संख्या खालीलप्रमाणे होती.

| | | |
|---|---|---|
| १) | शस्त्रक्रिया करुन झालेल्या प्रसुति (Caesarea Deliveries) | ०४ |
| २) | चिमट्याचा वापर करुन झालेल्या प्रसुति (Forceps deliveries) | २० |
| ३) | बाळाचा पृष्ठभाग (Buttuck) प्रथम बाहेर आल्याने गुंतागुंतीच्या प्रसुति (Breech Deliveries) | ०२ |
| ४) | पायाळू बाळांच्या प्रसुति (Abnormal Babay - Microcephaly) | ०१ |

(Source : Centonary Edition, Prayer Bell Annual Report 1989.)

वरील माहितीवरुन या इस्पितळामध्ये अवघड व गुंतागुंतीच्या प्रसुति करण्यासाठी वैद्यकिय कर्मचारी वर्ग प्रशिक्षित होता. त्यासाठी आधुनिक वैद्यकिय उपकरणे होती.

३)  या तिसऱ्या विभागामध्ये १२ खाटांची रुग्ण खोली (Sick – room) आहे. येथे फक्त मुक्ति मिशनमधील रहिवाशी मुली व स्त्रियांवर उपचार केले जातात. संसर्ग व संपर्कजन्य आजारांवरील उपचारांसाठी ही स्वतंत्र व्यवस्था आहे.

या इस्पितळात रुग्णांना कायमस्वरुपी दाखल करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था आहे. “राजसबाई डोंगरे या विभागामध्ये जुलै १९८६ ला दाखल झाल्या व येथेच २ जानेवारी १९८७ ला त्यांचामृत्यू झाला... बेटीबाई डोंगरे कायमस्वरुपी रुग्ण म्हणून हॉस्पिटलमध्ये ऑक्टोबर

१९८५ ला दाखल झाल्या व त्यांचा मृत्यू येथेच २८ फेब्रुवारी १९८९ रोजी झाला."[२१९] वरील दोन रुग्णांची नावे उदाहरणादाखल दिली आहेत. राजसबाई डोंगरे बालवयातच मुक्ति मिशनमध्ये दाखल झाल्या होत्या. त्यांनी मुक्ति मिशनची प्रदीर्घ काळ सेवा केली होती. त्यांच्या वार्धक्याच्या काळात त्या आजाराने त्रस्त होत्या. त्यामुळे त्यांना कायमस्वरुपी रुग्ण म्हणून दाखल केले होते. त्यांच्या अखेरपर्यंत त्यांना वैद्यकिय सुविधा पुरविली होती.

बेटीबाई डोंगरेंनी प्रिंटींग प्रेस हा विभाग त्यांनी समर्थपणे सांभाळला होता. बायबलच्या भाषांतराच्या कार्यात त्यांची पं. रमाबाईंना खूप मदत झाली होती. त्याही वार्धक्याच्या काळात आजारी होत्या. त्यांच्यावर साडेतीन वर्षे कायमस्वरुपी रुग्ण म्हणून उपचार केले होते.

यावरुन दिसून येते की, पंडिता रमाबाई मुक्ति मिशनमध्ये शेकडो स्त्रिया कायमस्वरुपी वास्तव्यास होत्या. वार्धक्याच्या काळात त्यांची देखभाल करणारे मुक्ति मिशनशिवाय कोणीही नव्हते. येथे मानवतेच्या दृष्टिकोनातून वृध्द स्त्रियांची विशेष काळजी घेतली जात होती. आजही शेकडो स्त्रियांच्या वार्धक्याच्या काळातील एकमेव आधार मुक्ति मिशन आहे.

## ५.१३ परदेशी परिषदा (Overseas Counsils)

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या कार्याचा जागतिक पातळीवर प्रभाव निर्माण झाला आहे. अनेक देशांतील स्वयंसेवक मुक्ति मिशनच्या कार्यामध्ये सहभागी होतात. परदेशी स्वयंसेवकांनी परिषदा (Counsils) स्थापन करुन मुक्ति मिशनशी नाते जोडले आहे. मुक्तिमिशनच्या आर्थिक मदतीचा मुख्य स्त्रोत परदेशी परिषदा आहे. पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या कार्यामध्ये पुढील परदेशी परिषदांचे सहकार्य प्राप्त झाले आहे.

### ५.१३.१ अमेरिकेची परिषद (American Counsils) :

पं. रमाबाईंच्या कार्याला आर्थिक बळ अमेरिकेतूनच मिळाले होते. विधवा शिक्षणासाठी अमेरिकन लोकांनी दीर्घकाळ आर्थिक मदत केली होती. १३ डिसेंबर १८८७ साली द रमाबाई असोशिएशनची स्थापना झाली. या संस्थेने भारतीय विधवांच्या शिक्षणासाठी शारदासदनला दहा वर्षे आर्थिक मदत केली होती. सन १८९८ मध्ये द अमेरिकन रमाबाई असोशिएशनची स्थापना होऊन मुक्तिमिशनच्या कार्यासाठी दीर्घकाळ आर्थिक मदत केली होती.

“जानेवारी १९२५ रोजी या संस्थेचे नामांतर अमेरिकन कॉन्सिल ऑफ द रमाबाई मुक्ति मिशन असे केले होते. सन १९२९ नंतर अमेरिकन कॉन्सिल नावाने ही संस्था ओळखली जाऊ लागली.”[२२०]

मुक्ति मिशनच्या कार्यासाठी ३० मिशनरींनी सेवा केली. या संदर्भात अमेरिकन कॉन्सिलचे कार्यकारी संचालक रेव्ह. डेव्हिड एल. स्कॉट लिहितात, “The first was Miss Minnie Abrams who joined Ramabai in 1898 and the last to retire was Miss Elsie Rohrer in 1988.”[२२१] यावरुन अमेरिकन कौन्सिल मुक्ति मिशनसोबत दीर्घकाल काम करणारी संस्था असल्याचे स्पष्ट होते.

पंडिता रमाबाई मुक्ति मिशन हे ख्रिस्त आशिर्वादीत गृह आहे अशी या कौन्सिलची श्रध्दा आहे. “पंडिता रमाबाई मुक्ति मिशनमध्ये गरजू लेकरे, स्त्रिया व इतरांची काळजी घेतली जाते. म्हणून ख्रिस्ताची प्रिती आम्हाला मदत करावयास भाग पाडीत आहेत.”[२२२] असे रेव्ह. केव्हिड एल. स्कॉट नमूद करतात. गेली शंभरवर्षे या कौन्सिलची मदत मुक्ति मिशनला मिळत आहे.

### ५.१३.२ **ऑस्ट्रेलियन परिषद** (Australian Counsils)

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनचे ऑस्ट्रेलियन परिषदेशी नाते १०० वर्षांपेक्षा जुने आहे. या संदर्भात पं. रमाबाईंच्या चरित्रकार मिस हेलन डायर लिहितात, “The news of the revival in Australia in 1903 aroused, Ramabai sent thither her daughter Manoramabai and miss Abrams in order that they might catch the inspiration of revival fire and form praying bands for Mukti among the Australian Christian’s.”[२२३] अशा प्रकारे मनोरमाबाई व मिस अब्राहम यांनी मुक्ति मिशनच्या कार्याची पार्श्वभूमी ऑस्ट्रेलियामध्ये तयार केली होती. मुक्ति मिशनला दीर्घकाळ मदत करण्यासाठी आस्ट्रेलियन परिषदेची स्थापना झाली होती. “सन १९१६ मध्ये ऑस्ट्रेलियाच्या चार मिशनरींनी पंडिता रमाबाई सोबत सेवा केली होती. १९५० ते १९६० दरम्यान आणखी नऊ जणींना मुक्ति साबत काम करण्याचा मान मिळाला.”[२२४]

मिस ग्लॅडी फ्लेचर ह्या सन १९३८ मध्ये मुक्तिच्या सेवेत रुजू झाल्या. त्यांनी ३५ वर्षे मुक्ति मिशनची सेवा केली होती. मिस बेटी ग्रे यांनी २३ वर्षे मुक्ति मिशनची सेवा केली होती. या दोघींनी अधिक्षिका पदाचा कार्यभार सांभाळला होता. मिस मार्गारेट विल्यमने सन १९५५

ला मुक्ति मिशनच्या सेवा कार्याला सुरुवात केली. आज ८८ व्या वर्षी त्या मुक्तिसाठी समर्पित जीवन जगत आहेत. आपल्या जीवनाचा शेवट मुक्ति मिशनमध्ये व्हावा अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे. त्यासाठी त्यांना भारताचा कायमस्वरुपी व्हिसा मिळाला आहे. मिस हेथर जॉनस्टोन सन १९६२ मध्ये मुक्ति मिशनमध्ये दाखल झाल्या. त्यांनी ४० वर्षे सेवा कार्य केले. वरील उदाहरणांवरुन दिसून येते की, पंडिता रमाबाई मुक्ति मिशनचा फार मोठा प्रभाव ऑस्ट्रेलियन मिशनरींवर पडला होता. त्यांनी केडगावमध्ये दीर्घकाळ सेवा कार्य पार पाडले होते ही बाब मानवतेच्या दृष्टीने फार महत्वाची आहे.

ऑस्ट्रेलियन परिषद मुक्ति मिशनच्या सेवा कार्याला ईश्वरी कार्य मानते. या परिषदेच्या राष्ट्रीय संचालिका ग्लेंडा डी जागर नमूद करतात. "गेली शंभर वर्षे भारतातल्या मुक्ति मिशनकरीता पाठबळ पुरविण्याचा विशेष हक्क परमेश्वराने मिळवून दिला. त्याबद्दल आम्ही विशेष कृतज्ञता व्यक्त करीत आहोत."[२२५] मुक्ति मिशनच्या कार्यामध्ये परमेश्वराचा हेतू आहे. येथील सेवा कार्य परमेश्वराचे कार्य आहे अशी या परिषदेची धारणा आहे. त्यामुळेच ऑस्ट्रेलियन परिषदेने दीर्घकाळ मदत केल्याचे दिसते.

### ५.१३.३. **इंग्लिश परिषद** (English Counsils)

इंग्लंडमध्ये पं. रमाबाईंवर येशू ख्रिस्ताचा प्रभाव पडला होता. त्यांचे धर्मांतर इंग्लंडमध्ये झाले त्यामुळे पं. रमाबाईंचा फार मोठा प्रभाव इंग्लंडमध्ये निर्माण झाला.

पं. रमाबाईंसोबत मिस ई काऊच यांनी मुक्ति मिशनमध्ये दीर्घकाळ सेवा केली. "त्यांच्याकडे मुलांवर देखरेख करण्याचे काम होते. मुलगे त्यांना 'ममा' म्हणत."[२२६] मिस मिनी अब्राहम ह्यांनी मुक्ति मिशनच्या कार्याचा प्रसार परदेशामध्ये केला. श्रीम. बॅरेट या इंग्लिश मिशनरीने ४० वर्षे सेवा कार्य केले. मिसेस इ. बी. बटलर, जी. टिलेट यांनीही मुक्तिच्या कार्याची जबाबदारी उचलली. सन १९३७ मध्ये लंडन रेडिओवर मुक्ति मिशनच्या कार्याची माहिती सांगितली जात होती.

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनला संस्थापक पातळीवरुन मदत करता यावी, म्हणून ३१ मे १९५८ रोजी इंग्लिश परिषदेची स्थापना करण्यात आली. इंग्लिश परिषदेच्या स्वयंसेविका मिस इसाबेल क्रॅडोक यांनी सन १९४५ ते सन १९४९ तसेच सन १९५१ ते सन १९५५ या कालावधीत मुक्ति मिशनच्या अधिक्षिका पदी काम केले. त्यांनी मुक्ति मिशनची ३९ वर्षे सेवा

केली. ४ जुलै १९५९ रोजी मिस सर्जंट, मिस टिलेट, रेव्ह. टेट, मि. नेलोर हे परिषदेचे समासद मुक्ति मिशनच्या सेवा कार्यात सहभागी झाले होते. मिस एलिझाबेथ मॉरीस यांनी मुक्ति मिशनमध्ये दीर्घकाळ सेवा कार्य केले. त्यांच्या कार्याविषयी १९२७ च्या अहवालात लिहिले आहे की, "The last long serving Mukti Missionary from England was miss Elizabeth Morris who had completed almost 40 years of service, She was much love and respected in the local community and by the whole mukti family"[२२७] इंग्लिश परिषदेकडून मुक्ति मिशनसाठी आजही मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत मिळते. "सन २००७-०८ च्या आर्थिक वर्षामध्ये ५५००० पौंड इतकी आर्थिक मदत इंग्लिश परिषदेने मुक्ति मिशनसाठी पाठविली होती."[२२७अ] या वरुन पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या सेवा कार्यात इंग्लिश परिषदेने मोठे योगदान दिले होते असे दिसून येते.

### ५.१३.४ **स्वीडन परिषद** (Swiden Counsils)

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या कार्यामध्ये स्वीडन परिषद सन १९८३ पासून सहभागी झाली. स्वीडन परिषदेच्या प्रतिनिधी सोनजा कार्लसनच्या प्रयत्नांमुळे "१९८४ साली मुक्तीतील ३० बालकांना प्रायोजक मिळाले. स्वीडनमध्ये ९० मुलींकरता प्रायोजक आहेत."[२२८] स्वत: मिसेस सोनजा कार्लसन यांनी मुक्ति मिशनमधील दोन मुली दत्तक घेतल्या होत्या. अशाप्रकारे स्वीडन परिषदेमुळे अनाथ बालकांच्या दत्तक ग्रहणाची प्रक्रिया सुरु झाली. भारतातील अनाथ बालकांना स्वीडनसारख्या पाश्चात्य व उच्चभ्रू देशात जाण्याची संधी मिळाली.

### ५.१३.५ **स्कॉटलंड परिषद** (Scotland Counsils)

सन १९१० मध्ये मिस ल्युसी जेम्स या स्कॉटीश महिलेने मुक्ति मिशनमध्ये दोन वर्षे सेवा केली होती. सन १९३९ ते सन १९७७ या प्रदीर्घ काळात मिस जेनट कॅलॉन यांनी मुक्ति मिशनमध्ये सेवा केली. त्यांनी १९६४ ते १९६५ व १९६७ ते १९७० या काळात अधिक्षिकापदी काम केले. त्यांनी वैद्यकिय विभागात महत्वपूर्ण काम केले.

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनला संस्थात्मक पातळीवर मदत करता यावी, म्हणून १९५० साली स्कॉटलंड परिषदेची स्थापना केली. मुक्ति मिशनला आर्थिक मदत पुरविणारी ही महत्वाची परिषद आहे.

### ५.१३.६ **हॉलंड परिषद** (Holland Counsils)

सन १९६९ पासून हॉलंड परिषद मुक्ति मिशनच्या सेवाकार्यात सहभागी झाली आहे. या परिषदेच्या स्थापनेत मिसेस रुकमाकर यांनी पुढाकार घेतला होता. “१९६९ साली मिसेस रुकमाकर यांनी मुक्ति विषयी ऐकले व आमच्या लेकरांकरीता प्रायोजक गोळा करुन या कार्याला मदत पुरविण्याकडे त्यांचे मन लागले. तेव्हापासून हॉलंडच्या समिती बरोबरचा आमच्या मंडळींचा सहयोग तसाच आहे.”[२२९] असे मिस्टर अलबर्ट हेलिंजर (हॉलंड परिषदेचे संचालक) नमूद करतात. मिसेस रुकमाकर यांच्या प्रयत्नांमुळे डच सरकारने मुक्ति मिशनच्या कार्याची दखल घेतली. डच सरकारकडून मुक्ति मिशनला दुग्धजन्य पदार्थ मोफत पुरविले जातात. मिसेस रुकमाकर यांनी मुक्ति मिशनमधील बालकांच्या दत्तक ग्रहणासाठी डच कुटूंबांना प्रोत्साहित केले. “सन १९८९ पर्यंत मुक्ति मिशनमधील ३४ बालकांना हॉलंडमधील दयाळू पालकांना दत्तक घेतले होते.”[२३०] पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या पाच विस्तारीत गृहांना मदत करण्याचे काम हॉलंड परिषद करते. अशाप्रकारे पंडिता रमाबाई मुक्ति मिशनला मदत करणारी ही महत्त्वाची परिषद आहे.

### ५.१३.७ **कॅनडातील परिषद** (Canadian Counsils)

पं. रमाबाईंनी सन १८९८ ला अमेरिकेला भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी कॅनडाचा दौरा केला होता. कॅनडामध्ये मिसेस लिअर, मिसेस रॅचेल नाल्डर आणि मिस ग्रेस फ्ले यांच्यामार्फत पं. रमाबाईंच्या कार्याचा प्रसार झाला होता. पं. रमाबाईंच्या नावाने कॅनडामध्ये सर्कल्स स्थापन झाले होते. या संदर्भात मुक्ति प्रेअर बेलच्या अहवालात लिहिले आहे की, “Under the leadership of Mrs. Nalder, Prayer group was started in Halifax, Nova, Scotia and funds were spent to Ramabai”[२३१]

मिस बार्बरा जॉनस्टोन ह्या मुक्ति मिशनच्या सेवेत दाखल झालेल्या पहिल्या कॅनेडिअन स्वयंसेविका होत्या. त्यांनी १९०६ ते १९०९ या काळात ग्रीक बायबलच्या भाषांतराच्या कामात त्यांनी पं. रमाबाईंना मदत केली होती. मिस व्हिक्टोरिया ब्राझीअर यांनी १९१० ते १९३१ या काळात मुक्ति मिशनमध्ये सेवा केली. त्यांच्या कार्याविषयी १९२७ च्या अहवालात लिहिले आहे की, “Miss Brazier had to add dispensaries and the sick ones to her already heavy burden”[२३२]

कॅनेडिअन मिशनरी मिस. लिलियन डार्कसेन यांनी भारतात प्रार्थना संघ स्थापन केले. त्यांनी पं. रमाबाईंचे आत्मचरित्र पुर्नप्रकाशित केले. सन १९५६–५७ मध्ये मिस के. स्टाइटलर व मिसेस एल. मान्सून यांनी कॅनेडिअन परिषदेची स्थापना केली. मुक्ति मिशनला संस्थात्मक पातळीवर स्वतंत्र मदत करता यावी हा यामागील हेतू होता. १९५६ पूर्वी कॅनडातील मिशनरी स्त्रिया व स्वयंसेवक अमेरिकन परिषदेच्या मार्फत मुक्ति मिशनला मदत करीत होत्या. मिस अॅनी सिमेन या कॅनेडिअन मिशनरीने तीस वर्षे (सन १९४७ ते सन १९७७) मुक्ति मिशनमध्ये सेवा कार्य केले. त्यांनी अंध स्त्रिया व बालकांची सेवा केली. अशाप्रकारे कॅनेडियन परिषदेने मुक्ति मिशनसाठी समर्पित भावनेने सेवा केली.

### ५.१३.८ **न्युझीलंडची परिषद** (Newzealand Counsils)

न्युझीलंडमधील मिशनरी स्त्रिया सन १८९६ पासून पं. रमाबाईंना मदत करीत होत्या. सन १८९६ ते सन १९०० या काळातील दुष्काळामध्ये श्री व श्रीमती जॉर्ज मॅकेन्झी यांनी मुक्ति मिशनमधील अनाथ मलींना मदत केली होती. 'Ramabai and her mission to the child widow of India.'या पुस्तकाची आवृत्ती 'The Newzealand Auxilary Ramabai's Mukti Mission' या संस्थेतर्फे प्रकाशित केली होती. सन १९२२ मध्ये या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली होती.

न्युझीलंडमधील सहकाऱ्यांनी पं. रमाबाईंच्या मराठी बायबलच्या छपाईसाठी आर्थिक मदत केली होती. या संदर्भात मिस लिसा हेस्टी लिहितात, "Newzealand friends have ordered a 10,000 editions of the Marathi New Testament to be done as a memorial for which they are to supply the funds"[२३३] या परिषदेच्या मिस जॉन मॅकग्रॅगर सन १९४७ ते सन १९५२ या काळात शारदासदनच्या मुख्याध्यापिका होत्या. त्यांनी मुक्ति मिशनची २८ वर्षे सेवा केली. मिस कॅथलिन होम्स व मिस अविस रुटलेस या मिशनरी स्त्रियांनीही मुक्ति मिशनच्या सेवा कार्यात भाग घेतला होता.

सन १९४५ मध्ये मिस मेरी राईट यांच्या पुढाकाराने न्युझीलंड परिषदेची स्थापना झाली. या परिषदेच्या मिस ऑलिव्ह डॉसेट ३० वर्षे मुक्तिच्या सेवेत होत्या. यावरुन असे दिसते की, न्युझीलंड परिषदेमध्ये पुष्कळसे लोक समर्पित भावनेने काम करणारे सदस्य होते. ते शिक्षण, वैद्यकिय खर्च व इतर मुक्ति प्रकल्पांसाठी उदार हस्ते देणग्या देत होते.

## ५.१४ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या सेवा कार्यात सहभागी झालेल्या परदेशी मिशनरी स्त्रिया

| अ.क्र. | मिशनरी स्त्रियांची नावे | मूळचा देश | दाखल साल | निवृत्त साल | एकूण कालावधी वर्षे |
|---|---|---|---|---|---|
| १ | मिस मिनी अब्राहम | अमेरिका | १८९८ | अखेरपर्यंत | |
| २ | मिस एल्सी रोहरेर | अमेरिका | १९८८ | | |
| ३ | मिस ई. वेल्स | अमेरिका | १९२६ | १९३९ | १४ |
| ४ | मिस बी. ई. स्टीड | अमेरिका | १९४९ | १९५० | २ |
| ५ | मिस. फुल्लर | अमेरिका | | | ४ |
| ६ | मिस. ग्लॉडी फ्लेचर | ऑस्ट्रेलिया | १९३८ | १९७३ | ३५ |
| ७ | मिस बेटी ग्रे | ऑस्ट्रेलिया | | | २३ |
| ८ | मिस मार्गारेट विल्यम | ऑस्ट्रेलिया | १९५५ | २०१३ | ५८ |
| ९ | मिस हेथेर जॉनस्टोन | ऑस्ट्रेलिया | १९६२ | | |
| १० | मिस बार्बरा जॉनस्टोन | कॅनडा | १९०६ | १९०९ | ४ |
| ११ | मिस व्हिक्टोरिया बाझीअर | कॅनडा | १९१० | १९३१ | २१ |
| १२ | मिस ॲनी सिम्सन | कॅनडा | १९४७ | १९७७ | ३० |
| १३ | मिस ल्युसी जेम्स | स्कॉटलंड | १९१० | १९१२ | २ |
| १४ | मिस जेनेट कॅलन | स्कॉटलंड | १९३९ | १९७७ | ३८ |
| १५ | मिस ॲंकी रुकमाकर | हॉलंड | १९७५ | १९८२ | ७ |
| १६ | मिसेस बॅरेट | इंग्लंड | | | ४० |
| १७ | मिस इसाबेल क्रॅडोक | इंग्लंड | | | ३९ |
| १८ | मिस एलिझाबेथ मॉरीस | इंग्लंड | १९२५ | १९६५ | ४० |
| १९ | मिस जॉन मॅकग्रॅगोर | न्युझीलंड | १९१० | १९३८ | २८ |
| २० | मिस ऑलिव्ह डॉसेट | न्युझीलंड | | | ३० |

वरील माहितीवरुन दिसून येते की, पं. रमाबाई व मुक्ति मिशनच्या कार्यात अनेक पाश्चात्य स्त्रियांनी आयुष्य वेचले. पं. रमाबाई व मुक्ति मिशनच्या कामामध्ये या स्त्रियांचे मोठे योगदान आहे. ह्या स्त्रिया "पं. रमाबाईंना मदत करण्यासाठी केवळ पोटावारी राहून काम करु लागल्या. कित्येक इकडे आल्या, त्या परत गेल्याच नाहीत."[२३४] या स्त्रियांना मावशी म्हणण्याची पध्दत पं. रमाबाईंनी रुढ केली. या स्त्रिया प्रशासकीय कार्यात व सेवा कार्यात मदत करीत होत्या. "मुक्ति मिशनमधील अनाथांची सेवा म्हणजे पवित्र आत्म्याची देणगी"[२३५] या भावनेतून त्या काम करीत होत्या. वरील तक्त्यातील स्त्रियांचा उल्लेख उदारहणासाठी केला आहे. मुक्ति मिशनच्या सेवा कार्यात सहभागी परदेशी स्त्रियांची संख्या ह्यापेक्षा फार मोठी होती. मुक्ति मिशनला भेटी देणाऱ्या परदेशी व्यक्तींची संख्या मोठी होती.

मुक्ति मिशनने स्वत:च्या सेवाकार्याविषयीचा विश्वास जागतिक पातळीवर निर्माण केला होता. या संदर्भात मिस बर्मिक स्टीड लिहितात की, "Mukti is special blending of International spirit as India, England, Scotland, Austrelia, Canada, Newzealand and America are respected."[२३६] मुक्ति मिशनमध्ये ईश्वरीय कार्य चालते हा विश्वास जागतिक पातळीवर निर्माण झाला होता. त्यामुळे अनेक दूरच्या देशांतून मुक्ति मिशनच्या कार्याला पाठिंबा मिळत होता. परदेशांतून आर्थिक मदत मिळत होती. या मिशनरींमुळे मुक्ति मिशनसाठी आर्थिक स्त्रोत परदेशात निर्माण झाले होते. या परदेशी स्त्रियांना मुक्ति मिशनशी जोडणारा महत्त्वाचा दुवा येशू ख्रिस्त होता.

ख्रिस्ती संस्था म्हणून टिकून राहिलेली भारतातील सर्वात जुनी व मोठी संस्था आहे. मुक्ति मिशन एक आशिर्वादीत भूमी म्हणून प्रसिध्द पावली होती. मुक्ति मिशनमधील कार्य हे येशूच्या शिकवणूकीचा परिपाक होता. एक ख्रिस्ती गृह म्हणून जगभरातील मिशनरींचे ते श्रध्दा केंद्र आहे. या संदर्भात बेटी ग्रे लिहितात, "मुक्तिच्या स्थापनेमागील परमेश्वराचा हेतू तो अद्यापही सिध्दीस नेत आहे."[२३७] मुक्ति मिशनवर येशू ख्रिस्ताची विशेष कृपा आहे. अशी धारणा ख्रिस्ती समाजाची आहे. त्या ख्रिस्त वचनाचा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होत्या. मुक्ति मिशनमध्ये ख्रिस्ताचे अस्तित्व बळकट करण्यामध्ये मिशनरी स्त्रियांचे मोठे योगदान आहे. या संदर्भात मिस युनिस वेल्स लिहितात, "Miss Lizziere Couch although seventy four years old goes twice each day to the railway station to distribute Gospel literature"[२३८] यावरुन मिशनरी स्त्रिया सेवाकार्याबरोबरच ख्रिस्ती धर्माचा प्रसार करीत होत्या हे दिसून येते. मिस मिनी अब्राहम सप्टे १९०७ च्या अहवालात लिहितात, "काही मिशनरी व पवित्र आत्म्याने परिपूर्ण असे १०० पेक्षा अधिक कार्यकर्ते पंढरपूर या ठिकाणी सुवार्ता प्रसारासाठी गेले होते तेथे ते हजारो यात्रेकरुंना सुवार्ता सांगतील."[२३९] पंढरपूरला आलेल्या हिंदू भक्तांमध्ये हृदयपरिवर्तनासाठी सुर्वार्ता प्रसारक काम करीत होते. "मुक्ति मिशनमधील स्त्री सुवार्तिकांचा पहिला गट १९०६ च्या नोव्हेंबर मध्ये पंढरपूर येथे गेला १९७२ पर्यंत ह्या स्त्री सुवार्तिका पंढरपूरलाच रहात होत्या.[२४०] हिंदू धर्म श्रध्दांचे सबलीकरण पंढरपूर यात्रेमध्ये होते. मिशनरी स्त्रिया ख्रिस्ताची ओळख हिंदू भाविकांना करुन देत होत्या. यावरुन मिशनरी स्त्रियांचा सेवाकार्याबरोबर ख्रिस्ती धर्मप्रसाराचा हेतूही स्पष्ट होतो.

## ५.१५ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनची प्रशासकीय माहिती :

सन १८९८ ते सन १९२२ या कालावधीत पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या प्रमुख होत्या. मुक्ति मिशनच्या प्रशासनात त्या सर्वेसर्वा होत्या. प्रशासकीय बाबतीत त्याच सर्व निर्णय घेत होत्या. पं. रमाबाईंनी ७ मार्च १९२२ रोजी मृत्यूपत्र केले होते. या मृत्यूपत्रात त्यांनी त्यांच्या मृत्यूपश्चात मुक्ति मिशन संदर्भात योग्य मार्गदर्शन केले आहे. त्या लिहितात, “I have nominated miss Lissa M Hasti to be my successor”[२४१] मिस लिसा हेस्टी यांनी सन १९२२ ते सन १९२६ या कालावधीत मुक्ति मिशनचे अधिक्षिकापद सांभाळले. पं. रमााबईंच्या इच्छेनुसार मुक्ति मिशन सन १९२५ मध्ये इंडिया मिशन ऑफ द ख्रिश्चन ॲण्ड मिशनरी अलायन्स च्या अधिकाराखाली आले. सन १९९० मध्ये भारतीय ख्रिस्ती पुढाऱ्यांची एक नवीन सर्वसाधारण सभा नेमली. त्यांनी पंडिता रमाबाई मुक्ति मिशनचे प्रशासन पाहिले. सन १९९९ मध्ये पंडिता मुक्ति मिशनचे प्रशासन पूर्णपणे भारतीयांकडे आले. संपूर्ण भारतीय ख्रिस्ती कार्यकर्त्यांचे एक प्रशासकीय मंडळ तयार केले. सध्या हेच संचालक मंडळ संपूर्ण कारभार पाहते.

**५.१५.१ पं. रमाबाई मुक्ति मिशनच्या अधिक्षिका** (सन १८९८ ते सन २०१३)

| अ.क्र. | अधिक्षिकेचे नाव | कालखंड | एकूण वर्षे |
|---|---|---|---|
| १ | पं. रमाबाई | ११८९८ ते १९२२ | २४ |
| २ | लिसा हेस्टी | १९२२ ते १९२६ | ४ |
| ३ | युनिके वेल्स | १९२६ ते १९३९ | १३ |
| ४ | ज्युलिया वुडवर्ड | १९४० ते १९४४ | ४ |
| ५ | इसाबेल क्रॅडोक | १९४५ ते १९४९<br>१९५१ ते १९५५ | ९ |
| ६ | बर्निके स्टीड | १९४९ ते १९५१ | २ |
| ७ | ग्लॅाडिस फ्लेचर | १९५५ ते १९५७<br>१९५९ ते १९६३<br>१९६६ ते १९६७ | ७ |
| ८ | करोल हेरी | १९५७ ते १९५९ | २ |
| ९ | जेनेट कालन | १९६४ ते १९६५<br>१९६७ ते १९७० | ४ |
| १० | रोहिणी गद्रे | १९७० ते १९७४ | ४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | हिदर जॉनस्टन | १९७४ ते १९७७<br>१९७८ ते १९८०<br>१९८६ ते १९८७<br>१९९४ ते १९९८ | १० |
| १२ | बेटी ग्रे | १९७७ ते १९७८ | १ |
| १३ | जया मिसाळ | १९८० ते १९८६ | ६ |
| १४ | सेलीन फर्नांडीस | १९८७ | १ |
| १५ | सुप्रभा कांबळे | १९८८ ते १९९० | २ |
| १६ | सुधा गायकवाड | १९९० ते १९९१ | १ |
| १७ | रेव्ह. जे. टी. सिरवैया | १९९१ ते १९९३ | २ |
| १८ | डॉ. मिना मेहता | १९९३ ते १९९४ | १ |
| १९ | वेणू इंगळे | १९९८ ते २०१० | १२ |
| २० | लॉरेन्स फ्रॉरेन्स | २०१० ते २०१३ (कार्यरत) | ३ |

या तक्त्यावरुन दिसून येते की, मुक्ति मिशनच्या अधिक्षिकापदी सर्वाधिक काळ पं. रमाबाईंनी काम केले. त्यांच्या मृत्यूनंतर मिस युनिके वेल्स व मिस वेणू इंगळे यांचा कार्यकाळ सर्वाधिक मोठा होता. सन १८९८ ते २०१३ या काळात एकूण २० स्त्रियांनी अधिक्षिकापदी काम केले. या काळात कोणत्याही पुरुष व्यक्तीची नेमणूक केली नाही. हे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. अधिक्षिका पदावर एकूण ११ परदेशी स्त्रियांनी काम केले तर एकूण ८ भारतीय स्त्रियांनी काम केले. कालानुरुप संस्थेच्या कार्यपध्दतीमध्ये आवश्यक ते बदल होत गेले. मात्र अनाथ व गरजू मुली व स्त्रियांची सेवा करणे हा हेतू कायम राहिला .

मुक्ति मिशनचे स्थानिक प्रशासन व्यवस्थापन पाहणे, विस्तारीत गृहांची व्यवस्था पाहणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी संबंध प्रस्थापित करणे तसेच व्यवस्थापनासाठी लागणारा पैसा उभे करणे हे अवघड काम अधिक्षिकांना करावे लागते. या संदर्भात अधिक्षिका युनिक वेल्स लिहितात की, “Financial burden was also a hard thing to face”[२४२] यावरुन या संस्थेसाठी पैसा उभा करणे अवघड काम आहे असे दिसून येते. अलिकडच्या काळामध्ये राष्ट्रीय पातळीवरुन आर्थिक मदत सुरु झाली आहे. या संदर्भात अधिक्षिका मिस लॉरेन्स फ्रान्सि माहिती देतात की, “I am very happy to say that the Indian donations have increased from Rs. 42 Lacs in the last year to Rs. 56.65 Lacs this year.”[२४३] यावरुन भारतामध्ये मुक्ति मिशनच्या कार्याचा प्रभाव वाढत असल्याचे दिसते.

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या कामाचा व्याप फार मोठा आहे. दररोज नवनवीन समस्यांना तोंड द्यावे लागते. अधिक्षिका युनिक वेल्स लिहितात “Mukti is like warn out garment one hole is patched and immediatly another appears. There is no end to the problems.”[२४४] यावरुन येथील व्यवस्थापन व प्रशासन किती अवघड आहे हे दिसून येते. तरीही येथील अधिकारी व कर्मचारी वर्ग सेवाभावी वृत्तीने काम करतो.

## ५.१६ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनची नवी संरचना :

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनमध्ये एकूण चार व्यवस्थापकिय विभाग आहेत या नव्या संरचनेचे संक्षिप्त नाव ‘CART’ असे आहे. CART म्हणजे

| | | | |
|---|---|---|---|
| C | = | Community Care | (सामाजिक देखभाल) |
| A | = | Administrative Care | (प्रशासकीय देखभाल) |
| R | = | Residential Care | (निवासीय देखभाल) |
| T | = | Team Care | (संघाची देखभाल) |

### ५.१६.१ सामाजिक देखभाल :

१) पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, दृष्टी विकलांग, विशेष गरजूंसाठी शाळा, संगणक अकादमी, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र

२) रुग्णालय सेवा व गतीशील वैद्यकिय सेवा (सी.डी.पी.)

३) समाजाधारित उपक्रम : वैद्यकीय देखभाल, व्यवसायिक प्रशिक्षण, प्रौढ साक्षरता, लघुकर्ज : मुक्तिच्या विवाहीत मुलांसाठी कार्य व मदत, मुक्तिची मुले व नातेवाईक, मुक्तिच्या शाळेतील मुले, मुलांसाठी दिवस देखभाल केंद्र

४) पालकीय देखभाल : ख्रिस्ती मंडळींना मार्गदर्शन, सुवार्ता प्रसार व मंडळी रोपण, आत्मिक संवर्धन, पालक सेवा

### ५.१६.२ प्रशासकीय देखभाल :

मध्यवर्ती कार्यालय, अर्थ आणि मालमत्ता, कायदेविषयक बाबी, खरेदी आणि संग्रह, संस्थेची देखभाल, शेती, दुग्धालय आणि बागकाम, संपर्क, प्रसार, प्रकाशन, परदेशी परिषदा, स्वयंसेवक, भागिदारी, कार्याचे जाळे, स्वागत आणि एकान्तस्थान केंद्र, राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रम व विद्यावाचस्पती अध्ययन, विशेषतज्ञांची समिती.

**५.१६.३ निवासीय देखभाल :**

अनाथ व एकमात्र पालक असलेल्या बालकांची सर्वांगिण देखभाल, मारहाण व दुर्व्यवहार झालेल्या विधवा अणि वयस्क निराश्रीत स्त्रियांची सर्वांगीण देखभाल, दृष्टी विकलांग आणि विशेष गरजू असलेल्यांची सर्वांगीण देखभाल, मनोरुग्ण आणि बालके, असंपर्कित लोकगटांसाठी मुलांची सर्वांगिण देखभाल, झोपडपट्यातील, रस्त्यावरील मुलांची सर्वांगिण देखभाल, वेश्या व्यवसायातील स्त्रिया, एच.आय.व्ही. (एडस्) बाधितांची देखभाल, मुक्ति निवासी निवृत्त कर्मचाऱ्यांची देखभाल, मुक्तिच्या भूतपूर्व रहिवाश्यांची विश्रामगृहे, कुटूंब व्यवस्था, दत्तक ग्रहण, विवाह, पालन पोषण विषयक देखभाल, मुक्ति कुटूंब, ख्रिस्ती शाळा, वसतिगृह, ख्रिस्ती संस्था.

**५.१६.४ संघाची देखभाल :**

संचालक मंडळ, पंडिता रमाबाई मुक्ति मिशन संस्था आणि व्यवस्थापन समिती, मानवसाधन प्रशिक्षण आणि विकास, सभासद देखभाल, कर्मचारी देखभाल.

व्यवस्थापनाच्या वरील संरचनेवरुन पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या कार्याची व्याप्ती यावरुन असे दिसून येते की, पंडिता रमाबाई मुक्ति मिशन ही सेवाकार्य करणारी संस्था आहे. येथील व्यवस्थापन सुनियोजित व पध्दतशीर आहे. सामाजिक कार्याची फार मोठी परंपरा या संस्थेला आहे. अनाथ, विधवा, दुर्वर्तनी स्त्रिया, वृध्द स्त्रिया, वेश्यांची मुले, एडस्‌बाधीत व्यक्ती यासाठी या संस्थेने फार मोठे कार्य केले आहे.

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या प्रशासनाची सुसूत्रपणे बांधणी केली आहे. विभाग निहाय जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी प्रशासकीय पदे निर्माण केली आहे. व्यवस्थापनासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग आहे. हा कर्मचारी वर्ग समर्पित भावनेने काम करतो. येथे कर्मचाऱ्यांसाठी नियमितपणे मार्गदर्शन वर्ग चालविले जातात. त्यांना बाहेरील संस्थांमध्ये पुर्नउत्साहीत (Refresher) करणाऱ्या अभ्यासक्रमासाठी पाठविले जाते. पंडिता रमाबाई मुक्ति मिशनची संपर्क केंद्रे बेंगलुरु, चेन्नई, दिल्ली, हैद्राबाद, कोचीन या शहरांमध्ये आहेत. या केंद्राद्वारे मुक्ति मिशनच्या कार्याचा प्रसार देशभर केला जातो.

## ५.१७ विस्तारीत गृहे :

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनची एकूण १६ विस्तारीत गृहे भारतातील सहा राज्यांमध्ये सुरु केली आहेत. ती प्रामुख्याने आदिवासी व दुर्गम भागात आहेत. सन १९९३ मध्ये नारायणपूर (छत्तीसगड) येथे पहिले विस्तारीत गृह सुरु केले. नारायणपूर हा नक्षलवादी प्रभावित क्षेत्र आहे. तेथे प्रामुख्याने आदिवासी जमाती राहतात. या जमाती सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास आहेत. पंडिता रमाबाई मुक्ति मिशनने नारायणपूरमध्ये तेथील मुलामुलींच्या कल्याणाकरीता विस्तारीत गृह सुरु केले. या संस्थेचे दुसरे विस्तारीत गृह राजस्थानमधील माऊंट अबू येथे सुरु केले. माऊंट अबु हा पर्वतमय प्रदेश आहे. तेथील असंपर्कित लोकांपर्यंत सामाजिक व शैक्षणिक सुविधा पोहोचविण्याचे कार्य या संस्थेने केले. याशिवाय गुडगाव (दिल्ली), सापेडा बालवाडी (गुजराथ), नेरुळ (नवी मुंबई), अहमदनगर, नाशिक, सुपा, मिरज (महाराष्ट्र), जगदलपूर (ओरिसा), बाजार (आंध्रप्रदेश) इत्यादी ठिकाणी विस्तारीत गृहे सुरु आहेत. या सर्व विस्तारीत गृहांची मुख्य प्रशासकीय केंद्र केडगाव येथे आहे. या विस्तारीत गृहांद्वारे असंपर्कित लोकांपर्यंत मदत केली जाते.

वरील विस्तारीत गृहांच्या भागातील लोकांसाठी किमान गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. तेथील मलामुलींच्या शैक्षणिक गरजा पूर्ण केल्या जातात. त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी घेतली जाते. मुक्ति मिशनने या भागात शाळा सुरु केल्या आहेत. निवासी गृहे बांधली आहेत. दिवस देखभाल केंद्र सुरु केली आहेत. या विस्तारीत गृहांतील मुले–मुली बी. ॲग्री., बी. फार्म., फिजिओथेरपी, इंजिनिअरींग, चार्टर्ड अकाऊंटन्सी इत्यादी अभ्यासक्रम पूर्ण करीत आहेत. या विस्तारीत गृहांमध्ये वैद्यकीय मदत, प्रौढ साक्षरता वर्ग, शिवणकाम, खेळगृहे, दैनंदिन देखभाल केंद्र चालविली जातात. अशाप्रकारे या विस्तारीत गृहांद्वारे मागास भागातील मुलामुलींची जीवने बदलून टाकली आहेत. “सोनू पोटाई हा छत्तीसगड राज्यातील बस्तर गावच्या खेडेगावातील मुलगा बी. एस्सी. (ॲग्रीकल्चर) झाला.”[२४५] त्याचे कुटूंब अत्यंत गरीब होते. अशा प्रतिकूल वातावरणातून सोनू पोटाई आला होता. त्याचे पालानपोषण नारायणपूरच्या विस्तारीत गृहामध्ये झाले. तेथे त्याने उच्च शिक्षण पूर्ण केले. तो म्हणतो की, “मुक्ति मिशनमध्ये आणून एक चांगले जीवन जगण्याची संधी मिळाली. माझ्या जीवनात एक फार मोठे परिवर्तन घडवून आणले.”[२४६] मुक्ति मिशनचा आधार मिळाला नसता तर सोनू पोटाई

नक्षलवादी चळवळीत सामील झाला असता. नक्षलवादी कारवाया वाढण्याची दोन कारणे आहेत. शिक्षणाचा अभाव व आवश्यक गरजांची पूर्तता न होणे होय. मुक्ति मिशनच्या विस्तारीत गृहांमध्ये या दोन गोष्टींची प्रामुख्याने पुर्तता केली जाते. त्यांच्यावर सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीय संस्कार केले जातात. अशाप्रकारे नक्षलवादी कारवाया नियंत्रित करण्याचा उपाय मुक्ति मिशनच्या कार्यामध्ये दिसून येतो. अशा प्रकारे मुक्ति मिशनच्या कार्याचा विस्तार विस्तारीत गृहांद्वारे भारतभर झाला आहे. ही संस्था राष्ट्रीय कार्यामध्ये योगदान देत आहे.

## ५.१८ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनचा दृष्टांत :

"कोणत्याही पार्श्वभूमीतील निराधार स्त्रिया आणि मुले असोत त्यांनी समाजातील मीठ आणि प्रकाश बनावे म्हणून ज्यांना ज्या गृहात स्विकारले जाते, जेथे त्यांची काळजी घेतली जाते आणि त्यांची जीवने बदलून टाकली जातात असे ख्रिस्त केंद्रीत गृह."

वरील दृष्टांताद्वारे पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या सेवा कार्याचे सार दिसून येते. या दृष्टांताद्वारे निराधार स्त्रिया व मुले यांना स्विकारले जात असल्याचे स्पष्ट होते. त्यांनी समाजातील मीठ व प्रकाश बनावे यासाठी प्रयत्न केले जातात. मीठ व प्रकाश हे मानवी जीवनातील उपयोगी घटक आहेत. मुक्तितील स्त्रिया व मुलामुलींनाही समाजासाठी उपयोगी सिध्द व्हावे ही अपेक्षा व्यक्त केली आहे. अनाथांची जीवने बदलून टाकणारे हे ख्रिस्त केंदीत गृह असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे.

## ५.१९ पंडिता रमाबाई मुक्ति मिशनचे निवेदन :

"ख्रिस्ताच्या आत्म्यात आमचा प्रयत्न आहे की, मुक्ति मिशनच्या देखरेखीखाली असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात परिवर्तनाचे बीज पेरावे, त्यांच्या जीवनात येणाऱ्या वादविषयांचा योग्य तो निर्णय त्यांना करता यावा, म्हणून त्यांना कुशलतेने समुपदेशन करावे, विविध आरोग्य सुविधांचा उपक्रम राबवावा आणि व्यापक समाजासाठी त्यांनी देवराज्याचे आदर्श नमुना बनावे म्हणून प्रार्थनापूर्वक त्यांना आकार द्यावा."

वरील निवेदनाच्या परिच्छेदातून पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या कार्याचे स्वरुप लक्षात येते. या संस्थेमध्ये दाखल होणाऱ्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी पाहिली जात नाही. प्रत्येक वर्ग,

जात, धर्म, संस्कृती आणि भिन्न परिस्थितीतील स्त्रिया व मुलामुलींचा स्विकार केला जातो. येथे आई किंवा वडील यापैकी एक पालक हयात नसलेल्या बालकांचा स्विकार केला जातो. ही संस्था निराधार, गरजू, दुबळ्यांना सामर्थ्य पुरविते. त्यांच्या जीवनात परिवर्तन व्हावे यासाठी ही संस्था प्रयत्नशील असते. हृदयपरिवर्तनाच्या मार्गाने होणाऱ्या धर्मांतराचा ही संस्था स्विकार करते. संस्थेच्या प्रत्येक सभासदाने आदर्श नागरिक बनावे, त्यांच्या जीवनात नैतिक मूल्यांचा अविष्कार व्हावा यासाठी प्रयत्न केले जातात. मुक्ति मिशनमध्ये ख्रिस्ती संस्था म्हणवून घेताना आत्मगौरवाची भावना दिसते.

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनचे 'Shaping Lives' ही ब्रीदवाक्य आहे. प्रत्येक सदस्याचे भवितव्य उज्वल व्हावे यासाठी परिश्रम घेतले जातात. या संदर्भात अधिक्षिका वेणू इंगळे लिहितात, "येथील मुली कुंभाराच्या हातातील माती आहेत, असा विचार केला जातो. त्यांना घडविणे, आकार देणे आणि त्यांच्यातून चांगले ख्रिस्तनिष्ठ नागरिक बनविणे यासाठी प्रयत्न केला जातो."[२४७]

जीवनाची पुनर्बांधणी, पुन:स्थापना, पुनर्नवीकरण हे संस्थेच्या कामाची त्रिसुत्री आहे. या अनुषंगाने मुक्ति मिशनच्या सेवा कार्याचे उद्देश पुढीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत.

१) राखेतून सौंदर्य निर्माण करणे (Creating beauty out of ashes) : समाजाने नाकारलेल्या जीवनांना अर्थ प्राप्त करुन देणे. नकारात्मक व दुर्मुखलेले जीवन जगणाऱ्या स्त्रिया व मुलींचे जीवन आनंददायी बनविणे.

२) हरविलेली ओळख पुन्हा मिळविणे (Recovering lost identity) : अनाथ, निराधार मुलामुलींना माणूस म्हणून स्वत:ची ओळख निर्माण करुन देणे. त्यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणे.

३) स्त्रियांच्या हितसंबंधांना महत्व देणे (Highlighting the cause of woman) : स्त्रियांच्या सबलीकरणासाठी प्रयत्न करणे. विविध क्षेत्रामध्ये विकासाची संधी देणे.

४) भावी पिढ्यांना उत्तेजन देणे (Inspiring the future generations) : मुक्ति मिशनमधील बालकांचा बौद्धिक, मानसिक व शारीरिक विकास करणे. बालकांच्या गरजांची पूर्ती करणे. त्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करुन देणे.

५) जीवनांना अंनत काळासाठी आकार देणे (Shaping lives for eternity) : संस्थेतील स्त्रिया, बालके, मुली यांच्यावर संस्कार करणे. त्यांच्यामध्ये नैतिक गुणांचा स्विकार करणे. त्यांना आर्थिकदृष्या स्वावलंबी बनविणे.

६) शोकाचे रुपांतर नाचण्यात करणे (Turning mourning into dancing) : संस्थेतील स्त्रिया व मुलींच्या व्यक्तिगत जीवनातील दु:खाचा नायनाट करणे. त्यांचे जीवन सुखी व आनंददायी करणे.

अशाप्रकारे पंडिता रमाबाईंच्या स्त्री सुधारणाविषयक कार्याचा वारसा मुक्ति मिशनने अखंडितपणे चालविला आहे. हा वारसा भारतीय स्त्रियांसाठी स्फुर्तिदायक असूनही दुर्लक्षित आहे हे खेदाने म्हणावे लागते. परदेशी राहणाऱ्या स्त्रीवादी अभ्यासकांच्या दृष्टीने पंडिता रमाबाई मुक्ति मिशनचे कार्य महत्त्वाचे मानले जाते. मात्र भारतीय समाजामध्ये त्यांच्या कार्याचे विस्मरण व्हावे ही बाब दुर्दैवी आहे. पंडिता रमाबाईंचे ख्रिस्ती धर्मांतर व मुक्ति मिशनचे ख्रिस्तीकरण याबाबी पुढे करुन समाज त्यांच्या सेवाकार्याला नाकारत आला आहे. पंडिता रमाबाईंनी केलेले कार्यच आजच्या स्त्री मुक्तीच्या संघटना करीत आहेत. पंडिता रमाबाईंच्या कार्याचा वारसा अप्रत्यक्षरित्या अनेक बिगर सरकारी संस्थांकडून चालविला जातो. म्हणूनच पंडिता रमाबाईंच्या चरित्रकार मीरा कोसंबी 'रमाबाईंचा वारसा म्हणजे अनुकूल व प्रतिकूल घटकांचे मिश्रण आहे' असे मत मांडतात. पंडिता रमाबाईंच्या व मुक्ति मिशनच्या अनुकूल घटकांचा स्विकार करणे काळाची गरज आहे. मुक्ति मिशनने ही स्थानिक समाजाबरोबर तुटलेली नाळ जोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजानेही उदार अंत:करणाने मुक्ति मिशनच्या सेवा कार्याला आश्रय दिला पाहिजे. कारण भारतासारख्या देशामध्ये स्त्री स्वातंत्र्याचा अविष्कार आजही अपूर्ण अवस्थेत आहे. स्त्री विषयक परिवर्तनासाठी पंडिता रमाबाईंच्या स्मृती जतन करणे, त्यांच्या विचारांचा वारसा चालविणे सामाजासाठी गरजेचे आहे. समाजातील अनाथ, अपंग, मंदबुध्दी व पतित स्त्रियांचे आश्रयस्थान म्हणून मुक्ति मिशनला सामाजिक आधार दिला पाहिजे.

प्रकरण पाचवे

## तळटीपा

१. जोगळेकर मृणालिनी, स्त्री स्वातंत्र्याचा अविष्कार, १९ वे शतक भाग ३, पंडिता रमाबाई, मुंबई, १९९१, पृ. १००.

२. टिळक दे. ना., महाराष्ट्राची तेजस्विनी, पंडिता रमाबाई, पुणे,२०१२, पृ. ३४१.

३. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. १००.

४. टिळक दे. ना., पर्वोक्त, पृ. १००.

(Miss Fullar, The Triumph of An Indian Widow, Page. 46.)

५. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३४२.

६. साठे ताराबाई, अपराजिता रमा, पुणे १९७५, पृ. १९१.

७. कार्व्हालो सिसिलिया, महाराष्ट्राचे शिल्पकार, पंडिता रमाबाई, मुंबई, २००७,पृ. ४३.

८. बायबल जूना करार, स्तोत्र ८१:१०.

९. Report of the Sixth Annual Meeting of The American Ramabai Association held on May 24, 1904, Page. 17.

१०. तत्रैव, पृ. १७.

११. गद्रे कृष्णाबाई, स्मृती सुमने, केडगाव, प्र. आ. १९३९, दु. आ. २०१३.

१२. रामटेके सु. धो. अग्रेसर स्त्री कैवारी, पंडिता रमाबाई, केडगाव, १९५७, पृ. ४२.

१३. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३४५.

१४. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989) Pg. 10.

१५. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३५४.

१६. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989),Pg. 13.

१७. रामटेके सु. धो., पूर्वोक्त, पृ. ४३.

१८. शोमरोनी–प्रेम संदेश नवा करार, बायबल सोसायटी ऑफ इंडिया, बेंगलोर, योहान, ४:१:४२, पृ. १९८, १९९.

१९. दिघे प्रभाकर, सरस्वती मुंबई, १९९२, पृ. ३३८.

२०. रामटेके सु. धो., पूर्वोक्त, पृ. ४२.

२१. केसरी, दि. १२ जानेवारी १९०४.

२२. वैद्य द्वा. गो., पंडिता रमाबाई, पुणे, १९२२, पृ. २४९.

२३. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३५४.

२४. वैद्य द्वा. गो., पूर्वोक्त, पृ. २४७.

२५. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ११.

२६. बार्तमी– Blind Bartimaeus प्रेम संदेश, नवा करार, Mark १०:४६:५२, पृ. ९७.

२७. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३५५.

२८. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989),Pg. 16.

२९. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३५५.

३०. Report of the Sixteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March13, 1914, Page. 23.

३१. Report of the Twenteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on April 4, 1918, Page. 23.

३२. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ५.

३३. रामटेके सु. धो., पूर्वोक्त, पृ. ४२.

३४. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ५४.

३५. मुक्ति किरण, चर्च शताब्दी अंक, केडगाव, १९९९, पृ.१३.

३५/अ Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989), Page. 27.

३६. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३५०.

३७. Letter From Pandita Ramabai to Sister Giraldin on dated Ash Wednesday 1884.

३८. मुक्ति मिशन चर्चच्या कोनशिलेवरील मजकूर.

येशूला आश्रयाचा खडक असे बायबल स्तोत्र १८:२ मध्ये म्हटले आहे.

कोनशिलेवरील शेवटच्या दोन ओळी बायबल स्तोत्र १४४:१२ मध्ये लिहील्या आहेत.

३९. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३५२.

४०. दैनिक लोकमत, दि. १६ एप्रिल,२०१२, पृ. १.

४१. दिघे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. ३३५.

४२. दैनिक लोकमत, दि. १६ एप्रिल, २०१२, पृ. १.

४३. दिघे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. ३३४.

४४. तत्रैव, पृ. ३३६.

४५. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989),Pg. 15.

४६. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989),Pg. 15.

४७. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ४१७.

४८. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ८.

४९. Report of the Twelveth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 30, 1910, Page. 23.

५०. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ९, १०.

५१. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३८१.

५२. तत्रैव, पृ. ४६९.

५३. तत्रैव, पृ. ३४३.

५४. Report of the Sixth Annual Meeting of The American Ramabai Association held on May 24, 1904, Page. 44.

५५. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३४५.

५६. कोसंबी मीरा, पंडिता रमाबाई, पुणे, २०१०, पृ. १२६.

५७. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३४५.

५८. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. १७.

५९. तत्रैव, पृ. १७.

६०. तत्रैव, पृ. १३.

६१. केसरी, दि. २८ जानेवारी १९०२

६२. कार्व्हालो सिसिलिया, पूर्वोक्त, पृ. ४७.

६३. तत्रैव, पृ. ४७.

६४. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. १३४.

६५. मुक्ति किरण, चर्च शताब्दी अंक, केडगाव, १९९९, पृ. १५.

६६. किर धनंजय, महात्मा जोतिराव फुले, मुंबई, १९९२, पृ.२२१.

६७. मुक्ति किरण, चर्च शताब्दी अंक, केडगाव, १९९९, पृ. ३०.

६८. Report of the Nineteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1917, Page. 29.

६९. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३४७.

७०. तत्रैव, पृ. ३४७.

७०/अ कार्व्हालो सिसिलिया, पूर्वोक्त, पृ. ६२.

७१. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३४९.

७२. पं. रमाबाई, माझी साक्ष, (अनु. रेव्ह. आर. जोशी), केडगाव, १९६८, पृ. ४५.

७३. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३४९.

७४. Report of the First Annual Meeting of The American Ramabai Associaiton held on March 24, 1899, Page. 13.

७५. Report of the First Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1899, Page. 14.

७६. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ४७.

७७. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (18889 – 1989), Page. 10.

७८. Report of The Third Annual Meeting of The American Ramabai Association held on March 18, 1901, Page. 33.

७९. Report of the Fourth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 18, 1902, Page. 24.

८०. Letter From Manoramabai to The American Ramabai Association on dated 30th January 1914.

८१. Report of the Nineteenth Annual Meeting of the American Ramabai Association held on March 24, 1917, Page. 33.

८२. Report of the Seventh Annual Meeting of The American Ramabai Association held on March 13, 1905, Page. 25.

८३. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. १५२.

८४. तत्रैव, पृ. १०६.

८५. पं. रमाबाईंच्या जन्मदिनाच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त काढलेली मुक्ति किरणची विशेष आवृत्ती, २००८, पृ. १९.

८६. Report of the Eighth Annual Meeting of the American Ramabai Association held on March 12, 1906, Page. 25.

८७. Report of the Twenty-fifth Annual Meeting of the American Ramabai Association held on May 10, 1923, Page. 17.

८८. Report of the Twenty-Sixth Annual Meeting of the American Ramabai Association held on May 10, 1924, Page. 19.

८९. पं. रमाबाईंच्या जन्मदिनाच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त काढलेली मुक्ति किरणची विशेष आवृत्ती, २००८, पृ.१९.

९०. Report of the Fifth Annual Meeting of The American Ramabai Association held on March23, 1903, Page. 27.

९१. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989), Page. 24.

९२. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३५१.

९३. Report of Annual Meeting of Ramabai Association held on March 18, 1896, Page. 14.

९४. Report of the Nineth Annual Meeting of The American Ramabai Association held on May 17, 1907, Page. 23.

९५. Treasurers Report for Year 2006-2007 of The American Ramabai Association.

९६. Report of the fifth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 23, 1903, Page. 23.

९७. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989),Pg. 24.

९८. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989),Pg. 24.

९९. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989),Pg. 24.

१००. Report of the Fifteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1913, Page 22.

100/अ Report of the Nineteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1917, Page. 13.

१०१. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३५१.

१०२. कार्व्हालो सिसिलिया, पूर्वोक्त, पृ. ५५.

१०३. दिघे प्रभाकर, पूर्वोक्त, पृ. ३३२, ३३३.

१०४. Report of the Eighth Annual Meeting of The American Ramabai Association held on March12, 1906, Page. 13.

१०५. Report of the colonel of the Inspecting and Sanitary Commission Under date of Janaury 23, 1906.

१०६. Report of the First Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1899, Page. 27.

१०७. Report of the First Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1899, Page. 27.

१०८. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा २२ व्या वार्षिक सभेचा अहवाल (१५ एप्रिल १९२०), पृ.२२.

१०९. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989),Pg. 37.

११०. Report of the First Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1899, Page. 28.

१११. Report of the First Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1899, Page. 28.

११२. Report of the Twenty-Fourth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 29, 1922, Page. 23.

११३. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989),Pg. 37.

११४. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३६६, ३६७.

११५. तत्रैव, पृ. ३६७.

११६. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ.१९.

११७. Report of the Twenty-Fourth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 29, 1922, Page. 23.

११८. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा सन१९१७ च्या वार्षिक सभेचा अहवाल, पृ.१८.

११९. Report of the Twenty-Fourth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 29, 1922, Page. 23, 24.

१२०. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा सन१९०२ च्या वार्षिक सभेचा अहवाल,पृ. २४.

१२१. Report of the First Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1899, Page. 29.

१२२. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा सन१९०३ च्या वार्षिक सभेचा अहवाल, पृ.२५.

१२३. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा सन१९०४ च्या वार्षिक सभेचा अहवाल, पृ.१७.

१२४. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा सन१९०६ च्या वार्षिक सभेचा अहवाल, पृ.२४.

१२५. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा सन१९०६ च्या वार्षिक सभेचा अहवाल, पृ.२२.

१२६. Report of the Seventh Annual Meeting of The American Ramabai Association held on March 13, 1905, Page. 25.

१२७. Report of the Nineth Annual Meeting of The American Ramabai Association held on May 17, 1907, Page. 19.

१२८. Report of the Tenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 23, 1908, Page. 23.

१२९. Report of the Tenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 23, 1908, Page. 15.

१३०. मुक्ति किरण, चर्च शताब्दी अंक, केडगाव, १९९९, पृ. १३, १४.

१३१. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ.१४७.

१३२. तत्रैव, पृ. १४७.

१३२/अ Report of the Annual Meeting of The American Ramabai Association held on April 14, 1918, Page. 22.

१३३. Report of the Sixteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 23, 1914, Page. 14.

१३४. Report of the Sixteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 23, 1914, Page. 15.

१३५. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. १३६.

१३६. Report of the Twenty-Sixth Annual Meeting of The American Ramabai Association held on April 14, 1918, Page. 21.

१३७. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा सन१९२० च्या वार्षिक सभेचा अहवाल पृ.२४.

१३८. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा सन१९२१ च्या वार्षिक सभेचा अहवाल पृ.१७.

१३९. Report of the Twenty-Second Annual Meeting of The American Ramabai Association held on April 15, 1920, Page. 19.

१४०. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ४६.

१४१. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा सन१९२० च्या वार्षिक सभेचा अहवाल पृ.२४.

१४२. Report of the Twenteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on April 14, 1918, Page. 22.

१४३. Report of the Fifteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1913, Page. 24.

१४४. कार्व्हालो सिसिलिया, पूर्वोक्त, पृ. ५४.

१४५. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा सन१९१३ च्या वार्षिक सभेचा अहवाल पृ.२३.

१४६. द अमेरिकन रमाबाई असोशिएशनचा सन१९१३ च्या वार्षिक सभेचा अहवाल पृ.२५.

१४७. Report of the Twenteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on April 14, 1918, Page. 23.

१४८. Report of the Eighteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 28, 1916, Page. 25.

१४९. Report of the Twenty – Second Annual Meeting of The American Ramabai Association held on April 5, 1920, Page. 23.

१५०. Report of the Nineteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 20, 1917, Page. 28.

१५१. Report of the Fifteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1913, Page. 29.

१५२. Report of the First Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1899, Page. 27.

१५३. Report of the First Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1899, Page. 27.

१५४. Report of the First Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1899, Page. 28.

१५५. Report of the Nineth Annual Meeting of The American Ramabai Association held on May 17, 1907, Page. 22, 23.

१५६. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. १०६.

१५७. Report of the Fifteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 24, 1913, Page. 30.

१५८. Report of the Eighteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 28, 1916, Page. 25.

१५९. Report of the thirteenth Annual Meeting of The American Ramabai Association held on March 28, 1911, Page. 28.

१६०. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989),Pg. 15.

१६१. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ५

१६२. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ.१०७.

१६३. गद्रे कृष्णाबाई, पूर्वोक्त, पृ. ८.

१६४. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. १०७.

१६५. तत्रैव, पृ. ४७.

१६६. Assemblies of God Heritage Vol.2 No. 4 (Article by William t. Ellis – Pentecostal Revival touches India)

१६७. Centenary Edition, Annual Report Prayer Bell - )(1889 – 1989),Pg.28.

१६८. मुक्ति किरण, चर्च शताब्दी अंक, केडगाव, १९९९, पृ. १८.

१६९. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ४४९.

१७०. तत्रैव, पृ. ४४८, ४४९.

१७१. Artical by Helen Dyer, Pandita Ramabai – The Story of the great Revival at Mukti, India, 1905, Page. 3.

१७२. मुक्ति किरण, चर्च शताब्दी अंक, केडगाव, १९९९, पृ. ११.

१७३. टिळक दे. ना., पूर्वोक्त ,पृ. ४५३.

१७४. तत्रैव, पृ. ४५५.

१७५. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. ४७.

१७६. वैद्य सरोजिनी, संक्रमण, पुणे १९८५, पृ. ६८.

१७७. देवधर जोत्स्ना, रमाबाई, मुंबई, १९८९, पृ. १६२.

१७८. Centenary Edition, Annual Report Prayer Bell – (1889 – 1989),Pg. 28.

१७९. रानडे प्रतिभा, पूर्वोक्त, पृ. १०.

१८०. Clementina Butler, Pandita Ramabai Saraswati, Fleming H. Revell Company Publication, London, 1922, Page. 76.

१८१. जोगळेकर मृणालिनी, पूर्वोक्त, पृ. १९८.

१८२. तत्रैव, पृ. १९८.

१८३. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. ४६.

१८४. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. १३८.

१८५. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. १८.

१८६. Report of the Twenty-Fifth Annual Meeting of The American Ramabai Association held on May 10, 1923, Page. 15.

१८७. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. १५.

१८८. कोसंबी मीरा, पूर्वोक्त, पृ. १४३.

१८९. मुक्ति किरण, विशेष अंक व मिशन संचलकांचा वार्षिक अहवाल २०१०–११,पृ.२६.

१९०. तत्रैव, पृ.२६.

१९१. तत्रैव, पृ. २६.

१९२. Annual Report of Ramabai Mukti Mission, 1956.

१९३. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. १८.

१९४. Centenary Edition, Annual Report of Prayer Bell – (1889-1989), Page. 11.

१९५. Centenary Edition, Annual Report of Prayer Bell – (1889-1989), Page. 12.

१९६. Centenary Edition, Annual Report of Prayer Bell – (1889-1989), Page. 12.

१९७. Centenary Edition, Annual Report of Prayer Bell – (1889-1989), Page. 12.

१९८. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. २०.

१९९. Report of the Twenty-Sixth Annual Meeting of The American Ramabai Association held on May 10, 1924, Page. 7.

२००. Report of the Twenty-Sixth Annual Meeting of The American Ramabai Association held on May 10, 1924, Page. 7.

२००/अ मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. ३४.

२०१. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती,२००८, पृ. ३४.

२०२. Centenary Edition, Annual Report of Prayer Bell – (1889-1989), Page. 14.

२०३. Centenary Edition, Annual Report of Prayer Bell – (1889-1989), Page. 14.

२०३/अ Centenary Edition, Annual Report of Prayer Bell – (1889-1989), Pg 14.

२०४. Report of the Twenty-Fifth Annual Meeting of The American Ramabai Association held on May 10, 1923, Page. 15.

२०५. Report of the Twenty-Sixth Annual Meeting of The American Ramabai Association held on May 10, 1924, Page. 17.

२०६. कर्वे धों. के., आत्मचरित्र व चरित्र, हिंगणे स्त्री संस्था, पृ. १६७.

२०७. शारदासदन शाळेचा कालपट

२०८. Time Chart published by Pt. Ramabai Mukti Mission.

२०९. Santion Letter by Inspectors of Girl, Letter No. 3, GrantPhy. (Education), 6338, Poona, dated 5th January 1950.

२१०. Centenary Edition, Annual Report of Prayer Bell – (1889-89), Pg 20.

२११. Centenary Edition, Annual Report of Prayer Bell – (1889-89), Pg 20.

२१२. मुक्ति प्रेअर बेल वार्षिक अहवाल १९३३.

२१३. मुक्ति प्रेअर बेल वार्षिक अहवाल १९३३.

२१४. मुक्ति प्रेअर बेल वार्षिक अहवाल १९८९, पृ. २५.

२१५. मुक्ति प्रेअर बेल वार्षिक अहवाल १९८९, पृ. २५.

२१६. मुक्ति प्रेअर बेल वार्षिक अहवाल १९८९, पृ. २५.

२१७. The Annual Report of The christian and Missionary Alliance in India for the year 1929, Page 62, 63.

२१८. मुक्ति प्रेअर बेल वार्षिक अहवाल १९८९, पृ. २५.

२१९. मुक्ति प्रेअर बेल वार्षिक अहवाल १९८९, पृ. २६.

२२०. मुक्ति प्रेअर बेल वार्षिक अहवाल १९८९, पृ. ३८.

२२१. मुक्ति प्रेअर बेल वार्षिक अहवाल १९८९, पृ. ३८.

२२२. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. ६.

२२३. Article by Helen Dyer, named ‘Pandita Ramabai – The Story of the Great Revival at Mukti, India, 1905, Page. 3.

२२४. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. ७.

२२५. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. ७.

२२६. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ४७९.

२२७. The Annual Report of The Christian and Missionary Alliance in India for the year 1927, Page. 87.

२२७/अ Annual Reports of The English Counsil of Ramabai Mukti Mission for year Ending March 2009.

२२८. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. ९.

२२९. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. ९.

२३०. मुक्ति प्रेअर बेल वार्षिक अहवाल १९८९, पृ. ४१.

२३१. Centenary Edition, Annual Report of Prayer Bell – (1889-89), Pg. 20.

२३२. The Annual Report of The Christian and Missionary Alliance in India for the year 1927, Page. 84.

२३३. Report of the Twenty – Sixth Annual Meeting of the American Ramabai Association held on May 10, 1924, Page. 8.

२३४. टिळक दे. ना., पूर्वोक्त, पृ. ३८९.

२३५. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. ८.

२३६. The India Alliance Report, 1925.

२३७. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००८, पृ. ७.

२३८. The Annual Report of The Christian and Missionary Alliance in India for the year 1927, Page. 87.

२३९. मुक्ति किरण, विशेष आवृत्ती, २००७, पृ. ७.

२४०. चर्च शताब्दी अंक, १९९९, पृ. १२.

२४१. Pandita Ramabai will on dated March 7' 1922.

२४२. The Annual Report of Christian and Missionary Allience, 1927, Page 84.

२४३. Mission's Director's Annual Report 2010-11, Page, 16.

२४४. The Annual Report of the Christian and Missionary Allience, 1929 Pg. 63.

२४५. मुक्ति किरण विशेष आवृत्ती, २००८, पृ. ३६.

२४६. तत्रैव, पृ. ३६.

२४७. तत्रैव पृ. १९.

# प्रकरण ६ वे

# उपसंहार

## ६.१ प्रस्तावना :

सदरच्या प्रबंधामध्ये पंडिता रमाबाई व त्यानी स्थापन केलेल्या मुक्ति मिशनच्या कार्याचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास करताना शारदासदनचे स्थापनेचे वर्ष सन १८८९ ते मुक्ति मिशनचे शताब्दी वर्ष सन १९८९ हा कालखंड विचारात घेतलेला आहे. या शंभर वर्षातील पंडिता रमाबाई व त्यांच्या पश्चात मुक्ति मिशनने केलेल्या स्त्री सुधारणा विषयक कार्याचे विश्लेषण व मूल्यमापन केले आहे.

सदरच्या प्रबंधामध्ये पंडिता रमाबाईंच्या विचारांचे व स्त्री विषयक कार्याचे वेगळेपण स्पष्ट केले आहे. पंडिता रमाबाईंनी आपले स्त्री सुधारणा विषयक विचार प्रत्यक्ष कृतीमध्ये उतरविले. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये स्त्री उद्धाराचे कार्य केले. त्यांच्या मृत्यूनंतर मुक्ति मिशनने स्त्री सुधारणेचा वारसा दीर्घकाळ चालविला. या बाबींचे तटस्थपणे व नि:पक्षपपातीपणे विश्लेषण या प्रबंधामध्ये केले आहे. पंडिता रमाबाईंच्या धर्मांतरामुळे दुर्लक्षित राहिलेले त्यांचे लोकोत्तर कार्य प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला आहे. एक ख्रिस्ती संस्था म्हणून समाजाच्या टीकेचे लक्ष झालेल्या मुक्ति मिशनच्या कार्यावर प्रकाश टाकला आहे. पंडिता रमाबाई व मुक्ति मिशनच्या कार्याचे ऐतिहासिक मूल्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये पंडिता रमाबाई व मुक्ति मिशनचे स्त्री सुधारणा विषयक कार्य अत्यंत महत्वाचे असूनही पंडिता रमाबाई व मुक्ति मिशनच्या कार्याची उपेक्षा का झाली? याचा अभ्यास या प्रबंधामध्ये केलेला आहे.

या प्रबंधातील पहिले प्रकरण ‘प्रास्ताविक व संशोधन पध्दती’असे आहे. या प्रकरणामध्ये अभ्यासाची भूमिका, अभ्यास विषय निवडण्याची कारणे, संशोधनाची उद्दिष्टे, पूर्व संशोधनाचा आढावा, संशोधनाची गृहीतके व संशोधन पध्दती या मुद्द्यांच्या स्पष्टीकरणार्थ लेखन केले आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये ‘पंडिता रमाबाईंच्या समकालीन स्त्री जीवनाचा’ अभ्यास केला आहे. पंडिता रमाबाईंच्या स्त्री सुधारणा कार्याचे महत्व व मूल्य समजून घेण्यासाठी त्यांच्या समकालीन स्त्री जीवनाचा अभ्यास केला आहे.

या प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये पंडिता रमाबाईंच्या प्रारंभिक जीवनाचा आढावा घेतला आहे. सन १८५८ ते सन १८८८ या कालाखंडामध्ये त्यांची स्वतंत्र व्यक्ती म्हणून जडणघडण कशी झाली, त्या समाज सुधारणेसाठी कशा सिध्द झाल्या. याचा अभ्यास केला आहे.

या प्रबंधाच्या चौथ्या प्रकरणामध्ये पंडिता रमाबाईंचे शारदासदनाच्या म्हणजेच सन १८८९ ते १८९८ या कालखंडातील कार्याचा अभ्यास केला आहे. शारदासदनाची स्थापना तेथील स्त्री सुधारणा कार्य व समाजाचा विरोध या बाबींचा प्रामुख्याने अभ्यास केला आहे. शारदासदनामध्ये विधवांच्या सबलीकरणासाठी झालेल्या कार्याचा आढावा घेतला आहे.

या प्रबंधातील पाचव्या प्रकरणामध्ये मुक्ति मिशनच्या स्थापनेपासून ते शताब्दी वर्ष अखेरीपर्यंतच्या कालखंडातील माहितीचा आढावा घेतला आहे. सन १८९८ ते १९८९ या मुक्ति मिशनच्या कालखंडाचे दोन भाग पडले आहेत. सन १८९८ ते सन १९२२ या काळातील मुक्ति मिशनच्या कार्याचा अभ्यास करताना पंडिता रमाबाईंचे कार्य केंद्रभागी मानले आहे. पंडिता रमाबाईंच्या मृत्यूनंतर सन १९२३ ते १९८९ या काळात मुक्ति मिशनचा कारभार विविध अधिक्षिकांनी सांभाळला. त्यामुळे मुक्ति मिशनच्या स्त्री सुधारणा कार्याचा अभ्यास स्वतंत्रपणे केला आहे.

## ६.२ समकालीन सुधारकांच्या तुलनेत पंडिता रमाबाईंच्या कार्याचे महत्व :

एकोणिसाव्या शतकामाध्ये बाळशास्त्री जांभेकर, विष्णुबवा ब्रह्मचारी, ज्योतिबा फुले, लोकहितवादी, म. गो. रानडे, गो. ग. आगरकर, रा. गो. भांडारकर इत्यादी समासुधारक समाज परिवर्तन घडून आणण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्या समाजसुधारणेच्या संकल्पनेमध्ये व पंडिता रमाबाईंच्या समाज सुधारणेच्या संकल्पनेमध्ये बरेच साधर्म्य आढळते. एकात्मता, समता, समाजातील सर्वांच्याहिताची कळकळ, समाज व्यवस्थेतील बदल, समाज सुधारणेचा स्विकार करणारा उदार दृष्टिकोन ही एकोणिसाव्या शतकातील समाज सुधारणा प्रवाहाची वैशिष्ट्ये होती. हीच वैशिष्ट्ये पंडिता रमाबाईंच्याविचारांमध्ये व कार्यामध्ये दिसून येतात. मानवाचे हित पाहणे हा धर्माचा गाभा आहे असे पंडिता रमाबाईंचे मत होते. एकोणिसाव्या

शतकातील प्रबोधनाच्या केंद्रभागी मानवतावाद सुधारकांच्या कार्यामध्ये दिसून येतो. हाच मानवतावाद पंडिता रमाबाई व मुक्ति मिशनच्या कार्यामध्येही दिसून येतो.

तत्कालीन सुधारकांना सामाजिक चौकटीत राहिल्यामुळे एक सुरक्षितता लाभली होती. काही सुधारक प्रमुख विचारधारेतील सुधारक म्हणून काम करीत होते. धर्माचे, समाजाचे, कुटुंबाचे पाश शाबूत ठेवून सुधारणा कार्य सुधारकांकडून होत होते. पंडिता रमाबाईंना अशी सामाजिक व कौटुंबिक सुरक्षितता लाभली नाही. त्यांच्या मागे कुटूंबाची प्रतिष्ठा नव्हती. जातीच्या व धर्माच्या सुरक्षिततेचा लाभ त्यांना मिळाला नाही. अशा परिस्थितीत त्या स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगल्या. स्त्री सुधारणेचे कार्य करताना अनेक धाडसी निर्णय स्वत:च्या जबाबदारीवर घेऊ शकल्या. सामाजिक बंड करण्यासाठी त्यांची सिध्दता होऊ शकली. त्या स्त्री उध्दाराचे परिघाबाहेरील कार्य करु शकल्या.

एकोणिसाव्या शतकामध्ये 'ख्रिस्ती धर्मांतर थोपविणे' हा सुध्दा समाज सुधारणेचा एक भाग मानला जात होता. पंडिता रमाबाईंनी स्वत: धर्मांतर करुन तत्कालीन सुधारणा प्रक्रियेलाच धक्का दिला. पंडिता रमाबाईंना धर्मांतरामुळे सुधारकांचा रोष पत्करावा लागला. असे असूनही स्त्री सुधारणेच्या महत्वाच्या प्रश्नाचा स्वतंत्रपणे व जबाबदारीने विचार करु शकतो हे दाखवून दिले.

एकोणिसाव्या शतकामध्ये समाज प्रबोधनाला चालना देताना सुधारकांनी स्त्री सुधारणेला महत्वाचे अंग मानले. त्यासाठी लोकोपयोगी संस्था काढणे व चालविणे, व्याख्याने देऊन जागृती करणे, ग्रंथ रचना करणे, वृत्तपत्र चालविणे इत्यादी कामे केली. पंडिता रमाबाईंनी हेच कार्य स्वत:च्या बळावर व स्वत:च्या अंत:प्रेरणेतून केले. अनेक सुधारकांचे सुधारणा विचार साहित्य निर्मिती पुरतेच मर्यादित राहिले. पंडिता रमाबाईंनी स्त्री सुधारणा विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. विधवा, अनाथ, पतित, अपंग स्त्रियांच्या उध्दारासाठी संपूर्ण जीवन समर्पित केले. त्यांच्या कार्याचा वारसा मुक्ति मिशनने अखंडितपणे चालविला. यामुळेच समकालीन सुधारकांच्या तुलनेत पंडिता रमाबाईंच्या कार्याचे वेगळेपण जाणवते. एकोणिसाव्या शतकामध्ये समाज सुधारणा क्षेत्रातही पुरुषांची मक्तेदारी होती. या पार्श्वभूमीवर या क्षेत्रामध्ये पंडिता रमाबाईंच्या रुपाने स्त्री नेतृत्त्व निर्माण झाले ही बाब वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

पंडिता रमाबाईंनी तत्कालीन काळातील कोणत्याही सुधारकापेक्षा सर्वाधिक प्रवास केला होता. अगदी लहानपणापासून ते तारुण्यापर्यंत भारतातील सर्व प्रांतामध्ये भटकंती केली होती. तेथील स्त्रियांच्या समान परिस्थितीचे अवलोकन केले होते. भारताबाहेर इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, जपान, हाँगकाँग अशा देशांचा प्रवास केला होता. तेथे वास्तव्य करुन जागतिक समाज स्थितीचे अवलोकन केले होते. थोडक्यात पंडिता रमाबाईंनी कोणत्याही समकालीन सुधारकांपेक्षा जास्त समाज पाहिला होता. या अनुभवाच्या जोरावर त्या भारतीय समाजाची चिकित्सा अगदी प्रगल्भपणे करु शकत होत्या. या अनुभवातूनच पंडिता रमाबाईंच्या कार्याचे विविध पैलू निर्माण झाले होते. विधवा असूनही सन्मानाने वावरणारी स्त्री म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली होती. पुरुष समुदायामध्ये स्त्री नेतृत्त्व निर्माण करणारी स्त्री म्हणून त्या पुढे आल्या होत्या. सभा संमेलनामध्ये अनेक सामाजिक विषय त्यांनी मांडले होते. समाजकारणात हिरीरीने सहभाग घेणारी स्त्री म्हणून त्यांचे कौतुक होत होते. भारतीय स्त्रियांच्या उध्दारासाठी परदेशातून आर्थिक मदत आणणाऱ्या त्या पहिला महिला होत्या. संस्था पातळीवर सेवाकार्य करणाऱ्या स्त्री म्हणून त्यांचे कार्य दखल घेण्याजोगे होते. असे अनेक पैलू भारतीय स्त्रियांसमोर पंडिता रमाबाईंच्या जीवनातून समोर येतात. त्यांच्या जीवनातील हेच पैलू त्यांचे सामर्थ्य होते. या सामर्थ्याचा वापर पंडिता रमाबाईंनी सामाजिक बांधिलकीच्या पूर्ततेसाठी केला होता.

एकोणिसाव्या शतकातील सुधारकांनी स्त्री सुधारणा विचारांना प्राधान्य दिले. त्यासाठी तत्कालीन सुधारकांनी पुरुष वर्गाचे प्रबोधन करण्यावर भर दिला. पंडिता रमाबाईंनी स्त्री सुधारणेचे कार्य प्रत्यक्ष स्त्रियांच्या सहवासात राहून केले. त्यांनी स्त्रियांच्या हक्काचा व अस्मितेचा सतत पाठपुरावा केला. स्त्री सुधारणेची ऊर्मी प्रत्यक्ष स्त्रियांमध्ये निर्माण केली. आजच्या काळातील स्त्री मुक्ती संकल्पनेचे बीजारोपण त्यांच्या कार्यातून झाले.

आज स्त्री वादाची (Feminism) व्याख्या "An awareness of woman's oppression and explotation in society and conscious action to change this situation"[१] स्त्री वादामध्ये स्त्रियांमध्ये स्वअस्तित्त्वाची जाणीव निर्माण करणे महत्वाचे मानले जाते. पंडिता रमाबाईंनी स्त्रियांच्या जीवनामध्ये जाणीव जागृती निर्माण केली. पंडिता रमाबाईंनी ही जाणीव जागृती उच्चवर्णीय, सुशिक्षित स्त्रियांमध्ये निर्माण केली असती तर त्यांचे कार्य सुलभ झाले असते. मात्र त्यांनी हे कार्य अनाथ, निराधार, पतित, अपंग, अंध,परितक्त्या

स्त्रियांसोबत राहून केले. ज्या स्त्रियांची समाजात किंमत कवडीमोल होती. अशा स्त्रियांच्या जीवनाला आकार प्राप्त करुन दिला. पंडिता रमाबाईंनी हे कार्य शारदासदन व मुक्ति मिशन या संस्थांद्वारे सलग ३४ वर्षे केले. मुक्ति मिशनने हा वारसा गेली ९० वर्षे चालविला.

भारतीय स्त्रियांची दु:खे दूर करण्याचे एवढे सशक्त कार्य त्या काळात कोणत्याही स्त्री वा पुरुषांकडून झालेले दिसत नाही. पंडिता रमाबाईंनी विधवांसाठी केलेल्या कार्यामुळेच विधवांविषयी भारतीय समाजाची अनुकूल मानसिकता तयार झाली. पंडिता रमाबाईंनी भारतीय समाजामध्ये दुर्दैवी स्त्रियांविषयी करुणा व वात्सल्य निर्माण केले. विधवा पुनर्विवाहाची संकल्पना त्यांच्यामुळे समाजात रुजू लागली. त्यांनी स्त्री शिक्षण व बालशिक्षणाचा उत्साह समाजात निर्माण केला. त्यांच्यामुळे अंध, अपंग स्त्रियांच्या अस्तित्त्वाचा समाज जाणीवपूर्वक विचार करु लागला. पतित स्त्रियांविषयी समाजामध्ये सहानुभूतीची भावना निर्माण झाली.

पंडिता रमाबाईंनी स्त्री ची प्रतिष्ठा हा पुरस्कृत केलेला सर्वात मोठा विचार होता. स्त्रियांना शिक्षणात, समाजात, कुटूंबात, व्यवसायात, धर्मात पुरुषांइतकेच समान स्थान व हक्क हवेत असा आग्रह पंडिता रमाबाईंनी धरला. विधवेला पुनर्विवाहानंतरही इस्टेटीत वारसा मिळाला पाहिजे हा पुरोगामी विचार मांडला. मर्जीविरुध्द विवाह झाल्यास किंवा नवऱ्याशी पटत नसल्यास तिला घटस्फोट घेण्याचा अधिकार असला पाहिजे हा क्रांतीकारी विचार मांडला. पति पत्नीतील नाते परस्पर पूरक व मित्रत्त्वाच्या पातळीवर असावे. हा आधूनिक विचार मांडला. पती हा परमेश्वर आहे हा पारंपारिक विचार त्यांनी नाकारला. हा विचार स्त्री दास्यत्त्वाला प्रोत्साहन देतो असे त्या मानत होत्या. स्त्री–पुरुषाचे नाते बरोबरीचे असावे अशी ठाम भूमिका वेळोवेळी घेतली.स्त्रियांच्या सबलीकरणाचा मार्ग आर्थिकतेतून जातो याची जाणीव त्यांना होती. म्हणूनच पंडिता रमाबाईंनी शारदासदन व मुक्ति मिशनमध्ये पारंपरिक शिक्षणाबरोबर व्यावसायिक शिक्षण सुरु केले. आधुनिक काळातील स्त्री सबलीकरणाची संकल्पना पंडिता रमाबाईंनी एकोणिसाव्या शतकातच प्रत्यक्षात आणली होती. महाराष्ट्रात नऊवारी ऐवजी पाचवारी साडी नेसण्यास महिलांनी सुरुवात करण्यामागे पंडिता रमाबाई यांचेच प्रयत्न होते. पाचवारी साडी नेसणे सहज सोपे आहे, सुसह्य आहे व आर्थिकदृष्ट्याही परवडणारे आहे. त्या काळात स्त्रियांच्या वेशात हा बदल करणेही त्यांना खूप अवघड गेले होते. पण रमाबाईंनी ही चळवळ

चालूच ठेवली. तो केवळ कपड्यांचा मुद्दा नव्हता, तर स्त्री स्वातंत्र्य, स्वयंनिर्णयाचा हक्क हे मुद्दे महत्वाचे होते.

एकोणिसाव्या शतकामध्ये संमतीवयाच्या बिलाचा मुद्दा बराच गाजला. "लोकहितवादी, जोतिबा फुले, रानडे, तेलंग, आगरकर इत्यादी सुधारकांनी संमती बिलाच्या बाजूने पाठिंबा दिला. तर टिळकांच्या नेतृत्त्वाखालील सनातनी लोकांनी सुधारकांना विरोध केला."[२] पंडिता रमाबाईंनी संमती वयाबाबतचा विचार मांडताना तत्कालीन प्रचलित व प्रमाणित विचारांना मागे टाकले. त्यांच्या मते "आठ ते वीस शिक्षणाचे वय असते. या वयात बुध्दी अपरिपक्व असते. समागमनानंतर येणाऱ्या मातृत्त्वाची जबाबदारी पेलण्याची शारीरिक व मानसिक तयारी झालेली नसते. तेव्हा २० वर्षांपूर्वी लग्न करु नये."[3] पंडिता रमाबाईंनी तत्कालीन सुधारकांच्या कक्षेबाहेर जावून विचार मांडले. पंडिता रमाबाईंचे विचार व त्याचा स्त्री जीवनावर झालेला परिणाम तपासला तर असे लक्षात येते की, आजच्या काळातील स्त्रियांविषयीचे कायदे त्यांच्याच विचारांचा परिपाक असल्याचे जाणवते.

लिंगानुसार भूमिका (Gender Role) हा भारतीय स्त्री जीवनाचा स्थायीभाव आहे. तत्कालीन सुधारकांनी या भूमिकेशी फारकत घेतलेली दिसत नाही. आजही समाज लिंगानुसार भूमिका या विचाराला चिकटून आहे. मुक्ति मिशनमध्ये या भूमिकेला छेद देत सर्व कामे स्त्रियाच करीत होत्या. "मुक्ति मिशनमधील सर्व उद्योगांसाठी पंडिता रमाबाई प्रथम बाहेरुन प्रशिक्षित माणसे बोलावत व मुली एकदा त्यांच्या हाताखाली तयार झाल्या की, त्यांना रजा देत."[४] अशाप्रकारे संपूर्ण स्त्रियांचे व्यवस्थापन असणारी मुक्ति मिशन ही संस्था वैशिष्ट्यपूर्ण होती. अशाप्रकारे लिंगानुसार भूमिका या पारंपरिक विचाराला आव्हान पंडिता रमाबाईंनी दिले व ते यशस्वीपणे पेलले असे म्हणावे लागेल.

पंडिता रमाबाईंनी समाज सुधारणेची आदर्श उभारणी केली. त्यांनी सुधारणेची व्याप्ती पांढरपेशा वर्गाच्या परिघाबाहेर नेली. त्यामध्ये दलित व शोषित वर्गाला सामावून घेतले. एकोणिसाव्या शतकातील सुधारक प्रामुख्याने उच्चवर्णीय समाजाला समोर ठेऊन सुधारणा कार्य करीत होते. (याला अपवाद जोतिबा फुलेंचा होता.) पंडिता रमाबाईंनीही शारदासदनची निर्मिती उच्चवर्णीय विधवांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी केली होती. मात्र पुढील काळात

पंडिता रमाबाईंचे कार्य मानव मुक्तीच्या दिशेने गेले. त्या दलित व शोषित स्त्रियांच्या उद्‌धारासाठी झटल्या.

पंडिता रमाबाई स्वत: ब्राम्हण जातीतील होत्या. तरीही विषमतावादी जाती अभिमान त्यांनी कधीही बाळगला नाही. हेच विचार त्यांनी पुढे प्रत्यक्षात कृतीमध्ये उतरविले. मुक्ति मिशनमध्ये दाखल झालेल्या मुली व स्त्रिया भिन्न प्रांतीय, भिन्न धर्मीय व भिन्न जातीय होत्या. जातीच्या परिघाबाहेर जाऊन दलित व शोषित मुली व स्त्रियांना त्यांनी मुक्ति मिशनमध्ये आश्रय दिला. "महाराष्ट्रातील स्त्री आंदोलनाचा इतिहास पाहिला तर या काळात केवळ एकच स्त्री शूद्रातिशूद्र स्त्रियांचा विचार करणारी दिसते, ती म्हणजे रमाबाई."[५] असे स्त्री अभ्यासक डॉ. ज्योती लांजेवार लिहितात. पंडिता रमाबाईंनी हजारो दलित व शोषित स्त्रियांना मुक्ति मिशनमध्ये सामावून घेतले होते. याबाबतीत पंडिता रमाबाईंनी जोतिराव फुले यांची परंपरा पुढे चालविली होती असे म्हणावे लागेल. पंडिता रमाबाईंनी याच कार्याचा वारसा चालू ठेवला होता. या संदर्भात प्रभाकर वैद्य लिहितात की, "महात्मा फुले यांनी उपदेशिलेल्या स्त्री शुद्र सेवेच्या कार्यक्रमातील प्रत्येक तपशील पंडिता रमाबाईंनी कसोटीने व निष्ठेने आमलात आणला."[६] यावरुन पंडिता रमाबाईंच्या स्त्री सुधारणा कार्य त्यांच्या समकालीन सुधारकांच्या तुलनेत महत्वाचे होते. भारतीय स्त्री मुक्तीच्या प्रवर्तक म्हणून त्यांचे स्थान महत्वपूर्ण आहे. पंडिता रमाबाईंच्या कार्याचे महत्त्व विषद करताना खालील विचारवंतांनी मांडलेली मते विचारात घेतली आहेत.

१. श्रीमती शोभा पाटील–"स्त्री शिक्षणाचे व स्त्री मुक्तीचे कार्य करण्यात पं. रमाबाईंचे योगदान फार मोठे आहे."[७]

२. धनंजय किर–"पांडित्य आणि प्रतिभा असलेली एकोणिसाव्या शतकातील स्त्री म्हणून पंडिता रमाबाईंचा उल्लेख केला जातो."[८]

३. प्रभाकर वैद्य–"आपल्या कार्यामध्ये संपूर्ण भारतीयत्त्व टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न त्यांनी जन्मभर केला. राजनिष्ठा राजकारणापासून त्या जन्मभर कटाक्षाने अलिप्त राहिल्या. पं. रमाबाईंची सेवा राजकारणापासून दूर होती. कारण त्यांच्या दृष्टीने समाजकारण महत्त्वाचे होते."[९]

४. दि.२४ नोव्हेंबर १८९२ च्या बॉम्बे गॅझेटमध्ये एका इंग्रजी लेखकाने पंडिता रमाबाईंचे केलेले मूल्यांकन–"पंडिताबाईंना 'Modern Apostle of Culture' 'नव संस्कृतीची अग्रदूत' असे म्हटले आहे. शेवटी तो लिहीतो आम्ही तिच्याकडे आमच्या जित साम्राज्यातील एक स्त्री म्हणून पाहतो पण अमेरिकन माणूस तिच्याकडे बरोबरीची कॉम्रेड म्हणून पहात होते."[१०]

५. मृणालिनी जोगळेकर–"Sense of belongingness' हा जो प्रत्येक व्यक्तीला धरुन ठेवणारा घटक असतो तो रमाबाईंच्या जीवनात दृढ झालेला जाणवत नाही. त्यामुळे देशाच्या, धर्माच्या सीमा ओलांडताना त्यांना मागे खेचणारे पाश फारसे नसावेत असे वाटते."[११]

६. डॉ अनंत राऊत–"सावित्रीबाई फुले यांच्यानंतर स्त्री शिक्षण व स्त्री स्वातंत्र्यासाठी स्वत:स समाजसेवेला वाहून घेणाऱ्या स्त्रियांमध्ये पंडिता रमाबाई यांचा अग्रक्रमाने विचार करावा लागतो."[१२]

७. डॉ. अनंत राऊत–"कुठल्याही समाज सुधारकाचा धर्म महत्वाचा नसतो तर त्याने केलेले काम महत्त्वाचे असते. त्या कामामधून किती जणांचे जीवन सुखी झाले ही गोष्ट महत्त्वाची असते. या संदर्भात पंडिता रमाबाईचे काम अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून त्यांना अनाथमाता म्हणण्यास काहीही हरकत नाही."[१३]

८. डॉ. स्मिता शिंदे–"पंडिता रमाबाई भारतातील स्त्रीवादाच्या प्रणेत्या होत्या. त्यांनी स्त्रियांच्या सक्षमतेसाठी, स्वावलंबनासाठी आणि वंचित स्त्रियांसाठी मोलाचे योगदान दिले आहे."[१४]

९. शहा ए. बी.–"Pandita Ramabai Saraswati (1858-1922) was the greatest woman produced by modern India and one of the greatest Indian in all history. Her achievement as a champion of women's right and as a pioneer inthe field of womens' education and social reform."[१५]

१०. मधु मंगेश कर्णिक–"आजच्या महाराष्ट्रातील महिला वर्गाला मिळालेले स्वातंत्र्य आणि स्त्रीत्वाबद्दलच्या अस्मितादर्शक भावना या साऱ्यांचा जन्म पंडिता रमाबाईंच्या

सुधारणावादी भूमिकेमध्ये असल्याचे आढळून येते. त्या दृष्टीने आजच्या महाराष्ट्राने त्यांचे सदैव ऋणाईत राहिले पाहिजे."[१६]

११. डॉ. सिसिलिया कार्व्हालो–"पंडिता रमाबाईंनी मानवता धर्माची धरलेली आस, माणसाला माणूस म्हणून विशेषत: स्त्रीला माणूस म्हणून ओळखण्यासाठी केलेली प्रयत्नांची पराकाष्ठा यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व सदैव उज्ज्वल असेच राहिले आहे."[१७]

१२. रेव्ह. आर. जोशी– "पंडिता रमाबाई ह्या हजारो दुर्दैवी, दु:खी, बालविधवा आणि निराश्रित अनाथांकरीता आत्मबलीदान करणारी 'माता' असामान्य संत होत्या."[१८]

१३. मृणालीनी जोगळेकर– "एकोणिसाव्या शतकातील सर्व सुधारकांपेक्षाही एकट्या रमाबाईचे कर्तृत्त्व, विचार, उच्चार व आचार असे सर्वांगाने अधिक बहरले होते. त्यामुळे मराठी पुरुषाला स्त्री सामर्थ्याची जबरदस्त प्रतिती सलामीलाच आलेली आहे. आजच्या स्त्रीवर विशेषत: मराठी स्त्रीवर रमाबाईंचे केवढे हे ऋण म्हणायचे!"[१९]

१४. महर्षि धों. के. कर्वे– "अशा पराक्रमी स्त्रिया हिंदुस्थानातच काय, पण भूतलावर एकेकाळी हाताच्या बोटांनी मोजण्याइतक्या सुध्दा मिळावयाच्या नाहीत."[२०]

१५. सरोजीनी देवी नायडू– "हिंदू धर्मातील संत मंडळींच्या नामावलीत पंडिता रमाबाई ह्या पहिल्या ख्रिस्ती संत म्हणून त्यांचा समावेश हिंदू धर्म करीतल."[२१]

१६. Dr. N. McNicol – "The first Christian to be enrolled in the calendar of Hindu Saints."[२२]

१७. नारायण वामन टिळक– "वेगवती नदीप्रमाणे कधीही अडून न राहणारी त्यांची इच्छाशक्ती, एखाद्या वीरालाही लाजवील असले त्यांच्या अंगी असलेले शौर्य, त्यांचे अमर्याद औदार्य, ज्याला बांध म्हणून ठाऊक नाही असले त्यांचे विचार स्वातंत्र्य, पारिजातकाप्रमाणे भरगच्च फुललेले त्यांचे प्रेम इत्यादी नैसर्गिक गुण पाहिल्यावर बुध्दी थक्क होऊन जाते."[२३]

१८. मुक्ता अशोक टिळक– "हजारो मैलांची भटकंती, शिक्षण, विद्वत्ता, विवाह, परदेशगमन, ख्रिस्ती धर्मांगिकार, स्त्रियांसाठी केलेले प्रचंड मोठे कार्य, बालविवाह, केशवपन, मद्यपान यांच्या विरोधातील चळवळी, हिंदी राष्ट्रभाषा व देवनागरी लिपीचा आग्रह अशा गोष्टींतून त्यांचे आगळेपण, थोरत्त्व दिसून येते."[२४]

१९. सौ. आनंदीबाई कर्वे– “विधवांच्या शिक्षणाप्रमाणे पोरक्या मुलांबद्दल कळकळ पंडिताबाईंच्याच आचरणाने माझ्या मनात उत्पन्न झाली. पुढे माझ्या आयुष्यात मी जी अनेक पोरकी मुले पाळली त्याचे बीज यातच आहे.”[२५]

२०. सरोजीनी वैद्य– “एका सामाजिक शोकनाट्याची नायिका”[२६]

२१. सरोजिनी वैद्य– “कर्व्यांचा अनाथ बालिकाश्रम व रानड्यांचे सेवासदन ही हिंदू समाजाला उभी करावी लागलेली रमाबाईंची स्मारकेच आहेत.”[२७]

२२. य. दि. फडके–“एकोणिसाव्या शतकात केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध भारतात सार्वजनिक जीवनात असामान्य कर्तृत्त्व गाजविणाऱ्या स्त्रियांची संख्या हाताच्या बोटावर मोजता येण्याजोगी आहे. या मोजक्या स्त्रियांमध्येही पंडिता रमाबाईंना अग्रस्थान दिले जाते.”[२८]

२३. आचार्य प्र. के. अत्रे–“Ramabai’s illuminating and inspiring life, stands like a lighthouse leading and guiding the people of India and is like an immortal, unforgettable novel, conceived and written by God!”[२९]

२४. डॉ. स्वाती कर्वे–“अत्यंत निष्ठेने काम करण्याची मनोवृत्ती, तळमळ, कामात झोकून देणे, कष्ट करण्याची तयारी या गुणांनीच पं. रमाबाईंचे जीवन आणि कार्य ऐतिहासिक घटना ठरते.”[३०]

२५. सु. धों. रामटेके–“पंडिता रमाबाई थोर व अग्रेसर स्त्री समाज सेविका आणि आदर्श ख्रिस्ती महिला होत्या.”[३१]

२६. भारतीय टपाल खाते–“अनंतशास्त्री डोंगरे यांची धाकटी कन्या पंडिता रमाबाई या समाज सुधारीका, महिलांच्या दास्यमुक्तीच्या कैवारी आणि शिक्षणाच्या अग्रेसर प्रणेत्या होत्या.”[३२]

२७. M. Santoshkumar – “Pandita Ramabai became a one women army to raise the status of women, by educating girls and empowering women.”[३३]

२८. ज्ञानोदय–“हिंदू स्त्री दुःख परिमार्जन शकास इ.स. ११ मार्च १८८९ रोजी आरंभ झाला. ह्या शककर्तीचे नाव पं. रमाबाई होय.”[३४]

२९. वि. द. घाटे–"पं. रमाबाई व ना. वा. टिळक हे महाराष्ट्रात ख्रिस्त झाले. पण त्यांनी ख्रिस्तालाच हिंदू केले."[३५]

३०. Clementina Butlar – "Pandita Ramabai proved to the whole Indian society that this unfortunate class could be made not only happy, but also be equipped for service to the community, when given a chance for education and proper development oftheir talents. for this India must thank Ramabai's memory for centuries to come!"[३६]

३१. आनंदीबाई जोशी (पहिल्या भारतीय स्त्री डॉक्टर)–"पंडिता रमाबाईंनी आपल्या धैर्याने मोठ–मोठ्या योध्यासही खाली पहावयास लावले."[३७]

३२. काशिबाई कानिटकर–"ज्या दोन स्त्रिया रमाबाई व आनंदीबाई अमेरिकेस गेल्या. त्यांनी आपल्या कृतीने दहा पुरुषांपेक्षा एका स्त्री ची योग्यता जास्त आहे असे दाखविले."[३८]

३३. Clementina Butlar – "Pandita Ramabai is unique. I have travelled in Africa, in Egypt. I have seen richer women, more clever women. But I have not met with a noble woman than Pandita Ramabai and she has devoted her energy, her time, her everything to the cause which she has undertaken."[३९]

३४. Uma Chakravarti – "Ramabai had all the elements required for a great character. She was articulate, learned, confident, and forceful woman from 19th century."[४०]

३५. William I. Ellis – "Pandita Ramabai the Hindoo widow's friend is known among educated people all over the world."[४१]

३६. Jayanti Chakraborty – "Pandita Ramabai stands out as a role model to many woman of contemporary times and can be considered apt to be labelled as the 'Indian women of the millenium'... She laid the foundation of a movement for women's liberation in India."[४२]

३७. Robert Ellisberg – "Pandita Ramabai, a poet, scholar and champion of the rights of women, has been acclaimed as a "mother of modern India... Ramabai had become the leading advocate for the rights and welfare of women in India."[४३]

३८. Dr. Rajendra Prasad – “Pandita Ramabai’s example and her attainments can go along way in inspiring our women with these virtues.”[४४]

३९. Dr. Robert A. Hume – (Representative in India of the American Ramabai Association) “No other India lady has given to many many thousands of people in many lands, so high an example of learning, devotion, goodness, courage and administrative ability, as this remarkable christian scholar, saint and servant of humanity, Pandita Ramabai Medhavi.”[४५]

४०. प्रबोधनकार के. सी. ठाकरे–“स्त्रियांना शिक्षण दिलेच पाहिजे आणि बाल किंवा तरुण विधवांचे असले हाल कायमचे नाहिसे झालेच पाहिजेत. या निर्धाराने समाजाची निंदा, छळ, उपहास सोसून ज्या अनेक सुधारकांनी धडाडीचे प्रयत्न केले त्यात पंडिता रमाबाई अग्रेसर अबलोद्‌धारक म्हणून महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासात चिरंजीव झाल्या आहेत.”[४६]

४१. विशाल मंगलवाडी– “The woman who began reforming India’s attitude towards women was Pandita Ramabai Saraswati – a builder of modern India, Pandita Ramabai is the Indian woman of the millennium.”[४७]

वरील विचारवंत, लेखक यांची पंडिता रमाबाईंविषयी व्यक्त केलेल्या मतांवरुन त्यांचे एकोणिसाव्या शतकातील स्त्री सुधारणा कार्याचे महत्व स्पष्ट होते.

पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या मुख्या इमारतीच्या दर्शनी भागावर एक आकर्षक फलक लावला आहे. या फलकावर पंडिता रमाबाईंचे स्त्री सुधारणा कार्याचे महत्व विशद करणारी वाक्ये लिहीली आहेत. ती पुढीलप्रमाणे

Pandita Ramabai

Woman of Honour

1. The first woman to be given the title Pandita and Saraswati.
2. The first woman in India to get Kaiser-e-Hind award.
3. The first woman in the world who translate the Bible in Marathi language.
4. The first woman to encourage the education of woman doctors in India.

5. The first woman who suggested Hindi to be our national language.
6. The first woman to invent Marathi Braille / type set.
7. The first woman to organize cottage industry, specially the making and wearing of Khadi.
8. The first woman to organize wide – spread relief work for orphans and widow during famine.
9. The first woman to organized kindergarten system of education.
10. The first woman who raised her voice for the rights of woman against authority.

या माहिती फलकावरील माहितीवरुन पंडिता रमाबाईंचे तत्कालीन सुधारकांच्यामध्ये स्थान महत्त्वपूर्ण होते हे लक्षात येते.

## ६.३ पंडिता रमाबाई व मुक्ति मिशनचे कार्य दुर्लक्षित का राहिले ?

पंडिता रमाबाई व मुक्ति मिशनचे स्त्री सुधारणा कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. पंडिता रमाबाईंचे स्त्री सुधारणेविषयीचे विचार व कार्य क्रांतीकारक होते. तरीही त्याचे श्रेय पंडिता रमाबाईंना योग्य न्यायाने मिळाले असे दिसत नाही. मुक्ति मिशनच्या कार्यास सामाजिक गौरवाचे स्थान मिळाले असे घडले नाही. समाज सुधारणेच्या इतिहास लेखनामध्ये पंडिता रमाबाईच्या कार्याकडे दुर्लक्ष झाले. तत्कालीन समाज सुधारकांच्या पंक्तीमध्ये त्यांचे नाव फारच उशीराने आले.

खरे तर भारतीय समाजामध्ये १९७० च्या दशकामध्ये स्त्री वादाचा जन्म झाला. स्त्रियांची पारंपरिक भूमिका बदलण्याचा प्रयत्न होऊ लागला. त्यासाठी स्त्री वादाच्या विचारांची आद्य केंद्रे इतिहासात शोधण्याचा प्रयत्न अभ्यासक करु लागले. अभ्यासकांचा हा शोध एकोणिसाव्या शतकामध्ये जावून स्थिर झाला. याच शतकामध्ये स्त्रीवादाची बीजे रोवणाऱ्या सुधारकांच्या कार्याकडे अभ्यासकांचे लक्ष गेले. तत्कालीन काळातील स्त्री सुधारणेचे कार्य करणाऱ्या सुधारकांच्या बरोबर पंडिता रमाबाईंच्याही कार्याचा अभ्यास करणे अनिवार्य ठरले. तरीही पंडिता रमाबाईंच्या कार्याला सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने योग्य स्थान मिळाले नाही.

एकोणिसावे शतक हे सामाजिक सुधारणांसाठी विरोध पर्वाचा काळ होता विसावे शतक उपेक्षा पर्वाचा काळ होता व आजचे एकवीसावे शतक उत्साह पर्वाचा काळ आहे. पंडिता रमाबाईंना एकोणिसाव्या शतकामध्ये विरोध पर्वाला सामोरे जावे लागले. तर त्यांच्या मुक्ति मिशनच्या बाबतीत विरोध पर्वाचा कालखंड विसाव्या शतकापर्यंत सुरु होता. पंडिता रमाबाई व मुक्ति मिशनच्या वाट्याला आलेले उपेक्षा पर्व दीर्घकाळ सुरु राहिले. पंडिता रमाबाईंच्या वाट्याला आलेल्या उपेक्षेसंदर्भात टिळक दे. ना. लिहितात, "जगाने पंडिता रमाबाईंना ओळखले आहे. भारताने मात्र ओळखले की नाही कोण जाणे!"[४८]

बर्नार्ड शॉ फार मोठा नाटककार होता. त्याने सेन्ट जोन नावाचे नाटक लिहिले. या नाटकाचा शेवट त्याने पुढील शब्दांत केला आहे. तो लिहीतो, "Oh God, Thou madest this beautiful earth. When will it be ready to receive. Thy saints? How long, O Lord, How long?"[४९]

अगदी अशीच काहीशी स्थिती पंडिता रमाबाईंच्याबाबतीत झालेली दिसते. त्यांच्या कार्याचा स्विकार करण्यास समाज किती काळ लावणार आहे हा प्रश्न पडतो. भारतीय समाजातील स्त्रियांच्या उद्धारासाठी झटणाऱ्या मुक्ति मिशनला समाजाचा आश्रय कधी मिळणार हा प्रश्न पडतो. पंडिता रमाबाईंचे कार्य दुर्लक्षित राहिले की, तत्कालीन समाजाने त्यांच्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले. या विषयी मतमतांतरे असू शकतात. मात्र त्यांच्या कार्याची इतिहासाने ठळकपणे दखल घेतली गेली नाही हे सत्य नाकारता येत नाही. याच गोष्टींचा मागोवा घेताना पंडिता रमाबाईंच्या जीवनातील काही घटनांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे लागते.

पंडिता रमाबाईंचे जीवन विलक्षण घटनांनी भरलेले आहे. तत्कालीन समाजाला न रुचणाऱ्या अनेक घटनांची मालिका त्यांच्या जीवनात घडत होती. पंडिता रमाबाईंचे वडील अनंतशास्त्री डोंगरे यांनी आपल्या पत्नीला संस्कृत शिकविण्याचा प्रयत्न केला होता. त्यासाठी त्यांना अनेक धर्म पंडितांशी शास्त्रवाद घालावा लागला. ही बाब समाज विसरलेला नव्हता. अनंतशास्त्री डोंगरे यांनी तत्कालीन धार्मिक जाणिवांना धक्का लावला होता. त्यामुळे समाजाचा रोष पंडिता रमाबाईंवर वारशाने आला होता. पंडिता रमाबाई स्वत: स्त्री असून संस्कृत विद्या शिकलेल्या होत्या. अनेक संस्कृत धर्मग्रंथ त्यांचे तोंडपाठ होते. एखाद्या स्त्री ने धर्मग्रंथांचा अभ्यास करणे, त्यावर प्राविण्य मिळविणे ही बाब तत्कालीन समाजाला सहज मान्य होणारी

नव्हती. याशिवाय पंडिता रमाबाईंचे वयाच्या २२ व्या वर्षापर्यंत अविवाहीत राहणे ही बाब तत्कालीन समाजाला मानवणारी नव्हती. पंडिता रमाबाईंचे विवाहापूर्वीचे जीवन तत्कालीन स्त्री जीवनाच्या पारंपरिक कल्पनांना छेद देणारे होते. त्यामुळे समाज त्यांच्या विषयी नकारात्मक विचार करीत होता.

पंडिता रमाबाईंचा विवाह आंतरजातीय, आंतरप्रांतीय होता. प्रांत, भाषा, जात या संकूचित विचारसरणीच्या समाजाला पंडिता रमाबाईंचा विवाह सामाजिक बंड वाटला. “एका बंगाली शुद्र माणसाच्या घरात आमची कोकणस्थ ब्राह्मणाची चित्पावन शास्त्र्यांची मुलगी त्याचं उष्ट शेण करायला स्वत:हून गेली. बुडाला ना धर्म!अशी प्रतिक्रिया समाजामध्ये उमटली. पंडिता रमाबाईंनी बिपीन बिहारी दास मेधावी या शुद्र तरुणाशी विवाह करुन आगरकर, रानडे, गोखल्याचं नाक कापलं असा आरोप समाजाने केला.”[५०] अशा प्रकारे पंडिता रमाबाईंच्या विवाहाने समाजाच्या धर्म भावना दुखावल्या गेल्या. पंडिता रमाबाईंनी आंतरजातीय विवाह करुन मोठे पाप केले असे समाज समजू लागला. पुढे पंडिता रमाबाईंना कन्या झाली व अल्पावधीत वैधव्य प्राप्त झाले. त्यांनी धर्मबाह्य कृत्य केले त्याची शिक्षा म्हणून देवाने त्यांना वैधव्य दिले असा तर्क समाजामध्ये रुढ झाला.

पंडिता रमाबाई सन १८८३ मध्ये इंग्लंडला गेल्या. समुद्रमार्गे इंग्लंडला जाणारी ती पहिली भारतीय स्त्री होती. पंडिता रमाबाईंचे परदेशगमन ही तत्कालीन समाजाला आवडले नाही. त्यांनी इंग्लंडला जाण्याचे ठरविल्यावर त्यांच्या प्रवासाला हरकत घेणारी अनेक पत्रे आली. या पत्रांना उत्तर देण्यासाठी पंडिता रमाबाईंनी ‘माझा इंग्लंडचा प्रवास’ हे पुस्तक लिहिले. खरं तर यावेळी पंडिता रमाबाई तरुण होत्या. इंग्लंडसारख्या चैनबाजीच्या मुलखात त्या जाणार होत्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या एकाकी होत्या. यामुळे तेथे अकल्पित काहीतरी घडून येईल अशी भिती समाजाला वाटत होती. इंग्लंडला ख्रिश्चन लोकांशी संपर्क येईल यावर ही समाज आक्षेप घेत होता. म्हणूनच वयोवृध्द झाल्यावर इंग्लंडला जा असा अनाहूत सल्ला या पत्रातून दिला होता. पंडिता रमाबाईंच्या परदेशगमनातून त्यांच्या चारित्र्याविषयीची शंका व धर्मांतराची शक्यता या दोन गोष्टीची भिती समाजाला वाटत होती. मात्र पंडिता रमाबाईंनी समाजाने घेतलेल्या हरकतींकडे फारसे लक्ष दिलेले दिसत नाही. भारतीय महिलांचा उद्धार

करण्याच्या उदात्त भावनेने त्या इंग्लंडला गेल्या. त्यामुळे समाज नाराज झाला. समाजाची ही नाराजी अखेरपर्यंत टिकून राहिली.

पं. रमाबाईंच्या कार्याकडे समाजाचे दुर्लक्ष होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यांनी केलेले ख्रिस्ती धर्मांतर होय. पंडिता रमाबाईंनी धर्मांतर करुन हिंदू समाजाचा उरलासूरला विश्वास गमावला. "धर्मांतर घडले नसते तर आजसुध्दा त्यांच्याकडून होऊन गेलेल्या प्रत्यक्ष कार्याच्या बळावर आपण त्यांना फुले, आगरकर, कर्वे यांच्या इतकेच महत्त्वाचे व मानाचे स्थान देत राहिलो असतो."[५१] पं. रमाबाईंनी धर्मांतर टाळले असते तर कदाचित सुधारकांशी कृतज्ञ असणाऱ्या हिंदू समाजाने त्यांना आपल्या देव्हाऱ्यातच ठेवायचे बाकी ठेवले असते.

पं. रमाबाईंच्या धर्मांतरामुळे त्यांच्या कार्याची फारशी दखल शासन पातळीवर घेतलेली दिसत नाही. "सन १९५८ या वर्षी जन्म शताब्दी वर्षात समाजसेवक महर्षी धोंडो केशव कर्वे या पहिल्या मराठी माणसाला भारतरत्नाने सन्मानित करण्यात आले."[५२] स्त्री सुधारणेच्या इतिहासामध्ये पितृतूल्य व्यक्तिमत्त्व म्हणून ते ओळखले जातात. महर्षी धों. के. कर्वे यांनी स्त्री सुधारणा कार्याची प्रेरणा पंडिता रमाबाईंच्या कार्यातून घेतली होती. पंडिता रमाबाईंचे ऋण त्यांनी आपल्या आत्मवृत्तातून व्यक्त केले आहे. असे असूनही महर्षी कर्व्यांच्या संस्थेला समाजाकडून मोठी मदत मिळत गेली. या पार्श्वभूमीवर पंडिता रमाबाई व त्यांच्या मुक्ति मिशन या संस्थेला उपेक्षा सहन करावी लागली. महर्षी कर्वे व पंडिता रमाबाई या दोन्ही स्त्री सुधारकांचे जन्म शताब्दी वर्ष सन १९५८ होते. एकीकडे महर्षी कर्वे यांना भारतरत्न सारख्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले गेले. महर्षी कर्वे यांच्या कार्यासाठी स्फुर्ती, प्रेरणा देणाऱ्या पंडिता रमाबाईंच्या कार्याची फारशी दखलही घेतली गेली नाही. हे अत्यंत खेदाने लिहावे लागते. या कारणाचा शोधही पं. रमाबाईंच्या धर्मांतरापर्यंत येऊन पोहोचतो. जे कार्य महर्षी कर्वे यांनी हिंदू धर्मात राहून केले तेच कार्य पंडिता रमाबाईंनी ख्रिश्चन धर्मामध्ये राहून केले. त्यामुळे समाजाने त्यांच्या कार्याची उपेक्षा केली.

पं. रमाबाईंच्या कार्याविषयी मधु मंगेश कर्णिक लिहितात की, "जे काम सावित्रीबाई फुले यांनी हिंदु धर्मामध्ये राहून केले त्याच प्रतीचे कार्य पंडिता रमाबाईंनी धर्मांतरानंतरही तत्कालीन महाराष्ट्रामध्ये केले. स्त्री स्वातंत्र्याचा उद्धार व विचार महाराष्ट्रामध्ये रमाबाईंनी त्या काळात प्रकर्षाने प्रगट केला."[५३] सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षणासाठी फार मोठी कामगिरी

केली. मात्र त्यांच्या कार्याची उभारणी जोतिराव फुले यांच्या भक्कम पाठिंब्यावर झाली होती. त्या तुलनेत पं. रमाबाई एकाकी होत्या. आंतरजातीय विवाह व धर्मांतर यामुळे त्या जाती बहिष्कृत व धर्म बहिष्कृत झाल्या होत्या. अशाही अवस्थेत पं. रमाबाई स्त्री सुधारणेचे कार्य एकटीच्या बळावर करीत राहिल्या. आज सावित्रीबाईच्या कार्याचा वारसा सांगणारी पिढी समाजामध्ये तयार झाली. त्या तुलनेत पं. रमाबाईंच्या कार्याचा वारसा अभिमानाने मिरवणारी पिढी तयार झाली नाही. त्यामुळे त्यांचे कार्य दुर्लक्षित राहिले.

एकोणिसाव्या शतकामध्ये समाज सुधारणा क्षेत्रामध्ये फार मोठ्या उंचीचे सुधारक होऊन गेले. ह्यामध्ये जोतिबा फुले, आगरकर, लोकहितवादी, रानडे, विष्णुशास्त्री पंडित इत्यादी नावे घेतली जातात. हे सर्व सुधारक मुळचे महाराष्ट्रातील होते. त्यांच्या कार्यासाठी स्थानिक असण्याचा निश्चितच फायदा झालेला होता. हे सुधारक मूळचे स्थानिक असल्यामुळे स्थानिक समाजाचा विरोध ते सहजपणे मोडून काढू शकले. पंडिता रमाबाई ह्या मूळच्या महाराष्ट्रातील नव्हत्या. त्यांचे कुटुंब भटकंतीच्या काळात महाराष्ट्रामध्ये कधीही स्थिर झाले नव्हते. थोडक्यात पंडिता रमाबाईंना महाराष्ट्राने घडविले नव्हते. सन १८८२ मध्ये वैधव्य प्राप्त झाल्यानंतर त्या महाराष्ट्रात आल्या. महाराष्ट्रामध्ये प्रागतिक सुधारकांनी निर्माण केलेल्या वातावरणामुळे त्यांनी आपली कर्मभूमी महाराष्ट्र निवडली. स्त्रियांच्या उन्नतीसाठी महाराष्ट्रातून स्त्री नेतृत्त्वाची गरज होती. ती गरज पंडिता रमाबाईंच्या नेतृत्त्वाने पूर्ण केली. त्यांच्या परप्रांतीयत्त्वामुळे महाराष्ट्राला त्याना समाजाच्या आश्रयापासून दूर ठेवणे सहज शक्य झाले. महाराष्ट्राच्या भूमिकन्येचा मान त्यांना मिळाला नाही. कानडी स्त्री म्हणून त्यांच्या वाट्याला उपेक्षा आली. परिणामी त्यांचे कार्य दुर्लक्षित राहिले.

एकोणिसाव्या शतकामध्ये समाजसुधारणा चळवळीचे नेतृत्त्व करणाऱ्या स्त्रियांची संख्या अत्यंत कमी आहे. या काळामध्ये सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, आनंदीबाई कर्वे या स्त्रियांची नावे प्रामुख्याने घेतली जातात. या स्त्रिया तत्कालीन सर्वसामान्य स्त्रियांचे जीवन जगल्या होत्या. या स्त्रियांनीही पारंपरिक स्त्री जीवनाची चौकट ओलांडण्याचा फारसा प्रयत्न केला नाही. या स्त्रियांना उत्तुंग व्यक्तिमत्त्व असलेले पती लाभले. त्यांनी आपल्या पतीच्या समाज कार्याच्या परिघात राहून आपापल्या पतीच्या कार्यात मदत केली. या तुलनेत पं. रमाबाईंचा विवाह तत्कालीन समाजासाठी धक्का होता. त्यांच्या सामाजिकीकरणामध्ये त्यांचा

आंतरजातीय विवाह प्रमुख अडसर होता. त्यांनी केलेले समाज कार्य पतीकडून वारशाने मिळालेले नव्हते. तरीही पं. रमाबाई एकटीच्या बळावर स्त्री सुधारणा कार्य करीत होत्या. विधवा शिक्षणाचा अत्यंत संवेदनशीलविषय प्रत्यक्ष कृतीमध्ये आणला. त्यांच्या कार्याला जेव्हा समाजाचा विरोध होऊ लागला. तेव्हा त्यांच्या भोवती पती रक्षणाची सोय नव्हती. त्यांच्या पाठिंब्यासाठी जवळचे सगे सोयरे नव्हते. त्यामुळे पंडिता रमाबाईंच्या कार्याचे उदात्तीकरण समाजाकडून झाले नाही. ते उपेक्षित राहिले.

एकोणिसाव्या शतकातील जोतिबा फुले, आगरकर, लोकहितवादी व इतर समाज सुधारक त्यांच्या ग्रंथ कतृत्त्वामुळे समाजाच्या स्मरणात राहिले. पं. रमाबाई थोर साहित्यिक होत्या. त्यांचे सुरुवातीचे स्त्री धर्मनीती हे पुस्तक सोडले तर इतर साहित्य इंग्रजीमध्ये होते किंवा ख्रिस्ती धर्मातील अध्यात्मावर होते. पं. रमाबाईंनी ‘हाय कास्ट हिंदू वूमेन’ हे क्रांतीकारी पुस्तक इंग्रजीतून लिहिले. ते अमेरिकेमध्ये लोकप्रिय झाले. पण त्या काळात ते स्थानिक भाषेमध्ये उपलब्ध झाले नाही. त्यामुळे त्या पुस्तकाचा प्रभाव स्थानिक समाजावर निर्माण होऊ शकला नाही. पं. रमाबाईंनी मोठ्या प्रमाणावर लिहिलेली पुस्तके ख्रिस्ती धर्माला केंद्रीत मानून लिहीली. त्या साहित्यातून समाज परिवर्तनाची उर्मी नष्ट झाली. त्या साहित्याला ख्रिस्ती अध्यात्म पुस्तिकांचे स्वरुप प्राप्त झाले. पं. रमाबाईंनी बायबलचे मराठीमध्ये भाषांतर केले. या साहित्याचे प्रयोजन बायबल वचनांचा प्रसार करणेसाठी केले असे वाटते. येशू भक्तीचा गौरव करणारे साहित्य अशी मर्यादा त्यांच्या लिखाणाला निर्माण झाली. परिणामी आपल्या साहित्याद्वारे समाजाला आपल्या सुधारणावादी विचारांची ओळख करुन देण्याची संधी पं. रमाबाईंनी दवडली. त्यामुळेच पं. रमाबाईंचे विचार व कार्य उपेक्षित राहिले.

प्रत्येक व्यक्ती जन्मापासूनच त्याला प्राप्त झालेल्या जातीचे व धर्माचे प्रतिनिधीत्व करत असतो. या नियमाला सुधारकही अपवाद नव्हते. समाज सुधारकांनी जातिभेदाच्या पलिकडे जाऊन समाज कार्य केले. तरीही त्यांची जात व धर्म त्यांची ओळख म्हणून त्यांच्या अनुयायांनी शाबूत ठेवलेली दिसते. धर्मनिष्ठेतून जातिनिष्ठेतून निर्माण झालेला इतिहास एकांगी, आग्रही व तर्कदृष्ट असतो हे समजून घेण्याची मानसिकता सर्वसामान्य समाजाची असल्याचे दिसत नाही. त्यामुळे प्रत्येक धर्मनिष्ठ व जातिनिष्ठ समाज आपलाच धर्मसमूह वा जातिसमूह श्रेष्ठ आहे असे मानत असतो. त्यासाठी आपापल्या धर्मातील व जातीतील गौरवस्थाने तो इतिहासामध्ये

शोधण्याचा प्रयत्न करतात. “धर्मासाठी व जातीसाठी इतिहास राबविण्याचा उद्योग सर्व धर्म जातीकडून होत असतो.”[५४] या सामाजिक मानसिकतेतून जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्या. रानडे, आगरकर, आण्णा भाऊ साठे इत्यादी सुधारकांच्या जाती समूहाने या सुधारकांचे उदात्तीकरण केले. त्यांच्या अनुयायांनी या सुधारकांच्या कार्याचे विस्मरण होऊ दिले नाही. राजकीय मंडळींनी राजकीय गणिते समोर ठेवून सुधारकांच्या कार्याचे उदात्तीकरण केले. पं. रमाबाई स्वत: जातिबहिष्कृत व धर्मबहिष्कृत असल्यामुळे त्यांच्या कार्याचे उदात्तीकरण करण्यासाठी कोणीही पुढे आले नाही. अगदी स्थानिक ख्रिस्ती समाजामध्येही पं. रमाबाईंच्या कार्याविषयी फारशी आपुलकी असल्याचे दिसत नाही. ख्रिस्ती समाज पंडिता रमाबाईंच्या मानवतावादी कार्याला विसरला. ख्रिस्ती धर्म श्रेष्ठत्त्वाच्या परिकल्पनांना तो अधिक महत्त्व देऊ लागला. त्यामुळे ख्रिस्ती समाजाकडूनही पं. रमाबाईंच्या कार्याची उपेक्षा झाली.

आजच्या काळामध्ये सिंधुताई सकपाळ ह्या अनाथांच्या माता म्हणून सुपरिचित आहेत. सिंधुताई सकपाळ यांच्यावर निघालेल्या चित्रपटामुळे त्यांचे कार्य घराघरामध्ये पोहोचले. त्या स्वत: समाजामध्ये व्याख्याने देत आपल्या कार्याचा प्रसार करु लागल्या. असेच सेवाकार्य पं. रमाबाईंनी शारदासदन व मुक्ति मिशनमध्ये केले. अनाथांचा सांभाळ करण्याचे व्रत मुक्ति मिशनने आजही जपले आहे. पंडिता रमाबाई मुक्ति मिशनच्या स्थापनेनंतर फारशा समाजामध्ये गेलेल्या आढळत नाहीत. सन १९०५ ते सन १९२२ या दीर्घ कालखंडात त्यांनी बायबलचे मराठी भाषांतर केले. या काळात त्या पूर्णपणे अलिप्त व संन्यस्त जीवन जगल्या. सिंधुताई सकपाळ यांचे कार्यमोठे आहे पण या सेवाकार्याला त्यांनी व्यवहारवादाची जोड दिली आहे. पं. रमाबाईंनी आपल्या सेवाकार्याला अध्यात्माची जोड दिली आहे. “सर्वांचे ख्रिस्तीकरण झाले नाही तर त्यांची उन्नतीच होणार नाही हे ही ठामपणे त्यांनी मानले.”[५५] ही बाब समाजाला मान्य झाली नाही. समाजाचा एक सर्वसाधारण नियम आहे तो म्हणजे जी गोष्ट समाजाला आवडत नाही, त्या गोष्टीला समाज प्रथम विरोध करतो, त्यातून काही साध्य झाले नाही तर समाज त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. शारदासदनाच्या कालखंडामध्ये पं. रमाबाईंच्या कार्याला फार मोठा विरोध केला व मुक्ति मिशनच्या कालखंडामध्ये दुर्लक्ष केले.

पं. रमाबाई ह्या धर्मांतरीत आंतरजातीय विवाह केलेल्या विधवा स्त्री होत्या. त्यांचे हे अस्तित्व तत्कालीन सामाजिक प्रतिष्ठेच्या चौकटीत बसणारे नव्हते. अशा स्त्री ने आपली मर्यादा

सोडून तत्कालीन पुरुषांशी अल्प प्रमाणात का होईना बरोबरी करण्याचा केलेला प्रयत्न समाजाला मान्य झाला नाही. त्यांचा स्त्रियांना स्वातंत्र्याच्या व स्त्री पुरुष समानतेच्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न समाजाला रुचला नाही. तत्कालीन समाज सुधारणा चळवळीचे नेतृत्त्व करण्याची मक्तेदारी पुरुषांकडे होती. ती मक्तेदारी मोडून पं. रमाबाईंनी महनीय कार्य करुन दाखविले. ही सल समाजाच्या मनातून कधीच निघू शकली नाही. याच भूमिकेतून मुक्ति मिशनच्या कार्याकडेही समाजाने दुर्लक्ष केले. पुढील काळात रमाबाई रानडे यांची सेवासदन व महर्षी कर्वेंची अनाथ बालिकाश्रम या संस्था समाजाच्या अभिमानाची केंद्रे बनल्या. समाजाने या संस्थांना मुक्त हस्ते मदत केली. पण हे भाग्य मुक्ति मिशनला मिळाले नाही. गेली शंभरपेक्षा जास्त वर्षे मुक्ति मिशन ही संस्था परदेशी संस्थांच्या मदतीवर अवलंबून आहे.

आज पंडिता रमाबाईंच्या मृत्यूला एक्यान्नव वर्षे झाली. मुक्ति मिशन ही संस्था शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षामध्ये पदार्पण करीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण धर्म निरपेक्ष विचारसरणी स्विकारली आहे. तरीही पंडिता रमाबाईंचे धर्मांतर व मुक्ति मिशनमधील ख्रिस्ती प्रभाव समाजाकडून विसरला गेला नाही. नव्या काळातील नव्या दृष्टिकोनाच्या संदर्भात इतिहासाचे पुनर्लेखन करणे आवश्यक ठरते. पुनर्लेखन करताना नवीन अंगाने त्यांच्या कार्याची पुनर्मूल्यमापने होत राहतात. पंडिता रमाबाईंच्या धर्मांतरामुळे त्यांच्या कार्याच्या मूल्यमापनाची गरज कोणाला वाटल्याचे दिसत नाही. "एखादी उच्चवर्णिय हिंदू मुलगी ख्रिस्ती होत आहे असे दिसताच आपल्या जीवनाच्या गाभाऱ्यालाच कोणीतरी झोंबत आहे असे त्या काळातील नेत्यांसह सर्वांना वाटले आणि त्यांनी रमाबाईंना समाजशत्रू मानले."[५६]

अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी डॉ. आंबेडकरांनी लाखो अनुयायासह हिंदू धर्माचा त्याग केला. तर पंडिता रमाबाईंनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी ख्रिस्ती धर्मांतरे घडवून आणली. दोघांच्याही पुढे हिंदू धर्मातील सामाजिक अन्यायाचे आव्हान होते. हिंदू धर्मामध्ये राहून अस्पृश्य व स्त्रिया यांचा उद्धार शक्य होणार नाही. याच भावनेने डॉ. आंबेडकर व पं. रमाबाई यांच्या जीवनात धर्मांतराची प्रक्रिया घडून आली. डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर हे परिवर्तन मानले तर पं. रमाबाईंचे धर्मांतर राष्ट्रांतर मानले. ही समाजाची संकूचित, पक्षपाती भूमिका आजही ठाम असल्याचे दिसून येते.

## ६.४ पंडिता रमाबाई व मुक्ति मिशनच्या कार्याची आजच्या काळातील गरज :

आजच्या आधुनिक काळामध्ये पं. रमाबाई व मुक्ति मिशनच्या कार्याचे महत्त्व अबाधित आहे. तत्कालीन स्त्री जीवनाशी निगडीत असलेल्या ज्या समस्यांचा विरोधात पंडिता रमाबाईंनी लढा दिला त्या समस्या आजही अस्तित्त्वात असल्याचे दिसते. स्त्रियांच्या सबलीकरणाच्या चळवळी सुरु असल्या तरी समाजाला स्त्रियांच्या सबलीकरणाचे अंतिम उद्दिष्ट गाठता आले नाही. त्यामुळे आजच्या काळातही पं. रमाबाईंच्या विचारांचे व कार्याचे महत्व पटते. त्यांचे विचार व कार्य काळाच्याही पुढे जाणारे द्रष्ट्या समाज सुधारकाचे होते. पंडिता रमाबाईचे स्त्री सुधारणे संदर्भातील विचार आजही उपयुक्त आहे.

पं. रमाबाईंनी स्त्री जीवनाशी निगडीत तत्कालीन रुढी पंपरांवर हल्ला चढविला. अंधश्रध्दांवर प्रहार केले. मात्र आजही श्रध्दा व अंधश्रध्दा यातील फरक करण्याची क्षमता समाजामध्ये आलेली दिसत नाही. अंधश्रध्दामूलक अनेक गोष्टींचे पालन समाजामध्ये होताना दिसते. या पार्श्वभूमीवर पं. रमाबाईंचे विचार समाजाच्या प्रबोधनासाठी महत्त्वाचे ठरतात.

पं. रमाबाईंनी विधवांचे जीवन आनंददायी करण्यासाठी संपूर्ण जीवन समर्पित केले. आजच्या विधवांच्या परिस्थितीमध्ये बराच फरक पडला आहे. शासनाच्या काही योजनांमध्ये विधवा व परितक्त्या स्त्रियांसाठी आरक्षण दिले जाते. याचे बरेचसे श्रेय पं. रमाबाई व समकालीन सुधारकांच्या कार्याला द्यावे लागेल. असे असले तरी विधवांच्या जीवनातील सर्व नकारात्मक बाबी संपल्या आहेत असे नाही. सन १९८१ च्या जनगणना अहवालानुसार भारतामध्ये ग्रामीण भागातील स्त्रियांच्या एकूण संख्येच्या तुलनेत विधवा स्त्रियांचे शेकडा प्रमाण ८.२ असे होते. हेच प्रमाण महाराष्ट्रामध्ये शेकडा ९.२ असे होते. याचा अर्थ आजही विधवांची फार मोठी संख्या समाजामध्ये आहे. स्त्रियांना आलेल्या वैधव्याचा संबंध नशिबाशी जोडला जातो. त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी समाज घेताना दिसत नाही. तरुण वयात विधवा झालेल्या स्त्रियांवर कडक बंधने घातली जातात. त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व समाजाने आजही स्विकारलेले दिसत नाही. या पार्श्वभूमीवर पं. रमाबाईंचे विचार व कार्य महत्त्वाचे वाटतात.

पं. रमाबाईंनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. आज मात्र विधवांचे लग्न करण्यासंबंधी अनेक धार्मिक व सामाजिक अडथळे आहेत. मराठा जातीमध्ये अद्यापही विधवांचा पुनर्विवाह मान्य नाही. दुसऱ्यांदा पाट लावणे हे इतरही काही जातींमध्ये निषिध्दे

मानले जाते. भारतीय समाजामध्ये विवाह योग्य वय असणाऱ्या विधवा स्त्रियांची संख्या मोठी आहे. जातीच्या प्रतिष्ठेपोटी विधवा पुनर्विवाहाला विरोध करणारा सनातनी विचारसरणी अद्यापही अस्तित्वात आहे. त्यामुळे पंडिता रमाबाई व त्यांच्या समकालीन सुधारकांचे कार्य विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

पं. रमाबाईंनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. आज भारताला स्वातंत्र्य मिळवूनही पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार पुरुषांच्या साक्षरतेची टक्केवारी ८२.१४ अशी होती तर स्त्रियांच्या साक्षरतेची टक्केवारी ६५.४६ अशी नोदंविली गेली. साक्षरता या शब्दाच्या व्यापक संकल्पनेचे निकष पाहता स्त्रियांच्या साक्षरतेमध्ये अक्षरज्ञान मजकूराचे लेखन वाचन एवढाच मर्यादीत निकष लक्षात घेतला जातो. खऱ्या साक्षरतेमध्ये जाणीव जागृतीचा महत्त्वाचा निकष दुर्लक्षित केला जातो. त्यादृष्टीने भारतीय स्त्रियांमध्ये विशेषत: ग्रामीण स्त्रियांमध्ये अपेक्षित जाणीव जागृती झालेली दिसत नाही. त्यामुळे स्त्रियांमध्ये जाणीव जागृती होण्यासाठी पं. रमाबाईंचे विचार व कार्य महत्त्वाचे ठरते.

